
१००वा
अंक
छात्र
प्रबोधन
सौर कार्तिक शके १९२२
वर्ष १ अंक २
ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी
अभिनव मासिक
दीपावली
विशेषांक

# संवाद

***प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,***

*अनेकांच्या साहित्यकृतींनी-चित्रकृतींनी-धडपडींनी-कष्टांनी रंगलेला-सजलेला-नटलेला, ज्याची तुमच्यासारखे महाराष्ट्रातील हजारो वाचक अत्यंत आतुरतेने वाट पाहात आहात, असा हा दीपावली विशेषांक त्याच्या सर्व वैशिष्ट्यांसह तुमच्यापर्यंत पोहोचवताना खरोखरच खूप आनंद होतोय! शतकपूर्तीचा हा आनंद तुमच्यासोबत अनुभवताना अजूनच छान वाटतंय!*

*दिवाळी अंकामधलं अंतरंग, त्याचं वैशिष्ट्य पुढील पानापासून तुम्हाला जाणवेलच! या अंकासोबत दिलेल्या भेटीतून प्रवेशद्वारावर लावण्यासाठी एक छानसं तोरण तुम्ही तयार करावं अन् सर्वांच्या स्वागताला सतत हसतमुखाने सज्ज असावं ही अपेक्षा! कोणत्याही शुभप्रसंगी दारावर आपण तोरण बांधतो ते हातातील कार्य निर्विघ्नपणे पार पडेल ही श्रद्धा ठेवून! या श्रद्धेला कृतीची जोड मिळाली म्हणजे अपेक्षित परिणाम साध्य होतो असा अनेकांचा अनुभव! आपणही तो अनुभव घेऊया!*

*दरवर्षीप्रमाणे याही वर्षीच्या दिवाळी अंकामध्ये विशेष लेखमालेत दहा कर्तृत्ववान व्यक्तींनी आपल्या धडपडींचे अनुभव लिहिले आहेत. त्यांनी वयाच्या विशी-पंचवीशीपासून आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर छोटी मोठी स्वप्नं पाहिली, ती ऊराशी बाळगून अथक परिश्रमाने त्याच्या पूर्तीसाठी धडपड केली. अशी विविध क्षेत्रातील 'स्वप्नं जगणारी माणसं' या लेखमालेमध्ये तुम्हाला भेटतील.*

*कधी वाचनातून, कधी ऐकण्यातून, कधी पाहण्यातून अशी भव्यदिव्य कृती करण्याची स्वप्नं आपल्यालाही पडतात, हो ना! पण मग काय होतं त्यांचं? आपण ती कोणाला सांगत नाही. कोणी हसेल, आपल्याला चिडवतील, 'परीक्षेत साधे मार्क मिळवता येत नाहीत अन् म्हणतोय मला अब्दुल कलामांसारखं व्हायचंय' असे संवाद आई-बाबांकडून ऐकायला लागतील, या सगळ्यांमुळे अन् स्वत:बद्दलच शंका निर्माण झाल्यामुळे मग अशी स्वप्नं विझून जातात. पण जे भव्य दिव्य स्वप्नं पाहू शकतात तेच ती प्रत्यक्षात आणण्याची शक्यता असते. ज्यांनी ज्यांनी आपापल्या क्षेत्रामध्ये मोठमोठी कामे केली त्या सर्वांना त्याबाबतची स्वप्ने आधी पडलेली होती, ती धूसर होती पण ती त्यांना खुणावत होती. लोकांनी त्यांना वेडं म्हटलं पण त्यांनी ती स्वप्नं उराशी घट्ट धरून ठेवली, त्यासाठी अथक परिश्रम केले अन् त्या स्वप्नांमधून जी ताकद त्यांना मिळाली त्यातून मोठमोठी कामे उभी राहिली, असं इतिहास सांगतो. तेव्हा तुम्हीही या वयामध्ये भव्यदिव्य स्वप्नं पाहायला हवीत, ती जपून ठेवावीत, त्या दिशेने स्वत:ची तयारी करावी, स्वप्नांमध्येच नुसतं रमून न जाता वास्तवाचं भान ठेवत तुम्हीही त्या स्वप्नपूर्तीच्या वाटेवरचा प्रवास मोठ्या जिद्दीने करावा, त्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!*

*२०२० साली भारत एक विकसित देश होईल असं स्वप्न भारतरत्न अब्दुल कलामांनी आपल्या पुढे ठेवलंय, या दिवाळीत दिव्यांच्या ज्योतींकडे पाहताना या भव्य स्वप्नाचं बीज मनामध्ये रुजवूया अन् धडपडीला प्रारंभ करूया!*

*छात्र प्रबोधनच्या वाटचालीतला हा शंभरावा अंक! एका महत्त्वाच्या टप्प्यावर मोठी झेप घेण्यासाठी छात्र प्रबोधन सिद्ध होतंय! छात्र प्रबोधन हे निव्वळ मासिक नाही हे तुम्ही जाणताच. मासिक म्हणूनही अजून ते अनेकांपर्यंत पोहोचायला हवं आहे पण त्याचबरोबर त्यानिमित्ताने सुरू झालेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाच्या चळवळीला गती येण्यासाठी तुम्हा सर्वांचा पुढाकार, प्रतिसाद भरभरून हवा आहे. तुम्ही तो देणार ना! पुढच्या यशस्वी वाटचालीचे तेच खरं भांडवल आहे.*

*शतकपूर्तीनिमित्त प्रायोगिक स्तरावर स्वतंत्रपणे ग्रामीण व युवा अंकांना आपण प्रारंभ करत आहोत. त्यालाही तुमचा छान प्रतिसाद मिळेल असा विश्वास वाटतो.*

*ही दिवाळी अन् येणारे विक्रम संवत्सर तुम्हां सर्वांना उत्साहाचे अन् चैतन्याचे जावो. तुमच्यातली जिद्द, स्नेहभाव, संवेदनशीलता, अन्यायाविरुद्धची चीड, स्वदेशीबद्दलचा सार्थ अभिमान अन् स्वत:वरचा विश्वास वाढवणारे जावो यासाठी आम्हा सर्वांच्या खूप खूप,*

***अगदी मनापासून शुभेच्छा!***

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

# संपादक मंडळ

महेन्द्र सेठिया B.E. , M.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
दत्ता श्री.टोळ B.A.,B.Com.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.

**संपादक, प्रकाशक, मुद्रक :** महेन्द्र सेठिया
**कार्यकारी संपादक :** वर्षा कुलकर्णी
**संपादन साहाय्य :** सुषमा निसळ, नीलिमा करमरकर
**मुद्रित शोधन:**श्री.उदय हर्षे,श्रीमती गायत्री सेवक

**मुखपृष्ठ :** गिरीश सहस्रबुद्धे
**रेखाचित्रे :** भास्कर सगर,सचिन जोशी, गिरीश सहस्रबुद्धे
**अक्षर जुळणी :** छात्र प्रबोधन,पुणे ३०


**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०,
☎(०२०) ४४७७६९१, ४४७८०९५
**फॅक्स :** ४४९१८०६
E-mail : prabodhini@vsnl.com



**वर्गणी : वार्षिक :** रु. १२५/- **द्वैवार्षिक :** रु.२४०/-
**त्रैवार्षिक :** रु.३५०/- **आजीवन :** रु. २०००/-
**भारताबाहेर वार्षिक वर्गणी:** ३० डॉलर
**या अंकाची किंमत : रु. ५०/-**


## कथा


९. अभयारण्य - डॉ. जयंत नारळीकर
२५. वनपुत्र ताडोबा - सुरेशचंद्र वारघडे
४८. आई, माझं चुकलंच - डॉ.लीला दीक्षत
७३. जग्वार वाघाशी झुंजणारा किशोर - विजय देवधर
१३३. मुघल शाहजादा - निनाद बेडेकर
१४९. विबंधुत्व - मुकुंद जोगळेकर
१६२. वाढदिवसाची भेट - मृणालिनी चितळे
१७१. भुताचा डोंगर - म.वि. कोल्हटकर
१७७. माझी मैत्रिण सोना - सुहासिनी देशपांडे
२००. शखिर सुमनची गंमत - शाम भुर्के
२१३. इमानी इनाम - शकुंतला फडणीस


## ललित


५. जिद्दीचं लोभस रूपं - मल्हार अरणकल्ले
७. दाजीपूरच्या अभयारण्यात - मधुमंगेश कर्णिक
१७. माय ओण गाय - डॉ. रामचंद्र दखिणे
३९. कविता सुचते कशी ? - शांता ज. शेळके
६१. सातमाळ्यातले सहा दुर्ग - आनंद पाळंदे
८१. नवी वाट - रेणू दांडेकर
९५. उगवत्या थंडीतील सकाळ - बजरंग सरोदे
१४५. व्यंगचित्रकारांच्या दृष्टीतून टी.व्ही. - आ.ना.पेडणेकर
१७५. वाचलचि पाहिजे...' ऋतु शैशव' - वर्षा तोडमल
१८४. सूर गवसलेले बीज - प्रवीण दवणे
१९७. गुज गोष्टी - डॉ. विजया वाड
२११. पिल्लू एकटे - हेमा लेले


## कविता


४. निर्धार - रेणू पाचपोर
कळी - संजीवनी बोकील
७१. पु. ल. एक वैभव - मृदुला पाठक
१३१. निसर्गात - डॉ.संगीता बर्वे
आभाळाचे रंग - आश्लेषा महाजन
पाणी - वि.म. कुलकर्णी
१४७. सखी - अंजली कुलकर्णी
कुणी - दत्ता हलसगीकर
संदेश - किशोर पाठक
१५६. कविता शहाण्या प्राण्यांची - कल्याण इनामदार
१८३. शेवटचा साथी - वसंत जोशी
रविवार - इंद्रजित भालेराव
२०५. नवी दिवाळी - रवींद्र भट
सहजीवन - फ.मु.शिंदे
गाणे - डॉ.शंतनू चिंधडे


परवान्याच्या नूतनीकरणाच्या प्रक्रीयेमुळे अंकावर पुन्हा 'वर्ष १' छापायला सुरुवात करावी लागली. प्रत्यक्षात मासिकाचा प्रारंभ, सौर श्रावण, शके १९१४ (जुलै १९९२) ला झाला असून त्यानुसार हा अंक, वर्ष ९ अंक ४ म्हणजेच 'शंभरावा' आहे!

छात्र
# प्रबोधन
दिवाळी २०००

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

## अंतरंग

### विशेष लेख


| | |
|---|---|
| १४. निसर्गाची डिस्कव्हरी | - दिलीप कुलकर्णी |
| ४३. 'स्वदेशी' तात्पुरती व नेहमीची | - डॉ.गिरीश बापट |
| ६५. एक आनंदाचे झाड | - शैलजा देशमुख |
| १६७.पदकं विसरा; बेहोशी आठवा ! | - हेमंत जोगदेव |
| १९३. जेव्हा भावना बोलक्या होतील | - डॉ. आनंद नाडकर्णी |


### विशेष लेखमाला


९७. भव्यदिव्य स्वप्ने उराशी बाळगून त्या दिशेने कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यक्तींचे प्रेरणादायी अनुभव, त्यांच्याच शब्दात !

* डॉ.धनंजय केळकर
* सदानंद दाते
* वासुदेव कामत
* नसीमा हुरजूक
* डॉ. मिलिंद वाटवे
* शरद कापूसकर
* जयकुमार गुंडे
* डॉ. विवेक रानडे
* प्रतिमा कुलकर्णी
* मोहन गुजराथी


### कृति कौशल्य


| | |
|---|---|
| ८. कागदाला आकार देऊया | - डॉ.द.वि.नवाथे |
| ३७. करून तर पाहा | - मेधा सुदुंबरेकर |
| ५५. दिशा: विद्युत चुंबकीय बलाची | - डॉ.सी.के.देसाई |
| ७९. करून तर पाहा | - संगीता केळकर |
| ८५. काही नवं शिकूया - कालिज | - प्रभाकर भावे |
| १९१. बुद्धिला खुराक | - डॉ.वा.ना.दांडेकर |
| २२५. जुन्यातून नवं काही... | - विद्या नारळकर |


### ज्ञान-विज्ञान


| | |
|---|---|
| २१. प्रकाशाच्या वेगाला आव्हान | - डॉ.निवास पाटील |
| ३३. त्रयोदशगुणी विडा | - डॉ.कांचनगंगा गंधे |
| ५७. युग माहिती - तंत्रज्ञानाचे | - गिरीन्द्र कसमळकर |
| ८९. वाळवीची समाज रचना आणि सामोजक जीवन ! | - डॉ.पुरुषोत्तम जोशी |
| १३९.सजीवांचे आकार व आकारमान | - डॉ.पंडित विद्यासागर |
| २१८.भारताची चंद्रावर स्वारी | - डॉ.प्रकाश तुपे |


या दिवाळी अंकासाठी आवर्जून पाठविलेले पुढील मान्यवरांचे दर्जेदार लेख, केवळ जागेअभावी या अंकात आम्ही प्रकाशित करू शकलो नाही, त्याबद्दल दिलगीर आहोत -
डॉ. संजय ढोले, यशवंत पाठक, सुलभा जोगळेकर, दिलीप भाटकर, नीलिमा करमरकर, अविनाश दर्प.



# कळी

वाऱ्यासवे कळी
हलते डोलते
गुपचुप त्याच्या
कानात बोलते !
‘बरोबर तुझ्या
नेशील रे दूर?
खुडतील कोणी
मनात काहूर’
‘मी असा फिरता
कुठे तुला नेऊ?
घर नाही दार
कुठे तुला ठेवू?
छान छान इथे
खूप झुलायचं,
झोका घेता घेता
हळू फुलायचं !
फुलता फुलता
होशील सुंदर,
गंधित होईल,
सारा परिसर’

***

**– रेणू पाचपोर,**
‘पाकळ्या’, रचनानगर, कोरेगांव रोड,
परभणी ४३१ ४०१.

# निर्धार


पसरून राही आभाळावर
एक मेघ पांढरा
ओलाव्याचा अंश ना उरी
फक्त विराट आकार......


विराट मेघाहुनही मोठा
एक थेंब सानुला
जीवन त्याचे सार्थ खरोखर
करी सत्य स्वीकार....

तहानलेल्या ओठांसाठी
असा थेंब होणार
धडपडणाऱ्या मनात उमटो
हाच एक निर्धार... !!

***

**– संजीवनी बोकील**
विजयालक्ष्मी अपार्ट.
रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे३८.





# जिद्दीचं लोभस रूप

-मल्हार अरणकल्ले

एक असतं बी. वाळून गेलेलं शरीर आणि इवलीशी अंगकाठी. वाळल्यानं अगदी हलकं झालेलं. वाऱ्यावर इकडून तिकडं भिरभिरत राहतं. असंच कधीतरी एका ठिकाणी बसून राहतं. उन्हाळ्याचा वणवा सौम्य होतो. काळ्या ढगांनी आकाश भरून जाऊ लागतं. निळ्या गाभाऱ्यातून रेशीमधारांचं गाणं बरसू लागतं. वाळून गेलेलं बी त्यातला एक थेंब पिऊन घेतं आणि ताजंतवानं होतं. पाऊसथेंब त्याच्यासाठी नवं आयुष्य घेऊन येतात. बी पाणी पीत राहतं. ओला उत्सव अंगांगात टिपत राहतं. काळ्याभोर जमिनीच्या एका कणाच्या आधारानं लपून बसतं... आणि एके दिवशी मातीआडून कोवळा हिरवा हुंकार उमटतो.

पावसाच्या थेंबांचं अमृत पिऊन आणि मातीच्या कणांचा आधार घेऊन बी नवं पान लिहू लागतं. वाळलेलं रूप बहरू लागतं. जमिनीच्या अंगावर नव्या बाळाची ही चाहूल ठळक होऊ लागते. एक कोंभ वाऱ्याच्या दिशेनं डोळे किलकिले करून पाहू लागतो.

हिरवेपण दिवसागणिक अधिक गहिरं ठळक होऊ लागतं. कोंभाला पानांचे कोवळे हात उमटतात. वाऱ्यावर ते खेळू लागतं. टाळ्याही वाजवू लागतं. पानांचे नवे नवे हात अंगाभोवती लपेटून घेत रोप वाढू लागतं.

हिरवं-पिवळं आणि फिकट पांढरं अशा रंगाचं कोवळेपण मिरवीत रोप बाळसं धरू लागतं. नवं जग पाहायला आसुसलेलं ते कोवळं गाणं आवाज उमटण्याआधीच कुणा जनावराच्या मुखीचा गोड घास होतं. तिथं केवळ खुरटलेली एक खूण उरते. धरणीची जखम सलत राहते.

पाऊस कोसळतच असतो. वारा घोंघावत असतो. विजांच्या रेषा आकाशाच्या अंगणात स्वैरपणानं नाचत असतात. खुरटलेल्या रोपाच्या आधाराला केवळ भुसभुशीत ओली माती असते; पण तिच्या हृदयात माऊलीच्या मायेची ऊब असते. या उबेची अंगाई सोबतीला घेऊन रोप पुन्हा बळ धरतं. आलेलं संकट बाजूला ठेवतं. पुन्हा नव्यानं सूर्यप्रकाश पिऊन घेतं. पाणी शोषून घेतं. जखमी शरीर उभारी पकडू लागतं. जखम भरून येते आणि खुरटलेल्या झाडाला पुन्हा दोन कोवळे हात उमलून येतात. वाऱ्याबरोबर पानांचा झिम्मा रंगू लागतो. त्यांचं मैत्र चांगलं जुळून येतं. रोप बहरू लागतं. नाचू-गाऊ लागतं. हा आवाजच त्याचा घात करतो. रोपाचा पुन्हा घास होतो.

रोप पुन्हा पहिल्यासारखं खुरटून जातं. पाऊस संपून जातो. उदंड पाण्याची सोय हरवते. रोप तग धरून असतं. पाण्याच्या-ओलाव्याच्या शोधासाठी ते धरणीच्या गाभाऱ्यात भजन गात गात फिरू लागतं. खोल जाता-जाता त्याला ओलाव्याची माया गवसते. ती त्याला पाण्याचे थेंब देते. थेंब थेंब पाणी घेत रोप टिकाव धरू पाहतं. हळूहळू उष्मा वाढतो. जमिनीला भेगा पडतात. रोपाला जमिनीची ओली माया तरीही संजीवनी देत राहते. भयंकर ताप असूनही रोप तग धरतं. टिकण्याची ईर्ष्या त्याला बळ देते.

मोठा काळ कोरडा जातो; आणि

अखेर पुन्हा एकदा गगनाच्या गाभाऱ्यात ढगांची तोरणं बांधली जाऊ लागतात. त्यांच्या कडकडाटाचे नगारे घुमू लागतात. कडाडणाऱ्या विजेची उदबत्ती काळ्याभोर पार्श्वभूमीवर रेषांची नक्षी काढू लागते. वर्षोत्सवाच्या वातावरणाची ललकारी उमटते आणि पुन्हा थेंबांचं नृत्य धरणीभोवती फेर धरून गाऊ लागतं.

थेंब रोपाला संजीवनी देतात. रोप ताजं होतं. पाणी पिऊ लागतं. नवं बळ धरतं. जोमानं वाढू लागतं. पर्जन्यराजाला सलामी करतं आणि वादळाशीही मस्ती करतं. वेडं वादळ घोंघावत राहतं. पाऊस उभा-आडवा कोसळत राहतो. विजांचा चमचमाट डोळे दिपवून टाकतो. संततधारेनं परिसर तुडुंब होतो. रोप पाण्यानं वेढून जातं. पावसाचा जोर कमी होताच पाण्याला उतार पडतो. रोप मुक्त होतं. पुन्हा वाऱ्याशी कानगोष्टी करू लागतं. पावसाशी खेळू लागतं.

एके दिवशी रोपावर कोवळी हळदी खूण उमलते. कळीचं मुग्ध गाणं तिथं लकेरी घेऊ लागतं. रोप नाचतं-गातं आणि बहरतंही. कळी उमलते आणि सुगंधाच्या वाटेवरून फुलाचे स्वर घमघमत येतात.

फुलानं शृंगारलेलं रोप अचानक फळभारानं भरून जातं. त्याचं झाड होतं. सावली देणारं... फळं देणारं...

झाड ऊन झेलतं, पाऊस अंगावर घेतं, कुऱ्हाडीचे-कोयत्याचे घावही पचवतं. झाड अतिवृष्टीला सामोरं जातं आणि दुष्काळालाही पचवून टाकतं. धक्के सहन करीत झाड उभं राहतं. कुणाला दोष देत नाही. कुणाविषयी तक्रार करीत नाही. सहन करण्यासाठी झाडाकडं केवढं थोरलं मन असेल नाही ? किरकोळ गोष्टींनी त्रागा करणाऱ्या माणसांना झाडाच्या मनाची खोली कशी कळणार ?

झाडाकडं असं असतं तरी काय?

झाडाकडं असते प्रचंड जिद्द. कणखर उभारी. कर्तव्यकठोर वृत्ती.

तुम्ही आजूबाजूची अशी जिवंत झाडं पाहिलीत कधी ?

आहेत, अशी झाडं समाजजीवनात आजही आहेत. ती झगडताहेत, दोन हातांनी लढताहेत. उभारीचं शीड उंच उभारून, वाऱ्यावादळात आपापलं गलबत पुढं हाकारताहेत.

शिडात जिद्दीचा वारा भरून ऐटीत जाणाऱ्या या गलबतांना किनारा ठाऊकच नसतो. अथांग सागर हेच त्यांच्यासाठी जगणं असतं. जिद्दीचं बोट धरून चालणाऱ्या पावलांना कोण अडवू शकणार? संकटांवर मात करीत पुढ जाणाऱ्याला कोण बांध घालणार?

जिद्द झाडांकडून शिकावी. सहनशीलता त्यांच्या सहवासात घ्यावी. परोपकाराचा संस्कार त्यांच्या कृतीतून घ्यावा.

झाडाची जिद्द आम्ही कधी शिकणार?

***

**– मल्हार अरणकल्ले,**
१०/२, गुरुजन सोसायटी,
शास्त्रीनगर, कोथरूड,
पुणे २९.


**ज्ञान प्रबोधिनीद्वारा, दिवाळीच्या सुट्टीत मुला-मुलींसाठी**
**ग्रामीण भागातील तंबूतील शिबिर व गिरिभ्रमण**

- डोंगरदऱ्यांमध्ये स्वच्छ, मोकळ्या वातावरणात स्वच्छंदपणे विहरायचं...
- मराठमोळा, रांगडा मुलूख डोळसपणे बघायचा, त्यांच्यातच मिसळून जायचं...
- ग्रामीण भागातील प्रश्नांची, तेथील संस्कृतीची ओळख करून घ्यायची...
- विविध अडीअडचणींना सामोरं जायचं,परिस्थितीशी जुळवून घ्यायचं...
- भरपूर दमायचं अन् रमायचंही! अगदी हसत खेळत,गम्मत-जम्मत करत,अनुभव अन् आत्मविश्वास मिळवायचा...

**या सर्वांसाठी या शिबिरात अवश्य सहभागी व्हा!**

**कालावधी :** ३१ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०००
**वयोगट :** इ. ८ वी ते प्रथम वर्ष पदवीपर्यंत
**स्थळ :** पुणे जिल्ह्यातील निसर्गरम्य परिसरात (मुला-मुलींसाठी स्वतंत्र शिबिरे)
**शुल्क :** रु.५००/- (शिबिरकाळातील प्रवास-निवास-भोजन इ.सह)

*प्रवेशसंख्या मर्यादित ! स्थानिक अथवा मुख्य कार्यालयात*
*२५ ऑक्टोबरपूर्वी शुल्क भरून नावनिश्चित करा !*
*शिबिराचे माहितीपत्रक मुख्य व*
*स्थानिक कार्यालयांमध्ये उपलब्ध !*
*दिवाळीची सुट्टी अधिक अनुभवसमृद्ध*
*अन् आनंदी करण्याची संधी दवडू नका !*





हे वैभव लेणे हिरवे लेऊन, खडा जरी वृक्ष
संकटावरी मात करुनी, राखण करण्या दक्ष

# दाजीपूरच्या अभयारण्यात !


*सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये दडलेलं दाजीपूर अभयारण्य म्हणजे निसर्गाच्या सौंदर्याचा एक आविष्कार! कोकण आणि घायमाथा यांचा सुरेख संगम तिथे झालेला आहे. राधानगरीचा विस्तीर्ण तलाव, उत्तुंग वृक्ष, असंख्य रानफुलं, भरारत येणारे वाऱ्याचे झोत, या सर्वांचे लहानपणी घडलेलं दर्शन आणि नंतरही अनेकदा तिथे गेल्यानंतर दाजीपूरच्या रुद्र सौंदर्याचं आपल्या मनोपटलावर उमटलेलं चित्र मधु मंगेश कर्णिक यांनी तुमच्यासाठी शब्दबद्ध केलं आहे.*

*मधु मंगेश कर्णिक*

कोकणातील माझ्या गावापासून फोंडाघाट हाकेच्या अंतरावर आहे. माझ्या गावच्या शेतावर उभं राहून पाहिलं म्हणजे सह्याद्रीची उत्तुंग शिखरं पूर्वेकडे कवायतीसाठी उभी असावी, तशी एका रांगेत दिसू लागतात. त्यांतील एका शिखराशेजारी छोटासा बाक दिसून येतो - ती असते दाजीपूरची खिंड. त्या खिंडीपलीकडे दाजीपूर. सह्याद्रीच्या शिखरावरील एक चिमुकलं गाव. लाल मातीचं, ठेंगण्या कौलारू घरांचं, धनगरांच्या केंबळी, गवतारू छपरांचं... खूप झाडी असलेलं आणि गवा अभयारण्यामुळे प्रसिद्धीस आलेलं.

'गवा अभयारण्य' हे नाव पर्यटकांच्या नकाशावर अलीकडे उमटलं. पण दाजीपूरचं जंगल आम्हांला फार पूर्वीपासून ठाऊक असलेलं. आमच्या शाळेच्या सहलीसाठी आम्ही दाजीपूरला कितीदातरी गेलो होतो. आमच्या गावातून उन्हाळ्यात सह्याद्रीमध्ये लागलेले वणवे रात्रीच्या वेळी आम्हाला पाहाता येत. त्या विद्यार्थीदशेत असताना वाटे, या जंगलामध्ये हे वणवे कसे लागतात ? मग तेथील पशुपक्ष्यांचं काय होत असेल ? ससे, भेकर, सांबर हे प्राणी आणि नाना तऱ्हेचे आम्ही पाहिलेले रंगीबेरंगी, गाणारे पक्षी त्या आगीमध्ये होरपळत तर नसतील ? त्यांच्या चिमुकल्या पंखात उडण्याची ताकद कितीशी असणार?

पण आमच्या प्रश्नांची उत्तरं कुणी देत नसे. सह्याद्रीचे कडे रात्रंदिवस जळतच राहात. दिवसा धुराची वेटोळी आकाशात चढलेली दिसत आणि रात्री अर्धचंद्राकार आगीच्या लाल कडा. मग कधीतरी ते वणवे विझत आणि हिरवीगार डोंगर शिखरं काळ्या





दाट धुक्याची ही तर दुलई,
अवघडलो मी न दिसे काही.

कोळशाच्या रंगाची झालेली दिसत. पाहाताना भयाण वाटे. सह्याद्री आणि दाजीपूर यांबद्दलचं कुतूहल अधिकच वाढलेलं असे. पावसाळ्यात एकदा हळदकर सरांनी आम्हाला ट्रीपला नेलं होतं, ती दाजीपूरची पहिली भेट. ती आजही स्पष्ट आठवते. सर्व्हिस मोटारीतून आम्ही घुणकवलीहून फोंडाघाट चढून दाजीपूरला पोहोचलो होतो. मुसळधार पाऊस पडत होता. कोकणातला पाऊस मुसळधारच असतो. पण घाटातला, सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातला पाऊस आम्ही प्रथमच अनुभवीत होतो. हळदकर सर मराठी आणि इंग्लिश फार सुरेख शिकवायचे. त्यांनी अनेक सुंदर शब्द आम्हांला ओळखीचे करून दिले. त्यांतील 'रुद्रावतार' हा एक शब्द. घाटात पाऊस 'रुद्रावतार' धारण करतो, असं ते म्हणाले आणि 'रुद्र' 'अवतार' हे सारं समजावून सांगितलं. माणसाचा रुद्रावतार तसा निसर्गाचाही. तो पाहण्यासाठी त्यानंतरही मी अनेकदा दाजीपूरला गेलो आहे. ज्येष्ठ-आषाढाचे दिवस असावेत आणि दाजीपूरची खिंड ओलांडून आपण हसने या गावात प्रवेश करावा; तिथपासून धुक्याचा प्रदेश सुरू होतो. मृगनक्षत्राच्या झिमझिम पावसाला सुरुवात होताच चहूबाजूंनी बोलावल्या-सारखं धुकं प्रवेश करतं. तोपर्यंत ते कुठं असतं कुणास ठाऊक!

आकाशातले ढगच बहुधा धुक्याचं रूप घेऊन खाली उतरत असावेत ! या धुक्याच्या प्रदेशात सर्व आसमंत अदृश्य झाल्यासारखं वाटतं. पावलाखालची वाट दिसत नाही. आजूबाजूची झाडं, डोंगर यांपैकी काहीही नजरेला पडत नाही. फक्त दुधासारखं दाट धुकं.. त्याचे सूक्ष्म कण आपल्या चेहऱ्यावर, हातावर उतरलेले दिसतात. हिमालयातील बर्फवर्षाव आणि बर्फाच्छादित शिखरं मी नंतरच्या आयुष्यात पहिली, पण सह्याद्रीतील हा धुक्याचा समुद्र फक्त महाराष्ट्रातच असावा. मराठी मुलखामध्ये बर्फ नसलं तरी धुक्याला तोटा नाही, याची खूण दाजीपूरला पटते. धुक्यातून चालताना फार मजा वाटते. रस्त्यावरून समोर येणारी मोटार तिच्या दिव्यांमुळे समजते. मोटारीला दिवे नसतील तर तिला रस्ता दिसणार नाही आणि तिनं हॉर्न वाजवला तरी ती दिसून येणार नाही, अशी सगळी धुक्याची किमया असते. पण त्याचीही एक गंमत असते. आकाशातून सूर्यप्रकाशाची एक धारदार तिरीप मध्येच येते आणि क्षणार्धात धुक्याचा दाट पडदा नाहीसा होतो आणि आजूबाजूची हिरवीगार सृष्टी आपलं रूप लख्खपणे दाखवू लागते. पण हा आरसा किंचितकाळच टिकतो. आकाशात ढग दाटले, सूर्य त्यामागे दडला की पुन्हा पृथ्वीवर धुक्याचं शुभ्र साम्राज्य पसरतं आणि हा निसर्गाचा जादूभरा खेळ पाहताना आपली मती गुंग होते. दाजीपूरला हा जादूभरा खेळ आपल्याला दर पावसाळ्यात पाहायला मिळतो. दाजीपूरला अभयारण्य होण्यापूर्वीची एक गोष्ट मला आठवते. 'अभयारण्य' ज्या गव्यांसाठी मुख्यत्वे उभारलं आहे, ते गवे म्हणजे रानरेडे आम्हाला एकदा अभयारण्याच्या बाहेर भर रस्त्यावर पाहायला मिळाले, तो हा प्रसंग. आता जिथे अभयारण्याची हद्द सुरू होते, त्याच्या बाजूनं आम्ही जीपनं कोल्हापूरला येत होतो. जीपचा रस्ता राधानगरी तलावातील 'बॅक वाटर्स' म्हणजे तुंबलेल्या पाण्याचा मागील भागाचा विस्तारलेला भाग. तोही एखाद्या लांबलचक जलाशयासारखा असतो. राधानगरी सोडून आम्ही पुढे निघालो, तोवर तिन्हीसांजा झाल्या होत्या. राधानगरीनंतर बांबरवाडी नावाची वस्ती सोडली की सारं अरण्य. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पसरलेल्या त्या घनदाट अरण्यांतून आमची जीप चालली होती. थोड्याच वेळात दाजीपूरची हद्द लागणार होती. ती ओलांडली की फोंडाघाटाचा नऊ मैलांचा उतार नि मग तळकोकणांतील आमचं गाव ड्रायव्हर वेगानं जीप हाकीत होता आणि अकस्मात त्यानं कर्रकन् ब्रेक दाबले. गाडी गच्चकन थांबली. ड्रायव्हरनं न बोलता समोर हात केला नि आम्ही तिकडं पाहिलं. बापरे...रानरेड्यांचा एक भला मोठा कळप, गुरांच्या कळपासारखा भर रस्त्यावर आमची वाट अडवून उभा होता ! मी



संथ सावल्यांसारख यावा निळारावा,
हिरव्या पंखांचा गर्द लपेटून पारा.

आयुष्यात प्रथमच असं दृश्य पाहात होतो. ते दृश्य भीतीदायक मुळीच नव्हतं. पहिल्या काही क्षणांत भीति वाटली तेवढीच. तीही भीती नव्हती, तर निखळ उत्सुकता होती. तिचं रूपांतर कौतुकभरल्या नजरेत झालं नि आम्ही डोळे विस्फारून, टक लावून समोरच्या कळपाकडे पाहू लागलो.

जवळजवळ पंधरावीस रानरेडे (गवे) तिथे एकमेकांना खेटून उभे होते. जीपच्या प्रकाशात त्यांचे मोठाले हिरवट निळसर डोळे लकाकत होते. त्या साऱ्यांची शिंगे रेखीव अर्धवर्तुळावर होती. देह पुष्ट आणि माजलेले होते. पाठीवरील भाग वशिंडासारखा किंचित उंचावलेला, पण पाठीमागे लांबलेला होता. त्यांच्या डोळ्यांच्या मधोमध कपाळावर पंजापेक्षा मोठ्या आकाराचा शुभ्र चांदवा होता आणि त्यांच्या काळ्या भुऱ्या मस्तकावर तो शोभून दिसत होता. खाली एकजात साऱ्यांच्या पायांना पांढरे मोजे घालावे, तसा पांढरा रंग होता. विलक्षण बांधेसूद, देखणे आणि आमच्या जीपकडे विस्मित डोळ्यांनी एकटक पाहणारे ते पशू शांतपणे उभे होते. मग तीन-चार मिनिटांतच त्यांचा तो कळप हलला आणि अगदी शांतपणे, निमूटपणे रस्ता ओलांडून पलीकडच्या गर्द अरण्यात, अंधारात नाहीसा झाला. आम्ही तोवर रोखून धरलेले श्वास सोडले आणि एक अपूर्व दृश्य पाहायला मिळालं त्याबद्दल हलक्या, कुबुजल्या आवाजात बोलू लागलो. ड्रायव्हरने वेगाने जीप सुरू केली.

त्यानंतर बऱ्याच वर्षांनी सरकारने त्या भागात अभयारण्य निर्माण केले. अभयारण्य म्हणजे जिथे पशुपक्ष्यांना अभय मिळते ते अरण्य. दाजीपूरचे जंगल ही खरोखरच अभयारण्यासाठी आदर्श जागा आहे. कारण तिथे जवळपास शहरी जीवन, मनुष्यवस्ती, यांचा आढळ नाही. सर्व वातावरण सह्याद्रीच्या उत्तुंग कड्यांनी आणि खोल दऱ्यांनी भरलेलं आहे. तुरळक वस्ती दाजीपूरच्या रस्त्यावर, नाक्यावर आहे तेवढीच. आता पर्यटकांसाठी तिथे काही निवासस्थाने, तंबू वगैरे सोयी झाल्या असल्या तरी एकूण परिसर जंगलाच्छादित आणि निवांत आहे. माझ्या लहानपणी मी पाहिलेले सह्याद्रीतील वणवे आता लागत नाहीत. कारण, अरण्याच्या संरक्षणासाठी ठिकठिकाणी फॉरेस्ट गार्डस ठेवलेले आहेत. त्यांचा पहारा असतो. शिवाय वन्यपशू निरीक्षणासाठी ठिकठिकाणी उंच मनोरे उभारलेले आहेत. तिथे निरीक्षक, पर्यटक येत असतात. अरण्यातून जीपचे  कच्चे रस्ते बनवले आहेत. वन्य प्राण्यांसाठी ठिकठिकाणी पाणथळी तयार केल्या आहेत, त्यामुळे अरण्यातील पशुपक्षी निर्भर राहू शकतात. दाजीपूरच्या अभयारण्यामध्ये वाघ (बिबटे) अस्वलं, सांबर, भेकर, रानडुकरं, ससे यांसारखी जनावरे आणि गवे मोठ्या संख्येने आढळतात. पण त्या साऱ्यांचं दर्शन एकाच वेळी होण्यासाठी तो काही 'राणीचा बाग' किंवा 'झू' नव्हे. नशीब चांगलं असलं तरच जीपमधून रात्रीच्या वेळी हे प्राणी दिसू शकतात. वाघ आणि गवे दृष्टीला पडण्यासाठी खरोखरच शुभशकुन लागतो. पण सांबर, हरणं, भेकरं, ससे, रानडुकरं सर्च लाईटच्या झोतामध्ये हवी तेवढी दिसतात.

मी इतक्यांदा जीपने रात्रीच्या प्राणी दर्शनासाठी गेलो; पण कोणे एके काळी पाहिलेला निर्भय, मुक्तपणे वावरणारा गव्यांचा कळप मला पुन्हा कधीही दिसला नाही.

मला वाटतं, माणसे प्राणी पाहण्यासाठी जेवढी गर्दी करतात. तेवढ्या प्रमाणात वन्य प्राणी माणसांपासून दूर दूर जाऊ पाहतात!

माणसांनी पशुपक्ष्यांच्या वाट्याला जाऊ नये, हाच तर निसर्गाचा नियम असतो. पण आपण माणसं नियम पाळण्यापेक्षा नियम मोडण्याकडेच अधिक लक्ष देतो आणि सारा तोलच घालवून बसतो.

दाजीपूरच्या अभयारण्यापेक्षा, तेथील गव्यांपेक्षा अधिक प्रेक्षणीय असंही काही तिथे आहे. जसं पावसाळ्यातील धुकं आणि सह्याद्रीतील धबधबे, खळाळत येणारे रूपेरी निर्झर, राधानगरीच्या तलावाचं अलोट, अमर्याद पाणी, तिथे जगणारे असंख्य भटके पक्षी, नाना तऱ्हेच्या वनस्पती, उत्तुंग

वृक्ष, हंगामात काठोकाठ फुलणारी कारवी, फाल्गुनात पेटत्या ज्योतीसारखे लालभडक फुलांनी बहरलेले पळस, सावरी, वैशाखात पिवळीरंजन फुले, घोसांनी अंगावर घेणारे बहावे, जांभळट सुंदर फुलांचे ताम्हणे आणि अशी असंख्य रानफुलं... त्यांवर बागडणारी चित्रविचित्र फुलपाखरं. हसन्याच्या कड्यावरील 'उगवाई'चे दगडी, पुरातन मंदिर. तिथून दिसणारा खालच्या तळकोकणाचा डोळे निववणारा देखावा. भरारत येणारे वाऱ्याचे झोत आणि सह्याद्रीच्या शिखरावरून खाली तळकोकणात अल्लदपणे पॅराशूटसारखे तरंगत उतरणारे, आपल्या अंगाला खेटून जाणारे ढगांचे पुंज. हे सारे सृष्टीचे अद्‌भुत सौंदर्य अभयारण्याबाहेर आपली वाट पाहात थांबलेले असते.

जरा अलीकडे वाटचाल करून फोंडाघाटाच्या खिंडीमध्ये यावं नि सडकेच्या कडेला उभे राहावे. फोंडाघाटाची बाजारपेठ, तिथून पुढे मालवणकडे कणकवलीवरून जाणारा रस्ता, त्यावरची दुतर्फा झाडं उजवीकडे फोंडातिठ्यावरची आय.टी.आय.ची नवी कोरी इमारत आणि उजवीकडे गेलेला देवगड रस्ता. सगळे चित्र स्वच्छ दिसते. आकाश निरभ्र असेल तर खूप दूरवरची, क्षितिजरेषेजवळ झगमगणारी अरबी समुद्राची किनारपट्टीसुद्धा उन्हात लख्ख दिसते. सह्याद्रीवरून समुद्रदर्शन घेणं, हा योग विलक्षण असतो. दुर्लभ असतो. पण उभ्या सह्याद्रीमध्ये फोंडाघाटाची ही खिंड आणि आंबोली घाट, या ठिकाणाहूनच अरबी समुद्राचं दर्शन घडू शकतं. अन्य कुठे शिखरावर अशी जागा असल्याचे मला ठाऊक नाही. समुद्रदर्शन घडलं नाही तरी हिरमुसण्याचं कारण नाही. दाजीपूरच्या या खिंडीतून सह्याद्रीचे पश्चिमकडे अक्राळविक्राळ पसरलेले पाहायला मिळतात. खोल दऱ्या डोळ्यांना भोवळ आणतात आणि घाटातून संथ गतीने वर चढणारी वाहनं पाहताना वेळ कापरासारखा उडून जातो.

कोकण आणि घाटमाथा यांचा सुरेख संगम म्हणजे दाजीपूर. तिथे घाटमाथ्यावरील गारवा आहे नि कोकणचं हवामान आहे. कोकणची लाल माती आहे. तिथला पाऊस आहे. घाटावरची थंडी आणि तलावाचं पाणी आहे. समुद्र नसला तरी समुद्राची आठवण करून देणारा राधानगरी तलाव आहे. फणसाची झाडं आहेत, कोकणाची जांभळं- करवंदं नि आंबे आहेत. सारं काही कोकणचं आणि सारं काही घाटावरचंही, पाऊस मात्र 'रुद्रावतार' धारण करणारा.

ही किमया सह्याद्रीची -

सह्याद्री हा आपल्या महाराष्ट्राचा मोठा जादूगार आहे. त्याच्याजवळ नाना प्रकारचे चमत्कार दाखवण्याची शक्ती आहे. दाजीपूर हाही त्यातलाच एक चमत्कार !

***


**– मधु मंगेश कर्णिक**
४०१/एक्स १८, 'मार्व्हल'
शास्त्रीनगर, अंधेरी(प.),
मुंबई ५८



पाण्यातल्या झाडांवर तरंग थेंबांचे,
सावल्यांचे पंख ओल्या हळदी उन्हाचे.

# अभयारण्य

- डॉ. जयंत नारळीकर



*संयुक्त राष्ट्रसंघाची ती तातडीने बोलावलेली बैठक होती. कार्यवाहांच्या अहवालवाचनानंतर पाकिस्तानी आणि भारतीय राष्ट्रप्रमुखांनी आपली अण्वस्त्रे कशी आणि केव्हा नाकाम झाली याचे विवरण दिले. त्यावरून दोघांचे साठे एकाच वेळी, एकाच प्रकारे नष्ट झाल्याचे दिसले. ही आश्चर्यकारक घटना होती आणि इतक्या सफाईदार कामगिरीची जबाबदारी कोणाची असावी, अशी अटकळ सुरू झाली. तेवढ्यात राष्ट्रसंघाच्या अध्यक्षांना त्यांच्या खिशातल्या टॅबवर एक संदेश मिळाला -*

''गल्या शतकातली गोष्ट आहे, चालेल?'' पणजोबांनी विचारले. ''हो, चालेल! सांगा ना...'' अजय आणि विजय एकसुरात उद्गारले.

***पणजोबांच्या गोष्टी त्यांच्या 'आवडी'च्या क्षेत्रातल्या. वास्तविक त्या दोघांच्या आजवरच्या सहा वर्षांच्या आयुष्यात त्यांना करमणुकीची अनेक साधने उपलब्ध होती. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात सुरू झालेले माहिती -तंत्रज्ञानाचे नवे युग २०४७ पर्यंत कुठच्या कुठे गेले होते. इलेक्ट्रॉनिक्सला बाजूला सारून फोटॉनिक्सने बहुतेक ठाणी काबीज केली होती. प्रकाशाचे कण, फोटॉन, वाटेल त्या मार्गाने पाठवण्याची आणि त्यांचा माहितीच्या आदान-प्रदानासाठी उपयोग करण्याची किमया साध्य झाली होती. विसाव्या शतकात ज्या सुपर कम्प्यूटरच्या वापरावर अमेरिकेने निर्बंध लावले होते, त्याहून जास्त संगणकीय क्षमता अजय-विजयच्या खेळण्यांत होती. परंतु पणजोबा आले की ही सर्व खेळणी बाजूला टाकून ते दोघे त्यांच्याभोवती पिंगा घालीत.***

वास्तविक ८५ वर्षांचे पणजोबा आणि ८२ वर्षांच्या 'पंजी' प्रकृतीने चांगले ठणठणीत होते. स्वतंत्रपणे आपल्या फ्लॅटमध्ये राहात होते. मधूनमधून भेटीला येत, तेव्हा अजय-विजयच्या हल्ल्यापासून पणजोबांची सुटका करण्यातच पंजीचा अर्धा वेळ जाई. आज त्या आईबरोबर बाहेर फिरायला गेल्याची संधी साधून दोघांनी पणजोबांवर मोर्चा नेला होता. पालुपद नेहमीचेच... 'गोष्ट सांगा'! त्यांच्या अत्याधुनिक यांत्रिक साधनांपेक्षा प्रत्यक्ष समोर बसून गोष्ट सांगणारे पणजोबा त्यांना अधिक नवलाईचे.

पणजोबांच्या बऱ्याच गोष्टी 'गेल्या शतकातल्या'च असत. अजय-विजयना ते गेले शतक म्हणजे लांबच्या भूतकाळातले वाटे. त्या काळी मुले---

त्यांच्या वयाची पण-- रोज घरून उठून कुठेतरी लांब शाळेत जात. घरबसल्या शाळा नसे. लोक म्हणे मोठ्या हॉलमध्ये गोळा होऊन चित्रपट पाहात. अजय-विजयना घरबसल्या हव्या त्या भिंतीवर हवा तो चित्रपट हवा त्या वेळी पाहता येई आणि आपल्या घरी कुलूपबंद कपाटात जपून ठेवलेली कागदी पुस्तके त्या काळची लहान मुले आणि मोठी माणसे सर्व वाचत असत. आपले पणजोबा लिहून दाखवतात तेही सगळ्यांना येत असे म्हणे. एकदा पणजोबा अजय-विजयना ट्रेनने मुंबईहून पुण्याला घेऊन गेले, तेव्हा त्यांनी सांगितले होते की हाच प्रवास त्यांच्या लहानपणी करायला ट्रेनला तब्बल साडे-तीन तास लागत. ''ट्रेन वाटेत झोप काढत होती का?'' असे अजयने विचारले, तेव्हा पणजोबा हसून उत्तरले होते,''मला वाटते ती सबंध प्रवास तू कधीकधी झोपेत चालतोस तसा झोपेतच करत असे.'' नाही तर जेमतेम एका तासात होणाऱ्या प्रवासासाठी साडेतीन तास घ्यायचे कारण काय?

***

''ऐका तर!'' आपल्या नेहमीच्या संथ सुरात पणजोबा म्हणाले,''मी वीस एक वर्षांचा असेन तेव्हा..मला जंगलांचे आकर्षण फार.

मी वनरक्षकाची नोकरी घेतली. गिरनारच्या जंगलात माझे काम होते...''

''वनरक्षक म्हणजे?'' विजयने अडवले.

''बेटा! जंगलातल्या झाडांना तोडू नये, जनावरांना मारू नये, तिथे येणाऱ्या पक्ष्यांची शिकार करू नये म्हणून लक्ष ठेवायचे काम होते माझे.''

''पण जंगलात असला वेडेपणा कोण करायला जाईल?'' अजयचा प्रश्न.

''अजय, त्या काळी आजच्यासारखी जाण नव्हती लोकांत. तू म्हणतोस तो वेडेपणा करणारे पुष्कळ होते. मी होतो तिथे तर विशेष काळजी घ्यावी लागे, कारण ते सिंहांचे अभयारण्य होते... आजही आहे.''

''अभयारण्य म्हणजे?'' अजय-विजय दोघांनी टोकले.

''तेच सांगतो. अभयारण्यात सिंहांना मोकळे सोडले होते आणि त्यांना कोणी मारायचे नाही याची खबरदारी घेतली होती. सिंह-सिंहिणी आणि त्यांचे छावे कसलीही भीती न बाळगता जंगलात बागडावेत याची काळजी आम्ही घेत होतो. नाही तर काही दुष्ट लोक सिंहांना मारून त्यांच्या अंगावरची चामडी पिशव्या, टोप्या वगैरे करायला वापरत.''

''ईऽईऽ काय हा क्रूरपणा...'' अजय-विजय यांची प्रतिक्रिया.

''होय तर! आणि जेव्हा असं वाटायला लागलं की सिंहांचा संपूर्ण नाशच होईल--- पृथ्वीवर सिंहच शिल्लक राहणार नाहीत... तेव्हा त्यांच्यासाठी अशी अभयारण्ये केली गेली. गिरमध्ये आम्ही त्यांची पुष्कळ काळजी घेत असू. जेव्हा सिंहिणीला नवीन पिल्ले होत, तेव्हा आम्ही पार्टी करत असू.'' पणजोबा म्हणाले.


''तुम्ही रोज जंगलात जायचा सिंहांशी खेळायला ?'' अजय-विजयला तसे करायला आवडले असते.

''मुळीच नाही.'' पणजोबा म्हणाले. ''अभयारण्यात जनावरांच्या जीवनचर्येत ढवळाढवळ करीत नाहीत. त्यांना मुक्तपणे त्यांचे नैसर्गिक जीवन जगू देतात आणि आपण त्यांना लांबून लक्ष ठेवून पाहात असतो. ते कसे वागतात, कसे शिकार करतात हे सगळे आम्ही दुरून पाहतो. सिंह-सिंहिणी आपल्या खाण्याच्या गरजेपुरती शिकार करतात. ती त्यांची नैसर्गिक प्रवृत्ती आम्ही कायम ठेवतो. ही पाहा गिर जंगलावरची एक लहान फिल्म.''

पणजोबांनी एक रिमोट कंट्रोल दाबून भिंतीवर चित्रफीत दाखवायची तयारी केली. खिशातून डायरीवजा एक फोटॉनिक 'वही' काढली आणि त्यावरील काही आकडे व अक्षरे दाबली. भिंतीवर गिर अभयारण्याची दहा मिनिटांची माहितीवजा फिल्म दिसली...

''माणसांनी वेडेपणा करू नये म्हणून अभयारण्यात सिंह ठेवलेत, पण सिंहानीच वेडेपणा केला तर?'' अजयने विचारले.

''त्याचीच ही हकीगत आहे बाबा!'' पणजोबा म्हणाले. ''एकदा काय झाले, आम्ही मोठी पार्टी दिली जेव्हा एका सिंहिणीला दोन छावे झाले. आम्ही त्यांची नावे ठेवली 'रुस्तुम' आणि



'जमशेद'. उमदी जनावरे होती. खूप मस्ती करायची...

''आम्ही दुरूनच पाहात होतो आणि हळूहळू आम्हाला काळजी वाटू लागली. कारण त्यांची मस्ती जास्त करून भांडणाच्या रूपात होती.''

''आम्ही दोघे भांडतो तसे?'' विजयने हसत विचारले.

''तेवढे चालते रे! नंतर तुम्ही नाही का परत जुळवून घेत?'' पणजोबा त्याला थोपटत म्हणाले.'' पण रुस्तुम आणि जमशेद यांची भांडणे संपेचनात. रुस्तुमने ससा मारला तर जमशेदला तो हवा असे. जमशेद एका झाडाखाली आराम करत असेल तर तीच जागा रुस्तुमला हवी....

''पुढे दोघे, मोठे सिंह झाले. तेव्हा दोघांनी जणू आपल्या टोळ्याच तयार केल्या, इतर सिंहांना आपल्या बरोबर घेऊन. पूर्वी दोघे एकटे एकटे भांडत, तर आता टोळ्यांनी लढू लागले.''

''आणि तुम्ही काहीच केले नाही ? नुसते बघत राहिलात?'' अजयने विचारले.

''आम्हाला सक्त ताकीद होती, ढवळाढवळ करायची नाही... पण आम्ही आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सर्व अहवाल देत होतो. त्यांच्यातले काही तज्ज्ञ बघून गेले. सिंह असे नेहमी वागत नाहीत, पण जोपर्यंत त्यांच्या अस्तित्वाला धोका पोहोचत नाही; तोपर्यंत आपण काही करायचे नाही. मात्र प्रकरण हाताबाहेर गेले तर काय करायचे हे त्यांनी आम्हाला सांगून ठेवले...

''आणि एक दिवस तसा प्रसंग आलाच. रुस्तुम आणि जमशेदच्या टोळ्यांत विलक्षण लढाई झाली... जंगलाच ताबा कोणा एकाच टोळीला मिळावा अशीच जणू त्यामागची प्रेरणा असावी. त्यांत चार सिंह खलास झाले आणि मग आम्ही ठरवले... इनफ इज इनफ.

''आम्ही हेलिकॉप्टरवरून युद्धक्षेत्रावर फिरलो आणि प्रत्येक सिंहावर एका खास वायूचा मारा केला. सगळे सिंह बेशुद्ध झाले. आम्ही त्यांना पिंजऱ्यात घालून देशातल्या आणखी चार वेगवेगळ्या अभयारण्यांत नेऊन सोडले. विशेष खबरदारी घेतली की जमशेद आणि रुस्तुम एकाच अभयारण्यात असणार नाहीत आणि मग धोका टळला. गिरमध्ये पुन्हा शांतता नांदू लागली... गोष्ट संपली! झोपा आता.''

इतक्यात एक सायरन वाजू लागला आणि ते तिघे गेल्या शतकातल्या अभयारण्यातून वास्तवात आले. अजय-विजयना सायरनची माहिती होती, कारण ते दोघे तडकाफडकी उठले. ''चला पणजोबा.... ट्रेनिंगसाठी बंकरकडे.'' त्यांनी पणजोबांचे दोनही हात पकडले. त्यांच्या फ्लॅटच्या एका कोपऱ्यात लहानसे दार होते. त्यावर एक हिरवा दिवा फ्लॅश करत होता. (एरवी त्या दारावर सतत एक लाल दिवा असे.) दार उघडता आत एक 'शूट' होता, जो एका वेळी पाच लोकांना भर्रकन तळघरात पोहोचवू शके. ते तिघे त्या मार्गाने तळघरात पोचले.

***

हे तळघर सामान्य तळघर नव्हते. पृथ्वीच्या खाली पन्नास मीटर खोल, जाड भिंतींनी घेरलेले असे ते ठिकाण वरच्या राहत्या इमारतीच्या बरोबर खाली होते. प्रत्येक नव्या इमारतीखाली असे तळघर बांधणे सक्तीचे होते आणि सायरन वाजला की हातातले सर्व काम टाकून इमारतीतल्या सर्वांनी इथे जमायचे -पुढील सूचना मिळेपर्यंत. अजय- विजयसारख्या लहानांना देखील हा परिपाठ आता परिचयाचा झाला होता. हे 'इमर्जंसी ड्रिल' महिन्यातून एकदा केव्हाही होऊ शकते हे त्यांना माहीत होते.

तळघर लवकरच भरून गेले---- पण तसे ते ऐसपैस आणि वातानुकूलित असल्याने कोंदटपणा नव्हता. जमलेल्यांत एक प्रकारची शिस्त आणि तसेच ही एक गंमत आहे अशी भावना होती. तिथे असलेल्या खुर्च्या जवळजवळ भरल्या. प्रत्येकजण समोरच्या पांढऱ्या शुभ्र भिंतीकडे पाहात होता. लवकरच भिंत 'प्रज्वलित' होऊन त्यावर चलचित्र उमटले. फौजी गणवेशातील अनेक बिल्ले व फिती लावलेली एक

व्यक्ती दिसू लागली. सर्वांना अभिवादन करून ती व्यक्ती बोलू लागली.

''लोकहो, तुम्ही जर सायरन चालू असेपर्यंत इथे येऊन पोहोचला असाल तर तुमचे अभिनंदन! भारतावर जर अण्विक हल्ला झाला तर याहून जास्त पूर्वसूचना तुम्हाला मिळणार नाही. हल्ल्यापासून बचाव करायची आपली यंत्रणा भक्कम असली तरी तीवर पूर्णपणे विसंबून राहता येणार नाही. म्हणून हा खटाटोप. तुमच्या बंकरमध्ये सहा महिने पुरेल इतकी खाद्य-साधनसामग्री ठेवणे तुम्हाला आवश्यक आहे. हे पुन्हा सांगतो. युद्ध झालेच तर तितका काळ तुम्हाला खाली राहणे आवश्यक आहे. जर त्यापूर्वी वर येणे सुरक्षित आहे असे आमच्या पर्यावरण मापक यंत्रांनी आश्वासन दिले तर आधीही वर येऊ शकाल. त्याहून जास्त काळ खाली राहावे लागले तर --- देव तुमचे रक्षण करो, असेच मी म्हणेन.

''आजचा संचलनाचा पाठ संपला !आता वर जाऊ शकता.

जयहिंद!

***

एका वेगळ्या ठिकाणी, वेगळ्या तळघरात - ते आकाराने लहान होते पण यांत्रिकदृष्ट्या अद्ययावत होते - तीन व्यक्ती बसल्या होत्या. आपण त्यांना ए, बी आणि सी म्हणू. पैकी ए आणि सी हे पुरुष आणि बी स्त्री असावी असा तर्क करायला हरकत नाही. तिघे भिंतीवरच्या पडद्याकडे पाहात होते. त्यावर पृथ्वीच्या गोलाचे चित्र होते. गोलावर ठिकठिकाणी लाल टिंबे होती.

ए ने बटन दाबून तो गोल फिरवला. पृथ्वीच्या अन्य भागांवर टिंबे दिसत होती. तिकडे बोट दाखवून ए उद्गारला.

''माझ्या अंगावर शहारे येतात हे चित्र पाहून. प्रत्येक लाल टिंब म्हणजे अण्वस्त्रांचा साठा... आगीची ठिणगीच, जी आग हा संपूर्ण ग्रह भस्मसात् करील.''

नंतर बी ला उद्देशून ए पुढे म्हणाला,''तू या प्रकल्पात नव्याने आली आहेस, म्हणून हा इतिहास

पाहा. सुरुवात झाली इथे.'' त्याने एक बटन दाबले. पडद्यावर माहिती उमटली.

जुलै १६, १९४५ : मॅनहॅटन प्रकल्प यशस्वी. अणूच्या केंद्रभागात दडलेली ऊर्जा स्फोटकरूपात बाहेर काढण्यात मानव यशस्वी.

ए पुढे म्हणाला,''प्रकल्पाच्या मुख्याला, जे. रॉबर्ट ओपेन हायमरला स्फोट पाहून आठवले. एका भारतीय धर्मग्रंथात सहस्रसूर्यांचे

तेज एकदम प्रकट व्हावे, अशी उपमा दिली होती. हा स्फोट तसाच होता.''

बी ने किंचित् चुळबुळ केली आणि म्हणाली ''सर! हा सर्व इतिहास मी वाचला आहे.''

ए खिन्नपणे हसला आणि म्हणाला,''कबूल आहे! पण हे लक्षात ठेव, मानव हा प्राणी इतिहासापासून शहाणपण कधीच शिकला नाही. क्षुल्लक बाबींवरून युद्धे उकरून काढून अपरिमित प्राणहानी तो करत आला आहे. कशासाठी? कुठल्या न कुठल्या तत्त्वासाठी; पण आता त्याच्या हातात हे जे अण्वस्त्र आले आहे, त्यामागे लागून तो सर्वात मोठे तत्त्व विसला आहे---''

''---की तो ज्या पृथ्वीवर राहतो त्या नैसर्गिक साधन-संपत्तीने भरलेल्या पृथ्वीचा तो क्षणात निकाल लावू शकतो.'' बी ने त्याचे वाक्य पुरे केले.

''शाब्बास! स्पेस ॲकॅडमीत तुझे रेकॉर्ड सर्वोत्तम होते, असे ऐकले होते त्याचा प्रत्यय आला. '' अे स्मित करत म्हणाला.

''पण सर! आपण किती वेळ नुसते बघत राहणार? ती लाल टिंबे पाहा. त्यांची संख्या वाढत आहे. हो-नाही करत अनेक देशांनी अण्वस्त्रे बनवलीत. आपण ठरवले तर पुढल्या १५ मिनिटे--

''

''थांब! इतकी उतावीळ होऊ नकोस.''बी ला हाताने टोकत ए म्हणाला. ''आपण हा निर्णय घेऊ शकत नाही. त्याला वरून संमतीदर्शक सिग्नल यायला पाहिजे.''


''पण त्याला कितीतरी वेळ लागेल --- अगदी प्रकाशाच्या वेगाने संदेश पाठवला तरी---''

परत बी ला थांबवत ए म्हणाला ''नाही, ती गरज नाही. निर्णय आपणच इथल्या इथे घ्यायचा आहे. हा संगणक तो घेईल, फक्त आपण विद्यमान परिस्थितीची माहिती त्यात भरत राहायचे. हा आपला सहकारी सी तेच करत आला आहे.

सी ने हात वर केला आणि म्हणाला,''सर! मला वाटते आपण त्या स्थितीच्या जवळ येत चाललो आहोत. माझ्या मॉनिटरवर मला जे काही दिसते आहे, ते फार भयावह आहे. या पाहाच...मी भिंतीवर ते चित्र टाकतो.

***

१४ ऑगस्ट २०४७, इस्लामाबादहून पाकिस्तानचे राष्ट्रपती मियाँ शफी नुरानी जनतेला देशाच्या निर्मितीला शंभर वर्षे झाल्याबद्दल अभिनंदनपर शुभेच्छा देत होते. त्यांच्या भाषणाचा रोख सौम्य होता. 'शंभर वर्षांच्या तणावपूर्ण परिस्थितीचा अनुभव आपल्या सर्वांना आहे. आता शेजाऱ्याशी सलोख्याने वागण्याच्या प्रयत्न झाला पाहिजे--'' इत्यादी



इत्यादी. परंतु भाषणाचा शेवट करताना ते म्हणाले, ''केवळ शब्दांनी नव्हे तर कृतीने मी आपल्या देशाच्या सौहार्दपूर्ण भावनेची झलक शेजाऱ्यांकडे--- भारताच्या पंतप्रधानांकडे पाठवणार आहे. त्यासाठी मी आत्ता, या क्षणाला असे फर्मान काढतो की''

पण वाक्य पुरे होण्यापूर्वीच राष्ट्रपती पुढे कोसळले. टी.व्ही.वर त्यांना पाहणाऱ्या कोट्यवधी प्रेक्षकांना स्तंभित करणारे ते थरारनाट्य होते. त्यांच्याच अंगरक्षकाने त्यांच्यावर लेसरगन वापरली होती. त्याला बाजूला सारून एक राकट व्यक्ती पुढे आली आणि तिने जनतेला संबोधन केले :

''लोक हो, घाबरू नका! एका देशद्रोह्याला ठार करण्यात आले आहे. तो पाकिस्तानचे अण्वस्त्रसाठे नष्ट करण्याचे फर्मान काढणार होता. ही सौहार्दाची भावना आपल्याला परवडणारी नाही, असे आमच्या संघटनेने ठरवले आहे. तिचे नाव आता पडद्यावर पाहा.''

पडद्यावरील नाव पाहून जनतेचा थरकाप उडाला. ही तर कट्टरात कट्टर अशी संघटना, देशातून निर्वासित केलेली. हिने कशावर ताबा मिळवला आहे ? पडद्यावरील व्यक्तीने जणू प्रश्नाचे उत्तरच दिले :

''आम्ही देशाच्या सर्व अतिसुरक्षित समजल्या जाणाऱ्या अण्वस्त्रांच्या साठ्यावर ताबा मिळवला आहे. भारताच्या पंतप्रधानांकडे आम्ही आमच्या मागण्या या क्षणाला पाठवल्या आहेत. चोवीस तासांच्या आत त्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर भारताच्या दहा शहरांवर अण्वस्त्रांची बरसात होईल. अर्थात् त्यांनी आमच्यावरच आधी अस्त्रे डागली तर ईट का जबाब पत्थर से दिया जाएगा! खुदा हाफिज. माझे नाव या कार्यक्रमानंतर पाहा.''

घियासुद्दीन! हा तर अतिरेक्यांच्या नामावलीत पहिले स्थान पटकावलेला. भारत अशा धमकीला भीक घालणार नाही हे नक्की. पण तो अण्वस्त्रानीच उत्तर देईल का? अणुयुद्ध सुरू करायची जबाबदारी तो पत्करील का?

***

भारतात पंतप्रधानाच्या नवी दिल्ली येथील निवासीय कार्यालयात राष्ट्रीय सुरक्षा मंडळाची 'अत्यंत तातडीची' बैठक भरली होती. प्रत्यक्ष दिल्लीत हजर राहू न शकलेले सदस्य आपापल्या जागी 'व्हिडिओ यंत्रणे'त सहभागी झाले होते.

''कृपालजी, बताइये हमारे पड़ोस का माहोल क्या है?'' पंतप्रधानांनी आपले परराष्ट्रमंत्री

कृपाल शर्मा यांना सुरुवात करायला सांगितले. मुत्सद्देगिरीत शर्मांचा हात धरणारा कोणी नाही अशी आंतरराष्ट्रीय ख्याती होती. वाटाघाटीत 'वज्रादपिकठोराणि' अशा भावनेने आलेले लोक त्यांचा युक्तिवाद ऐकून 'मृदूनि कुसुमादपि' होऊन परत जात. चर्चा करणारी व्यक्ती आपल्याला अनुकूल नाही झाली तरी आपल्या पुढे सर्द तरी होईल इतकी काळजी ते घेत. ते म्हणाले,

''पंतप्रधानजी, त्या घियासुद्दीनवर पूर्ण फाईल आमच्याकडे आहे. याचे आजोबा रशियाविरुद्ध अफगाणांच्या

लढ्यात होते. वडील जम्मू-काश्मीरात भाडोत्री सैनिक होते तर हा खरोखर मियाँ नुरानींनी पोसलेला खास त्यांच्या विश्वासातला पण पुढे दहशतवादाच्या मार्गाला गेला. पूर्वी हा...''

''कृपालजी, वेळ कमी असल्याने भूतकालावर छाट मारूया. आत्ता आपल्यापुढे पर्याय काय आहेत ?'' शर्माजींची गाडी रूळावर आणत पंतप्रधान म्हणाले. ''सॉरी सर! घियासुद्दीनने दिलेल्या चोवीस तासांत आपण काय करू शकतो? पर्याय एक--- आपण प्रथम हल्ला करायचा. कराची, इस्लामाबाद, हैदराबाद सिंध, लाहोर, पेशावर आदि शहरे आपण पाच मिनिटांत भस्मसात करू शकतो. एकूण दहा शहरांवर आपली अण्वस्त्रे रोखली आहेत.''

पंतप्रधानांनी खिन्नपणे मान डोलवून म्हटले, ''आणि त्यांची अण्वस्त्रे दिल्लीसकट आपल्या शहरांवर आहेतच रोखलेली ! पण नागासाकीनंतर पहिला अणुहल्ला करायचा तथाकथित बहुमान एकेकाळी महात्मा गांधींच्या अहिंसेला शिरोधार्य मानणाऱ्या देशाने मिळवावा हे घडता कामा नये.''

''दुसरे पर्याय कोणते आहेत ते तर पाहू या'' गृहमंत्री म्हणाले. उद्ध्वस्त शहरांची जबाबदारी त्यांच्याच शिरावर पडणार होती. कृपालजी पुढे म्हणाले,

''आणखी पर्याय या चोवीस तासांत वाटाघाटींत त्यांना गुंतवून ठेवण्याचा---- पण हा माथे फिरू केव्हा काय करील नेम नाही. आपण अमेरिका, युरोप, चायना, जपानकडून दडपण आणू शकतो. पण घियासुद्दीनच्या हाती अण्वस्त्रांची कळ असणे म्हणजे आज-उद्या नाही तरी परवा तोच धोका राहतो. त्याचा नायनाट करणे आवश्यक आहे.''

''ती झाली नंतरची कार्यवाही! सध्याचा धोका आधी टळला पाहिजे.'' पंतप्रधान म्हणाले. त्यावर उलटसुलट चर्चा झाली, अखेर---

''बोलायची परवागनगी असावी, सर !'' नम्रपणे त्रिदलप्रमुख म्हणाले.

''बोला, जनरल पात्रो'' पंतप्रधानांनी आज्ञापिले.

''आपण अशी परिस्थिती घडवून आणू शकतो की ते पहिला हल्ला करतील जो फार तीव्र नसेल ... आणि मग आपण त्याचा चोख जबाब देऊ ! हे कसे घडवून आणायचे ते माझ्यावर सोडा.''

'कसे घडवून आणायचे' हे जनरल पात्रो प्रत्यक्ष सांगायला तयार नसले तरी त्यांच्या पूर्वकर्तृत्वावरून ते तसे घडवून आणतील याबद्दल कोणालाही शंका नव्हती.

''फेक अटॅक... लाइक फेक एन्काउंटर'' विरोधी पक्षनेते राम बजाज शेजारी बसलेल्या संरक्षणमंत्र्यांच्या कानात पुटपुटले. संरक्षणमंत्र्यांनी डोळे मिचकावले. चर्चा आणखी अर्धा तास लांबली आणि शेवटी त्रिदलप्रमुखांचा पर्याय मान्य झाला. अणुयुद्ध आता काही तासांवरच आले होते. मात्र, हा निर्णय गुप्त ठेवायचा होता. पण पंतप्रधानांच्या या अतिगुप्त यंत्रणेचा निष्कर्ष खोलीबाहेर केव्हाच निघाला होता आणि प्रकाशाच्या वेगाने चालला होता.

***

''हा पाहा भारताने घेतलेला निर्णय ! आता कार्यवाही अटळ आहे.'' सी ने आपल्या मॉनिटरवर उमटलेला संदेश दाखवला.

''पण कॉम्प्यूटरला आधी दाखवले पाहिजे'' अे म्हणाला. त्याने तशी व्यवस्था केली. तिघेजण उत्सुकतेने कंप्यूटरच्या निर्णयाची वाट पाहात होते - बी तर कंप्यूटर कंसोलजवळ उभी होती.

दहा मिनिटांचा तणावपूर्ण काळ.... आणि मग हिरवा दिवा

लागला. ''कार्यवाही करावी लागणार'' ए उद्गारला. ''बी, पाहा कंप्यूटरने काही प्रिंट-आऊट पाठवला का ?''

''हा काय !'' बी ने काही छापील पाने ए कडे दिली. ती वाचता वाचता ए उद्गारला : ''आपण एक लाखाहून जास्त वर्षे पाहात आलेल्या अभयारण्यात हस्तक्षेप करायची वेळ आली आहे.''

***

पृथ्वीवर सर्व राष्ट्रांची सभा भरली होती. संयुक्त राष्ट्रसंघाची ती तातडीने बोलावलेली बैठक होती. सभेची सुरुवात कार्यवाहांच्या अहवालाने झाली. ते म्हणाले,

''उपस्थित राष्ट्र प्रमुखांनो,

परवा भारत आणि पाकिस्तान या दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रांमधील तणाव वाढत जाऊन अणुयुद्ध पेटण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. एका दहशतवादी संघटनेने अण्वस्त्रांच्या पाकिस्तानी साठ्यावर कब्जा मिळवून भारताला आव्हान दिले होते आणि चोवीस तासांची मुदत.

परंतु चोवीस तास उलटले तरी काही घडले नाही.... पण मी म्हणतो त्यांत दुरुस्ती करायला हवी... विनाशकारी असे घडले नाही. कारण सर्व पाकिस्तानी अण्वस्त्रे आणि बॉम्बचे साठे निकामी करण्यात आले होते. ते पाहून दहशतवाद्यांना पाकिस्तानी सेनेने आपल्या ताब्यात घेतले. मात्र, शस्त्रास्त्रे निकामी करण्यात त्यांचा काही हात नव्हता.

हे काम भारताचे होते का ? या प्रश्नाचेही नकारार्थी उत्तर मिळाले. फार काय भारताचे अण्वस्त्रसाठे देखील तितक्याच सफाईदारपणे निकामी केलेले दिसले. आपल्या सुरक्षा यंत्रणेत दुसऱ्या राष्ट्रांनी ढवळाढवळ केली, असे सांगायला भारत आणि पाकिस्तान दोघांनीही तातडीची बैठक बोलावली.

यावर आज आपल्याला उत्तर शोधून काढायचे आहे. एखाद्या राष्ट्राच्या सुरक्षा यंत्रणेत अशी ढवळाढवळ म्हणजे त्याच्या सार्वभौमत्वाला आव्हान आहे. तेव्हा ही कार्यवाही कोणी घडवून आणली त्या राष्ट्राच्या किंवा राष्ट्रांच्या प्रमुखांनी निवेदन करावे. जरी अणुयुद्ध टळले या गोष्टीबद्दल आपण सर्वांनी आनंद व्यक्त केला पाहिजे, तरी ज्या पद्धतीने हे करण्यात आले ती चिन्तेचा विषय असू शकते.''

कार्यवाह खाली बसले आणि त्यानंतर पाकिस्तानी आणि भारतीय राष्ट्रप्रमुखांनी आपली अण्वस्त्रे कशी आणि केव्हा नाकाम झाली याचे विवरण दिले. त्यावरून दोघांचे साठे एकाच वेळी, एकाच प्रकारे नष्ट झाल्याचे दिसले. दोघांचे साठे पूर्ण रिते झाल्याची ग्वाही त्यांच्या राष्ट्रप्रमुखांनी दिली.

ही अत्यंत आश्चर्यकारक घटना होती आणि इतक्या सफाईदार कामगिरीची जबाबदारी कोणाची असावी अशी अटकळ सुरू झाली. तेवढ्यात राष्ट्रसंघाच्या अध्यक्षांना त्यांच्या खिशातल्या टॅबवर एक संदेश मिळाला. त्यांनी हात उंचावून लोकांना शांत केले आणि म्हणाले:

''लोकहो, आपल्या जागतिक अणुशक्ती संघटनेचे प्रमुख बाहेर आले आहेत. त्यांना या संदर्भात महत्त्वाचे निवेदन करायचे आहे. तुमच्या परवानगीने मी त्यांना व्यासपीठावर बोलावतो.''

सभासदांत त्या अनपेक्षित घटनेने चुळबुळ माजली. पण अणुशास्त्रज्ञ डॉक्टर फ्रांझ रुंझेन जेव्हा व्यासपीठावर आले, तेव्हा सर्वत्र शांतता स्थापित झाली. अध्यक्षांनी अनुमोदन देताच डॉ. रुंझेन यांनी बोलायला सुरुवात केली.

''मित्र हो, तुमच्या यंत्रणेत व्यत्यय आणल्याबद्दल क्षमा मागतो. पण मला नुकतीच मिळालेली माहिती इतकी खळबळजनक आहे की ती तातडीने तुमच्यापुढे मांडणे आवश्यक आहे. प्रथम तिचे सार ऐका :

मित्र हो, जगातले सर्व अण्वस्त्रसाठे आज... दोन तासांपूर्वी... निकामी करण्यात आले आहेत !''

सभेत विलक्षण खळबळ माजली. अनेक राष्ट्रप्रमुखांनी आपले टॅब काढून आपल्या देशाशी संपर्क साधायला सुरुवात केली. त्यांना शांत करत डॉ. रुंझेन म्हणाले :

''आपण सवडीने खात्री करून

घ्या, पण आमच्या संस्थेतर्फे खात्री करूनच मी आलो आहे. आमच्याकडे या अण्वस्त्रांच्या गुप्त नोंदी ठेवल्या जातात. पण मला हे कसे समजले ? ते महत्त्वाचे आहे.

हा संदेश मला माझ्या फोटॉनिक मेलमधून मिळाला... तो कुठून आला याचा शोध चालू झाला आहे. पण संदेश वाचा.''

असे म्हणून त्यांनी भिंतीवर मोठ्या अक्षरात तो संदेश प्रोजेक्ट केला.

पृथ्वीवासीयांनो,गेली ११५, २४७ वर्षे आम्ही तुमच्यावर लक्ष ठेवून आहोत. पृथ्वीवर एखादी संस्कृती प्राथमिक अवस्थेतून विकसित होत कशी बदलते, अधिक बुद्धिमान होत जाते, आपले माहितीचे साठे वाढवीत जाते ते आम्हांला पाहायचे आहे. त्यासाठी हा ग्रह फार सोयीचा आहे. हा नैसर्गिक साधनसंपत्तीने विभूषित आहे. खरेच तुम्ही इथे जन्म घेतलात हे तुमचे सौभाग्य आहे. विश्वातील इतर अधिक खडतर ठिकाणे पाहिलीत तर तुम्हाला खात्री पटेल.

अशा या परिपूर्ण जागी एका अभयारण्याप्रमाणे आम्ही तुमचा विकास पाहात आलो. तुम्हाला अजून प्रगतीच्या पुष्कळ पायऱ्या चढायच्या आहेत. तुमच्यावर मधूनमधून नैसर्गिक आपत्त्या येतील. आपली बुद्धिमत्ता वापरून तुम्ही त्यावर कशी तोड काढता ते आम्ही पाहू. पण सर्वात मोठी आपत्ती नैसर्गिक नसून तुम्ही स्वत:च्या मूर्खपणाने स्वत:वर ओढवून आणता आहात.

विज्ञान-तंत्रज्ञानाचा आधार घेऊन तुम्ही प्रगती करीत आहात पण त्याचबरोबर या बहुरत्ना वसुंधरेचा तुम्ही अंत पाहता. तिला मिळालेले सुंदर पर्यावरण बिघडवत चालला आहात. सूर्यमालेच्या इतर ग्रहांवर जाऊन पाहा आणि मग कळेल पृथ्वीवरच का जीवसृष्टी नांदते आहे. आता ती पण तुम्हाला नकोशी झाली का ?

कारण तिचा काही क्षणांत अंत करण्यास सक्षम अशी अण्वस्त्रे तुम्ही साठवली आणि आपापसांतले हेवेदावे साधण्यासाठी संपूर्ण पृथ्वीला ओलीस ठेवलेत. आम्ही तुम्हाला जोपासायचे तसेच या पृथ्वीलाही. ह्यापूर्वी पण काही निवडक प्रसंग होते, जेव्हा आम्हाला हस्तक्षेप करावा का हा प्रश्न पडला. उदाहरणार्थ, दुसरे जागतिक युद्ध उद्‌भवले त्या वेळी. पण आम्ही स्वत:ला आवरले. मोठा नाश पाहून तुम्ही किती शहाणे होता ते आम्हांला पाहायचे होते.

पण गेल्या काही दिवसांत परिस्थिती विकोपाला गेली. दुसऱ्या जागतिक युद्धातली संपूर्ण प्राणहानी काही क्षणांत होईल असे युद्ध तुम्ही आखलेत आणि आपली अण्वस्त्रे पणाला लावलीत. शेवटी आम्ही या अभयारण्यात हस्तक्षेप करायचे ठरवले.... नाइलाजाने. नाहीतर पृथ्वी पुन्हा जीवसृष्टी पोसूच शकली नसती.

आम्ही तुमचे अण्वस्त्रांचे सर्व साठे नाकाम केले. केवळ युद्धेच्छू राष्ट्रांचेच नव्हे तर सर्व राष्ट्रांचे. आज पृथ्वीवर एकही अण्वस्त्र उरले नाही आणि या अनुभवातून शहाणे न होता तुम्ही पुनर्निर्मितीच्या फंदात पडलात तर तो प्रयत्न - वेळ, ऊर्जा आणि मेहनत - तिन्ही वाया घालवणारा ठरेल. कारण अण्वस्त्र तयार झाले की नाकाम करण्याची आमची योजना आहे. तेव्हा आपले ज्ञान विधायक कार्यांसाठी वापरा.

आम्ही कोण ? कुठले ? या प्रश्नांची उत्तरे तुमचा आणखी विकास झाला की आपोआप मिळतील. तोपर्यंत तुम्ही आम्हाला दिलेले नाव वापरून तुमचा निरोप घेत आहोत !

तुमचे हित पाहणारे,

(पृथ्वी बाहेरचे ए.ढ.)

संदेशात शेवटी म्हटले होते तरी ए.ढ. ना शोधण्याचे प्रयत्न झाले. अस्त्रे निकामी करणारी यंत्रणा मंगळावर आहे, असे प्रथमदर्शनी दिसले. कुठली अस्त्रे केव्हा निकामी झाली त्या माहितीच्या आधारे ती जागा शोधण्यात आली. मंगळावरील ऑलिंपस मॉन्स पर्वताच्या आत तिचा उगम होता. अजून तो पर्वत भेदण्याची क्षमता आपल्यात नाही याची खात्री झाल्यावर मानवाने हा शोध आवरता घेतला.

आणि पृथ्वी नावाच्या अभयारण्याची सुखरूप वाटचाल पुढे सुरू झाली.

***

**- जयंत नारळीकर**
'आयुका' पुणे विद्यापीठ
आवार, पुणे ७

# निसर्गाची डिस्कव्हरी



*–दिलीप कुलकर्णी*

आम्ही एका खेडेगावात राहतो. इथं आम्ही ३ वर्षांपूर्वी घर बांधलं. मातीच्या भिंती, कौलारू छप्पर असं. आजूबाजूला ऐन, किंजळ, खैर, कुडा, करवंदी यांचं जंगलच आहे.

शहरात अशा तऱ्हेचं वनांनी वेढलेलं घर असूच शकत नाही. नव्या वस्त्यांत बागा-उपवनं तरी असतात. पण जुन्या वस्तीत आता झाडं दिसणं देखील दुर्मिळ होत चाललं आहे. मोकळ्यावर हिंडणाऱ्या वन्य प्राण्यांचं दर्शन तर धूमकेतूइतकंच दुर्लभ.

या परिस्थितीमुळे शहरी माणूस निसर्गाच्या अनुभवाविषयी भुकेलेला राहतो. प्राणिसंग्रहालय, सर्पोद्यान, मत्स्यालय अशा ठिकाणी जाऊन तो दुधाची तहान ताकावर भागवतो. पण हे काही खरं नाही, हे त्यालाही ठाऊक असतं.

आधुनिक तंत्रज्ञानानं ही भूक शमवण्याचा एक उपाय सादर केला– निसर्गज्ञान देणाऱ्या वाहिन्या. अनेकांना, 'केबल' घेण्यासाठी तो सभ्य बहाणाही होता. आता घरोघरी केबल असल्यामुळे त्यात काही विशेष वाटत नाही; पण अशीही घरं निश्चित आहेत की, जिथे जागरूक, सुजाण पालक मुलांना 'डिस्कव्हरी' बघता यावी म्हणून आपल्या दूरदर्शनावर मर्यादा ठेवतात. कित्येक मुलंही अभ्यासपूर्वक ते कार्यक्रम पाहतात.

अशी जी 'डिस्कव्हरी', 'नॅशनल जॉग्रफिक' किंवा 'ॲनिमल प्लेनेट' पाहणारी मुलं आहेत, त्यांच्यासाठी नि त्यांच्या सुजाण पालकांसाठी हा लेख आहे.

या वाहिन्यांवरून प्रसारित होणारे कार्यक्रम खरोखरच उच्च दर्जाचे असतात यात वादच नाही. विषयांचं वैविध्य, त्यांची अभ्यास-नियोजनपूर्वक हाताळणी, परिश्रम आणि कौशल्यपूर्ण प्रकाशचित्रण, समजावून सांगण्याची आकर्षक धाटणी – सगळंच काही छान असतं. जगाच्या कानाकोपऱ्यांत कुठं-काय-कसं आहे हे आपण घरबसल्या बघू शकतो. कुठेही जावं न लागता निसर्गविषयक माहितीच्या धबधब्यात भिजून चिंब होऊ शकतो. इकडे आफ्रिकेच्या घनदाट जंगलात काय आहे; तिकडे बर्फाळ ध्रुवावर कोण, कसं राहतं; इकडे ॲमेझॉनच्या खोऱ्यातलं जीवन कसं आहे; तिकडे अरबस्थानातल्या वाळवंटात वाळूखाली काय दडलंय; सागरी वनस्पतिसृष्टी आणि प्राणिसृष्टी कशी आहे... ही सगळी माहिती आपल्याला मिळते.

पण मला अनेकदा असा प्रश्न पडतो की, इतकी सगळी माहिती मिळवून आपण काय करतो ? अन् हा एकच नाही, तर अशा प्रकारचे अनेक प्रश्न माझ्या मनात येतात: जगाच्या पाठीवरच्या यच्चयावत् निसर्गवैशिष्ट्यांची अशी माहिती मिळवण्यात खरोखरच काही अर्थ आहे का? त्या माहितीचा उपयोग काय? की माहिती मिळवण्याच्या नादात निव्वळ एक वेगळ्या प्रकारची करमणूक असा प्रकार होऊ लागतो?

सध्याचं युग हे माहितीचं युग आहे. या युगाच्या प्रारंभीच्या काळात माहितीसाठी धावपळ करावी लागे. कष्ट घ्यावे लागत. पण आता काळ बदलला आहे. आपण नुसते बसलो तरी वृत्तपत्रं, दूरचित्रवाणीवरच्या वाहिन्या, इंटरनेट अशा माध्यमांतून माहितीचे धबधबे नुसते कोसळत असतात. ही सगळी माहिती आपल्याला 'आवश्यक' असते का ? अशी नुसती माहिती वाचून, बघून डोक्यात कोंबून ठेवून काय साधतो आपण ? काहीही नाही. विवेकानंद म्हणतात तसं हे 'अनावश्यक आणि निरर्थक माहितीचं गाठोडं' आहे. इतकी माहिती आपण नीटपणे ग्रहण करू शकत नाही. सुसंगतपणे प्रक्रियित करू शकत नाही. योग्य प्रकारे साठवून ठेवू शकत नाही आणि संगतवार पुन्हा आठवून वापरू शकत नाही. कारण – स्पष्टपणे सांगायचं तर – ती निरुपयोगी असते, वांझ असते.

मग तरीही हे माहितीसाठीचं पछाडलेपण का - निव्वळ व्यसन म्हणून? सिगारेटमुळे, दारूमुळे आपल्याला काहीही मिळत नाही हे ठाऊक असूनही व्यसनी माणूस त्यांचं सेवन करीतच राहतो, तसं आपलं होतं का? दारू, सिगारेट पिण्यातून एक खोटं समाधान, एक खोटं सुख मिळतं. या 'माहिती'मुळेही 'ज्ञान' मिळाल्याचं खोटं समाधान आपल्याला मिळतं, म्हणून का आपण तिच्यामागे लागतो ?

मित्रांनो, 'माहिती' म्हणजे 'ज्ञान' नव्हे. इंग्रजीत त्यासाठी दोन भिन्न शब्द आहेत. इन्फर्मेशन् आणि नॉलेज. नॉलेज म्हणजे ज्ञान. ते आत असतंच - दिव्याच्या ज्योतीसारखं. पण ज्योतीभोवती जन्मोजन्मींच्या संस्कारांची काजळी साठलेली असते, त्यामुळे तिचा प्रकाश बाहेर पडू शकत नाही. 'शिक्षण या साधनानं आपण ही काजळी पुसून टाकतो. शिक्षणानं इंद्रियं-मनाची शुद्धी होते न् आतलं ज्ञान 'चित्' बाहेर येऊ लागतं. अशा प्रकारे 'आतून बाहेर' येतं ते 'ज्ञान'. ते असतंच, फक्त आता ते प्रकट होऊ लागतं.

माहिती म्हणजे त्याच्या बरोबर उलटी प्रक्रिया. 'बाहेरून आत' कोंबण्याची. दुसऱ्या कुणीतरी ती सांगावी - दाखवावी लागते. प्रयत्नपूर्वक लक्षात ठेवावी लागते. 'ज्ञानाचा' 'उपयोग' नसतो. ते साधन नाही, साध्य आहे. उलट, माहिती ही उपयोगासाठीच असते.

मला असं नाही म्हणायचं की, माहिती मिळवूच नये. ते चुकीचं होईल. व्यवहारात असंख्य गोष्टी करायच्या असतात - त्यासाठी जगातल्या अनेक बाबींची माहिती आपल्याला हवीच. आपल्या मेंदूची एक विशिष्ट कार्यपद्धती आहे. आत आलेल्या माहितीवर तो प्रक्रिया करतो. तिचं वर्गीकरण करतो. योग्य त्या कप्प्यांत ती साठवून ठेवतो. अन् याचबरोबर, विशिष्ट काळात वापरली न गेलेली माहिती तो पुसूनही टाकतो. आपण आज विविध माध्यमांद्वारे जी माहिती मिळवतो, त्या पैकी बऱ्याचशा माहितीचं हेच होतं. मेंदू ती अनावश्यक रद्दी फेकून देतो.

मग असं जर आहे, तर मुळात माहितीमागे इतकं उरापोटी धावायचं कशाला ? आवश्यक तेवढीच किमान माहिती - आणि तीही योग्य तऱ्हेनं - मिळवली तर मेंदूचंच काम हलकं होईल, नाही का ?

अगदी 'डिस्कव्हरी' बघतानाही आपलं हेच होतं. आपण टीव्हीचे गुलाम बनून तो जे दाखवील ते बघत राहतो. ते आपल्याला आवश्यक आहे का याचा विचार करत नाही. तिथं जे आणि जसं दाखवलं जातं ते आणि तसं बघत बसायचं. मग ते बघत असताना आपण किती आणि काय खातोय याकडे आपलं लक्ष नसतं. हरणाचा पाठलाग करणारा तिथला चपळ चित्ता, नि अंतश्चित्रात त्याच्या लवचिक कण्याचं क्ष-चित्र पाहताना सतत कुबड काढून वा लोळत टीव्ही बघणाऱ्या आपल्या कण्याची मात्र पार वाट लागते आहे हे आपण विसरतो.

दुसरं, आपण अशी टीव्ही पाहून जी माहिती मिळवतो, ती परिपूर्ण असते का ? विश्वाची माहिती मिळवण्यासाठी माणसापाशी पाच ज्ञानेंद्रियं आहेत. कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक. या इंद्रियांमार्फत आपल्याला अनुक्रमे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ह्यांची जाणीव होते. एखाद्या वस्तूचा ह्या पाच किंवा जास्तीत जास्त इंद्रियांमार्फत जेव्हा अनुभव घेतला जातो, तेव्हा तिचं अधिकाधिक परिपूर्ण ज्ञान आपल्याला होतं. दूरदर्शन हे 'दृक्श्राव्य' माध्यम आहे. म्हणजे पाचांपैकी फक्त दोन इंद्रियांचा उपयोग करावा लागणारं : डोळे आणि कान. बाकी तीन इंद्रियांचं काय ?- त्यामुळेच निसर्गाची ही माहिती अत्यंत अपुरी आहे.

आपण जेव्हा प्रत्यक्ष निसर्गाकडे जातो, तेव्हा आपली पाचही ज्ञानेंद्रियं काम करतात. टीव्हीवर मृगाचा किडा नुसता दिसेल; पण त्याचा मखमली स्पर्श कसा जाणवेल ? मोरपिसाचं सौंदर्य टीव्हीवर दिसेल, पण ते गालावर फिरवल्यावर होणाऱ्या सुखद गुदगुल्यांचं काय ? मोरपिसाच्या माहितीत या स्पर्श जाणिवेचा अभाव असेल, तर तिला काय अर्थ ? समुद्राच्या पुळणीवर ओल्या मऊ मऊ वाळूत अनवाणी चालताना तळपायाला जो ओला गारवा जाणवतो; भाताचं पीक तयार होत आलं की, बांधावरून चालताना चुलीवर शिजणाऱ्या भातासारखा त्याचा जो सुवास दरळवतो; भाद्रपदात बकुल-प्राजक्ताच्या झाडाखालून जाताना सुवासाची जी मखमली पखरण होते; उन्हाची आग चहूकडे पेटलेली असताना बाभळी-कडूनिंबाच्या सावलीत जो थंडावा जाणवतो; वडावर सूरपारंब्या खेळताना आजोबांच्या अंगाखांद्यावर नातवंडांनी बागडावं तशी जी अनुभूती येते-- हे सगळं पंचेंद्रियांनी अनुभवायला हवं. म्हणजे मग तो



निळावतीच्या दीपकळ्यांनो आला माझ्या घरी ।
नाचुनि गाउनि रंगेवलीही मम अंगण ओसरी ।।
शंभरावा अंक

अनुभव परिपूर्ण होतो. ती माहिती संपूर्ण असते.

अन् ही प्रक्रिया केवळ मेंदूसाठी नाही, तर मनासाठीही आवश्यक आहे. पंचेंद्रियांनी 'निसर्गाची डिस्कव्हरी' करताना आपण त्याच्याशी एकरूप होतो, तादात्म्य पावतो; अशा तादात्म्यातूनच खराखुरा आनंद मिळतो. टीव्हीवरची माहिती आपण त्रयस्थपणे पाहतो. माहिती मिळवण्याच्या प्रक्रियेत आपला सहभाग नसतो. तीसाठी आपण कष्ट घेतलेले नसतात. वाघाचं एक तरी प्रकाशचित्र मिळावं म्हणून अंग फोडणाऱ्या डासांच्या त्रासाला न जुमानता रात्र रात्र जागणाऱ्या प्रकाशचित्रकारासारखी तितिक्षा आपण करीत नाही. श्वापदानं हल्ला करण्याचा धोका आपण पत्करत नाही. जळवांनी रक्त शोषण्याचा त्रास आपण भोगत नाही. काट्यांनी अंग ओरबाडलं जाण्याचं दुःख साहत नाही. दुसरं कुणीतरी हे सगळं करतं. आपण निष्क्रियपणे ते बघायचं एवढंच. त्यामुळे मग ती माहितीही अपुरी, नि आनंदही तोकडा.

'निसर्गाची डिस्कव्हरी' ही साधना असते. तुम्ही 'कार्व्हर' वाचलाय? त्याच्या चरित्रात वीणा गवाणकरांनी लिहिलंय- 'एकाकी, अबोल जॉर्जचा मित्रपरिवार मुलखावेगळाच होता. रानावनातली झाडंझुडुपं, पक्ष्यांची पिलं, डबक्यातले मासे हाच त्याचा गोतावळा. झाडा-प्राण्यांच्या संगतीत तो मनसोक्तपणे गुणगुणत राही. अगदी भान विसरून जाई. पोटावर पालथं पडून तासन्तास एखाद्या अंकुराचं किंवा वाळवीचं निरीक्षण करीत राही. त्याच्या सहवासात झाडांना जणू जिव्हा फुटत. कान येत.

आपल्या भाषेत त्यांचे संवाद चालत.'



जगदीशचंद्र बसूंचंही बालपण अगदी असंच होतं. पानं, फुलं, वनस्पतींचं निरीक्षण करण्याची त्यांना आवड होती. आपल्या घराशेजारीच त्यांनी एक बगीचा तयार केला होता. त्यात ससे, खारी पाळल्या होत्या. एका छोट्या तळ्यात बेडूक, मासे नि बिनविषारी साप पकडून आणून ठेवले होते. पुढे महाविद्यालयात गेल्यावरही वसतिगृहाच्या आवारात त्यांनी अशीच बाग केली होती. प्राणी पाळले होते. सुट्टीत त्यांची कोण काळजी घेणार म्हणून या प्राण्यांना घेऊनच ते सुट्टीत घरी जात.

चिंपाझींचा अभ्यास करणाऱ्या जेन गुडाल ह्यांचं नाव तुम्ही ऐकलं आहे ना ? जंगलात जाऊन त्या चिंपाझींच्या कळपात राहात. त्यांच्यातल्या एक होऊन त्यांच्या सवयी, त्यांची वागणूक, त्यांची भाषा, त्यांचं जीवन याचा अभ्यास त्यांनी केला.

या सगळ्या इतिहासातल्या आणि दूरच्या गोष्टी झाल्या. आपल्या अगदी जवळ असे अभ्यासक आजही आहेत. मारुती चितमपल्ली आहेत, व्यंकटेश माडगूळकर आहेत. दुर्गाबाई भागवतांचं 'ऋतुचक्र' तुम्ही वाचलंय? निसर्गाची विविध ऋतूंमधली रूपं, पशु-पक्ष्यांच्या हालचाली दुर्गाबाईंनी अगदी एखाद्या शास्त्रज्ञासारख्या निरीक्षिल्या आहेत, नि या पुस्तकात सुंदर ललित निबंधांच्या रूपात आपल्यासमोर ठेवल्या आहेत.

आपण अशा प्रकारांनी निसर्गाचा अभ्यास करू तेव्हा आपल्याला त्याची खरीखुरी 'डिस्कव्हरी' होईल. त्याच्याशी पंचेद्रियांनी एकरूप झाल्याशिवाय तो त्याची गुपितं आपल्याला सांगत नाही.

अन् समजा, आपल्याला अभ्यास नाही करायचाय्, तरीही आस्वादक म्हणून आपण निसर्गाकडे जाऊ शकतोच. पाचही ज्ञानेंद्रियांनी त्याच्या सौंदर्याचा - माधुर्याचा आस्वाद घेऊ शकतोच.

आपल्याला आज लगेच हे शक्य होईल असं नाही. पण ध्येय म्हणून डोळ्यांपुढे असू द्या. नूडल्स किंवा आईस्क्रीम खात-खात 'डिस्कव्हरी' बघत बसणं हा त्या ध्येयाकडे जाण्याचा मार्ग निश्चितच नाही.

निसर्गाची डिस्कव्हरी करण्याची वाट ती नाही. ती निव्वळ पळवाट आहे.

***

**दिलीप कुलकर्णी,**
कुडावळे ४१५ ७१२
ता. दापोली, जि. रत्नागिरी.

# माय आणि गाय

– डॉ. रामचंद्र देखणे



***माणूस कितीही मोठा झाला तरी मनावर कायमचे संस्कार करणारी बालपणाची स्मरणचित्रे आठवत राहातात. घरी अत्यंत गरिबी असूनहीं ग्रामसंस्कृतीचा आस्वाद घेतघेत जगलेले समृद्ध जीवन त्याला स्मरते. कष्ट करणारी, गुरावासरांवर प्रेम करणारी माय आणि घराला, घरातल्या मुलाबाळांना लळा लावणारी गाय यांची हृदयंगम आठवण रामचंद्र देखणे येथे सांगत आहेत.***

माझे बालपण एका खेडेगावात गेले. त्या वेळी दारिद्र्यातही आम्ही आनंदी जीवन जगत होतो. प्राप्त परिस्थितीला जीवनाचा शिल्पकार मानले तर दारिद्र्यही संकट न ठरता जीवनाला जाणीव करून देणारा एक महत्त्वाचा घटक ठरतो. लहानपणी मी गुरे वळली. त्या निमित्ताने माझ्या गावचा सारा शिवार मी जवळून पाहिला. या शिवारालाच मी मित्र मानले. शिवाराने मला खूप गोष्टी शिकवल्या. मित्रासारखी साथ दिली. जीवनाच्या प्रत्येक वळणावर हे शिवार एकीकडे साक्षीदार ठरले तर दुसरीकडे मार्गदर्शक. मी मोटा हाकल्या. पाटाचे पाणी वावरात पोहोचविण्यासाठी बारे धरले. उन्हाळ्यात आंब्याचे राखण केले. गोठ्यातल्या जितराबांसाठी गवताचे भारे रानातून घरी वाहिले. खळी-टळी, पेरणी-पाभारी, पेंडी-काडी या साऱ्या गोष्टींत वडिलांना शेतीच्या कामासाठी मदत केली. खेडेगावात राहिल्याने तिथल्या ग्रामजीवनाशी आणि ग्रामसंस्कृतीशी एकरूप झालो. शिमग्याच्या सुमारास गावात होणाऱ्या ललितात सहभागी झालो. जत्रेच्या सोंगात भाग घेऊ लागलो. गावच्या ढोल-लेझीमच्या ताफ्यात लेझीम घेऊन देहभान विसरून नाचलो. रात्री मारुतीच्या देवळात रंगणाऱ्या भजनात खड्या आवाजात अभंग म्हणत म्हणत मीही रंगून गेलो.

समृद्ध गाव आणि त्यातील समृद्ध लोकजीवन मी पाहिले आहे. लहानपणी आई जात्यावर दळण दळीत ओव्या म्हणायची. त्या ओव्यांनी मी जागा झालो आहे. आईबरोबर जाते दळू लागलो आहे. जात्यावरच्या ओव्याही म्हटल्या आहेत. डोक्यावर मोरपिसांची टोपी. अंगात घोळदार अंगरखा, एका हातात टाळ, पायात चाळ, गळ्यात माळ. दुसऱ्या हातात चिपळ्या. त्या चिपळ्या वाजवीत आणि टाळाच्या ठेक्यावर नाचत नाचत गावगाड्यात पहाटे येणारा 'वासुदेव' मी पाहिला आहे. त्याच्या प्रासादिक गीतांनी खऱ्या अर्थाने जागा झालेला गाव मी अनुभवला आहे. जोशी, कडक-लक्ष्मी, बहुरूपी यांच्या आगमनाने गावगाड्यात आलेले चैतन्य आणि आनंद याने मीही भारावून गेलो आहे. संध्याकाळी शाळा सुटल्यावर पाठीवर दप्तर टाकून तासन्तास डोंबाऱ्याचा किंवा गारुड्याचा खेळ पाहात रमत गमत घरी आलो आहे. जत्रेच्या छबिन्यात भारुडे केली आहेत. श्रावण महिन्यात कुणाच्या माडीवर रामविजय, भक्तविजय, पांडवप्रताप यांसारखे ग्रंथ लावले जात. माझे वडीलच ग्रंथांचे वाचन करून त्यातील कथाभाग समजावून सांगत. मी लहानपणी संपूर्ण श्रावण महिन्यात वडिलांबरोबर जाऊन मलाही अजाणतेपणी ह्या ग्रंथांचे श्रवण घडले आहे. त्यातील काही कथाभाग अजूनही माझ्या कानात घुमतो आहे. थोडक्यात सांगायचे तर



घरी अत्यंत गरिबी असूनही ग्रामसंस्कृतीचा असा आस्वाद घेत घेत मी समृद्ध जीवन जगलो आहे. जीवनात मागे वळून पाहताना आपण किती समृद्ध जीवन जगत होतो याची मला ठायी ठायी जाणीव होते आणि त्या बालपणीच्या आठवणींतही मी रमून जातो.

वडिलांच्या सात्त्विक विचारसरणीत आमचे घर गरिबीतही सुखा-समाधानाने राहात होते. घराशेजारीच गुरांचा गोठा होता. तीन-चार गाई, एक-दोन वासरे त्या गोठ्यात असायची. 'गाई-गुरांनीं सजलेला गोठा ही आपली दौलत आहे', असं आई म्हणायची. पहाटेच्या वेळी आपल्या वासराला पाजण्यासाठी गाई हंबरडा फोडायच्या आणि गाईच्या त्या आवाजाने आम्हांला जाग यायची. मला लहानपणापासून गोठ्याचं खूप आकर्षण होतं. शेण-शेणकुटाचं काम मी आनंदाने करायचो. माझी आई शेणाच्या गोवऱ्या लावायची. वाळलेल्या गोऱ्यांचा कलवड रचला जायचा. गुरं वळण्यापासून गाईची धार काढण्यापर्यंत मी सारी कामे करायचो. लहान वासरांना तळ्यावर घेऊन जायचो, त्याला पाण्यात पोहायला सोडायचो. त्याचे डोळे, अंग नारळाच्या शेंडीने स्वच्छ पुसून काढायचो. जितराबांना दृष्ट लागू नये म्हणून त्यांच्या गळ्यात नाही तर शिंगात केसारीसह दृष्ट मणी अडकवायचो. सकाळीच आईबरोबर रानात जाऊन गुरांसाठी ताज्या हिरव्या गवताचा भारा आणायचो. गुरांना तळ्यावर पाणी पाजायला न्यायचो. ही माझी आवडीची कामे असायची. बैलपोळ्याच्या दिवशी तर मी दिवसभर गोठ्यातच असायचो. गुरांच्या शिंगांना हिंगोळ लावणे, त्यावर बेगड चिकटविणे, त्यांना बाशिंग बांधणे आणि मिरवत मिरवत घरी आणणे हा माझा आवडीचा छंद. दिवाळीच्या वेळी तर धनतेरसीला आणि लक्ष्मीपूजनाला आम्ही गाईची पूजा करायचो. रानातल्या गवताचा एक दिवा विणून घ्यायचो. त्यात पणती ठेवून गाईपुढे उभं राहून गाणी म्हणायचो -

'दिन दिन दिवाळी
गाई म्हशी ओवाळी
गाई म्हशी कुणाच्या
लक्ष्मणाच्या...
दे ग माई खोबऱ्याची वाटी
घालीन वाघाच्या पाठीत काठी...'

हातातला दिवा वर खाली करीत जेव्हा नाचत नाचत हे ओवाळणी गीत म्हटलं जायचं तेव्हा गायसुद्धा मान हलवीत त्याला साथ द्यायची.

'बहुळा गाईचा गोऱ्हा
गेनुबा बहुळी गाईचा गोऱ्हा
शिवारातल्या मोहरा
गेनुबा शिवारातल्या मोहरा...
मोहऱ्याचे ताट गेनुबा
मोहऱ्याचे ताट...
वाहे सोन्याचा पाट
गेनुबा वाहे सोन्याचा पाट...'

आणि वाड्यात गुराखी गीतांसह तासभर हा लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम चालायचा. मग गुराख्याचा मान म्हणून त्याला करदोटा आणि खोबऱ्याची वाटी दिली जायची. फराळाचं ताट दिलं जायचं. गुराख्याची दिवाळी आनंदात साजरी व्हायची.

आमच्याकडे त्या वेळी 'बहुळा' नावाची एक गुणी गाय होती. आमच्याच घरी ती लहानाची मोठी झाली होती. त्या गाईचा आमच्या घरातील सर्वांनाच खूप मोठा लळा होता. बहुळीला खायला घातल्याशिवाय आई जेवायला बसत नसे. सणावाराला गोडधोड केलं की पहिला देवाचा नैवेद्य आणि मग बहुळीला गोग्रास !... त्यानंतर आमची पाने वाढली जायची. त्या गाईनेही आमच्या घराला उदंड प्रेम दिलं. घरात करमले नाही की गोठ्यात जाऊन तिच्या पाठीवर अंग टाकून मी शाळेची पुस्तके वाचत बसायचो. मी वाचन करेपर्यंत ती अंगही हलवत नसे. धार काढताना तिला कधीही भाला घालावा लागत नसे. कोणत्याही कामासाठी घराबाहेर पडताना मी आईला नमस्कार करताना आई म्हणायची, 'बहुळीला नमस्कार केलास का?' आईचे संस्कार आणि बहुळीची माया मला उदंड मिळाली. माय आणि गाय यांच्या प्रेमाची पाखर घेऊनच मी लहानाचा मोठा झालो.

मी त्या वेळी सातवीला होतो. आमची शाळा गावाबाहेरच्या माळावर होती. शाळेच्या पाठीमागे लवण होते. गुराखी पोरे तिथे गुरे थोपवीत असत. गुराखी आणि शाळकरी याचं एकत्रीकरण माझ्या जीवनात झालं होतं. त्या वेळी गावात फक्त सातवीपर्यंतच शाळा होती. आठवीपासून तालुक्याच्या गावी शिकायला जावं लागे.

सातवीला जोडून 'व्हर्नाक्युलर फायनल'ची परीक्षा असे. गावातल्या शाळेत उत्तीर्ण झाला तरी फायनलच्या परीक्षेत किती गुण मिळाले यावर विद्यार्थ्यांची गुणवत्ता ठरायची. फायनलची परीक्षा हेच सातवीच्या इयत्तेचं आकर्षण असायचं. त्याची वेगळी तयारी करून घेण्यासाठी रात्रीची शाळा भरत असे. अंगावर गोधडी पांघरून हातातला कंदील हलवीत गावातल्या साऱ्या गल्ल्यांमधून पोरं गोळा करीत आम्ही रात्रीच्या शाळेला निघालो की गावकरी आमच्याकडे कुतुहलाने पाहात असत. रात्रीच्या शाळेसाठी गुरुजी वेगळी फी घेत नव्हते. त्यांच्या शैक्षणिक कर्तृत्वाचा भाग म्हणूनच ते रात्रीची शाळा चालवीत. फायनलच्या परीक्षेची तारीख निश्चित झाली आणि तालुक्याच्या गावी परीक्षेला जाण्याची तयारीही सुरू झाली. चार दिवस परीक्षा चालणार होती. एक लहान ट्रंक, तिला लहानसे कुलूप. त्या ट्रंकेमध्ये कपडे, व रोज लागणारे साहित्य, वह्या पुस्तके आणि एक अंथरूण-पांघरूणाची वळकटी बांधून मी तयार झालो. तालुक्याच्या गावी एका धर्मशाळेत चार-पाच खोल्या घेतल्या होत्या. त्यात आमची मुक्कामाची व्यवस्था होती. ग्रामपंचायतीचा पट्टेवाला रोज सायकलवरून आमचे जेवणाचे डबे तालुक्याच्या गावी पोहोचविणार होता. फायनलची परीक्षा असल्याने पोरं गांभीर्याने अभ्यास करत होती. आम्ही तालुक्याच्या गावी जायला निघालो. आई-वडिलांना नमस्कार केला आणि 'बहुळीला नमस्कार कर' असे आईने बजावले. मी गोठ्यात गेलो. बहुळीला नमस्कार केला आणि मला रडूच कोसळले. कारण तीन-चार दिवसांपासून ती खूप आजारी होती. खात-पीत नव्हती. वडिलांनी गावातल्या काही तज्ज्ञांना बोलावून काही गावठी औषधे दिली होती. गावाच्या जवळपास जनावरांचा दवाखानाही नव्हता. बहुळा अत्यंत मलूल दिसत होती. चारा खात नव्हती. मोकळेपणाने हंबरत नव्हती. मी तिच्या गळ्यात गळा घालून खूप रडलो. बहुळे, माझी परीक्षा नसती तर मी तुझ्या गोठ्यातून हललोच नसतो... पण मी परीक्षेला जाऊन येतोय. तोपर्यंत बरी हो... मी स्वत: तुला रानात घेऊन जाईन. तळ्यावर घेऊन तुला स्वच्छ धुऊन काढीन... पण मी येईपर्यंत मात्र कळ काढ...' तिच्याही डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहात होते. ती एकदा वासराकडे पाहात होती अन् हळूच माझ्याकडे पाहात होती आणि क्षीण आवाजात हुंकार देत होती. तिची ही अवस्था मला जाणवत होती. तिला वेदना असह्य होत होत्या. पण तरीही वेदना बाजूला ठेवून कान टवकारून डोळे उघडून तिने मला निरोप दिला... तिच्याकडे पाठमोरा पाहात पाहात तिच्या पायाची धूळ कपाळाला लावत लावत मी बाहेर पडलो. मला आईचे शब्द आठवले. 'अंगणात केवळ रांगोळीचे पद्म कशाला ? बहुळा हे प्रत्यक्ष गोपद्म आपल्या अंगणात नांदतंय. त्या गोपद्माची चरणधूळ रोज आपल्याला पावन करते आहे...' केवढे उदात्त विचार होते ते. आई तर म्हणायची केवढे भाग्याचे आपण... तेहतीस कोटी देवच आपल्या गोठ्यात वावरतात...'

मी परीक्षेसाठी तालुक्याला आलो. पण माझे परीक्षेतही लक्ष लागेना. निघताना कुचंबलेली बहुळी गाय आणि तिचा मलूल चेहरा माझ्यापुढे उभा राहायचा.. रोज माझा जेवणाचा डबा गावाहून यायचा. डब्यात मी रोज चिठ्ठी पाठवायचो. पेपर कसा गेला हे लिहायचो आणि बहुळीच्या तब्येतीची विचारपूस करायचो. इकडे वडीलांनी बहुळीला इलाज करून पाहिले पण तिच्या तब्येतीत काही सुधारणा होईना. परीक्षेचा शेवटचा दिवस होता. त्या दिवशी तालुक्याच्या गावी सर्कस आली होती. आज मुक्काम करून सर्व मुलांना सर्कस दाखवून उद्या गावी जाऊ असे गुरुजींनी सांगितले. पण माझे काही चित्त लागेना. मी गुरुजींना म्हणालो, 'मी आजच गावी जातो' आणि पेपर संपल्याबरोबर मी गावी जायला निघालो. गावात आल्याबरोबरच आईने विचारले.

'पेपर कसे गेले ?'

'चांगले गेले... पण बहुळा कुठंय...'

मी गोठ्यात गेलो. बहुळा गोठ्यात नव्हती... मी क्षणभर अस्वस्थ झालो...'

'आहे... तळ्याच्या काठी'... आणि आईला घेऊन मी तळ्यावर आलो.

'अरे आज तिला थोडे बरे वाटले... आणि पाणी प्यायला स्वत:हून ती तळ्यावर आली. पाणी प्यायली पण तिला परत घरी येता



ते खेडे मोरापरीस मनामध्ये थिरकत जाते
गाय-माय घर यांच्या आठवणींचे गाणे गाते

येईना. आठ-दहा दिवस झाले. पोटात अन्न नाही... क्षीण झालेली... शेवटी इथेच पडून राहिलेली'... जवळच माझे वडील उभे होते. क्षणभर थांबून आई म्हणाली, 'खरं सांगू का ? ... तिनं केवळ तुझ्यासाठी प्राण ठेवलाय रे... कालच खूप शिणली होती. धापाही टाकता येत नव्हत्या. आम्ही म्हणालो,

'बहुळे... राम परीक्षेला गेलाय... तुझे आशीर्वाद घेऊन गेलाय... तो आज येईल...' ... मी गाईजवळ गेलो... आणि आई मोठ्यांदा म्हणाली, 'बहुळे, रामची वाट पाहतेस ना... राम आलाय बघ...' तिने 'राम' हे शब्द ऐकताच क्षणभर डोळे उघडले...क्षीण नजरेने माझ्याकडे पाहिले आणि पुन्हा डोळे मिटले ते कायमचेच.....

केवढे संकेत असतात ! मी जर आज आलो नसतो तर... मृत्यूच्या दारात मृत्यूशी झगडत झगडत माझ्या भेटीसाठी.. प्राण ठेवणारी बहुळी... जितराब असूनही घरातल्या माणसाची माया देणारी बहुळी... माझ्या खोडकर आणि खट्याळ स्वभावाचे लाड करणारी बहुळी... तिच्या वासराबरोबरच मलाही लेकरू समजून प्रेम देणारी बहुळी... किती वेगवेगळ्या नातेसंबंधानं ती आमच्याशी एकरूप झाली होती.... बहुळीच्या जाण्यानं आमच्या


वाड्यातलं वैभवच हरवलं होतं... काही दिवसांनी फायनलच्या परीक्षेचा निकाल लागला. मी गावात पहिला आलो होतो. आईला ही आनंदाची बातमी सांगत नेहमीच्या सवयीप्रमाणे माझे पाय सहज गोठ्याकडे वळले. मला जाणवले माझ्या फायनलच्या परीक्षेसाठी स्वत: प्राण रोखून धरणारी बहुळी आज माझं कौतुक पाहायला नव्हती...

***

डॉ. रामचंद्र देखणे
५१३ शनिवार पेठ, पुणे ३०


## हे तुम्हाला माहीत आहे का?

एक व्यक्ती पृथ्वीवरील 'क' बिंदूवर उभी आहे. ती व्यक्ती 'क' बिंदूपासून दक्षिणेकडे 'क्ष' कि.मी. अंतर चालत जाते, मग पूर्व दिशेस वळून परत 'क्ष' कि.मी. अंतर चालत जाते; व उत्तरेकडे वळून पुन्हा 'क्ष' कि.मी. तर चालते. एवढे चालून गेल्यावर ती व्यक्ती 'क' बिंदूपाशी म्हणजेच ज्या बिंदूपासून सुरुवात केली त्याच ठिकाणी येऊन पोहोचते.... तर हे शक्य आहे का? म्हणजे आपण एका ठिकाणापासून दक्षिणेकडे ठराविक अंतर चालत गेलो, नंतर पूर्वेकडे तेवढेच अंतर चालत जाऊन उत्तरेकडे वळून पुन्हा तेवढेच अंतर चाललो तर ज्या ठिकाणापासून सुरुवात केली तिथेच येऊन पोहोचतो... जर हे शक्य असेल तर तो 'क' बिंदू कोणता?




उत्तर : हो नक्कीच शक्य आहे.

तुम्ही उत्तर ध्रुवावरून चालायला सुरुवात केलीत असं समजा. सोबतची आकृती पाहा म्हणजे तुमच्या लगेच लक्षात येईल. पण मग




हे फक्त उत्तर ध्रुवावरच होऊ शकतं की पृथ्वीवर आणखीही अशी काही ठिकाणे आहेत?ही ठिकाणं तुम्हाला शोधता येतात का, बघा बरं! पृथ्वीवर अशी असंख्य ठिकाणं असू शकतात. सोबतची आकृती पाहा. दक्षिण ध्रुवाला केंद्र मानून एक वृत्त काढायचे. त्या वृत्ताचा परीघ 'क्ष' कि.मी. असायला हवा. ह्या वृत्तावर 'ब' हा एक बिंदू घ्या व 'ब' पासून उत्तरेकडे 'अ' हा असा बिंदू घ्या की 'अब' हे अंतर 'क्ष' भरेल. लक्षात ठेवा की चालायला सुरुवात 'अ'पासून करायची. 'अ'पासून दक्षिणेकडे 'क्ष' अंतर चालल्यावर 'ब'पाशी पोहचू. तिथून पूर्वेकडे 'क्ष' अंतर जायचं आहे. म्हणजेच आपण मघाशी काढलेल्या वृत्तावरून एक फेरी मारून पुन्हा 'ब' बिंदूपाशी पोहोचणार. पुढे 'क्ष' अंतर उत्तरेकडे चालून गेल्यावर आपण 'अ' या आरंभबिंदूपाशीच येऊन पोहचू.

***

**अरविंद परांजपे**
'आयुका', पुणे विद्यापीठ आवार, पुणे.

# प्रकाशाच्या वेगाला आव्हान

**डॉ. निवास पाटील**

अल्बर्ट आइन्स्टाईन हा शतकातील एक क्रांतिकारी शास्त्रज्ञ होऊन गेला. आपण जे पाहिले नाही ते त्याने पाहिले आणि म्हणूनच त्याने जगाला दोन अत्यंत महत्त्वाचे (सापेक्षतावादाचे) सिद्धांत दिले. १९०५ मध्ये आइन्स्टाईनने जो विशिष्ट सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडला, त्यासाठी त्याने प्रकाशाची गती ही विश्वातील अंतिम गती मानली. याचाच अर्थ प्रकाशाच्या गतीपेक्षा जास्त गतीने कोणीही जाऊ शकणार नाही. परंतु अलीकडच्या संशोधनानुसार प्रकाशवेगाची (सेकंदाला तीन लाख किलोमीटर) ही मर्यादा ओलांडल्याचे दावे काही शास्त्रज्ञांनी केले आहेत. या नवीन दाव्याकडे वा संशोधनाकडे आणि त्यांच्या परिणामाकडे जाण्याअगोदर आपणास प्रकाशाचे स्वरूप जाणून घेणे आवश्यक आहे.

सतराव्या शतकात इंग्लंडमध्ये सर आयझॅक न्यूटन हा एक प्रतिभावंत शास्त्रज्ञ होऊन गेला. प्रकाशासंबंधी त्याने अनेक प्रयोग केले. या प्रयोगांच्या आधारे न्यूटनने १६६६ मध्ये प्रकाश हा कणांचा बनला आहे, असा निष्कर्ष काढला. यालाच न्यूटनचा 'कण सिद्धांत' म्हणतात. या सिद्धांताने काही प्रश्न निर्माण केले ते असे : प्रकाश जर कणांचा बनला असेल तर हिरव्या प्रकाशपट्ट्यातील कणांचे पिवळ्या पट्ट्यातील कणांपेक्षा जास्त वक्रीभवन का होते? तसेच, दोन प्रकाशकिरणे एकमेकांना आडवी आली तर त्यांतील कण एकमेकांवर का आदळत नाहीत ? या प्रश्नांना कण सिद्धातांच्या आधाराने उत्तरे मिळत नव्हती. १६७८ मध्ये डच भौतिकशास्त्रज्ञ ख्रिस्तियान हायगेन्सने प्रकाश हा कणांचा बनला नसून तो लहरींच्या वा तरंगाच्या रूपात असतो असा नवीन सिद्धांत मांडला. या सिद्धांतामुळे कण सिद्धांताने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पण काही नवीन प्रश्नांना जन्मही दिला. प्रकाशाच्या रंगपटातील वेगवेगळ्या रंगाची तरंगलांबी भिन्न असते आणि म्हणूनच त्यांचे कमी-जास्त वक्रीभवन होते. म्हणजेच कमी तरंगलांबी असेल तर जास्त वक्रीभवन होईल आणि जास्त तरंगलांबी असेल तर कमी वक्रीभवन होईल. तरंगलांबीच्या अशा वेगळेपणामुळेच आपले डोळे वेगवेगळे रंग ओळखू शकतात. प्रकाश तरंगांचा बनलेला असल्याने दोन प्रकाशकिरण एकमेकांना आडवे गेले तरी एकमेकांत ते अडखळत नाहीत.

हायगेन्सच्या तरंगसिद्धांताने काही प्रश्न निर्माण केले. उदाहरणार्थ, प्रकाशकिरण सरळच का जातात ? प्रकाशलहरी ध्वनि-लहरींप्रमाणे त्यांच्या वाटेत आलेल्या अडथळ्याला वळसा घालून का जात नाहीत? याशिवाय, प्रकाश जर तरंगांचा बनलेला असेल तर ते तरंग निर्वात पोकळीतून कसे जातात ? १८६५ मध्ये ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ जेम्स क्लार्क मॅक्सवेलने विद्युत आणि चुंबकीय ऊर्जांना (बलांना) जोडणारा सिद्धांत मांडला. या सिद्धांतातून विद्युतचुंबकीय तरंग निर्वात पोकळीतून प्रकाशाच्या वेगाने जातात हा निष्कर्ष निघाला. तसेच प्रकाश हा स्वत:च विद्युतचुंबकीय तरंग असल्याचे निष्पन्न झाले. 'कण सिद्धांत' आणि 'तरंग सिद्धांत' यांतील हा वाद १८७० च्या मॅक्स प्लॅक आणि १९०५ च्या आईन्स्टाईनच्या संशोधनातून निघालेल्या प्रकाशाच्या 'पुंज सिद्धांताने' संपुष्टात आणला. पुंज सिद्धांतानुसार प्रकाश म्हणजे ऊर्जेच्या पुंजांचा प्रवाह होय. या पुंजांनाच फोटॉन असे म्हणतात. मग कणस्वरूपात असलेले हे फोटॉन प्रकाशाच्या वेगाने कसे जाऊ शकतात? या प्रश्नाचे उत्तर असे की, फोटॉनचे अचलावस्थेतील वस्तुमान शून्य असते म्हणून.

प्रकाशाच्या स्वरूपाबद्दल ज्या वेळी संशोधन चालू होते त्याच दरम्यान त्याचा वेग काढण्यासंबंधीही प्रयोग चालू होते. पूर्वी प्रकाशाचा वेग अनंत आहे असे मानले जाई. त्यामुळे प्रकाशाच्या गतीवर कशाचाही परिणाम होणार नाही, असे त्या वेळी लोकांना वाटत होते. परंतु डॅनिश खगोलशास्त्रज्ञ ओलाऊस रोमरने १६७५ मध्ये प्रकाशाची गती मर्यादित आहे, असे सांगितले. रोमर इथेच थांबला नाही, तर त्याने प्रकाशाचा वेग मोजण्याचा यशस्वी प्रयोगही केला. रोमरने काढलेला प्रकाशाचा वेग आज आपण घेत असलेल्या प्रकाशवेगाच्या (सेकंदाला तीन लाख कि.मी.) जवळपास होता. परंतु, १७२९ मध्ये ब्रॅडली या शास्त्रज्ञाने मात्र प्रकाशाच्या वेगाचे काटेकोर मापन केले आणि प्रकाशाचा वेग सेकंदाला सुमारे तीन लाख किलोमीटर इतका निघाला. पुढे असे लक्षात आले की प्रकाशाची गती



रात्रीत काजळी दु:खांच्या वादळी,घेई कुणीतरी हाती हात,
वेदनेच्या गर्भी हुंकारतो सूर्य,पडे कवडसा कवितेत.

माध्यमानुसार बदलते. याचा अर्थ, प्रकाश घन, द्रव, वायुरूप माध्यमातून जाताना त्याची गती बदलते. प्रकाशाची निर्वात पोकळीतील गती सुमारे तीन लाख किलोमीटर आहे. विशेष म्हणजे प्रकाशाची ही गती सर्व दिशांनी सारखीच असते. प्रकाशाचे आणखी एक वैशिष्टय असे की, त्याची माध्यमातून जाताना बदललेली गती,

तो ज्या वेळी माध्यमातून बाहेर पडतो, त्या वेळी पुन्हा तो मूळची गती घेतो.

अल्बर्ट आइन्स्टाईनने १९०५ मध्ये विशिष्ट सापेक्षतावादाच्या सिद्धांत मांडला आणि प्रकाशाचा वेग हा विश्वातील अंतिम वेग ठरला. प्रकाशाचा वेग एक स्थिरांक धरून आइन्स्टाईनने आपल्या सिद्धांतातून निघालेले काही निष्कर्ष जाहीर केले. उदाहरणार्थ, गतीतील व्यक्तीचे घड्याळ मंदावते आणि त्याची गती प्रकाशगतीपर्यंत गेल्यास त्याच्या घड्याळातील काटे पुढे सरकणार नाहीत, म्हणजेच त्या व्यक्तीचे वय वाढणार नाही. तसेच गतीतील वस्तूचा गतीच्या दिशेने संकोच होतो. वस्तूची गती प्रकाशगतीएवढी झाल्यास तिचा पूर्णपणे संकोच होईल. ती वस्तू अदृश्य होईल. त्याचप्रमाणे गतीतील वस्तूचे वस्तुमान (वजन) वाढते, यासारखे काही निष्कर्ष आहेत. आइन्स्टाईनचा सिद्धांत जाहीर झाल्यानंतर पाच दशकांनी 'प्रकाशाची गती विश्वातील अंतिम गती आहे', ही गोष्ट शास्त्रज्ञांना खटकू लागली. त्यामुळे प्रकाशगतीपेक्षा जास्त गतीने जाणाऱ्या लहरी वा कण शोधून काढण्याचे प्रयत्न सुरू झाले.

आइन्स्टाईनच्या विशिष्ट सापेक्षतावादाच्या सिद्धांताने स्थल-काल आणि वस्तुमानाबद्दलच्या आपल्या नेहमीच्या कल्पनांत क्रांतिकारक बदल घडून आला. या सिद्धांताने प्रकाशाला सर्वात वेगवान ठरविले आणि त्याचा वेग निसर्गातील अंतिम वेग ठरला. परंतु विज्ञानातील सत्य हे 'अंतिम सत्य' होऊ शकत नाही, म्हणून काहींना असे वाटू लागले की, एखादी वस्तू प्रकाशवेगाच्या जवळच्या वेगाने जात असता तिला आणखी जास्त शक्ती लावली, तर तिचा वेग प्रकाश-वेगापेक्षा जास्त होणार नाही का ? आइन्स्टाईनचा सिद्धांत या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे देतो. आइन्स्टाईनने असे दाखवून दिले, की एखाद्या वस्तूचा वेग प्रकाशाच्या वेगाच्या जितका जवळ पोहोचेल तितके त्या वेगात आणखी वाढ घडवून आणणे अवघड होत जाते. कारण त्या वस्तूवर (न्यूटनच्या गतिविषयक दुसऱ्या नियमानुसार) लावावे लागणारे बल अधिकाधिक दराने वाढत जाते आणि वस्तूचा वेग जेव्हा जवळजवळ प्रकाशाइतका होतो तेव्हा ते अनंत होते.

आईन्स्टाईनच्या ए=मल२ (ए=ऊर्जा, म=वस्तुमान, ल=प्रकाशाची गती) या प्रसिद्ध समीकरणानुसार वस्तूचे वस्तुमान आणि ऊर्जा हे एकमेकांत परिवर्तनीय आहेत. कमी गतीच्या वस्तूच्या बाबतीत वापरलेल्या बाह्यशक्तीतील अतिशय अल्प शक्ती वस्तूचे वस्तुमान वाढविण्यास उपयोगात येते व त्यातील बरीचशी शक्ती त्या वस्तूची गती वाढविण्यास खर्ची पडते. याउलट मोठ्या गतीच्या, म्हणजे प्रकाशगतीच्या जवळ जाणाऱ्या गतीच्या बाबतीत घडते. अशा गतीतील वस्तूस वापरलेल्या बाह्यशक्तीचा खूप मोठा भाग त्या वस्तूचे वस्तुमान वाढविण्यास खर्ची पडतो. याचाच अर्थ, जसजशी वस्तूची गती वाढते तसतसे तिचे वस्तुमान वाढते. ज्या वेळी वस्तूची गती प्रकाशगतीएवढी होते, त्या वेळी तिचे वस्तुमान अमर्याद होते. अशा प्रकारे वस्तूला प्रकाशाची गती येण्यासाठी अमर्याद शक्तीचा वापर करावा लागेल.

मग प्रश्न असा निर्माण होतो की, या विश्वात प्रकाशगतीपेक्षा जास्त गतीने जाणारे काहीच नसावे का ? की कोणत्याही वस्तूच्या वेगाला प्रकाशवेगाची अंतिम मर्यादा आहे ? विश्वातील कोणत्याही मर्यादेला दोन बाजू असतात. एका बाजूला प्रकाशाचा वेग आणि दुसऱ्या बाजूला या विश्वात काहीच नाही का? प्रकाशगतीपेक्षा नेहमीच जास्त गतीने जाणारे व पुन्हा प्रकाशगतीपर्यंत येणे अशक्य असणारे कण वा लहरी या विश्वात असूच शकणार नाहीत का? नेमक्या याच दिशेने विचार करून १९५६ मध्ये जॉर्ज सुदर्शन आणि जी. फाईनबर्ग यांसारख्या शास्त्रज्ञांनी असे कण असावेत, असे गृहीत धरून आइन्स्टाईनच्या सिद्धांताच्या साह्याने त्या कणांचे गुणधर्मही सांगितले. या कणांना टॅकिऑन्स (टॅकिअस म्हणजे अतिचपळ)

म्हणतात. १९६२मध्ये शास्त्रीय जगताने

ही गोष्ट स्वीकारली, तरी प्रत्यक्षात असे कण आहेत का ? या प्रश्नाला संशोधकांचे उत्तर 'होय' असे आहे.

टॅकिऑन्सचे जे काही गुणधर्म काढले आहेत, त्यातील वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असा की, त्यांचे अचलावस्थेतील वस्तुमान (रेस्टमास) काल्पनिक असते. टॅकिऑन्सचे गती-सुरुवातीचे वस्तुमान काल्पनिक असते. ही गोष्ट भौतिकशास्त्राला वावगी नाही; कारण प्रकाश वाहून नेणाऱ्या फोटॉन्स कणांचे, तसेच न्यूट्रीनोज कणांचे अचलावस्थेतील वस्तुमान शून्य असते. म्हणजेच त्यांना वस्तुमान नसते. या गोष्टी भौतिकशास्त्राने स्वीकारलेल्या आहेतच. टॅकिऑन्सचा दुसरा गुणधर्म असा आहे की, जसजशी त्यांची शक्ती वाढत जाते, तसतशी त्यांची गती कमी होत जाते आणि जसजशी त्यांची शक्ती कमी होत जाते तसतशी त्यांची गती वाढत जाते. ज्या वेळी टॅकिऑन्सची शक्ती शून्य होते, त्या वेळी त्यांची गती अनंत होते. नेहमीच्या वस्तुकणांच्या गुणधर्मांच्या अगदी उलट गुणधर्म टॅकिऑन्सचे आहेत.

शास्त्रज्ञांनी टॅकिऑन्सचे अस्तित्व शोधून काढल्यास आणि त्यांची निर्मिती केल्यास किंवा अलीकडेच प्रिन्स्टन विद्यापीठातील डॉ. लिजून वांग यांनी शोधून काढलेली प्रकाशवेगाच्या तीनपटीने जाणारी प्रकाशस्पंदने, विचारात घेतल्यास त्यांचे विलक्षण असे उपयोग पाहायला मिळतील. त्यांचा एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे स्वग्रहावरील व परग्रहावरील संदेश दळणवळणा- संबंधी होय. सध्या गुरू, शनी, युरेनस, नेपच्यून इत्यादी ग्रहांकडे पाठविलेल्या अवकाशयानाला रेडिओ लहरीमार्फत संदेश पाठविला जातो. रेडिओलहरी प्रकाशाच्या वेगाने प्रवास करतात, त्यामुळे अशा संदेशांना यानापर्यंत पोहोचायला अनेक तास लागतात. प्रॉक्झिमा सेन्टारी हा आपल्या जवळचा तारा आहे. या ताऱ्यापर्यंत रेडिओ संदेशाला जायला सुमारे साडेचार वर्षे लागतील. या उलट टॅकिऑन्स अत्यल्प वेळात दूरचे ग्रह-तारे वा तारकाविश्वात जाऊन पोहोचतील. संदेश-वहनात क्रांती होईल. परग्रहावरील जीवसृष्टीच्या संशोधनात यांचा उपयोग होईल.

विश्वातील प्रत्येक वस्तू अनेक कणांनी बनलेली आहे. पृथ्वी, तिच्यावरील सजीव व निर्जीव वस्तू, ग्रह, तारे, सूर्य हे सर्व इलेक्ट्रॉन्स, प्रोटॉन्स, न्यूट्रॉन्स इत्यादी कणांपासून तयार झाले आहेत. टॅकिऑन्स कणांचे अस्तित्व सिद्ध झाल्यास विश्वातील मूलभूत कणांचे तीन प्रकार पडतील. पहिल्या प्रकारातील कण प्रकाशगतीपेक्षा कमी गतीने फिरतात. त्यांना स्थिरावस्थेत आणता येते आणि ते कधीही प्रकाशगती किंवा त्यापेक्षा जास्त गती घेऊ शकत नाहीत. अशा कणांना 'टार्डिऑन' किंवा 'ब्रॅडिऑन' म्हणतात. उदाहरणार्थ, इलेक्ट्रॉन्स, प्रोटॉन्स इत्यादी. दुसऱ्या प्रकारातील कण नेहमीच प्रकाशगतीने जातात. त्यांना स्थिरावस्थेत आणता येत नाही. या कणांना 'लक्सीऑन' म्हणतात. उदाहरणार्थ, फोटॉन्स. तिसऱ्या प्रकारचे कण नेहमीच प्रकाशगतीपेक्षा जास्त गतीने जातात. त्यांना कधीही प्रकाशगतीपेक्षा कमी गतीत वा प्रकाशगतीत आणता येत नाही. या कणांना 'टॅकिऑन्स' म्हणतात.

पहिल्या दोन प्रकारच्या कणांचे वैशिष्ट्य असे की, त्यांचे एकमेकांत रूपांतर होते. उदाहरणार्थ, इलेक्ट्रॉन व पॉझिट्रॉन (ॲन्टि इलेक्ट्रॉन) एकत्र येऊन ते एकमेकांना उद्ध्वस्त करतात व त्यातून फोटॉन (जो लक्सीऑन आहे) तयार होतो; तसेच लक्सीऑनचे रूपांतर टार्डिऑनमध्ये होते. हीच गोष्ट लक्सीऑन आणि टॅकिऑन्सच्या बाबतीत खरी असू शकते. याचाच आधार घेऊन विज्ञान नवलकथाकारांनी अंतराळ प्रवासाच्या कथा लिहिल्या आहेत. त्यांच्या कथेतील अंतराळवीर स्वत:ची शरीरे प्रथम लक्सीऑनमध्ये व नंतर टॅकिऑन्समध्ये बदलतात आणि क्षणार्धात अवकाश प्रवास करून इच्छितस्थळी पोहोचतात. तिथे पोहोचल्यानंतर ते आपल्या मूळच्या रूपात (टार्डिऑन्समध्ये) येतात. पुराणांमध्ये नारद अवतीर्ण झाले वा अंतर्धान पावले, यांसारख्या कथा याच प्रकारात मोडत असाव्यात.

सध्या माहीत असलेल्या प्रकाशाच्या वेगाच्या तिप्पट वेगाने प्रकाशालाच पाठवण्याचे आपल्याला जमले आहे, असा एका अमेरिकन शास्त्रज्ञाचा दावा आहे. यासाठी त्याने सेसियम मूलद्रव्याच्या वाफेचा माध्यम म्हणून यात वापर केला आहे. टॅकिऑन्सचे संशोधन काय किंवा विशिष्ट माध्यम वापरून प्रकाशाचा वेग वाढविणे काय, यामुळे आइन्स्टाईनच्या विशिष्ट सापेक्षतेच्या सिद्धांतापुढे (की जो प्रकाशगतीच्या स्थिरत्वावर उभा आहे) प्रश्न उभे राहतील.

***

**डॉ. निवास पाटील**
१/१६ साईदेव हाऊसिंग
सोसायटी, गंगापूर रोड,
नाशिक ५.



दूर कुठेतरी पहाटतो सूर्य,काळोखाचे मन ढवळते,
घनदाट रानी चालल्या पाऊला,पाऊलापुरते प्रकाशते.

शंभरावा अंक

'दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !'

# वनपुत्र ताडोबा

**सुरेशचंद्र वारघडे**

खूपखूप वर्षांपूर्वीची ही अरण्यकथा आहे. चंद्रपूरजवळ काटेझरी नावाचं घनदाट अरण्य होतं. या अरण्यात गोंड आदिवासी आणि वन्य जीव सुखाने नांदत होते. एका गरीब गोंड कुटुंबात एका बाळाचा जन्म झाला. ताडाच्या झाडाखाली जन्मला म्हणून त्याचं नाव ताडोबा ठेवण्यात आलं. आपल्या आईबापाचा तो एकुलता एक मुलगा होता. तो लहान असतानाच विषारी सर्पदंशामुळे बाप मरण पावला. त्यामुळे डोळ्यांत तेल घालून आईनं ताडोबाचा सांभाळ केला. त्याची आई मध, मोहाची फुलं, कंदमुळं गोळा करण्यासाठी दाट जंगलात शिरायची. ताडोबाला पाठीशी बांधून न्यायची. झाडाखाली ठेवून कामाला लागायची. ताडोबा झाडांच्या हिरव्यागार पानाकडं एक टक पाहात बसायचा. झाडाची सळसळ सुरू झाली की त्याचा चेहरा आनंदानं फुलायचा. पाखरांची गाणी व झाडांची सळसळ ऐकताऐकता ताडोबा वाढू लागला. दहाबारा वर्षांचा झाल्यावर त्याच्या पावलांना रानवाटांची माहेरओढ लागू लागली. कधी आईबरोबर, कधी संवगड्यांबरोबर तर कधी एकटाच घनदाट अरण्यात तो भटकायचा.



***आई–बापाच्या पश्चात जंगल हेच सर्वस्व असलेल्या ताडोबाला एकदा 'वाघबाबा' भेटला. वाघबाबाने ताडोबाचा पुत्रवत् सांभाळ करून त्याला आपली 'जंगलविद्या' दिली. वनसंरक्षणाचा वसा दिला. पुढे ब्रिटिशांच्या राजवटीत शिकारीला विरोध करून, वनाचे रक्षण करून, 'पर्यावरणाचा विकास' करण्याचे ताडोबाने निकराने प्रयत्न केले. अखेर ताडोबाने याच कारणासाठी प्राणार्पण करून पुढील पिढ्यांना अरण्यरक्षणाचा वसा कसा दिला? हे आपण वाचू या सुरेशचंद्र वारघडे यांच्या 'वनपुत्र ताडोबा' या कथेत !***



कधी ससा, भेकर, सायाळ मारून आणायचा. मधाचं पोळं आणायचा. कधी फळं, कंदमुळं आणायचा. आईला त्याचा मोठा आधार वाटायचा. परंतु ताडोबा घनदाट जंगलात एकटा जातो याची तिला भीती वाटायची. ताडोबाला ती म्हणायची, ''माझ्या लेकरा, आसं एकटा दुकटा जंगलात घुसू नकोस

रं. गुरकालनं (वाघानं) खाल्ला तर पत्त्या लागणार नाय बाबा.''

''आये, गुरकालला (वाघाला) खायला चित्राल (चितळ), माऊ (सांबर), पंड्री (रानडुकरं) हायती. मला कह्याला खाईल त्यो. वाघुला मला तर रोजच भेटतुया. माझ्या जवळून जातुया. पण त्येचं मला व माजं त्येला भ्याव वाटत नाय.'' असं उत्तर ताडोबा द्यायचा. ते ऐकून त्याच्या आईला मनात बरं वाटायचं. आपला मुलगा निर्भय आहे. धाडसी आहे. वाघालाही घाबरत नाही. याचा तिला अभिमान वाटायचा.

ताडोबानं भोपळ्याचं एक छोटंसं बिरी नावाचं वाद्य बनविलं होतं. गारुड्याच्या पुंगीसारखा ताडोबा त्यातून मोहक गोड स्वर काढायचा. तासन् तास वाजवायचा. सूर्य उगवला की ताडोबा 'बिरी'गळ्यात अडकावायचा आणि रानवाट पकडायचा. कमरेला लंगोटी व गळ्यात बिरी हाच त्याचा वेष. एकदा ताडोबाबरोबर त्याचे चार-पाच संवगडी काळाआंबा या घनदाट अरण्यात गेले. तिथं रानआंब्याला पिवळे पाड लटकले होते. ते पाहून संगवड्यांच्या तोंडाला पाणी सुटलं. ते माकडासारखे सरसर आंब्यावर चढले. ताडोबा आंब्याखाली बिरी वाजविण्यात तल्लीन झाला. तेवढ्यात गवतात घसघस झाली. गवतातून एक भेदरलेलं सांबर धावत आलं. त्याच्या पाठोपाठ दांडगा पट्टेवाला वाघ आला. त्याला पाहताच निरगू मोठ्यानं ओरडला.

''गुरकाल! गुरकाल!(वाघ! वाघ!)

वाघाचं नाव ऐकताच पोरं घाबरली. आंब्याखालून सांबरामागं धावत गेलेला वाघ त्यांनी ओझरता पाहिला. त्यांनी पटापट खाली उड्या टाकल्या आणि ते काटेझरीकडे पळत सुटले. ताडोबा आंब्याखाली बिरी वाजवत बसलाय याचं भानही त्यांना राहिलं नाही.

दिवस मावळायला सारेजण आपल्या वस्तीवर पोहोचले. त्या वेळी ताडोबा आपल्याबरोबर नाही हे त्यांच्या लक्षात आलं. अंधार पडला. सारं जंगल काळोखात बुडालं. त्यात अमावास्येची रात्र. ताडोबाला शोधायला जायचं धाडस कुणाला होईना. सकाळी लाकूडफाटा गोळा करायला गेलेली ताडोबाची आई अचानक ताप भरून थंडी वाजू लागल्याने दुपारीच घरी आली होती. तापानं फणफणत ती आपल्या झोपडीत ताडोबाची वाट पाहात पडून होती. पोरांनी वाघाबद्दल तिला सांगितलं. ताडोबा काळाआंबा जंगलातच राहिल्याचंही सांगितलं. तापाच्या भरात ती सारखी ताडोबा ! ताडोबा ! असं ओरडत होती. रात्री वस्तीतले सगळे गोंड जमले. दहा-बाराजणांनी ताडोबाला शोधायचं ठरवलं. हातात पेटलेले टेंभे (मशाली) व काठ्या, कोयते घेऊन ते निघाले. निरगू पण त्यांच्याबरोबर निघाला. बरीच पायपीट करीत ते रात्री बारा वाजता काळाआंबा अरण्यात प्रवेशले. सर्वजण त्या आंब्याखाली आले. पण तिथं ताडोबा नव्हता. पण पालापाचोळ्यात ओढत नेल्याच्या खुणा होत्या. रक्ताचे डाग होते. गोंडांनी सारी झाडं-झुडपं तपासली, पण ताडोबाचं नखही त्यांना दिसलं नाही. ताडोबाला नक्कीचं वाघानं खाल्लं, याची सर्वांना खात्री पटली. ते कोंबडा आरवायला हात हलवीत परत काटेझरीला आले.

ताडोबाच्या आजारी आईला त्याला वाघानं खाल्ल्याचं समजताच तिची शुद्ध हरपली. त्यातच तिचा अंत झाला. गोंडांनी त्यांच्या रीतीरिवाजाप्रमाणे अंत्यविधी केला. काळाआंबा रानातले वाघ नरभक्षक बनले. म्हणून काटेझरीत भीती पसरली. पुन्हा ताडोबाला शोधायलाही कुणी गेलं नाही. परंतु नवव्या दिवशी नवल घडलं. सकाळी सकाळी लंगोटी लावलेला ताडोबा काटेझरीत हजर झाला. त्याला पाहून सारे गोंड चकित झाले. कुणाला तो झोटिंगच (भूत) वाटला. परंतु त्याचा जिवलग सखा निरगूला मात्र त्याची भीती वाटली नाही. तो जवळ गेला. ताडोबाला त्यानं मिठी मारली. हळूहळू इतर पोरं त्याच्याभोवती जमली. आपल्या भोवती सारी वस्ती का जमली ? सारेजण आपल्याकडे विचित्र नजरेनं का पाहात आहेत ? याचं ताडोबाला कोडं पडलं. निरगूनं त्याला सारी हकीगत सांगितली. वाघानं खाल्ला असताना परत कसा आलास ? असा प्रश्नही विचारला. त्यावर खो-खो हसत ताडोबानं काय घडलं ते सांगितलं.

''म्या बिरी वाजवायच्या नादात व्हतु. पण तेवढ्यात गवतात आवाज झाला. गवतात योक निराल (बिबट्या) टपून बसला व्हता. त्यानं झेप घेत एका चिमालाची मानगुट पकाडली. त्येला वढ्याकडं वढीत नेलं. ताडोबा पुढं काही सांगत असतानाच ''इतकं दिस तू व्हता

कुट ?'' असा प्रश्न त्याला एका गोंडांने विचारला.

''चिमालला (चितळाला) निरालने (बिबळ्यानं) नेल्यावर म्या उठलो. काळुखीत कुटं जायचं सुचंना. वाटंत कावळंबी कोकलायला लागलं. इतक्यात टेंभ्याचा उजेड पडला. मागं वळूनशान बगितलं तर दाढीवाला बाबा जवळी आला. म्या घाबरलो. वाटलं, झोटिंगच(भूतच) हाय. त्येनं पाठणीवर हात फिरावला. घाबरू नगं म्हणाला. त्यानं माजं नावगाव इचारलं. म्या त्येला समंधी हकिगत सांगितली. चल म्हणाल्यावर त्येच्या बरूबर ग्येलो. त्यानं एका गुहेत नेलं. त्यानं मला पिकलेलं आंबं व रानफळं खायला दिली. वाघबाबा त्येचं नाव. रानाचा लई जाणकार माणूस. त्येच्या गुहेबाहीर जिवंत झरा हाय. तिथं गुरकाल, निराल, चिमाल, माऊ (सांबार) ही रानजनावरं पाण्याव येतात. पाखरं येत्यात. त्येला रानजनावरांची बोली येतीया. पाखरांची बोली कळतीया. झाडा-झुडपाव तर त्येची लई माया, अवषधी वनस्पतीची तर लई जानकारी हाय त्येला.''

वाघबाबाची कथा ऐकून साऱ्यांना नवल वाटलं. हा सारा प्रकार लक्षात आल्यावर सर्वजण हळहळले.

''हे सारं अगुदर कळालं आसतं तर पुडचं रामायण घडलं नसतं. तुजी आय देवाघरी ग्येली नसती.''

एका जाणत्या गोंडाचे वरील शब्द कानी पडताच ताडोबा गडबडला. ''आये ! आये !'' ओरडत तो आपल्या झोपडीकडं धावला. झोपडीत त्याची आई नव्हती. त्याच्या पाठोपाठ गेलेल्या गोंडानी ताडोबा ! ताडोबा ! असे म्हणत आईने प्राण सोडल्याचं त्याला सांगितलं. ताडोबा टाहो फोडत मटकन खाली बसला. बाया-बापड्यांनी त्याचं सांत्वन केलं. तो अचानक उठला आणि धावत सुटला. अनेकांनी त्याला अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु चित्त्याच्या वेगानं धावणारा ताडोबा कुणाला सापडला नाही.

दिवस मावळायला तो वाघदरीत उतरला. वाघबाबाच्या गुहेत गेला. वाघबाबाला मिठी मारून तो पुन्हा आये ! आये ! ओरडत ओक्साबोक्सी रडायला लागला. वाघबाबानं त्याचं दु:ख जाणलं. ''ताडोबा, बेटा मरण कधी कुणाला चुकलं नाही. शरीर दिसतं पण आत्मा दिसत नाही. तुझ्या आईचं शरीर नाश पावलं तरी तिचा आत्मा अमर आहे. त्याचा आशीर्वाद तुझ्या पाठीशी आहे.'' असे म्हणत वाघबाबांनी त्याच्या पाठीवरून मायेचा हात फिरविला. धीर दिला. ताडोबाचं दु:ख हलकं झालं. वाघबाबाच त्याचे मायबाप बनले. काटेझरीला तो विसरून गेला. वाघबाबाच्या सहवासात रमला. वाघ आणि भुताच्या भीतीनं काटेझरीतून कुणी त्याला शोधायला आलं नाही. वाघबाबानं त्याला अरण्यविद्या शिकवली. वन्य जीव व पाखरांचं गूढरम्य जीवन त्याला कळायला लागलं. त्यांच्या भावना व हावभाव तो जाणायला लागला. त्यांची अरण्यलिपी वाचायला शिकला. बाबांनी औषधी वनस्पतींचं ज्ञान दिलं. वाघदरीतलं घनदाट जंगल ताडोबाची अरण्यशाळा बनलं. ७-८ वर्षे निघून गेली. ताडोबा २० वर्षांचा दणकट शरीराचा उंचापुरा नवजवान बनला. एक दिवस वाघबाबा आजारी पडले. ताडोबाने रानोमाळ फिरून औषधी वनस्पती आणल्या. तो वाघबाबांजवळ बसला. त्यांनी त्याचा हात हातात घेतला.

''बेटा ताडोबा, आता या औषधी वनस्पतीचा माझ्या शरीरावर काही परिणाम होणार नाही. आता हे शरीर प्राण सोडणार आहे. या अरण्यात विलीन होणार आहे. या जीर्ण शरीरात त्यानं तरी किती दिवस राहायचं बरं. प्राण निघून गेला की तू माझ्या शरीराला अग्नी दे. एक खड्डा खण. त्यात माझ्या शरीराची राख टाक. त्यावर एक बेलाचं झाड लाव. कुणा वन्य जीवाची कधी शिकार करू नकोस. हिरवं झाड तोडू नको. कुणाला तसं करू देऊ नकोस. मी या जगातून गेल्यावर तू इथं राहू नकोस. काटेझरीला जा. गोंडांना अरण्य, पशुपक्षी रक्षणाची दिशा दे.''

असं सांगत असताना ते उठून बसले. त्यांचे डोळे मिटले आणि त्यांचे प्राण शरीर सोडून निघून गेले. ताडोबाच्या डोळ्यांतून अश्रु धारा वाहू लागल्या. वाघदरीतल्या घुबडांनी व पिंगळ्यांनी चित्कार केला. मोर ओरडले. वाघ-बिबळे डरकाळले. सांबर व चितळांचा कळप तर गुहेजवळच बसून होता. त्यांचे डोळेही पाणावले होते.

वाघबाबांनी सांगितल्याप्रमाणे ताडोबाने त्यांचा सारा विधी केला. जंगलातून बेलाचं रोप त्यानं शोधून आणलं. नाल्याकाठी खड्डा खणून त्यात रक्षा टाकली. त्यावर रोप लावलं. काही दिवस आठवणी



निळे नि सावळे मोकळे आभाळ, भिजते रंगात सांजवेळी,
सुदूर रुळते डोंगरांची माळ,मधेच गुलाल सांडलेली.

आळवीत वाघदरीत राहिला. वाघबाबांच्या आदेशाची आठवण येताच तो निघाला. बेलाच्या रोपाला त्यानं पाणी घातलं. एक गाडगं मुळाशी पुरून त्यात पाणी ओतलं. बेलरोपाला नमस्कार केला आणि त्यानं वाघदरीचा निरोप घेतला.

सायंकाळी ताडोबा काटेझरीत पोहोचला. लंगोटी लावलेल्या तरण्याबांड ताडासारख्या उंच ताडोबाला पाहताच पोरं जमली. त्याच्या गळ्यात बिरी होती. त्याला आईची आठवण झाली. तो तडक आपल्या झोपडीजवळ गेला. ताडोबा झोपडीसमोर नतमस्तक झाला. आपल्या आईच्या स्मृतीला त्यानं आदराजंली वाहिली. ताडोबाच्या गळ्यातली बिरी पाहून मित्रांनी त्याला ओळखलं.''आरं, हा तर आपला बालपणीचा मैतर ताडोबा.'' असं म्हणत जवळ जाऊन ताडोबाला आलिंगन दिलं. गाणी गात नाचत जवान ताडोबाचं गोंडांनी स्वागत केलं. नृत्याचा बहर ओसरल्यावर... सात-आठ वर्षं आपण वाघबाबाकडं राहिलो. तोच आपला मायबाप व गुरू बनला. वाघबाबा अरण्ययोगी होता. त्याच्याकडून आपण अरण्यविद्या शिकलो. शिकार सोडली. रानजनावरं, पाखरं व झाडा-झुडपावर आपली माया जडली. वाघबाबाकडून अरण्य व अरण्यजीव यांच्या रक्षणाचा वसा आपण घेतला. औषधी वनस्पतींचं

ज्ञान घेतलं. हे सारं त्यानं सविस्तर सांगितलं.

त्याचं सांगणं संपल्यावर निरगू त्याला म्हणाला ''आता समद्यांची लगनं झाली. तूबी बाशिंग बांध आन् संसार मांड बाबा !''

ते ऐकताच ताडोबा ताडकन उत्तरला, ''मला लगीनबिगीनं करायचं नाय. वाघबाबानं माजं लगीन जंगलाबरुबर लावलंय. त्याच्या राखणीचा वसा वाघबाबाकडून म्या घेतलाय. त्यो मला सोडायचा नाय. आन्, तुमीबी समंधी ध्यानात ठिवा. यापुडं रानजनावराची शिकार करायची नाय. हिरवं झाड तोडायचं नाय. पाखरं मारायची नायती. झाडंझुडपं,

जनावरं, पाखरं ही देवाची लेकरं. कुणी बाहिरचं शिकार कराया आलं तर त्येनला पण शिकार करू द्यायची नाय.''

''आरं, मग आपुन खायाचं काय? जगायचं कसं रं ?'' हा प्रश्न एका गोंडानं विचारला. त्याला उत्तर देताना ताडोबा म्हणाला,''जी जनावरं जिभंनं पाणी पित्यात त्येंचं आन्न मांसकांड (मांसाहारी) हाय. पण जे तोंडानं पाणी पित्यात, त्ये गवत खात्यात. माणूसबी तोंडानं पाणी पितोया. त्येलाबी मांसाची गरज नाय. ह्ये बघा झाडालाबी जीव आसतोय. झाडामुळं आभाळातून शिपाचं पाणी (पाऊस) पडतंया. ते जिमिनीत साचतंय. म्हणून आपुन जगतोया जेपावतु जिमिनीवर जंगाल, पाणी आन् जनावरं हायती, तेपावतु आपुन, आपली पोरंसोरं, नातवांडं सुकात जगतील, आसं आपल्या रुषीमुनींनी, पुराणात लिवून ठेवलंया.

गुरकाल दिलदार हाये. पण माणसाने खोड काढली तर तो धावणारच. त्याची शिकार आपण खाल्ली, तरच तो आपली गुरं नेणार. तुमाला खायला फळं, कंदमुळं, धान, साग द्येवानं जंगलात माहूर (खूप) ठेवलंय. तवा आजपास्नं शिकार बंद. हिरवं झाडतोड बंद. वाघबाबाचा तसा आदेश हाय. कुणी मोडला तर मुंडी पिरगळून टाकीन.'' असा दम भरून झिप्पा गोंडांच्या शंकेचं निरसन ताडोबानं केलं.

बलदंड ताडोबाचा काटेझरी गोंडवस्तीला मोठा आधार वाटायला लागला. कुणी आजारी पडलं तर त्याच्या वनस्पतीच्या औषधानं लगेच गुण यायचा. आसपासच्या भागातले गोंडही उपचारासाठी त्याच्याकडे यायला लागले. लोक त्याला मानायला लागले. त्याचा प्रत्येक शब्द पाळायला लागले. सर्वांनी शिकारबंदी व कुऱ्हाडबंदीची प्रतिज्ञा केली. रानजनावरं आणि आदिवासी यांच्यात परस्परांत विश्वास निर्माण


झाला. वाघानं, अस्वलानं व बिबळ्यानं कधी कुणा माणसाला जखमी केल्याची घटना घडली नाही. कुणाचं जनावर मारलं नाही. वन्य जीव आणि आदिवासी गुण्यागोविंदाने नांदायला लागले. ताडोबाला आनंद झाला.

एका वर्षी मोठा दुष्काळ पडला. अरबी समुद्रावरून पावसाळी ढग आलेच नाहीत. जंगलातले नाले आटले. झरे आटले. पाण्यासाठी वणवण भटकण्याची पाळी माणसावर आली. रानजनावरं तहानेनं तडफडायला लागली. सर्वांचे हाल ताडोबाला पाहावेनात. काटेझरीजवळ मोठा लांब रुंद खड्डा होता. त्यात जिवंत पाण्याचा झरा होता. तोही

आटला होता. तो खड्डा खोल खणायचा. जमिनीत दडलेलं पाणी बाहेर काढायचं. त्याचं तळं बनवायचं, असा निश्चय ताडोबानं केला. साऱ्या गोंडांना त्यानं योजना सांगितली. त्यानुसार तळ्याचं काम सुरू झालं, प्रौढ, तरुण, म्हातारेकोतारे, बायकापोरं तळं खणायला लागली.

खोदकाम चार फूट गेलं. पण पाणी काही बाहेर येईना. ताडोबा काळजीत पडला. झऱ्याकाठी येणाऱ्या झाडाखाली झोपडी बांधून ताडोबा राहात होता. स्वत: कुदळ हातात घेऊन मरमरेतो राबत होता. सायंकाळी अंजनाच्या झाडावर बसलेल्या घुबडाचा आवाज ताडोबाला ऐकू आला. त्याची वाणी त्याला समजली. तो धावत गेला. काळाआंबा रानातून वाघदरीत उतरला. नाल्याकाठी लावलेलं बेलाचं रोप बरंच वाढलं होतं. पण पाण्याअभावी सुकलं होतं. तो वाघबाबाच्या गुहेजवळ गेला. तिथंल्या झऱ्यात चिमटीभर पाणी होतं. गुहेतलं मातीचं भांडं ताडोबानं घेतलं. त्यात ओंजळीनं पाणी भरलं. बेलाला घातलं. मनोभावे नमस्कार करून वाघबाबाचं स्मरण केलं. दिवस उगवायला तो काटेझरीत आला. त्या दिवशी जोरात खुदाई केली. सूर्य बुडला. लोकांनी काम थांबवलं. पण ताडोबा खणतच होता. जीव गेला तरी चालेल पण पाणी लागेपर्यंत खणत राहाणार असा त्याचा निर्धार होता. गोंडांनीही पुन्हा काम सुरू केलं.

सारी रात्र खोदकामात गेली. पूर्वेला सूर्य उगवला. त्याच वेळी



वाघबाबाचं नाव घेत ताडोबानं पहार हाणली. बाहेर काढली. त्याबरोबर मनगटाएवढी जलधार भूमातेच्या उदरातून बाहेर आली. ताडोबाचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यानं प्रथम मातीची घागर भरली. ती खांद्यावर घेऊन तो पुन्हा वाघदरीत गेला. त्या बेलवृक्षाला त्यानं घागरभर पाणी पाजलं. वृक्ष आता टवटवीत झाला होता. पहिला जलप्रसाद त्यानं वाघबाबाला वाहिला होता.

काटेझरीतील गोंडांनी दोन दिवस जलोत्सव साजरा केला. ताडोबाची वाघबाबावरील अपार श्रद्धा, निर्धार व निश्चय यांमुळे प्रखर दुष्काळातही काटेझरीवर जलदेवता प्रसन्न झाली. त्या वर्षात पाऊसही चांगला झाला. सारं तळं पाण्यानं काठोकाठ भरलं. वन्य प्राणी त्यावर पाण्यासाठी यायला लागले. ताडोबा तळ्याकाठीच गवताच्या झोपडीत बसून ते पाहायचा. त्याचं हृदय आनंदानं थयथय नाचायचं. आपल्या जीवनाचं सार्थक झाल्याचं वाटायचं. ताडोबाची कीर्ती सर्वत्र पसरली. लोक

लांबलांबून ताडोबाकडं बंड्या (लहान बैलगाडा) जुंपून यायला लागले. आपला आजार व दु:खे ताडोबाला सांगायला लागले. ताडोबा औषधी वनस्पतींच्या उपचाराने त्यांचे रोग-आजार बरे करायला लागला. दु:खमुक्त करून सर्वांना सुखी करण्याचे काम करू लागला. गोंडांचा तो धन्वतंरी बनला. औषधी उपचार करताना तो सर्वांना शिकारबंदी व कुऱ्हाडबंदीची दिशा द्यायचा. अरण्य व अरण्यजीवांच्या रक्षणाचा संदेश द्यायचा. बिरी वाजवत सांबरं-चितळं जमवायचा.

एके दिवशी गोरे शिकारी रानात आल्याचे ताडोबाला समजले. ताडोबा धाडसानं त्यांच्या राहुट्याजवळ गेला आणि धारदार आवाजात म्हणाला,

''या जंगलात शिकारीला बंदी हाय.''

साऱ्यांचं लक्ष ताडोबाकडं वेधलं. गोऱ्या शिकाऱ्यांना त्याची भाषा कळली नाही. परंतु चंद्रपूरच्या शिकाऱ्यांना कळली. गोरे शिकारी ताडोबाच्या घाटदार शरीराकडं पाहात राहिले. चंद्रपूरचा एक माणूस ताडोबाजवळ गेला आणि मृदू आवाजात म्हणाला,

''मोठे इंग्रज अंमलदार आहेत. वाघाच्या शिकारीला आलेत. तू आमच्या वाटाड्याचे काम कर. तुला साहेब चांगली बक्षिसी देतील.''

त्यावर ताडोबा संतापला.

''तुमाला या रानात वाघच काय पण ससाबी मारता येणार नाय. या गोऱ्या माकडांस्नी घिऊन आल्या वाटंनं माघारी जावा.''

ताडोबाचं बोलणं त्याला झोंबलं. त्यानं आवाज चढवला.

''या गोऱ्या साहेबाचं साऱ्या देशावर आणि जंगलावर राज्य आहे. त्यांना आडवणारा व शिकारबंदी करणारा तू कोण ?''

हे ऐकताच ताडोबाचा पारा चढला.

''गोऱ्या सायबाचं बूटचाट्या झोटिंगा (भुता), आमाला गोऱ्या माकडांचं पुदाक सांगू नगं. त्येंनी राज्य बळकावलं तरी जंगल आमचं हाय. आमी आन् रानजनावरं कैक वरसं इथं सुकात नांदतुया. या जंगलाचं मालक आमीच हाय. तुमाला जंगलात पाय ठिवू देणार नाय. मुक्या जीवाची शिकार करू देणार नाय.''

ताडोबाच्या परखड शब्दांनी तो माणूस भयंकर चिडला.

ताडोबाच्या अंगावर तो त्वेषाने धावताच ताडोबानं आपल्या मजबूत पंजाच्या मुठीचा दणका त्याच्या तोंडावर हाणला. त्याबरोबर तो चार फूट मागं फरफटत पडला. त्याच वेळी अंजनाच्या झाडाखाली मांडलेल्या टेबलावर गोरे शिकारी चहापान करीत होते. त्यांच्या डोक्यावर अंजनाच्या झाडावर भलंमोठं आग्यामोहोळ लागलं होतं. ते निरगूला दिसलं. त्यानं त्यावर आपल्या धनुष्यातून अचूक बाण सोडला. आपल्या माणसाला ताडोबानं फटका लगावल्याचं पाहून ते शिकारी ताडोबाला पकडण्यासाठी उठण्याच्या बेतात असताना मधमाशांचं ते पोळं तुटलं. शिकाऱ्यांच्या डोक्यावर पडलं. मधमाशा त्यांच्यावर तुटून पडल्या. त्यांना पळता भुई थोडी झाली. ताडोबा आणि त्याचे साथीदार खो-खो हसत सुटले. धावतच त्यांनी काटेझरी गाठली. वर्षभरात कुणी गोरासाहेब शिकारीला आला नाही.

उन्हाळ्यातही तळं पूर्ण भरलेलं होतं. वन्य प्राणी त्यावर आपली तहान भागविण्यासाठी येत होते. अशाच उन्हाळ्याच्या एका सायंकाळी ताडोबा तळ्याकाठी झोपडीत बिरी वाजविण्यात तल्लीन झाला होता. त्याच वेळी ठोऽऽ ठोऽऽ असे बंदुकीचे आवाज चोहो दिशांनी त्याला ऐकू आले. त्या आवाजाने मोरांचे आक्रंदन सुरू झाले. चितळ, सांबर, भेकरं सैरावरा धावायला लागली. वानरं-माकडं ओरडत झाडांच्या शेंड्यावर चढली. ताडोबाची तल्लीनता भंग पावली. दहा-पंधरा ब्रिटिश शिकाऱ्यांनी चोरट्या वाटेनं जंगलात प्रवेश केला होता. त्यांनी सांबर व चितळांच्या कळपावर बंदुका चालविल्या. गेल्या वर्षी ज्यांना मधमाशांनी फोडून काढले होते तेच ते शिकारी होते. सूडाने ते पेटले होते. सांबर-चितळांना मारून ते थांबले नाहीत. तर काटेझरीतील गोंड वस्ती-भोवतालच्या गवताला त्यांनी आग लावली. उन्हाळ्याचे दिवस असल्यानं गवत भराभर पेटलं. साऱ्या जंगलात वणवा पसरला. आपल्या झोपड्यांजवळ वणवा येताना दिसताना गोंड आपल्या पोराबाळांसह वणव्यातून वाट काढीत पळाले. तळ्याकाठी ताडोबाच्या झोपडीचा त्यांनी आश्रय घेतला. बाबूंची बेटं तर कापरासारखी जळाली. तेंदू, आवळा, हिरडा, गराडी, येण, बेल, साग, अंजन, धावडा, रोहन, जांभूळ,



पिल्लासाठी त्याचे मन, फांदी होऊन झुलले,
गतजन्मीचे हे नाते ओळख घेऊन हे आले ।

लोखंडी या वृक्षवल्लरींना वणव्याने भाजून काढले. वणव्यात वन्य जीव होरपळून निघाले. साबरं व चितळंही ताडोबाच्या आश्रयाला आली. पाखरांची घरटी आणि पिलं वणव्यात सापडली होती. गोऱ्या शिकाऱ्यांनी डाव साधला होता. ताडोबाच्या हृदयात दु:खाचा वणवा भडकला होता. पण तो गोंडांच्या जखमांवर

उपचार करीत फुंकर घालीत होता. आश्रयाला आलेल्या सांबर-चितळांच्या कळपाची काळजी घेत होता.

वणवा बघून शिकारी पळाले पण, शेवटी एक शिकारी तळयाजवळून जात असताना एक सांबराची मादी सावकाश पावलं टाकीत ताडोबाच्या झोपडीकडं येत होती. ज्वाळांच्या प्रकाशात तिच्याकडं त्याचं लक्ष गेलं. त्यानं घोडा थांबवला. अचूक नेम धरला. ताडोबाच्या तीक्ष्ण नजरेला ते दिसलं. ताडोबा सांबर मादीकडं धावला. त्यानं तिला कवेत घेतलं. त्याच वेळी शिकाऱ्यानं बंदुकीचा खटका ओढला आणि घोड्याला टाच देत शिकारी निघून गेला. त्याच्या बंदुकीतून सुटलेल्या गोळीनं सांबर मादीऐवजी ताडोबाच्या मांडीचा वेध घेतला. त्याच्या मांडीत गोळी घुसली. ताडोबा ओरडत खाली कोसळला.

गोंडांनी त्याला झोपडीत आणलं. त्याच्या जखमेवर वनस्पतीचा पाला ठेचून बांधला. परंतु मांडीत घुसलेली गोळी त्यांना बाहेर काढता आली नाही. काही दिवसांतच जखम भरून आली, परंतु झालेला वनविनाश पाहून ताडोबाच्या हृदयातली जखम कधीच भरून आली नाही. ताडोबानं अन्नपाणी सोडलं. तो रात्रंदिवस येणाच्या झाडाखाली बसून राहिला. ती सांबरमादीही त्याला सोडून गेली नाही. तिच्या पोटात पिलू होतं. निरगू रोज ताडोबासाठी भाकर आणायचा. पण ताडोबा भाकरीला तोंड लावत नसे. तो भाकरीचा घास त्या सांबर मादीला भरवायचा. उन्हाळा संपला. पावसाळा सुरू झाला. महिन्याभरात पुन्हा अरण्य हिरवंगार झालं. वणव्यात जळालेल्या अरण्याचा कायाकल्प झाला. पाखरं पुन्हा गाणी गायला लागली. हरणांचे कळप बागडायला लागले. गोंडांनी पुन्हा आपले संसार उभारले. ताडोबा समाधान पावला. पण तो अन्नाला शिवला नाही. पाच महिन्यांत त्याचं वजन खालावलं. सहाव्या महिन्यात त्याची तब्येत खूप बिघडली. त्याचं बलदंड शरीर हाडांचा सापळा बनलं.

साऱ्या गोंडांनी त्याला आग्रह करूनही त्यानं आपलं उपोषण सोडलं नाही.

भाद्रपदातली पौर्णिमा होती. ताडोबानं निरगूला जवळ बोलावलं. ''निरगू, आभाळातल्या देवाचं आता बोलावणं आलंया. वाघबाबाला भेटायला जातोया. वाघबाबानं जंगल राखण्याचा वसा मला दिला. म्या तुला देतोय. घेतला वसा सोडू नगं. रानजनावरांना ईसरू नगं.''

असं बोलत असताना बसलेला ताडोबा आडवा झाला. त्याची मान लुळी पडली. त्याचं प्राणपाखरू वाघबाबाच्या भेटीसाठी निघून गेलं. त्याच वेळी सांबर मादीला पिलू झालं. तिचे डाळे पाणावले. गोऱ्या शिकाऱ्याच्या पापाचं प्रायश्चित्त ताडोबानं घेतलं. ताडोबा अरण्यमय झाला. गोंडांनी त्याचं दफन येणाच्या झाडाखाली केलं. त्यावर शेंदूर फासलेली पाषाणशिला ठेवून त्याची समाधी बांधली. वनपुत्र ताडोबा गोंडांचा देव बनला. त्याची यात्रा भरायला लागली. त्याच्या दर्शनासाठी गोंड, गवळी, धनगर लांबलांबून यायला लागले.

१९२९ मध्ये साली एका ब्रिटिश वनाधिकाऱ्याला वनपुत्र ताडोबाची कहाणी ऐकायला मिळाली. त्यानं काटेझरी, काळाआंबा, वाघदरी, पांढरपवनी, आंबट झिरा, जांभूळ-बोंडी अरण्यप्रदेशात अभयारण्य स्थापन केलं. शिकारीस बंदी घातली. ताडोबाच्या समाधीशिलेपुढं मान झुकवून आपल्या भाऊबंदांच्या पापाबद्दल क्षमा मागितली. अभयारण्याला ताडोबाचं नाव दिलं. १९५५ साली मध्यप्रदेश सरकारनं ताडोबा राष्ट्रीय उद्यान स्थापन केलं. १९६० मध्ये ताडोबा अरण्य महाराष्ट्रात आलं. आता ताडोबा राष्ट्रीय उद्यान व्याघ्रप्रकल्प म्हणून जाहीर झालं आहे. वाघबाबाचा अरण्यरक्षणाचा वसा ताडोबानं घेतला. त्यासाठी त्यानं आपला प्राण अर्पण केला. आज ताडोबाच्या प्राणापर्णाचं सार्थक झालं. अरण्य व अरण्यजीव रक्षणाचं त्याचं स्वप्न साकार झालं. त्यानं खणलेलं तळ अरण्यआत्मा बनलं.

***


**सुरेशचंद्र वारघडे**
'सिंधू',पत्रकारनगर,पुणे १६



मला वाटते वृक्षाची घनशीतल छाया व्हावे ।
शिणले त्यांना आरामाचे सौख्य जरासे द्यावे ।।

# त्रयोदशगुणी विडा

डॉ. कांचनगंगा गंधे



विड्याची पाने

***सणाच्या दिवशी साग्रसंगीत जेवणाच्या आनंदाचा परमोच्च बिंदू म्हणजे विडा ! हा विडा ज्या नागवेलीच्या पानांपासून तयार केला जातो ते पान, त्याचं सुंदर बाह्य रूप आणि त्याचं बहुगुणी अंतरंग, पानामध्ये वापरले जाणारे चुना, सुपारी, जायपत्री, केशर, कंकोळ, इ. घटकांमुळे विड्याची चव वाढत असते. या सर्व वनस्पतींची शास्त्रीय तरीही काव्यात्म अशा भाषेत ओळख करून दिली आहे, डॉ.कांचनगंगा गंधे यांनी.***

आपल्या संस्कृतीमध्ये भोजनाचं एक आगळं, वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. जेवण ही केवळ 'उदरभरणाची' गोष्ट नाही. ती तशी मानली तर मग सुसंस्कृत माणूस आणि जनावर यांच्यात फरक उरणार नाही. भोजन हे 'यज्ञकर्म' जाणावं, असं एक सुभाषित सांगतं. या यज्ञकर्माची खरीखुरी सांगता होते ती तांबूलसेवनानं. तांबूल किंवा विड्याचं एक अनन्य-साधारण महत्त्व आपल्या आहार व्यवस्थेमध्ये आहे. पण विड्याचं आणखी एक आगळं वैशिष्टच आहे. विड्याच्या रूपानं जेवून तृप्त झालेल्या आपल्या प्रिय व्यक्तीबद्दलचं अगत्य, प्रेम, जिव्हाळा या सगळ्या भावनांचा आविष्कार म्हणजे विडा. त्यामुळे जेवणातील पदार्थांइतका काळजीनं विडा तयार केला जातो. भक्त आपल्या आराध्य दैवताला 'विडा घ्या हो नारायणा' म्हणतो. तर लावणीतली प्रियकरावर लुब्ध झालेली युवती म्हणते,

'कळीदार कपुरी पान,कोवळं छान,  
केशरी चुना; रंगला काथ,केवडा  
वर्खाचा विडा घ्या हो मनरमणा;  
बारीक सुपारी निमचिकणी घालून  
जायपत्री, वेलची, लवंग वरी दाबून  
बांधले कसे या कुडीत पंचप्राण.'

भोजनाच्या आनंदाचा परमोच्च बिंदू, प्राण असलेल्या विड्यांमध्ये 'त्रयोदशगुणी' विड्याचं विशेष महत्त्व आहे. फार प्राचीन काळापासून जेवणानंतर मुखशुद्धीकरिता तांबूलसेवनाची जुनी परंपरा आहे. तांबूलसेवनाची प्रथा भारतात २००० वर्षांपासून रूढ आहे. चरक, सुश्रुत, वात्स्यायन, कालिदास इत्यादी अनेक लेखकांच्या संस्कृत ग्रंथांतही तांबुलाचा उल्लेख आहे. मद्रासी विडा, खणाची पट्टी, पुडीचा विडा असे अनेक प्रकारचे विडे निरनिराळ्या आकारांमुळे प्रसिद्ध आहेत. १३ वेगवेगळे प्रकार वापरून, १३ विविध गुण एकत्र आणून बांधलेला 'गोविंद विडा' आपल्याकडे शुभकार्यात देण्याची पद्धत आहे.

'तांबूल' म्हणजे विडा. त्यामध्ये सर्वात महत्त्वाचं स्थान आहे. 'पानवेलीला'. वेल असल्यामुळे ती दुसऱ्याचा आधार घेत वर वाढत जाते. 'पानवेल' तशी 'मिजासखोर', कारण तिला 'जिवंत' आधार लागतो. पण एकदा का आधार मिळाला की पानवेलीची नाजूक कांडं एकदा डावीकडे आणि एकदा उजवीकडे कल ठेवून नागासारखी विळखा घालत भराभर वाढते. म्हणून तिला 'नागवेल' ही म्हणतात. पकड घट्ट होण्यासाठी नागवेल आपलं सर्वस्व पणाला लावते. दंड फुगवल्यासारखी पेराजवळ थोडी फुगीर होते. एवढंच नव्हे तर फुगवलेल्या भागातून पाच-सहा मुळं तयार होऊन तीसुद्धा आधाराला घट्ट धरून वेलीला वाढण्यासाठी मदत करतात. उष्ण आणि दमट हवामानात तर ती चांगलीच फोफावते. नागवेलीचे सर्वच अवयव नाजूक. प्रत्येक पेरावर एक मुलायम, गुळगुळीत, रसरशीत, हिरवंगार पान ! देठाच्या बाजूला पानाचा आकार हृदयाकृती झालेला तर टोकाकडे टोकदार झालेला. पानाच्या हृदयाकृती भागात असलेल्या ५-७ उठावदार शिरांमुळे पान अधिकच आकर्षक दिसतं. पाहताक्षणी मोहात पडावं अन् खाऊन टाकावं ! काही



नागवेल ही नाजुक वळुनी,विळखा घालत भराभर चढे ।  
हिरव्या पानी सुगंध लेउनि,मोद पसरवी चोहीकडे ।।


'दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !'

शंभरावा अंक

क्षण सुगंधी अन् भान हरपणारी चव! पण जास्त चावलं की पान आपला 'तिखट' इंगा दाखवतं. पानात असलेल्या 'चाव्हीकॉल' पाचकद्रव्यामुळे तोंडाला पाणी सुटल्याशिवाय राहात नाही. पान तिखट असलं तरी आपण जेवलेलं गोडाचं जेवण केव्हाच पचवून टाकतं! एवढंच नव्हे तर पोटातले गॅसेस कमी करणं, तहान शमवणं, शरीराला उत्तेजकता आणणं, घसा साफ ठेवणं, अशी अनेक वैशिष्टचं पानात असल्यामुळे पानं सतत तोडली जातात. त्यामुळे पानवेलीचा 'फुलोरा' क्वचितच पाहायला मिळतो. वेलीप्रमाणे फुलोराही नाजूक. लहानसं, वाकलेलं 'कणीस'. नरफुलं आणि मादीफुलं एकत्र वाढत नाहीत. ती वेगवेगळ्या पानवेलीवर पानाच्या विरुद्ध बाजूला वाढतात. पण दोन्ही फुलांना एकमेकांशिवाय राहावत नाही. कीटक, भुंगे यांच्यामार्फत एकमेकांशी संपर्क ठेवून असतात. परिणामी, मादीफुलांच्या वेलीवर फळांचे घोस लोंबत राहातात.

'त्रयोदशगुणी' विड्यातला दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे 'चुना'. चुना हा 'चुनखडी' खनिज भाजून करतात. भाजल्यामुळे चुनखडीतला 'कार्बन डायॉक्साईड' बाहेर पडतो आणि शिल्लक राहते 'कॅल्शियम ऑक्साईड' तोच 'कळीचुना'- हाच विड्यात वापरतात. जास्त वापरला तर तोंड चांगलं भाजून निघतं, पण थोड्या प्रमाणात आणि रोज थोडा वापरला तर हाडांना, दातांना बळकटी येते. चुन्यात कॅल्शियम असतं, ते शरीरात लगेचच सामावून घेतलं जात नाही म्हणून विड्यातून थोडा 'चुना' खाणं शरीराच्या वाढीच्या दृष्टीनं चांगलं !

आपल्या आवडत्या माणसावर खरंखुरं प्रेम असलं की म्हणे 'विडा' रंगतो. पण 'अंदरकी बात' कात आणि चुन्यालाच माहीत ! कात अगदी 'छुपा रुस्तुम !' खैराचे वृक्ष 'जून' झाले की त्यांच्या लाकडांचे 'अर्क' काढून गाळून वाळवावे लागतात. जो घन पदार्थ राहतो तोच 'कात.' यात 'टॅनिक आम्ल' आणि 'कॅटेचिन' असतं ! चुना आणि टॅनिक आम्लात रासायनिक 'युद्ध' होतं आणि त्याचा परिणाम तांबड्या लाल रंगात होतो. पण तरीही ते दोघंही खाणाऱ्याचा घसा 'साफ' करतात. खाल्लेलं अन्नही पचवायला नागवेलीला मदत करतात.







विड्याचं पान म्हटलं की सुपारी आलीच ! 'पान-सुपारीची' 'जोडी' ठरलेलीच ! 'सुपारी' म्हणजे जणू विड्याच्या पानाची 'अर्धांगिनी !' म्हणूनच शुभकार्यात, लग्नप्रसंगी 'पान-सुपारीची जोडी' देण्याचा प्रघात आपल्याकडे आहे. कोणताही धार्मिक विधी करताना प्रथम प्रार्थनेचा हक्क फक्त गणपतीलाच मिळाला आहे. त्याचे प्रतिनिधित्व करते 'सुपारी.' धार्मिक विधीत श्रीगणरायाची मूर्ती समजून प्रथम 'सुपारीची' पूजा करतात. सुपारीला 'पूगीफल' म्हटलंय ! पूग म्हणजे ऐक्य भावना. ऐक्यभावनेनं कार्यपूर्ततेस नेणारं फल तेच पूगीफल.

नारळापेक्षा पूगवृक्ष अधिक देखणा, अधिक तजेलदार, तुकतुकीत. पानाची सोपटं खोडाला गुरफटल्यामुळे 'पूगवृक्ष' आकर्षक दिसतो. शेंड्याकडे पानांचा तुरा खोचल्यासारखा वाटतो. याच्या झावळ्या इतक्या शिस्तबद्ध की वरून पाहिलं तर बाण खोचले आहेत की काय असं वाटतं ! सुपारी स्वत:चा फुलोरा पानांच्या सोपटात लपवून ठेवते. नर आणि मादीफुलं वेगवेगळी असली तरी ती नागवेलीसारखी वेगवेगळ्या झाडांवर येत नाहीत. दोन्ही फुलं एकाच फुलोऱ्यात असतात. नरफुलांची संख्या जास्त आणि ती दोन रांगांत फुलोऱ्याच्या टोकाला असतात. मादीफुलांची संख्या कमी असली तरी ती नरफुलांपेक्षा जास्त टपोरी आणि मोठी असतात. मादीफुलाचं आणि नरफुलाचं 'मीलन' झालं की 'सुपारी' तयार होते. इतक्या अुंचीवर वाढलेल्या 'बीजाचं-सुपारीचं' संरक्षणही अतिशय चोख केलेलं असतं ! बीजावर तंतुमय दोऱ्यासारखं पण अतिशय चिवट, कडक 'टरफल' (आवरण) असतं- टरफलात बंद असलेल्या सुपारीला 'पोफळ' नाव आहे. उष्ण, दमट हवा आणि समुद्रावरचं खारं वारं प्यायलं की 'पोफळ' भरभरून वाढते. सुपारीत दोन प्रकार असतात. एक तुरट तर दुसरी गोडी. 'गोडी' सुपारी विड्यात वापरतात. तोंडातल्या लाळेमुळे ती विरघळते आणि तिची गोडी अजूनच वाढते.


जायपत्रीच्या सुगंधानं त्रयोदशगुणी विड्याची नुसती लज्जतच वाढत नाही



कळीदार कपुरी पान, कोवळं छान केशरी चुना;
रंगला काथ,केवडा वर्खाचा, विडा निरस हो त्याविना।।




तर तिच्यामुळे भोजनानंतर आलेला 'जडपणा' कमी होतो. तिचं नावं जरी जायपत्री असलं तरी ती म्हणजे जायफळाची पानं नव्हेत ! पण जायफळाच्या बीभोवती लालजर्द, नारिंगी रंगाचं, जाळीदार वेष्टन असतं ते म्हणजे 'जायपत्री.' बीजातल्या अंकुराला जपण्यासाठी फळाच्या कठीण कवच्याच्या आत ही जायपत्री




लपलेली. जायफळाचं म्हणजे बीजाचं ती रक्षण करते. जायफळ पक्व झालं की 'जायपत्री'ला वेगळे काढतात पण 'जायपत्री' आपले ठसे जायफळावर उमटवून मगच बाजूला होते. हिला जायफळापासून अलग करायला खूप कौशल्य लागतं. तशी ती सहजी आपल्यापासून जायफळाला वेगळं होऊ देत नाही - जणू जायफळाची सावली ! जायफळाचा समावेशही त्रयोदशगुणी विड्यात करतात. जायफळ-जायपत्री आणि वेलची म्हणजे विड्याच्या पंचप्राणांपैकी महत्त्वाचे दोन प्राण ! गारवा, सावली आणि समुद्राचं खारं वारं असलं की वेलदोडे टप्पोरे येतात आणि म्हणून पोफळीच्या बागांमध्ये वेलदोडे लावतात. चवीला थोडे तिखट असले तरी वेलदोड्याच्या दाण्यांना मंद सुगंध असतो, मुखशुद्धीकरता त्रयोदशगुणी विड्यामध्ये त्याला मानाचं स्थान आहे. पानांना आणि फुलांनाही वेलदोड्यासारखाच वास येतो. वेलदोड्याची झाडं हळदीच्या झाडांसारखी दिसतात. याची फुलं जमिनीजवळ तुऱ्यात येतात. परागीभवन झालं की फुलं जमिनीकडे वळतात, आपोआप वाढणारे वेलदोड्याच्या फुलांचे दांडोरे जमिनीत वाट काढत जातात. सर्वच फुलांची फळं होत नाहीत, पण मुद्दाम वाढवलेल्या वेलदोड्याच्या फुलांच्या दांडोऱ्यांना जमिनीत मुद्दाम खोलगट जागा करून ठेवतात त्यामुळे त्याचं उत्पन्न वाढतं !

केशर म्हणजे प्रेमाचं प्रतीक ! आपल्या प्रिय व्यक्तीबद्दलचं प्रेम आणि जिव्हाळा दाखवायचा असेल तर विड्यात केशराचा समावेश करायलाच हवा ! कुणाची पानं, तर कुणाची फळं, फळावरची वेष्टनं यांचा त्रयोदशगुणी विड्यात समावेश करतात, पण केशराचं वेगळंच ! निळसर जांभळ्या रंगाच्या फुलात एक लाल स्त्री-केसर असतो तेच 'शुद्ध केशर'. या फुलाचे पुंकेसरही लालसर रंगाचे असतात, तेही 'केशर' म्हणून वापरतात. केशर पाचक आणि कामोत्तेजक असल्यामुळे विड्यात त्याचा समावेश केला आहे. केशराची फळं सहसा तयार होत नाहीत. केशराच्या झाडाचे जमिनीत कंद असतात. त्याला छोटे कंद फुटतात आणि तेच पुढे वाढतात.







कंकोळाची फळं विड्यात वापरण्याचा प्रघात फार पूर्वीपासून आपल्याकडे आहे. पानवेल, मिरवेल जातीतलं हे कंकोळ मूळचं आहे 'जावा' बेटातलं ! पण आपल्याकडेही ते चांगलं वाढतं ! पानवेल आणि कंकोळ पुष्कळशी सारखी दिसतात. पण पानांमध्ये फरक आहे. कंकोळाची पानं पानवेलीइतकी मऊ, मुलायम नसतात, पण फुलोरा आणि फळांमध्ये मात्र बरंच साम्य आढळतं ! कंकोळाचं फळ सुगंधी आणि थंड आहे आणि म्हणूनच 'मुखमाधुर्य' वाढवण्यासाठी 'त्रयोदशगुणी' विड्यात त्याला समाविष्ट केलं आहे. कंकोळ काही ठिकाणी 'कापुरचिनी' किंवा 'कबाबचिनी' या नावांनी ओळखला जातो.

गोडाच्या जेवणामुळे दात, दाढा किडण्याची भीती जास्त. पण



निळी, जांभळी इवली, नाजुक फुलली केशरफुले,
मंदधुंद तो परिमळ त्यांचा आसमंति दरवळे ।


दीपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा !

शंभरावा अंक

विड्यात कापूर वापरल्यामुळे दाढेतली कीड मरते. कापूर जंतुनाशक आणि सुवासिक असल्यामुळे मुखदुर्गंधी घालवण्यासाठी जायफळ, कापूर आणि सुपारी कुटून गोळी तोंडात ठेवतात. कापूर आणि दालचिनीची जातकुळी एकच ! कापराचे वृक्ष ६० ते ८० फुटांपर्यंत वाढतात. त्याची पानं भाल्याप्रमाणे पण गुळगुळीत असतात. वृक्षाच्या खोडाला खाचा पाडून जे दाट तेल निघतं तोच कापूर. भीमसेनी, पत्री आणि चिनई कापूर असे कापराचे तीन प्रकार आहेत; पैकी भीमसेनी कापूर सर्वात महाग आणि खाण्यास योग्य.

असं म्हणतात की अतिगोड सतत खाल्लं तर पोटात जंत किंवा कृमी होतात. त्यामुळे पोट दुखतं, जड होतं, कधी उलटयाही होतात. पण यावर नारळाचं खोबरं खाणं हा 'रामबाण' उपाय आहे आणि म्हणूनच विड्यात ओलं किंवा कोरडं खोबरं आवर्जून घालतात. नारळ हे शुभसूचक फळ असून ते सृजनशक्तीचं प्रतीक मानतात. हिंदूंच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनात नारळाला महत्त्वाचं स्थान आहे आणि म्हणून त्याला 'श्रीफल' म्हणतात. कोणत्याही मंगलकार्याच्या आरंभी देवापुढे विडा-नारळ ठेवण्याची पद्धत आपल्याकडे आहे.

गोड जेवणानंतर त्याचं योग्य रीतीनं पचन होण्यासाठी विविध पदार्थ वापरून विडा खाण्याची पद्धत आपल्याकडे आहे. गोडाच्या जेवणामुळे मुखदुर्गंधी, मुखरोग होऊ नयेत, घसा आणि कंठ यांना सूज




येऊ नये म्हणून इतर पदार्थांबरोबर गुंजेच्या पाल्याचा उपयोग विड्यात करतात. गुंजेची वेल असल्यामुळे तिला वाढण्यासाठी दुसऱ्या झाडाचा आधार घ्यावा लागतो. गुंजेमध्ये तांबडी व पांढरी गुंज असे दोन प्रकार असले तरी विशेषत: पांढऱ्या गुंजेचा पाला विड्यात वापरतात.


त्रयोदशगुणी विड्यात वापरत असलेल्या सर्व १३ पदार्थांना सारखंच मानाचं स्थान असलं तरी विड्यात 'कस्तुरी' वापरणं प्रतिष्ठेचं आणि सुख, भोग व शांतीचं लक्षण मानलं जातं ! 'कस्तुरी' हे सुगंधी द्रव्य कस्तुरीमृगाच्या बेंबीच्या गाठीत असतं ! कस्तुरी हे पूजाद्रव्यही मानलं आहे. विष्णू, कृष्ण, पांडुरंगाच्या भाळी कस्तुरी टिळा असल्याचे संदर्भही अनेक आरत्यांमधून मिळतात. 'कस्तुरीमृग' जवळजवळ नामशेष झाल्यामुळे आता 'कस्तुरी'




मिळणं महामुष्कील आहे.

एवढे सगळे घटक मऊ, मुलायम नागवेलीच्या पानात बांधून त्याचा 'विडा' तयार केला जातो. पण नागवेलीचं पान गुळगुळीत त्यामुळे त्यात सगळं बांधून विडा 'बंद' करायचा म्हणजे महामुष्कील काम ! पण सर्व घटकांना 'कुडीत' बांधण्याचं काम लवंग 'बाहेर' राहून करते. 'त्रयोदशगुणी' विड्यात जे घटक वापरतात त्यात आपला पण सहभाग असावा म्हणून 'लवंग' स्वत:चा थोडा भाग नागवेलीच्या पानातून आत ढकलते आणि तिची दुसरी बाजू म्हणजे उमलत्या कळीचा नाजूक भाग एखादं छोटं तबक पसरावं तसं नागवेलीच्या पानावर पसरते. लवंग आहे पाचक आणि दुर्गंधीनाशक पण थोडी तिखट, त्यामुळे पोटदुखी, पोटफुगी आणि दातदुखीही थांबते. एकच छोटी लवंग पण सगळ्यांचे गुण एकत्र बांधून 'त्रयोदशगुणी' विड्याचे महत्त्व वाढवते.

असा हा 'त्रयोदशगुणी तांबूल' आहे. प्रथम मधुर पण नंतर थोडा तिखट, दुर्गंधीनाशक, उद्दीपक, सुगंधी, मुखशुद्धीकारक आणि सौंदर्यवर्धक ! म्हणूनच त्याला रसिकतेचं आणि मंगलतेचं प्रतीक मानण्यात येतं !



***

**डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७, लोकमान्यनगर
पुणे ४११ ०३०.

# करून पाहा

दिवाळीच्या निमित्ताने आपल्याला आपले नातेवाईक, मित्रमैत्रिणी काहीतरी भेटवस्तू देतात. अशा वेळी तुम्हालाही असे वाटत असेल की आपणही त्यांना स्वत: बनविलेली, उपयुक्त भेटवस्तू द्यावी.

भेट देण्यासाठी आपण जी वस्तू बनविणार आहोत, त्यासाठी वेगळ्या सामानाची काही आवश्यकता नाही. घरातील जुनी वर्तमानपत्रे, एक प्लॅस्टिकचे भांडे (श्रीखंडाचा रिकामा डबा, आंघोळीचा मग यासारखे), फेव्हिकॉल, थोडीशी मेथ्यांची पावडर (या मेथ्या आपण स्वयंपाकात वापरतो), गोडेतेल.

१) प्रथम वर्तमानपत्राचे बारीक तुकडे करून पाण्यात ३/४ दिवस भिजत ठेवा. ३/४ दिवसांनी या तुकड्यांचा लगदा झाला असेल. हा लगदा फेव्हिकॉल आणि मेथ्यांची पावडर घालून मळून घ्या. (एकच भांडे बनवायचे असेल तर मेथ्यांची पावडर १ छोटा चमचा पुरेशी आहे.)

हा लगदा थोडा सैलसर असावा.


तुम्ही जे प्लॅस्टिकचे भांडे वापरणार आहात, त्याला ब्रशच्या साहाय्याने गोडेतेलाचा एक वॉश लावून घ्या. आता या भांड्यावर कागदाच्या लगद्याचा एक जाडसर थर द्या. २/३ दिवसांनी हा थर पूर्णपणे वाळल्यावर आतील प्लॅस्टिकचे भांडे जरा जोर देऊन बाहेर काढा.

हे भांडे पोस्टर कलर्स किंवा फेव्हिक्रिलच्या रंगाने रंगवा आणि तुमच्या मित्रमैत्रणींना भेट म्हणून द्या, त्यांना नक्कीच तुम्ही बनविलेली ही वस्तू आवडेल.


तुम्हाला आता वर्तमानपत्राच्या तुकड्यांचा लगदा कसा बनवायचा हे माहीत झाले आहे.

हा जो तयार केलेला लगदा आहे त्याच्या साहाय्याने तुम्ही पपेटही (कळसूत्री) बनवू शकता.

बाजारात जे छोटे फुगे मिळतात तसे फुगे या पपेटसाठी वापरायचे आहेत. प्रथम एक छोटा फुगा फुगवून त्याला गाठ मारून घ्या.




या फुगलेल्या फुग्यावर कागदाच्या लगद्याचा थर (हा थर जाडसरच पाहिजे) सर्व बाजूंनी लावून घ्या.



डार्क केलेल्या भागात कागदाचा लगदा लावू नका


थर लावताना गाठीकडील अगदी थोडासा भाग मोकळा ठेवा. २/३ दिवसांनी थर वाळल्यावर गाठीकडील बाजूवर पिन मारून फुगा फोडा. फुगा फुटल्यामुळे आतील सर्व भाग पोकळ होईल. आता एक जाडसर पेपर घेऊन त्याचा रोल करा. या रोलची जाडी बऱ्यापैकी असावी, रोलची उंची ४'' ते ५'' च्या दरम्यान असावी, तसेच रोलची रुंदी तुमचं बोट व्यवस्थित जाऊ शकेल एवढी असावी.



भागात याप्रमाणे पेपररोल अर्धा आत आणि अर्धा बाहेर राहील.

फेव्हिकॉल, चिकटपट्टीच्या साहाय्याने रोल मजबूत करा. आता हा रोल फुग्याच्या पोकळ भागात दीड ते दोन इंच आत जाईल एवढा आत घाला.


थोडासा कागदाचा लगदा घेऊन चित्रात दाखविल्याप्रमाणे फुगा आणि रोल एकमेकांना जोडून घ्या.



कागदाचा लगदा वापरून रोल जोडून घ्या.

आवश्यक वाटल्यास फेव्हिकॉलचा वापर करा.

आता या फुग्यावर लगद्याचा वापर करून नाक, डोळे, केस करून घ्या. फुगा पूर्णपणे वाळल्यावर रंगवून घ्या. रंगविताना शक्यतो फेव्हिक्रिलच्या रंगाचा वापर करा.




आता बघा ! हा तुमचा बाहुलीचा मुखवटा तयार झाला. त्याला तुमच्या आवडीप्रमाणे कपडे करून तुम्ही पपेट शोमध्ये वापरू शकता.

***

**मेधा सुदुंबरेकर**
२६, मित्रमंडळ कॉलनी,
पर्वती, पुणे ९



सृजनशक्तीच्या स्पर्शे घेई कागद सुंदर आकार,
कलाकृतींच्या रचने करुया भाव मनीचा साकार.



# कविता कशी सुचते?

– शांता ज. शेळके

कवीला कविता कशी सुचते या प्रश्नाचं उत्तर शोधण्यापूर्वी प्रथम कविता म्हणजे नेमकं काय ते समजावून घेतलं पाहिजे. बऱ्याच रचना छंदोबद्ध असल्यामुळे किंवा त्या चालीवर गाता येतात म्हणून आपण त्यांना कविता म्हणतो. पण ते बरोबर नाही. कधी कधी अगदी गद्य असा मजकूर देखील या छंदोबद्धतेमुळे कवितेसारखा दिसतो. एक जुनी विनोदी रचना या संदर्भात सांगितली जाते ती अशी –

हवा थंड आहे तया बेळगावी
तिथे ऊष्ण वस्त्रे तुवा फार न्यावी

ही रचना चालीवर गाता येते म्हणून वरवर पाहता ती कविता वाटते. पण हे केवळ गद्य, माहिती देणारं निवेदन आहे. कविता नव्हे. छंदोबद्ध रचनेचा एक मोठा गुण म्हणजे तिची पाठान्तरसुलभता. गद्य रचना पाठ करता येत नाही. पण तोच मजकूर छंदात बसवला म्हणजे तो सहज पाठ होऊ शकतो. छंदाचं हे वैशिष्टय ध्यानात घेऊन पूर्वीच्या काळी वैद्यक, ज्योतिष, व्याकरण, वास्तुशिल्प यांसारख्या विषयांवरचे ग्रंथ अनुष्टुभ वगैरे छंदांत रचले जात आणि ते सहज पाठ होत. शाळेमध्ये पूर्वी परवचा, पाढे हेदेखील मुले सामुदायिकरीत्या चालीवर म्हणत आणि छंदोबद्ध, तालबद्ध रचनेमुळे मुलांच्या ते ध्यानात राहून जात. पण अशी रचना म्हणजे कविता नव्हे हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे.

हे सारं विवेचन बरोबर आहे पण कविता आणि छंद, ताल, लय यांचा मुळीच संबंध नाही असं मात्र म्हणता येणार नाही. कोणताही कवी कवितेकडे प्रथम वळतो तो तिच्यातील नाद, ताल, लय यांमुळंच. अगदी लहानपणी आपण जी बालगीतं मोठ्या हौसेनं, आनंदानं म्हणत होतो ती त्यातल्या नादाच्या लयीच्या आकर्षणामुळेच. कोणतंही बालगीत आठवून पाहावं. ते म्हणताना आपली बाळपावलं त्यांतील विशिष्ट तालावर, लयीवर कसा ठेका देत होती हे आजदेखील आपणाला आठवल्यावाचून राहणार नाही.

ये रे ये रे पावसा ।
तुला देतो पैसा ।
पैसा झाला खोटा ।
पाऊस आला मोठा ।

हे गाणं म्हणताना लहान मुलं तालावर नाचतात.

चांदोबा चांदोबा भागलास का ।
लिंबोणीच्या झाडामागे लपलास का!
लिंबोणीचं झाड करवंदी ।
मामाचा वाडा चिरेबंदी

हे बाळगाणंदेखील त्यातल्या नादमाधुर्यामुळे, त्यात अंतर्भूत असलेल्या लयीमुळे मुलं मजेनं म्हणतात. या गाण्यात अर्थापेक्षा लयीचं आकर्षण मोठं असतं. हीच गोष्ट मुलींची हादग्याची, भोंडल्याची गाणी, झिम्मा-फुगडच्यांची गाणी, शेतकरी बायकांची शेतावर काम करताना म्हणण्याची गाणी, नावाडच्यांची नाव वल्हवताना म्हणण्याची गाणी यांच्यासंबंधी सांगता येईल. यांतली अनेक गीतं तर निरर्थकच असतात. पण नादाचं, लयीचं, छंदतालाचं एक गूढ आकर्षण त्यांत असतं.

'हणमंताची निळी घोडी ।
येता जाता कमळं तोडी ।'

अथवा 'अगं अगं राणी। इथं कुठं पाणी ।
पाणी नव्हे यमुना जमुना ।
यमुनाजमुनाची बारीक वाळू।
तेथे खेळे चिल्लार बाळू'

अशी गाणी नुसती गाताना, ठेक्यावर म्हणताना देखील आपल्याला अतिशय आनंद होतो. एखादा कवी जेव्हा कविता रचनेकडे वळतो तेव्हा प्रथम हे नादतालाचं आकर्षण त्याचं मन ओढून घेतं, हे ध्यानात घ्यायला हवं. म्हणून आपल्या बहुसंख्य लोकगीतांत अर्थापेक्षाही नादाला अधिक महत्त्व असतं व ते उपेक्षणीय नसतं.

बरेच कवी आपल्या कवितेत या माधुर्याला, लयतालाला मोहून त्याच प्रकारची रचना सातत्याने करत राहतात. त्यांची कविता तिथेच थांबते. कवितेतले यमक आणि अनुप्रास हे अलंकार शब्दातील नादांच्या, वर्णांच्या पुनरावृत्तीवर अवलंबून असतात आणि त्यातून निर्माण होणारं नादमाधुर्य काही प्रमाणात तरी मनाला भुरळ घालतं.

पंडित कवींची बरीच रचना या नादात गुरफटून गेली आहे असं जाणवतं. वामन पंडितांच्या कित्येक श्लोकांचा गोडवा त्यातल्या नादाच्या पुनरुक्तीतून निर्माण झाला आहे.

'फिरविते रविते दधिंभीतरी ।
मिरविते रवितेज नगावरी ।
स्वकरि ते करि चंचलता मनी ।
उपरमे परमेश्वर गायनी । '

यासारखा वामन पंडितांचा श्लोक अर्थ न कळताही केवळ शब्दांच्या गोडव्यामुळे पुन्हा पुन्हा म्हणावासा वाटतो त्याचं कारण त्यात कवीनं साधलेली नादाची चमत्कृती हेच आहे. मोरोपंतांच्या अनेक आर्याही त्यांतल्या विशिष्ट शब्दरचनेमुळे आणि त्यातून उमटणाऱ्या नादामुळे आपण सतत गुणगुणतो.

नादाची पुनरुक्ती हा कवितेचा एक महत्त्वाचा घटक आहे. अनेक आधुनिक कवींच्या कवितेतही नादांच्या विशिष्ट आकृतींनी एक विलक्षण सौंदर्य निर्माण केलं आहे.

'जा हळुहळु वळसे घेत।
लपत छपत हिरवाळीत'

अशा मनाला भुरळ घालण्याच्या नादमधुर ओळी बालकवींच्या कवितेत किती तरी आढळतात. 'हिरवे तळकोकण' या माधव कवींच्या प्रसिद्ध कवितेमधल्या पुढील ओळी पाहाव्यात.

'तिथे मंडलाकार मनोहर
नर्तन आरंभुनी ।
रुसल्या सखिची घुमत
पारवा करतो समजावणी ।'

केवळ अर्थानंच नव्हे तर नादामुळेही या ओळी ऐकल्यावर किती तरी काळ त्या आपल्या मनात घुमत राहतात. भा. रा. तांबे, बा. भ. बोरकर, ना. घ. देशपांडे, मंगेश पाडगावकर यांच्या अनेक कवितांमधून हे नादमाधुर्य प्रत्ययाला येतं आणि त्यामुळे त्या कवितांची गोडी कितीतरी प्रमाणात अधिक वाढली आहे असं आपल्याला जाणवतं.

शब्दांचं सौंदर्य, विशिष्ट वर्णांच्या पुनरुक्तीमुळे किंवा यमक-अनुप्रासादी अलंकारांमुळे कवितेला येणारी आकर्षकता या सर्व गोष्टी कवितेत येतात आणि एखादा कवी जेव्हा कविता लेखन करू लागतो तेव्हा या गोष्टी आपल्या कवितेत आणण्यासाठी त्याची धडपड सुरू होते. त्यासाठी त्याला भाषेचा व्यासंग करावा लागतो. पूर्वकवींच्या कवितांचं भरपूर वाचन करावं लागतं. वेगवेगळे शब्दालंकार आणि अर्थालंकार यांचाही तो कवितेत वापर करतो; पण हे कवितेचं बाह्य सौंदर्य असतं. कवितेची ती वेषभूषा असते. कधी कधी एखादी कविता अशी आढळून येते की जिच्यामध्ये ही बाहेरची सजावट, शब्दांचा गोडवा, भाषाप्रभुत्व यातलं काहीसुद्धा नसतं आणि तरीही ती कविता वाचल्याबरोबर हृदयाचा ठाव घेते. तेव्हा कवितेच्या साऱ्या बाहेरच्या सजावटीपेक्षा तिचं आतलं सौंदर्य म्हणून काही वेगळंच असतं आणि कवितेला कवितापण त्यामुळेच येतं याची या नवथर कवीला जाणीव होते आणि मग कवितेतील त्या अन्त:सौंदर्याचा तो शोध घेऊ लागतो. अशा वेळी त्याला आढळून येतं की अनेक कवितांमध्ये नादाचं माधुर्य, शब्दरचनेची सुंदर सजावट, यमक-अनुप्रसादी शब्दालंकार यांतलं काहीही नसतं आणि तरीही त्या कविता आपल्या हृदयाला जाऊन भिडतात. काळजाचा ठाव घेतात. मग त्या कवितांचं सामर्थ्य कशात असतं?या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी तो प्राचीन साहित्यशास्त्रज्ञांकडे वळतो आणि तिथे 'रस' या शब्दाशी त्याचा परिचय होतो. रस म्हणजे विरघळणारी भावना. उत्तम कविता ती, की जिच्यामध्ये तुमच्या भावना विरघळवून टाकण्याची शक्ती असते. अशा कवितेला रसपूर्ण कविता म्हणतात. हा रस कवितेत असला पाहिजे. तो नसेल तर सारं नादमाधुर्य, शब्दांची सारी आरास व्यर्थ आहे. अशा रसाळ कवितांची कितीतरी उदाहरणं जुन्या आणि नव्या काव्यात आढळतात. त्यांत बायकांच्या ओव्या येतात, नामदेव-तुकारामांचे भक्तिपर अभंग येतात. आधुनिक कवितेत केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, मर्ढेकर यांसारख्या नामवंत कवींनी कितीतरी रसपूर्ण कविता लिहिल्या आहेत. अगदी साधं उदाहरण घ्यायचं झालं तर तुकारामांचा पुढील अभंग पाहावा-

कन्या सासुऱ्यासी जाये ।
मागे परतोनी पाहे ।।
तैसे झाले माझ्या जीवा।
केव्हा भेटसी केशवा ।।
चुकलिया माये ।
बाळ हुरूहुरू पाहे ।।
जीवनावेगळी मासोळी ।
तैसा तुका तळमळी ।।

लग्न झाल्यानंतर माहेर सोडून सासरी जाताना मुलगी पुन्हापुन्हा मागे वळून बघते. जत्रेत किंवा गर्दीत आई चुकली तर बाळ मनात व्याकुळ होऊन सर्वत्र तिचा शोध घेऊ लागते. पाण्याबाहेर येऊन पडलेली मासोळी पाण्यासाठी तळमळत राहते. पंढरीला

विठोबाची भेट घेऊन परत जाताना तुकारामांचा जीवही असाच व्याकुळ होतो आणि ते पुन्हापुन्हा मागे वळून ‘आता परत केव्हा भेटशील देवा?’ असा आर्त प्रश्न विठोबाला विचारत या अभंगातली भाषा अगदी साधी आहे, सासरी जाणारी मुलगी, गर्दीत आईचा हात सुटून बावरलेलं मूल, पाण्याबाहेर काढल्यामुळे तडफडणारी मासोळी ही आपल्या नित्याच्या पाहण्यातली उदाहरणं आहेत. ती उदाहरणं देऊन तुकारामांनी विठोबाच्या दर्शनाची मनाला लागलेली ओढ परिणामकारक रीतीनं व्यक्त केली आहे. अशी कविता वाचताना ती अस्सल कविता आहे हे कुणी आपल्याला समजावून सांगावं लागत नाही. ती आपोआपच आपल्याला भावते. आपल्या भावना उचंबळून टाकते. एका अननुभूत आनंदाचा आपल्याला प्रत्यय देते.

कवीला कविता कशी सुचते ? वरील उदाहरणावरून या प्रश्नाचं उत्तर काही प्रमाणात तरी आपल्याला मिळेल. कवीला जेव्हा एखादा उत्कट अनुभव येतो तेव्हा आपोआप त्याच्या मनात कवितेच्या ओळी जुळू लागतात. मात्र हा अनुभव कवीचा स्वत:चा असला पाहिजे. कवी अनुभव कसा घेतो? व्यक्तिगत जीवनात सुखाचे, दु:खाचे, विलक्षण कृतीचे किंवा गाढ निराशेचे अनेक क्षण त्याच्या वाट्याला येतात. आपल्या भोवतालच्या जगात निसर्गाचं अपार सौंदर्य पसरलं आहे. माणसांचे, मनुष्यस्वभावाचे हजार नमुने आहेत. माणसानं आपल्या बुद्धि-सामर्थ्याने घडवून आणलेले अनेक चमत्कार आहेत. आईची माया आहे. लहान बाळाचं निर्व्याज हसू आहे. माणसामाणसांना एकमेकांबद्दल वाटणारी ओढ आहे त्याप्रमाणे माणसांतले क्रौर्य, युद्धातील विध्वंसही आहे. संवेदनशील मन, उत्कट भावना, तरल कल्पना आणि मुख्य म्हणजे प्रसंगी इतरांच्या सुखदु:खाशी समरस होऊ शकणारी व्यापक सहानुभूती या कवितेसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी आहेत. यातलं थोडंसं जरी काही जवळ असेल तर त्यायोगे कवीला कविता सुचते आणि ती काही प्रमाणात तरी रसिकांच्या हृदयाला स्पर्शही करते.

ज्या भाषेत कवी कविता करतो तिचं उत्तम ज्ञान त्याला असलं पाहिजे आणि त्यासाठी भाषेचा अभ्यास त्यानं बारकाईने केला पाहिजे. त्याबरोबर जुन्या-नव्या कवितांचं भरपूर वाचनही त्यानं केलं पाहिजे. मुख्य म्हणजे कवितेविषयी प्रेम हवं. ज्याला कवितेविषयी असं प्रेम वाटत नाही, ज्याचं मन कोरडं आणि सहानुभूतिशून्य आहे असा महत्त्वाकांक्षी माणूस दुसरं काय वाटेल ते होऊ शकेल, तो कवी मात्र कधीही होऊ शकणार नाही. कवितेच्या संदर्भात आणखी एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. कवितेत अनेकदा एखादी भावना, कल्पना, संवेदना कवीला वाचकापर्यंत पोचवायची असते. पण कवीनं तिचं अमूर्त वर्णन केलं तर वाचकाला तिचा नीटसा प्रत्यय येणार नाही. अशा वेळी कवी प्रतिमांचा वापर करतो. प्रतिमा म्हणजे इंद्रिय संवेदनांच्या द्वारा जिचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल अशी एखादी वस्तू. उदाहरणार्थ, एखादा माणूस अत्यंत निर्दय आहे असं जर कवीला म्हणायचं असेल तर तो म्हणतो, ‘अमका तमका माणूस अगदी दगड आहे !’ या वर्णनाबरोबर दगड आपल्या डोळ्यांसमोर उभा राहातो. त्याचा थंडपणा, कठोरपणा, निर्विकारपणा आपल्याला जाणवतो आणि मग ‘दगड’ ही प्रतिमा कवीने वापरली आहे असं आपण म्हणतो. प्रतिमा या इंद्रियांच्या संवेदनांच्या द्वारा आपल्याला चटकन उमगतात. आणि कवीला वर्णन करावयाचा अनुभव साक्षात होतो. ‘दगड’ ही प्रतिमा डोळ्यांनी तशीच स्पर्शाने आपल्याला आकलन होते. त्याप्रमाणे रूप प्रतिमा, नाद प्रतिमा, श्रवण प्रतिमा काही असतात आणि त्यांच्या योगाने कवी आपली वर्णनं परिणामकारक करतो. ती थेट वाचकापर्यंत पोहोचवतो. ‘आईची माया म्हणजे अथांग सागर आहे’, ‘झरा आनंदाने हसत खिदळत नाचत चालला होता’ असं कवी कवितेतून जेव्हा सांगतो तेव्हा ‘अथांग सागर’, ‘हसत खिदळत नाचत जाणारा झरा’ या प्रतिमा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने कवीने वापरल्या आहेत असं आपण म्हणतो. प्रतिमांमुळे कवितेचं सौंदर्य तर वाढतंच. पण विशिष्ट अनुभवाचा प्रत्यय वाचकांना साक्षात आणून देण्याचं कार्यही प्रतिमा उत्तम रीतीने पार पाडतात. अलंकार, प्रतिमा यांच्या योजनेशिवायही काही कविता त्यातील उत्कट भावाभिव्यक्तिमुळे भावतात. कारण शेवटी रसनिर्मिती हेच कवितेचे प्रमुख कार्य आहे, हे आपण ध्यानात ठेवायला हवे.

***

**– शांता ज. शेळके**
प्लॉट नं.१९,आदर्शनगर,
पुणे-सातारा रस्ता, पुणे३७

# स्वदेशी, तात्पुरती आणि नेहमीची

– डॉ. गिरीश बापट

*'स्वदेशी वस्तू वापरा' अशी घोषणा आपण अनेकदा ऐकतो. त्याचा वरवरचा अर्थ आपल्याला माहिती असतो. परंतु 'स्वदेशी' या संकल्पनेविषयी अतिशय मूलभूत असे चिंतन ज्ञान प्रबोधिनीचे संचालक डॉ.गिरीश बापट यांनी आपल्यासमोर प्रकट केले आहे. जे जे भारतीय आहे ते ते जवळ करणे, दुरुस्त करणे, वाढविणे, सुधारणे आणि काढून टाकणे सुद्धा! स्वधर्म, स्वभाषा व संस्कृती इत्यादीविषयी सार्थ अभिमान बाळगणे आणि आपल्या कृतीतून जपणे हीच खरी स्वदेशीची कल्पना. या लेखातील विचार आत्मसात करून आचरणात आणण्याचा आपण सगळेच प्रयत्न करूया !*

काही महिन्यांपूर्वी एका लग्नाला गेलो होतो. कार्यालयाच्या दाराशीच पाटी लावली होती. येणाऱ्या पाहुण्यांसाठी त्याच्यावर एक सूचना होती. 'वधू-वर आहेर किंवा भेट स्वीकारणार नाहीत. त्यांना काही द्यावेसे वाटत असेल तर कार्यालयातच मांडलेल्या स्वदेशी वस्तू विक्री केंद्रातून आपल्या स्वत:साठी काही वस्तू विकत घ्यावी. त्यानेच वधू-वरांना आनंद होईल.' मी त्या विक्री-केंद्रापाशी गेलो. तिथे मांडलेल्या वस्तू बघितल्या. बहुतेक वस्तू अतिशय अनाकर्षक पद्धतीने बांधून किंवा गुंडाळून ठेवल्या होत्या. त्यांची वेष्टने आणि बाटल्या किंवा खोकी यांच्यावरची छपाई देखील फारशी लक्षवेधक नव्हती. ज्याचे वस्तूंवाचून अडले असतं. त्यानेच त्या वस्तू खरेदी केल्या असत्या किंवा ज्याने स्वदेशी वस्तूच वापरायचे ठरवले आहे त्याने त्या घेतल्या असत्या.

''स्वदेशी माल, स्वदेशी उत्पादने वापरा'' अशी मोहीम सध्या अनेकजण चालवत आहेत. साहजिकच त्याच्या विरोधी बोलणारे पण आहेत. वेगवेगळ्या वस्तू तयार करणाऱ्या परदेशी आणि स्वदेशी कंपन्या कोणत्या यांच्या याद्या अधूनमधून बघायला मिळतात. त्या आधारे चालणाऱ्या 'परदेशी वस्तू वापरू नका, स्वदेशी वस्तू वापरा.' या मोहीमेला मी 'तात्पुरती स्वदेशी' म्हणतो. कोणत्याच देशात दीर्घ काळ केवळ स्वदेशी वस्तूंचा वापर यशस्वी झाल्याचे ऐकिवात नाही. वस्तूंची गरज कमी-जास्त होते, वस्तूंची गुणवत्ता बदलते, वस्तूंच्या किंमती कमी-जास्त होतात, राजकीय परिस्थिती बदलते. या सगळ्यांमुळे




स्वदेशी वस्तूंचा आग्रह कमी-जास्त होतो. सर्वांना सर्व वेळ, सर्व वस्तू स्वदेशीच वापरणे अतिशय अवघड आहे. त्यामुळे फक्त वस्तूंच्या वापरातली स्वदेशी तात्पुरती असते.

'स्वदेशी' या विषयावर विचार सुरू होण्यासाठी 'स्वदेशी वस्तू' ही अतिशय चांगली कल्पना आहे. प्रत्येकाने जरूर कधीतरी याचा अनुभव घ्यावा. जेव्हा जेव्हा देशाच्या अस्तित्वाचा किंवा स्वातंत्र्याचा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा तेव्हा अनेक देशांनी शस्त्र म्हणून स्वदेशीचा वापर केला आहे. सर्वसामान्य लोकांना अस्तित्वासाठीच्या लढ्यात किंवा स्वातंत्र्यलढ्यात सहज सहभागी होता येईल असे हे वापरायला सोपे शस्त्र आहे. ठरवून स्वदेशी वापरणाऱ्याच्या मनात आपले कोण आणि परके कोण ही जाणीव स्पष्ट होते. कोणत्याही लढाईत आपल्या गोष्टींबद्दल प्रखर अभिमान आणि समोरच्या परक्या शत्रूविरुद्ध चीड असायला लागते. स्वदेशी वस्तू वापरण्याच्या कृतीतून देशाभिमान वाढवणारा मंत्र मिळतो. देशाच्या जीवन-मरणाच्या लढ्यात स्वदेशी महत्त्वाची ठरते. परंतु असे



स्वदेशसेवेवाचुनि दुसरा हृदयी भाव नसावा,
मनामनांतुनि असला नित संस्कार घडावा

आणीबाणीचे प्रसंग निर्माण होतात, याचे कारण मुळात देशाभिमान जागृत नसतो. देशाविषयीचा अभिमान नेहमीच मनात जागा पाहिजे. त्यासाठी फक्त वस्तूंसाठीची स्वदेशी पुरत नाही. आपल्या स्वातंत्र्ययुद्धात तर रोजच्या वापरातील मीठ या एकाच वस्तूच्या स्वदेशीचा आग्रह धरून मोठे आंदोलन उभे राहिले. देशाच्या जगण्या-मरण्याचा प्रश्न पुन:पुन्हा येऊ नये म्हणनू सोप्या, दीर्घ काळ करता येतील अशाही स्वदेशी वस्तूंशिवायच्या

कितीतरी स्वदेशी गोष्टी आहेत. तात्पुरत्या स्वदेशीकडून सर्वांनीच नेहमीसाठी स्वदेशीकडे प्रवास करायला पाहिजे.

सात-आठ वर्षांपूर्वी लातूरला मोठा भूकंप झाला. अनेक गावे उद्ध्वस्त झाली. ती गावे वसवण्यासाठी अनेक लोकांनी खूप मदत केली. पडलेल्या घरांच्या जवळपास, मोकळ्या जागेवर वेगवेगळ्या संस्थांनी नवीन घरे बांधून दिली. नवीन घरांमध्ये लोक राहायला येण्यापूर्वी काही गावांमध्ये मी रिकामी घरे बघायला गेलो होतो. सर्व घरे एकसारखी होती. एका आराखड्याप्रमाणे बांधली होती. खोल्यांची रचना आणि आकार एकसारखा. दारे, खिडक्यांचे सामान एकसारखे. सर्व घरांना रंग देखील एकसारखा. लोक राहायला लागल्यानंतर २ वर्षांनी मी पुन्हा गेलो तेव्हा मात्र बाह्यरूप सारखे असले तरी आतून मात्र प्रत्येक घर वेगळे होते. सारख्या आकाराच्या आणि सारख्या रचनेच्या खोल्यांचे आतले रंग बदलले होते. कुठे कुंकवात बुडवलेल्या पंजांचे छाप होते, कुठे हळदीतल्या पंजांचे छाप होते. काही घरांमध्ये देवादिकांच्या तसबिरी होत्या. तर काही घरांमध्ये नट-नट्यांच्या. काही घरांमध्ये आरसा होता, तर काही घरांमध्ये नव्हता. काही घरांत मातीच्या चुली होत्या तर काही घरांमध्ये गॅसच्या शेगड्या. कुठे स्टीलची भांडी होती तर कुठे पाण्याच्या कळशासुद्धा प्लॅस्टिकच्या होत्या. ज्या घरांमध्ये लहान मुले होती तिथे पसाराच पसारा, तर जिथे फक्त म्हातारा-म्हातारी राहात होते तिथे एखादी खोली पूर्ण रिकामी होती. सारख्या आकाराच्या सर्व घरांना प्रत्येक कुटुंबाने आपापल्या पद्धतीने घरपण आणले होते. घर म्हणजे नुसत्या भिंती नाहीत ही कविता अनेकांनी वाचली असेल. त्या चार भिंतींच्या आधाराने प्रत्येक कुटुंबातले लोक जे व्यवहार करतात, त्यामुळे घराला घरपण येते.

देशांचेही तसेच असते. डोंगर, नद्या, जंगले, माळराने, दगड, माती, झाडे, शेते सर्वच देशांमध्ये असतात. प्रत्येक देशातले लोक आपापल्या पद्धतीने देश सजवतात, नटवतात, तिथल्या नैसर्गिक संपत्तीचा उपयोग करतात. आपले जीवन साकार करतात. त्यातून देशाला देशपण येते. नुसता 'देश', 'आपला देश', बनतो. ज्या ज्या गोष्टींमुळे निसर्गाने तयार केलेला देश 'आपला देश' बनतो, त्या सगळ्या गोष्टी म्हणजे स्वदेशी.

देशामध्ये स्थिर काय असते? जमिनीची धूप होते. जंगले नाहीशी होतात. नवीन जंगले तयार होतात. नद्या पात्रं बदलतात. झरे आटतात. तलाव बुजतात. दरडी कोसळतात. सावकाशपणे निसर्ग बदलत असतो. ऋतुप्रमाणे देखील तो बदलतो. लोक बदलतात. जुने मरण पावतात. नवे जन्मतात. काही स्थलांतर करतात. गावे आणि शहरे मोठी होत जातात. लोकसंख्या वाढत असते. लोक नव्या वस्तू आणि पद्धती वापरायला लागतात. त्यांच्यासाठी नवे शब्द तयार होतात. जुन्या वस्तू आणि पद्धती वापरणे बंद होते. त्यांच्यासाठीचे शब्द वापरणे कमी होत जाते. काही गोष्टी वर्षा-वर्षाला बदलतात. काही पाच वर्षांनी, काही दहा वर्षांनी, तर काही शंभर वर्षांनी बदलतात. भाषा म्हणे दर पंचवीस किलोमीटरवर थोडी थोडी बदलते. तसेच दर शंभर वर्षांनीसुद्धा बदललेली दिसते. स्थळानुसार बदल होतात आणि काळानुसारही. मग सर्व बदलत असताना देशाचे देशपण कशात आहे? देश बदलतो तसे देशपण बदलते का? मग स्वदेशी नेमके कशाला म्हणायचे?

जगात अनेक गोष्टी सोयीसाठी एकसारख्या होत चालल्या आहेत. सगळे जण व्यापणाऱ्या अत्याधुनिक इंटरनेटचे नियम तर सर्व जगभर एकसारखे आहेत. कारण ते एकच ुीश्रव ुळवश ुशल (जग व्यापणारे जाळे) आहे. परंतु या जाळ्यामुळेच प्रत्येकाला स्वत:चे वैशिष्ट्य जपणारे आणि दाखवणारे होम पेज तयार करणे शक्य झाले आहे.

एकसारखेपणा सोयीसाठी आहे. पण सोय पाहणाऱ्या प्रत्येकाला आपली वेगळी ओळख टिकवून धरावीशी वाटते. छोटे देश आणि मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय संघटना आणि स्थानिक उत्सव मंडळे, देशांचे अध्यक्ष आणि पहिलीतली विद्यार्थिनी असे सगळेजण आपापले होम पेज तयार करताना दिसतात. स्वत:ला पाहिजे तशी स्वत:ची ओळख इतरांना करून देण्यासाठी या होम पेजचा ते वापर

करतात. प्रत्येकाला आपले आगळे-वेगळेपण जपून ठेवावेसे वाटते. आज जगाच्या पाठीवर जे दोनशे लहान-मोठे देश आहेत. त्यांचे त्यांचे देशपण जपून ठेवण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न म्हणजे त्यांची त्यांची स्वदेशी.

भारताची स्वदेशी म्हणजे जे जे भारतीय आहे ते ते जवळ करणे, दुरुस्त करणे, वाढवणे, सुधारणे आणि काढून टाकणेसुद्धा. आपली नखे वाढली की ती आपल्यालाच त्रासदायक होतात. त्यामुळे ती नियमितपणे कापावी लागतात. आपण वर्षा-दोन वर्षांनी घरातल्या माळ्यावरच्या वस्तू-काढून, तपासून त्यातल्या काही डबा-बाटलीवाल्याला, रद्दीवाल्याला, भंगारवाल्याला देतो आणि काही पुन्हा माळ्यावर ठेवून देतो. तसेच देशपण ठरवणाऱ्या काही गोष्टीसुद्धा विसर्जित कराव्या लागतात.

भारताचे भारतपण कशाकशांतून बनते? भारतातील शेते, बागा आणि जंगलांतून पिकणारी धान्ये आणि फळे; त्या धान्यांपासून वेगवेगळ्या पद्धतींनी बनवलेले पदार्थ यांतून आपले देशपण बनते. ही फळे, धान्ये, पदार्थ आपण ज्या रीतीने खातो त्यातून आपले देशपण बनते. जेवणाची पंगत, त्या वेळची बसायची, वाढायची पद्धत यातून आपले देशपण बनते. घरी विशेष पदार्थ बनवल्यावर आपण त्याचा नैवेद्य दाखवून जेवतो. त्यातून आपले देशपण बनते. ताट वाढताना कोणता पदार्थ कुठे आणि किती वाढायचा यातून आपले देशपण बनते. भारतातला प्रत्येक माणूस रोज जेवतो. या मातीतून जे पिकते ते तो जेवतो. अनेक पिढ्यांनी या जेवणाच्या रोजच्या आणि सणाच्या वेळच्या पद्धती ठरवल्या आहेत. त्या आपल्याला माहिती असणे, त्या कुठे वापरायच्या, कुठे किती बदलायच्या, कुठे सोडून द्यायच्या, कुठे आग्रह धरून पाळायच्या हे आपण ठरवत असतो. या पद्धतींची माहिती प्रत्येकाला घराघरांतून आणि सार्वजनिक कार्यक्रमांतून मिळते, एकमेकांचे पाहून मिळते. आपण कसे जेवतो यातूनसुद्धा आपण 'आपल्या देशाचे' की नुसतेच या देशाचे, की आज इथे आहोत म्हणून या देशाचे हे आपल्याला व इतरांना कळते.

सर्वजण करतात अशी जेवणाशिवायची दुसरी गोष्ट म्हणजे बोलणे, आपल्या गरजा, आपल्या इच्छा, आपल्या भावना, आपल्या प्रतिक्रिया, आपले विचार आपण एकमेकांना बोलून दाखवतो. सर्व लोक वापरतात ती लोकांची भाषा. एकमेकांचे ऐकून आपले शब्दोच्चार, बोलण्यातले हेल, वाक्प्रचार, अशी भाषेची वैशिट्ये घडत जातात. एकदा वसतिगृहातल्या नव्या-जुन्या विद्यार्थ्यांशी एकत्र बोलत होतो. नवे विद्यार्थी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून आले होते. त्यांपैकी एक जण अजिबात बोलत नाही, अशी बाकीच्यांनी तक्रार केली. मग एकाने हळूच सांगितले की त्याची भाषा इतरांसारखी नाही म्हणून त्याला बोलायची लाज वाटते. मराठवाड्याच्या ग्रामीण भागातून तो आला होता. त्याची बोली भाषा इतरांपेक्षा वेगळी असणारच. त्याला सांगितले की तुझी भाषा इतर कोणालाच येत नाही. त्यांनाच लाज वाटायला हवी. तुझी भाषा चांगलीच आहे. पण वेगळी आहे. ती इतरांना शिकव. त्यांची तू शीक. ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्यांना आपल्या भाषेचा संकोच वाटतो. त्यांच्यासाठी स्वदेशी म्हणजे त्यांना त्यांच्या बोली भाषेचा अभिमान वाटणे. तो अभिमान ठेवून ताठ मानेने शहरातली बोली भाषा शिकणे, सगळ्याच भारतीय भाषांचा अभिमान वाटला पाहिजे. त्या जास्तीत जास्त वापरल्या पाहिजेत. यालाच स्वदेशी म्हणायचे.

एकदा ठरवले की पाहिजे त्या भाषेत लिहिता येते. परंतु सहज उद्‌गार, संबोधन, अभिवादन, शुभेच्छा देणे यांतूनसुद्धा आपल्या देशाचे वळण जाता जाता लक्षात येते. माझ्या एका मित्राला इंग्रजीतून पत्र लिहिताना मोठ्या अधिकारी स्त्रीला नमस्कार म्हणणे फार विचित्र वाटायचे. त्याला मी म्हटले की भारतीय इंग्रजी ही वेगळीच भाषा मानतात. श्रीमती अमुक तमुक असे लिहीत जा. त्याने लिहून पाहिले. एका कारखान्याच्या प्रमुख व्यवस्थापिका महिलेने त्याला मुद्दाम कळवले की 'पत्राची अशी सुरुवात मला आवडली.' सध्या अनेकांच्या इंग्रजी पत्रांमध्ये श्री किंवा श्रीमती (असा उल्लेखही भारतीयच) आणि नमस्कार असे वाचायला मिळते. भाषा दुसऱ्यांची पण त्याला आपले वळण दिले. कारण तसे मनाला बरे वाटते. स्वदेशी बाण्याने वागलो की मनाला बरे वाटले पाहिजे. भारतीयांनी इंग्रजीत बोलतानासुद्धा Good morning /afternoon/.... म्हणायच्या ऐवजी 'नमस्कार' म्हटलेले चालते. तसेच 'जय रामजीकी' किंवा 'राम राम' असेही म्हटलेले चालते. जे अभिवादनाच्या बाबतीत तेच संबोधनाच्या बाबतीत. इतरांना हाका मारताना किंवा त्यांना उद्देशून बोलताना आपल्या भाषेतली

संबोधने वापरणे म्हणजे स्वदेशी. आनंद झाल्यावर 'हिप् हिप् हुरे' म्हणण्यामध्ये नुसतेच अनुकरण आहे. 'विजय असो', ' त्रिवार जय', 'भले शाब्बास' असा घोषणा देऊन आनंद व्यक्त केला तर तो सगळ्यांनाच कळतो; कारण ती देशी पद्धत आहे. त्यात स्वदेशी आहे.

काळ बदलतो त्याप्रमाणे आपल्या काही गोष्टी सोडून द्याव्या लागतात, इतरांच्या काही घ्याव्या पण लागतात. मराठी, हिंदी, संस्कृत भाषांची लिपी एकच आहे. ती म्हणजे देवनागरी. अक्षरांच्या बाबतीत जगातली ती जास्तीत जास्त विकसित लिपी म्हणता येईल. परंतु अंकांच्या, चिन्हांच्या बाबतीत त्यात नियमितपणा आला नव्हता. त्यामुळे जगभर प्रचलित असणारे मूळचे भारतीय अंक त्यांच्या अरबी / युरोपीय अवतारात आपल्या सरकारने स्वीकारले. ते लोकांनी आपल्या व्यवहारात अजून पूर्ण स्वीकारलेले नाहीत. कदाचित स्वीकार होईल. कदाचित आज आहेत तसे १,२,३...९,० आणि १,२,३,... ९,० असे दोन्ही प्रकार देवनागरी अक्षरांच्या बरोबर चालू राहतील. परंतु लेखनाच्या बाबतीत देवनागरी अक्षरे लवकर बदलतील असे वाटत नाही. ऋ, लृ सारखी अक्षरे कदाचित गळतील. 'ए'च्या जागी 'अे', 'उ'च्या जागी 'अु', असे बदल यंत्राच्या सोयीसाठी कदाचित होतील. पण ते आपण आपल्या सोयीने केलेले बदल आहेत. भारताच्या एकात्मतेसाठी हिंदी भाषेऐवजी देवनागरी लिपीचा जास्त उपयोग होईल, असे बऱ्याच लिपी तज्ज्ञांचे मत आहे. हा लिपीच्या विकासाचा विषय कधीतरी समजून घेण्यासारखा आहे. आपली स्वाक्षरी आपल्या लिपीतच करणे एवढे तर नक्की आपण करू शकतो. हा आपल्या लिपीचा अभिमान आणि आनंदाने, आग्रहाने वापर म्हणजे सुद्धा स्वदेशीच.

आपल्या समाजात बऱ्याच रूढी आहेत. वाहते रक्त साकळते तशा रूढीही साकळतात. त्यात अर्थ वाटेनासा होतो. साकळलेल्या रक्ताची खपली तयार होते. आतून जखम भरली की खपली पडून जाते. हे अगदी नैसर्गिक आहे. रूढी साकळल्या की नवीन रूढी पाडायला लागतात. नव्या रूढी लोकांनी मानल्या तर जुन्या रूढी खपलीसारख्या गळून पडतात. जिवंत शरीराच्या जखमांवर खपली तयार होते आणि गळून पडते. मृत शरीरावरच्या जखमांवर नाही. तसेच स्वतंत्र, स्वाभिमानी म्हणजेच जिवंत समाजातच जुन्या रूढी गळून नवीन रूढी तयार होतात. आपल्या बुद्धीने, आपल्या वेगाने, आपल्या पद्धतीने रूढी बदलणे म्हणजे स्वदेशी; इतरांच्या बुद्धीने, इतरांच्या वेगाने, इतरांच्या पद्धतीने रूढी बदलणे म्हणजे गुलामगिरी.

हे एकदा लक्षात घेतले म्हणजे आपले कपडे, आपली पूजा-पद्धती, आपले पंचांग, आपली वास्तु-कला, आपले खेळ, आपले संगीत, आपले सण, आपले उत्सव, आपली चित्रकला, आपला इतिहास, आपली शिक्षण-पद्धती, आपल्या निवडणुका, आपल्या ग्राम-पंचायती, आपल्या जात-पंचायती हे सगळेच आपले आहे. म्हणून टिकवण्याची, बदलण्याची, वगळण्याची आणि वाढवण्याची आपली जबाबदारी लक्षात येईल. एवढे केले तर स्वदेशी वस्तूसुद्धा आपोआप वापरल्या जातील. स्वदेशी वस्तू वापरणाऱ्यांनी हळूहळू या सर्व गोष्टींमधली स्वदेशी आपल्या जीवनात आणली पाहिजे.

या स्वदेशीमध्ये इतरांचे अनुकरण केलेले चालते. पण ते शिकण्यासाठी करायचे, बरोबरीच्या नात्याने करायचे. आपण कमी, किंवा आपले देशपण कमी म्हणून नाही. आपले शास्त्रज्ञ असे बरोबरीच्या नात्याने इतरांकडून विज्ञान शिकले म्हणून अनुकरणाने सुरुवात करून ते ते विषय त्यांनी आपले बनवले. आज आपली अणुशक्ती आणि आपली अंतरिक्ष-शक्ती आहे. ही विज्ञानातली स्वदेशी. इतरांकडून बरोबरीच्या नात्याने घेऊ. कोणी दिले नाही तर आमचे आम्ही तयार करू. कोणी केले नाही असे नवे निर्माण करू. हा स्वदेशी बाणा जसा विज्ञान क्षेत्रात दिसतो तसा प्रत्येक क्षेत्रात दिसू शकतो; प्रत्येकजण दाखवू शकतो.

इतरांचे अनुकरण करण्याआधी, घाईघाईने काही वगळण्यापूर्वी, नवीन काही सुरू करण्यापूर्वी, जे आपल्या वाड-वडिलांनी सांभाळले आणि वाढवले, त्यातले जेवढे जमेल ते समजून घेतले पाहिजे. काही वर्षे त्यांचा अनुभव घेतला पाहिजे. अनुभव घेतला की मग बदलण्याचा अधिकार आपल्याला मिळेल. विद्यार्थी असताना सर्वप्रथम आपले देशपण कशाकशात आहे आणि ते कसे टिकवायचे हेच प्रत्येकाने शिकले पाहिजे. हीच नेहमीसाठीची स्वदेशी.


***

- डॉ. गिरीश बापट
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.

# आई माझं चुकलंच!

– लीला दीक्षत

*आपटे सर मुख्याध्यापकांच्या केबिनमध्ये त्या तिघांना घेऊन आले.*
*''सर, रघू, जगू आणि सुदेश तिघांनाही कॉपी करताना पकडलंय.''*
*''सुदेशसुद्धा ?''*
*सुदेश आणखीच रडू लागला. त्याला ब्रह्मांड आठवलं. रघू आणि जगू त्याच्याकडे रोखून पाहात होते. काय करावं बरं? आणि एकदम त्याला बाबा आठवले. लहानपणी सुदेश एकदा खोटं बोलला होता तेव्हा त्यांनी समजावून सांगितलं होतं. ''हे पाहा सुदेश, एक खोटं लपविण्यासाठी शंभर खोटं करावं लागतं ! त्यापेक्षा सत्य सांगून जी शिक्षा होईल ती भोगणं शहाणपणाचं !''*
*आणि एकदम त्याला बळ आलं; सत्य सांगून टाकायचं !*



असं व्हायला नको होतं. परन्तु झालं होतं खरं ! कारगिलच्या युद्धात सुदेशच्या बाबांना वीरमरण आलं. साऱ्या कुटुंबावर आभाळच कोसळलं. युद्धाला सुरुवात झाली तेव्हा बाबांचं पोस्टिंग लेहला झालं. आई सुदेशला घेऊन नाशिकला आली. नाशिकला सुदेशच्या बाबांचं घर. तिथे सुदेशची आजी होती, आजोबा होते आणि एक दिवस दुपारी ती बातमी आली – ''कॅप्टन रमेश साखळकर यांना वीरमरण लाभले.''

रमेश शाळेतून घरी आला. गावातील अनेक माणसे आजोबांच्या अंगणात जमली होती. सुन्न झालेले आजोबा झोपाळ्यावर बसले होते. सुदेश घरात पळाला. आणि आईच्या गळ्यात पडून हमसून हमसून रडू लागला. आजी रडत होती. सारं माजघरच रडत होतं. त्याला काही सुचेना. दुसऱ्या दिवशी सायंकाळी पेटीमधून बाबा आले. ते सारं दृश्य पाहून सुदेश हादरला, बावरला. खूप खूप रडला.

त्याला असा रडताना पाहून शेजारचे सानेकाका त्याचे डोळे पुशीत म्हणाले, ''हे पाहा, सुदेश, झालं ते खूप भयंकर. पण तुला शहाणं व्हायला हवं.''

सुदेशनं मनात विचार केला शहाणं व्हायचं म्हणजे काय करायचं बुवा ! परन्तु त्यानं डोळे पुसले. तो जरा शांत झाला.

नंतरचे सारे सोपस्कार त्यानं पाहिले. डोळ्यांतून अश्रुप्रवाह अविरत वाहात होता. पण त्याचा नाईलाज होता.

नंतरचे आठ दिवस माणसं सारखी भेटायला येत होती. सुदेशला हे सारं पाहताना मनात निराशा दाटत होती. त्याची शाळाही बंद झाली होती. आता दिल्लीचे आपले मित्र – रोहन, सुकुमार, रंजिता, सोहम्, इस्माइल. कोणीच आपल्याला भेटणार नाहीत. आता आपण कुठल्या शाळेत जाणार? कुणाबरोबर खेळणार ? कोण मित्र आपल्याला मिळणार? कितीतरी प्रश्नचिन्हं त्याच्या चिमुकल्या मनात दाटत. मनात विचार करकरून गुंता होऊन जाई. बाबा जाऊन दहा–बारा दिवस झाले आणि शेजारचे सानेकाका घरी आले. सुदेश अंगणातल्या ओटच्यावर बसून आभाळ न्याहाळत होता. काका म्हणाले– ''सुदेश, आज आपल्याला शाळेत जायचंय.''

''कुठल्या शाळेत ?''

''नेताजी सुभाषचंद्र सेंट्रल स्कूल.''

''पण काका माझे सारे मित्र दिल्लीला...''

''अरे सुदेश. इथे मित्र मिळतील ना तुला. आणि हे बघ, आता शहाण्यासारखं वागायचं. आजी–आजोबांना केवढा धक्का बसलाय तुझ्या बाबांच्या जाण्यानं. आई आता इथंच राहणार. त्यांना सांभाळायला हवं ना ! तुला आवडतात ना आजी–आजोबा?

''खूप !''

''मग झालं तर ! आणि आईला पण इथं नोकरी मिळण्याची शक्यता निर्माण झालीय कॉलेजमधे.''

इतक्यात सुदेशची आई घरी



आली. तिने भरलेला फॉर्म आणि पैसे सानेकाकांच्या हातात दिले. मन भरून आलं -

''काका....''

''हं.. समजलं मला सारं. तू

काळजी करू नकोस. मी पाहतो सारं.''

खरं म्हणजे मीच जायला हवं. पण आईंना आणि मामंजींना सध्या तरी एकटं नाही ठेवता येणार मला.''

''मी पाहतो सारं आणि मी मोकळाच आहे. मी नेतो सुदेशला.'' - सानेकाका म्हणाले.

आणि सुदेशचा शाळेत प्रवेश झाला. तो शाळेत जाऊ लागला. पहिल्या दिवशी मराठीचे आपटे सर आले. त्यांनी सर्व मुलांची चौकशी केली. सुदेशचा नवीन चेहरा त्यांनी पाहिला. ते म्हणाले-

'बाळ, नाव काय तुझं ?''

''सुदेश''

''कुठल्या शाळेतून आलास ?''

''सर मी दिल्लीला होतो, सेंट्रल स्कूलमधे.''

''बाबांची बदली झाली नाशिकला ?''

सुदेशचे डोळे भरून आले. आपटे सर त्याच्याजवळ आले. त्याच्या पाठीवरून हात फिरवला.

''सर मला वडील नाहीत. वारले नुकतेच.''

''काय झालं बाबा इतक्या लहान वयात....''

''कारगिलच्या युद्धात .....'' सुदेशला पुढे बोलवेना.

आपटे सर सारं समजले.

''असू दे ! असू दे ! अरे सुदेश, तू मुळीच रडता कामा नये. तू तर पराक्रमी वीरपुरुषाचा मुलगा ! पूस पाहू डोळे.''

''किती मार्क मिळाले तुला पाचवीत ?''

''सर, नव्वद टक्के मार्क मिळाले मला. मी वर्गात पहिला आलो.''

''आपटे सर खूश झाले. सारी मुले कौतुकाने सुदेशकडे पाहू लागली. सुदेशच्या बाकावर शेजारी कोणीच नव्हते. वर्गात शेवटच्या बाकावर बसलेले जगन आणि रघू दोघेही सुदेशच्या शेजारी येऊन बसले. आपटे सरांच्या नजरेतून हे सुटले नाही. पण मनी म्हणाले,''पाहू या. सुदेशच्या संगतीने जगू आणि रघू सुधारले तर !''

वर्ग सुरू झाला. आपटे सरांनी कवितेला सुरुवात केली. 'वेडात मराठे वीर दौडले सात' सरांनी संपूर्ण कविता अशी जोशात वाचली की सारा वर्ग चिडीचुप होता. इतक्यात कोपऱ्यातून आवाज आला --''टप् टप् टाप् टाप् ''

सरांनी दरडावून विचारले.---

''कोण करतंय आवाज ?''

सुदेश उठून म्हणाला -''सर, माझ्या शेजारची ही मुले खाली मान घालून आवाज करताहेत घोड्यांच्या टापांचा.''

सारी मुले अवाक् झाली. आजपर्यंत रघू आणि जगूने किती दंगा केला तरी कुणाची शामत नव्हती त्यांची नावं घ्यायची. आता आपले नावच घेतले तर बाजू सावरायला हवी. रघू म्हणाला -

''सर, वेडात मराठे वीर दौडले सात... ते घोड्यावरून ना ? मी वातावरण निर्मितीसाठी टापांचा आवाज केला.''

वर्गातील खट्याळ मुले फिसकन् हसली. शिक्षा म्हणून जगू आणि रघूला आपटे सरांनी उभे केले.

त्यांना त्याचे फारसे काही वाटले नाही.

तास संपला. आपटे सर निघून गेले. साऱ्या मुलांनी श्वास रोखले. आता सुदेशचे काही खरं नाही. जगू आणि रघूच्या तावडीत आता सुदेश सापडणार ! पण आश्चर्य म्हणजे तसे काहीच घडले नाही. गणिताचे सर वर्गात आले आणि परत तास सुरू झाला.

रघू आणि जगू दोघेही बेरकी होते. वर्गातील सारी मुले अकरा वर्षांची होती. परन्तु हे दोघेही तेरा

वर्षं पूर्ण झालेले होते. एकेका वर्गात दोनदा आपटी खाऊन पुढे सरकत होते. दोघांची वर्गात जरब होती एवढेच नव्हे तर शाळेतील मुलेही त्यांना टरकून असत. बिचारा सुदेश या दोघांच्या तावडीत सापडला म्हणून वर्गातील गुणी मुले नुसती हळहळत होती. या साऱ्याचा सुदेशला काहीच पत्ता नव्हता. जगू आणि रघू चाणाक्ष होते. त्यांनी विचार केला. हा सुदेश नवीन आहे. आपल्याबद्दल त्याला फारशी माहिती नाही आणि मुख्य म्हणजे तो हुशार आहे. आपल्याला त्याची खूप मदत होण्यासारखी आहे. फक्त त्याला मथवायला आपल्याला जमले पाहिजे.

गणिताचा तास संपल्यावर जगूने सुदेशच्या गळ्यात हात टाकला.

''चल, आपण तिघे एकदम डबा खाऊ.''

सुदेश जरा वरमला. ''जगन तुला शिक्षा व्हावी म्हणून नाही मी सांगितलं नाव. सॉरी हं....''

''शिक्षेचं काय एवढं ?''

''नाही कसं ? पण सर वर्गात शिकवत असताना असं करणं...''

''बरं नव्हे'' रघू साळसूदपणे म्हणाला.

सुदेशला जाळ्यात पकडायला त्याचा विश्वास संपादन करायलाच हवा. सुदेशला वाटले दोघांना खरंच आपली चूक पटली असावी. तिघांनी झाडाखाली बसून डबे उघडले. एकमेकांना खाऊ दिला.

सर्व मुलांच्या आश्चर्याचा विषय होता सुदेशची आणि जगू-रघूची मैत्री. सुदेश खूप हुशार होता. थोडा साधाही होता. कुठलीही गोष्ट त्याला सहज पटत असे.

एक दिवस सुदेश आणि त्यांच्या शेजारचा रमण रमतगमत घरी चालले होते. रघू नेहमी गाडीतून शाळेत जायचा अन् यायचा. त्याने दोघांना पाहिले व सुदेशला गाडीत घेतले. त्याला वाटलं, आपल्यामागून रमण गाडीत बसेल. पण गाडी सुरू झाली होती. सुदेशला थोडे चमत्कारिक वाटले.

''आज आमच्या घरी आईस्क्रीम केलंय. ते खाऊ आणि ड्रायव्हर सोडील ना तुला घरी.''

काय करावं बरं ! आपल्याला आईस्क्रीम खूप खूप आवडतं हे आपणच एकदा रघू आणि जगनला म्हटले होते. आईस्क्रीमच्या कल्पनेने सुदेशचे डोळे चमकले. बाबा गेल्यापासून सारी मजा संपली होती. कितीतरी दिवसांत त्यानं आईस्क्रीम खाल्लं नव्हतं. सिनेमा पाहिला नव्हता. हॉटेलात तर तो गेलाच नव्हता. आईकडे कधी हट्ट केला की ती फक्त रागवयाची. म्हणायची,

''सुदेश, आपली परिस्थिती तुला कळायला हवी !'' आईचंही हल्ली सारं बदललंय. पूर्वी किती लाड करायची ? ती हल्ली अशी का वागते? बाबा गेल्याचे मला पण वाईट वाटतंच की ! म्हणून काय गम्मत करायचीच नाही ! सुदेशला विचाराच्या तंद्रीत पाहून रघू म्हणाला-

''अरे विचार कसला करतोस? चल उतर. घर आले माझे.''

रघूच्या घरी सुदेश प्रथमच येत होता. रघूचे घर अलिशान होते. घरात गेल्या गेल्या त्याने कपडे कोचावर भिरकावले. बूट काढून टाकले आणि शेजारीच दप्तर फेकले. रघूचे हे वागणे सुदेशला आवडले नाही. पण श्रीमंत मुले अशीच वागत असणार, आपल्याला काय त्याचे ?

मग मात्र सुदेश खुशीत आला. पोटभर बटाटे वडे आणि आईस्क्रीम खाणे झाले. खाऊन झाल्यावर सुदेशपुढे गणिताची वही करीत रघू म्हणाला - ''सुदेश, माझी उद्याच्या गृहपाठाची गणितं करशील ?''

''वा रे वा ! गणिताचा सराव म्हणून गणिताचा गृहपाठ असतो.''

''काय आहे. मला वेळ नाहीये. आज रात्री आम्ही सिनेमाला जाणार ना आणि उद्या शनिवार. वेळ तरी केव्हा होणार?''

रघूने चक्क थाप मारली. मग मात्र सुदेशचा नाईलाज झाला. मित्र म्हणून एक दिवस अशी मदत करायला काय हरकत आहे ! असा त्याने विचार केला आणि रघूची वही उचलली. आता घरी जायला हवं. आजी वाट पाहात असेल. तो घरी आला. आईस्क्रीमची चव अजून तोंडावर रेंगाळत होती. आजीने खायला विचारले. सुदेशने भूक नाही म्हणून सांगितले.

''भूक नसायला काय झाले?''

''नाही भूक म्हणजे नाही.'' सुदेश कावून बोलला. आपले बदललेले जीवन त्याच्या अंगवळणी अजून पडत नव्हते. दिल्लीचं घर केवढं मोठ्ठं होतं. इथे तीन खोल्या. उरलेल्या तीन खोल्या भाड्याने दिलेल्या. आजी-आजोबांना सोबत हवी म्हणून. त्याला बाबांची खूप



कधी असे कधी तसे तर कधी भलतेसे,
एका भ्रमसंदर्भात मन गुंतलेसे माझे।

आठवण झाली. का बाबा गेले असे? त्याचा चेहरा कसानुसा झाला. दप्तर घेऊन तो आत गेला आणि गृहपाठ करू लागला.

आजीचा समज झाला सुदेशला बरे नसावे. इतक्यात आई आली. सुदेशला वाटले आई आल्या आल्या आपली चौकशी करील. पण तसे झाले नाही. सुदेशच्या मनात आले बाबांच्या जाण्याने आईचे प्रेम -- त्याला रडून कोसळले. आजीने केलेला चहा आई प्याली. आईचा त्याला रागच येऊ लागला होता. तो उठला. पुस्तकं-वह्या आवरल्या आणि काही न बोलता रमणकडे खेळायला निघाला. आई म्हणाली,

''सुदेश, खाल्ले का नाहीस---- आजी म्हणत होती.''

''म्हणत होती ना --- बस्स झाले. मला भूक नाहीये आणि भूक नसली की खाल्लेच पाहिजे का ?'' सुदेशचा आवाज जरा चढला होता.

''अरे तिरसटायला काय झालं एवढं ?''

सुदेश काही बोलला नाही. दडदड जिना उतरून तो रमणकडे खाली गेला. जिना उतरताना त्याच्या मनात विचार आला. आपण कधी खाल्लं नाही तर आई किती प्रेमानं म्हणायची ''खा रे राजा'' आणि आज मलाच ओरडतेय, तिरसटायला काय झालं?

रात्र झाली. सुदेशने फक्त भात खाल्ला व तो झोपला. दुसऱ्या दिवशी शाळेत जाताना आई म्हणाली--

''अरे सुदेश, एन.सी.सी. ची चौकशी केलीस का तू ? किती दिवस सांगतेय. दिल्लीला तू एन.सी.सी.त जात होतास ना ?''

''दिल्लीला खूप गोष्टी होत्या आई. इथे आहेत ?''

आई काही बोलली नाही. सुदेशने दप्तर उचलले आणि तो शाळेत गेला. शाळेत गेल्या गेल्या रघूने विचारले ---

''केलीस गणितं...कुठाय वही?''

सुदेशने वही रघूच्या हातात दिली. रघू खूश झाला. म्हणाला - ''सुदेश, तुला ट्रीट देणार आहे आज.''

''ट्रीट कशाला? मित्राला मदत हवीच करायला.''

''आज आपण सिनेमाला जायचं. आपली तिघांची तिकिटेसुद्धा काढली आहेत. तू, मी आणि जगन.''

''अरे बापरे ! शाळा बुडवून मी नाही बाबा येणार !''

''शाळा कशाला बुडत्येय. तीनचा तर सिनेमा. दोन तासच तर बुडतील.''

हो-नाही करता शेवटी सुदेश तयार झाला आणि मधल्या सुट्टीनंतर ही तिक्कल शाळेच्या गेटमधून बाहेर पडली. सिनेमा पाहून सुदेश खूश झाला. जवळजवळ सात-आठ महिन्यांनी तो सिनेमा पाहात होता. अमिताभचा अभिनय पाहून तो अगदी खुशीतच घरी परतला. घरी येईतो सात वाजले होते. आई पण घरी आली होती. तिने विचारले...

''सुदेश, रमण साडेपाचलाच आला. तू कुठे गेला होतास ?''

अरे बापरे! आईला सांगावं तरी कसं? एक विचार आला सरळ सांगून टाकावं, मित्रांबरोबर सिनेमाला गेलो! पण छे! नकोच. न सांगता गेलो म्हणून आई रागावणार आणि त्याला एकदम आठवलं...तो म्हणाला-


''आई, तूच नव्हतं का सांगितलंस. एन.सी.सी.ची चौकशी करायला.''

''त्याला एवढा वेळ?''

''अग सर परेड घेत होते. म्हणून थांबायला लागलं.''

सुदेशने बेमालूम थाप मारली आणि तो खाऊन खाली पळाला.

एक दिवस मुख्याध्यापकांनी





दूर जाती परतती अशा तेढ्यामेढ्या वाटा,
पुढे पाऊल टाकता कधी फूल कधी काटा.

सुदेशला ऑफिसमध्ये बोलावले. ''सुदेश, तू हल्ली जगू आणि रघू-बरोबर असतोस. त्यांची संगत बरी नव्हे ! परवाच्या गणिताच्या परीक्षेत तुला नव्वद मार्कच मिळालेत. तुझे शंभर मार्क कधी चुकले नाहीत, असे तुझी आई म्हणत होती.''

अरे बापरे ! मुख्याध्यापकांना खूपच माहिती दिसत्येय आपली. पण वेळ मारून नेणे महत्त्वाचे होते. सुदेश म्हणाला -

''सर ! आता मी चांगला अभ्यास करीन.''

मुख्याध्यापकांच्या खोलीतून बाहेर पडताना जगनने सुदेशला नेमके पाहिले. तो म्हणाला -

''काय सुदेशऽ, काही विशेष?''

''काही नाही रे, गणितात दहा मार्क कमी पडले...''

''पण नव्वद पडले की ! या

मास्तरला कधी समाधानच नसते बघ.''

सुदेशला सरांचा एकेरी उल्लेख तसा आवडला नाही, पण जगन म्हणतो ते काय खोटे आहे ! दहा मार्क कमी मिळाले तर ऑफिसमध्ये बोलावून---

''आणि सुदेश, आणखी कान टोचले की नाही आमच्याबद्दल...'' सुदेशला काय बोलावे ते समजेना. त्याने ठरवले याबद्दल दोघांना न सांगितलेले बरे! माझ्याशी तर दोघे प्रेमाने वागतात.

वार्षिक परीक्षा जवळ आली. सुदेश अभ्यासाला जास्त वेळ देऊ लागला. तरी परत एकदा जगनने सुदेशला ओढून सिनेमाला नेलेच. मित्राकडे अभ्यासाला जातो, अशी थाप त्याने आजीला मारली. आता थापा मारणे त्याच्या अंगवळणी पडले होते. अधून-मधून सिनेमाही पाहावा असे त्याला वाटेच.

वार्षिक परीक्षा सुरू व्हायला दोन दिवस होते. जगनने आज खास सुदेशसाठी भरपूर काजूकतली आणली होती.

''सुदेश, परवा गणिताच्या पेपरला तू आम्हाला मदत करायचीस.''

''म्हणजे काय करायचे ?''

जगन हसत म्हणाला, ते तुला रघू सांगेल. रघू शेजारीची झाडावर एक हात टेकून उभा होता. दुसरा हात त्याच्या खिशात होता.

''सुदेश तुझे आडनाव काय?''

''कमाल झाली तुझी रघू. साखळकर. आडनावाचे आजचं का ?''

''तीच तर गोम आहे. माझं आडनाव सोळंकी आणि जगूचं आडनाव सोळकर.''

''त्याचं काय?'' सुदेशचा भाबडा प्रश्न. ''परीक्षेत तुझ्या मागे आमचे दोघांचे नंबर असतात.'' ''माहीत आहे मला. सहामाहीत तसेच होते की !''

''पण आता तू आमचा पक्का मित्र आहेस आणि मित्राला मदत करणं हे तुझे कर्तव्य आहे.'' जगू आणि रघू एकदमच म्हणाले.

सुदेश भांबावला. त्याने दोघांकडे पाहिले. कधी नव्हे ते विलक्षण बेरकी भाव दोघांच्या डोळ्यांत होते.

सुदेशने चाचरत म्हटलं ... ''परीक्षेत मदत करायला मला नाही हं जमणार'' ''नाही कसं जमणार?'' रघूने हाताची बाही नुसती वर केली.

''थांब रे रघू... त्याला घाबरवू नकोस.'' जगू म्हणाला.

आपण मित्र म्हणून समजलेल्या आपल्या मित्रांचे वेगळेच रूप सुदेश पाहात होता. तो धीर करून म्हणाला...

''रघू, परीक्षा म्हणजे आपण केलेल्या अभ्यासाची चाचणी ना ! मग तिथे आपली मदत आपणच स्वत:ला करायची. मी कशी मदत करणार ?''

''उगाच शहाणपणा नको शिकवू.'' जगनचा आवाज चढला होता.

''हे पाहा सुदेश. अगदी सोपे आहे मदत करणे !''- रघू म्हणाला.

''सोपे ? ते कसे काय ?'' सुदेशने भीत भीत विचारले.

''हे पाहा सुदेश. गणितांमध्ये गाळलेल्या जागा असतात. एका प्रश्नात उत्तर द्या, असा प्रश्न असतो. पर्यायांची निवड असणारा प्रश्न असतो. हो की नाही ?''

''त्याचं काय ?''

''हे प्रश्न तू प्रश्नपत्रिका हातात आली की प्रथम सोडवायचेस. तू तर हुशार. तासातच तुझे प्रश्न लिहून होणार.''

''मग ?''... सुदेशने पुन्हा भीत भीत विचारले.

''पुढचा पेपर तू नवीन पुरवणीतच सुरू करायचास आणि ही पुरवणी खाली टाकायची.''

''अरे बाप रे ! का म्हणून ?''

''मागे असलेला रघू ती पटकन् उचलेल.''

''आणि सरांनी पाहिलं तर .''



आईची माया ज्यांना भरवाया घास
काय कमी त्यांना, सुखी ते जगामध्ये खास.

''काही पाहात नाहीत. कशी उचलायची ते आम्ही पाहू. काय?''

''नाही बुवा--- हे असं म्हंजे?''

''आता तुला चौदावं रत्न दाखवू की काय ?''-- जगन बाही सरसावीत म्हणाला. सुदेश घाबरला. रमणबरोबर शाळेतून घरी येताना रमण आपल्याला सारखं सांगत असतो जगू आणि रघूबद्दल, ते खरंच असावं. त्यांच्या गोड गोड बोलण्यावर तू जाऊ नकोस, असं रमण मला सारखंच बजावीत असतो. गेल्या वर्षी रघूला आणि जगूला दोन मुलांना बेदम मारलं म्हणून शाळेतून काढून टाकण्याची वेळ आली होती, असंही रमण एकदा म्हणाला होता. दोघांचे वडील खूप श्रीमंत आणि मातब्बर म्हणून प्रकरण मिटलं म्हणे. जगनचा तो सारा अवतार पाहून सुदेशच्या डोळ्यांपुढे रमणने सांगितलेले चित्र उभे राहिले.

सुदेशला गप्प पाहून जगन बेदरकारपणे म्हणाला -

''मग काय ठरलं तुझे ?''

काय बोलावं तेच सुदेशला सुचेना. जगन परत म्हणाला- ''सुदेश बऱ्या बोलाने आम्ही सांगतो तसं वाग. नाही तर....नाही तर. मी तुझा उजवा हात अस्सा पिरगाळीन की तू पेपर लिहिणंच शक्य नाही.''

''मी सरांना सांगेन.''

''पण सांगून काय उपयोग रे ! हात सुजलेला लगेच सर का दुरुस्त करणार ! परीक्षा हुकणार बघ तुझी!''

जगनने सुदेशचा उजवा हात गच्च पकडला. सुदेश समजला. या दोघांचं म्हणणं मान्य करण्यावाचून गत्यंतर नाही.

रघूने सुदेशचा हात जगनच्या हातातून सोडवला आणि म्हणाला.

''सुदेश, घरी जाऊन आईला सांगितलंस तर तू आमच्या बरोबर शाळा

बुडवून सिनेमा पाहातोस, हॉटेलमध्ये

येतोस, घरातले पैसे चोरतोस...''

''पैसे चोरतोस ? कधी चोरले मी पैसे ?'' सुदेश म्हणाला.

''मग सिनेमा कसा पाहिलास?''

''तुम्ही तिकिटं काढलीत की माझी.''

''पण आम्ही तुझ्या आईला असंच सांगणार. सुदेश घरातले पैसे चोरून आमच्याबरोबर सिनेमाला येतो.''

सुदेशला काही सुचेना.

मधली सुट्टी संपल्याची घंटा झाली. जगू-रघू वर्गात गेलेच नाहीत. सुदेश वर्गात गेला. पण तो प्रचंड अस्वस्थ होता. शाळा सुटल्यावर तो

रमणबरोबर घरी निघाला. शेवटी रमण म्हणाला, ''सुदेश, बरं नाही का तुला?''

रमणला सांगावं का सारं ? पण नकोच. तो काहीच बोलला नाही. घरी आला. दप्तर जागेवर ठेवून तो गॅलरीत उभा राहिला.

तो काहीच न खाता पिता अभ्यासाला बसला. पण अभ्यासातही मन लागेना.

आई आली. सुदेशला वाटलं. सारं आईला सांगून टाकावं ! पण नकोच. बाबा गेल्यावर आई किती दुःखी आहे आणि आपण चोरून सिनेमा पाहिला दोन-तीन वेळा हे तिनं ऐकलं तर तिला धक्काच बसेल. छे ! बाबा गेल्यानं हा सारा घोळ झाला. बाबांच्या आठवणीनं त्याचे डोळे भरून आले.

रात्री जेवून सुदेश लवकरच झोपला.

दुसऱ्या दिवशीही तो अस्वस्थच होता. शेवटी घरी आल्यावर आईनं विचारलं-- ''सुदेशऽ काय झालंय? उद्या गणिताचा ना पहिला पेपर ? अभ्यास झालाय ना ? शंभरपैकी शंभर गुण मिळाले पाहिजेत.''

सुदेश मनात म्हणाला - कसं सांगावं आईला ! आई, प्रश्न तो नाही ग --- मार्क नक्की शंभरच --- पण त्याच्या मनाचा विलक्षण गुंता झालेला होता. तो काहीच बोलला नाही. नुसतंच बळे बळे हसला. आईला जरा बरं वाटलं. ती समजली, उद्याच्या पेपरच्या विचारात आहे सुदेश !

आईनं सुदेशची परीक्षा म्हणून रजा घेतली होती. सुदेश जेवून दहा वाजता रमणबरोबर शाळेत गेला. वाटेत तो रमणशी फारसं बोलला नाही. घंटा झाली. सर्व मुलं वर्गात बसली. सुदेश जागेवर बसला. जगू आणि रघू वर्गात आले. सुदेशजवळून जाताना रघू हळूच पुटपुटला ''लक्षात आहे ना?''

आपटे सर वर्गात आले.

सर्वांना उत्तरपत्रिका वाटून झाल्या. परत घंटा झाल्यावर आपटे सरांनी आणि बेलोसे बाईंनी सर्वांना प्रश्नपत्रिका दिल्या. मुलं पेपर सोडवण्यात दंग झाली. तास व्हायला आला. सुदेश चटाचट उत्तरं लिहीत होता. आपटे सर आणि बेलोसे बाई वर्गात चकरा मारीत होते. इतक्यात रामू शिपाई वर्गावर नोटीस घेऊन आला. टेबलापाशी खुर्चीवर बसून आपटे सर नोटीस वाचत होते.

सुदेशमागे बसलेल्या जगूने पाय लांब करून सुदेशच्या पायाला आपल्या पायाच्या अंगठ्याने चिमटा घेतला. स्ऽ स्ऽ करीत सुदेश खाली वाकला. या गडबडीत बेंचवरची उत्तरपत्रिका खाली पडली आणि नेमकी जगूने ती उचलली. बेलोसे बाई नेमक्या पाठमोऱ्या असताना हे घडलं. पहिली उत्तरपत्रिका संपत आल्याने सुदेशने पुरवणी घेतली होती. म्हणून बरे ! त्याने ती चटकन खालून वर काढली. त्याच्यावर नंबर, विषय तो नोंदवीत होता. सुदेश अत्यंत अस्वस्थ होता. बेलोसे बाईंच्या लक्षात सुदेशची अस्वस्थता आली. त्यांनी विचारलं- ''सुदेश, पाणी हवंय का ?''

''नको मॅडम.''- सुदेश म्हणाला आणि पेपर लिहू लागला. सारा प्रकार पलिकडच्या मुलांच्या लक्षात आला होता. पण रघू आणि जगूच्या भानगडीत पडणार कोण ? आपणच उठून आपटे सरांना सर्व सांगावे,

असाही विचार सुदेशच्या मनात आला.

पण रघू आणि जगूची तंबी आठवली-''हे बघ, आईला सांगू, शाळा चुकवून सुदेश सिनेमाला येत होता.सुदेश घरातील पैसे चोरून हॉटेलात जात होता.''

बाप रे ! आईची काय अवस्था होईल हे ऐकून. वेळ तर जोरात पळत होता. उरलेला पेपर सोडवणं महत्त्वाचं होतं. सुदेश पुढचा पेपर सोडवू लागला. जगूने अर्ध्या तासात सुदेशचा पेपर कॉपी केला आणि मागे रघूला चटकन दिला. पण हायरे दुर्दैवा ! नेमकं त्याच वेळी आपटे सरांनी ते पाहिलं. ते पुढे आले. त्यांनी रघूचे पेपर पाहिले.

''तुझ्याकडे दोन पेपर कसे ?''

''रघूऽ मी तुला विचारतोय.'' आपटे सरांचा आवाज चांगलाच चढला. त्यांनी दुसरा पेपर पाहिला. सुंदर मोत्याच्या दाण्यासारखं अक्षरं नीटनेटकेपणा असलेला तो पेपर त्यांनी तात्काळ ओळखला. पेपर सुदेशचा होता. ते सुदेशकडे वळले. सुदेश रडत होता आणि सदऱ्याच्या बाहीने तोंड पुसत होता.

''सुदेशऽ, तुझा पेपर रघूकडे कसा ?''

''सर--- पेपर खाली--- सुदेशला पुढे बोलवेना.

''पेपर खाली पडला तर मला सांगायचं. बेलोसे बाईंना सांगायचं आणि तुझा पुष्कळसा पेपर रघूने उतरून काढलाय याचा अर्थ पेपर पडून खूप वेळ झालाय.''

सुदेशचं रडणं वाढलं. वर्गातील हे नाट्य सर्व मुलं पाहू लागली. आपटे सरांनी निर्णय घेतला. इतर मुलांना पेपर लिहायचा आहे. आपटे सर म्हणाले --

''बाई, या दोघांचे पेपर घ्या ताब्यात. मी या दोघांना घेऊन मुख्याध्यापकांकडे जातो.''

रघू बेरकी. तो म्हणाला ''सर, जगूने पण---''

जगूने त्याही परिस्थितीत रघूवर हात उगारला. जगूचा पेपरही बेलोसे बाईंनी उचलला. तिघांची वरात वर्गाबाहेर निघाली. जगू आणि रघू मख्ख होते. सुदेश पुरता घाबरला

होता. रडत होता. धरणी आपल्याला पोटात घेईल तर बरं अशी त्याची अवस्था.

मुख्याध्यापकांच्या केबिनमध्ये आपटे सर तिघांना घेऊन शिरले.

''काय झालं ?''

''सर, रघू-जगू आणि सुदेश तिघांनाही कॉपी करताना पकडलंय.''

''सुदेशसुद्धा ?''

सुदेश आणखी रडू लागला. आपटे सर म्हणाले-''सुदेश रडू नको, तुझा पेपर पडला तरी तू का बोलला नाहीस ?''

''कारण पेपर पाडायचा असं आमचं ठरलंच होतं--''

जगूने बेदरकारपणे उत्तर दिले. आपटे सरांना वाटले, काड्कन जगूच्या श्रीमुखात द्यावी. पण त्यांनी संयम केला. म्हणाले ''जगूऽ, प्रश्न तुला विचारलेला नाही. गप्प बैस.''

''सुदेश, खरंच काय ठरलं होतं- जगू म्हणतोय---''

सुदेशला ब्रह्मांड आठवलं. पेपर

आपण पाडला नव्हता हे खरं ! पण पेपर पडल्यावर आपण आपटे सरांना का सांगितलं नाही ? रघू आणि जगू पेपर खाली टाक म्हणाले होते. खरं बोलावं तर रघू आणि जगूचे चेहरे त्याच्याकडे रोखून पाहात होते. काय करावं बरं ! आणि एकदम त्याला बाबा आठवले. आपण दुसरीत एकदा खोटं बोललो होतो, तेव्हा बाबांनी समजून सांगितलं होतं ''हे पाहा सुदेश, एक खोटं लपविण्यासाठी शंभर खोटं करावं लागतं. त्यापेक्षा सत्य सांगून जी शिक्षा होईल ती भोगणं हेच खरं शहाणपणाचं असतं.''

आणि एकदम त्याला बळ आलं. सत्य सांगून टाकायचं. त्याने डोळे पुसले आणि सारी सत्य हकीगत सांगून टाकली. रघूने आणि जगूने आपल्याला शाळा बुडवून कसं सिनेमाला नेलं. हॉटेलात नेलं. पेपर दाखवला नाही तर कशी मारण्याची तंबी दिली. आपटे सरांनी आणि मुख्याध्यापकांनी सारं ऐकून घेतलं. सुदेश असा मुलगा नाहीच. संगतीनं, दबावानं त्याच्या हातून हे घडलंय. त्यांनी रघूकडे आणि जगूकडे वळून म्हटलं - ''तुम्हाला दोघांना माहीत आहे ना कॉपीचा परिणाम. तुम्हाला या विषयात शून्य गुण देण्यात येतील आणि सुदेश तुलासुद्धा.''

सुदेश शांत होता. वाईट कृत्याचा परिणाम आपण भोगायलाच हवा. रघूला आणि जगूला त्यांनी घरी जायला सांगितलं. सुदेशही जायला निघाला. आपटे सर म्हणाले,

''थांब सुदेश.''

इतक्यात सुदेशची आई आली. आपटे सरांनी सुदेशच्या आईला बोलावणं पाठवल्याचेही सुदेशला कळलं नव्हतं. आईला कळेना असं काय झालं शाळेत की आपल्याला घरी बोलावणं यावं ! मनातून ती धास्तावली होती. मुख्याध्यापकांच्या केबिनमध्ये ती शिरली. आईला पाहताच सुदेश धावला. आईला बिलगला - आणि स्फुंदत म्हणाला,

''आई गऽ, चुकलंच माझं ?''

त्याच्या डोक्यावरून हात फिरवून आईनं विचारलं,''काय चुकलं बाळा ?''

आपटे सरांनी घडलेली सारी हकीगत आईला सांगितली.

सुदेशने पेपर पडल्यावर सांगितलं नाही; त्यामुळे तोही यात सामील झाला, असंच होतं. म्हणून या पेपरात त्यालाही शून्य मार्कच मिळतील.

आई चक्रावली. रडवेली झाली शब्द जड झालं -

''सरऽ,सुदेश असा मुलगा नाही हो!''

आईला शांत करीत आपटे सर म्हणाले - ''सुदेशच्या आई, या सर्व प्रकरणाकडे आम्ही सहानुभूतीनेच पाहू. सुदेश चुकला, त्याला चूक समजली. चुकीबद्दल परिणाम भोगायला हवाच.

कारण कायदा सर्व मुलांना समान आहे.''

''पण सर, त्याचं वर्ष वाया---'' आईला बोलवेना.

''ते वाया नाही जाणार. नियमाप्रमाणे तिमाही, सहामाही आणि वार्षिक या तीनही परीक्षांचे एकत्र गुण धरूनच वार्षिकचा निकाल असतो ना. सुदेशला तिमाहीत ९८ आणि सहामाहीत ९५ गुण आहेत. परीक्षेत तो पास होईलच. पण वर्गात येणारा त्याचा पहिला नंबर मात्र हुकला.''

आईला जरासा दिलासा मिळाला. सरांना नमस्कार करून आई सुदेशला घेऊन बाहेर पडली--वाटेत आई बोलत नव्हतीच. किती दुःख दिलं आपण आईला. आईला बिलगत सुदेश म्हणाला- ''आई, रागावलीस ? मला क्षमा नाही करणार ?''

''सुदेश, आई क्षमा करतेच. तुला चूक कळली ना ?''

'' आई या वेळी एन्.सी.सी.मध्ये तू चार वेळा सांगूनही मी गेलो नाही. पुढील वर्षी मी एन्.सी.सी.मध्ये नक्की जाणार. बाबांसारखा होणार मी ! फारच वेड्यासारखा वागलो मी !''

आईने हळुवारपणे सुदेशचा हात हातात घेतला. ''चल घरी. आज तुझ्यासाठी आजीनं शिरा आणि मटारच्या करंज्या केल्यात !''

''खरंच ?''

''अगदी खरं ?''

दोघंही हसली आणि त्यांची पावलं घराच्या दिशेने पडू लागली अन् सुदेशची वेगळ्या वाटेनं वाटचाल सुरू झाली.

***

डॉ. लीला दीक्षित
'ध्रुव' ४९/२, सहजानंद
कोथरूड, पुणे ४११ ०२९.

# दिशा : विद्युत चुंबकीय बलाची


*– सी. के. देसाई*

विद्युतशक्तीचा वापर करून आपण विहिरीतून अथवा टाकीतून पाणी वर खेचतो. विद्युतशक्तीवर रेल्वेचे इंजिन चालते, पंखे फिरतात हल्ली छोट्या बसेसही धावतात. अशा ज्या-ज्या ठिकाणी विद्युतशक्तीचे यांत्रिक शक्तीत रूपांतर केले जाते, त्या-त्या ठिकाणी 'विजेच्या मोटर'चा वापर केला जातो. या मोटरचे तत्त्व समजावे म्हणून 'छोटी मोटर' कशी तयार करावी' याची कृती मी मागे विस्ताराने छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकात दिली होती. ती आठवते का ते पाहा! अथवा १९९८ चा छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक काढून पाहा. बदलणाऱ्या चुंबकीय क्षेत्रात आपण एका अक्षावर-ॲक्सिसवर छोटा लोहचुंबक ठेवला होता. हा छोटा चुंबक त्या अक्षाबरोबर फिरत होता आणि मोटर तयार झाली.

प्रवाहाने तयार होणाऱ्या विद्युत चुंबकीय क्षेत्राच्या आणि चुंबकीय क्षेत्राच्या परस्परांतील क्रियेमुळे जे विद्युत चुंबकीय बल तयार होते, त्या बलामुळे मोटर फिरत असते. या विद्युत चुंबकीय बलाची दिशा समजावून देणारा प्रयोग आपण स्वत:च एक उपकरण तयार करून करूया.

या उपकरणासाठी आपल्याला बाजारातून पुढील गोष्टी मिळवाव्या लागतील. एक बलशाली पट्टी चुंबक, एक नवीन सेल, लाल-काळी जाड वायर, दोन क्रोकोडाईल क्लिप्स्; ६मि.मी. जाडीचा तांब्याचा अथवा ॲल्युमिनियमचा रूळ, छोटा प्लॅस्टिकचा डबा.

**कृती** :-जेवणासाठी अथवा कंपास पेटीसाठी बाजारात प्लॅस्टिकचा डबा मिळतो, तो या प्रयोगासाठी सर्वोत्तम राहील. याची परिमाणे सामान्यत: २० सें.मी. लांब, ७ ते ८ सें.मी. रुंद, व ३ ते ३.५ सें.मी. उंच अशी असतात. असा किंवा यासारखा डबा घ्या. कोणत्याही हार्डवेअरच्या दुकानात ६ मि.मी. व्यासाचे अल्युमिनियमचे भरीव रूळ सुमारे चार रुपये प्रतिफूट या दराने मिळतात. असा दोन फूट रूळ आणा. डब्याची लांबी २० सें.मी. असल्यास २२ सें.मी. लांबीचे दोन रूळ कापावेत. साध्या हॅक्सॉ ब्लेडने हे रूळ कापले जातात.




**वरील परिस्थितीत कड रूळाचे अ च्या दिशेने चलन होते.**

याच रूळाचा सुमारे ४ सें.मी. चा आणखी एक तुकडा कापावा. आकृतीत दाखवल्याप्रमाणे डब्याला दोन-दोन छिद्रे, २.५ ते ३ सें.मी. अंतरावर पाडून त्यात हे रूळ बसवा. डब्याच्या एका बाजूने एक रूळ व दुसऱ्या बाजूने दुसरा रूळ थोडा बाहेर आलेला दिसतो. आता या डब्यात एक नवीन पेन्सिल सेल बसवा. पेन्सिल सेल बसवण्यासाठी आता बाजारात प्लॅस्टिकचे सेल-होल्डर मिळतात, शक्यतो ते वापरा. सेलच्या धन टोकापासून एक लाल वायर काढून ती विजेच्या घंटीसाठी वापरतो तशा 'पुश-टू-ऑन' या प्रकारच्या क्षणभर चालू राहणाऱ्या स्विचला द्या. स्विचच्या दुसऱ्या टोकापासून आणखी एक लाल वायर काढून तिला पुढे सुसरीसारखी तोंड असलेली लाल क्लिप बसवा. या प्रकारच्या क्लिपला क्रोकोडाईल क्लिप असेच म्हणतात. ही क्लिप एका रूळाला लावा. सेलच्या दुसऱ्या म्हणजे ऋण टोकापासून काळी वायर काढून तिच्या टोकाला काळी क्रोकोडाईल जोडावी. काळी क्रोकोडाईल क्लिप दुसऱ्या रूळाला लावा. बाजारात

लाल-काळी वायर व लाल-काळ्या क्रोकोडाईल जोडीने मिळतात. लाल रंग 'धन ध्रुवासाठी' व काळा रंग 'ऋण ध्रुवासाठी' वापरावा, असा संकेत आहे. ४ सें.मी. चा तुकडा रूळावर आडवा ठेवा. बटन दाबताच क्षणभर प्रवाह क ते ड असा जाईल.

या प्रयोगासाठी लागणारी थोडी महाग वस्तू म्हणजे शक्तिशाली लोहचुंबक होय. ''रेअर-अर्थ'' मेटल वापरून तयार केलेले आकाराने लहान परंतु अतिशय शक्तिशाली लोहचुंबक बाजारात मिळतात. असा लोहचुंबक या प्रयोगासाठी वापरावा म्हणजे इष्ट परिणाम ताबडतोब दिसेल. हाताशी एक पॉलिश पेपर ठेवा. आवश्यकतेनुसार आपण त्याचा वापर करू.

आता आपले उपकरण प्रत्यक्ष प्रयोगासाठी-खेळासाठी तयार झाले.


एका हाताने लोहचुंबक छोट्या कड या धातूच्या काडीच्या वर सुमारे १ सें.मी. अंतरावर धरा. आवश्यकतेनुसार अंतर कमी-जास्त करा. विजेचे बटन दाबताच कड ही काडी दोन उभ्या रूळांवर घरंगळायला लागेल. विजेचा प्रवाह चालू ठेवून लोहचुंबक काडीवर धरत नेल्यास ही काडी डब्याच्या टोकापर्यंत पळत पुढे-पुढे जाते.

आता या खेळाला गंमत येईल. लोहचुंबक उलटा करा. पुन्हा ''स्विच ऑन'' केल्यावर ही काडी उलटच्या दिशेने घरंगळत डब्याच्या दुसऱ्या टोकाला जाईल. म्हणजे लोहचुंबकाची - चुंबकीय क्षेत्राची दिशा बदलली की काडीच्या चलनाची दिशा बदललेली दिसते.

आता या खेळात लोहचुंबकाची - चुंबकीय क्षेत्राची दिशा न बदलता आपण विजेच्या प्रवाहाची दिशा बदलू. धन क्रोकोडाईल आणि ऋण क्रोकोडाईल यांच्या रूळांची अदलाबदल करूया. याने आडव्या काडीतून जाणाऱ्या प्रवाहाची दिशा बदलेल. लोहचुंबक जवळ आणून विद्युतप्रवाह सुरू करताच काडी घरंगळायला लागेल. मात्र, आता तिची दिशा बदललेली दिसेल.खेळ खेळून झाला ! आता थोडे विज्ञान शिकूया.

आपल्या दोन्ही हातांची पहिली तिन्ही बोटे - अंगठा, तर्जनी, मध्यमा अगदी सरळ करा. नीट पाहा. ही तिन्ही बोटे परस्परांना अगदी ९० अंशाच्या कोनात असतात. आपल्या प्रयोगातील तीन्ही महत्त्वाच्या गोष्टी १) विद्युतप्रवाह - क ते ड अथवा ड ते क २) चुंबकीय क्षेत्र - वरून खाली अथवा खालून वर आणि

३) काडीचे चलन - अच्या बाजूला अथवा बच्या बाजूला या तीन्ही गोष्टी परस्परांना लंबरूपच आहेत.




आता हाताच्या मधल्या बोटांवर 'उ' लिहा. हे बोट विद्युतप्रवाहाची दिशा दाखवेल. तर्जनीवर 'इ' लिहा. तर्जनी चुंबकीय क्षेत्राची दिशा दाखवेल. उरलेला अंगठा-अर्थातच काडीचे चलन दाखवेल. दोन्ही हातांची मधली बोटे प्रवाहाला समांतर करा. तर्जनी चुंबकीय क्षेत्राला समांतर करा. आता असे दिसेल की दोन्ही हातांचे अंगठे एकमेकांच्या विरुद्ध दिशेला सरळ आहेत.

कोणत्या हाताचा अंगठा काडीचे चलन दाखवतो ? डाव्या की उजव्या? (उत्तर या अंकात शोधा).

काडीचे चलन होते कारण काडीवर 'विद्युत चुंबकीय बल' कार्य करते. म्हणजे एका हाताचा अंगठा विद्युत चुंबकीय बलाची दिशा दाखवतो. ''मधले बोट प्रवाहास व तर्जनी चुंबकीय क्षेत्रास समांतर केल्यास..... हाताचा अंगठा विद्युत चुंबकीय बलाची दिशा दाखवतो.''

हाच तो प्लेमिंगचा....हाताचा विद्युत चुंबकीय बलाची दिशा सांगणारा सुप्रसिद्ध सिद्धान्त होय.


विज्ञान शोधिकेत येणारे विद्यार्थी प्रत्यक्ष प्रयोग करूनच हा सिद्धांत आत्मसात करतात. तुम्हीही विज्ञान शोधिकेत येऊ शकता.

अ) ॲल्युमिनियम ऐवजी तांब्याचे रूळ वापरल्यास उत्तम. ब) ॲल्युमिनियम ऐवजी पितळी अथवा तांब्याची २मि.मी.जाडीची पातळ काडी वापरता येईल. क) हवेने धातूवर गंज चढतो. ऑक्साईडचा थर जमा होतो. आवश्यकतेनुसार रूळांना हलक्या हाताने-पॉलिश पेपरने पॉलीश करावे. ड) यात विद्युतप्रवाह खूप वापरला जातो. विनाकारण बटन ऑन करून ठेवू नका.

***


- डॉ. सी.के.देसाई
संचालक, 'विज्ञान शोधिका',
भारतीय विद्याभवन,
सेनापती बापट रोड, पुणे१६.


उत्तर : डाव्या, हाताचा अंगठा



# युग माहिती तंत्रज्ञानाचे

गिरीन्द्र कसमळकर

आजच्या काळात 'संगणक (computer) किंवा माहिती तंत्रज्ञान (IT) हे शब्द न ऐकलेला माणूस मिळणे जवळजवळ अशक्यच ! जेव्हा एखाद्या गोष्टीचा समाजावर इतका परिणाम होतो की समाजातील प्रत्येक व्यक्ती त्यामुळे प्रभावित होते, इतकेच नव्हे तर पूर्ण समाजव्यवस्थाच त्यामुळे कदाचित बदलली जाऊ शकते, तेव्हा आपण त्या गोष्टीचे 'युग' आले असे म्हणतो. गेली काही शतके जगामध्ये औद्योगिकीकरणाचे युग होते. त्यानंतर गेल्या शतकात इलेक्ट्रॉनिक्सचे युग अवतरले. गेल्या पन्नास वर्षांत इलेक्ट्रॉनिक्समधील प्रगतीमुळेच संगणकामधेही विलक्षण प्रगती झाली. भारतामधील खेडेगावात सुद्धा आणि शहरात तर घरोघरी personal computer दिसू लागला. आपल्या दैनंदिन जीवनात संगणकाचा स्पर्श नाही अशा गोष्टीसुद्धा आता फार कमी राहिल्या आहे. त्यामुळे संगणकाचे युग चालू झाले असे म्हणायला आता हरकत नाही.

**संगणकाची प्रगती** – सुरुवातीचे संगणक हे मुख्यत: संशोधनासाठी होते. त्यांच्यावर काम करणारे हे शास्त्रज्ञच असत. त्यानंतर संगणकांचा प्रसार मोठ्या उद्योगांमध्ये झाला. हे सर्व संगणकार mainframe असत. यांमधे एका केंद्रीय ठिकाणी संगणक असे व त्यावर अनेक जण आपापल्या terminals वरून आपापले काम करू शकत असत.

पण संगणकाचा खरा प्रसार personal computer आल्यामुळे झाला. इलेक्ट्रॉनिक्समधील प्रगतीमुळे अगदी छोट्या संगणकांमध्ये सुद्धा भरपूर गोष्टी करता येऊ लागल्या. त्यामुळे संगणकावर आता फक्त संशोधन नव्हे. तर पत्रलेखन, खेळ, चित्र काढणे अशाही गोष्टी करण्याची गरज वाढली व अशा गोष्टी करता येणारी programmes आणि softwares तयार झाली.

Personal computers दिवसेंदिवस अधिकच शक्तिशाली होऊ लागले. 8086, 80286, 486, Pentium, PII, PIII असा प्रवास वेगाने होऊ लागला. त्यामुळे आता संशोधनासाठीसुद्धा लोक personal computers वापरू लागले!

जिथे केंद्रीय ठिकाणी माहिती गोळा होणे आवश्यक आहे, उदा. banking, train/air reservation अशा ठिकाणी अजूनही mainframe च वापरले जातात. पण एकंदरीत पाहता Personal Computer नी mainframe वर कुरघोडी केली आहे यात शंका नाही.

जसजसे शास्त्रज्ञांच्या ऐवजी सामान्य लोक संगणक वापरू लागले, तसे संगणक वापरायला सोपा होणे फार गरजेचे झाले. भाषेऐवजी चित्रांच्याच माध्यमातून संगणकाला आपल्याला काय हवे ते सांगता आले तर उत्तम ! हे काम software कंपन्यांनी केले. Microsoft ही कंपनी आणि त्याचे Windows हे software सर्वांना माहीत आहेच.

संगणकाच्या वाढलेल्या शक्तीमुळे गुंतागुंतीचे मोठे प्रश्न सोडविता आले. भारतात दर वर्षी मान्सूनचे होणारे अचूक prediction हे त्याचे एक उदाहरण. वेगवेगळ्या संगणकांवरील माहिती एकमेकांना पुरविणे ही त्यापुढची मोठ्या उद्योजकांची व संशोधकांची गरज होती. उद्योगात वा संशोधनात एकटा माणूस काम करत नसतो, तर बरेच जण सामूहिक काम करतात. तेव्हा या गरजेतून networking किंवा संगणक एकमेकांना जोडण्यास सुरुवात झाली. या गरजेतून झाला internet चा जन्म.

### इंटरनेट

इंटरनेट म्हणजे संगणकांचे जगभर

पसरलेले जाळे. या जाळ्यातील प्रत्येक संगणकाला एक स्वतंत्र पत्ता असतो. (IP address-Internet Protocol address) ज्यायोगे बाकीचे संगणक त्याच्याशी संवाद साधू शकतात. त्या संगणकावर काम करणाऱ्या प्रत्येकास तिथे वेगवेगळे account असते. जे संगणक या जाळ्यात प्रत्यक्ष नाहीत, तेसुद्धा फोनने किंवा केबलने internet वरील एखाद्या संगणकाला स्वत:ला जोडून घेऊ शकतात. अशा सुविधा देणाऱ्यांना Internet Service Pronder (ISP) म्हणतात. त्यामुळे त्या प्रत्येक व्यक्तीला माहिती पाठवणे शक्य होते. भारतात VSNL ही एकमेव ISP आतापर्यंत होती.

आता आणखी काही खाजगी कंपन्यांनी ही सुविधा सुरू केली आहे.

संगणकांप्रमाणेच internet ची ही सुरुवात शास्त्रज्ञांनीच केली. तेव्हा IP addresses हे विशिष्ट प्रकारचे आकडेच असायचे. जेव्हा internet world wide web(www) ची सुरुवात झाली, तेव्हा प्रत्येक IP addresses ला नावाने बोलावण्याची सोय झाली. उदाहरणार्थ www.prabodhan.com.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे internet वर हिंडण. आता चित्रांच्या आणि mouse च्या आधारे शक्य झाले. आता फार मोठ्या वेगाने कुठल्याही विषयाची खडान् खडा माहिती आज internet तर उपलब्ध होऊ लागली आहे.

इंटरनेटच्या जाळ्याची तुलना पाणीपुरवठा यंत्रणेशी करता येईल. जितके पाईप्स मोठे तितके पाणी जोरात मिळण्याची शक्यता! Internet च्या बाबतीत याला bandwidth म्हणतात. जेव्हा आपण घरातून फोन करून आपल्या ISP(VSNL) च्या द्वारे internet वर जातो तेव्हा modem नावाचे यंत्र वापरतो. हा modem आपला संगणक आपल्या फोनला जोडणे शक्य करतो. माहिती एका ठिकाणावरून दुसरीकडे जाण्यासाठी त्याचे packets मधे विभाजन केले जाते. पाण्याच्या पुरवठ्यामध्ये जे काम पंप करतात ते internet मध्ये routers करतात. Packet वरचा पत्ता बघून, उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या मार्गांतील सर्वोत्तम मार्ग निवडून, ते Packet पुढे ढकलतात व योग्य ठिकाणी पोहोचल्यावर सर्व Packets योग्य क्रमाने परत एकत्र जोडले जातात.

या तशा साध्या वाटणाऱ्या तंत्रज्ञानाने आज क्रांती घडवली आहे. आज लोक याचा वापर करून एकमेकांना पत्रे (e-mails)

### संगणकाची प्राथमिक माहिती – १. Hardware

संगणक हे एक इलेक्ट्रॉनिक यंत्र आहे. ज्याला आपण programme करू शकतो. त्यामुळे हे यंत्र एकच काम न करता आल्याला पाहिजे ते काम आणि निश्चित केलेल्या प्रकारे करू शकतो.

**Hardware :** संगणकामध्ये दिसणारी इलेक्ट्रॉनिक components व त्यांना जोडणारी circuitry.

**Software :** संगणकाला एखादे काम करण्यासाठी दिलेल्या सूचनांचा संच.

**CPU** (Central Processing Unit) **:** संगणकाचा मेंदू . दिलेल्या सूचना व माहिती साठवणे (memory), संगणकाच्या विविध भागांचे control (control unit) व आकडेमोड व निर्णय घेणे (Arithmetic & Logic Unit - ALU) ही त्याची कामे.

**Input devices** : संगणकाला माहिती पुरवण्याची साधने उदा.Key board व mouse

**Output devices :** संगणकाने आपल्याला माहिती पुरवण्याची साधन उदा.Monitor व printer

**संगणकाचा Speed :** इलेक्ट्रनिक्सच्या प्रगतीबरोबर CPU म्हणून वारिल्या जाणाऱ्या chips च्या शक्तीमध्ये प्रचंड वाढ झाली. Intel हे कंपनी Chips तयार करण्यातील अग्रगण्य कंपनी आहे. बहुसंख्या PC's या chips वर चालतात. CPU च्या प्रत्येक operation ला विशिष्ट cycles लागत असल्यामुळे 400mHz पेक्षा 500mHz यांचा वेग जास्त असतो.

**RAM (**Random Access Memory**)** : CPU च्या आतील memory शिवाय आणखी memory संगणकामध्ये memory chips घालून वाढवता येते. ही memory संगणकाच्या चालू operations शी निगडित सर्व programmes, data इ. ठेवण्यासाठी वापरली जाते.

**Secondary memory :** RAM ही संगणक चालू असतानाच वापरली जाते. पण संगणक चालू नसतानासुद्धा आपल्याला माहिती साठवून ठेवणे आवश्यक असते. यासाठी आणि floppy disk किंवा hard disk वापरतो. या magnetic disks असतात व त्यांवर माहिती ठेवण्यासाठी power लागत नाही. आजकाल CD-ROM खूप प्रचलित आहेत.CD म्हणजे Compact Disk, ROM म्हणजे Read only memory. आपल्याला यावर माहिती लिहिता येते नाही, फक्त वाचता येते. (CD Writer वापरून CD वर मोहती लेहता येते. एका CD मध्ये ६५०MB एवढी माहिती दीर्घकाळ साठवता येते.

पाठवतात. एकमेकांशी दहा हजार मैलांवर गप्पा (chat) मारतात. वस्तू विकत घेऊ शकतात व विकू शकतात. (e-commerce) लिलाव करू शकतात किंवा शिक्षण घेऊ शकतात. कल्पना येण्यासाठी एक उदाहरण देतो.

तुम्हांला समजा एक पुस्तक विकत घ्यायचे आहे. तुम्हांला फक्त त्या पुस्तकाचं अर्धवट नाव किंवा लेखक माहीत आहे. तर तुम्ही internet वर प्रथम ते पुस्तक त्या अर्धवट नावावरून वा लेखकावरून शोधू शकता. (Searchचे काम करणारी अनेक search engines उपलब्ध आहेत, उदा. google, yahoo इ.)

एकदा पुस्तक सापडल्यावर, त्याचे प्रकाशक, किंमत, त्यावरील अभिप्राय, त्यातील उतारे सर्व काही तुम्ही घरातल्या खुर्चीतून न हलता पाहू शकता.

Internet वर काय होऊ शकते याची ही एक छोटीशी झलक. मुख्यत्वे, लोकांच्या निर्णयाच्या प्रक्रियेत माहितीच्या अभावे ज्या त्रुटी राहू शकतात, त्या सर्व पूर्णपणे नामशेष करण्याची शक्ती internet मध्ये आहे. याचे महत्त्व आर्थिक व्यवहारातच नव्हे तर सामाजिक राजकीय, या सर्वच क्षेत्रांत कल्पनातीत आहे.

**यापुढील प्रगती –** इंटरनेटपुढचा आताचा सर्वात मोठा प्रश्न आहे तो bandwidth चा. आज जी bandwidth उपलब्ध आहे ती video सारख्या गोष्टींना पुरेशी नाही. एखादा चित्रपट internet वर पाहू म्हटले तर ते आज शक्य नाही.

दुसरीकडे Pager, mobile सुद्धा प्रत्येकाला घेता येईल इतका स्वस्त झालेला नाही, किंबहुना झउ च्या सगळ्या क्षमतेची गरजसुद्धा बहुसंख्यांना नाही. त्यामुळे विशिष्ट माहिती देणारी (हवामान, रहदारी, शेअरबाजार इ.) अतिशय छोटी यंत्रे, जी आपल्या बरोबर बाळगता येतात अशांना इंटरनेटवर connection असणे याचे महत्त्व खूप वाढणार आहे. Pager, mobile इ. यंत्रे लगेचच डोळ्यासमोर येतात; पण याहीपेक्षा वेगळी, विशिष्ट कामे करणारी यंत्रेही येऊ लागतील. त्याबरोबरच घरातील फ्रीज, वॉशिंग मशीन, टी.व्ही. इ. उपकरणे, ळीशिशिं ला जोडली जाऊ शकतील व त्यामुळे ती आपल्याला घरात नसतानासुद्धा नियंत्रित करणे शक्य होऊ शकेल. या सर्व प्रगतीचा रोख हा विविध तंत्रे व माध्यमे यांच्या संगमाकडे (convergence) आहे.

भारतासारख्या खंडप्राय आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात आर्थिक शक्तीच्या अभावी आज आपण देशाच्या कानाकोपऱ्यात दळणवळणाच्या सुविधा पोहोचवू शकलेलो नाही. आपल्याकडील दरडोई टेलिफोनची उपलब्धता विकसित देशांच्या मानाने अत्यल्प

### संगणकाची प्राथमिक माहिती – २. Software

**Software :** संगणक या यंत्रांचेबाकी यंत्रांपेक्षा वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे programming करता येते. हे करणारी softwares वेगवेगळ्या प्रकारची असतात.

**Operating System :** संगणकाला खरे तर फक्त "Zero-O" आणि "1", on आणि off ही machine language च समजते. आपल्याला हवे तसे programming या भाषेत करणे खूपच किचकट ! तेव्हा संगणकाची सर्व प्राथमिक कामे करणारी व ती वापरून आपल्याला programming करू देणारी जी Software असतात त्यांना operating system(OS) म्हणतात. PC वर DOS, Windows या operating systems असतात.

**Programming languages :** शास्त्रीय, औद्योगिक किंवा वैयक्तिक applications चे programmes लिहिण्यासाठी programming languagesचा जन्म झाला. सुरुवातीच्या काळात Cobol व fortran या प्रचलित languages होत्या. त्यानंतर C, C++ या भाषा आल्या आजकालच्या internet जमान्यात Visual Basic (VB), Visual C++ (VC++) व Java या भाषा लोकप्रिय झाल्या आहेत.

**Databases :** माहिती तंत्रज्ञानातील प्रमुख सुविधा म्हणजे अत्यंत मोठ्या प्रमाणावरील मोहती सुसूत्ररीत्या साठवता येते. व त्यातून पाहिजे ती माहिती सहजरीत्या काढता येते. हे काम databases करतात. Foxpro, Access हे छोट्या applications साठीचे databases आहेत. तर Oracle, SQL Server हे मोठमोठ्या applications साठीचे databases आहेत. या databases वर एका वेळी शेकडो लोक काम करू शकतात.

**Applications :** लोकांना प्रत्यक्षपणे लागणाऱ्या गोष्टी करणाऱ्या Softwares ना applications म्हणतात. Word Processing,CAD,banking ही सगळी उदाहरणे आहेत.

**Browsers :** इंटरनेट बघण्यासाठी लागणारे Software उदा. Internet Explorer, Netscape

**Servers :** एका वेळी बऱ्याच लोकांना सोयी पुरवणाऱ्या softwares ना servers म्हणतात. Database servers आपण वर पाहिले. अशाच प्रकारे application servers सुद्धा असतत. Internet च्या तंत्रज्ञानात खूप लोकांना एका वेळी website दिसण्याची सोय करणाऱ्या softwares ना web servers म्हणतात.



ज्ञानाचा हा अफाट सागर, प्रगतीला हे क्षितिज मोकळे
जो जो उत्सुक त्याच्यासाठी, विज्ञानाने दार उघडले.

शंभरावा अंक

'छात्र प्रबोधन' मधील निवडक कुमारकथांचा संग्रह
'बहर' 'छात्र प्रबोधन' प्रकाशन किं.रु.५०/–

आहे आणि त्यामुळे आपल्या प्रगतीचा वेग विकसित देशांच्या तुलनेत मंदावून विषमता आणखीनच वाढणार! या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग आपल्याला नवीन तंत्रज्ञानामुळे सापडू शकेल.

वैद्यकीय क्षेत्रात प्रत्यक्षपणे वैद्यकीय मदत देणे कदाचित या तंत्रज्ञानाला अवघड आहे. पण स्थानिक डॉक्टरला जगातील उत्तमोत्तम माहिती व तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळण्याची सोय निश्चित होऊ शकेल. प्रशासनाच्या उपक्रमांची माहिती कुठल्याही नागरिकाला मिळू शकेल. तसेच आपल्या कामांसाठी कार्यालयात न जाता ते कुठवर आले आहे ते कळू शकेल. शेतकऱ्यांना आपल्या मालाची बाजारपेठ भारतातच नव्हे तर जगभर कुठे आहे हे कळू शकेल. या तंत्रज्ञानाने माल एका ठिकाणाहून दुसरीकडे हलवता येणार नाही. पण ही माहिती जरी मिळाली तरी लोकांना आपल्या मालाला चांगला भाव मिळण्यासाठी काही हालचाल करता येईल.

अशाच प्रकारच्या सुधारणा शिक्षण, प्रशासन, वैद्यकीय सेवा, सामाजिक सुविधा, राजकारण या सगळ्या क्षेत्रांत होऊ शकतात. शिक्षणासाठी हे माध्यम अत्यंत चांगल्या प्रकारे वापरता येईल. सर्वोत्तम शिक्षक देशभर वेगवेगळ्या भाषांत उपलब्ध होतील. तेसुद्धा विद्यार्थ्यांच्या सोयीच्या वेळी आणि प्रश्नोत्तरांसकट! पण त्याचबरोबर या नवीन युगात कुठले विषय शिकवायला पाहिजेत, विद्यार्थ्यांच्या कुठल्या कौशल्यांच्या विकासावर भर देणे आवश्यक आहे, यावर शिक्षण-तज्ज्ञांना विचार करावा लागणार आहे.

या सर्व सुविधा जगभर सगळीकडेच लागतील; पण या सुविधा जी माहिती पुरवतील ती माहिती प्रत्येक ठिकाणची वेगळी असणार. आज internet वरची बरीचशी माहिती ही अमेरिकेतील आहे. तेव्हा भारतात या सुविधा पुरवण्यासाठी भारतातील माहिती internet वर टाकायला प्रचंड वाव आहे. जितकी जास्त आणि समयोचित माहिती तितक्या या सुविधा जास्त उपयुक्त ठरतील आणि हे नवे युग जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचू शकेल आणि त्यांचे जीवन बदलू शकेल.

**मर्यादा व धोके–** इंटरनेटवर कोणीही कुठल्याही प्रकारची माहिती ठेवू शकतो. ही जशी त्याची शक्ती आहे तसेच त्यामुळे त्याचे काही धोकेही आहेत.

एक तर इंटरनेटवर असणारी सर्व माहिती खरी असेलच असे नाही.

त्याहीपेक्षा मोठा दुसरा धोका म्हणजे इंटरनेटवर असणारी माहिती समाजाला धोकादायक ठरू शकेल अशीही असू शकते. उदा. आज इंटरनेटवर अतिरेकी आहेत. विशिष्ट समाजाचे द्वेषी आहेत. रक्तपाताचे इच्छुक आहेत आणि इंटरनेटच्या मार्गाने ते आपल्या गैरकृत्यांसाठी लोक जमवू पाहात आहेत. पण इंटरनेटचे स्वरूपच असे आहे की सरकारी माध्यमातून त्यावर ताबा मिळवता येईल अशी शक्यता नाही. त्यामुळे लोकांनीच सावधान असणे एवढेच त्यावरचे उत्तर आहे. सज्ञान लोक ही काळजी घेतील पण लहान-मुलांचे संरक्षण कसे करणार? त्यासाठी तुम्ही मुला-मुलींनीही याचा वापर करताना योग्य सावधानता राखली पाहिजे.

सर्व आर्थिक व्यवहार internet वर होऊ लागल्यावर तिथे एक वेगळ्या प्रकारची internet गुन्हेगारीसुद्धा सुरू होणार. तसेच internet चे खाजगी जीवनावरही अतिक्रमण होणारच. यासाठी पोलीस, कायदेतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांनाही काही उपाययोजना करावी लागेल.


**युवकांना संधी –** माहिती तंत्रज्ञानाचे युग हे असंख्य संधी घेऊन आलेले आहे हे तर खरेच. पण त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट आहे की हे युग अवतरते आहे, अजून प्रस्थापित झालेले नाही. त्यामुळे पूर्णपणे नवीन विचार, नवीन प्रणाली, पद्धती यांना भरपूर वाव आहे. जे चाकोरी बाहेरचा विचार करू शकतात, अशांना ही सुवर्णसंधी आहे.

आजच्या काळाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे होणाऱ्या बदलांचा प्रचंड वाढलेला वेग ! कालचे ज्ञान आज कालबाह्य होत आहे. अशा स्थितीत तर तुमच्यासारख्या नवतरुणांना ही एक विशेष संधी व आव्हान आहे.

तंत्रज्ञानाची अचूक जाण, समाजाच्या गरजांचे पूर्ण भान व त्या गरजांची व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी लागणारी स्वयंभू कल्पनाशक्ती (original thinking) याच्या जोरावर आजचा तरुण जग बदलून टाकू शकतो. शेवटी 'जग बदलून टाकणे' हेच प्रत्येक तरुणाचे स्वप्न नसते काय ?

***

**श्री. गिरीन्द्र कसमळकर**
११/ब, गणंजय सोसायटी,
कोथरूड, पुणे २९





*सप्तशृंग – धोडप इ. सातमाळ्यातील डोंगरांच्या यात्रेचं वर्णन या लेखात दिलं आहे. गिर्यारोहण क्रीडेतील कष्टांचा, आनंदाचा, निसर्गदर्शनाचा आलेख यात वाचावयास मिळेल. कठीण डोंगरांच्या चढाईतील आव्हानाची मजाही अनुभवायला मिळेल.*

*सह्याद्रीतील या डोंगरांना केवळ प्राकृतिक सौंदर्य नाही. इथे संस्कृती नांदलीय. इतिहास घडलाय. पण हे संचित शास्त्रशुद्ध स्वरूपात अद्यापि पुढे आलेले नाही. इतिहासकालीन घटनांचा तटस्थ वृत्तीनं मागोवा घेणारं, स्थळांच्या रचनेची, वास्तूंची अचूक नोंद घेणं हे एक आव्हानच आहे. या दुर्गस्थळांचा असा अधिकृत इतिहास शोधण्याचं आव्हान कुणी स्वीकारील काय ? इंग्रजांनी लिहून ठेवलेल्या इतिहासाची री ओढण्याचं म्हणूनच यात टाळलं आहे.*

**आनंद पाळंदे**

डोंगरातून परत येताना गावचा एस.टी. थांबा दिसला रे दिसला की पुढच्या यात्रेचे वेध लागतात. प्रवासानं अग आंबलेलं असतं, पाय दुखत असतात, किरकोळ खरचटल्याच्या खुणा चेहऱ्यावर, हाता-पायांवर शोभून दिसत असतात आणि त्यांची हुळहुळही होत असते. तरीही मन पुन्हा ते कष्ट भोगायला कसं आसुसतं हे एक कोडंच आहे. पण असं होतं खरं. मनाला उभारी आलेली असते. निसर्गाच्या सुंदर दर्शनाने मन प्रसन्न आणि बळकटही झालेले असते. एक-दोन दिवस वृत्तांत लिहिण्यात जातात. डोंगरमित्रांना वर्णन ऐकवून त्यांच्या हळहळीची मजा घेण्यातही काही दिवस जातात. निसर्गातल्या नवल वैशिष्ट्यांचा-वनस्पती, फुले, दगड यांचा अधिक परिचय तज्ज्ञ मंडळींना भेटून आल्याशिवाय पुरा होत नाही. त्यातही काही दिवस छान जातात. ऐतिहासिक संदर्भ, पुरातत्वीय निरीक्षणं यांतील शंकांचे निरसन काही काळ पुन्हा एक अनुभूती त्याच डोंगरांची देते.




या वेळेपर्यंत नकाशावर डोळे फिरत असतात. तो पाहतानाही अनेक चांगल्या स्थळांवर आठवणींनी रेंगाळायला होतं. त्यातल्याच न भेट दिलेल्या डोंगराची, वाटेची चुटपुट लागलेली असते. ती पुन्हा जागी होते. मन एकाग्र झालं की सह्याद्रीच्या रांगा नकाशातून उभारून वर दिसायला लागतात – ज्या सुरुवातीला दिसतच नाहीत. अशाच एका धांडोळ्यात नाशिकच्या उत्तरेला एक लांबलचक रांग आडवी पसरलेली दिसली. डोळे विस्फारलेलेच राहिले. सह्याद्रीच्या मुख्य रांगेत सुरू होऊन ती जवळजवळ २५० कि.मी. पसरली होती – थेट खानदेशापर्यंत.

या माळेचे नाव आहे सातमाळा- अजिंठा. हातगड, अहीवंत, सप्तशृंग, धोडप, राजदेहेर, इंद्राई, अणकई-टणकई, कण्हेर अशी कितीतरी शिखरं ओवून ही डोंगरमाळ महाराष्ट्राच्या छातीवर विराजमान झाली आहे. सर्वच सातमाळा रांग विलक्षण देखणी आहे. प्रत्येक शिखराला कातळमाथा आहे. त्यातून वाटा कोरून काढल्या आहेत. दुर्गशिल्पींचं ते कौशल्य तोंडात बोट घालण्याजोगंच आहे. पदरातून संपन्न जंगलाचे अवशेष आणि पायथे मात्र झाडांविना ओसाड असे- निवडुंग, झुडुपी रानांना आश्रय देणारे. पण तरीही क्षितिजावर पाहताना या माळेचे सौंदर्य चढ-उतारांमुळे एकदम प्रेमातच पाडते.



घाट बोलतो हासत खिदळत, आकाशाची बोली
सरळ डोंगरी चढ बाजूला, लाख हात खोली

प्रेम, बंधुता, एकात्मतेचा झेंडा घेऊ हाती ।
भ्रष्टाचार अन् कुप्रवृत्तींना देऊ आम्ही माती ।

सातमाळेचा राजा म्हणजे धोडप दुर्ग आणि म्हणून या माळेत पहिलं पदार्पण धोडपलाच करावं असं ठरवलं.




दूरवर जायला एसटी.चया रातराणीसारखी दुसरी उत्तम सोय नाही. अर्थात झोपेत बसणाऱ्या दणक्यानं नाक चेमटण्याचा त्रास किंवा जागरणामुळे यात्रेचा पहिला दिवस पेंगुळवाणा होण्याचा संभव लक्षात घ्यायला लागतो.

आम्ही पहाटे पहाटे नाशिक सेंट्रलला उतरलो. सकाळची पहिली नांदुरी गाडी पकडली. सप्तशृंगगड प्रख्यात तीर्थस्थान असल्यामुळे एस.टी. गाड्यांचा व प्रवाशांचाही सुकाळ आहे. पहिल्याच गाडीला भरपूर गर्दी होती. आमची पाठीवरची बाजकी पाहून वाहकानं जरा नापसंतीच दाखवली.

वणीच्या पुढं चंडिकापूरला उतरलो. सप्तशृंग गडाच्या पहिल्या दर्शनाने सारे शीण दूर पळाले. तीव्र चढावर माथ्यापाशी अक्राळ कातळकडा उभा होता. पश्चिमेकडे अहीवंत - अचला दिसत होते. बुटाच्या नाड्या आवळल्या. पिठ्ठूचे बंद कसले आणि आम्ही पाचजणांनी पावलं उचलली. आता चार दिवस पायांचं सामर्थ्यच उपयोगी पडणार होतं.

सावकाश पण ठोसपणे चढाई करीत आम्ही कातळ कड्यातल्या पायऱ्यांपर्यंत पोहोचलो. उंच पायऱ्यांची ती कातळशिडी चढताना पायात गोळे आलेच पण दरीकडे पाहताना डोळ्यांनीही गोते खाल्ले. माथ्याची धार गाठली आणि आलेली वाट, पायथ्याची इटुकली घरं, वणी-नांदुरी घाट रस्ता यांनी समाधान पावलो. गडाचं शिखर वळसा घालून पूर्वेला गेलो आणि देवस्थान कचेरीजवळील शंकराच्या देवळा जवळ विसावलो.

चाऊम्याऊ उरकलं. चूल मांडून चहा बनवला. गरम घोट घशाखाली गेल्यावर तरतरी आली. यात्रेसारख्या ठिकाणी अथवा खात्री वाटत नसल्यास पाणी उकळून पिणे योग्य यासाठी चहापान सुरक्षित असते. शिवाय पुरेशी विश्रांतीही आपोआपच घडते.

मार्कंडेयाच्या खिंडीकडून गार वारा येत होता. समोर सप्तशृंग देवीशिखराची सात शिखरं उठावाने दिसत होती. सर्वोच्च शिखरावर भगवा झेंडा फडकत होता. हा झेंडा लावायची जागा सहजासहजी सापडत नाही. याचा मान परिसरातल्या एका पुजाऱ्याच्या घराण्यात आहे. शिखराच्या पोटात असलेल्या गुहेत देवीचा निवास आहे. तिकडच्या वाटेवर जगसागर लोटला होता. आम्ही त्या पर्वतरूपी देवीच्या दर्शनानेच धन्य झालो होतो. आपल्या पूर्वजांनी यात्रा करण्याचा दंडक घालून दिला, तेव्हा पायी वा घोड्यावरून प्रवास असे. निसर्गाचा रानवा अधिक होता. वाद्यांना भक्तीची जोड होती. वॅटेजमध्ये मोजता येईल असे कर्णे नव्हते. श्रमसंस्कृती होती. यामुळे यात्रास्थानी जाता जाता समृद्ध निसर्गाचं दर्शन घडे. मंदिर परिसरात शांतपणे बसून इष्ट देवतेचे ध्यान समोर ठेवीत ध्यानधारणा करता येत असे. मन मंगल-पवित्र होऊन भाविक परत कर्मयोगाकडे वळत असत. पण सोयीसुविधा वाढल्या. लोकसंख्या फोफावली आणि यात्रास्थानांना बाजाराचं स्वरूप येऊ लागलं. झटपट दर्शनाची परंपरा बळेच निर्माण केली गेली आणि शांत ध्यानासाठी असलेल्या जागांचा कब्जा दलालांनी घेतला. दर्शनसाध्य करताना वाटेत येणाऱ्या विशाल अनुभवाला आपण मुकलो आणि एका गाभाऱ्यात कोंडलेल्या, एका बिंदूत कोंबलेल्या देवदर्शनात सार्थक मानू लागलो. आम्हाला त्या गर्दीत सामील व्हायची इच्छाही झाली नाही. सप्तशृंग-मार्कंडेयामधील वाघखिंडीच्या वाटेला लागण्यापूर्वी खिंडीतली वाट कुठून कशी जातीय याचं बराच वेळ निरीक्षण करावं लागलं.

सातमाळेतील खिंडी खोल आणि तीव्र उताराच्या आहेत. पठाराची कड



रान जागे झाले सारे, पायवाटा जाग्या झाल्या.
सूर्य जन्मता डोंगरी, संगे जागल्या सावल्या.

गाठल्याशिवाय खिंड दिसतही नाही. मार्कंडेयाच्या खिंडीत उतरायला चांगली वाट मिळाली. पण पलिकडे त्याच्या पठारावर चढेपर्यंत घामाघूम झालो.




पठारावरून पूर्वेला गेल्यावर शिखरावर जाण्याची वाट दिसली. शिखर छान दिसत होतं. शिखराच्या उजवीकडे खोगीर होतं. तिथं चढताना मस्त ताल सापडला. वाटेत एक दुतोंडी गुन्हा होती. खिंडीतून शिखर अगदी जवळ होतं. अपर्णा क्षीरसागर आणि अवधूत जोशी या नव्या दमाच्या आरोहकांनी आघाडी घेऊन ते झटकन सर केलं. माथ्याच्या खाली एक देवळी व पाण्याचे टाके आहे. तर माथ्यावर मार्कंडेय ऋषींची नव्यानेच बसवलेली मूर्ती आहे.

दुपारचे बारा वाजले होते. चहूबाजूंना वरती निळंभोर आकाश होतं. पश्चिमेला सप्तशृंग शिखर मोठं दिमाखदार दिसत होतं. नैर्ऋत्येचा रामसेज-देहेर व त्यामागे त्र्यंबक रांग होती. ईशान्येला मार्कंडेयाचा एक फाटा कण्हेरगडला जाऊन भिडला होता. आमच्या यात्रेचा तो शेवट असणार होता पण आता आमचं लक्ष होतं ते पूर्वेच्या खळ्या-जवळ्यावर. शुद्ध स्वच्छ हवा, नितांत शांतता यांमुळे एक वेगळीच अनुभूती मिळाली. पदरात उतरलो. गणेशाच्या देवळाजवळ पाण्याच्या टाक्यात डोकावलो आणि पश्चिमेला मार्कंड्या पठाराची धार गाठली.

खिंडीत सोप्या वाटेने उतरलो आणि पलिकडच्या खळ्याच्या पठारावर धापा टाकीत चढलो. खिंडीतून वणी-कळवण गाडी रस्ता आहे. पठाराच्या कडेवरून उजवीकडे पाहताना गोदावरीचं खोरं अगदी कोरडं दिसत होतं. सगळा मातकट-राखाडी रंग. हिरवा अगदी तुरळक. मात्र जसजसे खळा-जवळा खिंडीकडे गेलो तसे छोटयाशा राईमुळे सुखावलो. खिंडीत तिवारीजींना रामराम केला. त्यांचं एकच कुटुंब इथे वस्ती करून आहे. थोडीशी शेती व पशुपालन हा त्यांचा व्यवसाय. जुनं कुंड आहे.

संध्यासमय होत आला होता. वातावरण शांत होत चाललं होतं. वस्तीच्या अंगणात पथाऱ्या पसरून आम्हीही शवासन करून रात्रं-दिवसाची दमणूक विसरून गेलो. कारण, आमच्या पोटाची व्यवस्था आम्हाला करावयाची होती. लक्षतारांकित निवास आम्हाला करावयाचा होता. सकाळी ६ वाजताच लख्ख उजाडलं. पश्चिमेला खळा आणि पूर्वेला जवळा आपली कातळशिरे आता अधिकच उंचावून उभे होते.

खळ्याची चढाई आग्नेय टोकाशी होती. एका छोट्या भुयारा-जवळील घळीतून वर पोहोचलो आणि कसोटीचा क्षण आला. ५ मीटर उंचीचा किंचित अवघड कडा समोर ठाकला. अशा वेळी अर्थातच दिलीप निंबाळकर- शिवाय गत्यंतर नव्हते. दिलीपने कुशलतापूर्वक तो कडा चढून आम्हाला बिले द्यायला सुरुवात केली. आमच्या सोबत एक २५ मीटर लांबीचा दोर घेतलेला होता. अन्य सर्वांना त्यामुळे वर चढणे सुरक्षित झाले.

शिखराकडे जाणारी वाट घसाऱ्याची होती, पण तिला आम्ही सरावलो होतो. खळा अखेर सर झाला. सप्तशृंग-मार्कंड्याचे पुन्हा दर्शन घडले. खळ्यावर पाणी नव्हते पण आमच्या पाणथैल्या कामी आणल्या. घामाघूम झाल्यावर, एखादी खडी चढाई पार केल्यावर नुसतं पाणी पोटात गेलं तरी जीवनदान मिळतं.

खळ्यावरून जवळ्याची वाट निरखली होती, त्यामुळे खळा उतरल्यावर जेमतेम तासातच आम्ही जवळा माथा गाठला. जवळ्याची वाट वायव्य टोकावरून खोदलेली आहे. पायऱ्या संपल्या की बोगदेवजा दरवाजा आहे. माथा सपाट कातळाचा होता. आग्नेय टोकावरील पाणी चाखत आम्ही पूर्व दिशा अचंबित होऊन पाहातच राहिलो. जवळ्याकडून धोडपच्या पठाराकडे डोंगरमाळ वळसा घेत होती. वाटेत दोन खिंडी होत्या. या धारेनं जायचं झाल्यास जास्त उतरायला लागणार



खोल खालती दरी त्यामध्ये उठती पडसाद
वनदेवीची सृष्टि लाडकी अहोरात्र धुंद.

शंभरावा अंक

दुसऱ्यासाठी जिवंत रहाणं म्हणजे जगणं !
दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
अनंत टोळ व सौ.अर्चना अनंत टोळ

नव्हतं. तर जवळ्याच्या उत्तरेकडची वाट घेतली तर पूर्ण दरी उतरून धोडप पूर्ण चढावा लागणार होता. ही वाट तांत्रिकदृष्टया मात्र सोपी होती. अवघड आव्हान झेलायच्या ऊर्मीमुळे आम्ही धारेची वाट निवडली. जवळा माथा उतरलो. पठाराचे आग्नेय टोक गाठले. पण लांबून वाटले होते तेवढे धारेने उतरणे सोपे नव्हते. टोकावरून सरळ उतरायचे तर दोर बांधून सरसरत उतरावे लागले असते. ते शक्य नव्हते. दक्षिण बाजू पाहिली तर तिकडेही सरळ कडे होते. मग बारकाईने धार पाहात चालू लागलो. सगळा वेळ फुकट जाणार, असे वाटत असताना गुलाब सपकाळच्या सराईत नजरेने कड्यात एक फट टिपली. ती एक घळई होती. पाण्याच्या प्रवाहाने निर्माण झाली होती. त्यामुळे उतार कड्यापेक्षा सोपा होता. गुलाब कसब दाखवून त्यातून उतरला. चिंता दोघा नवोदितांची होती. पण दोरीचा बिले दिल्यावर त्यांची सुरक्षा वाढली. कारण घळीतून घसरलं तर २-३ शे मीटर घरंगळत जावं लागलं असतं.

दुसरा टप्पा किंचित सोप्या घळीचा होता. पण त्यामुळे कड्याची मुख्य उंची कमी झाली आणि आम्ही निर्धास्त झालो. पण अडचणी कमी नव्हत्या. एक तर एप्रिलमधलं भाजणारं ऊन आमच्यावर दुपारच्या टळटळीत वेळी आग ओकू लागलं होतं. खिंडीत पोहोचण्यासाठी अतिशय वाईट घसाऱ्यावरून - त्याही तापलेल्या- आडवं जायला लागणार होतं. हाताच्या पकडी घ्यायला निवडुंगाची झुडुपंच होती. अशा वेळी शरीर अन् मन दोघांनी साथ साथ जाण्याचं ठरवलं. किंबहुना असं शिक्षणच अशा अडचणीतून मिळतं असं म्हणा हवं तर. ज्या वेळी खिंडीत पोहोचून मागे वळून जवळ्याकडे पाहिलं, तेव्हा आम्ही त्या वाटेवर विश्वासच ठेवू शकलो नाही.

पुढे खडी चढाई होती. ती पार करून पठारावरून लांबच लांब चालल्यावर धारेवरची दुसरी खिंड दिसली. महानिंबाच्या सावलीनं. माया दिली. भरपूर विश्रांती आवश्यक होतीच. जवळचे कणकेचे लाडू घोटभरच पाण्यात रिचवले. ऊन उतरल्यावर खिंडीत उतरलो. त्यानंतर कातळाचे एक-दोन छोटे टप्पे चढावे लागले. दोन कातळमाथ्यांच्या मधल्या वाटेने पुढे गेलो आणि धोडपच्या जवळून दर्शनाने स्तिमित झालो.

धोडप आणि विखाऱ्याच्या मध्यभागी बुध्या डोंगर उभा होता. काळा, करडा, राखी, मळकट या रंगांनी ती रांग अशी काही छान सजवली होती की तोड नाही. हिरव्या रंगाला त्या चित्रकारीत स्थानच नव्हतं, तरीही ती निसर्गाची अद्‌भुत कलाकृती होती. सायंकाळच्या तिरप्या उन्हात धोडपची उंच निळ्या आभाळात घुसलेली काळ्या कातळाची शेंडी हे दृश्य आम्ही कधीही विसरणार नाही. धोडपमाचीत सोनारांच्या घरच्या ओट्यावर मुक्काम केला. माचीत गतवैभवाच्या खुणा जागोजागी आहेत. धोडप नांदता असेल तेव्हा फार बघण्यासारखा असेल. सोनार वस्तीत

उतम बांधीव विहीर आहे. या विहिरी-जवळून धोडप चढाईची वाट आहे.

धोडप माथ्यापासून पायथ्यापर्यंत संपूर्ण कातळाचाच आहे. त्याचं रांगडं रूप अजोड आहे. खालच्या टप्प्याच्या पूर्व टोकास दरवाजा आहे. त्यातून पुढे गेल्यावर शेंडीच्या पोटातील गुहेत पोहोचलो. त्यात पाण्याचे उत्तम टाके व मंदिरही आहे.

दोर, करॅबिनर, हातमोजे, पाणथैली, पिटॉन, खाद्यपदार्थ छोट्या पिठूत भरून आम्ही शेंडीवर चढायला सज्ज झालो. उत्तर कड्यानी चढाई सुरू केली. वारा प्रचंड होता. पहिले ५० मीटर चांगल्या पकडी होत्या. धपापते ऊर शांत झाले. आम्ही कातळारोहणाची मजा अनुभवू लागलो. नंतरच्या टप्प्यात उजवीकडे पाहताना शहाराच आला. त्या डोकावणाऱ्या भागावर मजबूत पकड घेता आली हे नशिबच ! पुढचे ५० मीटर थोडेसे घसाऱ्याचे. आणि आम्ही शेंडीच्या टोकाशी पोहोचलो. उजव्या अथवा उत्तरेला पाहताना दृष्टीभय वाटत होतं. पण दूरवर साल्हेर, चौल्हेर, इंद्राई, राजदेहेर, अणकई-टणकईच्या दर्शनाने आम्ही अवाक् झालो.

अतिशय काळजीपूर्वक शेंडी उतरलो आणि जड अंत:करणाने धोडपचा निरोप घेतला. उत्तरेकडून उतरताना झालेलं शेंडीचं दर्शन न विसरणार होतं. कण्हेरवाडीत मुक्काम करून आम्ही कण्हेरगड पुढच्या दिवशी चढलो खरे पण मी वर्णन करू नये अन् तुम्ही ऐकू नये अशी आमची हबेलहंडी उडाली. प्रत्यक्ष जाऊनच पाहा म्हणजे प्रचीती येईल.

***

- आनंद पाळंदे
२/३ एरंडवन, कर्वे रोड, पुणे४



पलीकडे खळाळे निर्मळ निळसर पाणी,
उत्तुंग तरुंची उभी सभोती श्रेणी.



# एक आनंदाचे झाड

*बाल-वृद्ध, गरीब-श्रीमंत, अशा भेदांच्या पलीकडे जाऊन मराठी माणसाच्या जीवनात आनंदाची बाग फुलवणारं एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे पु. ल. देशपांडे. जीवनावर माणसांवर प्रेम करीत, स्वत: समृद्ध होत आणि इतरांना समृद्ध करीत या माणसाने आयुष्यभर आनंदाची उधळण केली. विनोदी लेखक, नाटककार, नट, गायक, संगीतकार दिग्दर्शक, वक्ता, उत्तम रसिक, असाधारण दाता अशा अनेक भूमिका त्यांनी उत्कटपणे पार पाडल्या. संगीतावरच्या उदंड प्रेमामुळे त्यांच्या लेखनात शब्द, सूर, रस, गंध, रंग, रूप, नाद या साऱ्यांचं सौंदर्य एकवटलं. हास्याच्या भाषेनं मराठी माणसाच्या मनाशी नातं जोडलं; वाचकांशी संवाद साधला. त्यांच्या सर्व साहित्याचा एकत्र परामर्श एका लेखात खूपच अवघड ! म्हणून कुमारांनी आवर्जून वाचावी अशी त्यांची प्रवासवर्णने व व्यक्तिचित्रे यांचा मागोवा या लेखात घेतला आहे. 'पुलं' नावाचं चैतन्य आज आपल्यात नसलं तरी त्यांच्या पुस्तकांच्या पानापानातून हास्याचं संजीवन मराठी वाचकांना चिरकाल मिळत राहील.*

**११ शरावती,**
**पत्रकारनगर, पुणे**

**आदरपूर्वक नमस्कार,**

ग्रंथवाचनाने सुचलेला एक विचार.जपानमध्ये एक संत होऊन गेला. 'होतेई' त्याचं नाव. त्याला ज्ञानप्राप्ती झाल्यावर तो हसूच लागला; आयुष्यभर हसतच राहिला. तो गावोगाव फिरायचा. बाजारात उभा राहायचा. जपानचे लोक त्याला 'हसणारा बुद्ध' म्हणायचे. तो येण्याची वाट पाहात राहायचे. तो दुसरा कुठलाही उपदेश करीत नसे. फक्त हसायचा; मग लोकही हसू लागायचे.

पुढे त्याला म्हणायचे,''आम्हाला काहीतरी सांगा ना !'' तो म्हणायचा ''काय सांगू ? उगाच रडता तुम्ही सगळे; सगळं सुख आहे; कशात काही कमी नाही; मन मोकळं करून तुम्ही फक्त हसा. सगळं अस्तित्व हसतंय, चंद्र-तारे-फुले-पक्षी सगळे हसताहेत. तुम्ही उगाचच रडताहात. जागे व्हा आणि हसा.''

सगळ्या जपान देशाला त्यानं हसवलं. हसता हसता लोकांना असाही अनुभव आला की आपण हसू शकतो; आपण प्रसन्न होऊ शकतो, अगदी अकारणसुद्धा. सुख आहेच. ते फक्त प्रकट करायचं आहे.

आपल्या देशात एक 'गंभीर बुद्ध' होऊन गेला. दुसरा 'प्र-बुद्ध' देशाची घटना लिहून गेला आणि तिसरा बाजारात उभा राहून एका मुलखाला हसवीत आहे. 'हसवणारा बुद्ध !' पु.ल.देशपांडे ! हीही एक घटनाच आहे एवढंच !

आपला नम्र,
पद्माकर गोवईकर



जगभरच्या अनेक देशांत देशस्थ होऊन फिरलो,
पण मनातील मराठीपणा कधी मावळला नाही.

श्री. पद्माकर गोवईकर यांनी पुलंना लिहिलेलं हे पत्र ! प्रत्येक मराठी वाचकाला पुलंनी हसण्याचा मंत्र दिला. हे पत्र म्हणजे जणू पुलंनी दिलेल्या अनमोल ठेव्याविषयीच्या जनमानसातील आदरभावाचा, कृतज्ञतेचा प्रातिनिधिक हुंकार !

पु. ल. देशपांडे यांनी सतत पन्नास वर्षे आपल्या लेखनातून सामान्य माणसाला जो शुद्ध आनंद दिला त्याला तुलना नाही. 'साहित्य, संगीत, नाटक, सिनेमा अशा विविध क्षेत्रांत ते आनंदाचा गुलाल उधळत राहिले. शुद्ध आनंदासारखं दुर्लभ जगात काही नाही. पु. ल. असेच आनंदयात्री - म्हणूनच त्यांनी समाजाला वेडं केलं ' असं श्री. ना.पेंडसे त्यांना आदरांजली वाहताना म्हणतात, त्याची प्रचीती पुलंवरील आबालवृद्ध मराठी रसिकांचं प्रेम पाहताना येते.

अभिनय, विनोद, व्यक्तिचित्रण, प्रवासवर्णन, संगीत, नाट्य, वक्तृत्व अशा अनेक पैलूंमधून मराठी माणसाशी त्यांनी संवाद साधला. त्याचबरोबर आपल्या असाधारण दातृत्वाने अनेकांच्या जीवनात त्यांनी सुख, सौंदर्य, प्रकाश आणला. जीवनातील आनंद स्वत: तर अनुभवायचाच पण तो दुसऱ्यांनाही भरभरून द्यायचा हे व्रतच जणू या लेखकानं घेतलं होतं. हास्याची भाषा माणसांना जवळ आणते अशीच जणू त्यांच्या मनाची धारणा होती. पुलंचं नाव काढताच ज्याच्या चेहऱ्यावर एखादी तरी स्मितरेषा उमटली नाही, ज्याच्या डोळ्यात हास्याची चमक दिसली नाही असा मराठी माणूस विरळाच. दैनंदिन जीवनातील गप्पाटप्पा, सभासंमेलनं, व्यासंगी भाषणं, व्यक्तिचित्रं, नाटक, सिनेमा या सर्वांना जिथे जिथे 'पुलं' स्पर्श झाला तिथे विनोद लखकन् चमकून गेला. शब्दखेळ, विसंगती, मार्मिक निरीक्षण, अनपेक्षित गोष्टींची सांगड त्यांच्या साहित्यात दिसते. त्यांच्या 'वयं मोठं खोटं'

या बालनाट्यातील मुलं 'संस्कृतं फडाफडं बोलं' असे म्हणतात. प्रवासवर्णन लिहिताना इथल्या मातीचा त्यांना विसर पडत नाही. मग फ्लॉरेन्स शहराचे ते 'फ्लॉरेन्स खुर्द' व 'फ्लॉरेन्स बुद्रुक' असे भाग पाडतात. शब्दाच्या माध्यमावर जबरदस्त पकड असल्याने त्यातून ते सहज विनोद-निर्मिती साधतात. किशोरी अमोणकरांचं वर्णन करताना 'नाव किशोरी असलं तरी गाणं प्रौढ आहे' अशी वाक्यं ते सहज टाकतात.

उपरोध, उपहास, कोटी यांच्या बरोबरीने विडंबनाच्या माध्यमातूनही त्यांनी लोकांना हसवलं. बटाट्याची चाळ, वाऱ्यावरची वरात, असा मी असा मी, अशा अनेक पुस्तकांतून सामान्यांचं समूहचित्रण कमालीचं जिवंत केलं. तुझं आहे तुझपाशी, सुंदर मी होणार, ती फुलराणी यांसारखी सुंदर नाटकं, अनेक एकांकिका, नवे गोकुळ इ. बालनाट्ये, विडंबने, प्रहसने, व्यक्तिचित्रे व प्रवासवर्णन; साहित्याच्या अशा अनेक प्रांतांत त्यांच्या लेखणीने स्वैर संचार केला. त्यांच्या नावावर असंख्य पुस्तके आहेत. त्या सर्व प्रकारांचा या लहानशा लेखात विचार करणं ही अवघड गोष्ट आहे. म्हणून तुम्हां कुमारवाचकांना आवर्जून वाचावीशी वाटतात अशी पुलंची प्रवासवर्णनं व व्यक्तिचित्रं यांचा विचार करू.

पुलंची प्रवासवर्णने 'मी मायदेशात तसा बैठा माणूस आहे. परदेशात मात्र खूप हिंडतो आणि ऐकतो; नव्हे, पाहण्यासाठी हिंडतो, कुठे काय ऐकण्यासारखे आहे ते शोधत जातो आणि जे ऐकले - पाहिले ते सांगायची मला ओढ लागते. त्यातूनच माझे लिहिणे घडते!''

'जावे त्यांच्या देशा' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील या उताऱ्यातून प्रवासवर्णनं लिहिण्या मागची पुलंची भूमिका स्पष्ट होते. प्रत्यक्ष प्रवासाचं वर्णन, प्रवासातील ठळक अनुभवांचं कथन, काही संस्मरणीय स्थळं, घटना, प्रसंग, व्यक्ती यांची वर्णनं 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्यांच्या देशा' आणि 'वंगचित्रे' या चार पुस्तकांतून येतात. या पुस्तकांना लहानांपासून थोरांपर्यंत मराठी रसिकांनी दाद दिली आहे. असं नेमकं कोणतं सामर्थ्य आहे या पुस्तकांत, ते जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

वास्तविक प्रवासवर्णन हे देश-काल -परिस्थितीशी जोडलेलं असल्याने काही वेळा त्यातील संदर्भ काळाबरोबर बदलत जातात. पण पुलंची ही पुस्तकं म्हणजे केवळ स्थलवर्णनं नव्हेत. या देशभरच्या, जगभरच्या भटकंतीत त्यांना जे जे भावलं; रुचलं ते ते आपल्या स्वत:च्या खास शैलीत वाचकांना सांगत राहिले. नवा देश, नवीन संस्कृती न्याहाळताना आपल्या संस्कृतीशी बांधून ठेवणारा धागा त्यांना इथला विसर पडू देत नाही. त्या त्या ठिकाणचा निसर्ग, तिथलं समाजजीवन, नव्या ओळखी,

तिथल्या कला-नृत्य-नाट्य-सिनेमा या सर्वांचाही ते रसिकतेनं वाचकांना सहज परिचय करून देतात.

आज हजारो तरुण मुलं शिक्षणासाठी, नोकरीसाठी परदेशी जातात. तरीही मध्यमवर्गीय घरात जन्मलेल्या मुलाच्या मनात पहिल्या प्रवासाच्या वेळी असलेलं नाविन्य तेच असतं. प्रवासाची तयारी, कपडे, बरोबर नेण्याच्या वस्तू हे सर्व तपशील बदलले तरी त्यामागची सर्वांना वाटणारी 'अपूर्वाई' तीच असते. म्हणूनच आजही 'अपूर्वाई' 'पूर्वरंग' ही पुस्तकं ताजी वाटतात.

संन्याशाच्या लग्नासारखीच पुलंच्या या प्रवासाची पूर्वतयारी - टायची गाठ बांधायला शिकणं, सूट शिवून घेणं, ठराविक वजनात सामान बसवणं, 'कॉलरा' टोचूनं घेणं विमानतळावरचा निरोप समारंभ या सगळ्याचं खास 'पुल' विनोदी शैलीतील वर्णन एक रंजक नाट्यमय अनुभव देतं. अपूर्व म्हणजे पूर्व नसलेली ती पश्चिम आणि पश्चिमेच्या प्रवासाची अपूर्वाई असं हे द्व्यर्थी शीर्षक लेखकाच्या मार्मिकपणाची साक्ष देतं.

या प्रवासात त्यांनी ब्रिटिश आणि युरोपीय रंगभूमीची विविध रूपं अनुभवली. तिथले वेगवेगळे नाट्यप्रयोग, बॅले, पपेट-शो पाहाताना मन सारखं मायदेशीच्या आठवणीत गुंतलेलं होतंच. त्यामुळे दोन्ही ठिकाणांतील साम्यस्थळं ते सांगत राहातात. बी.बी.सी.तील शिक्षणक्रमाबरोबरच कार्लाईल, डिकन्स्, कीटस् जॉन्सन या लेखकांची घरं, लंडनचा झू, टॉवर, ऑक्सफर्ड, केंब्रिजसारखी विद्यापीठं, शेक्सपिअरची समाधी, यहुदी मेनुहिनचा कार्यक्रम हे सगळं अनुभवताना जे जाणवलं, जो आनंद मिळाला तो पुलं शब्दबद्ध करतात. लंडनच्या हवेचे सगळे चमत्कार पाहताना, साधं तिथलं धुकं किती वेगवेगळे रंग दाखवतं याचं वर्णन ते आपल्या येथील दृष्टान्त देत करतात. नाताळच्या सणाच्या वेळी तिथली छान छान खेळण्यांनी भरगच्च भरलेली खेळण्याची दुकानं पाहताना आपलं 'खेळणी-विरहित बालपण' त्यांना आठवतं. नाकडोळ्यांचा पत्ता नसलेली लाकडी ठकी बाहुली आठवते. पण तिच्या लग्नाच्या सोहळ्याचा आनंद मात्र आजही त्यांना स्मरतो. मुलांना मुक्तपणे खेळण्यांशी खेळायला न देता ती शोकेसमध्ये ठेवणारे पालकही त्यांना आठवतात. इंग्लंडमधील निसर्ग - सौंदर्याचा, सांस्कृतिक समृद्धीचा आनंद ते शब्दबद्ध करतात. पण त्याचबरोबर तिथेही फसवणूक करणारा दुकानदार, तिकिटाचा काळा बाजार करणारा विक्रेता भेटतो याबद्दल ते खेदही व्यक्त करतात. इंग्लंड सोडताना ''हाइड पार्कमध्ये पहिली फुलं फुलली होती. नव्या वसंताचं स्वागत झालं होतं. लंडनमध्ये आम्ही कुणाचा निरोप घेणार होतो? मी मनोमन त्या चिमण्या फुलांचा निरोप घेतला.'' असं ते म्हणतात. एखाद्या देशाचा इतका नाजूक, भावपूर्ण निरोप घ्यायला तितकंच रसिक, संवेदनक्षम मन हवं.

'पूर्वरंग' मध्ये पूर्व आशियाच्या प्रवासाचं वर्णन आहे ''मलाया, सयाम, बाली, जपान अशा दूरदूरच्या देशांमध्ये चार महिने हिंडत होतो. रोजचा दिवस नवा होता. मनात कुठलाही पूर्वग्रह नव्हता. कोणत्याही धार्मिक, राजकीय किंवा कलाविषयक मतांचा आग्रह न धरता जे पाहाता येईल ते पाहात होतो. भेटता येईल त्याला भेटत होतो !'' या मनोगतातून त्यांच्या या पूर्वेच्या भटकंतीतील मनस्वी अनुभव ध्यानात येतो. मलाया, इंडोनेशिया येथील निसर्गाचं, संस्कृतीचं, माणसांचं जिवंत चित्रण इथे आहे. बाली बेटावरील खेड्यातल्या केचकनृत्याचं पुलंनी केलेलं वर्णन एक चित्तथरारक अनुभव देऊन जातं. 'जपान' पाहात असताना 'युद्धात बेचिराख झालेले हे जपानी इतक्या लवकर वर कसे आले ?' हा प्रश्न त्यांना पडतो. तिथला फुलांचा बहर मनात जपत ते जपानला 'सायोनारा' करतात.

वंगचित्रांमध्ये मात्र बंगाली भाषेचा, संस्कृतीचा अभ्यासक अशा गंभीर भूमिकेत पुल भेटतात. बंगाली भाषा शिकायची तर तिथल्या लोकसंस्कृतीशी एकरूप होऊन ! कारण भाषा हा लोकसंस्कृतीचा प्रकट

### "बो" कशासाठी

शंतनुराव किर्लोस्करांचं नाव घेतलं, रे, घेतलं, की त्यांची गळयात 'बो' असलेली आणि सुटाबुटांतली तजेलदार मूर्ती डोळ्यांसमोर पटकन उभी राहाते.

एकानं भाबडेपणानं पुलंना एक दिवस विचारलं ''भाई, शंतनुराव किर्लोस्कर नेहमी 'बो' का हो, लावायचे ?''

त्यावर पुलंनी लागलीच त्याला उत्तर दिलं,''त्याचं काय आहे, शंतनुरावांच्या लहानपणी त्यांच्या आईनं त्यांना सांगितलं होतं, की 'बाबा रे, बोलावल्याशिवाय कुठंही जाऊ नये,' तेव्हापासून शंतनुराव 'बो' लावल्याशिवाय कुठंही जात नसत.''

हुंकार असतो. म्हणून ते शांतिनिकेतनमध्ये गेले. दौऱ्यासाठी जानेवारी ते मार्च हे महिने निवडले. कारण हा काळ म्हणजे सुगीनंतरच्या समृद्धीचा, उत्सवांचा, मेळे, जत्रा यांचा काळ. अशा प्रफुल्ल वातावरणात अनुभवलेलं वंगसौंदर्य त्यांनी पूर्वार्धात वर्णन केलंय, तर उत्तरार्धात त्याच काळात तेथील राजकीय अस्वस्थता वाढल्याने त्यांना आपला मुक्काम आवरता घ्यावा लागला हा निराशाजनक अनुभव येतो. एकूण अनुभवांच्या वेगवेगळ्या विभ्रमातून होणारा प्रवास म्हणजे 'वंगचित्रे'! 'जावे त्यांच्या देशा' हे पुस्तक रूढ अर्थानं प्रवासवर्णन नाही. प्रवासातील एखादं ठिकाण, दृश्य मनात कायमचं ठसलं, तर त्याविषयी लिहिल्यावाचून राहावेना ही या लेखनामागची ऊर्मी. त्यामुळे शोभादर्शकातून विविध आकृत्यांतून सुंदर कलाकृती दिसत जाव्यात तसं या पुस्तकाचं स्वरूप आहे.

वास्तविक सामान्य प्रवाशांप्रमाणेच पुलंनी निसर्ग पाहिला, माणसं पाहिली, विविध समाज, संस्कृती यांचं दर्शन घेतलं. पण त्यांचं वेगळेपण म्हणजे अतिशय रसिक अशा वृत्तीनं हे सर्व पाहिलं आणि आपल्या आकर्षक भाषाशैलीत कधी काव्यात्मक भाषेत तर कधी विनोदी भाषेचा आविष्कार करीत सामान्य वाचकांना त्यांनी हे रूपदर्शन घडवलं. या सर्व पुस्तकांमध्ये काही ठिकाणी लेखक निसर्गाचं चित्रमयी दर्शन घडवितो.''इंडोनेशिया' हा पाचूच्या बेटांचा पुंजका समुद्रात रत्नजडित कंठा फेकून द्यावा तसा आहे; पण बाली या कंठ्यातील कंठमणी आहे.'' या एकाच वाक्यात उपमा, रूपक या अलंकारांचा सुरेख वापर आहे.

'तलावावरचे धुके हळूहळू आळोखेपिळोखे देत उठत होते.' 'विमान उडाले तेव्हा खाली पाहाता एक चिमुकली नदी वळणे घेत पळाली.' अशासारख्या वर्णनांतून निसर्गाला सचेतनाचं रूप प्राप्त होतं. तरीही माणसांवर पुलंचं प्रेम जास्त. त्यामुळे निरनिराळ्या ठिकाणी भेटलेल्या, दिसलेल्या व्यक्ती त्यांनी सचेतन करून ठेवल्या आहेत.

त्या त्या देशीचं समाजजीवन ते चिकित्सकपणे पाहतात. उदा. जपानचं वर्णन करताना तेथील लोकांची परंपरा आणि नवता यांत साधलेला समतोल त्यांना मोहवितो. तेथील लोकांची मानसिक उभारी व विध्वंसातून बाहेर येऊन थोड्याच काळात पुन: नवं जीवन उभं करण्याची जिद्द त्यांना भावते. या संदर्भात जपानी मुलांच्या खेळण्यांचा, उत्सवांचा ते उल्लेख करतात. ''दारुमा' नावाचा एक बाहुला असतो; त्याला कितीही पाडलं तरी तो पुन: उठून बसतो. 'पुत्रदिना'च्या दिवशी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला पोहत जाणाऱ्या माशांची चित्रं बांबूला लटकावलेली असतात. तीही प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा संदेश बालपणीच देत असतात.'' 'जावे

त्यांच्या देशा'मध्ये 'एक बेपत्ता देश''अशा शब्दात स्वत:चं 'मी'पण हरवलेल्या अमेरिकेचं ते वर्णन करतात.

सामान्य माणसं एखाद्या ठिकाणी गेल्यावर तिथे पाहण्यासारखं काय आहे ते पाहण्याचा सोस करतात. तर पुलंना ''एखाद्या गावात पाहण्यासारखं काही नाही'' हे कळल्यावर आनंद होतो. मग निवांतपणे तिथली माणसं पाहता येतात. रस्त्याच्या कोपऱ्यावर उभं राहून शहराचा स्वभाव पाहता येतो. ''निसर्गाची शोभा कशी अचानक सामोरी यायला हवी.'' ठरवून काही पाहणं म्हणेज त्यांना संकट वाटतं. मग रस्त्यावरची शाळकरी मुलं, वृद्ध पेन्शनर्स, कामकरी, उत्साही तरुण अशा नाना रूपांत ते 'माणसं' शोधतात. देशांतरीच्या गोष्टी सांगताना त्या त्या संदर्भातील आपल्या देशातील स्थळं त्यांना आठवतात. मग 'जर्मनीतील अगत्य वऱ्हाडी अगत्याच्या तोडीचं असतं,'.... हाँगकाँगला जाऊन नवा सूट न शिवता येणं म्हणजे नाशिकला जाऊन मकाजीचा चिवडा न खाता परत येण्यासारखं आहे, असे संदर्भ येतात. हे सर्व पाहात असताना पुलंची विनोदबुद्धी जागी असते. मलाया भाषेत 'रॉंग नंबर' असं टेलिफोनवर म्हणायचं असलं तर 'साला' असं म्हणतात हे ऐकल्यावर त्या भाषेच्या यथार्थ शब्दयोजनेवर त्यांचं प्रेम बसतं. एअर होस्टेस जर 'हवाई सुंदरी' होऊ शकते तर नर्सला 'दवाई सुंदरी' का म्हणू नये ? हा प्रश्न त्यांना पडतो.

या सर्व प्रवासात जिथं निसर्गाची भव्यता किंवा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची प्रतिभावान माणसं भेटली की, पुलं नम्र होतात. भारावून जातात. कातर होतात.



कृतज्ञतेइतकं सुंदर जगात काही नाही आणि
माणसाच्या कृतघ्नतेइतकं कुरूप काही नाही

फ्लॉरेन्स शहरातील चर्चमधील सुरांच्या लाटांनी प्रचंड वास्तू भारून टाकणारे ऑर्गन्स त्यांना देवत्वाचा साक्षात्कार घडवतात. एक रंग-रूप-रस-स्पर्श गंध या संवेदनांचा सोहाळा या त्रिखंडातील प्रवासात पुलंनी अनुभवला आणि रसिकांसाठी शब्दबद्ध केला. ''आयुष्यात अनेक दिशांतून साद आली; काहींना प्रतिसाद दिला; पण कितीतरी हाकांना आणि खुणांना ओ द्यायची राहून गेली याची खंत अंत:करणात लहानशी कळ उठूवन गेली.'' असं ते म्हणतात. तरीही या सादेला त्यांनी दिलेला प्रतिसाद रसिकांना मात्र भरपूर आनंद देऊन जातो हे निश्चित. पुलंच्या प्रवासवर्णनांनी वेगवेगळ्या देशात फिरताना आलेले अनुभव तर दिलेच पण रसिकतेनं प्रवास करण्याची दृष्टीही मराठी माणसाला दिली.

**पुलंची व्यक्तिचित्रणे**

पुलंच्या सर्व साहित्यात त्यांची व्यक्तिचित्रं ही सदैव ताजी अंत:करणाला भिडणारी अशी आहेत. व्यक्ती आणि वल्ली, गणगोत, गुण गाईन आवडी, मैत्र हे चार संग्रह याचे निदर्शक आहेत. यांतील 'व्यक्ती आणि वल्ली' मधील व्यक्तिरेखा काल्पनिक आहेत. ही चित्रं प्रत्ययकारी होण्याचं कारण म्हणजे त्या माणसांचं दिसणं-वागणं-लकबी-भाषा-पेहराव- त्यांच्या भोवतालची माणसं हे सगळं त्यांनी मूर्तिमंत उभं केलं. म्हणून आजही एखाद्या पुस्तकातील किड्याला आपण 'सखाराम गटणे' म्हणतो. किंवा लग्नातील हरकाम्याला 'नारायण' म्हणतो. यांतील एक व्यक्ती दुसऱ्यासारखी नाही. त्यांचे सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्तर वेगळे, त्यांची जीवनविषयक तत्त्वज्ञानं वेगळी, सुखदु:खं वेगळी ! पुलंचं सर्वांत मोठं वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या लेखनातून सतत व्यक्त होणारी मध्यमवर्गीय संस्कृती. त्यामुळे पुलं मराठी वाचकांना इतके भावले, आवडले; नुसते आवडले इतकंच नव्हे तर हा लेखक त्यांना अगदी आपला, आपल्या घरातला असा वाटला. पुलंशी त्यांचं अभिन्न, उत्कट असं नातं जडलं. ही आपुलकी, ही जवळीक फार थोड्या लेखकांच्या वाट्याला येते. 'कुटुंबसंस्कृतीने त्यांना दिलेली भावनिक संवेदनशीलता, तिचा प्रामाणिक उमाळा यांतून त्यांच्या व्यक्तिरेखा साकार होतात!' अशा शब्दांत शांताबाई शेळके यांनी त्यांच्या लोकप्रियतेचं मार्मिक विश्लेषण केलं आहे.

पुलंचा लोकसंग्रह खूप मोठा! ज्या ज्या व्यक्ती ज्येष्ठ, आदरणीय आणि आपली वाटली अशा व्यक्तींचा त्यांनी सामान्यांना परिचय करून दिला. मग ते बाबा आमटे असोत, हिराबाई बडोदेकर, बेगम अख्तर यांच्यासारख्या थोर गायिका असोत. व्यक्तीच्या बाह्य रंगरूपापासून वर्णनाला सुरुवात करायची आणि अंतरंगाच्या गाभ्यापर्यंत पोचायचं ही त्यांची व्यक्तिचित्रणाची खास पद्धत.

'गणगोत'च्या प्रस्तावनेत ''आपुलकीच्या डोळ्यांनी पाहताना मला जे दर्शन घडलं त्याची ही चित्रे'' असं पुलं म्हणतात. 'गुण गाईन आवडी' या संग्रहाच्या शीर्षकातूनच त्यांची भूमिका स्पष्ट होते. गायक वसंतराव देशपांडे, कुमार गंधर्व, इरावती कर्वे, डॉ. लोहिया, लता मंगेशकर इ. व्यक्तिरेखा रेखाटताना पुलंची गुणग्राहकता व रसिकता यांचं दर्शन होतं. या कर्तृत्ववान व्यक्तींच्या गुणांची आरास त्यांच्या अंत:करणात सदैव मांडलेली आहे. 'मैत्र'मध्ये ग.दि.मा., केसरबाई, चि. त्र्यं. खानोलकर यांच्यावरचे सुंदर मृत्युलेख, ज्योत्स्ना भोळे, माणिक वर्मा यांना भरभरून दाद देणारे लेख यांचा समावेश आहे. अनेक प्रतिभावंत व स्नेही या सर्वांच्या मैत्रीचं सुंदर चांदणं, पुलंनी व्यक्तिचित्रणातून रसिकांपर्यंत पोहोचवलं.

ही सर्व व्यक्तिचित्रं वाचताना सर्वांत महत्त्वाचं जाणवणारं वैशिष्ट्य म्हणजे, किती विविध क्षेत्रांतील माणसं पुलंनी मैत्रीच्या धाग्यानं जोडली होती! जीवनाच्या, समाजाच्या - साहित्य, कला, संगीत, राजकारण कुठल्याही क्षेत्रातील माणसं त्यांना वर्ज्य नाहीत. यशस्वी व्यक्तींबरोबरच सिनेमा स्टुडिओतला हरकाम्याही पुलंना तितकाच महत्त्वाचा वाटतो.

या व्यक्तींची बाह्यरूपं पुलं हुबेहूब नजरेसमोर उभी करतात, मग ती कल्पनेतील असोत की वास्तवातील! सखाराम गटणे पहिल्यांदा दिसतो तो ''चेहऱ्यावर हवा गेलेल्या फुटबॉलचा भाव... अर्ध्या विजारीत पांढरा सदरा खोचलेला, नाकासमोर गांधी टोपी घातलेला, लहानसे भावशून्य डोळे, काळा रंग, वेडेवाकडे दात...'' असा. हिराबाई बडोदेकरांच्या तेजस्वी, भावपूर्ण डोळ्यांत त्यांना त्यांच्या गळ्यातील मोत्याच्या सराचं पाणी दिसतं.

अशा वर्णनातून ही माणसं न पाहिलेल्यांनाही पाहिल्यासारखी वाटू लागतात. या व्यक्तिरेखा सजीव करत असताना त्या व्यक्तींचा संपूर्ण परिसर ते जिवंत करतात. उदा. 'नारायण'ची व्यक्तिरेखा लिहिताना जुन्या काळचं लग्नघर, तेथील माणसांचे स्वभावविशेष, दागिन ेखरेदी, लग्नातले रुसवे-फुगवे इ. प्रसंग ते तपशीलाने, नाट्यमय भाषेत वर्णन करतात.

व्यक्तिचित्रांपैकी बहुतेक माणसं वयानं, कर्तृत्वानं ज्येष्ठ अशी आहेत. त्यामुळे मुलं त्यांच्यापुढे नतमस्तक होतात.त्यांच्या या गुणाचा गौरव आचार्य अत्रे यांनी पुढील शब्दांत केला आहे.

''पुलंच्या अंत:करणात मधुरा भक्तीची आर्तता आहे. म्हणून त्यांची व्यक्तिचित्रं इतकी जिवंत उतरली आहेत. व्यक्तींचा व्यासंग कसा करायचा हे जर कुणाला शिकायचं असेल तर प्रमाणग्रंथ एकच - पु. ल. देशपांडेलिखित 'गणगोत' !''

ज्योत्स्नाबाई भोळे यांच्यासारखी गायिका ज्या पद्धतीनं नवशिक्या विद्यार्थ्यांच्या श्रद्धेनं गाण्याची तालीम करते, त्यामुळे पुलं प्रभावित होतात. बाबा आमटयांनी आनंदवनात नवजीवन प्रकल्प उभा करताना घेतलेले कष्ट ते भरभरून वर्णन करतात. इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे शिवरायांच्या पावलांच्या खुणा शोधत रानोमाळ हिंडतात; शिवचरित्राचं धन गोळा करतात ही ध्येयनिष्ठा, हे भारावलेपण, एखाद्या गोष्टीचं वेड पुलंना मोहवतं.

सर्वच व्यक्तिचित्रांचे शेवट हृद्य, मनाला चटका लावणारे, अतिशय परिणामकारक आहेत. आजी म्हणजे 'बाय' यांच्याबद्दलच्या लेखाचा शेवट पाहा.

'आज तुळशीच्या पानाने बायच्या आठवणी जागवल्या. मी पुन: एकदा लहान लहान झालो. ती वारली तेव्हा मी शेकडो मैल दूर होतो. दिवसा पत्र वाचले आणि रात्री उशीत मान खुपसून लहान होऊन मुळूमुळू रडलो. मला लहान करण्याचं सामर्थ्य बायच्या आठवणीखेरीज दुसऱ्या कशातही नाही.'

चितळे मास्तर, पुलंचा वर्गमित्र मुकुंदाकडे येतात. त्याच्या पोलिओ झालेल्या मुलीला गोष्ट सांगतात आणि त्या नादात चपला विसरून बाहेर येतात. त्या आणून देण्याची 'जुनी सेवा' लेखक बजावतो. 'मी वर गेलो. मुकुंदाच्या चपलांच्या स्टँडवरून मास्तरांच्या चपला शोधणे अवघड नाही गेले - कुठल्याच चपलांच्या टाचा इतक्या झिजलेल्या नव्हत्या!' यातील कारुण्य वाचकांच्या डोळा पाणी आणते.

अर्थात विनोदाची पखरण, चटपटीत वाक्यरचना या त्यांच्या नेहमीच्या शैलीच्या वैशिष्ट्यांमुळे पुलंची व्यक्तिचित्रे बांधेसूद, अंतर्बाह्य मोहक आहेत; म्हणूनच ती सदासर्वकाळ वाचनीय ठरतात.

रानावनात एखादं झाड फुलांफळांनी बहरून यावं तसा पुलंचा विनोद स्वयंभू होता. विनोदाची जातिवंत आणि उत्स्फूर्त खेळकर वृत्ती त्यांच्या स्वभावातच होती. तिच्या तळाशी असलेला मिस्किलपणा आणि खिलाडूपणा मुळातलाच होता. पुलंनी हसण्याला एक सुसंस्कृत रूप दिलं. अभिरुचीचे भान कधी सोडलं नाही. त्यांचा विनोद व्यक्तिगत चारित्र्यहननपर कटुता निर्माण करणारा नव्हता. प्रसंगी स्वत:चीही छानशी खिल्ली त्यांनी उडवली. 'विनोद म्हणजे जीवनाच्या विसंगतीवरचं सहृदय भाष्य' या व्याख्येत बसणारं लेखन त्यांनी केलं. विनोदाच्या साहाय्याने ते माणसांच्या अंतरंगाचा ठाव घेत. संगीतात त्यांचा विनोद भिजलेला असल्यामुळे ते कधीही बेताल, बेसूर होत नाहीत. जन्म आणि मृत्यूच्या रूपाने माणसाची झालेली फसवणूक उमगली म्हणजे 'हसवणूक' हा एकच त्यावर उपाय माणसाच्या हाती राहातो' अशा एका वाक्यात त्यांनी स्वत:चं विनोदाचं

---

पुलंच्या लहानपणचा एक प्रसंग त्यांची चुणूक दाखविणारा आहे. ते चौदा-पंधरा वर्षांचे असताना लोकमान्य सेवा संघात साहित्यसम्राट न.चिं. केळकरांचं व्याख्यान होतं. व्याख्यानानंतर श्रोत्यांना प्रश्न विचारण्याची मुभा होती.

त्या काळी भारतानं फेडरेशन स्वीकारावं, की स्वीकारू नये. यावर चर्चा चालू होती. शाळकरी पुरुषोत्तम उभा राहिला आणि त्यानं तात्यासाहेबांना फेडरेशन स्वीकारावं, की स्वीकारू नये, असा प्रश्न धीटपणे विचारला.

त्यावर तात्यासाहेबांनी उत्तर दिलं, ''स्वीकारू नये, पण राबवावं.'' यावर पुरुषोत्तम म्हणाला,''मला आपलं उत्तर कळलं नाही.''

तेव्हा समजावणीच्या सुरात ते म्हणाले,''बाळ, आपल्याला कळेल, असाच प्रश्न लहान मुलांनी विचारावा.'' त्यावर पुरुषोत्तम लगेच म्हणाला, ''पुण्याला सध्या अंजिरांचा भाव काय आहे ?''

तात्यासाहेबांचं काही उत्तर येण्यापूर्वीच सभागृह श्रोत्यांच्या हसण्यानं भरून गेलं.

---

अध्यात्म सांगितलं आहे.


पुलंच्या व्यक्तिमत्त्वाचा दातृत्व हा पैलू त्यांचं माणूस म्हणून मोठेपण दाखवून जातो. आपल्याला आवडलेल्या सामाजिक महत्त्वाच्या कामासाठी आपला वेळ, मन, बुद्धी, याचबरोबर कार्याच्या उभारणीसाठी आर्थिक मदत पु.ल.देशपांडे यांच्या प्रतिष्ठानने पुरवली आहे. पुण्याचे मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, पुणे मराठी ग्रंथालयाचा बालविभाग, देवदासींसाठीचा उत्थान प्रकल्प अशा अगणित संस्थांना त्यांच्या प्रतिष्ठानने रोख रकमा, पुस्तकं, यंत्रसामग्री अशा रूपात देणग्या दिल्या. पैशासाठी चांगली कामं खोळंबू नयेत, या हेतूने जवळजवळ १ कोटीच्या घरात देणगीची रक्कम दिली. कुठलाही गाजावाजा न करता हे काम केलं. आपल्या या कृतीनं हसण्याबरोबर सामाजिक ऋण मानण्याचा संदेश त्यांनी दिला. नुसतं हसवलं नाही तर 'कशाला हसू नये' हे देखील शिकवलं. सहृदयता, निर्मळ माणुसकी यांचा वस्तुपाठ स्वत:च्या जगण्यानं घालून दिला. समाजाला मूल्यविवेक दिला.

एकूणच ज्येष्ठ साहित्यिक, विनोदकार, नाटककार, गायक, अभिनेता, समाजऋणाचं भान असणारा दाता, माणसांवर प्रेम करणारा एक मित्र अशा विविध भूमिका जगणारं 'पुलं' नावाचं चैतन्य आज आपल्यात नसलं तरी मराठी माणसाच्या मनात कायमचं घर करून राहील. पुलंच्या आईने एका पत्रात म्हटले आहे. 'भाईचे लिखाण हा माझ्या जिवाचा विरंगुळा आहे. मन सैरभैर झाले की भाईचे एखादे पुस्तक घेऊन मी वाचीत बसते. वाचता वाचता एका वेगळ्याच मुक्त साम्राज्यात गेल्याचा भास होतो व मनाला शांतता लाभते.' हे उद्गार म्हणजे केवळ मुलाचं आईने केलेलं कौतुक नव्हे तर पुलंच्या जगभरच्या चाहत्यांच्या अनुभवांचा हा प्रतिनिधिक उद्गार आहे असं म्हणता येईल आणि त्यांच्या वाङ्मयाचं हेच कदाचित सर्वांत अर्थपूर्ण मूल्यमापन ठरेल.

***

**शैलजा देशमुख**
ब-७/५, गुरुराज सोसा.
पद्मावती, पुणे ३७

# पु.ल. एक वैभव



पु. ल. एक वैभव होतं
महाराष्ट्राचं धन होतं
सर्वांनाच हसवणारं
हसवताना रडवणारं
एक अजब रसायन होतं ।।१।।

साहित्याचा सम्राट होता
अनभिषिक्त राजा होता
ज्याच्यापुढे विनम्र व्हावं
असा माणसातला देव होता ।।२।।

घोंघावणारं वादळ आता
पंचभुतात विलीन झालं
भरभरून जगणारं
जीवन आता अतीत झालं ।।३।।

काय करू काय नको
कसा असू कसा नको
कसं हवं कसं नको
साहित्यातून उमटत होतं ।।४।।

सरस्वती नांदत होती
काली देखील तेथे होती
तरी देखील 'मी'पणाचा
वसा त्याने घेतला नाही ।।५।।

कर्मयोगी गीतेतील जो
अखेरपर्यंत लिहीत जातो
मराठीतील कालिदासच
तुलना याला अन्य नसे ।।६।।

भक्तियोगी जीवन जगला
उत्कटतेने बोलत राहिला
चौदा विद्या, चौसष्ट कला
नवरसांचा भोक्ता ठरला ।।७।।

संसारात रमून ज्याने
वैराग्याचा वसा घेतला
न्यास स्थापून वैभव जो
मुक्तपणे देत राहिला ।।८।।

एक वेडा फकीर अन्
एक चांगला माणूस गेला
मुक्तपणे वावरणारा
'आनंद' जणू निघून गेला ।।९।।

काळापुढे सर्व सारखे
हे जो जाणून होता
आपल्या आधिव्याधींवरही
'विनोद' जो करत होता ।।१०।।

'व्यक्ती' म्हणून आता नाही
पण ग्रंथांतून पाहात राहू
विचारधन उरी ठेवून
पुलंची सोबत सदा ठेवू ।।११।।

***

**सौ. मृदुला पाठक.**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे - ३०.

# जग्वार वाघाशी झुंजणारा किशोर

**'ॲटक्ड बाय माऊंटन लायन' या मूळ इंग्लिश कथेचा स्वैर अनुवाद.**

**चौदा वर्षांचा केन नाताळच्या सुट्टीत गिर्यारोहणासाठी निघाला. दुपारी बाराच्या सुमाराला एका हिमाच्छादित पठारावर तो पोहोचला. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. समोरच हिरव्यागार झाडीचे एक गर्द बन त्याला दिसले. चालता चालता त्याच्या एका बुटाचा बंद सैल झाला. खाली वाकून बंद बांधून तो सरळ झाला. त्याच क्षणी ---- -------- झाडांच्या फांद्यांवरून पक्षी कर्कश्श स्वरात ओरडले. पानांआड त्याला काहीतरी हालचाल झालेली दिसली. प्रथम दोन त्रिकोणी, टोकदार कान त्याला वर आलेले दिसले. नंतर हिरव्याकंच डोळ्यांची जोडी दिसली... पुढे काय झालं ते वाचूया विजय देवधर यांच्या अत्यंत रोमहर्षक व चित्तथरारक अशा या साहसकथेत.**

नाताळ सणानिमित्त केनच्या वडिलांनी त्याला लांब पात्याचा, नक्षीदार मूठ असलेला एक दुधारी सुरा भेट म्हणून दिला, तेव्हा स्वारी जाम खूश झाली. अवघ्या १४ वर्षांच्या केनला गिरिभ्रमणाची अतिशय आवड होती. त्याच्या शाळेला जेव्हा सुट्टी पडत असे, तेव्हा तो कोणत्या ना कोणत्या तरी ट्रेकिंगच्या मोहिमेला अगदी आवर्जून जात असे. लॉस एंजेलिसमध्ये केन मॉर्गन आपल्या आई-वडिलांबरोबर राहात असे.

१९७६ मधली नाताळची सुट्टी केनच्या दृष्टीनं विशेषच आनंदाची ठरली. कारण त्याला घेऊन त्याचे आई-वडील त्या थंडीमधे कोलोराडोमधल्या 'रे' गावाच्या बर्फाच्छादित पर्वत-राजीमध्ये सहलीला जाणार होते. नाताळनिमित्त केनच्या शाळेला सुट्टी लागली. पण त्याच सुमारास केनच्या वडिलांना - डॅनियल मॉर्गन यांना त्यांच्या ऑफिसमध्ये काहीतरी महत्त्वाचं काम निघालं. त्यामुळे केन आपल्या आईसह कोलोराडोमधल्या 'रे' या गावाला रवाना झाला. त्याचे वडील ऑफिसातलं काम संपवून त्यांच्या मागोमाग २५ डिसेंबरला त्या गावाला पोहोचणार होते.

'रे' गावातल्या एका डोंगराळ प्रदेशातल्या 'हॉलिडे रिसॉर्ट'वर मॉर्गन कुटुंबानं एक टुमदार कॉटेज दहा दिवसांकरता भाड्यानं घेतली होती. केन आणि त्याची आई ही दोघं २१ डिसेंबरला त्या हॉलिडे रिसॉर्टवर पोहोचली आणि त्यांनी तिथे घेऊन ठेवलेल्या कॉटेजमध्ये मुक्काम केला. २२ डिसेंबरची सकाळ उजाडली, तेव्हा केन कॉटेजमधून बाहेर आला आणि त्यानं सभोवतालच्या आसमंतावरून नजर फिरवली. आदल्या रात्री हिमवृष्टि झाल्यामुळे चौफेर पांढऱ्याशुभ्र हिमाचे थर पसरले होते. आसपासच्या झाडांचे शेंडे मऊ हिमानं आच्छादले होते. एखाद्या ख्रिसमस भेटकार्डावरल्या नयनरम्य दृश्यासारखाच सभोवतालचा सगळा परिसर मोठा मनोहारी दिसत होता. ते विलोभनीय दृश्य बघून केन आनंदानं हरखून गेला. हॉलिडे रिसॉर्टच्या पाठीमागे असलेल्या डोंगराळ प्रदेशातले डोंगरमाथे आणि त्यांच्यावर असलेली वृक्षराजी हिमानं न्हायल्यामुळे फारच आकर्षक दिसत होती. बाहेर दिसणाऱ्या थंडीच्या मोसमातल्या त्या विलोभनीय दृश्याचं काही वेळ अवलोकन केल्यानंतर केन कॉटेजमध्ये गेला. त्याच्या आईनं कॉफी तयार केली होती. आईबरोबर त्या गरमागरम नि फेसाळ कॉफीचा आस्वाद घेता घेता केन म्हणाला,

''आई ! मी आज पाठच्या भागामध्ये असलेल्या डोंगराळ प्रदेशात एक फेरफटका मारायला जाणार आहे.'' ''अगदी खुशाल जा! पण फार लांब मात्र जायचं नाही हं! संध्याकाळ व्हायच्या आत कॉटेजवर परत यायचं. आलं ध्यानात ?'' आई त्याला म्हणाली.

सकाळचा ब्रेकफास्ट घेतल्यानंतर केननं ट्रेकिंगसाठी आवश्यक असलेली तयारी केली. आपल्या कॅनव्हासच्या 'रक्-सॅक'मध्ये म्हणजे पाठीवर घ्यायच्या पिशवीमध्ये त्यानं काही खाद्यपदार्थ आणि पिण्याच्या पाण्याची एक वॉटरबॅग ठेवली. कॉफीची पूड असलेली एक पुडी, इनॅमलचा एक मोठा मग, काडेपेटी, लोकरीची एक जादा जर्सी आणि पहाडी प्रदेशामधल्या

बर्फामधून जाताना सुलभतेनं चालता यावं म्हणून रबराचे विशिष्ट तऱ्हेचे जाड तळ असलेली खास बुटांची एक जोडी अशा सर्व वस्तूदेखील त्यानं आपल्या पिशवीमध्ये भरून घेतल्या. मग त्यानं ट्रेकिंगच्या दृष्टीनं सुयोग्य असा पोशाख केला. जाड वूलनच्या कापडाची चुस्त फुलपँट, लांब बाह्यांचा फ्लॅनेलचा उबदार शर्ट, त्यावर हाफ स्वेटर, डोक्यावर गच्च बसणारी नि कान झाकणारी लोकरी टोपी, पांढरे हातमोजे, पायमोजे, कॅनव्हासचे बूट असा सगळा जामानिमा त्यानं केला. वडिलांनी भेट दिलेला लांब पात्याचा सुरा त्यानं अगदी आयत्या वेळी 'रक-सॅक' मध्ये भरलेल्या सामग्रीवर ठेवला आणि तिची 'झिप' लावत तो आईला म्हणाला, ''बाबांनी दिलेला सुरा मी मुद्दामच बरोबर नेतोय. झाडांच्या फांद्या छाटण्यासाठी मला तो उपयोगी पडेल. वर डोंगराळ प्रदेशात फिरताना जर फार थंडी वाजली तर फांद्या तोडून मी मस्त शेकोटी पेटवीन.''

सगळी तयारी झाल्यानंतर रक्सॅकचे पट्टे खांद्यांवर अडकवत केननं ती आपल्या पाठीवर घेतली. आईचा निरोप घेऊन तो कॉटेजमधून बाहेर पडला नि पिछाडीला असलेल्या डोंगराळ भागाच्या दिशेनं चालू लागला. त्या वेळी सकाळचे दहा वाजले होते. रमतगमत केन एक टेकडीवजा चढण चढून गेला. समोर एक पाऊलवाट डोंगराळ पर्वतराजीमधे गेली होती. त्या वाटेवरून तो मौजेनं चालू लागला. पाहतापाहता हॉलिडे रिसॉर्ट बराच मागे राहिला..

सभोवताली नजर जाईल तिथपर्यंत पांढरंशुभ्र हिम पसरलेलं होतं. आजूबाजूची वृक्षराजी हिमानं आच्छादलेली असल्यानं निसर्ग-सौंदर्यात आणखी भरच पडली होती. सभोवतालचं सृष्टीसौंदर्य न्याहाळत केन खोल पर्वतराजीत पुढे पुढे चालत राहिला. डोंगराळ प्रदेशाची चढण आता थोडी अवघड नि समोर सरळ उंच गेलेली होती. त्यामुळे केननं एका खडकावर बैठक मारली. आपल्या रक्सॅकमधून पर्वत प्रदेशात वापरायचे जाड रबरी तळाचे खास बूट त्यानं बाहेर काढले. पायातले कॅनव्हासचे बूट काढून ते रक्सॅकमधे ठेवून त्यानं पाठीवर ती घेतली आणि तो पुढे चालू लागला. जसजशी चढण वाढत गेली तसतसं पायाखालचं हिम अधिक भुसभुशीत होत चाललं आहे, याची केनला जाणीव झाली. त्याच्या जाड रबरी तळाच्या बुटाखाली चिरडल्या जाणाऱ्या बर्फाच्या चुऱ्याचा चर्रचर्र असा आवाज होऊ लागला. एका डोंगरमाथ्यावर चढून तो आता समोर असलेल्या दुसऱ्या डोंगरमाथ्याच्या दिशेनं निघाला. पुढे डोंगराळ चढणीची वाट असल्यानं त्याच्या चालण्याचा वेग आता थोडा मंदावला होता. हळूहळू पावलं टाकत तो पुढे निघाला. चालताचालता धाप लागली की वाटेत थोडं थांबून तो दम खाई. श्वासोच्छ्वास थोडा जागेवर आला की पुन्हा आस्ते आस्ते पावलं टाकत तो चालू लागे. थोड्याच वेळात त्या पर्वत प्रदेशात तो बऱ्याच उंच ठिकाणी पोहोचला. वातावरणामध्ये आता विलक्षण गारवा पसरला होता. परंतु चालण्याच्या श्रमांमुळे केनला तो विशेष जाणवत नव्हता. डोंगराळ चढण वाढत चालल्यानं आणि पायामध्ये जड 'स्नो-शूज्' घातलेले असल्यानं त्याला हळूहळू चालावं लागत होतं. त्या गिर्यारोहणात श्रम पडत असले तरी केनला त्याची मौजच वाटत होती. कारण लॉस एंजेलिसमधल्या शहरी, दूषित हवेपेक्षा इथल्या पर्वतराजीमधली हवा किती ताजी नि शुद्ध होती ! केवढीतरी स्वच्छ नि आल्हाददायक होती. वेळोवेळी दीर्घ श्वास घेत ती शुद्ध हवा आपल्या छातीत भरून घेत केन मौजेनं मार्गक्रमण करू लागला. आपण आपल्या तळापासून किती दूर आलो आहोत याची त्याला काही कल्पनाही आली नाही. पण त्याची त्याला अजिबात फिकीर नव्हती. कारण हिमाच्छादित पर्वत प्रदेशामध्ये मनसोक्त भटकण्यासाठीच तर तो आला होता...!

दुपारी बाराच्या सुमारास केन एका हिमाच्छादित पर्वत पठारावर पोहोचला. बरीच वाटचाल झाल्यानं त्याला आता भूक लागली होती. म्हणून एक सोयिस्करशी जागा पाहून तो बसला. आपल्या रक्सॅक्मधून खाद्यपदार्थ आणि पाण्याची वॉटर बॅग त्यानं बाहेर काढली. मग सभोवतालची निसर्गशोभा न्याहाळत त्यानं अगदी सावकाशपणे खाणंपिणं उरकलं.

पोटामध्ये अन्न-पाणी जाताच त्याला हुशारी वाटू लागली, पण त्याचबरोबर थंडीही वाजू लागली. म्हणून त्यानं आपली फोमलेदरची पूर्ण बाह्यांची जर्सी काढून अंगात घातली. काही मिनिटं विश्रांती घेतल्यानंतर त्या हिमाच्छादित



पर्वत प्रदेशातून पुन्हा त्याचं मार्गक्रमण सुरू झालं.

आणखी थोड्या वेळानंतर तो दुसऱ्या एका हिमाच्छादित पर्वत पठारावर पोहोचला. तिथे समोर हिरव्यागार झाडीचं एक सुंदर बन त्याला दिसलं. त्या बनामध्ये एक पायवाट शिरून हिरव्या झाडीमध्ये अदृश्य झाली होती. मधला सपाट हिमाच्छादित भूभाग ओलांडून केन त्या बनापाशी पोहोचला. पाठीवरल्या रक्सॅकचे पट्टे नीट खांद्यांवर ओढून घेत समोर असलेल्या पायवाटेवरून त्यानं त्या बनामध्ये प्रवेश केला. हळूहळू पावलं टाकत तो त्या पायवाटेवरून बनाच्या अंतर्भागाकडे जाऊ लागला. हिरव्यागार दाट झाडांची गर्दी त्या बनात होती. झाडांचे शेंडे हिमानं माखलेले असल्यानं फारच सुंदर दिसत होते. चोहीकडे एक नीरव शांतता पसरली होती. झाडांच्या फांद्यांवर विहरणाऱ्या पक्ष्यांची किलबिल ती शांतता मधूनच भेदत होती. चालताचालता केनच्या एका बुटाचा बंद थोडा सैल झाला. म्हणून एका ठिकाणी थांबून, खाली वाकून तो घट्ट करत त्यानं नीट बांधला. बुटाचा बंद बांधून तो सरळ झाला. त्याच क्षणी - त्याच्या डोक्यावर असलेल्या झाडाच्या फांद्यांवरून पक्ष्यांच्या कर्कश्श किलबिलाटाचा संमिश्र आवाज त्याला ऐकू आला. तो किलबिलाट काही क्षण चालू राहिला नि मग एकदम थांबला. चोहिकडे पुन्हा नीरव शांतता पसरली. झाडांवरले पक्षी कर्कश्श स्वरात एकाएकी का ओरडले ?... आसपास काही धोका तर नाही ना? केनच्या मनामध्ये भरभर विचार आले आणि तेव्हाच - समोर असलेल्या एका झाडाच्या ठेंगण्या फांदीवरल्या पानांआड त्याला काहीतरी हालचाल झालेली दिसली ! त्यानं नीट लक्षपूर्वक पाहिलं, तेव्हा पानांच्या आडून प्रथम दोन त्रिकोणी टोकदार कान हळूच वर आलेले त्याला दिसले. नंतर हिरव्याकंच चमकदार डोळ्यांची एक जोडी हळूच वर आली आणि मग फिस्कारलेल्या मिशा असलेलं एक तोंड ! ते बहुधा एखादं रानमांजर असावं, असंच केनला प्रथम वाटलं. काही क्षण गेले आणि मग त्या प्राण्यानं झाडाच्या ठेंगण्या फांदीवरून खाली झेप घेतली आणि जमिनीवर उतरून तो दबा धरून बसला. केननं डोळ्यांना ताण देऊन नीट निरखून पाहिलं. तेव्हा फिक्कट पिवळसर अंगावर काळ्या रंगाचे लांबट गोलाकार छप्पे असलेलं, पूर्वी कधीही पाहिलं नव्हतं एवढं भलंमोठं रानमांजर त्याच्या दृष्टीस पडलं. जमिनीस सपाट असा दबकून बसलेला तो प्राणी मग अगदी हळूहळू उठून उभा राहिला आणि आपला जबडा वासून त्यानं गुरगुराट केला. त्याचे पिवळसर रंगाचे लांब नि तीक्ष्ण सुळे केनला दिसले आणि तेव्हा कुठे केनच्या एकदम ध्यानात आलं की आपल्या समोर उभा असलेला तो प्राणी रानमांजर नसून पर्वताळ प्रदेशातला, बिबळ्याच्या जातीतला, डोंगरी वाघ आहे ! ही भयानक वस्तुस्थिती ध्यानात येताच केनच्या उरात एकदम धडकी भरली. त्याचं हृदय जोरजोरानं धडधडू लागलं. पण लगेच त्यानं स्वत:ला सावरलं.





गर्द वनातुन समोर आला महाकाय आकार,
पर्णांच्या गर्दीत कुणाचा, भयकारी चित्कार.

जंगलातून जाताना एखादा हिंस्त्र वन्य प्राणी अकस्मात् समोर येऊन उभा ठाकला तर काय काळजी घ्यावी नि स्वत:चा कसा बचाव करावा या विषयावरला पूर्वी वाचलेला एक लेख त्याला अचानक आठवला 'असा वन्य प्राणी समोर आला तर अजिबात घाबरू नका... धीटपणे अगदी निश्चल उभे राहा नि त्याच्या नजरेला नजर भिडवा... तुम्ही भ्यायला आहात, असं जर समोरच्या प्राण्याला दिसलं तर तो तुमच्यावर तात्काळ हल्ला चढवतो हे लक्षात ठेवा... पापणी न लववता त्याच्याकडे एकटक पाहात राहा... तुमचा धीटपणा पाहून तो प्राणी तुमच्यावर हल्ला न करता निमूटपणे बाजूच्या जंगलात निघून जाईल...!'

केनला ते सर्व नियम भर्रकन आठवले. पण अशा गोष्टी वाचणं आणि त्या प्रत्यक्ष अनुभवणं यात जमीन-अस्मानाचं अंतर असतं. भिऊ नका, हे सांगणं सोपं असतं पण अशा बिकट स्थितीत न घाबरणं हे तितकंच अवघड असतं...! तथापि सारं अवसान एकवटून, प्रसंगावधान राखून, त्या वाघाशी सरळ नजर भिडवून केन अगदी स्तब्धपणे उभा राहिला. काही क्षण ते दोघं एकमेकांकडे बघत अगदी तटस्थपणे उभे राहिले. तो जग्वार वाघ आपल्या भक्ष्याला जणू आजमावत होता.

आणि....

आणि अकस्मात् आपल्या मागच्या पायांना रेटा देऊन एखाद्या स्प्रिंगप्रमाणे त्या वाघानं केनच्या अंगावर उडी घेतली. त्याबरोबर घाबरून केन मोठ्यानं ओरडला. वाघाचं धूड अंगावर आदळताच त्याच्यासकट तो खालच्या बर्फामधे उताणा आदळला. तो वाघ आता त्याच्या उरावर स्वार झाला होता. मोठ्यानं गुरगुराट करत त्यानं आपला जबडा वासला. त्याबरोबर आता अगदी जवळून केनला त्याचे तीक्ष्ण सुळे दिसले नि प्राणभयानं मोठ्यानं किंकाळी फोडत आपल्या चेहऱ्याचा बचाव करण्याकरिता त्यानं जोरानं पलटी घेतली. त्याच्या वळण्यामुळे वाघ बाजूला ढकलला गेला व क्षणभर त्याच्या देहावरून दूर झाला. हाता-गुडघ्यांचा आधार घेत केननं उठण्याचा प्रयत्न केला. पण त्याच वेळी वाघानं त्याच्या पाठीवर झेप घेतली. केनच्या पाठीवर कॅनव्हासची रक्सॅक असल्यामुळे वाघाच्या तीक्ष्ण नख्यांपासून त्याच्या पाठीचा बचाव झाला. पण त्यामुळे वाघ चिडला आणि केनच्या डोक्याच्या मागल्या भागावर आपल्या पंजांनी तो फटकारे मारू लागला. त्याबरोबर त्याच्या मस्तकाच्या मागची त्वचा सोलली जावी तशी ओरबाडली गेली आणि तिथून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. त्या वेदनांनी केन जिवाच्या आकांतानं किंचाळला. वाघ आपल्या कराल जबड्यात त्याची मान पकडण्याचा प्रयत्न करू लागला. पण मोठमोठ्यानं किंकाळ्या फोडत केन आपलं मस्तक दोन्ही बाजूंना हलवू लागला; त्यामुळे त्याची मान धरणं वाघाला जमेना. वाघानं अचानक हल्ला चढवल्यामुळे केन इतका घाबरून नि गोंधळून गेला होता की आपल्या पाठीवरल्या पिशवीत लांब पात्याचा सुरा आहे याचा त्याला काही क्षण विसरच पडला होता !... आणि

आणि ती आठवण झाली, तेव्हा त्याच्या अंगात एकदम अवसान संचारलं ! सगळी शक्ती एकवटून आपल्या पाठीला त्यानं जोराचा झटका दिला. त्यामुळे वाघाचं धूड बाजूला कोलमडलं. हाता-पायांवर पटकन उठत केननं एका हिसड्यात आपल्या एका खांद्यावरला रकसॅकचा पट्टा खाली उतरवला. त्याबरोबर दुसऱ्या खांद्यावरला पट्टा सैल होत गर्रकन वळून रकसॅक त्याच्या पुढ्यात आली. निमिषार्धात तिची झिप उघडून केननं तिच्यात हात खुपसला आणि त्याच्या हाताला सुऱ्याची मूठ लागली. त्यानं सुरा रक्सॅकमधून काढला असेल नसेल तोच त्या वाघानं पुन्हा केनच्या अंगावर झेप घेतली. दोघंही पुन्हा धाडकन खालच्या बर्फात आदळले आणि केनच्या हातातला सुरा निसटून बाजूला जाऊन पडला! केनच्या उरावर स्वार झालेला वाघ पंजांचे फटकारे मारत त्याला ओरबाडू लागला. त्याचे चावे घेण्याचा प्रयत्न करू लागला. किंचाळत जोरजोरानं लाथा झाडत केन त्याचा प्रतिकार करू लागला. एकीकडे आपला उजवा हात शक्य तितक्या लांब फेकत, बोटांनी चाचपडत, जमिनीवरल्या चाकूचा शोध घेऊ लागला. वाघाच्या जबड्यापासून आपल्या चेहऱ्याचं संरक्षण करण्यासाठी डावा हात दुमडून तो त्यानं चेहऱ्यावर धरला



कुठे पिऊन घेतले त्याने नदीतल्या जळा।
दिले वाऱ्याने कोठल्या, बळ हत्तीचे त्याजला।

होता. त्यामुळे चिडून वाघानं तोच आपल्या कराल जबड्यात पकडला. केनच्या अंगात असलेल्या जर्सीच्या मऊ फोम लेदरमध्ये वाघाचे तीक्ष्ण सुळे घुसले. त्यानं आपल्या मस्तकाला एक जोराचा झटका दिला. त्याबरोबर सुळे केनच्या डाव्या हाताच्या मांसात रुतले आणि दुसऱ्याच क्षणी जर्सीची बाही फाटून गेली नि तिच्याबरोबरच केनच्या हाताचं मांसही ओरबाडलं गेलं! हातामधल्या नसा फाटत गेल्याची भीषण जाणीव केनला झाली आणि तो वेदनांमुळे मोठ्यानं ओरडला. वेदनांनी कळवळल्यामुळे त्यानं जोरानं लाथ झाडली. जाड तळाच्या बुटाची लाथ वाघाच्या मऊ पोटावर बसली नि त्या आघातानं तो केनच्या देहावरून खाली ढकलला गेला. ती संधी साधून केन पटकन कुशीवर वळला आणि त्यानं आसपास नजर फिरविली. तेव्हा त्याच्यापासून अवघ्या सात-आठ फुटांवर पडलेला तो सुरा त्याच्या दृष्टीस पडला. सगळी शक्ती एकवटून पलटी घेऊन, लोळण घेत केननं त्या सुऱ्याकडे झेप टाकली. त्याच क्षणी चिडलेल्या वाघानं पुन्हा त्याच्यावर हल्ला चढवला. केनच्या देहावर स्वार होऊन आपल्या तीक्ष्ण नख्यांनी तो त्याला ओरबाडू लागला. पंजांनी फटकारे मारत त्याला चावे घेऊ लागला. आपल्या देहामध्ये जागोजाग वाघाचे तीक्ष्ण सुळे नि नख्या घुसत असल्याची जाणीव होऊन केन वेदनांनी मोठमोठ्यानं किंचाळू लागला. आखाड्यामध्ये एकमेकांवर उलथे पालथे पडलेले, कुस्ती खेळणारे पहेलवान, ज्याप्रमाणे जमिनीवर गोल गोल फिरतात त्याप्रमाणे केन आणि त्याच्या उरावर स्वार झालेला वाघ दोघंही जमिनीवर गोल गोल फिरू लागले ... !



तसं फिरत असताना केनच्या उजव्या हाताच्या चाचपडणाऱ्या बोटांना अचानक सुऱ्याचा स्पर्श झाला ! जिवाच्या करारानं चाचपडत केननं पटकन त्या सुऱ्याची मूठ पकडून तो उचलला आणि दात-ओठ खात त्वेषानं त्याचा जोरदार वार वाघावर केला. सुऱ्याचं धारदार नि तीक्ष्ण पातं वाघाच्या कुशीत घुसल्या- बरोबर त्यानं मोठ्यानं डरकाळी फोडत एकदम माघार घेतली. त्याबरोबर वेगानं पलटी घेत केन एकदम उठून बसला आणि सुऱ्याच्या मुठीवरली पकड घट्ट करत त्यानं तो सरसावून धरला. त्याच्या चेहऱ्यावरून रक्ताच्या धारा गळत होत्या. क्षणभर माघार घेतलेल्या वाघानं केनच्या अंगावर पुन्हा झेप घेतली. या वेळी तयारीत असलेल्या केननं पाठीवर खाली आदळत असतानाच वाघाच्या शरीरावर सुऱ्याचे खचाखच घाव घातले. त्याबरोबर वेदनांनी मोठ्यानं डरकाळ्या फोडत वाघ त्याच्या देहावरून एकदम बाजूला झाला. पण तत्पूर्वी केनच्या उजव्या हाताचा त्यानं जोरानं चावा घेतला. त्यासरशी जर्सीची उजवी बाही फाटून गेली नि त्याबरोबरच केनच्या हाताचं मांसही ओरबाडलं गेलं. वेदनांमुळे केन मोठ्यानं ओरडला. त्याच्या अंगावरून बाजूला झालेला वाघ काही फुटांवर उभा राहून जिभल्या चाटत त्याच्याकडे बघत होता. केननं केलेल्या सुऱ्याच्या वारांमुळे त्याच्या शरीरावरही जागोजाग जखमा झाल्या होत्या नि त्यांमधून रक्त गळत होतं...

धडपडतच केन पटकन उठून उभा राहिला. सुऱ्याच्या मुठीवरली पकड-जायबंदी झालेल्या उजव्या हातामधून तीव्र वेदना निघत असतानाही त्यानं अगदी घट्ट ठेवली होती...! काही क्षण वाघाची नि त्याची दृष्टादृष्ट झाली. वाघ पुन्हा आपल्यावर हल्ला चढवील या भयानं हातातला सुरा उगारत केननं तशाही जखमी अवस्थेत बेंबीच्या देठापासून एक जोरदार आरोळी ठोकली.

सभोवतालच्या आसमंतात ती आरोळी केवढ्यानं तरी दुमदुमली. आणि...

आणि त्या भयभीषण आरोळीमुळे म्हणा किंवा केननं धारण केलेल्या रुद्रावतारामुळे

म्हणा त्या वाघानं बाजूच्या झाडीत छलांग मारली आणि जंगलामध्ये वेगानं घुसत तो एकदम नाहीसा झाला ! वाघ पसार झाल्याचं पाहाताच केनच्या जिवात जीव आला. मग एक क्षणही वाया न दवडता तशा भयंकर जायबंदी अवस्थेत देखील झपझप पावलं टाकत दाट झाडीच्या त्या वनातून तो बाहेर पडला आणि वाट फुटेल त्या दिशेला भेलकांडत, हेलपाटत चालू लागला. त्याच्या देहावर जागोजाग झालेल्या भयानक जखमांमधून गळणारं लालभडक रक्त जमिनीवरल्या पांढऱ्याशुभ्र हिमावर ठिबकू लागलं...! त्या रक्तस्रावामुळे येऊ लागलेल्या अशक्ततेनं त्याचं मस्तक सुन्न बधीर बनलं...!! आपण कोणत्या दिशेला नि कुणीकडे चाललो आहोत याचं भान त्याला उरलं नाही... पण दातओठ खाऊन, वेदना सहन करीत नि मोठ्या कष्टानं एकेक पाऊल उचलत त्या हिमाच्छादित प्रदेशामधले डोंगराळ उतार उतरत तो चालत राहिला !! त्या वाटचालीदरम्यान आपल्या उजव्या हातामधल्या सुऱ्याच्या मुठीवरली पकड मात्र त्यानं यत्किंचितही सैल होऊ दिली नाही...

ïîî

केनच्या तोंडाला विलक्षण कोरड पडली होती. तहानेनं त्याचा घसा सुकला होता. रक्तस्रावामुळे त्याला भयंकर अशक्तपणा आला होता. आपली दृष्टी मंदमंद होत चालली आहे, अशी विलक्षण जाणीव त्याला होऊ लागली. वेळाकाळाचं तर त्याला काही भानच उरलं नव्हतं. आपण किती वेळ चालतो आहोत, किती अंतर काटलं आहे नि कोणत्या प्रदेशात पोहोचलो आहोत याची त्याला काही शुद्धच नव्हती. अशातच -

अंधुक बनत चाललेल्या त्याच्या दृष्टीला समोर काही अंतरावर असलेलं काटेरी तारांचं एक कुंपण नि त्यापलीकडे असलेली एक कॉटेज दिसली ...!

कष्टानं पावलं टाकत, तोल जात असल्यामुळं भेलकांडत कसातरी तो त्या कुंपणाला असलेल्या फाटकापाशी पोहोचला. तिथल्या कॉटेजच्या व्हरांड्यात, एक माणूस एका खुर्चीत बसलेला त्याला दिसला. ओढलेल्या स्वरात केन त्या माणसाला म्हणाला,''प्लीजऽऽ ! मला ... मला... मदत... करा...!'' रक्तानं न्हायलेला एक पोरगा मदतीची याचना करतो आहे हे पाहाताच तो माणूस उठून बाहेर धावला. फाटक उघडून त्यानं केनला आधार दिला नि त्याला विचारलं,''ओ गॉडऽऽ ! पोरा ! तुझी ही इतकी भयंकर दशा कशामुळे झाली ?''

''माझ्यावर.... माझ्यावर... पहाडी जग्वार वाघानं...हल्ला... केला होता... !'' अडखळत कष्टानं केन उत्तरला.

''माय गॉडऽऽ ! ओ माय गॉडऽऽ!'' असं म्हणत त्या माणसानं आधार देऊन केनला आपल्या कॉटेजमध्ये नेलं. त्याला एक ग्लासभर थंड पाणी पाजलं. केनला आता विलक्षण ग्लानी आली होती. आपली शुद्ध हरपते आहे अशी जाणीव त्याला होऊ लागली. ''माझं नांव... केन मॉर्गन... रे... गावातल्या हॉलिडे... रिसॉर्टवर माझी... आई आहे... तिला... तिला कळवा...आणि...मला...लवकर हॉस्पिटलात न्या...!'' एवढे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले आणि दुसऱ्याच क्षणी त्याची शुद्ध हरपली...!

त्या माणसाचं नाव माईक स्टील असं होतं. आपल्या =३८ पिस्तुलानं नेमबाजी करण्याचा सराव करण्यासाठी तो त्या डोंगराळ प्रदेशात आला होता. कपाळापासून तो मस्तकाच्या मागे, मानेपर्यंत केनची त्वचा फाटून जागोजाग जखमा झाल्या होत्या. त्याच्या दोन्ही हातांवर तर इतक्या मोठाल्या जखमा झाल्या होत्या की त्वचा फाटून बाहेर आलेलं मांस लोंबत होतं. आपली प्रथमोपचाराची पेटी काढून माणसानं- माईक स्टीलनं - केनच्या डोक्याभोवती आणि



दोन्ही हातांवर भराभर बँडेज गुंडाळली. नंतर त्याला आपल्या मोटारीत घातलं आणि कोलोराडोमधल्या 'मेरी क्राऊन हॉस्पिटल'च्या दिशेनं ती भरधाव वेगानं सोडली...

***

केनला शुद्ध आली आणि त्यानं डोळे उघडले, तेव्हा आपण हॉस्पिटलमधल्या कॉटवर आहोत आणि आपल्या डोक्याभोवती आणि दोन्ही हातांसह इजा झालेल्या शरीराच्या इतर अवयवांवरती बँडेजेस गुंडाळलेली आहेत, असं त्याला आढळून आलं. त्यानं मान वळवून बाजूला पाहिलं तेव्हा कॉटशेजारी आपले आई-वडील उभे असल्याचं त्याला दिसलं. त्यांच्याच बाजूला त्याला हॉस्पिटलात आणून सोडणारा माईक स्टील पण उभा होता. केननं आपल्या वडिलांकडे पाहिलं आणि अगदी क्षीण स्वरात तो म्हणाला, ''बाबा ! तुम्ही मला ख्रिसमसनिमित्त दिलेली भेट फार मोलाची ठरली... कारण केवळ तो सुरा मी बरोबर नेला होता म्हणूनच माझे प्राण वाचले...''

''तुझा तो प्राणरक्षक सुरा तू माझ्या कॉटेजवर आला होतास, तेव्हा तुझ्या हातामध्येच होता. तो मी तुझ्या बाबांजवळ दिला आहे.'' माईक स्टील त्याला म्हणाला, ''तुला हॉस्पिटलमध्ये आणून सोडल्यानंतर मी त्या वाघाचा माग काढत त्या जंगलात गेलो होतो. तेव्हा एका झाडाखाली आपल्या जखमांमधलं रक्त चाटत तो बसला होता. पिस्तुलाच्या एकाच गोळीनं मी त्याला खलास केलं. त्याचं कातडं मी तुला भेट देणार आहे.''

हे ऐकून केनच्या मुद्रेवर समाधानाचं स्मित चमकलं.

('अॅटॅक्ड बाय माऊंटन लायन' या मूळ इंग्लिश कथेचा स्वैर अनुवाद.)

***

विजय देवधर
७/१०० कामदा कॉम्प्लेक्स,
चिंचवड, पुणे - ३३

# करून पाहा

मुलांनो, आता तुम्हाला दिवाळीची सुट्टी लागेल. या सुट्टीत करून बघण्यासाठी आम्ही तुम्हाला 'सोप्या सोप्या कलाकुसरीच्या वस्तू' सुचवत आहोत.

एखादी वस्तू पैसे देऊन विकत आणण्यापेक्षा, स्वत: ती करून प्रिय व्यक्तींना भेट देण्यातला आनंद काही वेगळाच असतो नाही का?


चला तर मग, या वस्तू तयार करून पाहा आणि तुमच्या मित्रमैत्रिणींना, भावाबहिणींना भेट म्हणून अवश्य द्या.

तुम्ही काय काय करून पाहिलेत, हे आम्हाला कळवायला विसरू नका हं !

**१) रंगीबेरंगी पणत्या :-**

**साहित्य :-** मातीच्या पणत्या, ऑईलपेंट, आरसे, मणी, सोनेरी दोरी फेव्हिकॉल इत्यादी.

**कृती :-** प्रथम एक पणती घेऊन ती लाल, पिवळ्या, हिरव्या कोणत्याही गडद रंगाने पूर्ण रंगवून घ्या. त्यानंतर





चित्रात दाखविल्याप्रमाणे वरच्या बाजूस छोटे चौकोनी आरसे चिकटवून त्यांची ओळ पूर्ण करा. प्रत्येक आरशाच्या चारी टोकांना रंगीत मणी चिकटवा. आरशांच्या खालच्या बाजूला सोनेरी रंगाची दोरी नागमोडी आकारात चिकटवा.

अशा प्रकारे तुम्हास हव्या त्या पद्धतीने पणतीवर डिझाइन बनवून घ्या ! आता बघा बरं. त्या मातीच्या पणतीचे रंगरूप पूर्ण बदलून ती आता किती आकर्षक दिसत आहे ते !

**२) टाईलवरील कलाकृती :**

**साहित्य :-** काळ्या रंगाची टाईल, कॅमल फ्रोलिका कॉपर ट्यूब, कार्बनपेपर

कृती : ६'' ; ८'' आकाराची काळ्या रंगाची टाईल घ्या. मागील बाजूस अडकविण्यासाठी




फेव्हिकॉलने एक हुक लावा. टाईलच्या मध्यावर गणपतीचे चित्र किंवा तुम्हाला आवडणारं एखादं चित्र कार्बनच्या साहाय्यानं छापून घ्या. छापायचं नसल्यास स्वत: कोणतंही चित्र पांढऱ्या पेन्सिलने काढा. मुख्य चित्राच्या सभोवती सजविण्यासाठी फ्रॉलिका कॉपर ट्यूबच्या साहाय्याने नक्षी काढा. ज्याप्रमाणे आपण कोनाने मेंदी काढतो, त्याप्रकारे वेगवेगळी डिझाईन्स या ट्यूबच्या साहाय्याने काढा. अशा प्रकारे एक छानदार टाईलची फ्रेम तयार करा.

**३) आगळा वेगळा पंखा :**

**साहित्य :-** बांबूच्या दोन काड्या, (अंदाजे १२'' ते १५''), फेव्हिकॉल रंगीत कागद, रंगीत क्रेऑन्स, दोरा.

**कृति -** चित्रात दाखविल्याप्रमाणे प्रथम बांबूच्या काड्या दोऱ्याने बांधून





घ्या. पंख्याच्या आकाराचा कागद कापून घ्या. जितका जास्त उंचीचा कागद कापून घ्याल, तितक्या जास्त घड्या कागदाला पडतील. त्यावर आवडीप्रमाणे पानाफुलांचे डिझाईन आकर्षक रंगाने रंगवून घ्या.

कागदाला पंख्याप्रमाणे एका बाजूने सुरुवात करून घड्या पाडून घ्या.तयार झालेल्या पंख्याच्या दोन्ही बाजू दोन काड्यांवर चिकटवा.

तुमचा स्वत: तयार केलेला जपानी पंखा टिकल्या लावून अधिक आकर्षक करा. या पंख्याने तुम्ही वारा घेऊ शकता किंवा भिंतीवर शोभेची वस्तू म्हणून लावू शकता.

मित्रांनो, आपल्या आईला हा पंखा भेट म्हणून देऊन खुश करा आणि अर्थातच शाबासकी मिळवा.




***


**– संगीता केळकर**


७६८/९/१६, पी. वाय. सी. कॉलनी, ११ गीताली, पुणे ४




सौंदर्याचा वेध आपुली साथसंगत सोडत नाही।
चैतन्याच्या अंतापर्यंत भावबंधन तोडत नाही।

# नवी वाट

- रेणू दांडेकर



***कोकणातल्या एका खेड्यात राहाणारा दिनेश शालेय शिक्षण संपल्यावर प्रशिक्षणासाठी वर्षभर शहरात गेला. नव्या जाणिवा, नवे ज्ञान घेऊन परत आला. गावी परत येऊन संगणक मुलांना शिकवू लागला. पण आपल्या मातीला तो विसरला नाही. अशा दिनेशची, त्याच्या जगावेगळ्या आईची, सत्यकथा वाचूया त्याला प्रोत्साहन देणाऱ्या त्याच्या बाईंच्याच शब्दांत !***

''खरंच तुम्ही शिका कॉम्प्यूटर मॅडम.''

''हो रे ! पण वेळच होत नाही.''

''वेळ तुम्ही काढलात तर नक्की होणार.''

हा संवाद त्याच्यात आणि माझ्यात कितीतरी वेळा व्हायचा. माझ्या डोळ्यांपुढे तो कितीतरी वेळा कॉम्प्यूटरपुढे बसलेला मला दिसायचा. तो कॉम्प्यूटरपुढे बसलेला असायचा, तेव्हा त्याची पाठ माझ्याकडे असायची. खरंच मला शिकायचं नव्हतं, असं काही नाही; पण मनानं घेतलं नव्हतं. मनापासून ठरवलं नव्हतं. मनापासून ठरवलं जात नाही, तोपर्यंत ते घडेना.

''आता मात्र मी ठरवलंय बरंका रे! आणि तू मला शिकवायचं...''

''एकदम कबूल...''

''आणि हे बघ. मला वेळ नसला तरी तू मला बोलवायचं. सक्तीनं.''

''ओके...'' असं म्हणून तो त्या दिवशी कामाला लागला.

मी विद्यार्थी आणि तो माझा विद्यार्थी माझाच शिक्षक झाला.

हे सगळं बोलणं झालं माझ्यात नि दिनेशच्यात. एरवी आजकाल शहरात या संवादाला तसा अर्थ नाही. निम्म्या संवादापर्यंत तर अगदी निरर्थक. कुणीतरी कॉम्प्यूटर शिकायचा म्हणतंय आणि कुणीतरी शिकवणारं आहे. केवळ निरर्थक नाही तर निम्मा संवाद अगदी हास्यास्पदही वाटेल. कदाचित या संवादात महत्त्व वाटलंच कुणाला तर शिक्षक विद्यार्थी होतो नि तोच विद्यार्थी शिक्षक होतो. शिवाय एकमेकांचे. ही अदलाबदल किती आनंददायक ! एरवी असं घडतं - माझे विद्यार्थी शिक्षक होतात, पण माझेच शिक्षक होत नाहीत. आता तसं घडलं. नवल वाटतं ना ?- त्याचं असं घडलं-

वर्गात नेहमीच कमीतकमी ३०/४० मुलं तरी असतात. शिक्षक सगळ्या वर्गभर पाहात असतो. सगळ्यांशी बोलत असतो. सगळेजण सारखेच नाही लक्षात राहात. कधी सगळा वर्ग आठवतो. कधी मुलं दिसतात. आठवतात पण नाव नाही आठवत. काही मुलंच ठळकपणे लक्षात राहतात. या लक्षात राहण्यात फक्त हुशार मुलं असतात असं नाही. वेगळी मुलं लक्षात राहतात. कारण नंतरही शाळेच्या फांदीवरून ही मुलं उडून जातात, भरारी घेतात. ही भरारी विलक्षण असते. त्यांचे शाळेचे दिवस अगदी कणकण आठवतात. मुलं मला वाचतात. माझ्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या परीनं अर्थ लावतात. मी मुलांना वाचते. मी माझ्या परीनं त्यांचा अर्थ वाचते. मनापासून मला हे आवडतं. सततच हे घडतं असं नाही.

म्हणूनच हा वेगळा अनुभव होता. नेहमी मी ज्याला शिकवत आले आणि भूमिका निश्चित झाल्या. मी मॅडम; तो विद्यार्थी. हा भूमिकेतला बदल वठवताना खूप मजा वाटली. म्हणूनच जेव्हा मी माझ्या विद्यार्थ्याकडून शिकू लागले तेव्हा

मोठ्या वयाची विद्यार्थिनी नि इटुकला विद्यार्थी. दिनेश हा माझा विद्यार्थी असं म्हणतानाही तो मला माझा वाटतो, पण तेवढी त्याला मी त्याची वाटते का ? माहीत नाही. मी तसं मानते. माझा एक ग्रह असतो, मी त्याला शिकवलं. मी त्याला घडवलं. असंही घडलेलं असतं की मीही घडत असते, शिकत असते.

दिनेश जवळच्याच गावात राहायचा. त्याचं मूळ घर दूर होतं. दूरच्या गावात होतं, पण तो राहायचा आजोळी. तो म्हणजे त्याचं सगळं घर - आई, वडील, दोन भाऊ, बहीण आणि आजी - आजोबा. थोडीशी शेती. आई मजुरीवर जायची. वडील कायम आजारी. अंथरुणावर. दिनेश सगळ्यात मोठा. त्यालाही वाटायचं नि तेवढंच त्याच्या आईलाही वाटायचं तो शिकावा. त्याचं शिकणं दोघांनीही समजून घेतलं होतं. दोघंही वेगळ्या जाणिवेचे आहेत हे पहिल्या वर्षी जाणवलं नाही. पण दुसऱ्या वर्षी काही कारणानं तो बोलू लागला, त्याची आई भेटू लागली; तेव्हा जाणवलं. एक दिवस त्याची आई म्हणाली,''एवढं शिकला की संपला नाही. तुमचाच प्वार समजा. पुढचं पर तुमीच बघा. आमची परिस्थिती नाही. फुकाट काही नको. तो काम करील, शिकेल. पर ते तुमीच द्या...'' एरवी असं म्हणणारी आई भेटायची नाही. सर्वसामान्य आईची भूमिका 'मला कष्ट करावे लागले तर चालतील. पण तो शिकू दे.' दिनेशची आई मात्र वेगळी होती. ''मॅडम आमी शिकलो न्हाई. वाईच येतं लिव्हाया. पर माझ्या पोराचं अक्षर कसं ब्येस आहे... शाळेतनं आल्या आल्या अभ्यास करतो. आता काय बुकं वाचतो ते समजत न्हाय, पर सगळी पोरं जमत्यात. अभ्यास करतात.'' या आईला आपल्या मुलातलं चांगलेपण समजलं होतं. नि त्या चांगलेपणाला आकार मिळावा, असं वाटत होतं.

आजूबाजूच्या घरातल्या बापेगड्यांसारखेच दिनेशचे वडील पण प्यायचे. त्याच्या मते त्यात फरक एवढाच होता की इतरांचे वडील घरात त्रास द्यायचे नि त्याचे वडील 'गपचिप' पडून राहायचे. यानं हळूहळू त्यांना आजारपण आलं. अंथरुणावर खिळून गेले. काम होईनासं झालं. आईच्या मजुरीत औषधाचा वाटा आला. चौघं मुलं, एक आजारी माणूस आणि दोन म्हातारी माणसं यांचं करणारी त्याची आई तशी एकटीच. तरीही शाळेत त्याच्या अभ्यासात त्यानं कधी चणचण जाणवू दिली नाही. सगळं कसं नियमित.

'घरची गरिबी आहे' या त्याच्या वाक्यातली वेदना मला तोवर समजली नव्हती, जोवर मी त्याचं घर पाहिलं नव्हतं. तरीही तो पुस्तकं वाचायचा. चांगलं लिहायचा. शाळेत एखादा कार्यक्रम असला त्याला फक्त रूपरेखा आखून दिली की तो 'कंडक्ट' करायचा. एव्हाना पुढचं वर्ष त्यानं ओलांडलं. तो १० वीत असताना त्याचे वडील एक दिवस मरून गेले. खाटलं रिकामं झालं. वडील गेले म्हणून पायाखालची भुई खचून चालणार नव्हतं. रीतीप्रमाणे माणसं भेटून गेली. आई कामाला लागली. अन् एक दिवस तो दहावी पास झाला. पुढं काय ? बाहेरच्या जगाची, शिकलेल्या जगाची त्याला काहीच कल्पना नव्हती. मी तरी फार काय करणार ? त्याला नेहमीच्या चरकात जायचं नव्हतं. नाही तर एरवी मुंबईत गेला असता. सोनारकाम, कुठंतरी घरगडी किंवा कुठलं तरी काम मिळून मेंढराचं जगणं सुरू झालं असतं. कित्येक दिवस पैसेच न पाहणाऱ्या मुलानं कॉलेजला प्रवेश

घेतला. सगळंच अवघड होतं. तशी त्याला कोणी कोणी मदत केली असतीही.

माझ्या नवऱ्याला मी सांगितलं - ''दिनेश कॉलेजला जाणारेय ?

''पुढं काय ? काही विचार

केलास ? असा कसा सल्ला दिलास ?''

''का जाऊ नये त्यानं कॉलेजला ?''

''मला वाटतं - त्यानं असं काही शिकावं की, तो त्याच्या पायावर उभा राहील. लवकरात लवकर...'' हा आमचा संवाद त्याच्या समोरच झाला आणि तो पटकन म्हणाला - ''चालेल मला असं काही शिकायला मिळालं तर! पण...'' ''खर्चाचंच ना ? आपण काहीतरी करू. तुझी तयारी आहे ना ?'' त्याचा होकार मिळाला नि नव्या जगण्याला सुरुवात झाली. हे वेगळं आव्हान पेलायची इच्छा दाखवणं हेच वेगळं होतं. जिथं ज्यांच्या जगण्यात काही आव्हानं नसतात अशानं असं काही आव्हान स्वीकारणं वेगळं होतं. पुढे दिनेश पुण्याजवळ पाबळला गेला. एक वर्षभर प्रशिक्षण घेतलं नि पुन्हा

गावाकडं आला. हेही इतकं सहज नाही झालं. त्यात महत्त्व होतं ते त्याच्या आईच्या आत्मविश्वासाला आणि विश्वासाला. कारण तो निघून गेला नि थोडे दिवसांनी वडिलांचं वर्षश्राद्ध होतं. आई म्हणाली, ''आता कशाला बोलवायचा? अभ्यास बुडेल नाय काय?... जानं येनं काय सोस्तात असतं काय?... आन् आला तरी त्ये काय परत येत्याल?... तुमी करताय त्ये त्याच्याचसाठी नव्हं काय?...'' खरंच हेच वेगळेपण होतं. एका खेड्यातल्या अडाणी स्त्रीनं आपल्या मुलाबद्दल स्वप्नं पाहावी हे विलक्षण होतं. त्यासाठी नवऱ्याच्या श्राद्धाला येण्याची गरज नाही या श्रद्धेत ताकद होती. संपूर्ण वर्षभर तिनं कधीही मुलाला बोलावलं नाही, कधीही सुट्टीला घरी आलेल्या मुलाला ठेवून घेतलं नाही. कधी फोन केलाच तर त्याला आधार दिला.

झोपडीत राहणारा एक मुलगा वर्षभरात कितीतरी शिकला. नव्या जाणिवा घेऊन आला. एक मुलगा. मुलाची झोपडी. झोपडीत कधीमधी पेटणारी चूल. चुलीत जळण रानातलं. थोडं ओलं, थोडं सुख्खं. दोन-चार टोप (पातेली). गाडग्या-मडक्यात सुखवलेल्या (वाळवलेल्या) उसऱ्या. प्रेमानं घरी जेवायला बोलावणारी आई. अशा घरात चुलीसमोर अभिमानानं कॉम्प्यूटर बसलाय. अन् आजूबाजूची मुलं दिनेशकडे जेवढ्या कुतूहलानं बघतात, तेवढ्याच कुतूहलानं कॉम्प्यूटरकडे बघतात. त्यातल्या गमतीजमती तो आजीला-आजोबांना त्यांच्या भाषेत, त्यांना समजतील अशा सांगतो. एवढं कसं तो ध्यानात ठेवतो? असं त्यांना नवल वाटतं. कॉम्प्यूटरची भाषा गावभाषेत त्यानं विरघळवली आहे. एवढंच नाही, तर मुलांना तो शिकवतो.

एक दहावी झालेला मुलगा आपला खर्च घरावर पडू नये म्हणून सुट्टीत मजुरी करतो. पैसे जमवतो. सगळं शिकवतो. स्वत: पिठाची गिरणी सुरू करतो आणि स्वत:चा स्वत: कॉम्प्यूटर रीशालश्रश करतो. कॉम्प्यूटरएवढंच हे आश्चर्य आहे, आव्हान आहे. आता तो जिथं शिकला तिथंच शिक्षक आहे. एरवी विद्यार्थी होता, तेव्हा केबिनमध्ये यायलाही घाबरत असे. त्याचा पेहराव बदलला असला तरी त्याची चिकाटी, जिद्द विलक्षण आहे. लगेच दुखावणाऱ्या माझ्या मनाला त्याच्याकडून कितीतरी शिकता येतं. याही अर्थानं तो शिक्षक आहे नि खराच शिक्षक आहे. तो म्हणतो, ''माझ्याकडे पाहून मुलांचा शिक्षणावर विश्वास बसेल. पायावर उभं राहिलं पाहिजे, असं वाक्य, ऐकणं वेगळं नि जगणं वेगळं.'' मनात नव्या नव्या कल्पनांच्या भराऱ्या आहेत. आपण असे घडलो म्हणून थांबून चालायचं नाही. असे आणखी दिनेश घडायला हवेत, असं त्याला वाटतं. त्याच्या घडण्यात थेंबा-थेंबाला महत्त्व आहे. ''अरे, तुला उसऱ्या आणायला सांगितलं होतं, तू काय विसरायलाही शिकलास की काय?'' ''सॉरी मॅडम. I forgot" अगदी सहज इंग्रजीत बोलणं. इंग्रजी बोलणं यात वेगळेपण नाही, वेगळेपण आहे ते त्याच्यात आलेल्या आत्म-विश्वासात. त्याची ही ताकद मला आधी वाचताच आली नाही. खूप उशिरा वाचता येऊ लागलं मला!

त्या दिवशी तो कॉम्प्यूटरवर काम करत होता. आता तो मला खरंच विद्यार्थ्यांना बोलवावं तसं आग्रहानं बोलवतो. 'एकदम नाही यायचं' जरा सराव झाला की जमेल' हे वाक्य ऐकवतो. कुणी आलं तर 'मॅडम' तुम्हाला बोलत नको बसायला म्हणून हे तयार केलंय' असं म्हणून शाळेची सर्व माहिती त्याच्या भूमिकेतून त्यानं फीड केलीय, ती दाखवतो. आता त्याला घडपड, अस्वस्थता, स्वत: प्रयत्न करणं समजू लागलंय. आईच्या चेहऱ्यावरचं समाधान घामाच्या थेबांतनंही चमकतंय. माझा विद्यार्थी माझा शिक्षक हे नवं नातं मला फार भावलंय. खरं तर त्याला वेगळ्या वाटेचा आधार दिला माझ्या नवऱ्यानं, त्याला प्रशिक्षण दिलं तो गुरू, इतर शिक्षक, त्याचं घर या सगळ्या सगळ्यांनी त्याला घडवलं असंही म्हणूया किंवा या सगळ्यांनाही घडता आलं असंही समजूया. म्हणून 'आम्ही बि घडलो'. आम्ही अमेरिकेत एका शाळेत गेलो होतो. तिथं एका मुलानं विचारलं, ''तुमच्या शाळेत मुलं किती?'' संख्या सांगितल्यावर मुलं म्हणाली, ''तीनशे मुलं नि एक कॉम्प्यूटर?'' ''पण फरक असा की तो कॉम्प्यूटर असेंबल एका मुलानेच केलाय.''.. बाकी त्यांना त्याची गरीबी virualire होणं शक्य नव्हतं, पण त्याच्या बुद्धीची प्रचीती नक्कीच आली आणि सगळंच त्यांना अवास्तव वाटलं....

***

**- रेणू दांडेकर**

मु.पो.चिखलगाव,ता.दापोली,रत्नागिरी



तुज एकच आहे, वेड पुढे जाण्याचे,
पण तुझ्यापुढे ते, डोंगर चढावयाचे !

# काही नवं शिकूया

**प्रभाकर भावे**

*खरं तर अगदी लहान असल्यापासून आपल्याला कागदांचे कपटे करायला खूप आवडतात. कागद दिसला की तो फाडणं, हे प्रत्येकालाच आवडतं. विविध आकारांत कात्रीने किंवा हाताने कागदाचे तुकडे करायचे आणि नंतर कचरा म्हणून ते फेकून द्यायचे. पण विविध आकारांत मुद्दाम रंगीबेरंगी कागदाचे तुकडे कापून, छापील चित्रे, प्रकाशचित्रे यांचा वापर करून एक वेगळी पण एकसंध अशी कलाकृतीची निर्मिती होऊ शकते, हे तुम्हाला माहीत आहे का? 'कोलाज' या चित्रकलेतील प्रकाराचे नाव आपण नक्कीच ऐकलेले असेल. तुमच्यापैकी अनेकांनी कोलाज केलीही असतील. पण छंद म्हणून हा कलाप्रकार जोपासून, आपल्या नावीन्यपूर्ण कल्पनांनी त्यात विविधता आणणाऱ्या प्रभाकर भावे यांनी त्यांच्या या वेगळ्या छंदाची ओळख तुम्हाला प्रस्तुत लेखातून करून दिली आहे.*

मला कोलाजचा छंद गेल्या १५ वर्षांपासून लागला. कारण तसं अगदी साधंच होतं, माझी पत्नी मला म्हणाली,''आपल्या स्वयंपाकगृहात लावायला फळ किंवा खाद्यपदार्थाचं एखादं चित्र आपण घेऊया.'' आम्ही वेगवेगळी पोस्टर्स पाहिली आणि मनात विचार चमकून गेला की आपणच का असं चित्र करू नये ?



बाजारात विकत मिळतंय म्हणजे अनेक घरांतून ते असणार, त्यात काय मजा ? मी रंगभूषाकार असल्याने त्या दृष्टीने माझ्याकडे खूप चित्रे, मासिके जमली होती. त्यात अशी चित्रे होती आणि मी त्या खटपटीला लागलो. ४/५ दिवसांत माझं चित्र तयार झालं. त्या चित्रात नुसते खाद्यपदार्थच नव्हते; नुसती फळं नव्हती तर खाण्यामुळे होणारा आनंदही होता. डाएटिंगचा सल्ला होता, समाधान होतं; कारण मी पदार्थांबरोबर त्याला योग्य अशा स्त्री-पुरुषांची-मुलांची चित्रेही वापरली होती. पहिलाच प्रयत्न खूप यशस्वी ठरला. घरी येणारा प्रत्येकजण हे चित्र 'कुठं मिळालं' याची चौकशी करत होता आणि आश्चर्यचकित होत होता. हे चित्र माझ्या बायकोच्या मैत्रिणीने शेवटी अमेरिकेला नेले आणि त्या ठिकाणी दुसऱ्या नव्या चित्राची स्थापना झाली.

नवे विषय सुचत गेले. नवनवी चित्रे तयार झाली आणि झोपताना वापरतो त्या उषा, दरवाजे, नृत्य शिल्प, स्त्रीजीवन, मदर तेरेसा, पर्यावरण, कष्टकरी स्त्रिया, भारतीय वाद्ये अशा अनेक विषयांवर मी चित्रे तयार केली. माझी बायको शिक्षिका असल्याने तिलाही याचा उपयोग झाला. तिच्या शाळेसाठी जलचक्र, खनिज संपत्ती, जंगल संपत्ती, पाण्याचा वापर अशीही चित्रे तयार झाली. माझी संग्राहक वृत्ती यासाठी खूप उपयोगी पडली.

'कोलाज' हा मुळात इंग्रजी शब्द आहे. हा एक कलाप्रकार आहे. या प्रकारांत अनेक रंगीबेरंगी कागदांचे तुकडे, छापील चित्रे, फोटोग्राफ्स यांचा वापर करून एक वेगळीच, एकसंध, विषयानुसार अशी कलाकृती निर्माण होते. एखाद्या सपाट पृष्ठभागावर हे सर्व तुकडे चिकटवले जातात. अनेक

प्रतिभावंत कलाकारांनी, भिंती, दरवाजे, जमीन यांवरही अशा सुंदर कलाकृती निर्माण केल्या आहेत. अमूर्त शैलीतील या कलाकृती मनाला भुरळ घालतात.

खरं पाहू जाता हा प्रकार अपरिचित असा मुळीच नाही. अगदी तान्ह्या अवस्थेपासून अशा तुकड्यांचा आपला संबंध आलेला असतो. फक्त ते कागदाचे तुकडे नसतात तर कापडाचे असतात आणि आपण त्याला 'दुपटे' असे म्हणतो. अशा अनेक कोलाजेस्‌चा आपला संबंध येत असतो; आपण वापरत असतो. फक्त त्या वेळेचा विचार वेगळा असतो. शर्ट व पॅन्ट, साडी व ब्लाऊज यांची निवड करताना आपण एकमेकांना शोभणाऱ्या रंगसंगतीचा विचार करतो. दोन्ही तुकडे वेगवेगळे असतात; ते एकत्र आणून एक प्रकारचे 'कोलाज'च तयार करतो.

शाळांमधूनही हल्ली 'कोलाज' बनवून घेतली जात. वेगवेगळ्या योग्य रंगांच्या कागदाचा वापर करून निसर्गचित्रे बनवली जातात. हव्या असलेल्या आकाराचा, रंगाचा कागद कापून ते चिकटवले जातात व चित्रे तयार करतात आणि ही फार चांगली गोष्ट आहे. याचा उपयोग व्यवहारातसुद्धा खूप होतो. योजनाबद्ध निवड करणे, योग्य रीतीने योग्य गोष्टी वापरणे, संकलन करणे याची शिस्तबद्ध सवय लागते; आणि सौंदर्यदृष्टीही वाढते. हा फायदा हमखास होतो हे मी अनुभवाने ठामपणे सांगू शकतो. अर्थात मनापासून या विषयात लक्ष घातले तरच हे लाभ होणार आहेत. आणि दुसरा महत्त्वाचा फायदा हा की आपण स्वत: तयार केलेली ही कलाकृती संपूर्ण जगातील एकमेव असते.



या कलाकृतीसाठी आपल्याकडे कच्चा माल असावा लागतो. म्हणजेच वर उल्लेख केल्याप्रमाणे कागदाचे/कापडाचे तुकडे, चित्रे इत्यादी. मित्रांनो, आता भेटकार्डांचे दिवस आहेत. खूप भेटकार्डे येतात. टाकू नका, ठेवा. आपल्या ओळखीच्या लोकांकडे, मित्रांकडे मागा. कारण अशी कार्डे नंतर फेकण्याचीच वृत्ती असते. लग्नपत्रिकांवर आता गणपतीच्याही कल्पनेपलिकडील गणेशचित्रे असतात. पत्रिकाही जपून ठेवा. रोजच्या वर्तमानपत्रातील चांगली चित्रे, फोटो, जाहिराती पाहा. आवडेल त्याचे कात्रण ठेवा. मासिके रद्दीत जाण्यापूर्वी न्याहाळा व ठेवावेसे वाटेल ते ठेवा.

वेळ मिळेल तेव्हा मी चित्रांचे कातरकाम करून ठेवतो. त्याची वर्गवारी करतो; त्यामुळे माझ्याकडे अशी कापून ठेवलेली जवळजवळ ५/६ हजार चित्रे असतील आणि त्यामुळेच मला सलग काम करायला मदत होते.

जुनी मासिके विकणारे रद्दीवाले मला अतिशय आवडतात, त्यांच्याकडे मी नेहमी मासिके पाहायला जातो. आवडणारे किंवा हवे असलेले एखादे जरी चित्र किंवा आपल्या मनामध्ये असणाऱ्या चित्राचा छोटासा जरी भाग त्यात आढळला तरी मी ते मासिक विकत घेतो. त्याच मासिकात इतरही चार गोष्टी मिळण्यासारख्या असतात आणि आता तर हे दुकानदार नवीन काही आले तर मला आपणहून बोलावतात. मला काय हवं असतं ते त्यांनाही चांगलं कळलंय. तुम्हीही अशी चित्रे जमवा. त्यानंतर तुमच्या साठवणीतील चित्रे वारंवार पाहा, एखादे चित्रच तुम्हाला विषय सुचवून जाईल. एखादे चित्र तुमच्या नजरेसमोर वेगळेच चित्र निर्माण करील. त्याला पोषक अशी इतर चित्रे/आकृत्या तुमच्या संग्रहातून निवडा. त्यांचे कोरीव कातरकाम करा. त्या चित्रांची जुळणी करा. चित्राला उठाव येण्यासाठी आपण अजून काही टाकू शकतो का ते पाहा.

अशी कच्ची जुळणी झाल्यावर, मग ते एखाद्या सपाट पृष्ठभागावर चिकटवा. तुम्ही तयार केलेले हे अनोखे चित्र तुमचे तुम्हालाच आवडेल. काही नवे सुचवून जाईल. नवे शिकवून जाईल.

चित्रे साठवतानाच ती कापून, कोरून ठेवावीत. चित्राची पार्श्वभूमी पूर्णपणे काढून टाकावी. त्यांची विषयवार वर्गवारी करावी म्हणजे सूर्योदय, सूर्यास्त, पशू, पक्षी, झाडे, पाने, फुले, फळे, विविध वाद्ये इत्यादी. म्हणजे चित्राचा आराखडा पक्का झाल्यावर हवे ते चित्र शोधणे सोपे जाईल. कापलेला कुठलाही भाग फेकू नका. तो एखाद्या खोक्यात ठेवून द्या. तुमच्या नव्या चित्राची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी त्यांचा



उपयोग होईल. या तुकड्यांच्या फिकट किंवा गडद रंगछटांतून आपण आपल्या चित्रांचे परिमाण व परिणाम बदलू शकतो. त्याला त्रिमितीतही आणू शकतो.

चित्रे निवडताना ती एका स्रोताची, एकाच शैलीतील साधारण मिळत्याजुळत्या रंगछटांतील असावीत. याचा फायदा चित्र एकसंध दिसण्यासाठी होतो. एकदम विसंगत शैलीतील चित्रे शक्यतो वापरू नयेत.

या सगळ्यासाठी जरूर असते ती कल्पनाशक्तीची व संपादन आणि संकलनाच्या कौशल्याची. आणि हे साध्य होते चिकाटीच्या प्रयत्नांतून. रंगांचा तोल सांभाळणे, प्रकाशाची दिशा कायम ठेवणे, सावल्यांचा



वापर करणे या गोष्टी चित्र तयार करत असताना पाहाव्या लागतात.

चित्रे निवडताना ती फार जाड असू नयेत, असल्यास चित्राचा मागचा पापुद्रा जरुरीप्रमाणे हळुवारपणे काढून टाकावा. या जाड चित्रांमुळे किंवा एकावर एक जास्त चित्रे चिकटवण्यामुळे पुढे फ्रेम किंवा लॅमिनेशन करताना त्रासदायक ठरते आणि चित्राच्या एकत्रित परिणामावर आघात करते. अशी चित्रे फक्त इतर चित्रांतून अथवा कागदांतूनच तयार करतात असे नाही तर चपटे दगड, वाळवलेली फुले, पाने, कुंच्याचे तुरे, खराट्याच्या काड्या, स्ट्रॉज, आईस्क्रीमचे चमचे इत्यादी वस्तू वापरूनही तयार होतात. जरूर आहे ती कल्पनाशक्तीची व सुयोग्य योजनेची. ही चित्रे घराची शोभा वाढवतात. एकाच वेळी अनेक गोष्टी दाखवतात. या कलाप्रकाराच्या साहाय्याने मी मुखपृष्ठेही तयार केली. शैक्षणिक तक्ते तयार केले, प्रशस्तिपत्रके तयार केली, छोटी छोटी लेटरहेड्स, प्रसंगानुरूप पत्रे लिहिण्यासाठी त्या प्रसंगाला साजेशा चित्रचौकटी तयार केल्या, निमंत्रण पत्रिका केल्या आणि परत हे सर्व दुसऱ्या कुणाकडेही नाही हा अभिमान. काहीजणांनी तर पत्रे लॅमिनेशन केली आहेत.

करायला सहज सोपी, दिसायला सुंदर व समृद्ध अशी ही कला. मी या कलेवर मनापासून प्रेम करतो. मला या कलेने खूप आनंद आणि समाधान दिले.माझी सर्जनशीलता या कलेने वाढवली. एका कल्पनेतून दुसरी कल्पना सुचत गेल्याने मला या कलेने सतत कार्यरत ठेवले.

सुरुवातीला झालेल्या अनेक चुकांमधून, झालेल्या नुकसानीतून मला खूप शिकायला मिळाले, येणारी अडचण आधीच समजायला लागली व नीटनेटक्या कामाच्या सवयीमुळे कामाची गतीही वाढली.

रंगभूषा करणे, मुखवटे बनवणे, विग तयार करणे, पेटी वाजवणे या माझ्या इतर छंदांबरोबरच माझा हाही नवा छंद जोरात बहरत आहे आणि माझ्या आत्मानंदात भर घालत आहे.

✻✻✻

**प्रभाकर नीलकंठभावे**
१११, शुक्रवार पेठ,गणेश
अपार्टमेन्टस्, पुणे ४११ ००२



निसर्गातल्या सौदर्यांचे कण कण तुम्ही पकडा,
सुंदर जग हे किती आपुले बघण्या डोळे उघडा।।


# वाळवीची समाज रचना आणि सामाजिक जीवन!


डॉ. पुरुषोत्तम जोशी

*साऱ्या जीवसृष्टीचा मूलाधार सहजीवन, सामंजस्य व सहकार हाच आहे. कीटकही त्याला अपवाद नाहीत, त्यातील वाळवीचा समाज, 'समाज' म्हणून आदर्श आहे. वाळवीच्या वसाहतीतील घटकांमध्ये परस्पर सामंजस्य आणि सहकार फार खोलवर रुजलेले दिसतात. व्यापक प्रमाणावर विस्तारलेले ते एक कुंटुंबच असते. वाळवीचे जीवन, समाजाचे विविध घटक, त्यांची कार्यपद्धती याची शास्त्रशुद्ध तरीही रंजक अशी माहिती डॉ. पुरुषोत्तम जोशी या लेखात सांगत आहेत.*

जिज्ञासू मित्रांनो,

मुंग्या, गांधीलमाशा, मधमाशा यांच्यासारखा वाळवी हा कीटकही समाज करून राहतो. या कीटकाच्या अनेक जाती असल्या तरी त्या सर्वांची समाजरचना आणि सामाजिक जीवन कमी-अधिक प्रमाणामध्ये सारखे असते. वाळवीची वसाहत काहीशी जमिनीवर तर बहुतांशी जमिनीत खोलवर असते. या वसाहतीत आवश्यकतेनुरूप अनेक दालने असतात. दालने एकमेकांस असंख्य जोडमार्गांनी जोडलेली असतात. दालनांमध्ये आणि जोड-मार्गांतही वाळवीचे घटक राहत






**वाळवीच्या वसाहतीचा उभा छेद**

१. राजा, राणीचे दालन
२. शिशू सदन
३. कवक उद्याने
४. जोडमार्गाची बाह्यद्वारे

असतात. या घटकांची रूपे वेगवेगळी असतात. ते समाजाच्या हितासाठी जी कामे करतात त्यांतही वेगळेपणा असतो. या कामांच्या स्वरूपाप्रमाणे समाजातील घटकांचे चार गट पडतात.

१. स्थापिका आणि राणी : समाज निर्माण करण्यासाठी कोणाची तरी आवश्यकता असते. वाळवीच्या समाजाची निर्मिती एखादी जननक्षम मादी घटक तिचा विवाह झाल्यानंतर करते.




स्थापक


एखाद्या कुजू लागलेल्या झाडाच्या बुंध्याशी किंवा कुजलेल्या लाकडाच्या ओंडक्यामध्ये ती छोटासा खळगा करते. हा खळगा तिच्या, पुढे बांधल्या जाणाऱ्या भल्या मोठ्या वसाहतीचा पाया आणि आरंभ असतो. त्यात ती १० ते १५ अंडी घालते. या पहिल्यावहिल्या अंड्यांतून बाहेर पडलेल्या तिच्या बाळांना कुमारावस्था म्हणतात. त्यांची वाढ पूर्ण झाली की त्या वसाहतीची बांधणी आणि इतर कामे करू लागतात.

२. नर अथवा राजा : वसाहत स्थापन करण्याआधी मादी घटकाचा, ती जननक्षम असली तरी विवाह होणे आवश्यक असते. नवरोजींशिवाय विवाह तो कसला? जननक्षम मादीला


राणी म्हणून सिंहासनावर बसविण्याचे काम हे नवरोजी (नर घटक) करतात म्हणून त्यांना 'राजा' म्हटले जाते. नर, इतर कामे करत नाहीत.


सपंखी राजा

३. कामकरी : वसाहत बांधण्यासाठी, तिची डागडुजी करण्यासाठी, तिची स्वच्छता राखण्यासाठी, अर्धपाचन झालेले अन्न (कुजलेल्या लाकडाचा भुस्सा, लाळ, कवकांचे बीज-कोश) वाढीस लागलेल्या बाळांना, राणीला, आणि इतर घटकांना खाऊ घालण्यासाठी, त्यांची काळजी घेण्यासाठी जे घटक सतत राबत असतात, त्यांना 'कामकरी' म्हणतात. या घटकांची संख्या अगणित असते. त्यांची रूपेही अनेक (अळी, आभासी कामकरी, कामकरी) असतात.


कामकरी


४. रक्षक/सैनिक : वसाहतीचे आणि त्यातील घटकांचे रक्षण करण्यासाठी, रूपाने इतरांपेक्षा वेगळे असणारे जे घटक शत्रूवर धावून जाऊन त्यांना पळवून लावतात किंवा ठार करतात त्यांना रक्षक वा सैनिक म्हणतात. रक्षक, रक्षणाविना दुसरे कोणतेही काम करीत नाहीत.


रक्षक


जसजसा काळ पुढे सरकत जातो तसतशी राणी वयाने वाढत जाते. तिच्या शरीराचे आकारमानही त्याच प्रमाणात वाढते. ती ससाणा कुलातील एखाद्या पतंगाच्या अळीसारखी लांब आणि जाडजूड दिसायला लागते. तिने घातलेल्या अंड्यांची संख्याही दिवसा-मासांनी वाढत जाते. अभ्यासक असं सांगतात


अगणित अंडी घालणारी जाडजूड राणी

की, काही जातींच्या राण्या प्रतिदिनी सुमारे ३०,००० किंवा त्यापेक्षाही अधिक अंडी घालतात. त्यांची वसाहतही त्याच प्रमाणात विस्ताराने वाढत असल्याने तिची सुयोग्य रीतीने देखभाल करण्यासाठी रक्षकांची फौज असणे जरुरीचे असते. एवढ्या मोठ्या संख्येने घातलेल्या अंड्यातून बाहेर पडणारे घटक ती गरज सहजपणे भागवितात. एका वेळी, ९०,००० च्या वर घटक आढळून येतात. त्यांत अवघी एक जननक्षम मादी (राणी), ५ ते १० नर (राजा), ७ ते ८ टक्के रक्षक असून, उरलेली ९२ ते ९३ टक्केवारी केवळ कामकरी घटकांची असते. अंडी घातल्यानंतर साधारणपणे सव्वा महिन्यामध्ये त्यातून बाळं बाहेर पडतात. या बाळांचे शरीर दुर्बल असते. प्रकृती अगदीच 'तुनुमुनु' असल्यामुळे की काय; त्या रूपाला सरळसरळ कुमारावस्था असे न म्हणता 'अळी' म्हटले जाते. ती अतिशय लवचिक असते. ती वाढीस लागल्यावर तिने तिच्या आयुष्यभर कामकरी राहावयाचे की आभासी कामकरी होऊन पुढे श्वेतरक्षक व्हावयाचे की बदली जननक्षम घटक (स्थापक राणी अथवा राजा अकार्यक्षम झाल्यावर अथवा मृत्यू पावल्यावर जो घटक राणीचे वा राजाचे स्थान घेतो तो) व्हावयाचे की पूर्ण सपंखी जननक्षम राणी किंवा राजा व्हावयाचे ते स्थापक राणीच ठरवीत असते. त्या अळीने काय व्हावयाचे यावर राणीसाहेबांचे शिक्कामोर्तब झाले की, त्यानुसार तिच्या स्वत:कडून अथवा वरच्या दर्जाच्या अनुभवी कामकरी घटकाकडून विशिष्ट प्रकारचे अन्न भरविण्यात येते. या अन्नामध्ये अर्धपाचन झालेल्या लाकडाच्या भुश्श्याबरोबर संदेशवाहक पदार्थ अथवा विशिष्ट संप्रेरक अथवा विशिष्ट चेतापेशीतील स्राव अथवा श्वेतग्रंथीचे स्राव यांपैकी अेकाची किंवा दोघांची विशिष्ट मात्राही दिली जाते. या अन्नासहित असलेल्या मात्रेचा योग्य तो परिणाम होऊन अळीचे कामगार वा आभासी कामगार वा बदली जननक्षम घटक यामध्ये रूपान्तर होते.


अभासी कामकरी

कॅलोटरमिस फ्लाविकॉलिया नावाच्या वाळवीच्या वसाहतीचा आणि त्यातील घटकांचा, अतिशय बोधप्रद प्रयोगांच्या साह्याने सुमारे वीस वर्षे; लुशर नावाच्या


बदली जननक्षम घटक (मादी)




समाज आहे देव आपुला, वारस आपण विजयाचे,
ऐक्यातुन हो जीवन फुलवू, स्वप्न आपुले सृजनाचे.
शंभरावा अंक

अभ्यासकाने चिकाटीने अभ्यास केला. या प्रयोगातील निष्कर्षांच्या आधारे त्याने असे दाखवून दिले की, जननक्षम स्थापक राणी अथवा राजा आपल्या शरीरातील संदेशवाहक पदार्थ वसाहतीत वितरीत करतात. हा पदार्थ जोपर्यंत वसाहतीत खेळत राहतो तोपर्यंत; अळीचे आभासी कामकरी घटकांत रूपान्तरण झाले असले तरी या आभासी कामकरी घटकाचे बदली जननक्षम घटकामध्ये किंवा पूर्ण सपंखी जननक्षम (नर, मादी) घटकांमध्ये रूपान्तरण होत नाही. तो संदेशवाहक पदार्थ स्पर्शसूत्रांच्या संपर्कातून किंवा पदार्थमिश्रित अन्नातून आभासी कामकऱ्यांपर्यंत पोहोचतो. आभासी कामकरी जर शिशू-संप्रेरकाच्या संपर्कात आले तर त्या संप्रेरकाच्या संपर्कामुळे त्यांचे रक्षक घटकांमध्ये रूपान्तरण होते. त्याचप्रमाणे, इतर काही आभासी कामकरी प्रौढ संप्रेरकाच्या संपर्कात आले तर त्या संपर्काचा परिणाम म्हणून त्यांचे, प्रौढ सपंखी जननक्षम घटकांमध्ये रूपांतरण होते.

अशा प्रकारे घटक रचना असलेला वाळवीचा समाज, 'समाज' म्हणून आदर्श आहे. कोणताही समाज, समाज म्हणून एकसंध राहावयाचा असेल तर त्यातील घटकांमध्ये कमालीचे सामंजस्य आणि सहकार असणे जरुरीचे असते. या गोष्टी आपोआप निर्माण होत नाहीत. त्यामागे दृढ प्रयत्न असावे लागतात. वाळवीच्या वसाहतीतील घटकांमध्ये परस्पर सामंजस्य आणि सहकार फार खोलवर रुजलेले आढळून येतात. वाळवीचा हा समाज म्हणजे अतिशय व्यापक प्रमाणावर विस्तारलेले एक कुटुंबच असते. त्यातील प्रत्येक घटकाचा दुसऱ्याशी नातेसंबंध असतो. हा नातेसंबंध सख्खेपणाचाच असतो असे नाही. त्यात सावत्र नाते संबंधाचे मिश्रणही काही जातींत आढळते. हे नातेसंबंध त्यांना एकसंध बांधून ठेवणारा आनुवांशिक अनुबंध आहे. परंतु ते त्यामुळेच, सामंजस्याने आणि सहकार्याने राहतात असे ठामपणे म्हणता येणार नाही. अन्नांश वितरीत करणारा एखादा कामकरी, एखाद्या भुकेल्या कामकरी घटकाकडे किंवा एखाद्या स्वत:हून अन्न मिळवू न शकणाऱ्या आणि खाऊ न शकणाऱ्या रक्षकाकडे जेव्हा अन्न घेऊन जातो तेव्हा पुढ्यात आलेले अन्न आपल्याच मुखी पडावे म्हणून त्या दोन्ही भुकेल्या घटकांकडून अन्नवाहक घटकाचा चाललेला अनुनय 'याची देही याची डोळा' पाहावा म्हणजे देण्या-घेण्याच्या त्या सोहळ्यामध्ये किती जिव्हाळा आणि हळूवारपणा आहे हे लक्षात येते. एक देणारा घटक जेव्हा घेणाऱ्या घटकाच्या पुढे उभा ठाकतो तेव्हा घेणारा घटक देणाऱ्या घटकाच्या वक्षावर आपले पुढील पाय बहुधा त्याला धरून ठेवण्यासाठी ठेवतो. आपल्या स्पर्शसूत्रांनी त्याच्या स्पर्शसूत्रांना स्पर्श करून, डोके काहीसे कुरवाळून तो आपले मुखावयव, त्याच्या मुखावयवांत धरलेल्या अन्नांशाकडे नेतो आणि अन्नांश आपल्या मुखात सरकवतो. स्पर्शसूत्रांना स्पर्श करणे, डोके कुरवाळणे हे अनुनयाचे आणि दात्याला खूष करण्याचे पारंपरिक धडे दोन्ही घटकांमध्ये जवळीक निर्माण करण्यास साह्यभूत होतात, असे अभ्यासकांना वाटते. अशी जवळीक सामंजस्य निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. त्याचबरोबर वसाहतीत आवश्यक असणारी शान्तताही कायम ठेवली जाते. ही शान्तता, प्रत्येक घटकाकडे सोपविलेले काम सुव्यवस्थितपणे पार पाडण्यास पूरक ठरते.

वाळवीच्या वसाहतीच्या प्रचंड विस्तारामुळे तिच्यात चांगल्या रीतीने वायु - वीजन व्हावे यासाठी जागोजागी खिडक्या आणि दारे ठेवलेली असतात. पावसाळा सोडला तर ती तिन्ही-त्रिकाळ उघडीच असतात. त्यांतून वसाहतीशी संबंध नसलेले पक्षी, साप, सरडे, बेडूक, विंचू, गोम, पैसा आणि ढालपंखी, द्विपंखी गणातील तसेच खवले कुलातील काही कीटक सहजपणे आत येतात. त्यांतील बहुतेक जण दुपारच्या किंवा रात्रीच्या वेळी निवाऱ्यासाठी येतात. परंतु कीटक वर्गातील काही कीटक मात्र केवळ निवाऱ्यासाठी येत नसून कायमच्या आश्रयासाठी येतात. वाळवीच्या कामकरी अथवा रक्षक घटकांनी आपल्याला परके न मानता आपले, आपल्यातील एक मानावे यासाठी ते त्या वसाहतीतील आचार, वास आणि इतर कितीतरी गोष्टी आत्मसात करतात. उत्क्रान्तीच्या कालखंडात, आपल्या शरीर-वैशिष्ट्यांत; कामकरी वा रक्षक घटकांच्या शरीर-वैशिष्ट्यांस अनुरूप असा बदल घडवून

आणण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. हा बदल पूर्णत: नसला तरी, बऱ्याच प्रमाणामध्ये यशस्वी झाल्याचे आढळते. कामकरी आणि रक्षक त्यांना, आचार, रूप आणि वास यांच्या सारखेपणामुळे आपल्यापैकी एक असेच मानतात आणि त्यांना आपल्या घासातील घास कुरकुर न करता सहजपणे काढून देतात. रक्षक त्यांना वसाहतीबाहेर हुसकावून लावण्याचा अजिबात प्रयत्न करीत नाहीत; जणू ते वसाहतीतील अतिविशिष्ट व्यक्ती असतात. खरोखरच हे कीटक, 'अतिशिष्ठ व्यक्तीप्रमाणे' वसाहतीत आचरण करतात. वसाहतीत मिळेल



वाळवीप्रेमीद्विपंखी माशी

तेव्हा मिळेल तेवढे अन्न खातात, मनाप्रमाणे वावरतात, आपली प्रजाही वाढवतात परंतु, वसाहतीच्या हिताच्या कामांत आपला सहभाग देत नाहीत. अभ्यासक, अशा कीटकांना 'जीवाभावाचे आश्रयार्थी' किंवा 'वाळवी प्रिय' म्हणतात.

अनेक अभ्यासकांनी समाज करून राहणाऱ्या कीटकांचा सखोल आणि विस्तारपूर्वक अभ्यास केलेला आढळतो. परंतु, मानवी समाजासाठी त्यातून काही शिकण्यासारखे आहे याचा धडा (विशेषत: सहकार्य आणि सामंजस्य) अंगी बाणवून घेतल्याचे जाणवत नाही. साऱ्या जीवसृष्टीचा मूलाधार सहजीवन, सामंजस्य आणि सहकार हाच आहे. हा मंत्र अंगी बाणविणे हे अशा अभ्यासाचे फलित आहे !

✻✻✻

**डॉ. पुरुषोत्तम जोशी**
११ गृहकल्प को.सो.
लोकमान्य हॉस्पिटलसमोर,
एरंडवन, पुणे ४

# उगवत्या थंडीतील सकाळ

**– बजरंग सरोदे**

भाद्रपद संपतो आणि आश्विनाची कोवळी पावलं अंगणात पडतात. सकाळ उगवते तीच मुळी गुलाबी थंडी पांघरून. या थंडीला एक बोचरी किनार असते. ती मोठीच सुखद अन् हवीहवीशी वाटणारी.


अंगणातील प्राजक्ताला नवा बहर येतो. केशरी देठांची शुभ्र धवल फुलं अंगणात सर्वत्र सांडलेली असतात. त्यांच्या सुगंधानं सारा आसमंत धुंद होतो. शेणाच्या सड्यांनी अंगणं शुचिर्भूत होतात. त्यांवर स्वस्तिक रांगोळ्यांची मंगल पखरण होते. दारासमोर वेलबुट्टीच्या हळदी कोंदणातील 'सुस्वागतम्'ची रंगीत पंचाक्षरं नवा अर्थ धारण करतात. वातावरणाला एका हळव्या गुलाबी कांतीचं देखणं व आल्हादकारक स्वरूप प्राप्त होतं. सगळंच कसं ताजं टवटवीत अन् प्रसन्न वाटतं. उत्साह मनाला नुसता गुदगुल्या करतो. शरदाचं गोड आणि दुसऱ्या मुखानं नकळत आगमन झालेलं असतं.

पटांगणावर सर्वत्र मुलायम हिरवळीचा गालिचा अंथरलेला असतो. त्यावरील कोवळ्या तृणफुलांची विविधरंगी किमयादार नक्षी मोठीच चित्तवेधक. या फुलांवर, पानांवर आणि वृक्षांच्या फांद्यांवर दवबिंदूंचे 'मोतिया' थेंब चकाकत असतात. त्यात सकाळच्या कोवळ्या किरणांची किमया विविध रंग भरते. 'ता ना पि हि नि पा जा' या रंगांनी भरलेलं 'इंद्रनभ' सगळ्या माळावर असं बिंदू-बिंदूंनी उमललेलं असतं. प्रतिबिंबित झालेलं असतं.

रात्रभर सुन्न पडलेलं आभाळ कसं मोकळं मोकळं अन् दिलखुलास हसू लागतं. त्याची कळी प्रसन्नवदनी आणि पूर्णाकार खुललेली असते. सकाळच्या या आरसपानी पृष्ठभागावर दिव्य तेजाची फुलं सर्वत्र उमललेली असतात. आभाळ आणि सृष्टी यांचं नातंही आता सलग आणि नि:संदिग्ध जुळलेलं असतं.

***

नव्या उत्साहानं गाव तुडुंब भरून जातं. सुरेल आवाजात कोंबड्याचं आरवणं अधूनमधून चालूच असतं. त्यामुळे वातावरणातील मंगलता वृद्धिंगत होते. देवघरात कुणी आजोबा उदबत्तीच्या मंद मधुर सुगंधात भूपाळी आळवतात. बाहेर मुलांनी





गंध रानभर झाला, कुपी रंगाची सांडली,
उडे पाखरांचा थवा, धून मनात वाजली.

काढलेल्या 'काकड आरती'ची फेरी निघालेली असते. सनई चौघड्यांचे मंगल ध्वनी कुठल्या-तरी मंदिरातून ऐकू येतात. टाळ, चिपळ्या, मृदंग, खंजिरी अशी गोड व मंजुळ स्वरांची वाद्यंही वाजत असतात. त्यांतून निघणारी भक्तिरसाची प्रशांत लय सगळ्या गावाला भावुक बनवते. गोठ्यात गोदुग्धरसांनी चरव्या भरून असतात.त्यांचा स्वरध्वनीही आगळीच मोहकता धारण करतो. कुणा तान्हुल्याचं प्रसन्न रडणंही यात भर घालतं.

जात्याची गोड घरघरही मोठीच प्रसन्न वाटते. त्यातून -

'जात्यावरती कुणी जनाई
दळते, गाते मंजुळ ओवी
सुरात भिजतो चिंब तिच्या
हा पहाटचा गारवा'

अशा काव्यपंक्तीचा यथार्थ प्रत्यय येतो. अशी अनेक गोड गीतं आणि ओव्या सकाळच्या रामप्रहरी रंगलेल्या असतात. त्यात चिंब भिजलेलं सकाळचं सूर्यफूल पाकळ्या पाकळ्यांनी उमलत असतं.

बागेतील वातावरण हिरव्याकंच रंगानं नुसतं न्हाऊन निघालेलं असतं. गेंदेबाज झेंडू, गुलाबी पुष्पराज, केशरी हातात पांढरे शुभ्र मोजे घातलेला प्राजक्त, मनमोहक गुलमोहर इत्यादी नानाविध फुलांच्या रंगगंधाची उधळण झालेली असते. रंगीबेरंगी फुलपाखरंही बेहोशपणे त्यात रुंजी घालू लागतात.

***

एव्हाना बरंच उजाडलेलं असतं. रस्ते बोलके झालेले असतात. गोठाणावर बासरीचे सूर घुमू लागतात. टोळ्याटोळ्यांनी गावातील सगळे गोपाळ तिथे हजर होतात. सोबतच साऱ्या गावची गाई-वासरंही. ''हम्मा हम्मा''चा एकच गदारोळ उठतो. धुळीचा गुलाल-बुक्का उधळला जातो. अन् बघता बघता हा सगळा थवा माळाकडे वळतो.

सगळा माळ या वेळी खूपच रम्य नि मोहक दिसतो. त्यावर तांबूस सोनेरी कोवळी उन्हं सांडलेली असतात. उभ्या ज्वारीतील मोत्याची पांढरी स्वच्छ कणसं तरारून झुलत असतातं हिरव्याकंच पिकांची कोवळी तरल पालवी लडिवाळपणे हसत-बागडत असते. त्यात रानपाखरांचा यथेच्छ विहार चालू असतो. त्यांचा जणू लपंडावाचा स्वच्छंद खेळच चालू असतो. गार चावरा वारा आपल्या मंदमधुर स्वरांनी वृंदगान गात असतो. एखाद्या रानझऱ्याची-भिजत सुरांची नाजूक झिलमिलही त्यात मिसळून जाते. हे सर्व दृश्य मोठं मनोहारी असतं.

अशी ही उगवत्या गुलाबी थंडीतील सकाळ मोठी प्रसन्न असते. तिच्या आगमनानं अंगप्रत्यंग पुलकित होतं. मन ताजतवानं होतं. नवी उमेद, नवी आशा फुलू लागते. अंतर्मनाच्या तारा हळुवारपणे छेडल्या जातात. त्यातून विलक्षण गोड अन् सुखद लहरी झंकारू लागतात. एका अननुभूत स्वर्गीय संगीताचा प्रत्यय येतो. हे संगीतही जेवढं नादमय तेवढंच सुंगधी असतं. त्यामुळे मनाची पाकळी न् पाकळी पुलकित होते. अंत:करणाची क्षितिजं विस्तार पावतात. अशी ही उगवत्या गुलाबी थंडीतील प्रसन्न पावन सकाळ, वाटतं कधी संपूच नये !

***

- बजरंग सरोदे,
'कौस्तुभ', हनुमान मंदिराजवळ,
रणपिसेनगर, अकोला ४४४००१.



किती दिस आले गेले, अवघं आभाळ भरुन,
पिकातल्या मातीसंगे, चिंब ओथंबलं मन.

# स्वप्नं जगणारी माणसं

लहानमोठी स्वप्नं तर सगळीच माणसं पाहात असतात. पण पाहिलेली स्वप्नं वास्तवात आणणारी, स्वप्नं साक्षात जगणारी माणसं फार थोडी. दोन वर्षांपूर्वी तरुण पिढीचे प्रतिनिधी असलेल्या काही तरुणांचं, वेगवेगळ्या क्षेत्रातलं कर्तृत्व सांगणारी 'कर्तृत्वाशी जडले नाते' ही लेखमाला प्रसिद्ध केली होती. या वर्षीच्या लेखमालेत ज्यांची काही स्वप्नं आज पुरी झाली आहेत, तर काही नवीन स्वप्नं त्यांना खुणावत आहेत अशा, वयाची तिशी पार केलेल्या व्यक्तींच्या कर्तृत्वाचा परिचय करून घेणार आहोत.

वैद्यकीय क्षेत्रात भरपूर पैसा मिळवणं शक्य असूनही त्या मोहापलीकडे जाऊन समाजसेवेच्या प्रेरणेने पुण्यातील संजीवन रुग्णालय चालवणारे डॉ.धनंजय केळकर यांची वास्तवाचं भान ठेवून पाहिलेली स्वप्नं खूप प्रेरणादायी आहेत.

चित्रकार वासुदेव कामत, शिल्पकार शरद कापुसकर यांच्यासारख्या कलावंतांच्या जीवनाची जडणघडण वाचताना कलावंताची प्रत्येक कलाकृती हे एक अमूर्त स्वप्न असतं, त्याच्या पूर्तीचा आनंदही असाच आगळा असतो,हा अनुभव येतो.त्यांची कलासाधना,अस्वस्थता, धडपड हे सगळं शब्दातून जाणवत राहातं.

'भोवताली वावरणारी माणसं' वाचत असताना जे मनात ठसलं त्याचा दिग्दर्शनात उपयोग झाला' असं म्हणणाऱ्या दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी यांनी लेखन, वाचन, नाटक, चित्रपट पाहाणं यातून व्यक्तिमत्त्वाची प्रगल्भता कशी वाढत गेली याचा आलेख मांडला आहे.

केमिकल इंजिनिअरींगच्या क्षेत्रात संशोधनात कार्यरत असलेल्या डॉ. विवेक रानडे यांच्या अनुभवांमध्ये ते आपल्या अभ्यासविषयाशी किती एकरूप झाले आहेत याचा शब्दाशब्दांतून प्रत्यय येईल.

विज्ञान शिक्षणाविषयी एक वेगळा दृष्टिकोन ठेवून अध्यापनाच्या कार्यात मग्न असलेले डॉ. मिलिंद वाटवे स्वत: तर ज्ञानशोधासाठी मनस्वी भटकंती करतातच आणि आपल्या विद्यार्थ्यांनाही भटकवतात.त्याची गोष्ट म्हणजेच त्यांचा कार्यपरिचय.

पोलिस क्षेत्रात सचोटीने काम करायचं या निर्धाराने कामाला सुरुवात करून अतिशय सहृदयतेने अभिनव पद्धतींचा वापर करून गुन्हेगारांचं मनपरिवर्तन घडवणाऱ्या सदानंद दाते यांची स्वप्नं म्हणजे कुठल्याही क्षेत्रात आपण नीतिमत्तेचा आग्रह धरून काय करू शकतो याचा वस्तुपाठच !

दुर्दैवाने अपंगत्व आल्यानंतर त्यावर मात करून आपल्यासारख्याच अपंगांसाठी कोल्हापूरला पुनर्वसन केंद्र चालवणाऱ्या नसिमा हुरजूक यांनी आपल्या वेदनेतच भावी आयुष्यातील कार्याचे स्वप्न शोधले.

एकदा 'शेती' हाच व्यवसाय पत्करायचा हा निर्धार झाल्यानंतर त्यासंबंधीचे सर्व ज्ञान, अनुभव मिळवून भुईमूग-उत्पादनात राष्ट्रीय उच्चांक गाठणारे जयकुमार गुंडे आता शेतीतील नवी स्वप्नं पाहाण्यात दंग आहेत.

'पैशाची ताकद मोठी आहे हे जाणून अर्थार्जनही करायला हवे व अर्थाच्या मर्यादा जाणून जीवनशैलीही ठरवायला हवी.' असा अतिशय मोलाचा विचार व्यवहारात उतरवणारे शेअर - व्यवसायातील एक अग्रगण्य व्यावसायिक मोहन गुजराथी यांनी आपले अनुभव लिहिले आहेत.

आयुष्याच्या मध्यान्ही मागे वळून पाहताना या सर्व व्यक्तींनी जाणीवपूर्वक आपला व्यवसाय स्वीकारलेला दिसतो. त्यावर त्यांची निष्ठा आहे, भक्ती आहे, प्रेम आहे हे जागोजागी जाणवतं. तरुणाई आणि प्रौढत्व यांच्या सीमारेषेवर रेंगाळणाऱ्या या सर्वांजवळ भविष्यासाठी काही स्वप्नं आहेत. नव्या जगाच्या गतिमानतेची त्यांना जाणीव आहे. ही मूल्यं, स्वप्नं ज्यांनी त्यांच्या हाती ठेवली त्यांच्याविषयी, त्यांच्या मनात कृतज्ञता आहे, या समाजऋणाचं भान आहे; स्वप्नांना कृतीची जोड आहे.

या लेखमालेतून स्वप्नं पाहाणारी, ती पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र ध्यास घेऊन धडपडणारी, पुन्हा नवीन, मोठी स्वप्नं पाहणारी अशी विविध क्षेत्रांमधील माणसं तुम्हाला भेटतील. त्यांचे अनुभव तुम्हाला नक्कीच प्रेरणादायी ठरतील असा विश्वास वाटतो.

हे सर्व अनुभव वाचून तुम्हीही अशीच भव्यदिव्य स्वप्नं पाहावीत. शालेय वयामध्ये ती स्वप्नं हृदयात जपून ठेवावीत, अन् तारुण्यामध्ये झोकून देऊन सर्व ताकदीनिशी त्या स्वप्नपूर्तीचा ध्यास घ्यावा, हीच अपेक्षा !

स्वप्नं जगणारी माणसं

*जन्म-१९६१*
*ज्ञान प्रबोधिनीचे विद्यार्थी. समाजसेवेच्या ध्येयाने प्रेरित होऊन वैद्यकीय क्षेत्रात कार्य. प्रसिद्ध कर्करोगतज्ञ, सर्जन.*

*पुण्यातील 'संजीवन रुग्णालया'ची पुनरुभारणी करून अद्ययावत रुग्ण सुविधांनी युक्त अशा भव्य 'दीनानाथ मंगेशकर' रुग्णालयाच्या प्रकल्पाचे प्रमुख. वैद्यकीय क्षेत्रातील समाज सेवेसाठी मिळालेल्या पुरस्कारांपैकी काही ठळक :*

*१) फाय फाऊंडेशन पुरस्कार.*
*२) डॉ. वारदेकर पुरस्कार.*



**डॉ. धनंजय केळकर**

# वैद्यकीय सेवेतून समाजसेवा

एकदा ध्येय निश्चित केल्यावर धडपड तर अपरिहार्यच असते. कधीकधी निराशेचे क्षणही वाट्याला येतात. नाही असं नाही. अशा वेळी 'निराशेचे क्षण आपल्याच वाट्याला का आले ?' असा फारसा विचार न करता, मी बल्बचा शोध लावणाऱ्या एडिसनचं उदाहरण आठवतो - त्याने बल्ब तयार करण्यासाठी १००० प्रयोग केले, तेव्हा कुठे त्याला यश मिळाले. पण त्याने हे यश मिळविण्याआधी ९९९ प्रयोग केलेच ना ! आयुष्यातील प्रत्येक वळणावर आशा-निराशा भेटणारच; फक्त या वाटेने आपण पुढेच चाललो आहोत ना हे जागोजागी तपासून बघावं लागतं. जेव्हा प्रयत्नवाद मरतो तेव्हा आपण संपलोच, असं समजावं.

असाच एक प्रसंग आठवतो, लता मंगेशकर फौंडेशन हॉस्पिटलच्या उभारणीसाठी जागा मोकळी करून मिळण्यासाठी माजी मुख्यमंत्र्यांच्या सहीचं पत्र आणायला मुंबईला गेलो होतो.

नवीन हॉस्पिटलच्या पायाभरणी अगोदर अडीच महिने अगदी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू होती. शेवटचे दोनच दिवस राहिले होते, असं मी म्हणेन; कारण त्या दोन दिवसांनंतर मुख्यमंत्री बदलणार होते. निवडणुका जवळ आल्या होत्या. त्यामुळे सहीसाठी सर्व कागदपत्रे घेऊन मी मुख्यमंत्र्यांकडे पोहोचलो होतो. या हॉस्पिटलच्या उभारणीसंदर्भातील प्रबोधिनीची व आमची भूमिका अनेकदा सांगून झाली होती. पण दोन दिवसांतला एक दिवस पुन्हा हे सगळं सांगण्यातच संपला. दुसऱ्या दिवशीच्या भेटीमध्ये त्यांनी सांगितलं की ''रात्री १२.०० वाजेपर्यंत तुमचं काम करून देतो. आपण पुण्याला जा. परत मला भेटू नका.'' झालं, त्यांनी इतकं सांगितल्यावर रात्री ११ वाजता पुण्याला निघालो. काम होईल ना ? मुख्यमंत्र्यांच्या लक्षात राहील ना ? काम नाही झालं तर मध्ये नवीन निवडणुका... नवीन निर्णय... नवीन मुख्यमंत्री... परत पुढचे ५-६ महिने सगळं लांबणीवर... प्रवासात हाच विचार चालू होता. हेच आठवत रात्री ३.०० वाजता पुण्यात पोहोचलो. घराच्या दरवाजासमोर हिरमुसलेलं तोंड घेऊन उभा होतो. बेल वाजवावी की न वाजवावी अशा परिस्थितीत असताना गाडीचा आवाज ऐकून आईने आधीच दरवाजा उघडला. आत येऊन पाहतो तर सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि माझा चेहरा मात्र पडलेला. दरवाजातच आईने बातमी दिली की रात्री १२.०० वाजता मुख्यमंत्र्यांचा फोन आला होता. ''तुमचं काम पूर्ण झालं आहे. कागदपत्रांवर सही झाली आहे. तुमचा मोबाईल नंबर मिळत नसल्यामुळे घरी फोन करून कळवतोय आणि पुढील कार्यवाहीसाठी Bert of Luck !'' हे ऐकून प्रवासातील विचारांचा ताण एकदम हलका झाला. प्रयत्नांना, धडपडीला अखेर यश आलं होतं.

आज आयुष्याच्या मध्यान्हीच्या एका टप्प्यावर मागे वळून पाहताना खूप काही आठवतंय. डॉक्टर झाल्यानंतर सुरुवातीच्या काळातील ते निर्णयाचे क्षण! तेव्हा पाहिलेली काही स्वप्नं आज पुरी झाली आहेत. काही नव्याने दिसताहेत. डॉक्टर होणं म्हणजे खरं तर भरपूर पैसा हातात खेळणार ! हे एक समीकरणच आहे. घरच्यांच्याही बरेचदा त्याच अपेक्षा असतात. सुरुवातीला कॅन्सरच्या उपचारासाठी भारतात प्रसिद्ध असलेल्या टाटा मेमोरिअल रुग्णालयात मी काम केले. तेथे

अनुभव घेऊन मी पुण्यात आलो, तेव्हा टिळक रोडवर कन्सल्टन्सी करत असताना, मलाही पैशाच्या पावसाची झलक मिळत होती. त्यात नवेपण होते पण या पावसात भिजून तृप्त व्हावे, असे वाटत नव्हते.

डॉक्टर, सर्जन म्हणून मी घडण्याआधी, ज्ञान प्रबोधिनीचे संचालक कै. आप्पा पेंडसे यांच्या विचारांचा माझ्या मनावर खोल संस्कार झाला होता. अभ्यासाबरोबरच खेळ, ट्रेकिंग, व्याख्यानं ऐकणं व स्वत: देणं यांत मी रमत होतो. सर्व क्षेत्रांमध्ये आपले कार्यकर्ते असावेत, निर्माण व्हावेत अशी आप्पांची भूमिका होती. त्यांचे हे विचार डोक्यात होतेच; शिवाय मला उपजतच चैतन्य असलेल्या गोष्टींबद्दल उत्सुकता होती, आवड होती. त्यात जीवशास्त्र हा माझा आवडीचा विषय होता. आणखी एका गोष्टीमुळे मी वैद्यकीय क्षेत्रात येण्याचं ठरवलं. सध्याचं अस्तित्वात असलेलं वैद्यकीय क्षेत्र बदलायला पाहिजे याची जाणीव त्या वेळी झाली होती. यातल्या बऱ्याचशा शाखा पैशाच्या अधीन झालेल्या, बरबटलेल्या जाणवल्या. हे सत्य बदलण्यासाठी या क्षेत्राकडे ओढ वाढतच गेली. ही खरं तर नकारात्मक प्रेरणा होती. पण ती तीव्र होती. त्यामुळे सुरुवातीपासून ठरवलं नसूनही मी वैद्यकीय क्षेत्राकडे वळलो.

बी.जे.मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना माझ्या शिक्षिका श्रीमती मेहरू मेहता यांचा माझ्यावर खूप प्रभाव पडला. निष्काम वैद्यकीय सेवा असा एकच ध्यास त्यांनी घेतला होता. आईबरोबर माझी टीचर - स्टुडंट अशी रिलेशनशिप होती. आईनंतर डॉ. मेहतांच्या रूपाने टीचर- स्टुडंट अशी रिलेशनशिप माझ्या ॲकॅडमिक करिअरमध्ये मला मिळाली. त्यांचं माझ्यावर वैयक्तिक लक्ष असायचं. त्यांच्या रूपाने ३० वर्षं सातत्यानं आठवड्यातून एकही दिवस सुट्टी न घेता २४-२४ तास काम करणारं व्यक्तिमत्त्व मला भेटलं होतं. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला असे अनेक पदर होते की ज्यामुळे त्या विद्यार्थिदशेत माझं स्वप्न होतं की आपणही बाईंसारखंच व्यक्तिमत्त्व मिळवायला हवं. काम करायला हवं. बाईंच्या ९ नंबर वॉर्डमध्ये ॲडमिट होण्याचा पेशंटचा आग्रह बाईंवरील विश्वासच दाखवितो. शून्यातून संजीवन रुग्णालय पुन्हा उभं करायची प्रेरणा, जगावेगळं काही करण्याच्या या स्वप्नातूनच मिळाली असावी.

मेहताबाईंबरोबर काम करताना, दैनंदिन कामामध्ये उत्तमता कशी आणता येते याचे आपोआप धडे गिरविले गेले. त्या आपल्या कामामध्ये इतक्या गुंतलेल्या असायच्या की आपल्या प्रयत्नाला यश येणारच हा विश्वास त्यांच्या मनामध्ये असायचा. मेहताबाईंकडून प्रेरणा घेऊन ज्या वेळी मी कॅन्सरसाठी भारतात प्रसिद्ध असलेल्या टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये काम करू लागलो, तेव्हा तिथे दिवसरात्र काम करताना, महिन्याला जवळजवळ दीडशे शस्त्रक्रिया व्हायच्या. तरीही थकवा न येता आपल्याला शिक्षणाची खूप मोठी संधी मिळते आहे याचाच उत्साह जास्त असायचा. यातूनच माझा कामाचा स्टॅमिना तयार झाला. टाटामध्ये एकमेकांशी बोलायलासुद्धा वेळ नसायचा. माझ्याबरोबरचे ज्युनिअर- सिनिअर शनिवार- रविवारी सुट्टी घेत असत. मला मात्र एक दिवसही सुट्टी घ्यावीशी वाटली नाही. अगदी दररोजची कामं असली तरी ती उत्तमच करू, मोठ्या कामांची जबाबदारी घेऊन मोठी कामं करू, हीच माझी या क्षेत्रातील धडपड होती; सुट्टीच्या दिवशी ग्रंथालयात वाचन करणे, संशोधनाचे काम करणे, केस स्टडी करणे, संगणकावर रुग्णांसंबंधी माहिती एकत्रित करून ठेवणे अशी कामे करायचो. या माझ्या सखोल अभ्यासाचा परिणाम असा झाला की मी जर कुठला शोधनिबंध वाचणार असेन तर टाटातले लोक आवर्जून उपस्थित राहू लागले. जरी मी अजूनही कधी सुट्टी घेतली तरी त्या दिवशीसुद्धा काहीतरी काम हवं असतं. कामाशिवाय करमतच नाही. मग सुट्टीच्या दिवशी नवीन व्यक्तींना भेटणं, त्यांच्याकडून नवीन काही शिकणं मला आवडतं.

यासर्व गोष्टी मी हळूहळू अनुभवातूनच शिकत गेलो. या संदर्भात टाटामध्ये मी रजिस्ट्रार असतानाचा एक प्रसंग आठवतो - सकाळची राऊंड, दिवसभर उभं राहून मेजर सर्जरी, परत राऊंड, संध्याकाळपासून दुसऱ्या दिवशीच्या ऑपरेशनची तयारी. खूप धावाधाव झाली होती. शरीरातील नसन् - नस् फक्त विश्रांती मागत होती. रात्री २ वाजता एका वॉर्डबॉयची बायको कॅन्सरच्या असह्य वेदना (शेवटची स्थिती) होत असल्याने आली. सिस्टर उठवायला आल्या. वेदनाशामक इंजेक्शन कुठलं ते सांगितलं, कारण त्याच्याशिवाय मीच काय कुठलाही डॉक्टर काहीच

स्वप्नं जगणारी माणसं

करू शकणार नव्हतो. पण सिस्टर तीन वेळा मला उठवायला आल्यावर ज्युनिअर-सिनिअर डॉक्टर सोडून तुम्ही मला का उठवताय, मी काही करू शकत नाही, असं ओरडून सांगितलं. सिस्टर निघून गेल्या आणि मी झोपलो. पण या प्रसंगानं माझ्या मनावर चांगलाच ओरखडा उठला. मी तो पेशंट अटेंड करायला हवा होता. पण मीही अपरिहार्यपणे सिस्टिमचा एक भाग बनत चाललोय, असं वाटलं आणि पुण्याला परतायचं या माझ्या विचारावर या प्रसंगाने शिक्कामोर्तब झाले. पुण्याला आल्यावर मी स्वत:ची कन्सल्टन्सी सुरू केली; शिवाय इतर हॉस्पिटल्समध्ये ऑपरेशनसाठीही मी जात होतोच. पण त्यांच्या टर्म्स आणि कंडिशन्स माझ्या मनातल्या कामाशी जुळत नव्हत्या. याच दरम्यान मला जपानला जायची संधी मिळाली. माझी ध्येयं आणि स्वप्नं यांच्या कक्षा विस्तारण्यासाठी ३ प्रमुख गोष्टी कारणीभूत ठरल्या - १) जग बघणं २) मोठ्या संस्थांना भेटी देणं व संस्थांमध्ये काम करणं ३) मोठी माणसं भेटणं.

जपानला गेल्यावर माझ्या मनातील अनेक गृहीतकांना धक्का बसला. पिण्याच्या पाण्याप्रमाणेच स्वच्छतेसाठी वापरण्याचे पाणीही स्वच्छच असते, हे बघून वाटले, आपल्याला अजून किती पल्ला गाठायचा आहे ! अशी गृहीतकं आपोआप बदलतात. पण यातून होणारं शिक्षण हे खूप महत्त्वाचं असतं.

बेळगावचे डॉ.माधवराव वैद्य, वैद्यकीय सेवेबरोबरच बांधकाम, शेती, दुग्धव्यवसाय, इ. अनेक क्षेत्रात उत्तम काम करताना पाहून मला एक वेगळे सत्य उमगले-ध्येय आणि स्वप्न प्राप्तीसाठी दोन गोष्टींची गरज असते. एक म्हणजे कष्ट करण्याची तयारी अन् दुसरी म्हणजे मनाची कवाडं उघडी ठेवणं. हे काम मला जमणार नाही, असं म्हणणारा आपली शिक्षणाची अन् मेंदूची झापडं बंद ठेवत असतो. त्यामुळे सकारात्मक विचार करून नवीन शिकत शिकत अनुभवसमृद्ध होणं म्हणजेच ध्येयपूर्तीकडे एक पायरी वर सरकणे होय, असं मला वाटतं.

स्वप्नपूर्तीच्या दिशेने पुढे जाताना मला दोन महत्त्वाचे टप्पे वाटतात. एक म्हणजे स्वत:च्या वैयक्तिक विषयात प्रवीण असणं, तुमच्या विषयातलं किंवा क्षेत्रातलं असं प्रावीण्य मिळवावं की त्यात कुणीही लहरश्रश्ररसिश करू शकणार नाही. मी माझ्या क्षेत्रात सध्या इतकं प्रावीण्य मिळवलं आहे की कॅन्सर विषयातलं कोणतंही असं ऑपरेशन नाही की जे अमेरिकेतील डॉक्टर्स करू शकतात पण मला जमत नाही. माझ्या जीवनातला एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण झालाय. पण यातला दुसरा टप्पा म्हणजे आपण ज्या ठिकाणी काम करतो तिथल्या लोकांशी जुळवून घेणं, त्यांची बांधणी करणं. हा महत्त्वाचा टप्पा मला वाटतो आणि तो अजून मला पार करायचा आहे. पण या टप्प्यावर माझं काम चालू आहे. मात्र, तिसरा टप्पा म्हणजे आपण जे काम करणार आहोत ते काम प्रथम शहरभर, नंतर राज्यभर व नंतर देशभर परिणाम घडवणारं ठरेल, असं करावं. हा टप्पा हे माझं पुढचं ध्येय आहे. आपल्या कामाचा परिणाम असा बदलत गेला नाही तर फक्त वैयक्तिक-रीत्या आमचं स्वप्न साध्य झालं असं होईल; पण सामाजिक स्तरावर तुमचं ते स्वप्न निरर्थक ठरेल. असं हे एक दूरवरचं स्वप्न मी पाहिलं आहे.

आठ वर्षांपूर्वी संजीवन रुग्णालय चालविण्याच्या निमित्तानं एक आव्हान समोर आलं. सुरुवातीला सहाजणांच्या ग्रुपचं प्रपोजल मी दिलं. ही संस्था रजिस्टर्डही नव्हती. अनेकजणांना भेटून, चर्चा करून संस्था रजिस्टर करण्याच्या मागे लागलो. या काळात ऑपरेशन्स जवळजवळ थांबविलीच होती. भारतातील अनेक हॉस्पिटल्स पाहिली, त्यांच्या मॅनजमेंट्सचा अभ्यास केला. यातला अनुभव पाठीशी नसताना हे आजारी हॉस्पिटल चालविणं हे खरंच आव्हानं होतं. देणग्या मिळविण्यासाठी रोज दारोदार फिरायचो. पण ही जबाबदारी सहकाऱ्यांच्या मदतीने मी पेलली; आणि एक दिवस मी तिथे राहायलाच गेलो. अक्षरश: हॉस्पिटल झाडण्यापासून ते पडदे लावण्यापर्यंत आणि पेशंटचं ड्रेसिंग करण्यापासून ते त्यांना बेडपॅन देण्यापर्यंत सर्व कामं केली. डोक्यात आदर्शवादाच्या अनेक कल्पना होत्या; पण तो दर्जा गाठायला काही काळ जावा लागेल, हे अनुभवांनी शिकवलं. प्रत्येक अनुभव काहीतरी नवीन गोष्ट शिकवणाराच असतो.


एक एक स्वप्न अथक प्रयत्नांनी अशी हळूहळू का होईना पूर्ण होत होती. पण तरीही वैद्यकीय क्षेत्रातली सद्य:स्थिती बघता पुढच्या ध्येयांकडे पावलं टाकणं मला अवघड वाटतं.

वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा माहिती – तंत्रज्ञानाच्या युगात सुधारण्याऐवजी खराबच होत चालला आहे. या क्षेत्रात नीती नसलेलं राजमान्य व्यावसायिकीकरण खूप मोठ्या प्रमाणावर घडत चाललंय. सध्या आपल्याला उपचार परवडेल की नाही हा रुग्णांसमोर प्रश्न नसून यात इतक्या नव्या वैद्यकीय शाखा निर्माण होत आहेत की त्यामुळे रुग्णांचा गोंधळ जास्त वाढला आहे. यावर अंकुशच राहिला नाही. कशातच मापदंड राहिला नाहीये. अगदी, आपण निवडलेला डॉक्टर अमुक एका गुणवत्तेचा असणारच याची खात्री कुणालाच वाटत नाहीये. यावर उपाय करणं शक्य आहे. त्यासाठी वैद्यकीय क्षेत्राबाबत नियम बनविणं अन् नियम बनविण्यासाठी व त्यांचं पालन करण्यासाठी मजबूत साखळी तयार करणं आवश्यक आहे. यात सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे एखाद्याला अत्यल्प सेवा व एखाद्याला अत्युच्च सेवा यातली तफावत कमी करण्याचा सगळ्यांनाच प्रयत्न करावा लागणार आहे. त्यासाठी सर्वात मोठ्ठं हॉस्पिटल उभं करून त्यात सर्वांना मिळेल अशी उत्तमात उत्तम सेवा उपलब्ध करून देणं हे माझं सगळ्यात मोठं स्वप्न आहे. हे अवघड काम अन् यातून मिळणारं शिक्षण हे शिकण्याचं एक नवीन क्षेत्र माझ्यासमोर आहे.

***

**डॉ. धनंजय केळकर**
संजीवन रुग्णालय,
२३, कर्वे रोड मागे, पुणे – ४

स्वप्नं जगणारी माणसं



श्री. सदानंद दाते

# प्रभावी शासकीय सेवेला नीतिमत्तेची जोड

जन्म १९६६, DCP बृहन मुंबई, १९९०- **I.P.S.** त्यानंतर स्वच्छ कारभाराचे ध्येय मनात ठेवून जाणीव पूर्वक पोलिस दलात प्रवेश.

- नक्षलवाद्यांना विधायक मार्गावर आणण्याचा प्रयत्न
- आधुनिक पद्धतींचा प्रयोग करून मुंबईतील संघेटत गुन्हेगारी शोधण्याचा प्रयत्न
- पोलिस व नागपरक यांच्यातील सामंजस्य वाढावे व त्याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात जागरूकता निर्माण व्हावी यासाठी विविध कार्यक्रमांच आयाजिन

**U**PSC च्या परीक्षेला मी अगदी अपघाताने बसलो. कॉलेजच्या पहिल्या काही वर्षात मी सामान्य विद्यार्थी होतो. पण एक मात्र ठरवलं होतं की आयुष्यात काहीतरी वेगळं, मोठं असं व्हायचं. S.Y. नंतर UPSC चा निर्णय एका वेगळ्या घटनेने झाला. घरच्या परिस्थितीमुळे काम करत, स्वकमाई करत शिक्षण झालं. पाचवीमध्ये लोकांच्या घरी देवपूजा करायचो. सातवी ते ICWA होईपर्यंत सकाळी वर्तमानपत्र टाकायचो. फर्निचरच्या दुकानात ऑफिसबॉयचं काम केलं. एका ग्रंथालयात काम केलं. घर लहान, घरात अभ्यासाला जागा नाही. F.Y. च्या पहिल्या सत्रापर्यंत मला अभ्यासात उत्तम असं यश मिळालं नव्हतं. F.Y. च्या पहिल्या सत्रात एका वादविवाद स्पर्धेत भाग घेतला आणि प्रथम क्रमांकाचं पारितोषिक मिळालं. शिक्षकांना ते दाखवायला गेलो, तेव्हा त्यांच्या वर्गातलाच मी विद्यार्थी आहे हेही ते ओळखू शकले नाहीत. ज्ञान प्रबोधिनीच्याच सुनील दाढेंनी मला सांगितलं की तू अशी भाषणं वगैरे करतोस तर तू अभ्यासातही यश मिळवू शकशील. तेव्हा महाविद्यालयीन अभ्यासात यश मिळवण्याची प्रेरणा मिळाली. मी दुसऱ्या सत्रात गुणानुक्रमे तिसरा आलो आणि माझे ७३% गुण वाढून ८९% झाले. इथेच माझा turning point होता.

माझा आत्मविश्वास वाढला. मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाने यश मिळू शकतं याची जाणीव झाली. प्रगती करण्यासाठी खूप छोट्या-छोट्या गोष्टी केल्या. हस्ताक्षर सुधारणं, इंग्रजी सुधारणं यासाठी प्रयत्न केले. माझे शिक्षक ICWA होते म्हणून तो कोर्स करायचं ठरवलं. एक "LAW OF EFFECT" आहे. म्हणजे अभ्यास जमायला लागला की, जमतोही आणि मग करावासाही वाटतो, रस वाढतो. त्यामुळे F.Y. नंतर अभ्यासात, स्पर्धापरीक्षांमध्ये यश मिळवायला काही अडचण आली नाही. अखेर १९८९ साली UPSC ची परीक्षा देऊन माझी IPS साठी निवड झाली.

या माझ्या यशात मित्र, शिक्षक आणि माझी आई यांचा मोठा वाटा आहे. सर्वात मोठा, अगदी सिंहाचा वाटा माझ्या आईचा. कारण मी आठवीत असताना माझे वडील वारले. त्यानंतर आम्ही सर्व भावंडांनी काम करत शिक्षण घेतलं. आईने अपार कष्ट केले. अगदी लोकांकडे स्वयंपाकाची कामं केली. पण आम्हाला शिक्षणामध्ये काही कमी पडलं नाही. आपल्या मुलांनी खूप शिकलं पाहिजे, असं तिला वाटायचं आणि शिक्षण घेणं हाच परिस्थिती सुधारण्याचा मार्ग होता. त्याचबरोबर माझे मित्र व शिक्षक यांनी माझा आत्मविश्वास वाढवला.

प्रशासकीय क्षेत्रात काम करताना आवश्यक अशी भूमिका मी UPSC साठी घेतलेल्या लोकप्रशासन या विषयामुळे तयार झाली होती. Thehry आणि Practice एकच असतं, अशी माझी धारणा आहे आणि गेल्या नऊ वर्षांमध्ये ते अनुभवायलाही मिळतंय.

मला असं वाटतं की आपल्या देशात महत्त्वाच्या अधिकारपदांवर कार्यक्षम, काही एका दर्जाची नीतिमत्ता असणारी माणसं जाण्याची आवश्यकता आहे आणि आपण हे करू शकतो, असं जाणवलं. असं क्षेत्र निवडून आपण सामाजिक प्रश्नांना प्राधान्य दिलं पाहिजे असं वाटलं. सर्वसामान्य समाजाचा भ्रष्टाचाराविषयी अगदी चुकीचा, अर्धवट दृष्टिकोन असतो. पण भ्रष्टाचार म्हणजे काय हे मला या नोकरीची सुरुवात झाल्यावरच समजलं. उदा. शासकीय दूरध्वनी, शासकीय गाडीचा व्यक्तिगत

कामासाठी वापर करणं, हा भ्रष्टाचार की सुविधांचा चुकीचा वापर हा मला प्रश्न पडतो. आपल्या अधिकारपदाचा वापर व्यक्तिगत आकांक्षा पूर्ण करण्यासाठी करणं किंवा सत्तेची नशा म्हणून पद वापरणं हीसुद्धा भ्रष्टाचाराचीच उदाहरणे आहेत. भ्रष्टाचारामध्ये अनेक छटा आहेत हे नंतर अनुभवातून कळलं. भारतीय पोलिस प्रशासन सेवेत आपल्याला थोड्या सेवा कालावधीत विस्तृत कार्यक्षेत्र मिळतं. भंडारा जिल्ह्यात पहिल्या चार वर्षांत मी पोलीस अधीक्षक म्हणून गेलो. तिथं माझ्या हाताखाली २२०० पोलिस कॉन्स्टेबल आणि १२५ पोलिस अधिकारी होते. हा २५ लाख लोकसंख्येचा आणि नक्षलवादी कारवायांचा प्रभाव असलेला मोठा जिल्हा आहे. माझ्या असं लक्षात आलं की, एका रात्रीत २३००-२४०० लोकांच्या कामाची पद्धत आपण बदलू शकत नाही. आपल्या नीतिमत्तेचे निकष त्यांना लावू शकत नाही. भ्रष्टाचार ही एकच समस्या इथे आपल्यासमोर नाही. तर नक्षलवाद्यांची, गुन्हेगारीची, कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या आहे. हेही सर्व महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्यामुळे आपल्या कामाचे प्राधान्यक्रम प्रत्येक वेळी वेगळे असतील. मला वास्तवाची जाणीव झाली की नीतिमत्तेने वागणं ही बांधिलकी आपण स्वत:पुरती पाळू पण साथीदारांकडून तशीच अपेक्षा करणं चूक आहे. तसे केले तर कदाचित नैराश्य आपल्याला गाठेल व आपल्या हातून काहीही काम होणार नाही. आपल्याला नीतिमान, प्रामाणिक आणि प्रभावी पोलिस अधिकारी व्हायचं हे माझं निश्चितपणे ठरलं होतं. कोणत्याही कामाचे Result मिळणं म्हणजे प्रभावी काम. मुंबईत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळणं, टोळीयुद्धांवर कारवाई करणं, लोकांशी योग्य संपर्क प्रस्थापित करून सामाजिक हिताचा, एकीचा विचार करणं हे एखाद्या प्रभावी पोलिस अधिकाऱ्याचं कर्तव्य असेल. नोकरीत प्रवेश करताना जी स्वप्नाळू वृत्ती होती, तिला आता वास्तवाचं भान आलं.

पोलिस सेवेत निराशेचे प्रसंगच खूप येतात. कारण गुन्हेगार, बेजबाबदार लोकांशीच सारखा संपर्क असतो. मी साहाय्यक पोलिस अधीक्षक म्हणून वर्ध्याला काम करत असताना एका पोलिस स्टेशनच्या भेटीत एक वृद्ध गृहस्थ रडत बसलेले दिसले. त्यांच्या मुलाला पोलिसांनी पकडलं होतं आणि त्याला सोडण्यासाठी ते पैसे मागत होते. मी पैसे मागणाऱ्या पोलिस अंमलदाराविरुद्ध कारवाई केली आणि त्याला निलंबित केलं. नंतर त्या पोलिस अंमलदाराची आणि या प्रश्नाची विभागीय चौकशी सुरू झाली. आता मात्र त्या वृद्ध गृहस्थानं आपली साक्ष पूर्णपणे बदलली या साक्षीच्या बदलाचं कारण मी शोधलं, तेव्हा तो वृद्ध म्हणाला, की ज्या पोलिस अंमलदाराविरुद्ध तुम्ही कारवाई केलीत तो माझ्या जातीचा आहे, त्याची नोकरी जाईल. तुम्ही सांगितल्यावर माझा मुलगा सुटला, आता माझं त्या पोलिसाशी काहीही वैर नाही. हा माझ्या सेवेत पहिल्या सहा महिन्यांत आलेला प्रसंग. तोपर्यंत जातीयता म्हणजे काय हे पुस्तकात वाचलं होतं. प्रत्यक्ष हा प्रश्न कधी भिडला नव्हता. जातीयतेमुळे गुणवत्तेपेक्षा आपल्या सोयीने निर्णय घेणारी व्यवस्था पाहून आश्चर्य वाटलं. जातीसाठी अनेक हीन कृत्यं करणारी माणसं पाहिल्यावर सुरुवातीच्या विचारांना धक्का बसला. नोकरीत येताना आपल्या माणसांसाठी, समाजासाठी प्रामाणिकपणे काम करायचं असं ठरवलं होतं, पण मग असं वाटलं की समाजासाठी म्हणजे कोणत्या समाजासाठी आपण काम करायचं? एखादा अधिकारी प्रामाणिकपणे काम करतो आणि त्यामुळे समाजाला त्रास होतो ही दु:खाची गोष्ट आहे. त्यामुळे इमानदारीने काम करण्यातला आपला उत्साह कमी होतो.

पण काही वेळा चांगल्या गोष्टींना समाजात मान्यताही मिळते. हे पाहून मी पक्के ठरविले की या नोकरीत मिळणाऱ्या पगारात आपलं मध्यमवर्गीय राहणीमान सांभाळून आपण बचतही करू शकतो आणि समाधानही मिळवू शकतो. मग भ्रष्टाचाराचा मार्ग कशासाठी?

भंडारा जिल्ह्यात काम करताना नक्षलवाद्यांच्या विरुद्ध कारवाई करणं, त्यांना चकमकीत मारणं या प्रकारच्या कामापुरते न थांबता नक्षलवादी चळवळीच्या मुळाचा, कारणांचा शोध घेतला. आदिवासींवरच्या अन्यायाचा अभ्यास केला. नक्षलवादी ही फक्त कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नसून ती एक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक समस्या आहे. म्हणून जे आदिवासी यामध्ये भरडले गेले आहेत, त्यांना न्याय मिळवून देणं आणि या प्रश्नाविषयी जाणीव जागृती करणं ही कामं केली. आदिवासींविषयी माहिती, त्यांच्या समस्या यांच्या फलकांची प्रदर्शनं भरवली. आदिवासी स्त्रियांचे कायदा - साक्षरता मेळावे, नक्षलवादाची माहिती मोहीम, आदिवासींच्या

स्वप्नं जगणारी माणसं

गावभेटी, पोलिस प्रशिक्षण देऊन ते गावकऱ्यांवर अन्याय करणार नाहीत अशी व्यवस्था करणं, नक्षलवादी चळवळीतील आदिवासींवर अन्याय न करता त्यांना कायद्याप्रमाणे वागवून त्यांच्या मनात आपल्याविषयी विश्वास निर्माण करणं, त्यांचं पुनर्वसन करण्याचे मार्ग वापरणं, त्यांना सुधारण्याचं आवाहन करणं हे उपाय केले. त्याला प्रतिसाद म्हणून दोन वर्षांत सर्व आदिवासी नक्षलवादी सशस्त्र शरण आले. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांचा म्होरक्या आणि त्याची पत्नी एके ४७ आणि ३०३ बंदूक घेऊन शरण आले. गेल्या ३५ वर्षांत एके ४७ शरणागतीची भारतात घडलेली ही एकमेव घटना आहे. मी तिथे काम करायला लागलो, तेव्हा भंडारा जिल्ह्यात पोलिस प्रशासनासमोर नक्षलवाद्यांचीच मोठी समस्या होती. जे व्यसनी कर्मचारी होते, त्यांच्यासाठी डॉ. अभय बंग यांच्या मदतीने १५ दिवसांचे निवासी व्यसनमुक्ती शिबिर आयोजित केले. त्यांपैकी ५३ लोक व्यसनमुक्त झाले.

अर्थात काम करीत असताना अनेक आव्हाने समोर असतात. मुंबईतील टोळीयुद्धे, पंजाब, काश्मीर येथील दंगली, गुन्हेगारीचे स्वरूप, दक्षिणेकडील दगंली या सर्व गुन्हेगारीच्या मागे वेगवेगळी कारणं असतात; ती जाणून घेऊन त्यावर उपाय करायला हवा. इंग्रजीत एक चांगलं वाक्य आहे की, "Every Policeman is citizen in Uniform and every citizen is Policeman in Civils." असं विश्वासाचं नातं पोलिस-नागरिकांच्यात निर्माण व्हायला हवं. सभ्य नागरिकांपेक्षा गुंड संख्येने कमी असून ते गुन्हेगारी पसरवू शकतात. सगळ्या समाजाने एकत्र येऊन यावर उपाय केला तर पोलिस यंत्रणेची गरज भासणार नाही.

चित्रपटात आपल्याला पोलिसांचं अवास्तव चित्रण दिसतं. पोलिस अधिकारीही माणूस आहे. त्यालाही माणसाच्या जाणीवा आहेत, त्यामुळे तो काही वेळा कार्यवाहीत चुकेल पण अधिकाधिक वेळा योग्य प्रकारे अधिकार वापरेल. प्रसारमाध्यमं याचं अजिबात योग्य चित्रण करत नाहीत. विद्यार्थ्यांपर्यंत याविषयी माहिती पोहोचविण्यासाठी मी DCP असताना मुंबईत एक School Contact Programme केला. त्यामध्ये पहिल्या वर्षी ५००० शालेय विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम राबवला. एक माहिती पुस्तिका तयार केली. पोलिस स्टेशन म्हणजे काय? तक्रार कशी नोंदवायची? पोलिस कोणत्या तक्रारींवर कारवाई करतात? पोलिसांमध्ये पदक्रम काय असतो? पोलिस स्टेशनमध्ये तक्रार ऐकून घेतली नाही तर त्याच्यावर कुठे जाता येईल. या प्रकारची माहिती त्यात होती. त्याचप्रमाणे शाळांमध्ये व्याख्याने दिली. पोलिस स्टेशनला दोन तासांची प्रत्यक्ष भेट ठरवली व तेथील सर्व माहिती प्रत्यक्ष दिली. सर्वांना जेव्हा हे कळले की पोलिस हाही आपल्यासारखा माणूसच असतो, त्याची चूक होऊ शकते; पण त्याच्यावर वरिष्ठ अधिकारी असतात. त्यांना भेटून त्यांच्याकडून आपल्याला न्याय मिळवून घेता येतो आणि पोलिसांच्यावर एक न्याययंत्रणा, प्रसारमाध्यमे व राजकीय व्यक्ती असतात. पोलिस व्यवस्थेबद्दल अधिकाधिक योग्य माहिती पोहोचली पाहिजे. लोकांची पोलिसांकडे बघण्याची दृष्टी विचित्र असते. पोलिस हा उद्धट, बेदरकार, उर्मट असला पाहिजे, असे लोकांना वाटते. गुन्हेगाराशी नीट वर्तन केले तरी लोकांना आश्चर्य वाटते. पण पोलिसांना कोणालाही उगाच मारण्याचा अधिकार नाही. त्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण केले पाहिजे, असे गृहीतक आहे. आपल्या वर्तनातून लोकांच्या अपेक्षा पूर्ण करताना तारतम्य बाळगणे आवश्यक असते. या नोकरीत सुट्ट्या जवळ-जवळ नाहीत. नऊ वर्षांच्या नोकरीत मी दोनदा सुट्ट्या घेतल्या आहेत. एक लग्नाच्यावेळी व दुसऱ्यांदा मुलगी झाली तेव्हा. मुलगी झाली तेव्हा एक महिन्याच्या सुट्टीतले १५ दिवस बाकी असताना महत्त्वाचे काम निघाल्याने मला कामावर रुजू व्हावे लागले.

नोकरीत प्रवेश करतानाच माझे ठरले होते की अतिशय प्रामाणिकपणे काम करायचे. लग्न ठरवलं तेव्हा पत्नीला याची कल्पना होती की मला मिळणाऱ्या पगारातच आपण चरितार्थ चालवायचा आहे. स्वत: सुविद्य व अतिशय बुद्धिमान असलेल्या माझ्या पत्नीने मला मोठा आधार दिला आहे. नोकरीत खूप ताण असतात. ते पेलण्याचं, सामर्थ्य मला माझ्या पत्नीमुळे मिळतं. मुंबईत दोन वर्षांच्या नोकरीत प्रामाणिकपणे काम करणं हीच माझी मोठी मिळकत आहे. अशी अनेक आव्हाने पुढील काळातही सामोरी येतील.त्यांना समर्थपणे सामोरं जात प्रभावी काम करणं हे माझे स्वप्न आहे.


***

**सदानंद दाते.**
युरोपियन क्वार्टर्स, आझाद मैदान, पोलिस कंपाऊंड, व्ही.टी.स्टेशनसमोर, मुंबई



प्रकाशात चालता चालता चालणेचि विसरावे ।
भावातीत सहज स्वभाव ध्येयी तन्मय व्हावे ।।

स्वप्नं जगणारी माणसं



**वासुदेव कामत**

जन्म १९५६, प्रख्यात चित्रकार
* चित्रांची अनेक स्वतंत्र प्रदर्शने
* बॉम्बे आर्ट सोसायटी पुरस्कार
* स्टेट आर्ट एक्झिबिशन आणि इतर अनेक संस्थांचे पुरस्कार
* पोर्ट्रेट आणि लँडस्केप या विषयांवरील कार्यशाळांचे आयोजन

# इदं न मम

ऋषिपुत्र सत्यकाम जाबाल गुरुकुलात वेदविद्या शिकण्याकरिता पहिल्या दिवशी गेला त्या वेळी त्याच्या गुरूने चारशे गाई चारावयास दिल्या आणि सांगितले की यांची संख्या, एक हजार झाली म्हणजे तू माझ्याजवळ ये. शिकण्याची जिज्ञासा आणि परिश्रम यांची तीव्रता आपल्या शिष्यात किती आहे हे पडताळून पाहण्यासाठी त्यांनी सत्यकामाची परीक्षा घेतली. या कथेचा खूप मोठा प्रभाव माझ्यावर पडला.

कोणतीही विद्या किंवा कला आत्मसात करण्याकरिता कठोर परिश्रम करण्याची तयारी आणि सश्रद्ध जिज्ञासूवृत्ती अंगी असेल तरच ती फळ धरते. बालपणापासूनच मला चित्रकलेची आवड होती. भिंतीवर आणि अंगणातल्या ओटऱ्यावर आगगाडीची लांबच लांब चित्रे खडूच्या रेघोट्यांनी काढून माझ्या कलेचा श्रीगणेशा झाला. पुढे शाळेत गेल्यावर तिथल्या कलाशिक्षकांनी आणि आई-वडिलांनी मला भरपूर प्रोत्साहन दिले.

चित्रकलेबरोबरच गणपतीच्या मूर्ती बनविण्याच्या छंदामुळे शिल्प कलेचीदेखील आवड लागली. गणेशोत्सव, शिवजयंती,दिवाळी हे सर्व सण कलेचा सोहळा दर्शविणारे होते.

कै. महाजन सर व कै. नाना अभ्यंकर यांचे मार्गदर्शन मला बालवयात लाभले. नानांनी माझ्या रेखांकनातील चुका वारंवार दाखवून एक डोळस दृष्टी दिली.

कलेच्या उच्च शिक्षणाकरिता मी सर जे.जे. कला महाविद्यालयात प्रवेश घेतला. जे.जे. स्कूल ही १८५७ पासूनची परंपरा लाभलेली वास्तू. तिथून बाहेर पडलेला विद्यार्थी केवळ आर्टिस्ट म्हणून गणला जात नाही तर त्याचे कर्तृत्व तिथल्या इतिहासाचे एक पान ठरते ही वस्तुस्थिती आहे.

येथे कॉलेजच्या व्यतिरिक्त इतर वेळात देखील भरपूर काम करावे लागे. रोज कमीत कमी वीस स्केचेस करणे आम्हाला अगत्याचे होते. मी आणि आमचे वर्गमित्र सामूहिकपणे रेखांकन आणि निसर्गचित्रण करण्यास नियमित जात असू. गेटवे ऑफ इंडियाच्या कट्ट्यावर बसून समोरून जाणाऱ्या व्यक्तीचे भराभर रेखांकन करून त्याच्या चेहेऱ्याचे साम्य आपल्या चित्रात उतरविण्याची स्पर्धा आम्हां मित्रांत लागत असे. यातही वेगवेगळ्या माध्यमांची हाताळणी, वेगवेगळे प्रयोग कामाचा उत्साह वाढवीत. नियमितपणे जहांगीर आणि ताज कलादालनांना भेटी देणे हे तर देवदर्शनासारखे भासे.

कॉलेजमध्ये शिकताना 'व्यक्तिचित्रण' हा माझा आवडता विषय होता आणि आजही आहे. त्या काळी ३ दिवसांत १ पोर्ट्रेट रंगविण्यासाठी मॉडेल बसविले जाई. अशा वेळी दोन इझलवर बोर्ड लावून दिवसाला दोन किंवा तीन पोर्टेट करून मी कामाची गती वाढवली.

याउलट एकदा जे.जे. स्कूलच्या समोर क्रॉफर्ड मार्केटजवळ एक लँडस्केप करण्यास बसलो; चित्र पूर्ण झाल्यावर एकाने खूश होऊन म्हटले की, दोन मिनिटं तुमचं चित्र मला द्या. मी लगेच आणून देतो. तो चित्र घेऊन गेला आणि येताना चित्राबरोबर ५ रुपये खुशीने त्याने मला दिले. नको म्हणत असतानादेखील त्याने आग्रहाने माझ्या खिशात कोंबले. मी काढलेल्या चित्रातील एक-दोन



रेषांना यावी लय, रंगात झरावा नाद ।
चित्रातील सौंदर्याचा रसिकांनी घ्यावा वेध ।।

स्वप्नं जगणारी माणसं

फटकाऱ्यात त्याचे तिथले दुकान दिसत होते. त्याचे त्याला कौतुक. कॉलेज जीवनात माझ्या चित्राने मिळवून दिलेली ही माझी पहिली मिळकत.

कॉलेजमध्ये शिकताना, रेखांकन आणि व्यक्तिचित्रणात योग्य ती प्रगती मी साधत होतो. म्हणून एके दिवशी प्रा. मृगांक जोशी यांना विचारले की, ''मी जे काही रचनाचित्र करतो ते एक तर निसर्गाचित्रासारखे होते किंवा व्यक्तिचित्रणासारखे. निखळ आशय किंवा केवलाकारी अभिव्यक्ती मला का जमत नाही. माझे चुकते कुठे?'' त्यावर जोशी सरांनी दिलेला सल्ला माझ्या विचारांना कलाटणी देणारा ठरला. सर म्हणाले की 'प्रथम आपले काही चुकते आहे हा विचार मनातून काढ. वास्तवदर्शी चित्रांकन ही काही चूक नव्हे. तुझ्या रक्तातच जणू ते भिनलं आहे. त्याचा आधार घेऊन तुझी अभिव्यक्ती कशी करता येईल ते पाहा' आणि डोक्यात लख्ख प्रकाश पडला. त्यानंतर माझी चित्रे अतिवास्तववादी आकार घेऊ लागली. माझ्या चित्राला त्या वर्षी सुवर्णपदक मिळालं.

१९७७ मध्ये प्रथम वर्गात प्रथम येत मी फाईन आर्टची पदविका मिळवली. आता पुढे काय? माझे सर्टिफिकेट, सुवर्णपदक आणि चित्रांची फाईल घेऊन नोकरीकरिता दारे ठोठावू लागलो. प्रत्येक ठिकाणी निराशाच पदरी पडत होती. शेवटी मन इतके उद्विग्न झाले की एस. एस. सी . च्या निकालावर बँकेतली नोकरी मिळते का म्हणून आमच्या मित्रांना विचारले.

मी शिक्षणपद्धतीला दोष देत नाही परंतु शिकता-शिकता व्यावसायिकतेच्या जगात नेमके काय चालले आहे, आपण त्यात नेमके कुठे बसतो याचे मी भान घ्यायला हवे होते. वस्तुनिष्ठ चित्र रंगविण्यात प्रावीण्य मिळवले पण वस्तुस्थितीची जाण नव्हती.

'फॉर यू' नावाच्या मासिकात इलस्ट्रेटर म्हणून मी पहिली नोकरी धरली. इथून फाईन आर्ट अणि कमर्शियल आर्ट याच्या मध्ये माझी मीच उभी केलेली कणखर भिंत मी फोडायला घेतली.

१९८४ पर्यंत नोकरी करता करता स्वतंत्र कामे मी मिळवत गेलो. मनाचा निर्धार करून नोकरीला राम राम ठोकला. तेव्हा सुप्रसिद्ध चित्रकार एस.एस. शेख यांचे मला चांगले मार्गदर्शन लाभले. याच वर्षी माझ्या व्यक्तिचित्रांचे पहिले प्रदर्शन जहांगीर दालनात भरवून मी स्वतंत्र अभिव्यक्तीला सुरुवात केली. यापूर्वी मी माझी चित्रे दाखविण्यासाठी दारोदार भ्रमंती केली, पण आर्ट गॅलरी ही एकच जागा अशी असते की रसिक आपल्या चित्रांकडे येतात. या प्रदर्शनानंतर मला अनेक कामे मिळाली. नोकरीनंतर सलग दोन-तीन वर्षं मिळेल ते काम स्वीकारून समोरच्या ग्राहकाचे समाधान केले.

वर्षातून एकदा निसर्गचित्रण आणि व्यक्तिचित्रण करण्याकरिता मी घराबाहेर पडू लागलो. व्यक्तिचित्रणाद्वारे अनेक नामवंतांशी जवळून परिचय झाला. पं. मल्हारराव कुलकर्णी, नटश्रेष्ठ चंद्रकांत मांढरे. कै. उमाकांत ठोमरे, कै. जयवंत दळवी, खा. राम नाईक, माधवराव गडकरी अशा अनेक विभूतींची, व्यक्तिचित्रे मी त्यांच्याशी गप्पा मारत चितारली.

हे सर्व चालू असतानाच मनात अनेक विषय आकार घेत. 'प्रतीक्षा', 'आई आणि मुलं', 'आपले सोबती' आणि आता रंगवीत असलेली 'कृष्ण' ही चित्रांची मालिका पुराणातले, इतिहासातले, प्रसंग आणि आजचे अनुभव यांच्यातला धागा जोडून ह्या मालिका मी रंगवल्या. ही चित्रे, प्रसंग वर्णन करणारी इलस्ट्रेशन नव्हती, परंतु त्यात माझ्या विचारांचे प्रकटीकरण असे. मुळात इलस्ट्रेशन मी कमी दर्जाचे मानत नाही, तोही एक भाव-चित्रातील अभिव्यक्तीचा एक प्रकार आहे. परंतु आज ही बोध देणारी चित्रे अगदीच कमी आणि निकृष्ट दर्जाची होत असलेली आपण पाहतो. कारण याकरिता लागणारा रेखांकनाचा सराव हल्लीच्या कलाविद्यार्थ्यांमध्ये कमी झालेला दिसतो.

उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याचे मलाही आकर्षण होते. सुदैवाने मला त्या वेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनातील एक प्रसंग वाचनात आला. उच्च शिक्षणाकरिता आपण परदेशात जाणार का? असे त्यांना विचारताच 'बिल्कुल नाही. परदेशात शिकण्यासाठी नाही,



सृष्टीसुषमा अनंत तिचा स्वर्गीय विस्तार ।
माझ्या रेखात आणू का एका छटेची बहार ।।

शिकवण्यासाठी जाईन' असे ठामपणे त्यांनी सांगितले. हे वाचून माझे झगमगाटाचे आकर्षण निवळले.

तसे कला आणि व्यवहार याची सांगड घालणे म्हणजे तारेवरची कसरत करण्यासारखे असते. एक कलाकार म्हणून स्वतंत्र अभिव्यक्ती करताना उपजीविका म्हणून व्यावसायिक उद्दिष्ट समोर आले. म्हणजे सृजनतेला ग्राहकांच्या रुचीची बांधिलकी येते. नोकरी सोडून स्वतंत्र काम करायला सुरुवात केली त्या वेळी येईल ते काम मी स्वीकारले. कथा पुस्तकांची कव्हर्स करणे, इलस्ट्रेशन्स करणे, याशिवाय व्यंगचित्रे, पोर्ट्रेट्स्, जाहिरातींची आर्टवर्क्स, काही सोडले नाही. कारण आज माझ्या समोर आलेला ग्राहक माझ्या कलेचा प्रचार करणारा ठरेल, आणि हळूहळू माझ्या स्वतंत्र अभिव्यक्तीचा आस्वादक ठरणार याची मला पक्की खात्री होती.

पहिला संपर्क, समाधान आणि नंतर व्यवहार या तीन पायऱ्यांतून आपला ग्राहक पुढे रसिक होत असतो. हळूहळू माझ्याकडे अशी कामे येऊ लागली की ज्यात मला खरोखरीच आनंद मिळत गेला.

कला आणि व्यवहार याचे प्रमाण आणि मर्यादा आपली आपण सांभाळावी लागते.

भारतीय जीवनाचा मूळ गाभा जाणून घ्यावा म्हणून त्यायोग्य वाचन-चिंतन करून त्यानुसार चित्रांची अभिव्यक्ती आकार घेऊ लागली. सुयोग असा की, भगवान गौतम बुद्धांचे विचार आणि त्यांचे चरित्र अभ्यासून चित्तशुद्धीची साधना अंगीकारता आली. यातून लाभलेली फलश्रुती म्हणजे माझी 'बुद्धचित्रमाला.' भगवान बुद्धांचे विचार आणि त्यांची विद्या पूर्वेकडे जपानपर्यंत पसरली. त्या जपानमधील 'सुबोसाका डेरा' मंदिरासाठी बुद्धचित्र रंगविण्याचे पवित्र कार्य मला मिळाले, याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. आठ फूट उंच आणि एकूण एकशेचाळीस फूट लांबीची चित्रमाला आज त्या मंदिरामधील प्रमुख आकर्षण आहे.

रेखांकन, निसर्गचित्रे, व्यक्तिचित्रे, आशयचित्रे याबरोबर केलेली भित्तिशिल्पे आणि भित्तिचित्रांची निर्मिती असा हा आजवरचा प्रवास. केवळ कलेसाठी कला म्हणून न राबवता एक साधना म्हणून मी कार्यरत राहिलो. या प्रवासात पारितोषिकांच्या माळा स्वीकारल्या. तसेच नाराजीचे सूर



सारख्याच भावनेने झेलले. या वर्षी कोल्हापूरचा डॉ.चंद्रकांत मांढरे कला अकादमीचा गौरव पुरस्कार स्वीकारताना साहजिकच आनंद



झाला. परंतु डोळ्यासमोर उभे राहिले ते अनेक जण की ज्यांच्यामुळे मी आज या पुरस्काराला पात्र ठरलो.

आता माझे वय पंचेचाळीशी ओलांडू लागले आहे. पूर्वीपासून मनात धरलेले एक स्वप्न आहे - रविवर्मांची चित्रे, ग.दि.मां.चे गीतरामायण आज घराघरात जाऊन पोहोचले आहे. तशी एखादी कला अभिव्यक्ती आपल्या हातून घडावी की जेणेकरून त्याची प्रतिकृती घराघरात जावी, सर्वांना परवडेल अशा किंमतीत जावी.

आज संगणकाचे युग आले आहे.

चित्रकारांनी रेखांकनाचा, पेटिंग करण्याचा सराव ठेवला नाही तर



रेषांच्या रंगझुल्यातून हळूच स्पर्शीन सौंदर्याला ।
गूढ, तरल ते माझ्या मनीचे कळेल का हो रसिकाला?

हातात कुंचला राहणार नाही. यांत्रिक किंवा अन्य कोणत्या साधनांनी एखादा परिणाम लवकर साध्य होईल. परंतु सृजनाचा खरा आनंद केवळ अंतिम परिणामाने मिळत नसतो, त्याकरिता प्रत्यक्ष कृतीची अनुभूती देखील कारण असते. एकदा एका संगणकीय चित्र काढणाऱ्या कलावंताने एक लेख लिहिला होता, त्यात सुरुवातीस तो सांगतो की "Now I dont want to depend on sticky pallette ad shabby colours..." जो चित्रकार आपल्या चित्र साहित्याला चिकट पॅलेट आणि गलिच्छ रंग म्हणतो तो भले संगणकाच्या आधारे चांगली चित्रे काढेल परंतु खऱ्या कॅनव्हास-वरच्या चित्रांचा दर्जा किंवा पावित्र्य त्याला येणार नाही. याचा अर्थ संगणकाकडे कलाकाराने पाठ फिरवावी असे नाही. पण त्याचे गुलाम न होता इतर साहित्य-साधनासारखा त्याचा वापर करावा.म्हणून मी संगणकापासून अलिप्त न राहता प्रत्यक्ष चित्र हाताने रंगविण्यावर सतत भर दिला.

आज किती नावे आठवू की ज्यांनी मला भरभरून दाद दिली. अशा वेळी एकच वाटते की ही गळ्यात पडणारी माळा अर्ध्यावरतीच धरावी आणि नम्रतेने झुकून म्हणावे, 'इदं न मम ।'

***

**चित्रकार श्री. वासुदेव कामत**
'तपस्या', रो हाऊस
नं. १५, साईकृपा कॉम्प्लेक्स,
काशि-मीरा, जि.ठाणे

# वेदनेने दिले भवितव्याचे स्वप्न

*जन्म १९५०, दुर्दैवाने प्राप्त झालेल्या अपंगत्वावर मात करून, आपल्यासारख्याच अपंगांच्या पुनर्वसनासाठी 'हेल्पर्स ऑफ द हॅंडिकॅप्ड' या संस्थेची कोल्हापूर येथे स्थापना*

** १९९६– अपंगांच्या पुनर्वसन कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार*
** फाय फाऊंडेशन पुरस्कार*
** सावित्रीबाई फुले पुरस्कार*
** बाया कर्वे पुरस्कार*
*असे अनेक पुरस्कार प्राप्त.*

अनेकजण कौतुकाचे उद्‌गार काढतात.... 'एवढे पराकोटीचे अपंगत्व असून तुम्ही एवढे कार्य करता ! नाही तर आम्ही ! सर्व असून साध्या साध्या गोष्टींचा बाऊ करतो.' त्यावर माझे उत्तर असते... मी अपंग झाले म्हणूनच एवढे कार्य करीत आहे. सुदृढ राहिले असते तर इतरांप्रमाणेच कदाचित सर्वसामान्य संसार केला असता. अर्थात फक्त अपंगत्व आल्याने या अपंग पुनर्वसनाच्या कार्यात पडले असे नाही. माझ्यासारखेच अपंगत्व असूनही चाकांच्या खुर्चीवर, प्रसन्न हास्य सोबतीला घेऊन रात्रंदिवस अपंग कल्याणासाठी झटणारे कोल्हापूरचे सुपुत्र बाबूराव दिवाण, माझे अत्यंत आवडते बाबूकाका मला भेटले नसते तर कदाचित मी माझ्याच वाट्याला वयाच्या सोळाव्या वर्षी असे परावलंबी लाचारीचे जिणे का आले, या विचाराने आत्महत्याही केली असती.

लहानपणी नेहमी बाबांचे बोल कानावर पडायचे, ''खुदीको कर बुलंद इतना की खुदा बंदे से पूछे, बोल तेरी रजा क्या है?'' सेंट्रल एक्साईज खात्यात सुपरिटेंडंट पदावर अत्यंत प्रामाणिकपणे बाबा काम करीत होते व आम्हा मुलांनाही आपल्यापेक्षा गरीब असलेल्यांकडे बघावे व त्यांच्या उपयोगी पडावे हे शिकवत होते.

आईकडून आम्ही कोणतेही काम वेळेवर करणे व हसतमुखाने पाहुण्यांचे स्वागत करणे या दोन गोष्टी शिकलो.

वयाच्या बाराव्या वर्षापासून माझे पाठीचे दुखणे नेहमी परीक्षा जवळ आली की सुरू व्हायचे. जीवघेण्या कळा सर्व शरीरभर पसरायच्या अशा वेळी आमचे शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. जीवन कांबळे म्हणायचे 'नसीम ! आजाराला सांग सध्या तुझ्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. परीक्षा संपल्यावर मी तुझ्याकडे बघेन. कॉलेजच्या पहिल्या वर्षाची परीक्षा कशीबशी दिली व दवाखान्यात ॲडमिट झाले.

वेदनेच्या समुद्रात गटांगळ्या खात, कमरेखालील शरीराचे स्पर्शज्ञान कायमसाठी गेले. (१९६७ साल.) वयाच्या सोळाव्या वर्षी तान्ह्या बाळासारखी स्थिती झाली. आजारपणात घरातील पैसा, दागिने होते-नव्हते ते सर्व धुतले गेले. माझे रडणे थांबत नाही म्हणून एकदा बाबा माझ्यावर खूप रागावले. 'मी रडून सर्व घरादाराला रडवत आहे. रडण्याने



**नसीमा महंमद अमीन हुरजूक**

संकट टळणार नाही. हसत, धीराने प्रत्येक संकटाला तोंड दिले तर दुःखही सुसह्य होते' हे बाबांचे म्हणणे मला पटले व त्या क्षणी माझे रडणे थांबले. या घटनेनंतर दोन महिन्यांतच बाबा हार्टअॅटॅकने देवाघरी गेले व त्या वेळीही मी रडले नाही.

आजारपणात व बाबा गेले तेव्हा नातेवाईक व मैत्रिणींनी अतिशय प्रेमाची साथ दिली. माझी हरतऱ्हेची सेवा मनापासून,आनंदाने प्रत्येकजण करी.

अपंगत्व येण्यापूर्वी डॉक्टर व्हावेसे वाटत होते. पाठीच्या दुखण्यामुळे आर्टस्‌ला जावे लागले व अपंगत्वामुळे रात्रंदिवस बिछान्यावर राहून आपल्याला कायमचेच अंधाऱ्या खाईत राहावे लागणार असे वाटत असतानाच, अरुणा कामत नावाच्या मैत्रिणीच्या वडिलांनी माझी भेट बाबूकाकांशी घडविली.

अर्धं शरीर दगडाप्रमाणे संवेदनाहीन झालेल्या दगडी पुतळ्याला जादूगाराच्या छडीने स्पर्श करावा व सर्वांगात चैतन्याने जन्म घ्यावा असे बाबूकाकांच्या पहिल्या भेटीतच घडले. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून नकळत



कुण्या जन्मातले पुण्य तुझ्या रूपात भेटले ।
माझे काळोखाचे घर तुझ्या प्रकाशात न्हाले ।।

स्वप्नं जगणारी माणसं

मीही हसले.
बाबूकाकांचे आयुष्य बेंगलोरच्या त्यांच्या संस्थेत जाऊन जवळून पाहिले व आपल्या स्वत:साठी जगण्याची इच्छा राहिली नाही, तरी इतर अपंगांसाठी हसतखेळत जगण्याचा निश्चय मनोमनी केला. काही कर्तृत्व करण्यासाठी शिक्षण घेणे आवश्यक होते. घरी अभ्यास करून पदवीधर झाले. अनेक प्रयत्नांनंतर सरकारी नोकरी लागली.

सुदृढांच्या क्रीडा-स्पर्धेतून इंग्लंडला जाता आले नसते. पण अपंगांच्या क्रीडा-स्पर्धेत चॅम्पियनशिप मिळवून १९७३ साली लंडनला गेले. तेथे अठ्ठेचाळीस देशांतील अपंग, त्यांचा उत्साह, त्यांची प्रगती पाहिली व निश्चय केला- आपल्या भारतातील अपंग बांधवांच्या चेहऱ्यावरील अपंगत्व आपण पुसून काढायचे. त्यांच्या चेहऱ्यांवरही हास्य-उत्साह दिसण्यासाठी प्रयत्न करायचे... दिशा दाखवायला बाबूकाका व चाकांची खुर्ची ढकलत साथ द्यायला आई, मामा, भाऊ, बहिणी, मैत्रिणींबरोबर कोल्हापूरमधील डॉक्टर्स व समाजसेवकही सोबत आले.

कार्याला सुरुवात केली व बालपणाचा एक प्रसंग आठवत राहिला. शाळेच्या संमेलनात मी राधेचे नृत्य स्टेजवर करीत होते. अचानक स्टेज कोसळले. (कदाचित त्याच वेळी पाठीचा मणका दुखावला व पुढे अनेक वर्षांनंतर मज्जारज्जूला बसलेल्या मारामुळे गाठ होऊन स्पर्शज्ञान गेले असावे.) पडदा पडला व पुढील नृत्याची घोषणा केली गेली. मी संचालकांना विनंती केली....''स्टेज बनवणाऱ्यांचा दोष असताना आम्ही नृत्य अर्धवट का ठेवायचे ?'' सरांनी परवानगी दिली व पुन्हा आमचे नृत्य सुरू झाले व पहिले बक्षीस आमच्या नृत्याला मिळाले. आज मिळणारे पुरस्कार, सत्कार हे आयुष्यात खोल दरीत पडूनही परत वर उठून नृत्य करण्यासारखेच वाटते.

असंख्य अपंग बालक केवळ आई-वडिलांकडे पुरेसा पैसा नाही, वैद्यकीय क्षेत्रातले ज्ञान नाही म्हणून पराकोटीचे अपंगत्व सोबतीला घेऊन घसटत, खुरडत, अशिक्षित राहून केवळ श्वास घेत जिवंत राहात आहेत. हे लक्षात येताच 'हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्ड, कोल्हापूर' या नावाने अपंग बालकांवर संस्थेतर्फे मोफत शस्त्रक्रिया करवून, त्यांना मोफत कृत्रिम साधने देऊन, शाळेच्या दारापर्यंत नेण्याचे काम संस्थेने सुरू केले. कृत्रिम साधने विकत घ्यायला खूप पैसा व वेळ लागतो म्हणून अपंगांना प्रशिक्षण देऊन आम्हाला लागणारी कृत्रिम साधने आम्हीच बनवू लागलो. कष्टाची भाकरी मिळू लागली.

आपणच अपंगत्वाचे दु:ख भोगत आहोत, जगात सर्वात मोठे संकट आपल्यावरच आहे ही बालकांमधील भावना घालविण्यासाठी सहल व क्रीडा-स्पर्धेसाठी मोठे-मोठे संघ नेण्यास सुरुवात केली. अशा एकत्र येऊन राहण्याने, प्रवास करण्याने आपल्यापेक्षा अधिक अडचणी असलेले इतर, परिस्थितीवर कसे मात करीत आहेत हे प्रत्यक्ष नजरेला पडल्याने आमच्या बालकांच्या चेहऱ्यांवरील अपंगत्व पुसले गेले. देवाने अनेक चांगल्या गोष्टी आपल्याला दिल्या आहेत, आपण अपंग असलो तरी इतर अपंगांना मदत करण्यात एक आगळे-वेगळे समाधान आहे. याचा प्रत्यय सर्वांना येऊ लागला. महाबळेश्वर, मद्रास, दिल्लीतील कुतुबमिनार, आग्र्याचा ताजमहाल, जुहू, गोवा व कोकणातील समुद्राच्या लाटांतील डुंबणे, खेळाच्या मैदानात भान हरपून खेळणे, या सर्वांत आपल्याला हातपाय आहेत- नाहीत याचे भान आमची मुले विसरू लागली. त्यांच्या डोळ्यांतील आनंद, चमक हे आमच्या कार्याचे यश आहे.

हो...! हे आमचे सर्वांचे कार्य आहे ! मनोहर देशभ्रतार, प्रमोद देशपांडे व सीताराम पाटील सारखे साथीदार, प्रत्येक यश-अपयशात साथ देणारी मैत्रीण सौ. रजनी करकरे व श्रीकांत केकडे, वयाने माझ्यापेक्षा लहान असून माझा सर्व भार पेलणारा सखखा भाऊ अजीज व इतर अनेक जण नि:स्वार्थपणे, सातत्याने आपापली नोकरी-व्यवसाय सांभाळून संस्थेचे कार्य करीत आहेत. मान-अपमान, लहान-मोठेपणा, जाती-भेद, लिंग-भेद सर्व विसरून फक्त कार्य करत राहणे एवढेच सर्वांना कळते व हीच आमच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

आम्ही आमच्या आवाक्या बाहेरील वसतिगृहाचा प्रकल्प हाती घेतला. प्रयत्न व प्रार्थना यांचे फळ



ना स्पर्श, ना दिलासा, नि:शब्द फक्त ग्वाही।
म्हणूनीच एकली मी ना एकली तरीही ।।

मिळाले व आज एक कोटी रुपयाची वसतिगृहाची इमारत उंचगाव (ता. करवीर, जिल्हा- कोल्हापूर, फोन नं. ६१५१६९) येथे अपंगांसाठी आवश्यक त्या सर्व सोयींनी युक्त अशी उभी आहे. प्रवेशदारात येताच तुम्हाला दिसेल दोन्ही पायांतील शक्ती गमावल्याने चाकांच्या खुर्चीत बसून पंखांच्या साह्याने आकाशात भरारी घेणारी बालिका. आत हॉलमध्ये येताच छताला लोंबकळणारे, आकाशात विहार करणारे, वाऱ्याच्या झुळकीबरोबर फिरणारे पक्षी. हॉलच्या चारी बाजूला पाच मोठ्या खोल्या. एका खोलीत ऑफिसमध्ये खुर्चीत बसून काम करणारे प्रशिक्षणार्थी, व्यायामाच्या खोलीत व्यायाम करणारे बालक, अभ्यासिकेत अभ्यास करणारी मुले-मुली, त्यांच्यासाठी लागणारे टेबल, कपाटे, चाकांची खुर्ची, तीनचाकी सायकल, कमोड, कॅलिपर, इतर फर्निचर - ही सर्व साधने अपंग बांधवांनी बनवलेली आहेत. शिलाई खोलीत शिलाईकाम करणारे. हात नसलेल्या महंमदने पायाने फीत सोडून या वसतिगृहाचे उद्‌घाटन केले. पायावर शस्त्रक्रिया केल्यानंतर नुकताच चालू लागल्यावर वसतिगृहाचा पायाभरणी समारंभ ज्याच्या शुभहस्ते झाला तो बंडू हराळे. अमरावतीच छोटा पाच वर्षांचा दोन्ही हात नसलेला अविनाश पायाने लिहून अभ्यास करताना दिसेल. (पायात मेणबत्ती धरून दीप प्रज्वलित करण्यासाठी तो हट्ट करतो व आम्ही तो हट्ट



पुरवितो.) त्यांचा अभ्यास कधी-कधी घेतो महेश देशपांडे, ज्याने दोन्ही हातपाय चौदाव्या वर्षी गमावले. पण तो हरला नाही. तोंडात पेन धरून S.S.C. ला ७८% मार्क मिळविले. आज तो पदवीधर आहे. अभ्यास घेणारे इतरही- कृत्रिम पाय, चाकांची खुर्ची वापरणारे आहेत. स्वयंपाकघरात, स्वयंपाक करताना, खोली, बाथरूम संडास व परिसराची स्वच्छता करताना, बागेत - परसात काम करताना सर्वत्र तुम्हाला शरीराने अपंग पण मनाने अभंग अशी छोटी-मोठी १३० मुले-मुली दिसतील. आईच्या कडेवरून संस्थेत आलेल्या अश्विनी मानेने S.S.C. ला ९१% मार्क मिळविले. आज ती पुण्यात बी.जे. मेडिकल मध्ये M.B.B.S. चे शिक्षण घेत आहे.

खेळाच्या मैदानात दोन्ही हात नसताना काखेत बॅट धरून चौकार लगावण्यात महंमदबरोबर खेळायला बालमित्रांनो तुम्हाला आवडेल का? तुम्हाला खेळण्यासाठी आमच्या वसतिगृहात झोपाळा, सी-सॉ, घसरगुंडी, मेरी-गो-राऊंड सर्व आहे. चाकांच्या खुर्चीतून थ्रो बॉल आमची मुले कशी खेळतात ? हे पाहायचे असेल तर हेल्पर्स ऑफ दि हँडिकॅप्डचे वसतिगृह तथा पुनर्वसन केंद्र, २६४/अ, शांतीनगर, उंचगाव, ता करवीर, जिल्हा - कोल्हापूर या पत्त्यावर तुमची येण्याची तारीख, वेळ कळवा व या. आमची मुले शनिवारी दुपारी व रविवारी इथे असतात. इतर दिवशी १४ कि.मी. वरील शाळा-कॉलेजला जातात. जाण्यासाठी संस्थेच्या दोन खास, चाकांच्या खुर्चीसाठी सोय असलेल्या बस व दोन रिक्षा आहेत.

या मुलांना जवळपास शाळा असणे गरजेचे आहे. आम्ही शासनाकडून जागा मिळविण्याच्या प्रयत्नांत आहोत. आमच्या स्वप्नातील या शाळेत सुदृढ व अपंग मुले-मुली एकत्रित, एकमेकांना सहकार्य करीत, प्रत्यक्ष आयुष्यात उपयोगी पडणारे शिक्षण घेतील. शिरोली येथील संस्थेच्या जागेत कृत्रिम साधनांचे मोठे प्रशिक्षण व संशोधन केंद्र उभारून त्याद्वारे उत्तम गुणवत्तेची कृत्रिम साधने सर्व भारतभर पुरविण्याचेही आमचे स्वप्न आहे.

अनाथ व अपंग बालकांना सर्वसामान्य अनाथाश्रमात प्रवेश नाही. त्यांना कोणी दत्तक घेत नाहीत. अशांसाठी घरकुल उभे करायचे आहे व यासाठी हवे आहे बालकांपासून वृद्धांपर्यंतचे सहकार्य !

***

- नसीमा हुरजूक
'नशमिन', २३५/११, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३.

# शिक्षणपद्धतीत बदल हवाच!

खपलं जगणारी माणसं



मिलिंद वाटवे

*जन्म १९५७, श्री. आबासाहेब गरवारे महाविद्यालय येथे मायक्रोबायॉलॉजी विषयाचे विभाग प्रमुख, पक्षीतज्ज्ञ व भारतातील अनेक जंगलांतून अभ्यासू वृत्तीने भटकंती*
*✲ अनेक शोधनिबंध प्रसिद्ध*
*✲ विज्ञान जागृतीसाठी व विज्ञान शिक्षणाविषयी विशिष्ट दृष्टिकोन मांडणारी अनेक व्याख्याने*
*✲ विज्ञान, ललित वाङ्मय, संगीत या विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध*
*✲ फाय फाऊंडेशन पुरस्कार, उद्योजकतेसाठी पारखे पारितोषिक*
*✲ इतरही अनेक पुरस्कार*

तुमच्या वयाचा असताना शाळेत लौकिकार्थाने मी 'उनाड विद्यार्थी' म्हणूनच ओळखला जायचो. तिथे जे शिकवलं जायचं, त्यात माझं मन रमत नव्हतं. हे काही फारसं उपयोगाचं नाही असं वाटायचं. सातवीत असताना स्कॉलरशिप मिळाली होती. पण त्यानंतर मात्र अभ्यासात फारसा चमकत नव्हतो. अकरावीला बरे गुण मिळाले होते पण गणित अजिबात आवडत नव्हतं. मेडिकलला गेलंच पाहिजे या दडपणाखाली अभ्यास केला खरा, पण माझ्या सुदैवामुळे मला कमी मार्क मिळाले. मेडिकल हुकली आणि इ.डल.ला प्रवेश घेतला. प्राणीशास्त्रात मला विशेष रस होता. आणि तो जाणून घेणारे प्रा. एम. टी. चौहान मला भेटले, ही माझ्या दृष्टीने आयुष्यातील महत्त्वाची मिळकत होती. गरवारे कॉलेजमध्ये च.डल. चा अभ्यासक्रम सुरू झाला. तेव्हा तिथे पुरेशा सुविधा नव्हत्या, प्रयोगशाळेत पुरेशी उपकरणे नव्हती, शिक्षक अननुभवी होते. या इष्टापत्तीमुळेच माझा अभ्यास विषयातील रस वाढत गेला. कारण जे करायचं ते आपण स्वत:च. स्वत:च प्रयोग करायचे... आणि शिक्षणातील शेवटच्या टप्प्याला असताना माझ्या खऱ्याखुऱ्या विद्यार्थिदशेला सुरुवात झाली.

'शिक्षण क्षेत्रातील ज्या गोष्टी पटत नाहीत त्या सोडून न देता त्या बदलता आल्या तर बदलूया; विज्ञानाच्या नुसत्या पढीक शिक्षणाला संशोधनाची, प्रयोगाची जोड द्यायला विद्यार्थ्यांना शिकवूया' या प्रेरणेने अध्यापन हे कार्यक्षेत्र निवडण्याचा विचार मनात हळूहळू पक्का होत गेला. शिकत असताना डॉ. आगटे यांनी आमच्यावर खूप विश्वास टाकला. प्रयोग करण्याचं स्वातंत्र्य दिलं. एवढंच नाही तर त्यांच्याच कॉलेजमध्ये म्हणजे गरवारे कॉलेजमध्ये नोकरी करायला प्रोत्साहन दिलं. मायक्रो-बायॉलॉजी हा विषय शिकवत असताना अभ्यासक्रम बदलत गेला. जे आधी शिकलो नव्हतो ते शिकवायचं होतं. मग नव्याने खूप शिकावं लागलं. त्यानंतर डॉ.आर.एल. मराठे यांच्या लॅबमध्ये केवळ अनुभव मिळावा म्हणून काही काळ काम केलं. कॉलेजमध्ये त्या वेळी काही काम करण्याची सोय नसल्यामुळे मी स्वत:च्या घरीच संशोधनासाठी Research Lab सुरू केली. मी केलेल्या संशोधनाला १९८३ साली पारखे पारितोषिक मिळाले. ॲनरोबिक जार हे उत्पादन तयार करण्याच्या, ते बाजारात आणण्याच्या, विक्रीच्या सर्व प्रक्रियेतून गेल्यामुळे माझ्या दृष्टीला एक वास्तववादी परिमाण लाभले. बिझनेसमध्ये आलेल्या अनुभवांचा माझ्यातल्या शिक्षकावर सखोल परिणाम झाला.

अध्यापक म्हणून काम करीत असताना आपल्या इथून विद्यार्थी शिकून बाहेर पडला की जगाची त्याच्याकडून जी अपेक्षा असेल ते ते आपण त्यांना दिले पाहिजे ही खूण मी मनाशी पक्की बांधली. केवळ परीक्षेत गुण मिळवण्याची तयारी करून घ्यायची नाही तर उघड्या जगात जगायला लायक बनवायचं. माझे वरिष्ठ सहकारी अध्यापक आणि विद्यार्थी यांच्याकडून याला मिश्र प्रतिसाद मिळाला. काहींचा ही पद्धती अवलंबण्याचा उत्साह, तर काहींचा विरोध. मोकळा वेळ मिळेल तेव्हा आपल्या विषयाशी निगडित इतर चार गोष्टी कराव्यात, भटकावं, निरीक्षण करावं, अनुमानं बांधावीत आणि प्रयोगाने सिद्धता शोधावी हा



उमलता उमलता रान फुलांचं जाहलं
फूल रानाच्या नादात एक मन हरवलं

दृष्टिकोन मी विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न करतो आहे.

१९७९ ते १९८९ दहा वर्षं शिकवल्यानंतर काही बदल हवासा वाटू लागला. काही वेगळं करण्याची ऊर्मी स्वस्थ बसू देईना. तेव्हा इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, बंगलोर येथे Ph.D. करायला जाण्याचे ठरवले. वन्य प्राण्यांमधील पॅरासाईट्स वर काम करायचे असल्याने मधुमलाईच्या अरण्यात गेलो. माझे हे संशोधन त्यातील नावीन्यपूर्णतेने खूप गाजले. आजवर या पद्धतीने कुणीही काम केले नव्हते. त्यामुळे अमेरिकेतून निघणाऱ्या 'Science' आणि 'Proceedingr of Nation Academy of Science', USA या प्रतिष्ठित नियत-कालिकांमधून या संशोधनाला प्रसिद्धी मिळाली. माझ्या विद्यार्थ्यांनाही मी त्याच पद्धतीने काम करायला उत्तेजन देतो. मग अगदी कॉलेजच्या पहिल्या वर्षापासून ते M.Sc. पर्यंतचे रिस्क घ्यायला तयार असणारे विद्यार्थी Ph.D. करणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षाही खूप चांगलं व नवीन संशोधन करू शकतात. याचं एक छानसं उदाहरण सांगतो. १९८६ ते ८९ या काळात काही विद्यार्थ्यांबरोबर भटकताना गरुडाचं एक घरटं आम्हाला सापडलं. घरट्यात पिल्लं होती. आमच्या गटात इ.९ वी पासून ११ वी पर्यंतचा १-१ विद्यार्थी, एक डिप्लोमाचा व इंजिनीअरिंग पदवीचे शिक्षण घेणारा- असे विद्यार्थी होते. या सर्वांनी ३-४ वर्षे चिकाटीने काम केले. पिल्लांचे आई-वडील शिकार करून सर्वांसाठी अन्न आणत. शिकारीला दोघेही बाहेर पडत. वास्तविक त्या कुटुंबाची अन्नगरज भागवण्यासाठी एकाने काम करणंही पुरेसं होतं तरीही ती दोघं जात. या सर्व गोष्टींचे नीट निरीक्षण करून एक शोधनिबंध प्रकाशित केला गेला. हे काही फार क्रांतिकारी संशोधन होतं असं नाही. पण शाळेतली मुलंसुद्धा उत्तम संशोधन करू शकतात हे मला या अभ्यासातून जाणवलं. परदेशात अशा प्रकारे संशोधन करून शोधनिबंध लिहून विद्यार्थी परीक्षासुद्धा पास होऊ शकतात. आपल्याकडे अशी संधी नाही.

आपल्याकडे पुस्तकी ज्ञानावर खूप भर दिला जातो. याचे एक बोलके उदाहरण- एका विद्यार्थिनीने मातीच्या सुगंधावर खूप छान संशोधन पदवीपूर्व काळातच केले. परंतु दुर्दैवाने B.Sc. ला थोडे कमी गुण मिळाल्याने तिला M.Sc. ला प्रवेश मिळू शकला नाही. अहमदनगरला प्रवेश मिळाला. 'तिच्या संशोधनाची गुणवत्ता जाणून तिला येथे प्रवेश मिळावा' अशी विनंती मी विद्यापीठाला केली. परंतु नियमांचा बडगा दाखवून तिला प्रवेश नाकारला गेला. मात्र पुढे तिचा निकाल चुकीचा प्रसिद्ध झाल्याचे Re-evaluation मध्ये लक्षात आले व गुण चांगले असल्याचे समजून ती विद्यापीठात आली व आपले संशोधन पुढे चालू ठेवू शकली.

तीन वर्षांपूर्वी एका संस्थेत संचालक म्हणून नोकरी मिळत असूनही ती संधी सोडून मी पुण्याला परत गरवारे महाविद्यालयात अध्यापक म्हणून काम करू लागलो. कारण ते माझं स्वप्न होतं. सतत शिक्षण क्षेत्रात असल्यामुळे इथल्या शिक्षण पद्धतीतील काही त्रुटी मला अस्वस्थ करतात. याचं कारण साधं आहे. Ph.D. साठी जेव्हा एखादा विद्यार्थी संशोधन करू लागतो तेव्हा त्याच्यासमोर पदवी हे ध्येय असतं. चार-पाच वर्षे संशोधन केल्यावर पुरेसं काही पदरात पडलं नाही हे परवडण्यासारखं नसतं. त्यामुळे संशोधनाला विषय निवडतानाच तो असा निवडला जातो की ज्यात आपल्याला काय सापडेल याची थोडीफार तरी पूर्वकल्पना आहे. अर्थात पूर्णपणे नवीन असं काही यातून बाहेर पडू शकत नाही. याउलट पदवीपूर्व विद्यार्थी जेव्हा काम करतात तेव्हा त्यांना गमावण्यासारखं काही नसतं. त्यामुळे अतिशय नावीन्यपूर्ण, वेगळे विषय ते संशोधनसाठी निवडू शकतात आणि यांतून महत्त्वाचे शोध लागण्याची संभाव्यता खूपच जास्त असते. गेल्या सहा-सात वर्षांत मी हाच प्रयोग करून पाहात आहे. त्याचं यश म्हणजे अनेक पदवीपूर्व विद्यार्थ्यांनी आतंरराष्ट्रीय स्तरावर शोधनिबंध प्रसिद्ध केले आहेत. त्यांपैकी काहींची 'नेचर', 'सायन्स' सारख्या जगप्रसिद्ध नियतकालिकांनी भलावण केली आहे. काही विद्यार्थ्यांनी पेटंटसाठी अर्ज केले आहेत. संशोधन हे विज्ञानशिक्षणाचं सर्वोत्तम आणि कदाचित एकमेव साधन आहे याची मला दिवसेंदिवस खात्री पटत चालली आहे.

आपल्याकडे विद्यापीठाचा अभ्यासक्रम हा शिक्षणातला पहिला अडथळा आहे. परीक्षेसाठी ठराविक प्रश्न विचारले जातात. प्रयोगांना फारसा वाव नसतो. याचा अर्थ

अभ्यासक्रमच नको असं नाही. पण त्यात लवचिकता हवी. परीक्षांचं महत्त्व कमी व्हायला हवं. कदाचित नव्या अर्थव्यवस्थेत शिक्षणाचं चांगल्या अर्थाने व्यापारीकरण होईल. विद्यार्थी हा तुमचा Product आहे, तो जास्तीत जास्त चांगला कसा बनेल ही अध्यापकांची जबाबदारी असेल.

पदवी आणि विषय यांना दिलं जाणारं अवास्तव महत्त्व व त्याचा नोकरीशी जोडला जाणारा संबंध हे बदलायला हवं. शास्त्रशाखेकडे गेल्यानंतर नेहमीचे चाकोरीबद्ध विषय सोडून त्यापलीकडचे अभ्यासाचे विषय शोधायला हवेत. बरेचदा चांगले विद्यार्थी परदेशात जातात. काही वेळा उत्तम कामाची संधी आपल्याइथेही उपलब्ध असते. पण ती पेलू शकतील अशी सक्षम मुलंच नजरेसमोर नसतात. चाकोरी मोडून वेगळं काही करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मी नेहमीच पाठिंबा देतो. व्यवसाय, उद्योग सुरू करायला प्रोत्साहन देतो. पण आपल्याकडे मध्यमवर्गीयांमध्ये हा व्यावसायिक दृष्टिकोन कमी पडतो.

आपल्याकडे स्वायत्त शिक्षण संस्था खूप कमी आहेत. हे स्वातंत्र्य जर शिक्षणक्षेत्रात मिळालं आणि त्याचा उपयोग योग्य प्रकारे करून घेतला गेला तर शिक्षण क्षेत्रात खूप मोठी क्रांती घडू शकेल.

अनेक ठिकाणी अनौपचारिक रीत्या लोकांचे संशोधन चालू असते. त्यांना योग्य वाव मिळावा या दृष्टीने Life rerearch foundation ही संस्था चालवली जाते. कामानिमित्त मी अनेकदा जंगलातून भरपूर फिरतो. तिथे असणारे आदिवासी वनरक्षक जंगलात सतत वावरत असतात. तिथले प्राणी, वनस्पती यांच्याविषयी त्यांना खूप ज्ञान असते. जणू जंगल त्यांच्याशी बोलत असते. पण लौकिकार्थाने म्हणाल तर त्यांचं शिक्षण कमी असतं. अशा लोकांना पदवीची मान्यता देणारे काही अभ्यासक्रम असावेत. त्यांची त्या विषयातील गती पाहून पदवी द्यावी व नोकरीत बढतीही द्यावी. सध्याच्या विद्यापीठांना ही कल्पना झेपण्यासारखी नाही. स्वायत्त शिक्षण संस्थांतून हे करणे सहज शक्य होईल.

शिक्षणपद्धती बदलणं ही एक प्रक्रिया आहे. विद्यार्थी हा त्यातील एक घटक आहे. मित्रांनो, स्वत:ची गुणवत्ता वाढवण्यासाठी तुम्ही प्रयत्नशील राहायला हवं हे आवर्जून सांगावंसं वाटतं. तुम्हीही आपल्याला शिक्षणातून काय मिळवायचंय याचा विचार करा. आपले अध्यापक, शिक्षणसंस्था, सरकार यांच्याकडे चांगल्यासाठी आग्रह धरा. शिक्षणाकडे, अध्यापकांकडे बघण्याचा पारंपरिक आंधळा आदर्शवादी दृष्टिकोन टाकून द्या. शिक्षणाच्या दर्जाबद्दल जोवर शिक्षणाचे ग्राहक म्हणजे विद्यार्थी आणि पालक जागरूक होत नाहीत तोवर चांगलं शिक्षण मिळण्याची संभाव्यता वाढणार नाही. ***

**डॉ. मिलिंद वाटवे**
१०, प्रणव सोसायटी, नवी पेठ, पुणे

स्वप्नं जगणारी माणसं

# नित्य नवनिर्मितीची ओढ

*जन्म १९६२, प्रख्यात शिल्पकार*
** जुहू येथे – शिवाजी महाराज, संभाजी यांच्या शिल्पाकृति*
** आगाखान पॅलेस पुणे – महात्मा गांधी, कस्तुरबा, यांचे पुतळे*
** पिलानी, राजस्थान – बिर्ला म्युझियममध्ये राम व बुद्ध यांचे पुतळे*
** आर्ट सोसायटी ऑफ इंडिया स्टेट आर्ट, एक्झिबिशन यांचे पुरस्कार*
** चंद्रकांत मांढरे पुरस्कार आणि अन्य अनेक पुरस्कार*
** शिल्पकला प्रशिक्षणासाठी अनेक शिबिरात मार्गदर्शन.*



**शिल्पकार शरद कापूसकर**

मुंबईच्या जुहू चौपाटीवरील छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, एक मराठा सरदार आणि तोफ, यांचे समूहशिल्प आपल्यापैकी अनेकांनी पाहिले असेल. १९९२ मध्ये या समूहशिल्पाचे, आव्हानात्मक काम मी पूर्ण केले आणि 'शिल्पकार' म्हणून प्रसिद्धीच्या झोतात आलो. त्यानंतर अनेक नामवंत व्यक्तींच्या शिल्पांची निर्मिती माझ्या हातून झाली. आज पुण्याजवळील 'भूगाव' या गावी शांत वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात माझी कलासाधना चालू आहे. आज शिल्पकार म्हणून माझ्या नावामागे असलेले प्रसिद्धीचे वलय अनुभवताना माझी इथपर्यंतची वाटचाल कशी झाली ते डोळ्यासमोर येते. मुळात चित्रकलेत रस असल्यामुळे १९८० साली अभिनव कला महाविद्यालयात प्रवेश घेतला. स्वत:चे शिक्षण स्वत:च्याच पायावर करीत असल्यामुळे इतर बाहेरील कामे शोधणे, मिळविणे व ती शिकता-शिकताच करणे अपरिहार्य होते. त्यायोगे शिल्पकार श्री.चंद्रकांत परब यांच्याशी ओळख होऊन त्यांच्याकडे उमेदवारीला प्रारंभ झाला. सुरुवातीच्या काळात त्यांना फक्त मदत करणे एवढाच उद्देश होता, परंतु हळूहळू शिल्पकलेतच गोडी निर्माण झाली.

शिक्षण घेत असताना, शिक्षणक्रमातील अभ्यास करीत असताना त्यासाठी जो सरावाचा भाग असतो त्यात एका आठवड्यात १०० रेखाटने (Sketches) अपेक्षित असते. परंतु मी एका दिवसाला १०० रेखाटने करीत असे. थोडक्यात सकाळी ७ ते १-३० कॉलेज, दुपारनंतर व्यावसायिक कामे व रात्री ९ ते पहाटे ३ स्वत:साठी सरावचित्रे काढणे असा दिनक्रम असे. असा अभ्यास करीत असतानाच आपल्याकडील ज्येष्ठ शिल्पकार श्री. करमरकर यांच्या शिल्पाकृतींचे निरीक्षण करायला आवडत असे. तसेच विदेशी शिल्पकारांविषयी; उदा. मायकेल, एंजेलो- वाचायला आवडत असे. शिल्पकलेत उमेदवारी करीत असताना प्रसिद्ध फ्रेंच शिल्पकार ऑगस्ट रॉडीन (August Rodin) याच्या मुंबईतील प्रदर्शनामुळे आपणही शिल्पनिर्मिती करावी असे वाटू लागले. त्यानुसार प्रत्यक्ष व्यक्ती समोर बसवून (model) शिल्पकलेच्या अभ्यासाला सुरुवात केली.



शिल्पकलेच्या कार्यशाळेसाठी स्वत:ची जागा असणे खूप महत्त्वाचे असते. पण त्या वेळी ते शक्य नव्हते. त्यासाठी अनेक मित्रमंडळींची मदत झाली. याच काळातगणेशोत्सवाचीही काही कामे केली. त्यातल्याही काही मंडळांनी उत्स्फूर्तपणे जागेसाठी



तुझे खनिज, तुझ्या शिला, तुझ्या मृत्तिका, तुझ्या वालुका
तयात मजला दिसे देखणा, शिल्पांचा नजराणा

मदत केली.

अभिनव कला महाविद्यालयातील पेंटिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करीत असतानाच काही शिल्पाकृतींना पुरस्कारही मिळाले होते. माती कामावर प्रभुत्वही आले होते. याच काळात अनेक मान्यवर कलाकारांशी ओळखी झाल्या. चुकत चुकत कलाकार म्हणून घडत असताना अशा ज्येष्ठ व्यक्तींचे मार्गदर्शन खूप मोलाचे असते.

'फ्रेन्ड्स ऑफ व्हिज्युअल आर्ट' या संस्थेत आम्ही कलाप्रेमी मित्रमंडळी चर्चांचे कार्यक्रम आयोजित करत असू. या कार्यक्रमांतर्गत सुभाष अवचट, समर नखाते, गोपाळ देऊस्कर, व्यंकटेश माडगूळकर आदी मान्यवरांशी चर्चा करत असताना वेगवेगळे प्रश्न, शंका निर्माण होत. त्यावर पुन्हा चर्चा होई. त्यामुळे माझ्या कलाजाणीवा नकळत विकसित होत होत्या. अनेक मान्यवरांनी देखील आस्थेने मार्गदर्शन करणे पसंत केले. यांपैकी श्री.एस.एम.पंडित, श्री.गोपाळ देऊस्कर, श्री. रवींद्र मेस्त्री व श्री.बाळ वाड हे प्रमुख होत. या प्रोत्साहनातूनच केलेल्या कामाचे पहिले प्रदर्शन जानेवारी ८८ मध्ये बालगंधर्व कलादालनात भरविले.

प्रदर्शनानंतरच्या काळात म्हणजेच साधारणपणे १९८८ सालीच पुण्यातील आगाखान पॅलेसमधील काही शिल्पे करण्याचे काम मिळाले. तेथील पेंटिंगचे काम श्री. एस. एम. पंडित करीत होते. साहजिकच त्यांच्या बरोबर तेथेच वर्षभर एकत्र राहून काम करण्याचा योग आला. श्री. पंडितांनी म. गांधी व कस्तुरबा यांची दोन पेंटिंग्ज केली व मी म.गांधी व कस्तुरबा यांचे शिल्प व श्रीराम व बुद्ध यांची दोन पूर्णाकृती उठावशिल्पे केली.

यानंतर काही काळ स्वत:साठीच शिल्पनिर्मिती केली. पुढे १९९२ मधे मुंबईच्या जुहू चौपाटीवरील समूह शिल्पाचे काम मिळाले. माझ्यासाठी सर्व दृष्टीने हे आव्हानात्मक काम होते. कारण आत्तापर्यंतची शिल्प निर्मिती ही केवळ plarter of Paris व Fibre glass याच माध्यमातील होती. परंतु हे समूहशिल्प Bronze मध्ये करावयाचे होते. प्रत्यक्ष उंचीपेक्षा दीडपट मोठ्या आकारात हे शिल्प करावयाचे होते. या समूहशिल्पात छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी, एक मराठा सरदार व तोफ दाखवावयाचे होते. या संपूर्ण कामाचे वजन ५००० किलो इतके भरणार होते. धातुशिल्पात ओतकाम अत्यंत महत्त्वाचे असते. आत्तापर्यंत त्याचा काहीही अनुभव नव्हता. आपल्याकडे (भारतात) व्यावसायिक foundries नसल्यामुळे हे सर्व काम स्वत:च करणे क्रमप्राप्त होते. ओतकामासंबंधी वाचलेली पुस्तके, एक छोटी ओतकामाची कार्यशाळा, व कोल्हापूरच्या रवींद्र मेस्त्रींच्या foundry त घालविलेला एक दिवस या अनुभवावर हे आव्हान स्वीकारले.

याच काळात श्री. नानासाहेब परुळेकर यांच्या अर्धपुतळ्याचे काम मिळाले होते. त्याचे मातीकाम पूर्ण झाल्यानंतर ओतकाम (Casting) करावयाचे होते. त्यासाठी भूगावच्या डोंगरावरची जागा निवडली. शहरात राहून ओतकाम करणे अवघड होते. कारण धातूच्या ओतकामासाठी मुबलक व हवेशीर जागा आवश्यक होती. ओतकाम करण्यापूर्वी मोल्डमधील मेण जाळावे लागते. त्यासाठी मोठी भट्टी बांधावी लागते. धातू वितळविण्याची भट्टीही वेगळी असते. यातून निघणाऱ्या धुराचा इतरांस त्रास होऊ नये म्हणून डोंगरावरील जागा निवडली. पण त्या काळात तिथे विद्युत पुरवठा नव्हता. पुन्हा एक नवे आव्हान समोर होते. परुळेकरांच्या पुतळ्याचा मोल्ड भाजून तयार होता. धातू वितळविण्यासाठी Air blower ची गरज होती. पण लाईट नसल्याने ते शक्य नव्हते. Blower कसा फिरवावा या विवंचनेत होतो. त्यासाठी इतर स्वयंचलित इंजिनांचा विचार करू लागलो. दुसरे इंजिन वापरण्यापेक्षा आपल्याच स्कूटरचे पाठीमागील चाक काढून त्याला पुली बसविली व त्याचा belt blower ला जोडला व स्कूटर सुरू करून धातू वितळविण्यास सुरुवात केली. ४ तासांनंतर धातूचा रस तयार झाल्यावर तो मोल्डमधे ओतला. अशा तऱ्हेने पहिले ओतकाम यशस्वीरित्या पार पडले. साहजिकच आत्मविश्वास वाढला व या अनुभवाच्या जोरावरच समूहशिल्पाचे काम सुरू केले. पुढे जनरेटर घेतल्यामुळे विद्युत पुरवठ्याचा प्रश्न सुटला. १९९२ साली सुरू केलेले समूहशिल्प ९४ साली संपले. हे काम करीत असताना विविध अडचणी आल्या व त्या सोडविताना अनेक नवीन गोष्टी शिकयला मिळाल्या.

हे समूहशिल्प पूर्ण झाल्यानंतर वर्तमानपत्रातील प्रसिद्धीमुळे १० दिवसांत जवळ जवळ २-३ हजार लोक भुगावच्या Studio वर येऊन गेले व प्रत्यक्ष काम पाहून

स्वप्नं जगणारी माणसं

अभिनंदनाचा वर्षाव केला. त्यामुळे दोन वर्षांदरम्यानच्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटले. महाराष्ट्रातील हे पहिले समूहशिल्प होते. १९२८ साली श्री.करमरकरांनी मुंबईत केलेला शिवाजीचा पुतळा पुण्यात बसविण्यात आला होता तर १९९४ साली पुण्यात बनविलेला शिवाजीचा पुतळा मुंबईत बसविण्याचा हा योग होता. यामुळे व्यवसायापेक्षाही या कामाने एक आगळे समाधान दिले.

व्यावसायिक पुतळे बनवितानाच स्वत:ची अशी शिल्पनिर्मिती देखील सुरू होतीच. यातूनच अनेक व्यक्तिशिल्पं आकाराला आली. प्रथमत: हुबेहूब व्यक्तिचित्रण करण्याकडेच कल होता. नंतरच्या काळात व्यक्तिमत्त्वाला महत्त्व दिल्यामुळे काम करण्याच्या पद्धतीतही आपोआप बदल झाला व ती प्रभावी वाटू लागली. बहुतेक व्यक्तिशिल्पं ही स्वत:साठी केलेली आहेत व ती प्रत्यक्ष व्यक्ती समोर बसवून केलेली आहेत. अशा पद्धतीने काम करताना समोरील व्यक्तीशी साहजिकच संवाद साधला जातो व त्या व्यक्तीच्या समृद्ध अनुभवांचा आपल्या मनावरही परिणाम होतो व त्याचं प्रतिबिंब आपोआपच शिल्पात दिसतं. हा अनुभव कलाकाराला देखील समृद्ध करणारा ठरतो. आनंद देणारा ठरतो. उदा.ज्येष्ठ साहित्यिक श्री. पु.ल.देशपांडे, पं. भीमसेन जोशी, श्रीमती गंगूबाई हनगल, श्री. चिंचाळकर गुरुजी यांचे शिल्प करतानाचा अनुभव विशेष आनंददायी होता. तसेच सर्वसामान्य



व्यक्तींची चित्रणं करण्यात देखील एक वेगळा अनुभव असतो. कारण चेहरा हा माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंबच असतो.

व्यावसायिक शिल्पकलेत स्वत:च असं स्थान निर्माण झालं असलं तरीही स्वत:ला अभिप्रेत असलेली शिल्पनिर्मिती अजून व्हावयाची आहे असे सतत वाटते. सद्यकालीन भारतीय शिल्पकलेवर पाश्चात्य विविध शैलींचा थेट प्रभाव आढळतो. इतका की, त्यातील भारतीयत्वच कधी-कधी लोप पावल्यासारखे वाटते. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात एकमेकांच्या शैलींचा परस्परांवर परिणाम होणे हे अपरिहार्य आहे. तथापि आपल्या परंपरेला धरून नवनिर्मिती होणे अपेक्षित आहे. म्हणून महाराष्ट्रातील साधा काळा पाषाण घेऊन नवीन शिल्पनिर्मितीला सुरुवात केली आहे. केवळ माध्यम दगड घेतला म्हणजेच परंपरेला अनुसरून काम होईल असे नाही. परंतु भारतीय शिल्पकला म्हटली म्हणजे नकळतच अजिंठा-वेरूळची शिल्पे व हजारो मंदिरांवरील शिल्पे ही आपल्या डोळ्यांपुढे येतात व या सर्वांचे माध्यम दगड हेच होते. त्यामुळे सध्या तरी दगड हेच माध्यम घेऊन काम करावेसे वाटते.

शिल्पकलेत कलेला जितके महत्त्व असते, तितकेच त्याच्या तंत्राला सुद्धा असते. पर्यायाने तंत्रज्ञान अवगत असणे ही खूपच महत्त्वाची गोष्ट आहे. परिपूर्ण तंत्रज्ञान शिकविणारे शिल्पकलेचे शिक्षण आपल्याकडे अजूनही मिळत नाही. त्यामुळे सुरुवातीचा काळ हा तंत्रज्ञान अवगत करण्यातच जातो. सर्वच काम स्वत:ला करावे लागते, परिणामत: प्रत्यक्ष मातीकाम (शिल्पनिर्मिती) कमी प्रमाणात होते.

चित्रकला आणि शिल्पकला या दोन्हींत Drawing (रेखाटन) महत्त्वाचे असते. शरीरशास्त्राचा अभ्यास, वेगवेगळी माध्यमे हाताळण्याचे कसब व मनाची संवेदनशीलता टिकविणे हे खूप महत्त्वाचे असते. कला व कारागिरी यांतील फरकही समजून घेतला पाहिजे. या सर्वांच्या एकत्रित परिणामानेच सुंदर शिल्पाकृती साकारू शकतात. प्रत्येक नवीन शिल्पाकृती पूर्ण झाल्यानंतर एक प्रकारचं मानसिक समाधान, आनंद लाभत असला तरी पुन: नवनिर्मितीची ओढ, नव्या शिल्पाचा विषय साद घालीत असतो. व्यावसायिक यश बऱ्यापैकी मिळालेलं असलं तरी माझ्यातला शिल्पकार पूर्णत: समाधानी नसतो आणि ही अस्वस्थताच भविष्यातही माझ्या हातून उत्तमोत्तम शिल्पं घडवून आणील ह्या विश्वासाच्या आधारावर शिल्पकलेच्या क्षेत्रातील माझी वाटचाल चालू आहे.

***

**श्री.शरद कापूसकर**
भूगाव, ता.मुळशी,
जि.पुणे४१२१११



रंगातून अन् कुंचल्यातून रम्य चित्र प्रकटते,
पहाडातूनी फत्तरातुनी शिल्प काव्य उमलते.

स्वप्नं जगणारी माणसं

# निसर्गाची गुपितं जाणून शेती करूया!



**जयकुमार गुंडे**

***जन्म १९५३, एक जिगरबाज शेतकरी, पट्टणकोडोली, कोल्हापूर येथे प्रतिकूल जमिनीत भुईमुगाची लागवड करून सातत्याने वाढतं उत्पन्न. १९९७ मध्ये भुईमूग उत्पादनाचा राष्ट्रीय विक्रम नोंदला. पुढील लक्ष्य – आंतरराष्ट्रीय उच्चांक नोंदणे***

आपल्याला करायचं असतं एक आणि घडत जातं वेगळंच. पण ज्यात कशात पडू त्यात जीव ओतून काम केलं की ते उत्तमतेकडेच जातं. माझंही काहीसं तसंच. शेतीची मूळची आवड बिल्कुल नाही. यात आलो अपघाताने. पण जे काही घडवलं ते मात्र अपघातानं नाही; तर जाणीवपूर्वक. प्रथम माझी तुम्हाला ओळख करून द्यायची म्हणजे – मी जयकुमार गुंडे, राहणार – पट्टणकोडोली, जि.कोल्हापूर. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. व्यवसायाने सामान्य शेतकरी. भुईमुगाच्या उत्पादनात राष्ट्रीय विक्रम केल्याने व त्यात सातत्य राखल्याने सध्या पदवी लाभलीये 'प्रगतिशील शेतकरी'. शेतीच्या, भुईगुमाच्या तंत्रज्ञानाबद्दल आजवर बरंच लिहिलंय, बोललोय; पण तुमच्यासारख्या मुलांशी गप्पा मारायचा योग आजवर आला नव्हता.

माझं बालपण गेलं ते या कोडोली सारख्या छोट्या गावात. शिक्षणाची सोयही बेताचीच. पण तरी मला मोडतोडीचा भयंकर नाद. त्या वेळी दुर्बीण, भिंगाच्या मागं बल्ब लावून भिंतीवर फिल्म उमटवणं, चलचित्रपट बनवणं असे नाना व्याप केले. घरची मोठी शेती पण त्यात कधी रसच वाटला नाही. खरं तर मला व्हायचं होतं मेकॅनिकल इंजिनीअर. पण घरच्या परिस्थितीमुळं पुढे शिक्षण घेता आलं नाही. मग भरपूर उद्योग केले. त्यात सेकंड हँड गाड्या विकण्याचाही व्यवसाय केला. पण घरची परिस्थिती पुढं जास्तच खालावली आणि मग मुकाटपणं घरच्या शेतीत लक्ष घालायला लागलो.

शेतीची आवड नाही पण एकदा ज्यात पडू ते मग मन लावून आवडीनंच करायचं असं मनाशी पक्कं ठरवून टाकलं.

आमचा कोल्हापूरकडला भाग म्हणजे सर्वत्र ऊसाचं साम्राज्य. तसं हे पीक फार पाणी पितं पण नगदी आणि बिनकष्टाचं. पुन्हा कर्जाची सोय फक्त याच पिकाला. शेवटी शक्कल लढवली, ऊस जरा लांब लांब लावला व मधल्या सरीत सोयाबिन लावला. त्याचंही छान पीक आलं. दुसऱ्या हंगामात लावला हरभरा. त्या वर्षी ऊस थोडा खुरटला. पण तिन्ही पिकांचं मिळून उत्पन्न भरून निघालं.

त्याच वेळी मी शोधात होतो अशा पिकाच्या की जे किफायतशीर ठरेल आणि भुईमूग डोळ्यापुढं आला. भुईमुगाला स्थिर दर मिळतो. शिवाय हे कटकटीचं पीक म्हणून फार कमी जण तिकडे वळतात. पुन्हा नाशवंत नाही. टिकवता येतो.

भुईमूग काढायचा तर परिस्थिती अगदी प्रतिकूल. ढेकूळ मारून फुटणार नाही अशी कठीण जमीन. ७०वर्षांत जमिनीला खत नाही. भुईमुगाला जमिनीचा सामू ६.५ लागतो. सामू म्हणजे जमिनीतल्या हायड्रोजनच्या स्वरुपावरून ती अल्कधर्मी की आम्लधर्मी ते ठरते. माझ्या जमिनीचा सामू ८.४ होता. पाणी पाजवायची अडचण. म्हणजे परिस्थिती सगळीच उलट गेलेली. पण भुईमूग म्हणजे अक्षरश: गुणी पीक. ते चांगल्या तऱ्हेनं घेतलं तर उत्पन्न तर देतंच पण जमीनही सुधारतं.

भुईमुगावर प्रयोग करत होतो तेव्हाच 'इक्रिसॅट' संस्थेचं माहिती–पत्रक वाचनात आलं. त्यांच्या पद्धतीनं लागवड करून पाहिली. त्यांच्या पद्धतीप्रमाणे रुंद गादीवाफे, मध्ये सऱ्या, नेमकं किती अंतरावर बी खोचायची, पाण्याचा ताण केव्हा अशी सगळी पथ्ये अगदी काटेकोरपणे पाळली. खरे तर शेती ही उघडी आणि आपले अजिबात नियंत्रण नसणारी प्रयोगशाळा. पण तरीही हातात असलेल्या सर्व घटकांचा नीट वापर केला. भुईमुगाचं सरासरीहून जास्त उत्पन्न येत होतं पण तरी बऱ्याच शंका सारख्या भेडसावत होत्या. शेवटी 'इक्रिसॅट' या हैद्राबादच्या संस्थेच्या डेप्युटी डायरेक्टर जनरलला पत्रच टाकलं



लाल मातीच्या शेतात, भुईमूग उफाळला
फुले सोन्याची पानात, बहरून रंग आला

स्वप्नं जगणारी माणसं

इक्रिसॅट म्हणजे इंटरनॅशनल क्रॉप रिसर्च इन्स्टि. फॉर सेमी ॲरिड ट्रॉपिक्स ही १३ देशांनी मिळून बनवलेली संस्था. या संस्थेकडून चक्क दखल तर घेतली गेलीच शिवाय भेटीचं आमंत्रणही. मग काय ४-५ उत्साही शेतकऱ्यांचा गट बनवला. प्रत्येकाने तिथे नेमकं काय काम करायचं याचं नियोजनच करून टाकलं आणि धडकलो हैद्राबादला. ती एवढी मोठी संशोधन संस्था आणि आम्ही छोटेसे शेतकरी. पण तिथे आमचे उत्तम स्वागत केले गेले. सर्व विभाग दाखवले गेले, दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, लेख मिळाले आणि शास्त्रज्ञांसोबत भरपूर चर्चा करायला मिळाली. तसं जाताना थोडं दडपण होतं पण न्यूनगंड कधी नाही आला. कदाचित माझा माझ्या विचाराशक्तीवर पूर्ण विश्वास असल्यामुळे असेल. पण एवढं खरं की नंतर मला कायम इक्रिसॅटचा स्नेहलाभ झाला.

शेती हा प्रांत तसा नावडीचा असूनही मी इतकी प्रगती करू शकलो कारण माझी निरीक्षण आणि कल्पनाशक्ती. मला कुठंही टाकलं असतं तरी या दोन्हीच्या जोरावर कशाच्याही खोलात गेलो असतो. या माझ्या विक्रमासाठी माझी आणखी एक सवय फार उपयोगी पडली ती म्हणजे एखाद्या गोष्टीच्या मागं लागायची.

त्याचं झालं असं की भुईमुगाला पाणी देण्याची माझी अडचण कायमच होती. तेव्हाच इक्रिसॅटनं मला चिनी शास्त्रज्ञांनी वापरलेल्या 'पॉलिथिन मल्चिंग' या तंत्राविषयी कळवलं. म्हणजे गादीवाफ्यांवर समांतर अंतरावर भोकं पाडलेली ६ मायक्रॉन इतकी पातळ पॉलिथिनची फिल्म अंथरायची. त्यामुळे पाण्याचं बाष्पीभवन कमी होतं व पाणी कमी लागतं. त्यासाठी मी सर्वत्र फिरफिर फिरलो. खरं तर माझी गरज होती अगदी एखादा किलो. दुसरं की उपलब्ध पॉलिथिन कमीत कमी होतं २० मायक्रॉनचं. सगळीकडे नकार घंटाच मिळायची तर क्वचित अपमानही. पण मी काही त्याची पाठ सोडली नाही. अखेर इंडियन पेट्रोकेमिकल्स लिमि. बडोदा यांनी माझ्या मागणीनुसार मला इतकी पातळ फिल्म करून दिली. त्यामुळे एकरी उत्पादन २७ क्विंटल वरून ३३ वर गेले. शिवाय शेंगा होण्याचा काळ १५ ते २० दिवसांनी कमी झाला. केलं त्याचं यश तर लगेच पदरात पडलं. पण त्यासाठी त्याचा तितकाच वेडा ध्यासही घ्यावा लागला.

अशासारख्या अडचणी बऱ्याचदा यायच्या. इक्रिसॅट पडलं तिकडे लांब. पुस्तकांची मदत तेवढ्यापुरतीच. अशा सर्व काळात मला साथ दिली ती केवळ माझ्या डोक्यानं आणि निरीक्षणानं. ही अडचण कशामुळे, कोणत्या घटकामुळे? असा सतत उलटा विचार मी करत गेलो. त्यामुळे जे उपाय केले ते पक्के डोक्यात बिंबले. कुणाच्या सांगण्यावरून केलं असतं तर कदाचित करून झाल्यावर विसरूनही गेलो असतो.

निसर्ग आहे ना त्यात प्रचंड गुपितं दडलेली आहेत. ती शोधायला हवीत. त्यासाठी प्रत्येक घटनेचं, तिच्या परिणामाचं बारीक निरीक्षण करायला हवं. कधी कधी अळ्या पानं खाऊन टाकतात. मग प्रकाश संश्लेषण कोण करणार? अशा वेळी खोड ते काम करतं. पण मग शेंग भरण्यावर त्याचा परिणाम काय? तो किती होतो? असे नाना प्रश्न रोजच्या रोज पडत असतात.

या प्रारंभीच्या प्रयोगात मला फटकाही सोसावा लागला; म्हणजे असं माझे मित्र म्हणतात. त्यांच्या मते माझे ३०-४० हजार तरी पाण्यात गेले. पण मला असं मुळीच वाटत नाही. या सगळ्यातून मी जे शिकलो त्याचं मोल कशाला आहे? जे मला भारतातल्या सगळ्या विद्यापीठांत शिकून मिळालं असतं की नाही कोण जाणे.

आमचं प्रयोगक्षेत्र म्हणजे हे असं बिनभरवशाचं. शेतमालाला बाजारपेठ मिळेलच असं नाही. दराचीही टांगती तलवार कायमचीच. हवापाणीही अनिश्चित मग हातात काय? तर जमिनीचा कस वाढवणं आणि उत्पन्न जास्तीत जास्त घेण्याचा प्रयत्नं करणं इतकंच आपल्या हातात. त्यामुळे त्यावर जास्त भर द्यायला हवा.

पण खरं सांगायचं तर शेतीवर परिणाम करणारे घटक, ते किती परिणाम करू शकतात याचा अंदाज, त्यानुसार सर्व प्रक्रियांचं वेळापत्रक, असं मांडायच्या भानगडीत कुणी शेतकरी पडतच नाही. शेतीचा व्यवस्थापनाच्या अंगानं विचार कुणी करतच नाही. त्यामुळेच पारंपरिक शेती केल्याने हा बेभरवशी धंदा झालाय.

हे सगळं नियोजन अगदी काटेकोर केल्याने व तसेच पाळल्याने मला हे आत्ताचे दिवस दिसताहेत. तसंच आपल्याकडचा सर्वसाधारण समज म्हणजे ज्याला काही येत नाही त्याने शेती करायची. पण शेती हा बुद्दू लोकांचा प्रांत मुळीच नाही. उलट



ओल मातीत दाटली, घोस धरले मुळाला,
नाही कळलेच कधी, केव्हा मध ठिबकला.

इथेच चिकाटी असणारा, प्रयोगाची आवड असणारा माणूस हवा. याचमुळे आपली शेती ही व्यावसायिक होत नाही. भरभर उत्पन्नामागं लागून आजचा शेतकरी भरपूर रसायनं वापरतोय. जमिनीकडून नुसतं ओरबाडतोय. तिला देत काहीच नाहीये. याचा एकच परिणाम म्हणजे पुढं पुढं शेतीत ३ रु. घालूनही १ रु. मिळणं मुश्कील होऊन बसेल.

हे सर्व सांगायचा, पटवायचा प्रयत्न करतो. भुईमूग विक्रमाचा आता एवढा सगळीकडे गाजावाजा झाला पण माझ्या आजूबाजूच्या भागातून विचारायला येणारे शेतकरी कमीच आहेत.

शेतीवर आज जे काही संशोधन चाललंय तेही प्रत्यक्षात जे शेती करतात त्यांच्यापर्यंत झिरपतच नाही. मला तर वाटतं की शेतकरी आणि शास्त्रज्ञ एकत्र आले पाहिजेत. तर असं विक्रमी उत्पन्न काढणं हे शक्य होईल. शेवटी शेतकरी त्याच्या मर्यादित साधनांनिशी, मर्यादित डोक्याने किती विचार करणार?

आज सर्व प्रतिकूल परिस्थितीतून स्वत:वर विश्वास ठेवून, कल्पनाशक्ती सतत लढवत इथवर येऊन पोचलोय. या पुढं काय? भुईमुगाच्याच बाबतीत बोलायचं तर चीनचा प्रति एकर ११.२ टन हा विक्रम मला मोडायचाच आहे. अर्थात ते आता फार कठीणतेच्या पातळीवर नाहीये. मला खरं तर एक डिझाईन तयार करायचंय. कुठलाही विक्रम हा अपघात नसायला पाहिजे. माझा भुईमूग हा पिकत नाही तर मी पिकवतो. म्हणूनच मला त्याच यशाची पुनरावृत्ती करता येते. याचप्रमाणे जमीन, पाणी, हवा, बियाणे असे सर्व बारीकसारीक घटक विचारात घेऊन मला एक तंत्र विकसित करायचंय, जे बहुसंख्य ठिकाणी वापरता येईल व किमान विशिष्ट उत्पन्न मिळेल. भुईमुगाबरोबर पूर्वी बाजूला टाकलेला ऊस खुणावतोय. जमिनीचा कस टिकवून ऊस घेता येईल का ? हे शोधायचंय.

आणि सगळ्यात महत्त्वाचं मगाशी म्हटल्याप्रमाणे निसर्गात प्रचंड रहस्यं दडलेली आहेत. मला खरं तर त्यात रस आहे. या निसर्गाची गुपितं मला जाणून घ्यायची आहेत. बाकी या सर्व उत्पादनवाढीच्या गोष्टी तर, घडतच राहतील. त्यासाठी पाहाणं, बघणं, प्रयोग करणं चालूच राहील.

***

**– जयकुमार गुंडे.**
पो.पट्टणकोडोली,
ता.हातकणंगले, कोल्हापूर

स्वप्नं जगणारी माणसं

# सखोल ज्ञानाला उपयोजनाची जोड



**विवेक रानडे**

जन्म १९६३, 'केमिकल इंजिनीअरिंग' तज्ज्ञ, पुणे येथील ''राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (NCL) येथे शास्त्रज्ञ
* CSIR चे १९९२ चे "Young Scientisst Award
* INAE - Young Engineer Award. १९९९ साली DSTची सुवर्णजयंती फेलोशिप इ. अनेक पुरस्कार प्राप्त. केमिकल इंजिनीअरींग या विषयातील अनेक models ची निर्मिती तसेच या विषयावरील अनेक पुस्तके प्रसिद्ध

रवींद्रनाथ टागोरांबद्दल वाचताना एक सुंदर चित्र बघितल्याचे आठवते. एका मोठ्या जंगलातून रवींद्रनाथ (बालपणचे) आणि त्यांचे वडील चालले आहेत. त्या लेखात रवींद्रनाथ म्हणतात, माझे पहिले शिक्षण वडिलांबरोबर जंगलात हिंडताना या निसर्गाच्या मोठ्या अनौपचारिक शाळेत झाले. त्यामुळे माझा पहिला गुरू निसर्ग. त्याच्याकडे घेऊन जाणारे, ती दृष्टी देणारे माझे वडील हे माझे दुसरे गुरू.

माझे वडील सिव्हिल इंजिनीअर असल्याने माझेही भिंतीपलीकडचे शिक्षण सिमेंटच्या जंगलात विविध मोठे प्रकल्प, धरणे, कालवे अशी बांधकामे जवळून बघताना झाले. त्यांचा नकळत संस्कार झाल्याने आपणही अभियंता व्हायचे हे मी ठरवून टाकलं होतं. त्यातही बारावीत गेल्यावर केमिकल इंजिनीअरींग Chemical Engineering या शास्त्रशाखेची गरज, महत्त्व कळायला लागले. या शाखेत मूलभूत शास्त्रावर आधारित इतर अभियांत्रिकी शाखांपेक्षा जास्त काम होते हे समजले व त्यात रस वाटला. त्यातून U.D.C.T. (University Department of Chemical Technology) मध्ये प्रवेश घेतला. तत्पूर्वी हा सगळा आत्मविश्वास येण्याला कारणीभूत म्हणजे आमचे पराडकर सर. दहावी ते बारावी या शैक्षणिक वर्षांत मी साताऱ्याला होतो. पराडकर सरांनी दिलेले आव्हानात्मक प्रश्न सोडवता सोडवता त्यातून विकसित झालेला प्रश्न सोडविण्याचा वेगळा दृष्टिकोन, आताचं माझं क्षेत्र, त्यातलं संशोधन, याच्याशी त्याचा जो समन्वय साधला गेला याचे महत्त्व जाणवते.

त्यानंतर U.D.C.T.ची पहिली दोन वर्षे इतर विद्यार्थ्यांसारखी गेली. खऱ्या अर्थाने या विषयाची खोली कळणे, त्यात शिरणे हे तिसऱ्या-चौथ्या वर्षात जेव्हा प्राध्यापकांशी जवळून संबंध आला तेव्हा झाले. तिसऱ्या-चौथ्या वर्षी उद्योगधंद्यातील प्रशिक्षणासाठी संध्याकाळी, रात्रीसुद्धा जेव्हा प्रयोगशाळेत काम करायला लागलो तेव्हा रासायनिक अभियांत्रिकी म्हणजे काय, त्यातलं संशोधन म्हणजे काय हे कळलं. प्रा.जोशी, प्रा.शर्मा कसे बोलतात, प्रत्यक्षात आपण जे शिकतो, त्याला व्यावहारिकतेची जोड कशी देतात हे त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष काम करायचो तेव्हा जवळून बघायची संधी मिळाली. त्यांच्याशी झालेल्या चर्चांमधून इतर विद्यार्थ्यांसारखे अमेरिकेत न जाता(इथेच) U.D.C.T.त Ph.D. करायचे असे ठरले.

त्या वेळचा एक प्रसंग चांगला आठवतो. त्या वेळी म्हणजे १९८८ साली माझी Ph.D. चालू असताना आमच्या विभागाने श्ररीशी वश्रिशी velocimeter नावाचं एक ४० लाखांचं अत्याधुनिक उपकरण, (मशीन) खरेदी केलं आणि ते installatipच्या वेळेसच जळालं. ते उपकरण परदेशातून आणलेलं होतं. ते परत दुरुस्त होऊन यायला १ वर्ष लागणार होतं. माझं काम त्यावर अवलंबून होतं. पण निराश न होता मी दुसऱ्या कामाला लागलो.

त्या वेळेस सरांनी मला Reactorचं two dimesional

model बनवायला सांगितलं होतं. त्यासाठी मी पुष्कळ कष्ट घेतले. एवढं काम पूर्ण झालं की आपलं Ph.D. होणार असं मला वाटत होतं. model चं काम सरांच्या अपेक्षेपेक्षा लवकर पूर्ण केलं आणि मी सरांकडे गेलो. सरांनी शाबासकी दिली आणि म्हणाले, 'आता three dimensional model बनवण्याच्या तयारीला लाग.' मला आश्चर्य वाटलं. पण आता वाटते की अशा तऱ्हेचे सोप्यातून अवघड पायऱ्यांकडे नेताना सरांनी जो आत्मविश्वास माझ्यात विकसित केला त्याचा मला आजही उपयोग होत आहे.

Ph.D.च्या कामाच्या दरम्यान, ही जी ाविशिश्री बनवत होतो तेव्हा त्याचा प्रत्यक्षात उपयोग कुठे करायचा हा विचार करायला सरांनी शिकवलं. आत्ताही संशोधन करताना ते प्रश्न कुठेतरी मीच मला विचारीत राहातो. कुठल्या दिशेने Ph.D. संशोधन करायचं, त्याचा डलशि काय ठरवायचा, असे विविध प्रश्न मनात कायम राहतात. नंतर स्वित्झर्लंडला गेलो. तिथल्या कामाचा, मला मिळालेल्या स्वातंत्र्याचा, संशोधनासाठी पूरक वातावरणाचा, प्रथमच मिळालेल्या एवढ्या निवांत वेळेचा खूप उपयोग झाला. खूप वाचन, विचार करायला मिळाला. आपल्याला नेमके कशात काम करायचे याची दिशा ठरवता आली आणि यापुढचे काम Multiphare reactor मध्ये करणार असे ठरवले.

इंडस्ट्रीत खूप काम करण्याची गरज आहे व तिथल्या systems मध्ये संशोधन करणे याला पुष्कळ वाव आहे हे प्रकर्षाने जाणवत राहिले. हे सगळे काम राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत (NCL) करता येईल, हे लक्षात आले आणि तशी संधी मिळताच (NCL) मध्ये रुजू झालो.

मी (NCL) मध्ये Chemical Reactor Engineering म्हणजे ज्या उपकरणांमध्ये (Instruent) हव्या त्या रासायनिक प्रक्रिया (Chemical Reaction) घडवून आणल्या जातात, त्या उपकरणांच्या अभियांत्रिकीचे काम करतो. ज्या रासायनिक प्रक्रिया करायच्या आहेत त्यासाठीचे उत्तमातले उत्तम hardware design करणे ही माझ्या संशोधनाची प्रमुख दिशा आहे. त्यासाठी आवश्यक ती साधन(tools) त्यावर आमचे काम सुरू आहे.

आम्ही विकसित केलेली tools वापरून industial reactors बद्दल आत्तापर्यंत मिळवता येत नसे ती माहिती मिळवता येते व त्याद्वारे Performance Enhancement (Reactor ची क्षमता वाढवता येते) करता येते.

जास्त उत्पादन, जास्त चांगली प्रत, कमी ऊर्जा, कमी प्रदूषण यांपैकी काहीही म्हणजे उत्पादन क्षमता वाढणे असे असू शकते.

आमची Tools वापरून आम्ही जास्तीत जास्त चांगला Performance मिळवण्याचा प्रयत्न करतो. हे प्रयत्न नुसते प्रयोगशाळेपुरतेच सीमित न ठेवता जास्तीत जास्त indstries पर्यंत पोहोचवायचा प्रयत्न करतो.

त्यासाठीच आता आम्ही इंटरनेटचीही मदत घेणार आहोत. वरील Programmes विकसित करण्यासाठी D.S.T. नी (Department of Science & Techology) प्रकल्प मंजूर केला. त्याच्या यशाची पावती म्हणून की काय Council of Scientific & Indrttial Research च्या १९९२ च्या 'तरुण शास्त्रज्ञ' या पारितोषिकासाठी माझी निवड झाली आणि आपण योग्य दिशेने चाललो आहोत याची खात्री पटली. आता ही जी वेगवेगळी tools आहेत, त्यांचा समन्वय करणं चालू आहे. यात माहिती तंत्रज्ञानांचं खूप महत्त्व आहे. Reactor Clinic नावाची वेब साइट विकसित करून त्यावर ही सगळी tools (Programme) ठेवायची. त्याचा उपयोग असा असेल की त्याचा वापर स्वत:च्या ठिकाणीच (industry मध्ये) Process industies ची क्षमता वाढेल. त्यामुळे जागतिक व्यापारात उदारीकरणामुळे जी स्पर्धा वाढीस लागली आहे त्यास तोंड देणे आपल्या उद्योगसंस्थांना शक्य होईल. विकसित केलेली साधने त्यांच्यापर्यंत पोहोचवणं हे एक आव्हान होतं. सुरुवातीला पत्राने संपर्क साधला तेव्हा निराशाच पदरी पडली. मी स्वत:च NCL मध्ये कार्यशाळा आयोजित केल्या. कारखान्यांमध्ये जाऊन व्याख्यानं, Toolsची प्रात्यक्षिके

स्वप्नं जगणारी माणसं

यांवर भर दिला. यात एक जाणवले, तुम्हालाच त्यांचा Problem identify करायला लागतो, त्याच्यावरचे संशोधन करून त्यांच्याकडे ते पोहोचवावे लागते. याची जाणीव निर्माण करण्यासाठी जवळ जवळ १ वर्ष लागलं. आता त्याचे परिणाम दिसायला लागलेत. इंडियन ऑइल कार्पोरेशन लि., रेलिकन्स्, थरमॅक्स अशासारख्या कंपन्यांनी, पुढे यायला सुरुवात केली आहे.

म्हणजे साधने विकसित करण्याचे जे theoratical काम केले, त्याचे उद्योगसंस्थांमध्ये उपयोजन करण्यासाठीचे जे प्रयत्न केले ते यशस्वीपणे चालू आहेत. त्यासाठी "Young Engineer" असे १९९६चे Award मिळाले. Indian Academy of Sciences चा "Young Associate" असा पुरस्कारही मिळाला.

NCL ला आल्यानंतर मला डॉ. माशेलकरांबरोबर काम करायची संधी मिळाली. खूप काही शिकायला मिळाले. स्वत: माशेलकर खूप जास्त वेळ काम करतात. हे करताना क्षमता, परिणामकारकता आणि कल्पकता यांचा फार सुंदर संगम त्यांच्या कामात बघायला मिळतो. त्यांनी मला अशाच एका महत्त्वाच्या कामासंबंधी विचारले होते आणि माझ्याकडे बाकीची खूपच कामे असल्यामुळे ती जबाबदारी स्वीकारण्यास मी फारसा राजी नव्हतो. माशेलकर मला म्हणाले,



'जरा स्वत:ला ताण, त्याने काही बिघडत नाही. आपोआप क्षमता वाढेल.

वेळाचे व्यवस्थापन अधिक सुंदर जमेल.' आणि खरोखर ते काम जमले आणि बरेच काही शिकवूनही गेले.

वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटलेले पराडकर सर, डॉ. जोशी, डॉ.शर्मा, डॉ. माशेलकर या उंचीच्या माणसांमुळे माझ्यातला माणूस आणि केमिकल इंजिनीअर Chemical Engineer घडतो आहे असे वाटते आहे. याचबरोबर विविध टप्प्यांत वेगवेगळी चांगली पुस्तकेसुद्धा एक चांगली शिदोरी आपल्याबरोबर देऊन जातात असं मला मनापासून वाटतं. त्यामध्ये ज्याचा अगदी आवर्जून उल्लेख करावासा वाटतो ते पुस्तक म्हणजे "The Seven Habit of Highly Effective People"- स्टीफन कोवे.

लेखक म्हणतो १) आपण स्वत: ज्या गोष्टी करतो त्यासाठी स्वत: जबाबदार आहोत हे जाणा. २) कोणतीही कृती करण्यापूर्वी ते काम, त्याचे टप्पे visualise करा आणि मग ते प्रत्यक्षात आणा आणि असे करणाऱ्याला आपोआप वेळेचे नियोजन प्रत्यक्षात आणता येतेच आणि ३) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वत:ची क्रांती, स्वत:तला बदल हा आतून बाहेर झाला पाहिजे, बाहेरून आत नको. यांपैकी काही गोष्टींचा उपयोग कामात होतोच.

नवीन क्षेत्र सुरू करून त्यात मूलभूत व उपयोजित अशा दोन्ही स्वरूपाच्या प्रकल्पांची कामे एकत्र चालू असताना परत एकदा नवीन संशोधन काय केले पाहिजे, यावर विचार सुरू झाला.

एक नवीन कल्पना सुचली. Stethoscope च्या साहाय्याने आपल्या हृदयाच्या स्पंदनांवरून आपले प्रकृती परीक्षण, त्यातला बदल डॉक्टरांना कळतो तसा एक tool set विकसित करायचा, की जो वापरून industrial multiphase reactors चे निदान करता येईल.

यामध्ये Pressure Sensors वापरायचे असे ठरवले आहे. ध्वनिलहरी या Pressure Waves च आहेत. त्यांच्या साहाय्याने reactor ची pulse बघता येणे आणि त्याचे निदान करता येणे हे यात अपेक्षित आहे. Reactor हा सगळ्या प्रक्रियांचे महत्त्वाचे

अंग(हृदय) समजले जाते. त्यामुळे त्याचे निदान करून त्याची Perfomance level हवी तशी ठेवली की बाकी बरेच प्रश्न सुटतील. या कल्पनेसाठी आणि ती प्रत्यक्ष साकार करण्यासाठी मला 'सुवर्णजयंती' शिष्यवृत्ती मिळाला आहे. येत्या ५ वर्षांत भारतातल्या शास्त्राच्या प्रगतीला वेग येण्यासाठी या शिष्यवृत्तीची घोषणा करण्यात आली आहे. ही stethoscope ची कल्पना, reactor audit, reactor clinic अशा अनेक कल्पना प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी पुढ्यात आहे.

Pressure sensor च्या signal चा अर्थ लावणे, त्यासाठीची models विकसित करणे हे काम मुख्यत्वे येत्या ४-५ वर्षांत करायचे आहे.

Theory आणि Practical यांमधली दरी कमी करण्यासाठी मूलभूत संशोधन जगभर चालू आहे. आम्हीही या विषयावर काम करतोय. अर्थात अभियंत्यांना मूलभूत संशोधन पूर्ण होईपर्यंत काम थांबवणे शक्य नसते. त्यामुळे आहे त्या ज्ञानावर, जास्तीत जास्त reliable/ optimum काम कसे करता येते त्यावर अभियंत्याचे कौशल्य ठरते. तिथेच खऱ्या अर्थाने कल्पकतेची गरज असते. त्यामुळे आत्ता तरी या मूलभूत ज्ञानाच्या खोलात जाण्यासाठी आपल्या ज्ञानाचा पाया पक्का करणे आणि आपली सर्जनशीलता वाढवत राहणे, उपयोगात आणणे, विविध विषयांत वापरता येणे हीच तयारी तुम्हाला करावी लागेल.

त्यासाठी शुभेच्छा !

***

**- डॉ.विवेक रानडे**
१७, वायरलेस कॉलनी,
औंध, पुणे ७

स्वप्नं जगणारी माणसं

# दिग्दर्शनाचा प्रपंच!



प्रतिमा कुलकर्णी

***जन्म १९५४, नाट्यक्षेत्र व दूरदर्शन मालिका – दिग्दर्शन, आत्मकथा, स्मृतिचित्रे, उंच माझा झोका गं, श्रीकृपेकरून, तो मी नव्हेच, या नाटकांचे दिग्दर्शन***
**** लाइफ लाइन, स्त्रीजातक, प्रपंच या दूरदर्शन मालिकांचे दिग्दर्शन.***

---

आपण दिग्दर्शक होऊ असं लहानपणी मला कधीच वाटलं नव्हतं. त्याचं मुख्य कारण असं की दिग्दर्शन या नावाचं काही असतं हे मुळी मला माहीतच नव्हतं. माझ्या लहानपणी टेलिव्हिजन तर नव्हताच. वर्षाला दोन ते तीन सिनेमे बघायचे. फिल्मी नियतकालिकांचा सुळसुळाट नव्हता. माध्यमांचा भडिमार नव्हता. मनोरंजनाच्या क्षेत्रातल्या छोट्या, मोठ्या लोकांची आवश्यक, अनावश्यक माहिती काना-डोळ्यांवर येऊन आदळत नव्हती.

पण नाटकं मात्र खूप होती. गाण्याच्या मैफली असायच्या, नृत्याचे कार्यक्रम असायचे. ते सर्व मी आवर्जून बघायचे. माझे आई-वडील मला ते दाखवायचे. अगदी 'इटकु-पिटकु' 'चिनी बदाम'पासून सुरुवात करून कॉलेजमधे पोचेपर्यंत 'गोची' अशी सर्व नाटकं मी पाहात होते. त्याशिवाय आज ज्याला मुख्य धारेची म्हणतात अशी नाटकंही होतीच. 'अश्रूंची झाली फुले', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'कट्यार काळजात घुसली' वगैरे. त्या वेळेस सिनेमापेक्षा नाटकाचं जग जास्त लोभस वाटायचं. थिएटरमध्ये जाऊन बसायचं, मग घंटा होणार, पडदा उघडल्यावर काय दिसणार आहे याची उत्कंठा, पडद्याच्या खालून दिसणारी नारळ, फुलं, माणसांची पावलं, क्वचित कधीतरी आतल्या लोकांचे आवाज-त्यानंतर पडदा उघडल्यावर जे काही दिसेल ते आवडण्याचीच तयारी मनाची असायची.

दिग्दर्शक नावाचा कुणी एक असतो. आपण ते काम करावं असं काही वाटण्याचं ते वय नसलं तरी या सगळ्या जगाचा आपण एक भाग असावं, आपलं जग हे असं असावं असं मला फार वाटायचं. हा झाला एक भाग.

आयुष्याचा दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे 'पुस्तकं.' पुस्तकं वाचण्याचा मला 'नाद' होता; फक्त आवड नव्हती. बसमधे, ट्रेनमध्ये, बसस्टॉपवर, कुठेही मी वाचायचे आणि वाचताना त्याच जगात रमून, गुंगून जायचे. ती सगळी दृश्यं मला नजरेसमोर दिसायची. त्या वेळी मला हे कळत नव्हतं की ह्याचा पुढच्या आयुष्यावर फार मोठा परिणाम होणार आहे.

तिसरी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'माणसं.' मला मित्र-मैत्रिणी चिक्कार होत्या. मी बोलायचेही खूप. पण त्याहीपेक्षा जास्त ऐकायचे, बघायचे. प्रत्येकाची खास बोलाचालायची पद्धत आहे, स्वभाव आहे, आवड-निवड आहे आणि त्याप्रमाणे तो वागतो. हे लक्षात आल्यावर मी लोकांकडे एका खास नजरेने पाहायला लागले. आता या वेळी अमुक माणूस, अमुक्त पद्धतीने का वागला असेल, तो खरं बोलला असेल की खोटं, त्याच्या अविर्भावात असं काय होतं की ज्यामुळे मला त्याचं बोलणं खोटं वाटलं...? आज मला कळतंय की हे सगळं मिळून दिग्दर्शकाची एक दृष्टी तयार होत होती. पुढे जेव्हा खरोखर नाटकाच्या जगात जाण्याची संधी मिळाली तेव्हा इतर कशाहीपेक्षा आपल्याला दिग्दर्शनात रस आहे हे लक्षात आलं आणि मी दिग्दर्शक व्हायचं ठरवलं.

सुदैवाने मला ते होता आलंही. नाटकाच्या दुनियेत मी नुकतीच

शिरत होते. त्या काळात समांतर रंगभूमीची चळवळ जोरात होती. मुंबईला दादरमध्ये 'छबिलदास' या शाळेच्या हॉलमधे अनेक नाटकं होत. नाटकांचे प्रयोग नसतील त्या काळात तालमी होत. तेही नसेल त्या वेळेस नुसत्याच भेटीगाठी, चर्चा, वादविवाद, प्रसंगी भांडणं होत. गप्पांचा किंवा भांडणांचाही विषय प्रामुख्याने 'नाटक'. मग हळूहळू त्यात सिनेमा सामील झाला. नाटकं करणाऱ्या माणसांपैकीच काहीजण सिनेमा करू लागले. कुणी नट, कुणी लेखक, कुणी दिग्दर्शक. तोपर्यंत टेलिव्हिजन पण आलेलाच होता. टि.व्ही.वर सुरुवातीच्या दिवसांत देशी-विदेशीचे उत्तमोत्तम सिनेमे दाखवले जायचे. फिल्म सोसायटीज होत्याच. त्या फिल्मस् बघताना बर्गमन, कुरोसावा, ओझु (Bergman, Kurosawa, Ozu) आणि आपल्याकडील सत्यजित रे यांच्यासारख्या लोकांचं जबरदस्त आकर्षण वाटू लागलं. यांच्यासारखंच आपणही काही करावं असं मनाने घेतलं. अर्थात हे चार लोकांत बोलण्याची सोय नव्हती कारण तेवढा आत्मविश्वास नव्हता. पण छबिलदासमध्ये मित्रांच्यात आणि मोठ्यांच्यात रंगलेल्या चर्चांमधून खूप शिकायला मिळायचं.

प्रामुख्याने त्यातून जे मिळालं ते म्हणजे स्वत:ची ओळख. आजूबाजूच्या चार लोकांपेक्षा मी वेगळी आहे का, ते म्हणतायत त्याच्यापेक्षा मला वेगळं काही म्हणायचं आहे का, मग मी ते कशी रीतीने म्हणणार आहे, ते मला येतं का वगैरे वगैरे...

माझ्या आसपास त्या वेळी जी मंडळी होती, त्या सर्वांना अन्यायाची फार जाणीव होती. समाजातला अन्याय, कलेवरचा अन्याय, व्यक्तीवरचा अन्याय- त्या अन्यायाला वाचा फोडायची असं त्यांचं म्हणणं होतं. पिळवणूक, शोषण, अत्याचार ह्या गोष्टी मांडण्याकडे त्यांचा कल असायचा. ते लोक जितक्या हिरीरीने याबद्दल बोलायचे,तेवढं मला बोलता यायचं नाही. अन्यायाची मला चाड नाही असं नाही. मला तो दिसेल तिथे मी आवाज उठवते - घरी, दारी अगदी नवऱ्यावरही.

पण जगात चांगुलपणाही भरपूर आहे. प्रचंड प्रमाणावर चांगलं काम होतंय. अनेक माणसं त्यात गुंतली आहेत. अशी माणसं की ज्यांना प्रसिद्धीची हाव नाही की गरज नाही. त्यांच्याबद्दल सहसा कुणी नाटक - सिनेमा करायला जात नाही. कारण त्याच्यात काही 'नाट्य' नाही. पण हे जगासमोर येणं महत्त्वाचं आहे. कोण, कुठं, काय काम करतंय हे कळलं नाही तरी चालेल पण सत्प्रवृत्तीचं दर्शन घडवणं, माणसाच्या मनातल्या उदात्त भावनांना साद घालणं, हेही कलेचं एक कार्य आहे असं मी मानते.

माणसाचं मन फार, फार खोल आहे. त्यात अनेक चमत्कारिक भाव-भावना दडून बसलेल्या आहेत. त्यात खूप गुंतागुंत आहे. त्याचा शोध घेणं हेही कलेचं एक प्रमुख कार्य आहे. तो शोध घेता घेता कधी अत्यंत हीन तर कधी अत्यंत उदात्त अशा गोष्टी हाताला लागतात. हीन गोष्टी सगळेच दाखवतात पण माझ्यापुरतं बोलायचं तर मला उदात्ताचं दर्शन अधिक आवडतं. आणि लेखक, दिग्दर्शक म्हणून ते शोधायचा, ते दाखवायचा जास्तीत जास्त मी प्रयत्न करते. १९७५ ते १९८८ या कालखंडात अभिनय, दिग्दर्शन साहाय्य, रंगमंच व्यवस्थापन इ. क्षेत्रांत उमेदवारी केली. त्यानंतर १९८८ साली दिग्दर्शित केलेल्या 'आत्मकथा' या नाटकाने 'दिग्दर्शक' म्हणून जाणकारांमध्ये माझे खूप कौतुक झाले. त्यानंतर 'स्मृतिचित्रे', 'उंच माझा झोका गं', 'श्रीकृपेकरून', 'तो मी नव्हेच' या नाटकांचे दिग्दर्शन मी केले तसेच दूरदर्शनवर 'लाइफलाइन', 'स्त्री जातक', सध्या दर बुधवारी रात्री सादर केली जाणारी 'प्रपंच' या मालिकांचे दिग्दर्शन करण्याची सुवर्णसंधी मला मिळाली.

दूरचित्रवाणी-टेलिव्हिजन हे फार प्रभावी माध्यम आहे. त्याच्यावर जे दाखवलं जातं त्याचा परिणाम फार चटकन आणि फार मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे या माध्यमात काम करणाऱ्यांनी फार जागरूकपणे काम केलं पाहिजे. आपली पात्रं काय बोलतात, कशी वागतात याकडे लक्ष दिलं पाहिजे. दुर्दैवानं तसं

स्वप्नं जगणारी माणसं

होत नाही. आज आपल्याकडे टेलिव्हिजनकडे फक्त 'बाजारपेठ' याच दृष्टीनं पाहिलं जातं. शेवटी मनोरंजनाचा व्यवसाय ही सुद्धा एक ळविींीं आहे. त्यामुळे त्याच्या अर्थकारणाकडे लक्ष दिलं गेलं पाहिजे हे तर खरंच. पण ते करता करता एक फार धोकादायक गोष्ट घडते आहे. ''लोकांना वाईट गोष्टी आवडतात तर त्यांना आणखीन वाईट द्या. त्यांना त्याची सवय लावा,'' हा मंत्र डोळ्यासमोर ठेवून काम करणाऱ्या माणसांनी एक असं खोटं, नकली, भ्रष्ट जग टेलिव्हिजनवर उभं केलंय की कुठल्याही विचारी माणसाला चीड यावी. अंधश्रद्धा, अनीती, भुतंखेतं ह्यांनी ते जग भरलेलं आहे. आधीच आपल्या देशात शिक्षणाची वानवा ! त्यात गरिबी, अनेक स्तरांवरची विषमता, अत्यंत वरवरचं आणि पोकळ शहरीकरण – ह्या सगळ्यात सामान्य माणसाचा आवाज हरवला आहे. त्याची मती कुंठित झाली आहे. अशा वेळेस ज्या माध्यमाचा उपयोग त्याला काही शिकवण्यासाठी, दिशा दाखवण्यासाठी होऊ शकतो, त्याच माध्यमाने त्याची नजर खिळवून ठेवली आहे. बुद्धी बधीर करून टाकली आहे.

'लाइफलाइन' ही मालिका करीत असताना अनेक सेवाभावी डॉक्टर गवगवा न करता काम करीत असतात हे लक्षात आले. प्रसिद्धीच्या बाबतीत उदासीन असलेल्या या लोकांबद्दल नाही तरी निदान त्यांच्या कामाबद्दल, त्यांच्या प्रश्नांबद्दल दूरदर्शनच्या प्रेक्षकांना माहिती झालीच पाहिजे असं वाटून मी त्यांची पात्रं, त्यांच्या घटना ङळषशश्रळशि मध्ये घातल्या.

भ्रष्टाचार, दुर्वर्तन.. याबद्दल भरपूर नाटकं, सिनेमे, मालिका होतात, त्या बघून सर्व जगाची एक निराशाजनक प्रतिमा तयार होत जाते. पण चांगलंही भरपूर आहे, ते बघण्याची दृष्टी आपल्यामध्ये बाणवली पाहिजे, लोकांसमोर ती ठेवली पाहिजे. आणखीन एक गोष्ट करण्याचा मी आवर्जून प्रयत्न करते ती म्हणजे आपण जे लोकांसमोर मांडतोय, ती नुसतीच एक कहाणी आहे, विरंगुळ्यासाठी सांगितलेली.... की त्याच्यातून काही म्हणायचं सुद्धा आहे? संदेश वगैरे जड शब्द मी वापरत नाही कारण माझा तेवढा अधिकार नाही. पण निदान त्यातून लोकांना काही नवा विचार, नवी नजर मिळतेय का ? कारण मी आधीच म्हटल्याप्रमाणे प्रसार माध्यमांची ताकद फार मोठी आहे.

'उंच माझा झोका गं' हे एक अशा मुलीचं नाटक होतं, जी काही तरी वेगळं करण्याचा ध्यास घेऊन घरातून पळून जाते. मला वाटत होतं की प्रेक्षकांनी त्या मुलीला समजून घ्यावं, त्यांना तिच्याबद्दल सहानुभूती वाटावी. पण म्हणजे तिचं सगळंच बरोबर आहे, घरातून पळून जाणं हे योग्यच आहे, असं मात्र वाटू नये. मी आग्रह धरून लेखकाकडून असा प्रसंग लिहून घेतला की तिची चूक तिला उमगते आणि त्या चुकांपासून धडा घेऊन परत एकदा ती आई-वडिलांच्या संमतीने नवीन आयुष्य सुरू करायला घराबाहेर पडते. कारण चुका करण्यात काहीच गैर नाही पण त्या कबूल न करून त्यांना चिकटून राहण्यात फार मोठी चूक आहे. कारण मग माणसाला सुधारण्यासाठी काही वावच राहात नाही.

आज इतके वेगवेगळे चॅनेल्स आहेत, आणखीन येत आहेत; अशा वेळी आपण ह्या माध्यमात आहोत याचं मला वैषम्य वाटून घ्यायचं नसेल तर मी त्या माध्यमाचा सदुपयोगच केला पाहिजे असं मी स्वत:ला सतत बजावत राहते. आपण जे काही काम करतो त्याचा समाजाला उपयोग झाला पाहिजे.

कुणीतरी गवंडी असतं म्हणून आपल्याला घर मिळतं, कुणीतरी शिंपी असतं म्हणून आपल्याला कपडे मिळतात, कुणीतरी शेतकरी असतं म्हणून आपल्याला खायला मिळतं.. मग आपण जे काम करतो, त्याचाही कुणाला तरी उपयोग व्हायला हवा. तुम्हांला काय वाटतं..?

***

**– प्रतिमा कुलकर्णी**
बी-६० अल्ट्रा सोसायटी,
मुंबई – ४०० ०१६.

# जोडोनिया धन उत्तम व्यवहारे



***मोहन चिमणलाल गुजराथी***

जन्म १९५६, अग्रगण्य शेअरब्रोकर
* ज्ञान प्रबोधिनीचे विद्यार्थी, सक्रिय कार्यकर्ते, १० वर्षे युवक सचिव.
* गेली सुमारे १५ वर्षे शेअर्स आणि Financing व्यवसायातील पुण्यातील अग्रगण्य नाव !
* १९९८-१९९९- पुणे स्टॉक एक्सचेंजचे अध्यक्ष
* व्यापार, उद्योगाशी संबंधित विविध संस्थांचे पदाधिकारी
* रोटरी क्लब (टिळक रोड) चे अध्यक्ष

---

माझे वडील कै. चिमणलाल गोविंददास गुजराथी हे पश्चिम महाराष्ट्रातील तेलातुपाच्या व्यवसायातील अतिशय नामवंत व्यापारी होते. ते पहाटे चारपासूनच व्यवहाराचे फोन करायला सुरुवात करीत असत.

त्यांच्या व्यवसायातील शिस्त चोखपणा, धाडस आणि दिलेली जबान पाळणे या गुणांचा खूप मोठा प्रभाव लहानपणापासून माझ्यावर पडला आहे. त्यांची जागरूकपणाची सवय मीही स्वत:ला लावून घेतली आहे. आमचा शेअर बाजार सकाळी १० ला सुरू होतो. बाजार खुला होताना कुठल्या कंपन्यांचे शेअर्स काय भावाने असतील याचा ढोबळ अंदाज घ्यायचा तर रात्री २।।-३ च्या दरम्यान अमेरिकन शेअर बाजारातला चढउतार निर्देशांक पाहून दिवसभरातल्या शेअर खरेदी-विक्रीचा आराखडा तयार करून सकाळी मार्केट सुरू होण्याचे वेळी तयारीने यावे लागते. म्हणजे पहाटे 'होमवर्क' केल्याविना सकाळी

फायदेशीर 'ऑफिसवर्क' सुरू होत नाही.

कंपन्यांच्या शेअर्सचे भाव नुसत्या मागणी व पुरवठा यांच्या रस्सीखेचीने कमी-जास्त होत नाहीत. देशभरातल्या महत्त्वाच्या घटनांचे आर्थिक परिणामही शेअरभावावर तात्काळ होत असतात. म्हणून त्या लगेच कळाव्यात असा माझा कटाक्ष असतो. काही वर्षांपूर्वी सुरत शहरात प्लेगची साथ आल्याची बातमी रात्री ९ ला आली. आता प्लेगचा आणि शेअरबाजाराचा संबंध किती ? पण प्लेगवरील औषधांची मागणी प्रचंड वाढणार हे ओळखून मी ती औषधे तयार करणाऱ्या कंपन्यांचे शेअर्स विकत घेऊन ठेवले व भाववाढ झाल्यावर विकले. या व्यवहारातून सहज खूप फायदा मिळवता आला.

शेअर्स खरेदी-विक्रीच्या व्यवसायात मी कसा आलो, ती गोष्टही मोठी वेधक आहे. माझे वडील आमच्या गुजराथीवाणी समाजातले मान्यवर अध्वर्यू होते. मी आंतरजातीय विवाह केला तेव्हा ते माझ्या वडिलांना आवडले नाही. मग मी असा निर्णय घेतला की आता आपण पूर्ण स्वतंत्र राहायचे आणि अगदी वेगळा व्यवसाय करायचा. त्यासाठी आपले शिक्षण आणि कष्टाची तयारी एवढेच भांडवल वापरायचे. वडिलांकडून काहीही घ्यायचे नाही! करायचा तर व्यापार-व्यवसायच नोकरी नाहीच. जे अनेक व्यवसाय सुचले त्यात शेअर व्यवहाराचेही नाव होते. त्यापूर्वी शेअरचा मला काही पत्ताच नव्हता. त्यामुळे हा व्यवहार नव्याने शिकून करायचा असे ठरविले. जिद्द अशी होती की जे काही करू त्यात आपण अव्वल स्थानावर असले पाहिजे. कसातरी पोटभरू उद्योग करणे नाही. आपल्यापुढे अडचणी हजार असतील, त्या उगाळत बसायचे नाही. सबबी सांगत बसायचे नाही. एकेक पाऊल पुढेच टाकीत जायचे, यशस्वी होण्यासाठी नियोजन करीत वाटचाल करायची.

नियोजन म्हणजे स्वत:च स्वत:ला शब्द द्यायचा. आपण अमुक गोष्ट योजली आहे याचा कधीही विसर पडून द्यायचा नाही. या सवयीचा प्रत्यक्ष व्यवहारात मला खूप फायदा होतो. रोजच्या

स्वप्नं जगणारी माणसं

कामाचे रोज पहाटे बसून नियोजन, दर आठवड्याचे दर रविवारी संध्याकाळी नियोजन आणि दर वर्षीच्या डिसेंबर अखेरीस पुढील वर्षाचे नियोजन हा माझा नित्यक्रम बनला आहे.

एकूणच आयुष्याचे आपले जे स्वप्न आहे, ते नुसते काव्यात्मक राहाता कामा नये. त्याला व्यावहारिक आखणीचे आधार द्यायला पाहिजेत. असे आयुष्याचे नियोजन आपण करतो का ? पुढच्या पाच वर्षांत मी काय साधणार, कोण होणार, त्याचे टप्पे कोणते, त्याची साधने कोणती, त्याचे वेळापत्रक काय हे प्रत्यक्ष कागदावर नोंदवून ठेवण्याची आवश्यकता असते.

१९८३ मध्ये ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक डॉ. आप्पासाहेब पेंडसे दिवंगत झाले. प्रबोधिनीचे बाणेदार संघटन स्वावलंबी कसे ठेवायचे हा त्यानंतरच्या काळातील प्रश्न होता. आपापली आर्थिक गरज भागवून संघटनेला कशी मदत करता येईल या विचाराने प्रेरित झालेल्या आम्ही दहा समविचारी, ध्येयवादी मित्रांनी प्रबोध उद्योग समूहाची स्थापना केली. आमच्या प्रत्येकाचा व्यवसाय वेगळा असला तरी व्यवसायाच्या सुरुवातीपासून दरमहा ज्ञान प्रबोधिनीला ठराविक गुरुदक्षिणा देण्याचा संकल्प आम्ही केला. सुरुवातीला केवळ काही हजारांची उलाढाल होती; तर आज काही कोटींची उलाढाल आहे. गेली बारा वर्षे सुरुवातीला घेतलेले हे व्रत आम्ही सर्वजण निष्ठेने पाळतो आहोत. त्यामुळेच गेल्या बारा वर्षांत आम्हा सर्वांची गुरुदक्षिणा एकूण रु.५० लक्ष एवढी होऊ शकली.

मी ज्ञान प्रबोधिनीचा विद्यार्थी व कार्यकर्ता आहे. युवक सचिव असताना दिवाळीत फटाका स्टॉल चालवून विक्री करीत असताना झालेला उद्योजकतेचा संस्कारही खूप प्रेरणादायी ठरला आहे.

या सर्वांमुळे शेअर व्यवहार सुरू करताना पुण्यातील अन्य ब्रोकर्सप्रमाणे थोडीथोडी पण नियमित खरेदी-विक्री मी करीत असे, तरी पुण्यातला सर्वात मोठा व्यवहार आपण करू शकलो पाहिजे हे स्वप्न मनात कायम ठेवलं होतं. शेअरब्रोकर म्हणून स्वतंत्र व्यवहार सुरू केल्यानंतर या दृष्टीने पद्धतशीर प्रयत्न मी सुरू केले, आज मी ज्या प्रबोध अर्थवर्धिनी आणि प्रबोध अर्थसंचय नावाच्या फर्मस् चालवतो त्यांची गणना पुण्यातील मोठ्या फर्म्समध्ये होते. शेअर्स्‌ची खरेदी-विक्री करणाऱ्या इतर ब्रोकर्स्‌ना मी शेअर्स्‌च्या तारणावर भांडवल देतो. या व्यवहारात चोखपणा आणि शब्दांचा पक्केपणा असल्याने माझ्या शब्दाला तिथे किंमत आलेली आहे. प्रारंभी सर्व शेअरब्रोकर्स्‌चा एक 'ब्रोकर फोरम्' असतो, त्याचे प्रमुखपद माझ्याकडे आले. त्यासाठी सर्व ब्रोकर्सनी मला भरीस घातले. नंतर पुणे स्टॉक एक्स्चेंजचा प्रेसिडेंट म्हणून मी काम करावे, असा एकमताने आग्रह करण्यात आला. त्यानुसार मी एक वर्षाकरिता पुणे स्टॉक एक्स्चेंजचा प्रेसिडेंट म्हणून काम केले. या काळात स्टॉक एक्स्चेंजला जुन्या आरडाओरडीच्या,

एके ठिकाणी जमून देवघेव करण्याच्या पद्धतीपासून नव्या, आधुनिक कॉम्प्यूटरवर, आपापल्या ऑफिसातून हिंदुस्थानभर देवघेव करण्याच्या तंत्रापर्यंत नेण्यासाठी मी यशस्वी प्रयत्न केले.

शेअर आणि फायनान्सिंगच्या व्यवसायात विश्वासार्हता हे फार मोलाचे भांडवल आहे. आज पुण्यातील सुमारे ५०० ठेवीदारांचे १० कोटी रुपये आमच्याकडे ठेव म्हणून आहेत. या ठेवीवरचा लाभ ठराविक दिवशी ठेवीदारांच्या घरी पोचलाच पाहिजे अशी शिस्त मी बसवली आहे. ती सांभाळण्यासाठी प्रसंगी अतिशय कठोर व्हावे लागते. सहकाऱ्यांना दुखवावे लागले तरी चालेल; पण आपल्यावर अवलंबूनअसलेल्यांच्या विश्वासाला किंचितही तडा जाता कामा नये, असा हा कठीण आग्रह असतो. गेल्या बारा वर्षांत आमचा एकही चेक पैशाअभावी परत गेला नाही किंवा कुणाचे देणे लांबवावे लागले नाही, ते यामुळेच.

शेअर व्यवहार म्हणजे काही नशिबाचा खेळ नाही. कंपन्यांच्या लाभ-हानीची शक्यता अभ्यासपूर्वक हेरून त्यांचे शेअर्स घ्यावे किंवा विकावे लागतात. सरकारच्या धोरणांचा, प्रतिस्पर्धी कंपन्यांचा, गुंतवणूकदार संस्था आणि व्यक्तींचा प्रत्येक शेअरच्या भावावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम होत असतो. या सर्व घटकांचा अगदी ताज्या क्षणापर्यंतचा सतत अभ्यास

करूनच गुंतवणूक करावी लागते.आधी केलेल्या खरेदीचे पैसे हाताशी तयार ठेवावे लागतात. आपण विकलेल्या शेअरचे पैसे वेळेत ताब्यात मिळवण्याची यंत्रणा उभी करावी लागते. या सर्व गोष्टी मी एखाद्या विद्यार्थ्याच्या भूमिकेत जाऊन शिकलो. अनेक मध्यमवर्गीय माणसांच्या आयुष्यभराची पुंजी त्यांनी आमच्याकडे सोपवलेली असते. आमच्या एकूण उलाढालीच्या मानाने ती रक्कम अगदी लहान असली तरी ती ठेव म्हणजे त्यांची शंभर टक्के बचत असते. त्यामागे त्यांचा विश्वास असतो, की काही झाले तरी ही प्रबोधिनीची माणसे आहेत. आपल्याला बुडवून तरण्याचा स्वार्थी विचार करणार नाहीत. त्यांचा हा विश्वास आमच्यावर मोठे दडपण ठेवून जातो.

व्यवहारात मात्र 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' असतो. फार मोठ्या रकमा जशा एकेका दिवसात मिळू शकतात तशाच पाहता पाहता जाऊही शकतात. शेअरच्या तारणावर आम्ही दलालांना भांडवल देत असतो. खूप कायदेशीर काळजी घेऊन हा व्यवहार केला तरी कधीतरी सगळ्या मुद्दलासकट तो दलाल गायब होऊ शकतो. लोकांच्या ठेवीची जोखीम व जबाबदारी मात्र आमच्यावर कायम असते.

१९९६ सालची गोष्ट. मंगल जैन नावाचा एक नामवंत ब्रोकर आमचे १ कोट रुपयाचे देणे लागत होता. त्या देण्यापोटी त्याने तारण म्हणून जे शेअर्स दिले होते, ते मुंबई, दिल्ली वगैरे ठिकाणच्या त्याच्या भागीदारांकडून आलेले होते. एके दिवशी मंगल जैन पुण्यातून गायब झाला, तो आजवर आलेला नाही ! झाले! आमचे १ कोट रुपये कुणाकडून वसूल करणार असा प्रश्न पडला. आम्ही त्याचे सर्व धागेदोरे शोधून काढले. तेव्हा त्यात अनेक गुन्हेगार टोळ्यांचा हात असल्याचे व काही पोलिस अधिकाऱ्यांचे त्यांना संरक्षण असल्याचे लक्षात आले. आम्ही त्यांच्यापर्यंत पोहोचल्यावर केवळ ३०% रक्कम घेऊन हे प्रकरण मिटवा, अशी धमकी त्यांच्याकडून देण्यात आली. पण सामान्य मध्यमवर्गीय माणसांकडून गोळा केलेल्या पैशातील ७०% रक्कम सोडून देणे म्हणजे त्यांची फसवणूक हे मला मान्य नव्हते. त्यांच्या धमक्यांना न भिता निर्भयपणे लढा देत आम्ही बरीच येणी वसूल केली.

वरील प्रकरणामुळे आमच्यात अशी हिंमत आहे, हे सर्वांना माहीत झाले. शिवाय स्वत: शब्द फिरवणार नाही आणि दुसऱ्यालाही तो फिरवू देणार नाही अशी माझी ख्याती झाली.

ही ख्याती फार महत्त्वाचे भांडवल आहे. त्यामुळे लोक आपल्याशी निर्धास्तपणे व्यवहार करू लागतात. हे कुणाची पै बुडविणार नाहीत आणि यांचा पैसा कुणाला बुडविता येणार नाही हा भरवसा तर मोठ्या व्यवहारांचा पाया ठरणारा आहे. यामुळेच करोडो रुपये आमच्याकडे सोपवताना लोकांना काळजी नसते. बाजारात व समाजात पत निर्माण होते ती यामुळे. प्रत्यक्ष आर्थिक ऐपतीपेक्षा ही समाजातील पत जास्त मोलाची असते. अर्थात यासाठी आपण लोकांच्या वित्ताचे जणू काही 'ट्रस्टी' आहोत अशी गांधीजींची ट्रस्टीशिप्‌ची कल्पना मनी बिंबवावी लागते. माझ्या उद्योगात प्रपंचाबरोबरच मी परमार्थाचाही विचार करतो. आता मोठमोठे व्यवहार करताना मला माझ्या मित्रांची, माझ्या संघटनेची, माझ्या स्वप्नांची आपण जबाबदारी सांभाळीत आहोत अशीच भावना असते. त्यांच्यासाठी केवढीही जोखीम पत्करण्यात एक वेगळेच समाधान असते. त्यासाठी तर मी स्वत:ला हा असा सतत घडवीत असतो.

या अखंड कामात सुट्टी, विश्रांती याला मर्यादितच शक्यता राहाते. तसा मला या रोजच्या कामाचा उपद्रव वाटतच नसल्याने थकवा आलाच तर शारीरिक मर्यादेने येईल तेवढाच. तसा मी सोरायसिस नामक जीवघेण्या आजाराने गेली पंचवीस वर्षे ग्रस्त आहे. माणसे या आजारामुळे मनाने खचतात, व्याधींनी लटपटतात असे आपण पाहतो. पण माझा मन:पिंड मी असा घडवला आहे की बहुधा आजारपणाची सबब मी कामाआड येऊ देत नाही. मी उत्साही, गतिमान असतो. माझे वेळापत्रक चुकत नाही. रोज बारा तास कामावर हजर असतो. नशिबाने माझी स्मरणशक्ती अगदी अचूक असते. मला ताळेबंद, नफातोटा, कॅशफ्लो, एखाद्या कवीला कविता

सहज स्फुरावी, समजावी इतक्या सहजपणे समजतो. माझी कागदपत्रे सहसा गहाळ होत नाहीत. वस्तू आणि कागद ठेवण्याची माझी शिस्त पक्की असते. ऑफिसमध्ये बसून मी माझ्या घरातल्या कुठल्या कप्प्यात कोणता कागद कुठे आहे हे अचूक सांगतो. त्यामुळे एकदा समोर आलेला आकडा वेळेत आठवला नाही असे कधी होत नाही. या साऱ्या गोष्टी उत्तम व्यवसायाचा 'पाया' समजून सर्वांना अंगी बाणवता येतात असे माझा अनुभव सांगतो. हे सारे करताना आपण एखादे भावनाशून्य यंत्र बनता कामा नये याचीही मला जाणीव आहे. त्यामुळे आयुष्यातल्या तरल आनंदासाठीचे कप्पे जपून ठेवीत मी जगतो. रोटरी, स्नेहसेवा सारख्या संस्थांमध्ये रंगून काम करतो. भुकुम- सारख्या खेड्यात मुळशी तालुक्याच्या ग्रामविकासाच्या कामात माझ्या मित्रांबरोबर मनसोक्त धावपळही करतो.

याबरोबरच माझ्या उणिवांचीही मला चांगली जाणीव आहे. मी भलताच संतापी आहे. जबर ईर्ष्येने कामांच्या मागे लागताना असे होते. पण सुविद्य पत्नीची साथ असल्याने कामात पूर्ण लक्ष घालणे मला शक्य होते.

गेली काही वर्षे काही कोटींचे व्यवहार करीत असल्यामुळे मला पैशाची ताकद जशी समजली आहे, तशीच पैशाची मर्यादाही कळलेली आहे. आपल्या लोकांना आर्थिक महापराक्रम करायला शिकवावेसे मला जरूर वाटते. पण बरोबरीनेच अर्थाची मर्यादाही शिकवावीशी वाटते.

सुदैवाने मुक्त अर्थव्यस्थेमुळे ज्ञानाची किंमत करण्याचे दिवस आले आहेत. त्यामुळे बुद्धिमान, कष्टाळू, महत्त्वाकांक्षी मुले यापुढे मोठा पैसादेखील कमवू शकतील. हा पैसा चैनीच्या वस्तूंचे उत्पादक त्यांच्याकहून परत हिरावून नेणार नाहीत अशी जीवनशैली मात्र त्या मुलांना शिकवली पाहिजे. माझ्या व्यवसायातला पूर्ण निर्व्यसनी आणि शाकाहारी असा अपवादात्मक माणूस म्हणून मी ओळखला जातो. तरीही मी इतरांपेक्षा जास्त आनंदी आहे असे खात्रीने म्हणू शकतो. म्हणून ही जीवनशैली जास्त सुखाची आहे हे लोकांना सांगितले पाहिजे.

"Creation of Wealth for Social Caure" असे आमच्या 'प्रबोध' कल्पनेचे सारसूत्र आहे. त्यानुसार समाजकार्यासाठी 'वेच' करण्यासाठी उत्तम व्यवहाराने पैसा जोडायचा असा माझा प्रयत्न असतो. मात्र समाजाची गरजच एवढी मोठी आहे की माझ्यासारखी कित्येक माणसे कमीच पडणार आहेत. मी त्या मानाने एक छोटासाच कार्यकर्ता आणि व्यावसायिक आहे याची मला जाणीव आहे.

***

- मोहन गुजराथी
'प्रबोध', १०७०, शुक्रवार
पेठ, सुभाषनगर,
रस्ता क्र.५ पुणे२







क्षितिजावरती स्वप्नं उद्याचे अविरत शोधायाचे असते.
जगायचे यासाठी असते, जगायचे यासाठी असते.

शंभरावा अंक

छात्र प्रबोधनची स्थानिक कार्यालये आपल्या गावात सुरु करु इच्छिणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत आहे.
तपशीलासाठी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

# निसर्गात



हे गडद निळे आभाळ वाकलेले
अन् अस्ताला रवितेज लोपलेले
भुरुभुरु गळे अंधार होय सन्नाटा
हिरवळीत लपती इथे पायवाटा ।।१ ।।

तट तुटलेला, कडाच कोसळलेला
नीलसागरी रत्नमणी फुटलेला
क्षितिजावरती सौंदर्याचा ताठा.
हिरवळीत लपती इथे पायवाटा ।।२ ।।

रानात पेटते झाड काजव्यांचे
झाडात किर्रर आभास सावल्यांचे
पक्ष्यांचा होतो अकस्मात बोभाटा
हिरवळीत लपती इथे पायवाटा ।।३ ।।


मेघातुन झरते पाऊसवेडी सर
सृष्टीत घुमतसे हा कुठला जागर
अखंड फुटती काळोखाच्या लाटा
हिरवळीत लपती इथे पायवाटा ।।४ ।।


– **संगीता बर्वे**, ९१/अे, स्नेहल बाग, तुळशीबागवाले कॉलनी, पर्वती, पुणे ९

# आभाळाचे रंग



मस्त मजेने गवतावरती झोकून द्यावे
आभाळाचे रम्य, मनोहर रंग पाहावे.
एक धाकुला मंद जांभळा मेघ पोहतो
त्याच्या मागे अन्य ढगांचा ताफा जातो.
मदोन्मत्त हा उमदा, काळा मेघ भासतो
गंडस्थळ हे त्याच्यामधुनी मदही स्रवतो.
कुठे ढगांचे डोंगर अस्ताव्यस्त पसरले
कुठे पुंजके शुभ्र छोटुले, कुठे ससूले.
रंग देखणे, छटा वेगळ्या, भास कितीसे
क्षणभंगुर त्या शिल्पांमधुनी येत उसासे.
किती आकृत्या विणल्या आणि किती पांगल्या
क्षणाक्षणाला नजरेदेखत किती भंगल्या.
मनिच्या अवकाशीही भरुया रंग छानसा
श्वासांमध्ये अपुल्याही अवकाश कितीसा?





**आश्लेषा महाजन**
२३०, चित्ररेखा सोसा.,
सहकारनगर - १, पुणे ९.

# पाणी

आले ढग आभाळात
घेऊनिया नवे पाणी
वेल पाही त्यांच्याकडे
उरी कळ्यांना घेऊनी

ढग कोसळू लागला
खळखळा वाहे पाणी
नदी चालली पुढती
गात जीवनाची गाणी !


आता उगवेल पीक
झाली शांत लाल माती,
शेतकऱ्याच्या मनात
पाने हिरवी डोलती.....

बाळे खेळती पाण्यात
त्यांच्या मनात उल्हास
दारी गुलाबाचे झाड
उभे झेलती पाऊस.....

पाण्यावीण जीवनात
नाही कसलीच गोडी
देवाजीची ही करुणा
मन त्याला हात जोडी !

***

**– वि. म. कुलकर्णी**
'कमळवेल' ६१/४८
...ो ४



# ‘‘मुघल शाहजादा !’’

*निनाद बेडेकर*



***पेशवाईच्या काळातील सदाशिवभाऊच्या तोतयाचा इतिहास आपल्याला माहीत असतो. मुघलांच्या कैदेत अठरा वर्षं काढल्यानंतर शाहूराजे सिंहासनावर आले. परंतु येसूबाई मुघल कैदेतच होत्या. त्यांची सुटका करण्यासाठी असाच एक तोतया उभा करण्यात आला. साक्षात मुघल शाहजाद्याचा ! हा कट कोणी आणि कसा रचला ? तोतयाच्या आधाराने येसूबाईंची सुटका कशी करण्यात आली ? हे जाणण्यासाठी वाचूया निनाद बेडेकर यांची ही ऐतिहासिक कथा !***

शाहूराजे साताऱ्याच्या किल्ल्यातल्या दरबारात सिंहासनावर बसले होते. मुघलांच्या कैदेत अठरा वर्षं काढल्याची सारी चिन्हं त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. चेहरा रापला होता. डोईचे केस वाढवलेले होते. एवढं होऊनही चेहऱ्यावर एक प्रकारचं तेज होतं. शेवटी ते शिवाजीराजांचे नातूच होते! संभाजीराजांचे चिरंजीव होते! पण आपल्या मातु:श्री येसूबाई मुघली कैदेत असल्याबद्दल काळजीही चेहऱ्यावर दिसत होती. बाळाजी विश्वनाथ पेशवे, खंडेराव दाभाडे सेनापती, अंबाजीपंत पुरंदरे, खंडो बल्लाळ चिटणीस अशी सारी मंडळी दरबारात जमली होती. सय्यिद हुसेनचे मुतालिक शंकराजी मल्हार साताऱ्यात बोलणी करण्यासाठी येणार होते. सय्यिद हुसेनअली हा मुघली सल्तनतीच्या दक्षिण प्रांताचा सुभेदार होता. महाराज म्हणाले,

‘‘बाळाजी! आपण पोख्त, मातबर ! दिल्लीतील आपली माणसं सुटली पाहिजेत आणि आपल्याला चौथाई, सरदेशमुखीच्या सनदाही मिळाल्या पाहिजेत हे बघा !’’

‘‘होय महाराज ! शंकराजी मल्हार अतिशय गुणी आहेत. मुघलांच्या चाकरीत असले तरी महाराष्ट्राबद्दल मोठे प्रेम आहे. त्यांच्या अटी काय आहेत ते अजमावून पाहू आणि मग आपल्या अटी घालू !’’

‘‘अर्थातच ! त्यांचा मनसुबा आधी कळू दे, मगच बोलणी सुरू करू!’’

‘‘महाराज, आम्हाला शंकराजींच्या मनाचा कल माहीत आहे. हुसेन सय्यिदांवर मारेकरी घाला असा प्रत्यक्ष बादशाह फरुखसियरचा निरोप असताना आपण मदत केल्याने हुसेनांचा जीव वाचला, याची जाणीव शंकराजींना आहे.’’

‘‘हंऽऽऽ ! मातु:श्रीसाहेबांच्या सुटकेची खटपट अवश्य करावी.’’

''ती तर मोठी महत्त्वाची बाब आहे, सरकार ! आम्ही आपली सारी शक्ती पणाला लावून मातु:श्री-

साहेबांची सुटका अवश्य करू. आम्हाला दिल्लीस जावे लागेल.''

''बाळाजी ! दिल्लीच काय,

पृथ्वीच्या पाठीवर कोठेही जायची तयारी

करा, पण मातु:श्रीस सोडवून आणा !''

खंडेराव दाभाडे म्हणाले,

''महाराज ! मध्येच बोलल्याची माफी असावी पण आपली ताकद मोठी झाली आहे. गुजरात, माळव्यापर्यंत आपल्या तलवारीचा महिमा पोहोचला आहे. आज्ञा कराल तर दिल्लीच झोडतो!''

''खंडेराव ! असे उतावीळ होऊ नका. दिल्लीला आपली ताकद कळली पाहिजे पण दिल्ली हे महास्थळ! आमचे वचन आलमगीर पृथ्वीपतीशी गुंतले आहे. दिल्ली काबीज करावयाची नाही.''

साऱ्यांनी माना डोलावल्या. शंकराजी मल्हार साताऱ्याच्या वेशीपर्यंत आल्याची वर्दी आली. बाळाजीपंत खासे पुढे गेले. शंकराजीपंतांना त्यांनी आलिंगन दिले. दुसऱ्या दिवशी शाहूराजांची भेट ठरली होती. शंकराजीपंत भोजनास बाळाजी विश्वनाथांच्या घरी होते. राधाबाईंनी अगदी अगत्याने स्वयंपाक केला होता ! जेवताना बोलणी सुरूच होती. बाळाजी शंकराजींना म्हणाले,

''शंकराजी ! आम्हाला आपली मैत्रीच हवी आहे!''

''बाळाजी, हुसेनअलींनी मदतीचा आणि मैत्रीचा प्रस्ताव घेऊनच आम्हाला पाठवले आहे !''

''शंकराजी, हुसेनअलींना दख्खनचा सुभेदार म्हणून इकडं पाठवलं, त्या वेळी त्यांचा काटा काढण्याच्या सूचना फरुखसियरनी आम्हाला दिल्या होत्या!''

''बाळाजी, आपण वेळीच मदत केली म्हणून हुसेनअलींचे प्राण वाचले, हे ते चांगले जाणतात! आम्ही एक वेगळीच गोष्ट आपल्याला विचारणार आहे !''

''बोला शंकराजी बोला !''

''बाळाजी, मनसुबा अवघड आहे! भोजन झाल्यावर सविस्तर बोलतो !''

मंडळी भरपेट जेवली! साखरभाताचं शंकराजींनी कौतुक केलं. त्या वेळी राधाबाई थोड्याशा लाजल्यादेखील! भोजनानंतर बाळाजी आणि शंकराजी एका वेगळ्या खोलीत बसले. विडा खात असताना शंकराजी म्हणाले,

''बाळाजी, गोष्ट फक्त आपल्याजवळ ठेवा. आम्हाला आपला भरोसा फार मोठा आहे !''

''बोला शंकराजी ! या कानाची गोष्ट त्या कानालाही कळणार नाही.''

''त्याची खात्री आहे आम्हाला म्हणूनच हा विषय फक्त आपल्याजवळ काढतोय!... हुसेनअलीनी आपल्याला सांगितलंय की जर मराठा फौज त्यांना या वेळी मदत करील तर दिल्ली ताब्यात घेता येईल. दिल्लीच्या बादशाहाला बरतरफ करून त्या जागी आपल्याला अनुकूल असा पोर बादशाह म्हणून बसवायचा. मुघल कैदेतली आपली माणसं मग तात्काळ सोडू''

''आणि सनदा?''

''तो मसुदा तर आपणच तयार करू.''

''चौथाई आणि सरदेशमुखी ?''

''आपल्याला हवे ते सारे कागद अवश्य देऊ! आपण मसुदा तयार करून हुसेनअलींची मान्यता घेऊ आणि मग दिल्लीची.''

''फरुखसियर बादशाहांनी फेटाळला तर?''

''म्हणूनच आम्ही आपली मदत मागतोय! फरुखसियरना पदच्युत करून टाकायला आपण मदत केली पाहिजे !''

''हंऽऽऽ! ठीक आहे! आम्ही बोलू शाहूराजांशी !''

दुसऱ्या दिवशी बाळाजी विश्वनाथ पेशवे लवकर उठून शाहूराजांकडे गेले आणि मसलत सांगितली. त्यांची खलबतं संपताहेत तोच शंकराजी मल्हार यांची पालखी वाड्यावर आलीसुद्धा. शंकराजी उतरले. पगडी सावरत आणि उपरणं नीटनेटकं करीत दालनात आले. शाहूराजांना त्यांनी दंडवत घातला. शाहूराजे म्हणाले,

''या शंकराजी, या! बाळाजीपंतांनी आमच्या कानावर सारी हकीकत घातली आहे.''

''हो, काल आम्ही सविस्तर चर्चा केली. मसुदा घेऊन मी हुसेनअलींची मान्यता घेतो.''

''आमची माणसं कैदेतून सुटणं महत्त्वाचं आहे.''

''होय! आम्ही त्यासाठी प्रयत्न करू! थोरली मसलत करण्याचा आमचा मनसुबा पसंत आला?''

''हो! आम्ही मदत करू! पण ती करत असताना काळजी घ्या. नाही तर आमच्या मातु:श्रीसाहेबांच्या जिवाला काही बरंवाईट...!

''नाही! नाही! तसं होणार नाही!''

तेवढ्यात बाळाजीपंत म्हणाले, ''एक गोष्ट करता येईल !''

''कोणती?''

''आपल्या ताब्यात कोणी मुघल शाहजादा आला तर...?''

''पण कोण येणार ?''

''येणार नाही ! आणावयाचा !''

''बाळाजीपंत, तुमचा बेत जरा खोलून सांगा!''

''महाराज! पूर्वी शाहजादा अकबर आपल्याकडे आश्रयाला होते. त्यांचाच एक मुलगा आपल्या ताब्यात आहे, अशी गप उठवू.''

''वाऽऽऽ वाऽऽ! बाळाजी आमच्या ध्यानात आता हळूहळू सारे येऊ लागले आहे. त्या मुघल शाहजाद्याच्या बदल्यात आपण आपली माणसं परत मागू.''

''हो! बघू प्रयत्न करून!''

''पण मुघल शाहजाद्याचे नाव काय?''

''पूर्वी पुण्यात मुईउद्दीन नावाचा एक शाहजादा मरण पावला. त्याला उठवू परत. त्याच्या नावाचा एक तोतया उभा करू!''

शंकराजी मल्हार म्हणाले,

''बाळाजी! तुमच्या बुद्धीला तोड नाही. या प्रकाराला यश लाभेल !''

''शाहूमहाराज! आमची आपल्याला एक विनंती आहे !''

''कोणती विनंती शंकराजी?''

''आम्ही दिल्लीला जाऊ त्या वेळी बाळाजीपंत आमच्या सोबत हवेत!''

''अवश्य शंकराजी ! आज मसुदा तयार करा. तो घेऊन आपल्या सोबत बाळाजीपंत जातीने औरंगाबादेस येतील आणि हो शाहजादा मुईउद्दीनही !!''

सारेजण हसले! तेवढ्यात शाहूराजे म्हणाले, ''अरे हो, पण मुईउद्दीन कुणाला करणार ?''

''किती वर्षांचा मुलगा पाहिजे?''

''अरे मुलगा कसला? अंदाजे तीस, बत्तीस वर्षांचा कोणीतरी पाहिजे!''

''आपल्या फौजेत कोणी इराणी असेल तर बघा या वयाचा!''

''आहे! दिलावरखान आहे! चांगला गोरा गोमटा आहे. तो शोभेल शाहजादा मुईउद्दीन !''

असा सारा बेत ठरला. दिलावरखानाला बोलावून आणलं. शाहजाद्याचे सोंग आणावयाची बातमी त्याला सांगितल्यावर तो गांगरलाच. पण त्याला तयार करण्यात आलं. मराठी दौलतीच्या रक्षणासाठी आणि मातुःश्री येसूबाई साहेबांच्या सुटकेसाठी दिलावरखानाला मुघल शाहजादा करण्यात आलं.

शंकराजी मल्हार औरंगाबादेस गेले. तहाचा मसुदा त्यांनी हुसेनअली सय्यिदांना दाखविला. त्यांनी तहाला मान्यता दिली. बाळाजीपंतांनी सुचवलेला डावही हुसेनअलींच्या कानावर घातल्यावर ते म्हणाले,''ही मराठी डोकी कशी काय चालतात बघा!''

शाहजादा मुईउद्दीन लवकरच औरंगाबादला दाखल होणार असल्याची बातमी पसरली. मुघली फौजेला आपल्या शाहजाद्याला बघण्याची उत्कंठा लागली! हुसेनअलींनी तहाचा मसुदा दिल्लीला पाठवला. तो बादशाहा फरुखसियरने फेटाळून लावला. कोणीतरी त्याच्या कानावर मुईउद्दीनची बातमी घातली. त्यानं मुहम्मद अमीनखानाला बोलावलं. अमीनखान जुना, जाणता शख्स होता. तो आल्यावर बादशाह फरुखसियरने त्याला सांगितले, ''एक वेगळीच बातमी आली आहे, अमीनखान!''

''कोणती बातमी आलमपनाह?''

''मराठ्यांच्या ताब्यात कोणी मुघली शाहजादा आहे म्हणे !''

''मुघली शाहजादा? कोण?''

''मुईउद्दीन! शाहजादा अकबरांचा मुलगा !''

''हाँ! शाहजादा अकबर मराठ्यांच्या आश्रयाला होते. बरीच वर्षे ते महाराष्ट्रातच होते. हो, आता आठवले! एक मुघल शाहजादा या नावाचा होता खरा! पण त्या वेळी आलेल्या बातमीप्रमाणे त्याचा मृत्यू झाला होता!''

''मग हा नवीन शाहजादा कोण?''

''मुघल शाहजादा अकबराला एक अजून मुलगा होता. तो दुर्गादास राठोडांनी परत पाठवला !''

''मग मुईउद्दीन कोण ?''

''काही कळत नाही बुवा! बातमी काढावयास पाहिजे !''

''मुहम्मद अमीन! अहदी, नजरबाज औरंगाबादला पाठवा आणि छडा लावा या प्रकरणाचा..!''

दिल्ली कामाला लागली. अमीनखानानं आपल्या विश्वासातली माणसं औरंगाबादेला पाठविली. शाहजाद्यानं अशी माणसं पाठविल्याची सूचना हेरांनी शंकराजी मल्हारांना आणून दिली.

बाळाजीपंत दाखल झाले. सोबत मुघल शाहजादा 'मुईउद्दीन' होता. शाहजाद्याची उत्तम बडदास्त ठेवण्यात आली. लोक शाहजाद्याला भेटावयास

येऊ लागले. भरभरून नजराणे घेऊन येऊ लागले. कुर्निश करू लागले. दिलावरखान सोंग उत्तम वठवत होता. बाळाजीपंतांनी त्याच्याकहून चांगलीच तालीम करून घेतली होती. खराच शाहजादा वाटत होता.

मराठ्यांची फार मोठी फौज सय्यिद हुसेनअलीच्या मदतीला आली होती. अंबाजी त्रिंबक, खंडेराव दाभाडे, संताजी आणि राणोजी भोसले, संताजी जाधव, केरोजी आनंदराव, तुकोजी पवार, पिलाजी आणि सटवाजी जाधव, कृष्णाजी दाभाडे, शेख मीरा, बाजी कदम, नारो गंगाधर मुजूमदार, बाळाजी महादेव फडणीस, नारो शंकर, चिमणाजी दामोदर, आवजी नीलकंठ, महादेवभट हिंगणे, कर्वे, उपाध्ये वगैरे मंडळी जातीनं लष्करात होती.

बादशाहाचे हेर आले. ते आल्याचंही साऱ्यांना कळलं ! मराठ मंडळ सावध झालं. दिलावरखानानं स्वत:चा थाट वाढवला. तो जरा जास्तच नाटक करू लागला. कोणाला चाबकानं फोडायची शिक्षा दिली. कोणाला मनसब देतो म्हणाला. मध्येच त्यानं औरंगजेबाचं नाव काढलं ! मराठी मंडळी आणि मुघल तोतयापुढे जाऊन मुजरे, कुर्निश करू लागले. नाटकाचा प्रयोग फारच रंगला! बादशाह फरुखसियरच्या हेरांची खात्रीच झाली की हा मुघल शाहजादाच आहे!

आले तसे हेर परत फिरले! बादशाहाला खबर गेली. त्यापाठोपाठ हुसेनअली आणि मराठे दिलावरखानाला घेऊन दिल्लीला निघाले. पोहोचले देखील! दिल्लीत घबराट पसरली. वेड्यावाकड्या अफवा पसरल्या. तीस हजार फौज दिल्लीत शिरली होती. दिल्लीत एवढी मराठी फौज शिरण्याची ही पहिलीच वेळ होती.

भेटीचा दिवस उजाडला. सय्यिद हुसेनअली साऱ्यांना घेऊन दरबारात पोहोचले. फरुखसियर बादशाहा मनातून घाबरला होता पण चेहऱ्यावर काही दाखवत नव्हता. शिरस्त्याप्रमाणे रिवाज झाल्यावर बादशाहाने विचारले,

''हुसेनअली, मुघल शाहजादा कहाँ है ?''

''है ! हमारे साथ है । मरहट्टोंके लोग कहाँ है ?''

''वह भी यहाँ है ।''

''तो फिर लाओ उन्हे !''

''पहले शाहजादा हमारे हवाले कर दो !''

''पहले मरहट्टोंके लोग रिहा कर दो!''

अशी बोलाचाली झाली. बादशाहाने मराठ्यांचा म्हणून एक माणूस पुढे केला. तो संभाजीराजांचा दासीपुत्र होता! इतर मंडळींना दुसऱ्या दिवशी मराठ्यांच्या हवाली करण्याचं ठरलं.

दुसरा दिवस फरुखसियरच्या दृष्टीनं फारच वाईट ठरला. आदल्या रात्री अफवांनी जोर धरल्यानं - दिल्लीत चकमकी उडाल्या. बादशाहानं हुसेनअलीला ठार मारावयास पाठवलेले मारेकरी मराठ्यांनी पकडले. हुसेनअलीचा राग अनावर झाला. तो आणि त्याची फौज ताडताड पावलं टाकीत सरकारवाड्यात शिरली. फरुखसियर घाबरून जनान्यात लपला होता. हुसेनअलीनं त्याला बाहेर खेचलं. दिल्लीचा मुघल बादशाह खाटकाकडे निघालेल्या एखाद्या बकऱ्यासारखा हुसेनअलीबरोबर चालत होता. दिलावरखान साध्या वेशात त्यांच्या बरोबर होता. फरुखसियरनं विचारलं,

''हमारा शाहजादा कहाँ है, हुसेनअली !''

दिलावरखानाकडे बोट दाखवत हुसेनअली म्हणाला,

''यही है मुघल शाहजादा 'मुईउद्दीन' ! हमारे यह दिलावरखानने शाहजादाका किरदार सम्हाला! बादशाह होके हमे दगा कर रहे हो; अब उसका नतीजा देखो...!!''

असं म्हणत हुसेनअलीनं इशारा केला, एकजण पुढे झाला. त्याच्या हातात गरम सळ्या होत्या. त्या सळ्या तापल्यानं लालबुंद झाल्या होत्या. जल्लाद पुढं झाला आणि त्यानं बादशाह फरुखसियरच्या डोळ्यांत त्या सळ्या फिरवत्या. ''आँऽऽ!!'' एक मोठी किंकाळी सरकारवाड्यात घुमली! आंधळा फरुखसियर कोसळला. मराठ्यांच्या मदतीनं हुसेनअलीनं दिल्लीचा ताबा घेतला. दिल्ली हाती येण्याची मराठ्यांची ही पहिलीच वेळ होती. रफीउद्दरजत नावाच्या एका मुलाला बादशाह म्हणून घोषित करण्यात आले. त्याच्या नावानं मराठ्यांना सनदा मिळाल्या. मुघली कैदेत असलेल्या सर्व मराठी मंडळींची सुटका झाली. येसूबाई आणि इतर मराठी मंडळींनी तीस वर्षांनंतर स्वातंत्र्याचा पहिला श्वास घेतला.

***

**-निनाद बेडेकर.**
११०५/१४, स्वानंद ५,
हरिकृष्ण मंदिर पथ, पुणे १६

# सजीवांचे आकार आणि आकारमान

**डॉ. पंडित विद्यासागर**

सजीव प्राण्यांच्या आकारांचा आणि आकारमानांचा विचार केल्यास थक्क व्हायला होतं. आपल्या सभोवती दिसणाऱ्या प्राणी आणि वनस्पती यांच्यातच एवढे वैविध्य आहे की त्यांचा विचार करणेही केवळ दुरापास्त आहे. साधे उदाहरण द्यायचे झाले तर आपल्या डोळ्यांनी दिसणाऱ्या प्राण्यांमध्ये पिसू या सूक्ष्म प्राण्यापासून ते हत्ती किंवा व्हेल माशांचा समावेश करता येईल. यातही काही प्राणी हे पाण्यात राहणारे, काही जमिनीवर चालणारे तर काही आकाशात उडणारे असे आहेत. यांच्या आकारांत आणि आकारमानांतही फरक आहेच. आकाराचा विचार करता मासा, बेडूक, गरुड, झुरळ, मनुष्य, चित्ता, साप या आणि अशा अनेक प्राण्यांचे आकार वेगवेगळे आहेत. आकारमानाच्या बाबतीतही अशीच विविधता आहे. उंदीर आणि हत्ती यांच्या आकारमानातील फरकावरून याची जाणीव होते. वनस्पतीमध्ये आढळणारी विविधताही अशीच आहे. हे झाले डोळ्यांनी दिसणाऱ्या सजीवांच्या बाबतीत; परंतु डोळ्यांनी न दिसणाऱ्या जगामध्येही आकार आणि आकारमानांची विविधता विपुल प्रमाणात आहे. अमीबा हा एकपेशीय प्राणी तर आपला आकार हवा तसा बदलू शकतो. आकारमानात हवा तसा बदल घडवून आणून तो शरीराची हालचाल घडवून आणतो. पॅरेमेशियम हा एकपेशीय प्राणी शेपटीच्या साहाय्याने हालचाल करतो.



**निसर्गातील सजीवांचे आकार, आकारमान यांतील विविधतेत काही शास्त्रीय तत्त्वांची संगती आहे. भव्य आकाराचं अस्वल, छोटासा उंदीर, पक्ष्यांचे पंख, त्यांची चोच, पाय यांचे वेगवेगळे आकार यांविषयी शास्त्रशुद्ध तरीही मनोरंजक माहिती डॉ. पंडित विद्यासागर यांच्या लेखात वाचूया.**

ही विविधता पाहिल्यानंतर साहजिकच मनात प्रश्न उभा राहतो की निसर्गाने ही विविधता निर्माण करण्याचे प्रयोजन काय असेल ? आकारमानाच्या बाबतीत संत तुकाराम महाराजांनी एका अंभगात म्हटले आहे.

लहानपण देगा देवा ।
मुंगी साखरेचा रवा ।।
ऐरावत रत्न थोर।
त्यास अंकुशाचा मार।।

याचा शब्दश: अर्थ घेतला तर आकारमान लहान असणे फायदेशीर आहे, असा अर्थ होतो; परंतु हे खरे आहे का ? या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी आपण आकारमानाशी संबंधित काही बाबींचा विचार करू. आकारमानाचा संबंध हा हालचालीशी असतो. हालचालीसाठी ऊर्जेची आवश्यकता असते. ही ऊर्जा मिळवण्यासाठी अन्नाची गरज असते. गंमतीचा भाग म्हणजे अन्न मिळविण्यासाठी हालचाल करावी लागते. याचाच अर्थ हालचाल करण्यासाठी खर्च करावी लागणारी ऊर्जा आणि अन्नाद्वारे मिळालेली ऊर्जा यांच्यात ताळमेळ असणे आवश्यक असते. अन्न मिळविण्यासाठी लागणारी ऊर्जा ही अन्नापासून मिळालेल्या ऊर्जेपेक्षा कमी असेल तर ते जीवावर बेतू शकते. जसजसे आकारमान कमी होत जाते तसतशी ऊर्जा साठवून ठेवण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे मिळवलेल्या आणि खर्च झालेल्या



ऊर्जेचा ताळमेळ सतत ठेवावा लागतो. परंतु त्याचबरोबर आकारमान कमी असेल तर हालचालीसाठी लागणारी ऊर्जा कमी असते. कमी वस्तुमान एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यास कमी बळ लागते हे तुम्हाला माहीत आहेच. शिवाय लहान आकारमानामुळे ज्या माध्यमात हालचाल होत असते, त्या माध्यमाचा विरोधही कमी होत असतो. त्यामुळेही ऊर्जेची बचत होते. हालचालीचा असणारा वेग हा ज्या प्रमुख घटकांवर अवलंबून


असतो, त्यात हालचालीमध्ये समाविष्ट वस्तुमान, ऊर्जा किती जलदपणे हालचालीसाठी उपलब्ध होते तो वेग आणि माध्यमाचा होणारा विरोध यांचा समावेश असतो. जसजसे आकारमान वाढत जाते, तसतसा माध्यमाचा होणारा विरोधही वाढतो. शरीराच्या किती पृष्ठभागाचा संबंध माध्यमाशी येतो हेही महत्त्वाचे असते. हा संबंध जितका जास्त तितका विरोधही जास्त. गर्दीमधून हात पसरून चालण्यामुळे जी परिस्थिती निर्माण होते, तीच परिस्थिती हवेतून अथवा पाण्यामध्ये हालचाल करताना होते. अशा परिस्थितीत आकारमानाबरोबर आकारही महत्त्वाचा ठरतो. निमुळत्या आकारामुळे मासे पाण्यात सहजगत्या हालचाल करू शकतात. त्याचप्रमाणे पक्षी आकाशात विनासायास उडू शकतात. अर्थात उडण्यासाठी त्यांना पंखांची साथ मिळत असते. पंखांबाबत आपण स्वतंत्रपणे विचार करू.

स्वसंरक्षणासाठी प्राण्यांना ताकदीची आवश्यकता असते. ताकद ही स्नायूंमुळे प्राप्त होते. परंतु स्नायूंची वाढ झाली तर त्यांच्या हालचालीसाठी लागणारी ऊर्जा अधिक असते. त्यामुळे कित्येक प्राणी चरबीच्या स्वरूपात ऊर्जेची तरतूद करून ठेवतात. थंड प्रदेशात आढळणारी अस्वले हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. चारशे किलोपेक्षाही अधिक वजनाची ही अस्वले बर्फ पडल्यानंतर काहीही न खाता कित्येक महिने झोपून असतात. या काळात शरीराला लागणाऱ्या ऊर्जेची गरज ही साठवलेल्या चरबीद्वारे भागवली जाते. परंतु अधिक वजनामुळे हालचाली मंद होतात. शिवाय याचा भार सांध्यांवर पडून ते झिजतात.


शरीराच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ अधिक असल्यास शरीरातून उष्णता अधिक प्रमाणात बाहेर टाकली जाते. त्यामुळे शरीराच्या पृष्ठफळाचे शरीराच्या घनफळाशी असलेले गुणोत्तर अधिक असणे या दृष्टीने फायदेशीर नसते. आकारमान जसजसे वाढते तसतसे हे गुणोत्तर कमी होत जाते. उदाहरणार्थ, उंदराच्या शरीरातून उष्णता अधिक प्रमाणात बाहेर टाकली जाते. शरीराचे तापमान टिकवून धरायचे असेल तर अधिक ऊर्जेची आवश्यकता असते. त्यामुळे उंदरांना सतत खात राहावे लागते. याउलट हत्तींना शरीरात निर्माण झालेली उष्णता बाहेर टाकण्यासाठी कानांचा उपयोग करावा लागतो किंवा पाण्याचा आश्रय घ्यावा लागतो. जसजशी समुद्रसपाटीपासून उंची वाढत जाते तसतसे तापमान कमी कमी होत जाते. त्यामुळे उंदरासारखे प्राणी हिमालयासारख्या उंच ठिकाणी आढळत नाहीत. याच कारणामुळे लहान आकाराचे पक्षी अधिक उंचीवर आढळत नाहीत.

शरीराच्या आकारमानाचा आणि बुद्धिमत्तेचा काही संबंध असतो का? तुम्हाला माहीत आहेच की बुद्धिमत्तेचा संबंध हा मेंदूशी असतो. प्रगत प्राण्यांमध्ये मज्जासंस्था ही अधिक विकसित झालेली असते. मानवामधे मोठ्या मेंदूची वाढ ही अधिक प्रमाणात झालेली असते. हे खरे असले तरी व्हेल या माशाच्या मेंदूचा आकार हा मानवी मेंदूपेक्षा मोठा असतो. मेंदू हा अनेक पेशींचा बनलेला असतो. या मज्जापेशींचा विचार केल्यास त्यांचा आकार हा उंदीर आणि हत्ती यांच्यात जवळजवळ सारखाच असतो. जरी हत्तीचे आकारमान हे उंदराच्या आकारमानापेक्षा हजार पटींनी अधिक असले तरी त्यामुळे बुद्धिमत्ता ही केवळ मेंदूच्या आकारमानावरून ठरत नाही. तर बुद्धिमत्तेचा संबंध हा मेंदूतील पेशींनी एकमेकांबरोबर प्रस्थापित केलेल्या संबंधांवर अवलंबून असतो.

संपूर्ण शरीराचा आकार जसा महत्त्वाचा असतो तसाच अवयवांच्या अथवा शरीराच्या एखाद्या भागाच्या आकारालाही तितकेच महत्त्व असते. पक्ष्यांच्या पंखांचेच उदाहरण घ्या ना. मानवाला पक्ष्यांच्या उडण्याने नेहमीच आकर्षित केले आहे. पक्ष्यांप्रमाणे उडता येईल का या कुतूहलापोटी अनेकांनी पंख लावून उडण्याचा प्रयत्न केला आणि त्यात प्राणही गमावले. परंतु मानवाच्या या ध्यासाची परिणती विमानाच्या निर्मितीत झाली हे विसरून चालणार नाही. विमानाच्या उड्डाणाचा विचार केल्यास चार बाबी महत्त्वाच्या असतात. त्यात विमानाचे वजन, विमानाला पुढे नेणारे बल, विमानाला वर उचलणारे बल आणि हवेचा होणारा विरोध यांचा समावेश असतो. ज्या वेळी विमानाला




उचलणारे बल हे वजनापेक्षा अधिक होते, त्या वेळी विमान वर उचलले जाते. हे बल विमानाच्या पंखांचा साहाय्याने निर्माण करता येते. यासाठी पंखांचा आकार फुगीर आणि वक्राकार असावा लागतो. ही कल्पना पक्ष्यांच्या पंखांवरून विकसित करण्यात आली आहे. पक्ष्यांचे पंख हे वरून गोलाकार आणि खालच्या बाजूने पोकळ असतात. पक्ष्यांचे शरीर अथवा विमान हवेत वर उचलण्यासाठी त्यांना गती देणे आवश्यक असते. विमानाच्या बाबतीत यासाठी इंजिनाचा वापर करतात तर पक्षी आपल्या पायांचा वापर करतात. वेगाने पुढे गेले असता, पंखांच्या आकारामुळे त्यांच्या वरच्या भागात हवेचा दाब कमी होतो. त्यामुळे पंखांखालची हवा त्या ठिकाणी



जाण्याचा प्रयत्न करते व त्यामुळे वर उचलणारे बल निर्माण होते. पक्षी हवेत असताना पक्षी पंखांची वर-खाली हालचाल करून पुढे जातात. उडण्याची दिशा ठरवण्यासाठी त्यांना पंखांचा उपयोग होतो. खाली उतरताना गती कमी करण्यासाठीही शेपटीचा उपयोग होतो. निरनिराळ्या पक्ष्यांच्या पंखांचा आकारही निरनिराळा असतो. आखूड आणि रुंद पंख असणारे पक्षी हे जमिनीवरून हवेत जलद उडू शकतात. गरुडाचे पंख हे लांब आणि रुंद असतात, त्यामुळे तो हवेत उंच भरारी घेऊ शकतो. घुबडांच्या पंखांना मऊ अस्तर असल्यामुळे उडताना त्यांच्या पंखांचा आवाज होत नाही. पफीन या रंगीत चोच असलेल्या आणि उत्तर अटलांटिक समुद्रावर सापडणाऱ्या पक्ष्यांचे पंख हे बळकट असतात आणि वल्ह्याप्रमाणे असणाऱ्या या पंखांमुळे ते पाण्यातही 'उडू' शकतात.


पक्ष्यांचे पंख ज्यांपासून बनलेले असतात त्या पिसांचा आकारही वैशिष्ट्यपूर्ण असतो. पक्ष्यांच्या शरीराच्या जवळ जी पिसे असतात ती मऊ आणि जाडसर असतात, त्यामुळे पक्ष्यांचे शरीर उबदार राहते. बाह्य भागातील आणि शेपटीची पिसे ही बळकट आणि कडक असतात. परंतु ही पिसे वजनाने हलकी असतात. या पिसांचा उपयोग पक्ष्यांना उडण्यासाठी होतो. या पिसांच्या मध्यभागी एक बळकट भाग असतो, त्याला दांडा म्हणतात. या दांड्याशी संलग्न असा जो पंखांचा भाग असतो, तो एकमेकांमध्ये गुंतलेला असतो; त्यामुळे उडताना त्यांच्यामध्ये सलगता राहते.

पक्ष्यांचा विषय निघालाच आहे तर आपण पक्ष्यांच्या आणखी एका



अवयवाचा विचार करू. पंखांप्रमाणे पक्ष्यांची चोचही वैशिष्ट्यपूर्ण असते. कीटक खाणाऱ्या पक्ष्यांची चोच ही पातळ आणि टोकदार असते. लाल रंग असलेल्या तपकिरी रंगाच्या दयाळ पक्ष्यांची चोच ही अशा प्रकारची असते. बिया खाणाऱ्या पक्ष्यांची चोच ही बळकट आणि जाड असते.

डोमकावळ्यासारख्या पक्ष्यांची चोच ही कुदळीप्रमाणे असते. याचा उपयोग त्यांना जमिनीखालील अळ्यांना बाहेर काढून खाण्यासाठी होतो. चिखलात खोलवर असणारे खाद्यपदार्थ शोधून खाणाऱ्या पक्ष्यांची चोच ही लांब आणि निमुळती असते. घुबड, घार आणि गरुड या पक्ष्यांची चोच मोठी आणि



अणकुचीदार असते. या आकड्याप्रमाणे असणाऱ्या चोचीमुळे ते भक्ष्यांच्या मांसाचे लचके सहज तोडू शकतात. बदक, राजहंस या पक्ष्यांच्या चोची या उथळ आणि चमच्याच्या आकाराच्या असतात, त्यामुळे वनस्पती आणि प्राण्यांचे अवशेष त्यांना पाण्यापासून सहज वेगळे करता येतात.

पक्ष्यांच्या पायांचे आकारही निरनिराळे असतात. बहुतेक पक्ष्यांच्या पायाला चार बोटे असतात. बोटांच्या शेवटी धारदार आणि आकड्यांप्रमाणे नखे असतात. त्यातील तीन बोटे पुढच्या बाजूस असतात. अशा रचनेमुळे हे पक्षी दूरड

अथवा भिंतींना पकडून राहू शकतात. सुतार पक्ष्याच्या पायांची बोटे ही दोन पुढे आणि दोन मागे अशी असतात. त्यामुळे हे पक्षी खोडाची साल घट्ट पकडून ठेवू शकतात. गरुड, घुबड



आणि घारीचे पाय बळकट असतात. त्यांच्या पायांची नखेसुद्धा अणकुचीदार आणि बळकट असतात. ते या पायाच्या साहाय्याने भक्ष्याला मारू शकतात. तसेच भक्ष्य घट्ट पकडून उंच भरारी घेऊ शकतात. बदक, राजहंस यांसारख्या पक्ष्यांच्या पायांची बोटे पडद्याने जोडलेली असतात. यामुळे हे पक्षी फार चांगले पोहू शकतात.

इतर प्राण्यांच्या पायांचा आकारही असाच वैशिष्ट्यपूर्ण असतो. चित्ता, मांजर यांसारख्या प्राण्यांच्या तळव्यात मऊ पदार्थ असतो. त्यामुळे हे प्राणी उंचावरून उडी घेऊ शकतात. पळतानाही त्यांना या रचनेचा स्प्रिंगप्रमाणे उपयोग होतो. शिवाय चालताना आवाज न झाल्यामुळे भक्ष्य पकडण्यासाठी त्याचा उपयोग होतो. हत्तीसारख्या वजनदार प्राण्याचे पाय हे जाडजूड आणि तळवे पसरट असतात. साहजिकच वजनामुळे तळपायांवर पडणारा भार विभागला जाऊन इजा होण्याची शक्यता टळते. अशाच रचनेमुळे उंटाला वाळूतून चालणे सुलभ होते. हरीण, शेळी यांसारख्या प्राण्यांच्या पायांच्या टोकाला बळकट खुरांची योजना असते. त्यामुळे जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवून हे प्राणी वेगाने पळू शकतात. घोड्याचे पाय तर इतके बळकट असतात की तो तीन पायांवर उभा राहून चौथ्या पायाला विश्रांती देतो. त्यामुळे त्याला पाय दुमडून विश्रांती घेण्याची गरज भासत नाही. थोडा झोपला तरी तो पाय सरळ ठेवूनच झोपतो. आपल्या पायाच्या रचनेचा विचारही या संदर्भात केल्यास वावगे ठरणार नाही. टाच आणि बोटे यांमध्ये पावलाची कमान तयार होते. या कमानीमुळे शरीराचे वजन टाच आणि बोटे यामध्ये समप्रमाणात विभागले जाते. याच तत्त्वाचा वापर करून अवजड वाहनांची वाहतूक करणाऱ्या पुलांची बांधणी केलेली असते. चालण्यामुळे जे धक्के बसतात, ते शोषण्याचे कामही ही कमान करत असते. ज्या व्यक्तींचे पाय सपाट असतात अशा व्यक्तींना खूप अंतर चालण्याने अथवा पळण्याने त्रास होऊ शकतो.

तर मित्रांनो, सजीवांचा आकार आणि आकारमान या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. या विषयांतर्गत अनेक गोष्टींची चर्चा करता येईल. उदाहरणार्थ, कानांची, डोळ्यांची आणि हृदयाची रचना; त्यांचा आकार आणि कार्य यांचा संबंध; हाडांचा आकार आणि आकारमान, सांध्यांचे आकार आणि त्यामुळे होणारे फायदे आणि तोटे; फुप्फुसांची रचना द्राक्षांच्या घडाप्रमाणे का असते ? हवेचे आतबाहेर येणे आणि रचना यांचा संबंध काय असतो ? रक्तवाहिन्यांचा आकार लहान लहान होत जातो, त्यामुळे रक्तप्रवाहावर काही परिणाम होतो का ? डोळ्यांना न दिसणारे एकपेशीय प्राणी, जीवाणू आणि विषाणू आपली हालचाल कशी घडवून आणतात ? वनस्पतींच्या मुळांचे, खोडांचे आणि पानांचे आकार निरनिराळे असतात. त्याचा आणि त्यांच्याशी संबंधित कार्याचा काही संबंध असतो का ? शरीरातील सेन्द्रिय रेणू विशिष्ट आकारच का धारण करतात ? त्यासाठी कोणत्या प्रेरणा कारणीभूत असतात ? असे अनेक प्रश्न विचारून त्याविषयी माहिती मिळवता येईल. परंतु या सर्वांचा विचार एका लेखात करणे शक्य होणार नाही. विज्ञानामध्ये अनेक नवनवीन विषय पुढे येत असतात. सजीवांचा आकार आणि आकारमान हा विषयही असाच विकसित होईल यात शंका नाही. या लेखामुळे तुमची या विषयाशी ओळख झाली आहेच. या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी गणित, भौतिकशास्त्र आणि संगणकशास्त्र यांसारख्या विषयांची मदत घेणे आवश्यक ठरणार आहे. आपण या विषयाचा पाठपुरावा केल्यास या लेखाचा हेतू सफल झाला, असे म्हणता येईल.

***

**– डॉ. पंडित विद्यासागर**
भौतिकशास्त्र विभाग,पुणे
विद्यापीठ,पुणे७

# व्यंगचित्रकारांच्या दृष्टीतून टी.व्ही.

आजच्या जीवनात टी.व्ही.ने आपले स्थान पक्के केले आहे. त्याचे बरेवाईट परिणाम आता दिसू लागले आहेत. टी.व्ही.चा योग्य उपयोग कसा करावा हे न कळणारे पालक फार. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी अहित होण्याची शक्यता वाढते आहे. व्यंगचित्रकारांच्या नजरेतून टी.व्ही.चा प्रभाव सुटलेला नाही. त्यांची कल्पकताही वाढलेली आहे. हा विषय व्यंगचित्रकार कसा हाताळतात ते पाहणे गंमतीचे आणि उद्‌बोधकही ठरेल.

ळपाळीव कुत्रा आरामात सोफ्यावर बसून टी.व्ही.चे प्रोग्रॅम बघत आहे. मालक आपल्या मित्रास कौतुकाने सांगतो. आजकालचे वॉचडॉग असेच. राखण करण्याऐवजी पाहण्याचेच काम करतात (watch-पाहणे, राखण करणे) कुत्र्याचे अर्थात त्यांच्याकडे लक्ष नाही.


•अशीच कल्पना दुसऱ्या एका व्यंगचित्रात आहे. टी.व्ही.वर महापुराचे दृश्य आहे. टी.व्ही.मधून महापुराचा लोंढा बाहेर येतो. त्या लोंढ्यात घरातील सामानसुमान वाहून जाते. तरीही टी.व्ही. बघणारा मालक त्या दृश्याकडे टी.व्ही.तील दृश्य म्हणून पाहात, त्याचा मजेने आस्वाद घेतो आहे. सत्य आणि काल्पनिक यातल्या रेषा पुसल्या जाताहेत.

•टी.व्ही.वर दृश्य. बॉक्सिंगचा सामना. एका बॉक्सरला बाई वारा घालते आहे. पाणी देते आहे. बॉक्सर अतिशय थकलेला.

ते दृश्य पाहणारा प्रेक्षकही थकलेला. त्याची पत्नीही त्याला वारा घालते आहे. पाणी देते आहे. तो बॉक्सर आणि हा प्रेक्षक यांच्या चेहऱ्यात विलक्षण साम्य आहे (कारण तो पराभूत बॉक्सर म्हणजेच हा प्रेक्षक ! त्याला पुन:प्रत्यय येतो आहे.

•टी.व्ही.वर ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम चालू आहे. टी.व्ही. बघणारा प्रेक्षक वादक आहे. तो आपले व्हायोलिन तारा जुळवून साथ द्यायला, वाजवायला लागणार तोच -

टी.व्ही. मधील ऑर्केस्ट्राचा कंडक्टर आपल्या तोंडावर बोट ठेवून खूण करतो - चुप !




वादक वाद्य बाजूला ठेवतो नर्व्हस होऊन ! पण तो वातावरणाशी किती समरस झाला होता !

•टी.व्ही.च्या पडद्यावर चमत्कारिक रेषा-रंगाच्या चेहऱ्याच्या माणसाची प्रतिमा. त्याचबरोबर सूचना - 'टी.व्ही. सेट अॅडजस्ट करू नका. मी हा असाच दिसत असतो !'

(निवेदकाचा काय हा प्रांजळपणा !)

•टी.व्ही.वर दृष्ये. एक : टी.व्ही. पाहतापाहता मालक झोपी गेलेला. तेवढ्यात चोर घरातले सामान गोळा करून टी.व्ही. पाहतो.

दृश्य दोन : टी.व्ही. वर साहित्य चर्चेचा कार्यक्रम पाहता पाहता चोरही झोपी जातो.




'कंटाळवाण्या कार्यक्रमावर सुरेख भाष्य !'

•शेजारचा माणूस दारातून ओरडतो - टी.व्ही.चा व्हॉल्यूम कमी करा. त्याला माहीत नाही. ज्याने दार उघडले तो दरोडेखोर आहे. त्याने बंदूक पाठीमागे लपवलेली आहे. समोर दोन माणसे बेशुद्ध पडलेली. टी.व्ही.च्या किंचाळण्याने त्यांचे ओरडणे ऐकू येत नाही.

टी.व्ही.चा असाही दुरुपयोग !

•टी.व्ही.चा दुकानदार प्रात्यक्षिक दाखवीत ग्राहकास अटी सांगतो !

पूर्ण रक्कम भरल्यास असा सेट मिळेल.
(टी.व्ही.वर पूर्ण चित्र दिसते.)
अर्धी रक्कम भरल्यास असा...'
(टी.व्ही.वर अर्धे चित्र...)
एक तृतीयांश भरल्यास असा...
(पडद्यावर फक्त एक तृतीयांश चित्र.
हप्ते भराल त्या प्रमाणात चित्र वाढत जाईल.
(हप्त्याहप्त्याने मनोरंजन !)

•टी.व्ही.निवेदक वार्ता सांगतो - सकाळीच अकस्मात वीज गेली. जनतेचे हाल झाले.

निवेदक विजेवर चालणाऱ्या रेझरवर दाढी करीत असल्याने त्याची दाढी अर्धीच केलेली, एका बाजूची मिशी उतरलेली आहे.


•आई बाहेरून येते. मुलगा वाचण्यात मग्न. ती टी.व्ही.ला स्पर्श करून म्हणते - 'उगाच नाटक करू




नकोस. टी.व्ही. अजून गरम आहे.' (ढोंग दडवण्याचा मुलाकडे उपाय नव्हता.)

ळत्याने तळ्याकाठी टी.व्ही.सुरू केला आहे. दोन्ही एरियल्सना दोर लावून गळ पाण्यात सोडला आहे. पाण्यात मासे जमताहेत. उद्योग आणि करमणूक यांचा सुंदर मेळ !

ळमुलगा वडिलांना विचारतो - 'पपा, जेव्हा टी.व्ही.च्या जाहिराती नव्हत्या तेव्हा आपण काय काय



खरेदी करायचं हे कसं कळायचं ?'

(जाहिराती ग्राहकात नव्या गरजा निर्माण करतात.)

•एक पोरगं दुसऱ्यास - 'वाचनापेक्षा टी.व्ही. बरा. आपल्याला स्वत:च्या डोक्याला त्रास द्यावा लागत नाही!' (टी.व्ही.वरचे बरेच कार्यक्रम बुद्धीला चालना देणारे नसतात असे शिक्षणशास्त्रज्ञांना वाटते.)

काहीजण टी.व्ही.ला 'इडिअट बॉक्स' म्हणतात. मात्र ते सर्वार्थाने खरे नव्हे.

***

**संकलन : आ. ना. पेडणेकर**
६, अनुपमप्रभा, अमरसी रोड, मालाड (प.) मुंबई ६४

# सखी



तापायात डोक्यात फुलं माळ
जरेतली चमक हरवू देऊ नको
ाडा घोळ उचलून धर वस्त्रांचा
डखळू नकोस.
शिरपेच खुशाल चढव मस्तकावर
त:च स्वत:ची राणी हो.

त्र विसरू नकोस
लवयातल्या सख्यांना
दत कर त्यांना फुलं माळायला
ांचे त्यांचे शिरपेच खोवायला
हात दे डोंगरचढणीवर चढताना.

भोवतीचा गलका वाढतोय; वाढू दे .
क्रोधाग्नी भडकतोय; भडकू दे .
धुक्यातून सरळ सिंहासनापर्यंत
निर्भय चालत राहा.

ऋतुंच्या पायघड्यांवरून
अलगद तरंगत जा अशीच
धुक्यात पायऱ्या अदृश्य झाल्या
तरी भांबावू नकोस.
सगळं स्पष्ट खडबडीत
दिसणंही तसं वाईटच
त्यानं वाढतो तो गोंधळच.

**-अंजली कुलकर्णी,**२० झाला हौसिंग सोसायटी मार्केटयार्ड ,पुणे ३७

# कुणी



कुणासाठी कोणी धरी सावली रे
कुणासाठी कोणी तरी जागतो
कुणी शुष्क रेताड माळावरीही
सुगंधी फुलांचे मळे लावितो.

कुणाचा कधी ढासळे तोल त्याला
कुणी हात देवोनिया सावरी
ी खोल गाळात बैसे रुतोनी
ावंत कोणी तया उद्धरी
मेरात कोणी दिशाहीन त्याच्या
। दीप होऊन तेवे कुणी
ी शून्य एकाकी उद्‌ध्वस्त त्याच्या
। धीर चैतन्य पेरी कुणी
। कुणीच्या उरी तूच देवा
करुणामृताचे झरे निर्मिसी
कुणा नेत्रिचे अश्रु आनंदताना
तुझे रूप डोळ्यांतुनी पाहसी !

***

**– दत्ता हलसगीकर**
२०अ,जवाननगर,विजापूर रोड, सोलापूर


# संदेश

युद्ध नको, विध्वंस नको,
शांतिचा संदेश हवा
राम नको अन् रहिम नको,
मानवतेचा देश हवा ।।

फुलास नसते जात कधीही
गंधाला नसते वस्ती
तुम्ही आम्ही आनंदलेकरे
माय एक हो या जगती
रक्त नको अन् खून नको,
समतेचा आदेश हवा ।।

धर्मग्रंथ का कधी सांगतो
मारा, ठोका, जुलूम करा
आम्ही कोंडिला पानांमधुनी
माणुसकीचा खोल झरा
स्फोट नको, विस्फोट नको,
शक्तींना आदेश हवा।।

आम्हा हवी मोकळी हवा अन्
शुभ्र हिमालय सर्वांचा
नंदनवन हे सौंदर्याचे
डाग नसावा रक्ताचा
बंद नको, प्रतिबंध नको,
मुक्त मनास प्रवेश हवा ।।



***

**– किशोर पाठक**
विठ्ठल पार्क को. ऑ.सो.,
श्रीरंगनगर, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड
नाशिक ५

# विश्वबंधुत्व

–मुकुंद जोगळेकर

***'हॅलो, टेरियन प्लॅनेट--- हॅलो, टेरियन प्लॅनेट---' चॅट करताना बऱ्याचदा काल्पनिक पण खूप मजेशीर गप्पा बघायला मिळतात. हा संदेश म्हणजे सुद्धा कोणीतरी गंमत करत असेल, असं आलोकला वाटलं. पण थोड्या वेळानं हे काही वेगळंच असल्याचं त्याला जाणवलं. या संदेशातून काही अर्थ निघत नसल्यामुळे इतर चॅटर्सनी या वारंवार येणाऱ्या संदेशाकडे दुर्लक्ष केले. पण आलोकला मात्र या संदेशाबद्दल कुतूहल निर्माण झालं होतं. त्यानं त्या संदेशकर्त्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू केला....***

---

एकदा भगवान शंकर आणि पार्वती कैलास पर्वतावर त्यांच्या पर्णकुटीबाहेर गप्पा मारत असताना छोटा गणपती आणि कार्तिकेय भांडत त्यांच्याकडे आले.

''आई आई, हा कार्तिकेय बघ मला चिडवतोय. तूच सांग त्याच्यापेक्षा मी जास्त बुद्धिमान आहे की नाही ? शिवाय माझ्यात शक्ती पण जास्त आहे. एका फटकाऱ्यातच मी त्याला हरवू शकतो.'' गणपती नेहमीप्रमाणे आईकडे तक्रार घेऊन गेला.

''बाबा, हा गणपती स्वत:ला मोठा श्रेष्ठ समजतो. त्याला शक्तीचा आणि बुद्धीचा फार गर्व झालाय. पण तुम्हीच सांगा, मीच त्याच्यापेक्षा मोठा आहे की नाही ?'' कार्तिकेय भगवान शंकराकडे पाहात म्हणाला.

पार्वतीनं गणपतीला जवळ घेतलं आणि ती भगवान शंकराकडे अपेक्षेनं पाहू लागली. शंकरापुढे मोठा पेच निर्माण झाला. कार्तिकेय त्यांचा लाडका मुलगा. पण त्याला श्रेष्ठ म्हटलं तर पार्वती रागावेल. शेवटी त्यांनी यातून एक मार्ग काढला.

''हे बघा, मी तुम्हां दोघांना एक काम सांगणार आहे. तुम्ही दोघांनी आता पृथ्वीप्रदक्षिणेला निघायचं. पृथ्वीप्रदक्षिणा करून जो आधी परत येईल तो श्रेष्ठ.''

ही अट ऐकल्याबरोबर कार्तिकेयाचा चेहरा उजळला तर गणपती क्षणभर काळजीत पडला. दुसऱ्याच क्षणी कार्तिकेय वाऱ्याच्या वेगाने पृथ्वीप्रदक्षिणेसाठी निघाला. इकडे गणपती सावकाश उठला. आजूबाजूच्या झाडांवरची सुगंधी फुले त्याने काढून आणली आणि मग आई-वडिलांकडे परतून गणपतीने ती फुलं त्यांच्या पायांवर वाहून दोघांना नमस्कार केला. नंतर ती दोघं बसलेल्या पाराभोवती एक प्रदक्षिणा मारून तो पुन्हा त्यांच्यापुढे हात जोडून उभा राहिला. भगवान शंकर त्याच्याकडे बघून कौतुकानं हसले. काही वेळानं कार्तिकेय दमून भागून, पृथ्वीप्रदक्षिणा करून परतला.

वाऱ्याच्या वेगानं धावून वेगाचा उच्चांक त्यानं गाठला होता. भगवान शंकरांनी त्याच्याकडे अभिमानाने बघितलं.

''बेटा कार्तिकेय, तुझं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. आज तू एक अशक्यप्राय गोष्ट तुझ्यातील शक्तीसामर्थ्याने आणि प्रबळ इच्छाशक्तीमुळे करून दाखवली आहेस. तुझ्यातील चिकाटी आणि प्रयत्नांची शिकस्त नि:संशय श्रेष्ठ आहे. परंतु या गणपतीनं आई-वडिलांना पृथ्वीच काय पण अखिल विश्वाच्या जागी मानून आमच्याभोवती एक प्रदक्षिणा घालून विश्वप्रदक्षिणेचं श्रेय मिळवलं आहे. त्यामुळे बुद्धिचातुर्याच्या आणि प्रसंगावधानाच्या बाबतीत तो सर्वश्रेष्ठ आहे. म्हणून मुलांनो, प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रात प्रयत्नांनी श्रेष्ठ ठरू शकतो. परंतु बुद्धिमत्ता आणि सामर्थ्य याचबरोबर विवेक असणं अत्यंत गरजेचं आहे. नाही तर श्रेष्ठ कोण या वादामध्येच तुमची सगळी हुशारी आणि शक्ती वाया जायची!'

गणपती आणि कार्तिकेय हे दोघेही मनातून जरासे वरमले. दोघांनीही मनोमन एक-दुसऱ्याचं मोठेपण मान्य केले. गणपतीचं बुद्धिचातुर्य आपल्यात नसल्याचं कार्तिकेयाच्या लक्षात आलं तर कार्तिकेयाची अफाट चपळता आपण दाखवू शकत नसल्याचं गणपतीनं मान्य केलं......

गोष्ट वाचून संपल्यावर आलोकच्या ओठांवर हसू फुटलं. आलोकला वाचनाची फार आवड होती. लहानपणापासून जमवलेल्या



पुस्तकांचा मोठा संग्रह त्याच्याकडे होता. अधूनमधून कंटाळा आला की जुन्या पुस्तकांमधल्या पौराणिक गोष्टी वाचायला त्याला भारी आवडे. आज सकाळीच त्याच्या शाळेमध्ये, सायबर इंटरनॅशनलच्या डॉ. प्रणव दासगुप्ता यांचे 'इंटरनेट आणि भविष्यातील वैज्ञानिक प्रगती' या विषयावर झालेले भाषण आलोकला आठवलं. त्या भाषणामधून संगणक विश्वाचं विराटरूपच डॉ. दासगुप्तांनी डोळ्यांपुढे उभं केलं होतं. आलोकला मोठी गंमत वाटली. सकाळी ऐकलेल्या भाषणात आणि आता वाचलेल्या गोष्टीत खूपसे साम्य जाणवले. आपल्या बुद्धिचातुर्याच्या जोरावर गणपतीनं रूपकात्मक विश्वपरिक्रमा करून बाजी मारली होती, तर मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या ज्ञानलालसेच्या ध्यासाने प्रत्यक्षात सृष्टीलाच संगणकात कैद करून ठेवलं होतं. कार्तिकेय आणि गणपतीला त्यांच्या प्रदक्षिणेचा प्रत्यक्ष काहीच लाभ झाला नव्हता. पण मानवाने मात्र आपल्या अफाट बुद्धीच्या बळावर सारी सृष्टीच संगणकाच्या माध्यमातून घरोघरी पोहोचवली होती. आपले अनुभवविश्व विस्तारले होते.

सकाळचं भाषण ऐकल्यापासून आलोक संगणकाच्या आणि इंटरनेट माध्यमाच्या सर्वदूर व्याप्तीनं झपाटला होता. आता वाचलेल्या गोष्टीमुळे त्याला अधिकच स्फूर्ती आली. पुढच्याच महिन्यात त्याचा पंधरावा वाढदिवस होता. या वाढदिवसाला त्याच्यासाठी व्हीडिओ गेम आणायचं बाबांनी कबूल केलं होतं. त्याऐवजी कॉम्प्यूटर कसा मिळवायचा याचा आलोक विचार करू लागला.

त्यामुळे बाबांना यायला उशीर झाला तरी त्यांची वाट बघत जेवायचा थांबला होता. बाबा आल्यावर जरासे थकल्यासारखे दिसत होते. त्यांच्या हातातली बॅग, जागेवर ठेवून तो लगबगीने त्यांच्यासाठी पाणी घेऊन आला.

''अरे वा आलोक, आज काय विशेष ? माझी एवढी सरबराई का चाललीय ?'' '' हे हो काय बाबा ? मी एरवीपण आणतोच ना पाणी ? ''आज तो जेवायचाही थांबलाय. तुमच्याबरोबर जेवायचं म्हणत होता.'' आलोककडे हसून बघत सुमतीबाई म्हणाल्या.

''चला तर मग आधी जेवायलाच बसूया. आज मलाही खूप भूक लागलीय.'' असं म्हणत आलोकचे बाबा सदाशिवराव हात धुवायला उठले. जेवायला बसल्यावर, कशी सुरुवात करावी याचा आलोक विचार करत होता. तेवढ्यात सदाशिवराव म्हणाले,''आज आमच्या ऑफिसमध्ये एक डेमॉन्स्ट्रेशन होतं.''

आलोकचा चेहरा एकदम पडला. आता बाबांचं डेमॉन्स्ट्रेशन सुरू झालं म्हणजे जेवण आटोपेपर्यंत आपल्याला बोलायचा चान्स मिळणं कठीण आहे, हे त्याला समजून चुकलं. पण सुमतीबाईंच्या लक्षात आलोकची मनस्थिती आली. त्या आलोकच्या मदतीला आल्या.

''अहो, आधी आलोकला तुम्हाला काही सांगायचंय.'' ''बरं, आधी आलोकचं ऐकूया; बोल रे.''

''बाबा पुढच्या महिन्यात माझ्या वाढदिवसाला तुम्ही मला व्हीडिओ गेम घेणार आहात ना ?''

''हो, तसं ठरलं तर आहेच..''

''शिवाय मी २० वर्षांचा झालो की माझ्यासाठी हीरो होंडा घेणार, असं तुम्ही म्हणाला होतात ना ?''

''हो, तसं म्हटलंय खरं..''

''पण बाबा, मला हे काहीच नको.. शिवाय मधल्या वाढदिवसांना सुद्धा मला काही नकोय.''



''मग या सगळ्याच्या बदल्यात तुला काय हवंय ?'' सदाशिवराव आलोककडे पाहात मिष्किलपणे म्हणाले.

''अं, बाबा, या सगळ्याऐवजी मला एक कॉम्प्यूटर हवाय. अहो, तो फारच भन्नाट आहे. त्यावर खूप काही करता येतं.'' आलोक किंचित ओशाळत पुढे म्हणाला, ''पण अर्थात इन ॲडव्हान्स हवाय बाबा.'' सदाशिवराव काही क्षण आलोककडे बघत राहिले. मग एकदम हसत ते म्हणाले,''ओके आलोक, ॲग्रिड..अरे पुढच्याच आठवड्यात आपण कॉम्प्यूटर घेतो आहोत.''

आलोकचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. लगेच पुढच्या आठवड्यात म्हणजे फारच होतंय. त्याला खूप आनंद झाला. सुमतीबाईंनीही आश्चर्यानं सदाशिवरावांकडे बघितलं.

‘‘पण बाबा, माझा वाढदिवस पुढच्याच महिन्यात आहे..’’

‘‘अरे, तो वाढदिवस पण आपण इन ॲडव्हान्स साजरा करूया की.’’ सदाशिवराव गंमतीने म्हणाले.

‘‘अग, मघाशी मी तेच तर सांगत होतो. आज आमच्या ऑफिसमध्ये इंटरनेट आणि ई-कॉमर्स या विषयांवर डेमॉन्स्ट्रेशन होतं. युनिव्हर्सल कॉम्प्यूटर्सचे मार्केटिंग ऑफिसर आणि संगणकतज्ज्ञ आले होते. खरंच आलोक म्हणतोय तसंच अफाट विश्व आहे या इंटरनेटचं. माहितीचा प्रचंड साठा जगभरातून मिळवता येतो. त्या कंपनीच्या काही इझी इन्स्टॉलमेंट स्कीम्स आहेत. त्यातल्या एका स्कीममध्ये मी लगेच नाव नोंदवून टाकलं. पुढच्या सोमवारी कंपनीची माणसं कॉम्प्यूटर इन्स्टॉल करायला येणार आहेत.’’

खरं तर महिन्याच्या खर्चात आता या काँप्यूटरच्या खर्चाची भर पडणार होती. इंटरनेट घेतल्यानंतर महिन्याच्या टेलिफोनच्या खर्चात वाढ होणार होती. पण तरीही संगणकाचं महत्त्व सदाशिवरावांना पटलं होतं. ती आता काळाची गरज बनली होती. पुढचे काही दिवस आलोक हवेतच तरंगत होता. घरात काँप्यूटर, इंटरनेट याशिवाय दुसरा विषय नव्हता. वेबसाईट्स, आय.एस.पी., सॉफ्ट वेअर, हार्ड वेअर, मायक्रोसॉफ्ट अशांसारखे नवीन शब्द कळायला लागले होते. रोज घरी येताना सदाशिवराव या विषयांवरची मासिके, पुस्तिका आणायला लागले. आलोक जात्याच हुशार मुलगा होता. त्याची ग्रहणशक्ती अतिशय चांगली होती. आणि काँप्यूटर हा तर त्याच्या आवडीचा विषय होता. या विषयातला त्याचा आवाका पाहून त्याचे सिनियर मित्रदेखील त्याच्यावर खूश होते. पुष्कळदा आलोकच्या प्रश्नांमधून त्यांनाही काहीतरी नवीन शिकायला मिळे.

शेवटी एकदाची युनिव्हर्सल कॉम्प्यूटर्सची माणसे येऊन त्यांनी कॉम्प्यूटर इन्स्टॉल केला. इंटरनेटची जोडणी दोन दिवसांत होणार होती. सुरुवातीचे काही दिवस युनिव्हर्सल कॉम्प्यूटर्सकडून संगणक आणि इंटरनेटचा वापर शिकवायला त्यांचे इन्स्ट्रक्टर येणार होते. त्यांच्याकडून आलोकने जास्तीत जास्त माहिती मिळविली.

काही दिवसांतच आलोक संगणक आणि इंटरनेट या विषयातला तज्ज्ञ बनला. आलोकची काँप्यूटरमधील प्रगती पाहून आणि त्याचा शिकण्याचा झपाटा पाहून सदाशिवराव देखील थक्क झाले. त्यांनी नेहमीच आलोकला प्रोत्साहन दिले होते.

शालेय शिक्षण समाधानकारकपणे संपवून तो आता कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होता. त्याच्या अभ्यासाचा विषय अर्थातच संगणकशास्त्र हाच होता. कॉम्प्यूटरचा विषय घरात पहिल्यांदा निघाला होता, तो दिवस आलोकला नेहमी आठवे. त्या गोष्टीला आता पाच वर्षे झाली होती. पण अजूनही त्याला डॉ. दासगुप्तांचे ते भाषण आणि त्या दिवशी वाचलेली पृथ्वीप्रदक्षिणेची गोष्ट स्पष्ट आठवे. आज आलोकने देखील आपल्या हुशारीने आणि चिकाटीच्या प्रयत्नांनी पृथ्वीवरच्या देश-विदेशांमधील वेबसाईट्सवर



मनमुराद भटकता करून, तिथल्या माहितीचा आणि ज्ञानाचा साठा मिळवला होता.

आलोकने ‘इंटरनॅशनल किड्स चॅट’ नावाचा एक संगणक प्रोग्रॅम तयार केला होता. साधारणपणे इंटरनेटवरचा चॅट हा प्रकार एक वादाचा विषय बनला होता. या प्रकारात असभ्य, शिवराळ आणि चावट भाषेचा वापर जास्त प्रमाणात होत असल्याने चॅट करणे म्हणजे वाया गेल्याचे लक्षण मानले जात असे. या गोष्टीमध्ये थोडेफार तथ्य असलं तरीही आलोकला ते तितकंसं मान्य नव्हतं. त्याच्या मते चॅट हे करमणुकीबरोबरच विचारांची आणि कल्पनांची देवाणघेवाण करण्याचं एक अत्यंत प्रभावी माध्यम होतं. जगाच्या या टोकाला संगणकावर बसलेल्या अनोळखी व्यक्तीशी प्रत्यक्ष सवालजबाब करण्याची, त्याच्याशी मैत्री करण्याची कल्पनाच आलोकच्या मते भन्नाट होती. या प्रकाराचा योग्य वापर व्हायला हवा होता आणि याचसाठी त्याने आपली वैशिष्ट्यपूर्ण चॅट कार्यप्रणाली विकसित केली होती. त्याने तयार केलेल्या ‘इंटरनॅशनल किड्स चॅट’ या प्रोग्रॅममधून चॅट करताना एखाद्यानं किंचितही असभ्य, शिवराळ शब्दाचा वापर करायचा प्रयत्न केला तरी तो शब्द दृश्यरूप होत नसे. इतकंच नव्हे तर असा वापर करणाऱ्या संगणकाची

त्या चॅटरूमशी असलेला संपर्क क्षणार्धात तुटत असे. यामुळे या चॅट साईटवर शुद्ध आणि सभ्य भाषेतील संभाषणालाच मुभा असे. या चॅट प्रोग्रॅममध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, इतिहास, राजकारण, समाजकारण, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, पर्यावरण, अशांसारख्या अनेक चॅटरूम्स् तयार केलेल्या होत्या. आपापल्या आवडत्या आणि अभ्यासाच्या विषयाच्या चॅटरूममध्ये जाऊन संभाषण करता येत असे. आलोकच्या या चॅट प्रोग्रॅमला विद्यार्थीवर्गाकडून मोठा प्रतिसाद मिळाला.

एक दिवस आलोक विज्ञान चॅटरूममधील सुरू असलेली संभाषणं बघत बसला असताना एका संदेशानं त्याचं लक्ष वेधलं गेलं.

'हॅलो, टेरियन प्लॅनेट..हॅलो, टेरियन प्लॅनेट..'

चॅट करताना बऱ्याचदा मग अशा कल्पनावीरांच्या काल्पनिक पण खूप मजेशीर गप्पा बघायला मिळत. टेरियन ग्रहावरून बोलणारासुद्धा असाच कोणी गंमत करीत असावा असा आलोकचा सुरुवातीला समज झाला. पण थोड्या वेळानं हा प्रकार वेगळा असल्याचे त्याला जाणवले. तो एकच संदेश वारंवार येत राहिला. या संदेशाचा काहीच अर्थ निघत नसल्यामुळे इतर चॅटर्सनी या संदेशाकडे दुर्लक्ष केले. बहुतेक सगळ्यांनी या आगंतुकाला टाळणे पसंत केले. तो संदेश मात्र पुन:पुन्हा येतच राहिला. आलोकला त्या पुन:पुन्हा येणाऱ्या संदेशाबद्दल कुतूहल निर्माण झालं होते. त्याने त्या संदेशकर्त्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू केला.

' हॅलो टेरियनवासी, मी आलोक. तुझं नाव काय आहे?'

यावर काही वेळानं आलोकनं पाठवलेला संदेशच पुन्हा संगणकावर उमटला. हा संदेश अर्थातच त्या व्यक्तीकडून आला होता. आलोक बुचकळ्यात पडला. त्याने काही वेळ विचार करून एक दुसरा संदेश पाठवला.

'ही टेरियन सृष्टी कोठे आहे ? जरा सविस्तर संदेश देऊ शकशील काय ?' या वेळेस देखील हाच संदेश आधीच्या संदेशासह त्या टेरियनवासीकडून परत आला. आलोक विचारात पडला. त्या व्यक्तीकडून आधीचे सारे संदेश आणि आलोकने पाठविलेल्या नव्या संदेशाची नक्कल परत येत होती. ती व्यक्ती बहुतेक काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करीत होती. त्यानंतर आलोकने लहान लहान शब्द पाठवायला सुरुवात केली. प्रत्येक वेळी त्याचे शब्द पुन्हा परत पाठविले जाऊ लागले. मात्र, या वेळेस आधीच्या संदेशाची पुनरुक्ती झाली नव्हती. एकाएकी आलोकच्या मनात एक विचार चमकून गेला. ती व्यक्ती आलोकची भाषा शिकायचा प्रयत्न तर करीत नव्हती ? आता आलोकने इंग्रजी मुळाक्षरं पाठवायला सुरुवात केली. आलोकचा कयास खरा ठरला. परत येणाऱ्या संदेशांवरून ती व्यक्ती खरोखरीच शिकायचा प्रयत्न करत होती, असं वाटत होतं. रोज काही वेळ त्या टेरियनवासीयाशी संपर्क साधून आलोकची शिकवणी सुरू झाली. ती व्यक्ती कुठल्याही वेळी नेटवर हजर असायची. अर्थात आलोकने शिकवलेल्या शब्दांचा, वाक्यांचा नक्की काय अर्थ ती व्यक्ती समजतेय हे कळायला मार्ग नव्हता. परंतु ही केवळ गंमत नाही या गोष्टीची आता आलोकला पूर्ण कल्पना आली होती.

आणि एके दिवशी संदेश आला, 'शिकवणीबद्दल आभारी आहे'. आलोकला आनंदाचा आणि आश्चर्याचा धक्का बसला. म्हणजे ती व्यक्ती आलोकच्या संभाषणाचा अर्थ समजत होती. हळूहळू आलोक आणि टेरियनवासी व्यक्तीमधील संभाषण जास्त स्पष्ट, सविस्तर आणि सुसंगत होऊ लागले. आलोकने त्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं मिळवायला सुरुवात केली आणि हे संदेश खरोखरीच एका दूरच्या ग्रहावरून येत होते हे त्याला समजलं. पृथ्वीपासून कोट्यवधी प्रकाशवर्षं दूरवर ही टेरियन सृष्टी अस्तित्वात होती. तेथील सजीवांनी पृथ्वीवरील मानवांशी संपर्क साधून इथली भाषा शिकण्यापर्यंत मजल मारली होती. यावरूनच त्यांच्या वैज्ञानिक प्रगतीविषयी कल्पना करता येऊ शकत होती. आलोकने त्या संभाषणकर्त्याला 'अल्फा टेरियन' असं नाव बहाल केलं होतं. ते आवडल्याचं त्यानं आलोकला लगेच कळवून टाकलं.

''अल्फा टेरियन, तू माझ्याकडून निरनिराळे शब्द लिहायला शिकलास, आमची भाषा शिकलास, पण मी शिकविलेल्या शब्दांचा आणि वाक्यांचा नक्की अर्थ तुला कसा काय कळू शकला ?'' आलोकला सुरुवातीपासून पडलेला

प्रश्न त्याने विचारला.

''हे बघ आलोक, तुमची भाषा किंवा शब्द हे तुमच्या भावना आणि विचार व्यक्त करण्याचं माध्यम आहे. पण आमची शाब्दिक अशी भाषा नाही. अतिसूक्ष्म अशा मूलकणांचं प्रक्षेपण आणि ग्रहण करून आम्ही विचारांची देवाण-घेवाण करतो. हे



वजनरहित मूलकण प्रकाशकिरणांपेक्षा कित्येक पट वेगानं प्रवास करू शकतात. हे मूलकण आम्ही सतत निर्माण करीत असतो. याशिवाय आमच्या तारकामंडलातील तेजस्वी ताऱ्यांकडून निर्माण होणारे म्यूऑन न्यूट्रीनो जातीचे सूक्ष्म मूलकण साठविण्यासाठी आम्ही प्रचंड प्रमाणात रिझर्व्हॉयर्स तयार केली आहेत. अवकाशात ठिकठिकाणी आमची न्यूक्लियर रिॲक्टर स्टेशन्स आहेत. या रिॲक्टर्समध्ये त्या मूलकणांवर आण्विक प्रक्रिया करून त्यांचं रूपांतर आम्ही फोटोसेन्सिटीव्ह कणांमध्ये करतो. या कणांचं सर्वदूर प्रक्षेपण करून, या फोटोसेन्सिटीव्ह कणांच्या माध्यमाद्वारे विश्वातील सजीव सृष्टींमधील सजीवांच्या मेंदूचा आलेख आम्ही मिळवू शकतो. या आलेखावरून, त्या सजीवांच्या भावना आणि विचार आम्हांला समजतात. ही एक सतत व अत्यंत जलद घडणारी प्रक्रिया असते. या विश्वातील अशा अनेक सजीव सृष्टींशी आम्ही संपर्क प्रस्थापित केला आहे. तुमचे मनोव्यापार, आम्हांला समजले तरी त्यावरची आमची प्रतिक्रिया व आमचे विचार तुम्हांला कळविण्यासाठी तुमची भाषा आम्हाला शिकावी लागली.''

''पण, अल्फा टेरियन, तुला आमची भाषा माहीत नव्हती तर सुरुवातीला तू पहिला संदेश कसा पाठविलास ?'' आलोकने त्याला पडलेला दुसरा प्रश्न विचारला.

''मी बराच काळपर्यंत, तुमच्या अनेक वेबसाईट्समधील संभाषणाचे निरीक्षण करीत होतो. त्यात हॅलो हा शब्द वारंवार वापरलेला मी पाहिला. त्या शब्दामागची भावना मला आधीच समजली होती. बाकी टेरियन हा शब्द मात्र मीच तयार केला, उगाचच काहीतरी मुळाक्षरांची जुळवाजुळव करून. आणि प्लॅनेट हा शब्द सुद्धा हॅलोप्रमाणे शोधून काढला. पण एवढे तीन शब्द तयार करायला आम्हांला बराच काळ लागला. तुझ्या मदतीशिवाय तुमची भाषा शिकणं फार अवघड आणि वेळखाऊ ठरलं असतं.''

''पण तुमच्याकडे भाषाच नाही तर तुम्ही संगणक कसे वापरता ? त्याचा की बोर्ड, मॉनिटर कसा असतो ?''

''हो ते सांगायचे राहिले. अरे तुम्ही की बोर्ड वापरून तुमच्या भाषेतील प्रश्नाचं संगणक भाषेत म्हणजेच बायनरी भाषेत रूपांतर करता. नंतर त्यावर योग्य क्रियाप्रक्रिया झाल्यानंतर बायनरी भाषेत तयार झालेल्या उत्तराचं पुन्हा तुमच्या शाब्दिक भाषेत रूपांतर होऊन तुम्ही ते उत्तर संगणकाच्या पडद्यावर पाहू, वाचू शकता. आम्ही अक्षरश: हजारोपट जास्त वेगानं काम करू शकतो.

''पण मग तुम्ही आमची भाषा शिकायचा एवढा आटापिटा का करतो? या सगळ्या प्रकारात माझे किती नेटतास वाया गेले माहीत आहे? आता माझा इंटरनेट अकाऊंट पण संपत आलाय. यापुढे आपल्याला नेटवर भेटता येणार नाही,'' आलोकने किंचित चिडूनच संदेश पाठवला.

''अरे आलोक, तू रागावलास. माफ कर. तुला चिडवण्याचा माझा उद्देश नव्हता, तुमच्यासारखी इंटरनेट तासांची फिकीर आम्हाला करावी लागत नाही. पण तू काळजी करू नकोस. मी आमच्या रिॲक्टर स्टेशनमध्ये तुझ्या नावानं एक खास माध्यम तयार करतोय. इथे तुला वेळाची आणि जागेची मर्यादा राहणार नाही. हे माध्यम कार्यान्वित होण्यासाठी लागणाऱ्या विशिष्ट 'मूलकण संयुगाचं' तुमच्या भाषेत रूपांतर करून तयार होणारा पासवर्ड मी तुला देतोय, तो लिहून घे. या माध्यमातून तुला पृथ्वीवरच्याच काय पण सगळ्या विश्वातील अस्तित्वात असलेल्या प्रगत सजीव सृष्टींची सफर करता येईल. यासाठी तुला तुमच्या टेलिफोन कनेक्शनची किंवा कुठल्याही इंटरनेट अकाऊंटची गरज लागणार नाही.''

आलोकने तो लांबलचक पासवर्ड लिहून घेतला. त्याचा चेहरा आनंदाने

फुलला होता.

आज अचानक एक फार मोठी आणि अनोखी भेट त्याला मिळाली होती. अखिल विश्वाची दारं त्याच्यासाठी खुली झाली होती. त्याने

अत्यानंदाने मॉनिटरकडे बघितले. अल्फा टेरियनकडून पुढचा संदेश येत होता.

''तुला आनंद झाल्यामुळे आम्हाला समाधान वाटतं आहे.

तुमची भाषा शिकण्याची आमची एवढी

धडपड का असं तू विचारलंस. याचं

उत्तर जरा सविस्तरपणे द्यावं लागेल.

''आमची सृष्टी ही विश्वातील सर्वात प्राचीन संस्कृती असावी. आम्ही वैज्ञानिक प्रगतीची सारी शिखरं गाठली, तेव्हा तुमच्या पृथ्वीची निर्मितीही झाली नव्हती. या विश्वातील अनेक घडामोडींचे आम्ही साक्षीदार आहोत. तुम्ही अवकाशातील ज्या सजीव सृष्टीच्या शोधासाठी मोठमोठ्या योजना आखता, अशा अनेक प्रगत सजीव सृष्टी आमच्या संपर्कात आहेत. नवनवीन सजीव सृष्टींशी संपर्क प्रस्थापित करून, त्यांच्याशी वैचारिक समन्वय साधणं हे आमचं मुख्य उद्दिष्ट आहे. अशा अनेक सजीव संस्कृतींबद्दल विश्वासाचं वातावरण तयार करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असतो. विश्वबंधुत्वाचा संदेश या विश्वास देण्यासाठी आमची धडपड अव्याहतपणे सुरू असते.

''पृथ्वीसंबंधी आमचा अनुभव मोठा विचित्र आहे. इथली संस्कृती मोठी वैविध्यपूर्ण आहे. इथे एकीकडे विश्वबंधुत्वाचे विचार पाहायला मिळतात. पण तुमची विश्वाची कल्पना पृथ्वीपुरती मर्यादित असूनदेखील हे विचार प्रत्यक्षात येऊ शकत नाहीत कारण दुसरीकडे आपसातील द्वेष, मत्सर, वाद, स्वार्थ, ईर्ष्या, सत्तास्पर्धा यापोटी तुम्हा मानवांमध्ये परपस्परांत पराकोटीचं शत्रुत्व तुम्ही निर्माण करता आहात. आम्ही गोळा केलेल्या माहितीनुसार देशांतर्गत कलहामुळे तुमची संस्कृती आज विनाशाच्या उंबरठ्यावर उभी आहे. लवकरच इथे अणुयुद्धाला सुरुवात होईल असं आमच्या तज्ज्ञांचं मत आहे.

''ही गोष्ट आम्ही संबंधित मानवांच्या निदर्शनास आणून देणार आहोत. एका प्रगत संस्कृतीचा सर्वनाश होताना आम्ही पाहू शकत नाही. हे करण्यासाठी तुमची भाषा शिकणे गरजेचे होते.

''आलोक, या कामामध्ये आम्हाला तुझी खूप मदत झाली. आता आम्ही त्यांच्याशी थेट संपर्क करू. गुड बाय आलोक आणि मदतीबद्दल तुझे आभार.''

अल्फा टेरियनशी झालेल्या संभाषणानंतर आलोक गोंधळून गेला होता. अल्फा टेरियनच्या सांगण्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून पृथ्वीवरील संघर्ष संपावा, असं त्याला मनापासून वाटत होतं. यामध्ये आपला थोडाफार सहभाग असल्याचा त्याला अभिमान वाटत होता. शिवाय परसृष्टीतील एका सजीवाशी मैत्री झाल्यानं तो खूप आनंदात होता.

आलोकचा आनंद फार काळ टिकला नाही. दुसऱ्या दिवशी आणि

त्यानंतर सतत काही दिवस एका बातमीनं जगभर खळबळ उडवून दिली होती.

'परसृष्टीच्या अस्तित्वाचा पुरावा

मिळाला !', 'परग्रहवासीयांचे आक्रमण!', 'पृथ्वीवरील जीवन लवकरच नष्ट होणार !' 'संगणक क्षेत्रात प्रलय !' 'परसृष्टीकडून संगणक व्हायरसचा हल्ला ?' 'नवा 'विश्वबंधुत्व' व्हायरस संगणक संस्कृतीचा कर्दनकाळ ठरणार !', 'महासत्तांच्या संरक्षण यंत्रणा कोलमडल्या'.. अशांसारख्या मथळ्यांखाली वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरून बातम्या येऊ लागल्या. दूरचित्रवाणीवर तर चर्चासत्रांचे पेव फुटले होते. जगभराच्या वैज्ञानिक वर्तुळात उलटसुलट चर्चांना आणि निष्कर्षांना उत आला होता. खगोलशास्त्रज्ञांना ही एक मोठी पर्वणी होती. खास आवृत्या वर्तमानपत्रांनी सुरू केल्या होत्या; जगातील सरकारी यंत्रणांमध्ये उच्च पातळीवर बैठका सुरू झाल्या. कधी नव्हे ते सगळ्या देशांनी आपसांतील मतभेद, शत्रुत्व विसरून या संकटाला सामोरं जाण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न सुरू

केले. यासंबंधीचे वृत्तांत प्रसिद्ध होत होते. 'विश्वबंधुत्व' व्हायरसवर पर्याय शोधण्यासाठी लहान मोठ्या सॉफ्टवेअर कंपन्या तेजीत आल्या होत्या. शोधपत्रकारितेला तर मोठा जोर आला होता. आत्यंतिक गोपनीय स्वरूपाच्या बातम्या सहजपणे प्रसिद्ध होत होत्या. सरकारी सूत्रांकडून अधिकृत पत्रकं काढून लोकांना शांतता राखण्याचं आवाहन सातत्यानं केले जात होते. तर आतल्या गोटातील खास बातम्या देणारी अनधिकृत बातमीपत्रं आणि लेखमाला गोंधळात भर टाकत होत्या.

हे सगळे पाहून आलोकला फार वाईट वाटत होते. पृथ्वीच्या कल्याणासाठी टेरियनवासियांचे प्रयत्न सुरू असताना सगळ्या माध्यमांनी त्यांना शत्रू ठरवल्यानं त्याला आश्चर्य वाटलं. टेरियनवासीयांचा 'विश्वबंधुत्व' संदेश जगभराच्या संगणकामध्ये पाठवण्यात आला असला तरी तो व्हायरस नव्हता. आलोकनं तो संदेश पाहिला होता. अल्फा टेरियनने त्याला सांगितल्याप्रमाणे त्यांनी पृथ्वीवासीयांना सावध करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला होता. या संदेशामध्ये टेरियन ग्रह व इतर सजीव संस्कृतींबद्दल माहिती दिली होती. या संदेशामुळे संगणकाचं फारसं नुकसान होण्यासारखं नव्हतं. आलोकने अल्फा टेरियनशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण त्याला त्यात यश आलं नाही. अल्फा टेरियनने दिलेला पासवर्ड कार्यान्वित होत नव्हता.त्यामुळे पुढं काय होणार

याची आलोकला काळजी वाटत होती.

शेवटी एक दिवस या सगळ्या प्रकरणावर पडदा पडला. आंतरराष्ट्रीय गुप्तचर संघटनेच्या एका खास नियुक्त पथकानं आपला तपास पूर्ण करून त्याचा अहवाल संयुक्त राष्ट्रसंघाच्या परवानगीने प्रसिद्ध केला. अहवालाचा वृत्तांत वाचून आलोकला मोठा धक्का बसला. परसृष्टीचं सारंच प्रकरण ही एक मोठी थट्टा ठरली होती. एका कुशाग्र संगणकतज्ज्ञ नायजेरियन युवकानं केवळ गंमत म्हणून हा सगळा प्रकार केला असल्याचं तपासात निदर्शनास आलं. या तरुणानंच परग्रहावरचा सजीव बनून 'विश्वबंधुत्व' व्हायरस जगभरातील संगणकांमध्ये पसरवून खळबळ माजवली होती. हा व्हायरस घालविण्यासाठी एक लहानसा संगणक प्रोग्रॅम तयार करण्यात आला होता. हा ॲण्टी व्हायरस इंटरनेटवर मोफत उपलब्ध करण्यात आला होता. त्या नायजेरियन युवकाला अटक झाली होती. त्यानं आपला गुन्हा कबूल केला होता. जगाचं लक्ष वेधण्यासाठी आपण असं केलं, असं त्याचं म्हणणं होतं. त्याच्या मानसिक चाचण्या घेण्यात येत असून, असा प्रकार पुन्हा न घडण्याच्या दृष्टीनं खबरदारीच्या उपाययोजना करण्यात येत असल्याचं त्या अहवालात शेवटी म्हटलं होतं.

आलोकला अतिशय वाईट वाटलं. तो या थट्टेचा पहिला बळी ठरला होता.

खिन्न मन:स्थितीत संगणकापुढे बसला असताना सहज त्याची बोटं की बोर्डवर फिरू लागली, त्यानं माऊसनं इंटरनेट लॉग इन बॉक्स उघडला. त्या बॉक्समध्ये आपलं नाव आणि अल्फा टेरियनने दिलेला

बोगस पासवर्ड टाईप करून तो उदासपणे संगणकाच्या पडद्याकडे पाहू लागला.

आता आश्चर्य करण्याची पाळी आलोकवर दुसऱ्यांदा येत होती.

टेलिफोन नंबर न वापरता आलोक इंटरनेटच्या टेरियन नावाच्या साईटशी जोडला गेला होता. तो डोळे विस्फारून संगणकाच्या पडद्याकडे पाहू लागला.

''हॅलो आलोक, पृथ्वीचा नाद सोडून आम्ही कायमचे जात आहोत. इथले लोक लबाड, संधिसाधू आणि खोटारडे असल्याचं आमच्या लक्षात आलं आहे. तुमच्या इथल्या वैज्ञानिक

शिष्टमंडळाशी आणि राजकारण्यांशी चर्चा करण्यात आम्ही गुंतलो होतो; त्यामुळे तुझ्याशी संपर्क ठेवता आला नाही.

''मानवप्राणी हा मुळात एक अत्यंत बुद्धिमान सजीव असल्याचं आमचं मत बनलं आहे. वैज्ञानिक क्षेत्रात तुम्ही केलेली प्रगतीदेखील

मोठी कौतुकास्पद आहे. केवळ या दोन कारणांमुळे आम्ही काही कठोर कृती केली नाही. आमच्या अस्तित्वाबद्दल त्यांची पुरती खात्री पटली आहे. त्यांनी प्रसिद्ध केलेला अहवाल धादांत खोटा आहे. हे करण्यात तुमच्या राजकारणी लोकांचा हात आहे. आपली सरकारं टिकवण्यासाठी त्यांनी व्हायरसची कथा रचली. काही अपवाद सोडले तर बहुतेकांच्या मनात आमच्याबद्दल भीतीची भावना होती. परसृष्टीचे सजीव हे आपला नाश करण्यासाठीच आले आहेत, असा ठाम समज त्यांनी केला होता. आमचा नाश कसा करायचा याच्या योजना आखण्यातच त्यांची सारी बुद्धिमत्ता आणि क्षमता ते वापरत होते. आमच्या मनात पुरेसा उद्वेग निर्माण करण्यात ते यशस्वी झाले आहेत. तुमच्या हुशार संगणकतज्ज्ञांनी बनविलेल्या काही ॲण्टीव्हायरस प्रोग्रॅम्समुळे आमच्या मूलकणांच्या संयुगांमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण करण्यात तुमचे शास्त्रज्ञ यशस्वी झाले. हे आजपर्यंत इतर कोणा सजीवास शक्य झालं नव्हतं. अशा गोष्टींचा आम्हाला त्रास होतो आणि म्हणूनच कंटाळून परत जाण्याचं आम्ही ठरवलं आहे. परंतु परत जाण्यापूर्वी पृथ्वीवरील सर्व ठिकाणच्या अणुभट्ट्यांमध्ये तसंच अण्वस्त्रनिर्मिती प्रकल्पांमधील संगणकांमध्ये कायमस्वरूपी बिघाड आम्ही निर्माण केला आहे. यामुळे येत्या काही वर्षांमध्ये तरी इथे अण्वस्त्रनिर्मिती होऊ शकणार



नाही. याआधी तयार झालेली अण्वस्त्रं कार्यान्वित करणाऱ्या यंत्रणादेखील आम्ही बंद पाडल्या आहेत. यामुळे मानवावर ओढवलेलं सर्वनाशाचं संकट काही काळापुरतं तरी टळलं आहे. परसृष्टीच्या अस्तित्वाची जाणीव झाल्यामुळे आता तरी मानवाची विचारसरणी बदलेल आणि तो सकारात्मक विश्वबंधुत्वाचा अंगीकार करील, अशी आम्हांला आशा वाटते. मात्र, तोपर्यंत आम्ही तुमच्याशी संपर्क ठेवू शकणार नाही.

''आलोक, जाताना आम्ही तुला आमची टेरियन वेबसाईट भेट म्हणून देत आहोत. तुला दिलेला पासवर्ड वापरून विनासायास इंटरनेटची सफर करता येईल. यासाठी तुला इतर काही माध्यमांची आवश्यकता नाही. मात्र, इतर सजीव सृष्टींशी या साईटचा संपर्क आम्ही तोडला आहे. त्यामुळे त्यांच्याशी तुला संपर्क करता येणार नाही. तुम्ही पृथ्वीवासी तुमच्या पृथ्वीपलिकडच्या सृष्टीचे अस्तित्व मानायला तयारही नाही आहात. तुमच्या मर्यादित विश्वात जरी तुम्ही विश्वबंधुत्वाची भावना जोपासलीत तरी त्याचा तुम्हाला नक्कीच उपयोग होईल. गुड बाय आलोक.''


अल्फा टेरियनचा शेवटचा संदेश वाचल्यानंतर आलोक बराच वेळ सुन्नपणे बसून होता. एकीकडे त्याला मिळालेल्या भेटीमुळे आलोकला खूप आनंद झाला होता. खरोखरच नुसती बुद्धिमत्ता आणि शक्ती असून चालत नाही. या गुणांना विवेकाची जोड नसली तर त्याची फार मोठी किंमत चुकवावी लागते, ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झाली होती.

***

**मुकुंद जोगळेकर**
२७, अनंत विजय अपार्टमेंट,
विरार (प.), ठाणे ३

# कविता शहाण्या प्राण्यांची

एकदा म्हणे, मुंबईला
राणीच्या बागेत
खूप तिकिटे विकली
आणि आतले प्राणी
आल्या गेल्या माणसांना
वाचायचे शिकली
*******




माकडाच्या
पिंजऱ्यासमोर
चिल्लर पोरे-बाळे
‘हुप्प्या हुप्प्या’
हाका मारून
करत होती
चाळे
मोठी मोठी माणसेही
नाक खाजवत खाजवत
माकडोबाला डिवचत होती
फुसकी शीळ वाजवत
माकडालासुद्धा त्यांचा
राग नाही आला
सुधारलेल्या वंशजाची
गंमत वाटली त्याला
त्याच्या मनात मात्र
पक्की खात्री झाली
‘शेपटी जाऊनसुद्धा य
अक्कल नाही आली’
माकडाला वाटले,
बाकी बरे झाले यार..
‘आपण नाही झालो
असला
उगाच भुईला भार’
**************



वाघोबाच्या पिंजऱ्यापाशी
घाबरत घाबरत, काही
माणसांच्या अस्मितेची
उडत होती बाही
वाघोबाने एका क्षणात
वाचून टाकला पाढा

आणि वदला, ‘हा कोण
आलाय भित्रा वेडा.....
याच्या अस्तित्वाची जरा
कीव करा बरे
आलतुफालतुसाठी नाही
गुरगुरणेही खरे !’
**************



पुढ्यातले लोक पाहून
हत्तीदादा झुलले
दोन दात पुढे काढून
सर्वांदेखत बोलले
‘देवासारखे मस्तक
आहे
म्हणून करतात बाऊ
शहाणे आहेत, खरे मोदक
घालत नाहीत खाऊ’
तरी पण हत्तीदादा
आपली सोंड उंचावून
खोटारड्या माणसांना
न्याहाळत होते दुरून
***************


पिंजऱ्यामधले केसाळलेले
अस्वल पाहण्यासाठी
काही बघे करत होते
उगाच दाटीवाटी
अस्वलाच्या मनात लगेच
विचार आले नवे
‘यांच्या नाकात वेसण घालून
नाचवायलाच हवे....
आमचे काय, रोज पाय
नाचत असतात छान
यांच्या दोन पायांत नाही
उभे राहायचे त्राण
आम्ही मुके मुके प्राणी
बघतो वेडेपिसे
कंबर मोडल्यासारखे
यांचे नाचणे हवे तसे’




अस्वलाची विचारशक्ती
विरली, उरलीसुरली
नाचणाऱ्या माणसासमोर
त्याने बैठक मारली
*****************



जिराफाची उंच मान
आपल्यासारखीच असेल
काहींना वाटले, शान
जपल्यासारखीच दिसेल
तसे काहीच नाही घडले
जिराफदादाच बडबडले.....
'मान गुपचुप खाली करा
बोलू नकाच उरलेसुरले
मला सगळे ज्ञात आहे
बोलत नाही जादा-कमी
मान खाली घालणार नाही
एवढीच तुम्ही द्यायची हमी'
आपण कशी हमी देणार
प्रत्येकालाच वाटले
मग लोकमाणसे जिराफाच्या
पिंजऱ्यापासून फुटले
**************



एकशिंगी गेंड्याच्या
नजरेला नजर देत
काही लोक बघत होते
मोठे धूड मस्त मजेत
गेंड्याला माहीत होते
माणसातले शक्तीसुख
खाण्यापिण्यात जन्म गेला
तरी नाही भागली भूक
ताकदीचा नुसता आव
गेंड्याला नकोच होता
शक्तिवर्धक चूर्णाची
त्याला ठाऊक होती कथा
त्याने सरळ त्याचे शिंग
जाळीबाहेर काढले
पळता पळता लोक, पायात
पाय घालून पडले
********************




मोर तर ओळखत होते
लहान-सहान थोरांना
बगळेशाही पेहरावाच्या
निगरगट्ट चोरांना
त्यांनी सरळ पिसाऱ्याचे
बंद केले फुलणे
शरमेने सोडून दिले
रंगबिरंगी झुलणे
बाकी पक्षी मोरापुढे
होऊन हवालदिल
मुक्यामुक्याच करू लागले
हळूच किलबिल
त्यांनासुद्धा ठाऊक असेल
माणसातले काही
बिचाऱ्यांची चोच मात्र
बोलू शकली नाही
********************

थकली भागली माणसे अखेर
बागेबाहेर पडली.....
'पैसे फुकट गेले' याची
चिंता त्यांना जडली
पिंजऱ्यातल्या पशूंनीही
दिली नाही किंमत
त्यांना डिवचण्याची
नव्हती
माणसामधे हिंमत
पिंजऱ्यातल्यांची तेवढी, थोडी
करमणूकच झाली
समोरासमोर त्यांना
माणसे वाचता आली
माणसांच्या अंगावरले
रंग मात्र उडले.....
फूल जावे कोमेजून
तस्से चेहरे पडले !



***

**कल्याण इनामदार**
सी-२७ अर्चना सो.,
३९/२/२ एरंडवन, पुणे ३८



# वाढदिवसाची भेट

• मृणालिनी चितळे

अंबुजनं मागं वळून पाहिलं. निम्मा अधिक पहाड त्यानं पार केला होता. आजचा दिवस फार छान होता. नितळ कोवळं ऊन सगळीकडं एकसारखं पसरलं होतं, बोचणारं वारं नव्हतं. आकाश अगदी निरभ्र होतं. त्याचा हुरूप वाढला. त्याच्यापुढं धावणारी चाँदनी - त्याची आवडती कुत्री - दगडावर पाय टेकवून त्याच्यासाठी थांबून राहिली होती.

''क्यूं बे थक गया ना ?'' तो थांबलेला पाहून बाबाजाननं विचारलं; आणि तो मोठ्यांदा हसला. त्याच्या हसण्याचे प्रतिध्वनी समोरच्या पहाडावरून उमटले.

''छट् ! मी नाही दमलो. तूच दमला असशील.'' असं म्हणून अंबुज धावत सुटला. त्यानं आज निश्चय केला होता की काय वाट्टेल ते झालं तरी कौसल्या नदीच्या उगमापर्यंत जायचंच जायचं, त्यांच्या कौसलाना गावातून वाहणाऱ्या कौसल्या नदीचं उगमस्थान त्याला पाहायचं होतं आणि मुख्य म्हणजे त्या शेजारी असलेलं गरम पाण्याचं कुंड ! परमेशकाका त्याला सांगायचे की त्या कुंडाच्या आजूबाजूला पांढराशुभ्र बर्फ पसरलेला असतो आणि पाण्यातून मात्र गरमगरम वाफा बाहेर येतात. त्या पाण्यात एक जलदेवता राहते. डोळे मिटून त्या कुंडात नाणं टाकलं की ती म्हणे मनातली इच्छा पूर्ण करते.

गेले कित्येक दिवस तिथं जायचं म्हणून अंबुज बाबाजानच्या मागं लागला होता. तो दिवस आज उगवला होता. उत्साहानं तो धावत होता पण त्याच्या छातीचं इंजिन धडधडायला लागलं तसं तो एका दगडावर बसला. चाँदनीला खांद्यावर उचलून घेऊन बाबाजान पुढं चालला होता. तो बसलेला पाहून त्याला चिडवण्यासाठी त्यानं विचारलं, ''जाऊया या परत ? किती दमलास बघ !'' असं म्हणत तो परत एकदा मोठ्यांदा हसला.

अखेरीस ते उगमापाशी येऊन पोचले. पाण्याची धार काळ्या कपारीतून वाहात होती; आणि त्या पलीकडं ते वाफाळत्या पाण्याचं कुंड होतं. त्याचं किती तरी दिवसांचं स्वप्न पूर्ण होत होतं. त्यानं खिशात हात घालून खूप दिवस जपून ठेवलेलं नाणं बाहेर काढलं. वाढदिवसाला बाबाजाननं त्याला ते दिलं होतं. तो कुंडाजवळ जाऊन उभा राहिला. जलदेवतेकडं काय मागायचं हे त्यानं कधीचं ठरवून ठेवलं होतं. त्याला आई हवी होती. बाबाजानसारखीच त्याच्यावर खूप खूप प्रेम करणारी आई ! त्यानं हात जोडले आणि....

.... आणि अचानक अंधारून आलं. दाट धुकं शत्रुसैन्यासारखं चाल करून आलं, बाबाजान कुठं दिसेनासे झाले. चाँदनीही त्या धुक्यात हरवून



दव पिऊन नवेली, झाली गवताची पाती,
गाणी जुनीच नव्याने, आली पाखरांच्या ओठी.
शंभरावा अंक

गेली.''बाबाजान... चाँदनी...'' असं म्हणून अंबुज जिवाच्या आकांतानं ओरडला आणि धावत सुटला.

''अंबुज बेटा, जागा हो. स्वप्न पडलं का तुला ?'' कुणीतरी त्याला हलवत होतं. त्यानं कष्टानं डोळे उघडले. कर्नलसाहेब त्याला थोपटत होते.

खरं तर खूप मोठ्यांदा रडावंसं वाटत होतं. पण अलीकडं त्याला रडताच येत नसे. त्याचा बाबाजान देवाघरी गेला तेव्हासुद्धा तो रडला नव्हता. अमीनादीदी मात्र रडरड रडली होती. तिचे अब्बा युद्धात मारले गेले होते तेव्हा तर ती एवढी रडली होती की अंबुजला वाटलं होतं की तिचे डोळेच त्या पाण्यात वाहून जातील.

त्या वेळी त्याच्या बाबाजाननं तिला जवळ घेऊन तिची समजूत घातली होती. तो म्हणाला होता,''हे बघ अमीना, तुझा अब्बा दुष्मनांशी लढता लढता शहीद झाला. त्याला असं रडलेलं अजिबात आवडणार नाही. तुला माहितीय तुझा अब्बा आता आकाशातला तारा झाला आहे.'' असं म्हणून त्यानं अमीनाला आकाशातला चमचमणारा तारा दाखवला होता.

त्याचा बाबाजान गेला तेव्हा अंबुज कोरड्या डोळ्यानं आकाशात नव्यानं उगवलेला तारा शोधत होता आणि कर्नलसाहेब त्याचा हात घट्ट धरून त्याला थोपटत होते. साऱ्या गावकऱ्यांना एकत्र बोलवून बाबाजानचा पराक्रम ऐकवत होते. रात्रीच्या भयाण अंधारात पहाड चढून जायची अवघड वाट बाबाजाननं सैनिकांना दाखवली होती. केवळ त्याच्यामुळं शत्रूनं गिळंकृत केलेलं मोक्याचं ठाणं काही तासांच्या चढाईत परत मिळवणं शक्य झालं होतं. पण या धुमश्चक्रीत बाबाजानला गोळ्या लागल्या होत्या. त्याला वीरमरण आलं होतं.

हे ऐकताना गावातले लोक ढसाढसा रडत होते. अंबुज मात्र डोळ्यातून टिपूसही न काढता स्तब्ध उभा होता. त्याच्या मनात मात्र अनेक प्रश्न थैमान घालत होते. कुठून आले हे दुश्मन ? त्यांच्याच गावात का घुसले ? ज्या गावात आजपर्यंत ढगांचा गडगडाट आणि विजेचा कडकडाट एवढेच आवाज उठत होते तिथं अचानक कसे घुमायला लागले तोफांचे आवाज, विमानांची घरघर आणि कानठळ्या बसविणारे बाँबस्फोट ? पण त्यांची उत्तरं त्याला कोण देणार होतं आता ? त्याचा बाबाजान तर तारा होऊन बसला होता.

अंबुजला आतून आतून खूप उदास वाटायचं. मग चाँदनीला घेऊन तो कौसल्या नदीच्या काठी जाऊन बसायचा. अमीनादीदी त्याला शोधत यायची. तो आता त्यांच्याच घरी राहात होता. कर्नलसाहेब अंबुजला भेटायला यायचे. त्याचे आणि त्याच्या चाँदनीचे फोटो काढायचे. गप्पागोष्टी करून त्याला बोलायला लावायचे. गोबऱ्या गालाच्या, काळ्याभोर डोळ्याच्या पाच/सहा वर्षांच्या अंबुजच्या ते जणू प्रेमात पडले होते.

एव्हाना युद्ध सुरू होऊन दीड महिना उलटला होता. ताबारेषा ओलांडून आपल्या हद्दीत घुसलेल्या शत्रूला आपल्या सैनिकांनी पिटाळून लावलं होतं. पण युद्धाच्या धुमश्चक्रीत कौसलाना गावातली शांतता उद्ध्वस्त झाली होती. गावातले चार/सहा लोक मारले गेले होते. अनेक जण गाव सोडून गेले होते. अमीनाची आईही आता अमीनाच्या काकांकडं जम्मूला जाणार होती. कर्नलसाहेबही दिल्लीला त्यांच्या घरी परतणार होते. त्यापूर्वी एक दिवस त्यांनी अंबुजला विचारलं,'' तुला माझ्याबरोबर दिल्लीला यायला आवडेल ? तिथं तुला शाळेत घालू या.''

अमीनाची आई आतून त्यांच्या गप्पा ऐकत होती. तिनं पुढं होऊन विचारलं, ''दिल्लीला ?''

कर्नलसाहेबांनी त्यांच्या मनातली इच्छा तिला सांगितली. त्यांना मूलबाळ नव्हतं. पत्नीला विचारून अंबुजला दत्तक घ्यावं असं त्यांना वाटत होतं. हे सगळं अंबुजला समजावून सांगायची विनंती त्यांनी अमीनाच्या आईला केली.

कौसलाना सोडून दिल्लीला जायचं म्हणजे कुठं जायचं हे अंबुजला कळत नव्हतं. पण ज्या गावात त्याचे बाबाजान नव्हते, अमीनाही राहणार नव्हती तिथं राहण्यात त्यालाही रस उरला नव्हता. अमीनाच्या आईनं सांगितलं म्हणून कर्नलसाहेबांबरोबर दिल्लीला जायला तो तयार झाला.

दिल्ली शहर पाहून अंबुज भांबावून गेला. उंचच उंच इमारती. लांब-रुंद, रस्ते, त्यावरून धावणाऱ्या असंख्य गाड्या. कर्नलसाहेबांचा बंगला खूप

मोठा होता. सवितानं अंबुजची खोली छानपैकी सजवली होती. लिहिण्याचं टेबल. कपड्यांचं कपाट. भला मोठा पलंग. हवी तेवढी खेळणी. अंबुजच्या कौसलानातील संपूर्ण घरापेक्षा त्याची खोली मोठी होती. खायला प्यायला कशाचीच ददात नव्हती. कर्नलसाहेब आणि सविता त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करत होते. पण अंबुजची मिटलेली कळी काही खुलत नव्हती.

ध्यानी मनी स्वप्नी त्याला कौसलाना दिसत होतं. बंगल्याभोवतीच्या बगीच्यातले डेरेदार वृक्ष पाहिले की त्याला तिथले उंचच उंच वाढणारे सूचिपर्णी वृक्ष आठवायचे. त्याचा जीव रमविण्यासाठी सवितानं पक्ष्यांचं पुस्तक उघडलं की त्याला पक्ष्यांचं बोलणं समजणारे परमेशकाका आठवायचे. पक्ष्यांची चित्रं ओळखीची वाटायची पण त्याखालची इंग्रजी नावं परकी होऊन जायची.

शाळेतही असंच व्हायचं. शाळेची अगडबंब इमारत पाहिली की त्याला कौसलानातील पडकी शाळा आठवायची. कितीदा तरी वर्ग झाडाखाली भरायचे. शिक्षक छडीनं चोपून काढायचे. दिल्लीतील शाळेतले शिक्षक खूप वेगळे होते. त्याच्याशी तर खूप प्रेमानं वागायचे. त्याचे बाबाजान शत्रूशी लढता लढता शहीद झाले ही गोष्ट सगळ्या वर्गाला अभिमानानं सांगायचे. तरीही अंबुजला ते आपले नाही वाटायचे. शाळेचा गणवेश, वह्या, पुस्तकं यापुढं, त्याची छाती दडपून जायची.

तो एकटाच कुठंतरी जाऊन बसायचा आणि डोळे घट्ट मिटून घ्यायचा. त्याच्या डोळ्यासमोर कौसल्या नदी यायची. पावसाळ्यात कशी ती वेगानं वाहायची. पाण्याऐवजी फेसाळतं दूध त्यातून उडायचं. थंडी पडायला लागली की ती सुस्त व्हायला लागायची आणि हिवाळ्यात तर पांढरीशुभ्र दुलई पांघरून झोपून जायची. मग त्यालाही उदास वाटायला लागायचं. आत्ताच्या सारखं ! चाँदनीला घट्ट मिठी मारून तो शेकोटीजवळ जाऊन बसायचा. त्याला मग त्यानं कधीच न पाहिलेल्या आईची आठवण यायची. तिच्याविषयीचे असंख्य प्रश्न तो बाबाजानला विचारायचा. अमीनादीदीच्या आईला विचारायचा. एकदा तिनं त्याला सांगितलं होतं,''तुला आई हवी आहे ना, मग पहाडावरच्या जलदेवतेला जाऊन सांग. ती तुला आई देईल.''

मग पहाडावर जाण्यासाठी तो बाबाजानच्या मागं लागला होता. तिथं जाऊन तो जलदेवतेला आई द्यायला सांगणार आहे हे ऐकून बाबाजान डोळ्यांत पाणी येईपर्यंत हसला होता आणि त्याच्या डोक्यावर टप्पल मारून म्हणाला होता, ''पगला कहीका.''

कौसल्या नदी आठवली की अंबुजला हे सगळं आठवायचं. पण तिच्या उगमापर्यंत जाऊन जलदेवतेला भेटण्याचं त्याचं स्वप्न आता कधीच पूर्ण होणार नव्हतं. तरीही डोळे मिटले की पुन्हा पुन्हा त्याला तेच स्वप्न पडायचं आणि तो घाबरून उठायचा. ओरडायचा. कर्नलसाहेब आणि सविता त्याला जवळ घ्यायचे. थोपटत राहायचे. पण तो अजूनच संकोचून जायचा.

त्या दोघांना कळत होतं की वडिलांच्या मृत्यूच्या धक्क्यातून तो अजून सावरलेला नाही. एकदम नवख्या गावात यायला लागल्यामुळं त्याच्या चिमुकल्या जीवाची ओढाताण होत आहे. त्या दोघांना अजूनही 'आपलं' समजायला तो तयार नाही. त्याला खूप सांभाळून घ्यायला हवं. समजवायला हवं. पण कसं ते त्यांनाच कळत नव्हतं.

बघता बघता अंबुज दिल्लीला येऊन तीन महिने उलटून गेले. पुढच्याच आठवड्यात त्याचा वाढदिवस होता. कर्नलसाहेबांनी आणि सवितानं ठरवलं की त्याला वाढदिवसाला अशी भेट द्यायची की तो खूश झाला पाहिजे. दोघांनी मिळून खूप विचार केला. टी.व्ही.वर ठेवलेला अंबुजचा फोटो पाहताना सविताला एक कल्पना सुचली. कर्नलसाहेबांनाही ती आवडली.

दुसऱ्या दिवशी अंबुजला बोलवून त्यांनी सांगितलं. ''अंबुज, मी २/३ दिवसांसाठी बाहेर गावी जातोय. एक डिसेंबरला तुझा वाढदिवस आहे ना तोपर्यंत मी नक्की परत येईन. तुझ्यासाठी छानशी भेट घेऊन.''

आपला वाढदिवस इतका जवळ आला आहे हे अंबुज विसरून गेला होता. त्याला आठवलं, त्या दिवशी त्याचे बाबाजान त्याला तेल लावून आंघोळ घालायचे. अमीनादीदीची आई त्याला ओवाळायची आणि गरम गरम परोठे करून जेवायला वाढायची. बाबाजान त्याला खाऊ आणण्यासाठी कोरं करकरीत नाणं

द्यायचे. गावातल्या दुकानात जाऊन तो खूप साऱ्या गोळ्या आणायचा. मित्रांना वाटायचा. या वर्षी मात्र त्यानं ते नाणं जपून ठेवलं होतं, जलदेवतेला अर्पण करण्यासाठी ! या आठवणीसरशी त्यानं डोळे घट्ट मिटून घेतले.

एक डिसेंबर उजाडला. कर्नलसाहेब अजून परतले नव्हते. अंबुज एकटाच एका झाडाखाली जाऊन बसला होता. त्याला शोधत सविता तिथं आली. त्याला जेवायला घेऊन गेली. पानात फुलक्यांऐवजी गरमगरम आलू परोठे पाहून त्याला आश्चर्य वाटलं. त्याला मनापासून जेवताना पाहून सविताला बरं वाटत होतं. इतक्यात गाडीचा हॉर्न वाजला. सविता दार उघडायला गेली. तिथूनच अंबुजला हाक मारत म्हणाली, ''अंबुज, लवकर बाहेर ये. तुझे पपा तुझ्या वाढदिवसासाठी काय घेऊन आलेत ते बघ तरी.''

अंबुज बाहेर आला. गाडीतून कर्नलसाहेब उतरत होते. आणि त्यांच्या पाठोपाठ....

अंबुजचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. चाँदनीसारख्याच उड्या मारत तो धावत सुटला. त्यानं चाँदनीच्या गळ्याला मिठी मारली. तीही त्याच्या हातावर मान घासत राहिली. चाँदनी आपल्याला परत भेटेल असं त्याला स्वप्नातही वाटलं नव्हतं. त्याच्या डोळ्यांला पाण्याच्या धारा लागल्या होत्या. वाढदिवसाची इतकी सुंदर भेट त्याला अपेक्षित नव्हती.

थोड्या वेळानं भानावर आल्यावर त्यानं समोर पाहिलं. सविता आणि कर्नलसाहेब दोघंही एकटक त्याच्याकडं पाहात होते. हळूहळू पावलं टाकत तो त्यांच्यापाशी गेला. त्याच्या वर्गातली मुलं म्हणायची, त्याच पद्धतीनं हळुवार शब्दांत तो लाजत, लाजत म्हणाला,''थँक यू ! थँक यू !'' त्यानं मान वर करून पाहिलं. सविताचे डोळे भरून आले होते. तिनं हात पसरले; आणि तो तिच्या मिठीत शिरला. कर्नलसाहेब काही न बोलता त्याच्या कुरळ्या केसांतून हात फिरवत राहिले.

पहाडावरच्या जलदेवतेच्या कुंडात नाणं न टाकताही तिनं त्याची प्रार्थना ऐकली होती. त्याला त्याची आई भेटली होती आणि बाबाजानही!

***

**– मृणालिनी चितळे**
७५९/३२, गोपिकाश्रम,
डेक्कन जिमखाना, पुणे ४

# पदकं विसरा; बेहोशी आठवा !

*– हेमन्त जोगदेव*

सिडनी ऑलिंपिक स्पर्धा संपली आहे. ते विक्रम, ते उच्चांक आणि ती चढाओढ थांबली आहे. पण त्या ऑलिंपिकनं दिलेला आनंद मात्र प्रज्वलित ज्योतीप्रमाणे कायम राहणार आहे.


ऑलिंपिकची पदकं कुणी आणि किती घेतली यापेक्षा ती घेणाऱ्यांनी आपल्या क्रीडाकौशल्यानं जगाला किती अपार आनंद दिला ते अधिक महत्त्वाचं आहे. त्यांनी किती विक्रम केले यापेक्षा त्यांनी लाखो युवकांना किती स्फूर्ती दिली ते महत्त्वाचं आहे.

दोनशे देशांचे जवळपास बारा हजार क्रीडा प्रतिनिधी एकत्र येतात... ते सगळेच काही पदकं जिंकत नाहीत... विक्रम करतात असंही नाही... पण ते किमान पंधरा दिवस एकत्र राहतात... एकमेकांना खूप खूप जवळून पाहतात... आपल्या कुवतीला जमेल तेवढ्या क्रीडा कौशल्यांनी परस्परांना आपली ओळख करून देतात... येथे भिन्न भिन्न भाषेतली अडचण जरासुद्धा येत नाही. त्यांच्यातील ही क्रीडा-मैफल, स्पर्धा संयोजक आपल्या अपार कर्तृत्वानं अतिशय देखणी करतात. दूरदर्शनवरून हा क्रीडा सोहळा पाहताना सर्व जग त्यातील मजा लुटते. हा आनंद घेत स्पर्धा संपते. सारे स्पर्धक घरोघर परततात – पुन: चार वर्षांनी एकत्र येण्यासाठी.

सिडनीनं यंदाच्या ‘सत्ताविसाव्या पुनर्भेटीची’ व्यवस्था चोखपणे सांभाळली, आणि नव्या सहस्रकातला प्रवेश अभूतपूर्व उत्साहानं अविस्मरणीय ठरवला. अर्थात मनुष्यस्वभावानुसार काही वादंगेही दिली. काही प्रश्नचिन्हेही दाखविली. त्यातून कुणी काय घ्यावं आणि काय विसरावं हा ज्याच्या त्याच्या परिपक्वतेचा आणि स्वभावाचा प्रश्न आहे...

सिडनी हे ऑलिंपिक घेणारं एकविसावं शहर.

‘सिडनी’नं ऑलिंपिक घेण्याबाबतची निवडणूक



जिंकल्यानंतर पूर्वतयारीच्या कामाचा अक्षरश: धडाकाच लावला. त्यांना काही अंतर्गत अडथळे आलेच नाहीत अशातला भाग नाही. पण ते सर्व दूर करून त्यांनी सर्व कामे नियोजित वेळेच्या आधीच पूर्ण करून टाकली. त्यांपैकी बांधकामाची पूर्तता ही तर आश्चर्याने थक्क करणारीच होती. ‘स्टेडियम ऑस्ट्रेलिया’ ह्या सर्वाधिक महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या बांधकामाला त्यांनी २३ सप्टेंबर १९९३ मध्ये प्रारंभ केला आणि मार्च १९९९ मध्ये ते पूर्ण केले. एवढेच नाही तर त्याच स्टेडियमवर रग्बी लीग आणि रग्बी असोसिएशन अशा दोन प्रचंड गर्दी खेचणाऱ्या स्पर्धा आयोजित करून स्टेडियमची यशस्वी चाचणीही घेतली.

‘स्टेडियम ऑस्ट्रेलिया’ असे त्या स्टेडियमचे नामकरण करण्यात आले असून १ लाख १० हजार प्रेक्षकांची क्षमता असलेले हे स्टेडियम आता जगातील सर्वात मोठे ऑलिंपिक स्टेडियम झाले आहे. किंबहुना ही वास्तू एवढी भव्य आणि देखणी झाली आहे की क्रीडा आणि मनोरंजनाचं आगर असणारं ते जगातील पहिल्या क्रमांकाचं वैभवच ठरेल. हे स्टेडियम अनेक अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण आहे. व्हिडिओचे दोन भव्य पडदे आणि स्कोअरबोर्ड यासाठी एक कोटीपेक्षा अधिक अमेरिकन डॉलर्स(सुमारे ५० कोटी रुपये) खर्च करण्यात आला आहे. पण त्या स्टेडियमची एक महत्त्वाची जादू म्हणजे बसण्याच्या आसन व्यवस्थेत काही फेरफार करून त्या



स्पर्धा अमुची यशदायी ही व्हावी जगती खरोखरी
द्वेषबुद्धि ती मनी नसावी राष्ट्राचा जी ऱ्हास करी.

स्टेडियमचा पूर्ण आकारच चौकोन अगर अंडाकृती हवा तसा बनविता येतो. तेसुद्धा केवळ आठ तासांच्या अवधीत. त्यामुळे ऑलिंपिक झाल्यानंतर त्यात आणखी काही बदल करवून हे जागतिक कीर्तीचं प्रचंड स्टेडियम फुटबॉल, क्रिकेट अगर रग्बी अशा कोणत्याही खेळासाठी जागतिक स्पर्धांनासुद्धा उपयुक्त होऊ शकणार आहे. विशेषत: उर्वरित अर्ध्या स्टेडियमवरील छताचे आवरण पूर्ण होईल तेव्हा फुटबॉल, क्रिकेट आणि अथलॅटिक्ससह, जगातील कितीही प्रचंड गर्दीच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांसाठी 'स्टेडियम ऑस्ट्रेलिया' हे सर्वाधिक सुखसोयींनी परिपूर्ण स्टेडियम असेल.

मोंडो स्पोर्टफ्लॅक्स सुपर या अत्याधुनिक बनावटीचा वापर ट्रॅकसाठी करण्यात आला आहे. विशिष्ट प्रकारच्या रबराचे आच्छादन असलेल्या या ट्रॅकवर स्पर्धकांच्या बुटाचे खिळे रोवले जात नाहीतच. उलट त्याच्या गुळगुळीतपणामुळे तो ट्रॅक जगातील सर्वाधिक वेगवान समजला जाऊ लागला आहे. या ट्रॅकवर आतापर्यंत जवळपास सव्वाशे

जागतिक विक्रम नोंदविले गेले आहेत.उद्‌घाटन सोहळ्याचे यश हे एकूण स्पर्धेचंच अर्धं यश आजकाल मानलं जातं. त्या पार्श्वभूमीवर सिडनीनं अभूतपूर्व यश एकट्या उद्‌घाटनातच पटकावलं.

सोहळे कसे असतील त्याबद्दलची

उत्सुकता अखेरपर्यंत ताणलेली राहावी म्हणून ते गुप्त ठेवण्याची प्रथा सुरू झाली आहे. सिडनीही त्याला अपवाद नाही.

उद्‌घाटन सोहळ्यातून पृथ्वीवरील सारी सृष्टीच जणू रंगमंचावर सादर केली गेली. पर्यावरण आणि ऑस्ट्रेलियाची जन्मापासून ते आधुनिक विकासापर्यंतची वाटचाल संगीताच्या सुरावटीतून आणि मन मोहून टाकणाऱ्या नृत्यातून त्यांनी जिवंत उभी केली. उद्‌घाटन सोहळ्यात त्यांच्या कल्पकतेतून त्यांनी ऑस्ट्रेलियाच्या इतिहासाचे अनेक टप्पे उलगडून दाखविले.

पण निक्की वेब्स्टर या १३ वर्षे वयाच्या शाळकरी मुलीनं तर साऱ्या सोहळ्याचंच मन जिंकलं. 'स्वप्नातल्या या परी'नं आकाशातनं ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर येऊन तेथल्या मूळच्या वंशजांना - आदिवासींना आपल्या लोभस व्यक्तिमत्त्वानं जिंकलं - ते दृश्य कोणालाही धुंद करणारंच ठरलं.

यंदाचं हे वर्ष महिलांना ऑलिंपिकमध्ये समावेश करून घेतल्याचं शताब्दी वर्ष होतं, तर ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर ज्यांनी प्रथम वास्तव्य केलं त्यांचीही आठवण ठेवणं आवश्यक असल्याचं भान त्यांनी ठेवलं होतं. डॉन फ्रेजर व शेन गाऊल्ड आणि इतर अनेक माजी महिला क्रीडापटूंना ज्योत प्रज्वलनासाठी संधी देऊन महिलांचा मान राखला गेलाच. पण त्यातही स्टेडियमवरची मुख्य ज्योत प्रज्वलनासाठी आदिम रहिवासी धावपटू कॅथे फ्रीमन हिची निवड करून आपल्या कल्पकतेचे शिखरच गाठले. आणि त्याच कॅथेने ४०० मीटर्स शर्यतीचे सुवर्णपदक जिंकून आपल्या निवडीचं सार्थकच केलं. कॅथे हिच्या नावाची जणू एक जादूच तयार झाली.


ऑलिंपिक ज्योत ही सिडनीनं जेवढी उंचावली तेवढी ती यापूर्वी कधी कुणी आकर्षक केली नाही. कॅथेनं पाच-पन्नास पायऱ्या धावत जाऊन आपल्या सभोवारच्या वर्तुळाकार वाहत्या पाण्यात उभ्या केलेल्या कुंडात ती ज्योत प्रथम प्रज्वलित केली. मागील धबधब्याच्या पार्श्वभूमीवरील ते दृश्य प्रेक्षकांना मोहात पाडत असतानाच ज्योतीचं ते आठ टन वजनाचं पोलादी अग्निकुंड यांत्रिक साहाय्यानं वर आलं आणि अलगदपणे तिचं स्टेडियमच्या सर्वोच्च स्थानी स्थलांतर केलं गेलं. त्यातूनच ऑस्ट्रेलियाने आपल्या यांत्रिकी अत्याधुनिकतेची जागाला ओळख करून दिली.

समारोपाचा सोहळाही तसाच चित्तवेधक ठरला आणि लाखो-अब्जावधी दर्शकांच्या साक्षीनं 'सिडनी २०००' इतिहासजमा झाली. ऑलिंपिक संघटनेने आपल्या प्रथेप्रमाणे पुन्हा चार वर्षांनी 'अॅथेन्स २००४' साठी येण्याचं आग्रहपूर्वक निमंत्रण दिलं आणि विरहाची रुखरुख मागे ठेवीत, पण सिडनीच्या अविस्मरणीय आठवणी सांभाळतच सर्व क्रीडापटू आपापल्या घरी परतले- अर्थात पुन्हा जमण्यासाठी!

मैदानांवरच्या लढती हा अर्थातच ऑलिंपिकचा प्राणच ! आणि त्यातही अॅथलॅटिक्स आणि जलतरणाचा तलाव हे सर्वाधिक गर्दी खेचणारे विषय. त्याशिवाय जिमनॅस्टिक्स, मुष्टियुद्ध, टेनिस, बॅडमिंटन वगैरे सर्वच विषय आपापल्या खेळातील लोकप्रियतेवर आधारलेले. हॉकीपेक्षाही फुटबॉलची लोकप्रियता


कितीतरी पटींनी मोठी.

स्पर्धा सुरू झाल्याचा पहिला आठवडा गाजला तो तलावावरच्या शर्यतींनी, इआन थोरपे हा ऑस्ट्रेलियाचा १७ वर्षे वयाचा शाळकरी मुलगा. पण पाण्यातली त्याची 'मुसंडी' पाहिली की त्याच्या 'थोरपे' नावावरून त्याची 'टॉरपेडो'



(पाणबुडी) या लाडक्या नावानं लोकप्रियता का वाढली आहे ते वेगळं सांगावंच लागत नाही. ४०० मी. फ्रीस्टाईलच्या सुवर्णपदकानं त्यानं आपल्या अपेक्षित यशमालिकेचा प्रारंभ केला आणि त्याच तलावावर अनेक जलतरणपटूंकडून एका मागोमाग एक विक्रम आणि उच्चांकांची चवडच रचली जाऊ लागली. हॉलंडचा व्हॅन डेन हुगेनबँड याने तर खुद्द 'टॉरपेडो'लाच २०० मी. फ्रीस्टाईलमध्ये रोखून साऱ्या तलावालाच धक्का दिला. चीन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे देशांतील अनेकांनी जलतरणाच्या शर्यतींतून अफाट लोकप्रियता मिळविली.

ॲथलेटिक्सच्या मैदानावर तर अपेक्षेप्रमाणे सतत जल्लोषच होत राहिला. स्पर्धेतील सर्वाधिक लोकप्रिय कोण हे ठरविणं केवळ अशक्य असलं तरी ऑस्ट्रेलियाची ४०० मी. धावण्याच्या शर्यतीची विजेती, आणि ऑलिंपिक ज्योत प्रज्वलित करणारी मानकरी कॅथे फ्रीमन, अमेरिकेचा ४०० मी. शर्यतीचा पुरुषांतील विजेता मायकेल जॉन्सन की १०० मी. धावण्याच्या शर्यतीत जागतिक विक्रमासह सुवर्णपदक घेणारा अमेरिकेचाच मॉरीस ग्रीन, आणि त्याच अंतराच्या शर्यतीची महिलांतील विजेती मारियान जोन्स यांच्यातच ती चढाओढ लागू शकेल.





पण आधीच केलेल्या अंदाजाप्रमाणे 'स्टेडियम ऑस्ट्रेलिया'त अपेक्षेपेक्षा अधिक विक्रम नोंदविण्याची जादू जरूर आहे आणि त्याप्रमाणेच घडलेही.

एकूण पदक विजेत्यांत अर्थातच अमेरिकेची सर्वोच्च संख्या सिडनीतही शाबूत राहिली. पण चीनने मात्र अपेक्षेपेक्षाही वरचढ उडी मारली. हॉकीमध्ये भारताने पूर्ण निराशा केली. त्यांना याही वेळी साखळीतूनही बाहेर पडता आले नाही. तशी संधी पाकिस्ताननं मात्र घेतली. त्यांनी हॉलंडला दिलेला पराभवाचा धक्का खरोखरीच अनपेक्षित होता.इतर कोणत्याच खेळात अनपेक्षित असं फारसं आश्चर्यचकित झालं नाहीच.

'मल्लेश्वरीनं अब्रू राखली !'

एक अब्जाहूनही अधिक लोकसंख्येचा आपला भारत, पण एवढ्या थोर परंपरेच्या आणि प्रचंड लोकसंख्येच्या या देशाला केवळ एका ब्रॉन्झ पदकावर समाधान मानावे लागते, ही गोष्ट मनाला नाही म्हटलं तरी खटकतेच. त्याची कारणं काहीही असोत. पण ती वस्तुस्थिती नाकारता तर येत नाही.

पण पदकं नाहीत यापेक्षा देशात अजून क्रीडा संस्कृतीच रुजत नाही याचा खेद अधिक होतो. छानसं मोकळ्या हवेत प्रसन्न मनानं भरपूर

खेळावं, शारीरिक संपन्नतेत डुंबावं, मनसोक्त दमावं, ही संकल्पना नाहीशीच होते आहे की काय याचीच शंका येऊ लागलीय... देश खरोखरीच गरीब असता तरीही मोकळ्या मैदानांवर बिनपैशातले खेळ खेळण्याला तर हरकत नसावी ना ? उलट प्रत्यक्षात हजारो कोटी रुपये आपण क्रीडा स्पर्धांवर खर्ची टाकतो...

...दर चार वर्षांनी.. ऑलिंपिकच्या आगेमागे विचारले जाणारे आणि निरुत्तरित राहणारे हे प्रश्न आता 'सिडनी २०००' निमित्तही चालू राहतील... अथेन्स २००४ साठी! पण तुम्ही-आम्ही हे चित्र नक्की बदलवू शकतो. जिद्द, ईर्ष्या, शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य निव्वळ खेळातूनच येतं, व्यायामातूनच निर्माण होतं, निदान त्यासाठी तरी मैदानावर येण्याशिवाय तरणोपाय नाही आणि पदकं मिळविणं ही जर त्याचीच प्रतीके असतील तर 'पदकं'सुद्धा मुळीच अशक्य नाहीत... आपल्या जिल्ह्याच्या आकाराचे छोटे-छोटे देश जर डझनावारी पदकं मिळवू शकतात तर... अर्थात मनाची उभारी मात्र त्यासाठी जरूर आहे... तेव्हा त्यासाठी इतर कोण काय करतं यापेक्षा आपण काय करावं, हे अखेरीला आपणच आपलं ठरवायला हवं.. तसं आजच ठरवूया, आणि त्याचा प्रत्यय अथेन्सलाच दाखवून देऊया.

हॉकी, ॲथलॅटिक्स, रोईंग, कुस्ती... एक ना दोन... सर्व डझनभर खेळ आणि शंभरावर भारतीय स्पर्धक सिडनीहून परतले असतील. पण त्या सर्वांच्या 'जबाबदारीचे वजन' एकटच्या करनाम मल्लेश्वरीनं आपल्या अतुलनीय पराक्रमानं प्रातिनिधिक स्वरूपात दाखवून दिलं... यापूर्वीही तसाच पराक्रम खाशाबा जाधव आणि लिएन्डर पेस यांनीही दाखविला आहे... मग तेच आदर्श आता नव्या पिढीने डोळ्यासमोर ठेवायलाच हवेत...

ऑलिंपिक हे सर्वस्व नसलं तरी त्यात भाग घेण्याची संधी मिळावी म्हणून प्रत्येकानं मनात तशी महत्त्वाकांक्षा जरूर बाळगायलाच हवी. त्यासाठी हवे तेवढे कष्ट करण्याची, स्वत:ला त्यात झोकून

देऊनच सराव करण्याची हिम्मत हवी... अर्थात प्रत्यक्षात ऑलिंपिकची संधी कुणा एखाद्यालाच मिळते हेही लक्षात घ्यायला हवंच. पण त्यासाठी प्रयत्न मात्र हजारोंचे-- लाखोंचे हवेत. अशा संधीसाठी जेवढे अधिक स्पर्धक प्रयत्न करतील तेवढी चुरस वाढतच राहील. आणि जेवढी चुरस वाढेल तसा प्रत्येकाच्या क्रीडाकौशल्याचा आणि कामगिरीचाही दर्जा वाढेल, मग अशा प्रचंड अटीतटीच्या चुरशीत जो कोणी तावून सुलाखून संधी मिळवेल, त्याच्या वाढलेल्या क्रीडा कामगिरीमुळे कोणाही बलाढ्य प्रतिस्पर्ध्याविरुद्ध झुंज देणे त्याला तुलनेने खूप सोपे जाईल.

ज्या शाळेमध्ये पहिला नंबर येण्यासाठी शेकडो हुशार विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड चढाओढ असते, त्याच शाळेतला पहिल्या क्रमांकाचा विद्यार्थी बाहेरच्या जगातही खूप वरची श्रेणी मिळवू शकतो. तसंच ज्या देशात ऑलिंपिकमधील प्रवेशासाठी संबंधित खेळाडूला प्रचंड चुरस करावी लागते त्याच देशातले क्रीडापटू ऑलिंपिकची पदकं मिळवू शकतात. म्हणूनच अशी उत्तुंग कामगिरी करणाऱ्या प्रत्येकाच्या यशामागे त्याच्याशी निकोप स्पर्धा करणारे त्याचे सहकारीही तितकेच वाटेकरी असतात असं म्हटलं जातं ते त्याच भूमिकेतून. आणि अशा प्रत्येक ऑलिंपिकवीराच्या मागे असणारी दर्जेदार क्रीडापटूंची फौज यालाच विशिष्ट अर्थाने 'सांघिक क्रीडा संस्कृती' असं मानलं जातं.

आपल्या देशाच्या ऑलिंपिक मधील निराशाजनक कामगिरीला इतर शेकडो कारणे असतीलही. पण आपल्या ऑलिंपिकपटूला तेवढ्याच -किंबहुना त्याच्याहीपेक्षा काकणभर अधिक दर्जाच्या प्रतिस्पर्ध्याकडून भारतात असताना सरावच मिळत नाही आणि 'झुंज' देण्याला तर कुणी नसतेच. तेव्हा आपल्या ऑलिंपिकपटूच्या मागे जिथं कुणी नसतंच तर तो पुढे विजयी व्हावाच कसा ?... तेव्हा त्याच्या पराभवाला 'क्रीडा संस्कृती' चा अभाव हेही एक कारण असतेच!

तात्पर्य इतकंच की ऑलिंपिकमध्ये आपल्याला संधी मिळाली तर सोन्याहून पिवळं. पण तशी मिळाली नाही तरी आपल्यातून तिथे जाणाऱ्याच्या यशात आपण त्याच्याशी दिलेल्या सरावातील शर्थींच्या लढतीतून तरी वाटेकरी, प्रत्येकाला जरूर होता येईलच... कारण तो आनंदही तितकाच मोलाचाच आहे ! त्यालाच म्हणतात, 'क्रीडा संस्कृती' आणि 'क्रीडा-परिपक्वता'ही ! ✲✲✲

हेमन्त जोगदेव
'इंद्रायणी' पत्रकारनगर,
सेनापती बापट मार्ग, पुणे १६.



# भुताचा डोंगर

म. व. कोल्हटकर

मेजर रामराव चव्हाण आपल्या मारुती कारमधून स्वत:च्या शिवथर या गावी अचानक आले. तब्बल अठ्ठावन्न वर्षांनी ते आपल्या गावामध्ये पाऊल टाकत होते. त्यांनी आवडीने सैनिकी पेशा स्वीकारला. काश्मीर फ्रण्टवर त्यांनी अतुल पराक्रम गाजवला, नागालॅण्डमधेही अवघड कामगिरी पार पाडली. त्यामुळे सेनादलात त्यांना वेगाने बढती मिळत गेली.

अठ्ठावन्न वर्षांच्या दीर्घ काळामधे रामराव आपले मूळ गाव शिवथर आहे, तिथे आपले वडिलोपार्जित घर आहे ही गोष्ट पार विसरून गेले होते.

एके दिवशी हे घरच त्यांच्या स्वप्नात आले. बालपणीच्या काही जुन्या आठवणी पण त्यांच्या मनात जाग्या झाल्या. मग त्यांनी सरळ आपली कार बाहेर काढली आणि ते पत्नीला म्हणाले, 'मी गावाकडे जातो आहे. आठ-दहा दिवसांत परत येईन.'

गावात आल्या आल्या रामरावांनी काही गडी कामाला लावले. घराभोवती वाढलेली झाडे आणि झुडपे काढून टाकली. परिसर मोकळा आणि स्वच्छ केला. घराची दारे, खिडक्या उघडल्या. अठ्ठावन्न वर्षांची साठलेली धूळ आणि कोळिष्टकं काढली. कित्येक वर्षांनंतर त्या घरामध्ये मोकळे वारे खेळू लागले.

सायंकाळची वेळ होती. अंगणामध्ये सकाळी सडा टाकल्याने ते स्वच्छ झाले होते. तुळशी वृंदावन तुळशीविना ओकेबोके वाटत होते. रामरावांनी मनात ठरवले, उद्या सकाळी उठल्या उठल्या वृंदावनात एक तुळशीचे रोप लावायचे.

रामरावांनी तुळशी-कट्टयावर दिवा लावला. सोफ्यावर खुण्टीला कंदील टांगला होता. घरामध्ये अद्याप वीज आलेली नव्हती.

कंदीलाचा प्रकाश अंगणात पसरला होता. अंगणामध्ये कॉट टाकण्यात आली होती. कॉटवर रामराव निवांतपणे बसले होते. जवळच कॉटवर सरपंच जिजाबाण्णा पवार बसले होते. शिवाय रामरावांचा गावाकडील जुना लंगोटीयार बाळिशा शेटेही मोठ्या कौतुकाने तिथे येऊन बसला होता. आणखीही गावामधील काही प्रतिष्ठित माणसे बैठकीत सामील झाली होती.

सरपंच म्हणाले, 'चव्हाणसाहेब तुम्ही आता रिटायर झाला आहात. तेव्हा हक्काच्या घरात इथे राहायला या'.

बाळिशा सरपंचांना म्हणाला, 'तुम्ही तर अगदी माझ्या मनातला विचार बोलून दाखविलात.'

गप्पा ऐन रंगात आल्या. सभोवती काळोख गडद होत गेला. दूर अंतरावर एक एकाकी काजवा खाली आणि वर तरंगत दूर गेला. लांब क्षितिजाजवळ दाट काळी रेघ दिसत होती. तिकडे पाहात रामरावांनी विचारले,'तो तिकडे डोंगर आहे वाटतं ?'

दक्षिणेकडे त्या दिशेला पाहात सरपंच म्हणाले,' होय तो डोंगर आहे. त्याला भुताचा डोंगर म्हणतात.'

'असं ? म्हणजे तिथं भूत आहे काय ?' रामरावांनी विचारले.

'होय तर. भूत साधेसुधे नाही. ते भूत अगदी जहाल आहे.' सरपंच जिजाबाण्णा म्हणाले.

'संपूर्ण डोंगरावर त्या कडव्या भुताचा अंमल आहे.' बाळिशा म्हणाला.

'आणि समजा एखादा धडाडीने गेला तर ?' रामरावांनी विचारले.

'जर एखादा तिथे गेलाच तर तो माणूस भ्रमिष्ट होतो, पांगळा होतो नाहीतर मरतो तरी. भूत



जाग घराला हो आली, दारी तुळस बहरली.
हिरवळले अंगण, पुन: बाग फुलू आली.

त्याला झपाटल्याशिवाय सोडत नाही.' बाळिशा म्हणाला.

त्या डोंगरावर जाण्याला पक्का रस्ता आहे काय ? रामरावांनी विचारले.

'पक्की सडक आहे. पण वापरच नाही त्या सडकेचा. कुणीसुद्धा फिरकत नाही तिकडे',सरपंच म्हणाले.

मग एकेकाने त्या भुताच्या भीतीदायक कहाण्या सांगितल्या. अमावास्येच्या दिवशी तर भूत खवळलेले असते. त्या टापूकडे अमावस्येच्या दिवशी कोणीही कधीही फिरकत नाही, असे सरपंचांनी निक्षून सांगितले.

'या महिन्याची अमावास्या कधी आहे ?' रामरावांनी विचारले.

'उद्या, उद्याच आहे अवस,' बाळिशा म्हणाला.

'तर मग ठरलं. मी उद्या रात्री भुताला भेटायला जाणार.' रामराव म्हणाले.

'छे छे चव्हाणसाहेब भलतच काय बोलताय् जाण्याचं नावसुद्धा काढू नका अगदी.

'तुम्हाला माहीत नाही हिसका त्या भुताचा. भल्याभल्यांना त्यानं अस्मानात

पाठवलंय्.' बाळिशा म्हणाला.

'मला पाठव म्हणावं अस्मानात. गोळीच घालीन त्याला असा लोळवतो भुताला, बघतच राहा' रामराव मिशीला पीळ देत म्हणाले.

तेव्हा सरपंच, बाळिशा आणि बैठकीतली इतर माणसे एकदम एका सुरात म्हणाली,'नका नका, अजिबात जाऊ नका. ऐका आमचे.'

पण रामराव हट्टाला पेटले. ते म्हणाले,'भुताशी दोन हात करणारच मी. बघूया कोण हरतंय,मी का भूत.'

लोकांनी रामरावांना नाना परीने सांगितले. पण रामराव आपल्या निश्चयापासून रेसभरही ढळले नाहीत. दुसरा दिवस उजाडला. ती अमावास्या होती. रात्र झाली. रामरावांनी आपली मारुती कार बाहेर काढली. पिस्तुल लोड करून घेतले. जम्बो टॉर्चही घेतला. रात्री अकराचा सुमार होता. गावकऱ्यांच्या विनवण्या न जुमानता मेजर रामराव गाडीत बसले. त्यांनी गाडी सुरू केली. झगझगीत प्रकाश सभोवार पसरला. मग गाडी भुताच्या डोंगराच्या रोखाने धावू लागली. रस्ता खरोखर चांगला होता. खाचखळगे मुळीच नव्हते. मात्र रस्ता वेडीवाकडी वळणे घेत डोंगरावर चालला होता. हळूहळू घनदाट जंगल दिसू लागले. भोवताली काळाकुट्ट अंधार होता. त्यामुळे वातावरण भीतीदायक झाले होते. अनेक वर्षांनंतर या जंगलात माणूस आला होता.जंगल अगदी भयाण भासत होते.

मधेच दूर एका झाडावर रामरावांना अगदी थेट माणसासारखा चेहेरा दिसला. रामरावांनी गाडी स्लो केली. टॉर्चचा झोत फांदीवर टाकला. फांदीवर एक घुबड बसले होते. ते माणसासारख्या डोळ्यांनी टकामका पाहात होते.

गाडीच्या वेगाने जागी झालेली काही वटवाघळे फडफडत गेली. रामरावांनी तिकडे लक्ष दिले नाही. त्यांनी गाडीचा वेग वाढवला. गाडीचे हेडलाइट रस्त्यावर लख्ख प्रकाशाचा झोत टाकू लागले.

अशा वेळी एक विचित्र गोष्ट रामरावांच्या लक्षात आली. रामरावांना स्पष्ट दिसले की माणसाची सावली हात पसरून गाडीला अडवीत आहे.

होय, ती अगदी माणसाचीच सावली होती. डोके, दोन पसरलेले, हात, दोन अंतरावर ठेवलेले पाय.

सावली गाडी अडवीत होती.

रामराव बुचकळ्यात पडले. त्यांनी आजूबाजूला पाहिले. आजूबाजूला चिटपाखरू नव्हते. माणूस तर दिसत नव्हता. पण माणसाची सावली तर अगदी स्पष्ट गाडीला हात पसरून अडवीत होती.

रामरावानी दिवे क्षीण केले. गाडीचा वेग मंद केला. तेव्हा ती सावली फिकट होत होत दिसेनाशी झाली.

मग रामरावांनी गाडी थांबवली. टॉर्चचा प्रकाश सभोवताली पाडला. सभोवती कोणीच नव्हते.

त्यांनी पुनः गाडी सुरू केली.

सावलीचे हातवारे आता वेगाने सुरू झाले. आता सावली मोठी, अधिक मोठी होत गेली. सावलीने रस्त्यावर अंधार निर्माण केला.

आता रामराव चरकले. पण ते डगमगले नाहीत. ते अनेकदा मृत्यूला सामोरे गेले होते. त्यामुळे



एक अनाम सावली, अवचित समोर आली.
मन भिऊभिऊ झाले, बुद्धी मात्र जागली.

त्यांना भीती वाटली नाही.

सावली गाडीच्या वेगाने पळते आहे हे रामरावांनी पाहिले. मग त्यांनी गाडी थांबवली आणि समोर सावलीच्या रोखाने पिस्तुल झाडले.

त्या निर्जन जंगलात पिस्तुलाच्या गोळीचा आवाज दुमदुमला. दूर कड्यापावेतो तो जाऊन थडकला.

त्या आवाजाने एका झाडावरची बरीच वटवाघळे उडू लागली.

''कौन हो तुम ?'' पिस्तुलाच्या चापावर बोट ठेवून रामराव म्हणाले.

पण रामरावांना प्रत्युत्तर मिळाले नाही. दूर एका घुबडाने घूत्कार केला. माणूस अदृश्य आहे,सावली मात्र गाडी अडवत आहे असा प्रकार पुन:पुन्हा घडला. तेव्हा रामराव मनातल्या मनात घाबरले. त्यांनी आपल्या कुलदेवतेचे स्मरण केले. गाडीच्या काचा वर केल्या. पिस्तुल सज्ज ठेवले. टॉर्च हाताशी ठेवला. हताशपणे त्यांनी व्हीलवर डोके टेकले.कितीतरी वेळ रामरावांना स्वत:च्या हृदयाचे ठोके ऐकू येत होते. रात्री अगदी उशीरा त्यांना डुलकी लागली. नंतर त्यांना अचानक जाग आली तेव्हा उजाडले होते झाडाच्या पानांच्या गर्दीमधून आभाळाचे तुकडे दिसू लागले होते. रामरावांनी दीर्घ नि:श्वास सोडला. पिस्तुल सज्ज ठेवून त्यांनी आपल्या गाडीचे दार उघडले. ते समोर काही पावले चालून गेले. तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. कारण शंभर पावलांवर रस्ता कड्याच्या टोकावर संपला होता आणि कड्याला लागून खोलच खोल दरी होती. रामरावांच्या अंगावर सर्रकन काटा उभा राहिला. आणखी एखादा क्षणच जर रात्रीच्या अंधारात त्यांनी गाडी दौडत थोडी पुढे नेली असती तर...! रामरावांनी मनातल्या मनात त्या अद्‌भुत सावलीचे आभार मानले. नंतर ते गाडीकडे परतले. आता ते गाडी वळवून परतणार होते. तत्पूर्वी गाडी थोडी पुसून काढावी म्हणून त्यांनी डिकीतून फडके काढले. ते फडक्याने गाडीवर पडलेली धूळ आणि पाने दूर करू लागले. गाडी पुसता पुसता ते हेडलाईटच्या काचा पुसू लागले. काचा पुसताना एका गोष्टीकडे रामारावांचे लक्ष गेले.

उजव्या हेडलाइटच्या आत रिफ्लेक्टरजवळ एक सहा पायांचा आणि छोटे डोके असलेला किडा बंदीवान झाला होता. तो बाहेर येण्यासाठी धडपड करीत होता. मध्येच तो बल्बवर चढत होता. मधेच पुढच्या काचेवर बसत होता. सहा पाय आणि एक डोके असलेला दिव्यामध्ये अडकलेला किडा रामरावांनी पाहिला. आजपर्यंत यांनी कुणापुढे हात जोडले नव्हते. या किड्याकडे पाहिल्यावर मात्र नकळत रामरावांचे हात जुळले गेले.

***

- म.वि. कोल्हटकर
१६, जीवनछाया सोसायटी,
सिव्हिल हॉस्पिटलसमोर,
सातारा.



दूर दरीखोऱ्यात निळं तळं थरारलं.
गार झुळुक बोचरी, मन अमृतात न्हालं.

वाचलेच पाहिजे असे काही


## 'ऋतू-शैशव'

बालपणीच्या गमतीजमती एक त्यातली अजून स्मरते पुस्तकातले मोरपीस ते हळूच गालावरून फिरते 'बालपण' हा प्रत्येकाच्या अगदी जिव्हाळ्याचा, कुतुहलाचा विषय ! त्यात विख्यात कलाकारांच्या बरोबरीनं त्यांच्या बालपणीच्या सुंदर जगामध्ये फेरफटका मारणं, त्यांची धडपड, आशा-निराशा, छोटी मोठी सुख-दु:खे यांमध्ये गुंतून जाणं कुणाला आवडणार नाही. त्यातही कलाक्षेत्रातील महामेरूंचं बालपण तर अनेकांना आकर्षून घेणारं आणि छोट्यांना प्रेरणा व स्फूर्ती देणारं!

'ऋतू-शैशव' या गौरी रामनारायण लिखित पुस्तकातही, सहा कलाकारांनी आपल्या बालपणाचा घेतलेला मागोवा अतिशय सुंदर रीतीने मांडला आहे. या पुस्तकात आपल्या सरोदवादनाने मंत्रमुग्ध करणारे अमजद अली खान, कला जगतात मोठा दबदबा असणारे एम. एफ. हुसेन, आपल्या अलौकिक स्वरांनी श्रोत्यांना मोहिनी घालणाऱ्या गायिका भारतरत्न एम.एस.सुब्बलक्ष्मी, एखाद्या मोठ्या घटनेवर एका छोट्या चित्रात परिपूर्ण भाष्य करणारे बुद्धिमान व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण, सर्जनशीलतेने आणि निर्भीडपणे समाजातील विदारक सत्य नाटक-चित्रपट लेखनातून मांडणारे विजय तेंडुलकर अशा दिग्गजांनी आपल्या बालपणाची केलेली एक मनोहारी सफर वाचायला मिळते.

आर्थिक परीस्थिती फारशी चांगली नसली तरी संगीताची श्रीमंती असणाऱ्या सुब्बलक्ष्मी वयाच्या ८० व्या वर्षीदेखील तार सप्तकात गंधार लीलया सादर करू शकतात. छोट्याशा लाजऱ्या बुजऱ्या या मुलीने आपल्या मधुर, कोकीळकंठी स्वरांनी सर्वांना लहानपणीच जिंकून घेतले. लहानग्या कुंजम्माला जाईच्या फुलांचं खूप वेड, पण फुलं घ्यायला परवडणार कुठून ? गोळ्या-चॉकलेट तर आवाक्याबाहेरचे ! चिंच, मिरची, मीठ एकत्र कुटायचं, त्याचे छोटे छोटे गोळे करायचे, त्यात काडी खुपसायची, की झाले आंबटगोड चवीचे लॉलीपॉप तयार. रेडिओ तर नव्हताच, पण जिन्यातल्या खिडकीत बसलं की शेजाऱ्यांकडील रेडिओवरील कार्यक्रम सहज ऐकू येत. हिंदुस्थानी संगीताची ओळख छोट्या कुंजम्माला त्या खिडकीत बसून तर झाली.

''कोणत्याही गोष्टीचं जबरदस्त वेड असेल तर काहीही अशक्य नाही,'' असं म्हणणारे एम. एफ. हुसेन यांनी आपलं चित्रकलेचं वेड जोपासण्यासाठी जे जे उद्योग लहानपणी केले ते वाचताना तर वाचकाची हसून हसून पुरेवाट




होते. अभ्यासात कधीच लक्ष न लागल्यामुळे ''यापुढे शाळा बंद'' असं छोट्या हुसेननं जाहीर करून टाकलं आणि रंग खरीदण्यासाठी शाळेची पुस्तकं देखील विकून टाकली. शिवाय शाळेत जाऊन वेळ वाया घालवण्यापेक्षा चित्रं काढून त्या वेळेचा सदुपयोग करावा, असं ठरवून अक्षरश: जमिनीवर, कपाटावर, भिंतीवर, प्लेटवर, अगदी रस्त्यावरसुद्धा चित्रं काढून आपली आवड जोपासली.

मात्र अमजद अली खान यांना 'आयुष्यात शिक्षणच महत्त्वाचं आहे' याची लहानपणापासूनच जाणीव असल्याने ते मनापासून अभ्यास करीत. तरीही काही विषय अवघड जात. सरोद आणि तबल्यावर कितीही अवघड बोल ते लीलया वाजवत असले तरी साधी साधी गणितं सोडवताना मात्र त्यांची पार भंबेरी उडत असे.

मुंबईच्या गल्लीमधून आपल्या छोट्याशा घरातून, त्या अजब दुनियेकडे डोळे विस्फारून बघणारा, तासन्तास निरीक्षण

करणारा, एकलकोंडा, स्वत:तच दंग असणारा तो छोटा मुलगा म्हणजेच विजय तेंडुलकर. त्यात त्याच्या बाबांना भविष्य बघायचा नाद. एकदा एका धंदेवाईक ज्योतिषानं ''या मुलाला फार तर म्युनिसिपालटीमध्ये एखादी फालतू नोकरी मिळाली तर मिळू शकेल,'' असं भाकित वर्तवलं आणि छोटा विजय हादरून गेला. त्यानंतर वडिलांनी शाळेत पाठविण्याचा घेतलेला ध्यास, इंग्रजीचा गृहपाठ पूर्ण नसताना खावा लागलेला मार, या साऱ्या गमतीजमती वाचताना वाचक रमून जातो.

काव-काव करणाऱ्या कावळ्यांविषयी ज्यांचे प्रेम जराही कमी झालेले नाही. स्वच्छंद बालपणी कावळ्यांची चित्रे काढताना जितका आणि जसा आनंद मिळे, तितकाच आनंद आजही मिळणाऱ्या, आर. के. लक्ष्मणांना 'कावळा' या पक्ष्याविषयी जबरदस्त आकर्षण वाटते. आपल्याला सामान्य वाटणारा कावळा त्यांच्या दृष्टीनं मात्र चतुर, उत्साही, सारखा धडपडणारा आणि कोणत्याही परीस्थितीत तरून जाणारा असा आहे.

बालपणीच्या नीलरंगी विश्वामध्ये पुन्हा एकदा रमून गेलेल्या लक्ष्मणांना भुतांच्या गोष्टी सांगून भंबेरी उडवणारा माळीबुवा आठवतो. तेंडुलकरांचे शिक्षकच वर्गात आपण पाहिलेल्या चित्रपटांच्या गोष्टी रंगवून सांगत. अमजद अली खान सरोदवर चित्रपट गीते वाजवून वर्गमित्रांना खूश करत.

छोट्या दोस्तांनो, या पुस्तकातून हे कलावंत आपल्या शैशवातील आठवणींना उजाळा देत आहेत. मोठेपणी ज्या कलाक्षेत्रात विपुल यश कमावलं, त्या कलेविषयी कशी गोडी निर्माण झाली याचं हृदगत ते तुम्हाला सांगत आहेत.

या विख्यात कलाकारांच्या जीवनातील शैशव ऋतूची वर्णनं वाचून तुमच्यादेखील मनात विचार आल्याशिवाय राहणार नाही, ''अरे, मीही सर्वांपेक्षा फारसा वेगळा नाही. कदाचित मलादेखील जमेल की.....''

उत्कृष्ट पुस्तक निर्मितीचे पारितोषिक मिळालेल्या या पुस्तकाच्या लेखिका गौरी रामनारायण या 'इंडियन एक्सप्रेस', हिंदू', 'फ्रंटलाईन' यांमधून गेली १० वर्ष कला आणि कलाकार या विषयावर लिहीत आहेत. त्यांचे हे पुस्तक आजच्या आंग्लाळलेल्या तरुणांसाठीही आहे.

भारतातील सांस्कृतिक आणि सर्जनशील आघाड्यांवर काय चाललं आहे, याचा या तरुणांना पत्ताही नसतो. थोर भारतीय कलाकारांच्या बालपणीच्या आठवणी वाचून आजच्या तरुण पिढीमध्ये त्यांच्याबद्दल आत्मीयता निर्माण होईल. या प्रतिभावंतांविषयी, वैभवशाली भारतीय संस्कृतीविषयी औत्सुक्य उत्पन्न होऊन, एक भावनिक बंध निर्माण होईल, अशी खात्री वाटते.

ऋतु शैशव,
('पास्ट फॉरवर्ड' ले.-गौरी रामनारायण या पुस्तकाचा अनुवाद)
अनुवादिका-उल्का राऊत
रोहन प्रकाशन, मूल्य : ९५ रुपये

***

- वर्षा तोडमल
तोडमल नर्सिंग होम,
सोमवार पेठ, पुणे

# माझी मैत्रीण सोना

- सुहासिनी देशपांडे



नव्या नोकरीच्या जागी रुजू होताच बाबांचं पत्र मला मिळालं होतं. बाबांनी नव्या नोकरीच्या ठिकाणचं वातावरण, कामाचं स्वरूप, कामातली आव्हानं यांचं वर्णन केलं होतं; ते खूप खुश दिसत होते. त्यामुळं माझी उत्सुकता शिगेला पोहोचली होती. कधी एकदा परीक्षा आटोपते नि मी आई-बाबांकडे जातो असं झालं होतं!

सुट्टीत त्या नव्या घरी आलो आणि खरंच खूप हरखून गेलो. प्रचंड 'झू'चा शेकडो एकरांचा परिसर आणि त्याच्या अगदी मागच्या टोकाला घर-खरंच स्वप्नातल्यासारखं! ऐसपैस बैठी बंगली, मोठं अंगण, मोठी बाग. बाबा या मोठ्या नॅशनल झूऑलॉजिकल पार्कचे मुख्य व्हेटर्नरी डॉक्टर म्हणून रुजू झाले होते. अगदी कबुतरं-काकाकुवांपासून ते वाघ-सिंहांपर्यंत तऱ्हेतऱ्हेचे पशु-पक्षी असलेलं प्राणीसंग्रहालय हे बाबांचं नवं कार्यक्षेत्र होतं.

स्टेशनवरून बाबांबरोबर घरी आलो तो पहिली सलामी मिळाली ती सोनाची ! रिक्षातून उतरून फाटक उघडून अंगणात शिरतो तो पाठोपाठ झुलणाऱ्या घंटेचा नाद आला. चमकून बघितलं तर महाकाय हत्ती खुशाल आमच्या मागोमाग फाटकातून आत आला होता !

'बाबाऽ...' म्हणून मी घाबरून बाबांच्या मागे लपलो.

'घाबरू नकोस. ही आपली नवी मैत्रीण - सोना!' बाबांनी ओळख करून दिली.

'डाकसाब, पावनं जणू ?' - हत्तीवर बसलेल्या शिसवीसारख्या काळ्याभोर रंगाच्या तरुण पोरानं विचारलं. 'पाहुणा नाही, गन्ना ! आमचे चिरंजीव रोहित !'

सोनाचा माहुत गन्नानं सोनाच्या गंडस्थळावर प्रेमानं थोपटलं आणि इशारा समजून सोनानं माझ्याकडे सोंड उंचावून गंमतीदारपणे मान झुलवीत मला अभिवादन केलं. तोवर सोनाची नजर बाबांच्या हातातील बास्केटवर गेली. बास्केटच्या वरच पिवळ्याधमक केळांची फणी होती. कोणाच्या लक्षात येण्याच्या आत, सोंड लांब करून सोनानं खुश्शाल दोन-तीन केळी तोडून मटकावली पण ! आम्ही सारे कौतुकानं हसलो; तशी सोनाही माना वेळावत मिष्किलपणे माझ्याकडे बघून हसली. त्यानंतर आपल्या गळ्यातील घंटा वाजवत सोना निघून गेली.

आमच्या घरासमोरून जाणारा रस्ता खाली थेट नदीकडे जात होता. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ सोनाच्या आमच्या घरावरून पाणवठ्याकडे फेऱ्या होत. इतरही हत्ती, उंट इथूनच पाण्यावर जात असत, पण सोनानं त्या सगळ्यांमध्ये आपलं विशेष स्थान निर्माण केलं होतं.

रोज संध्याकाळी 'झू'मधल्या विशिष्ट मार्गावर मुलांना पाठीवर बसवून हत्तींच्या फेऱ्या होत. सोना कधी या फेऱ्या करतेय हे मला तिच्या गळ्यातल्या घंटानादानं पक्कं ओळखता येत असे.

थोड्याच दिवसात सोना माझी चांगलीच मैत्रीण बनली.



**बगळ्यांचा थवा माळ ओळून पंखांची**
**तळ्यातल्या मेघुटांचे थेंबथेंब वेची.**

तिच्या साऱ्या लकबी मला माहीत झाल्या होत्या. सोनाला श्वास सोडताना मध्येच 'फ्रॅऽऽ' करून आवाज काढायची सवय आहे हे माझ्या लक्षात आलं.

'काय रे गन्ना ? लोकांनी दिलेली नाणी सोनानं तुला दिलेली दिसत नाहीत सगळी ! सोंडेत दडवून ठेवलेली दिसताहेत !' मी गन्नाला चिडवलं ! बाबा मात्र थोडे विचारात पडले. सोनाच्या सोंडेवरून हात फिरवत म्हणाले -'गन्ना, ही नेहमी असा आवाज काढते का रे !'

'काय की डाकसाहेब ! अलीकडे लई चावाट झालीय बघा. पाठ फिरली रे फिरली की फर्रर्, आवाज काढती आन् अशी माना वेळावती !'

सोनांचं हे फुरफुरणं पुढल्या काही दिवसांत जरा जास्तच वाढलं. आपल्याकडे लक्ष वेधून घ्यावं अशा हेतूनं ती असले 'नखरे' करते हे गन्नाचं मत होतं, ते खोटं नसावं !

एक दिवस 'जनरल चेक-अप' साठी बाबा राऊंड मारत असताना मीही त्यांच्या बरोबर गेलो. हत्ती-खान्यात सगळ्या हत्तींची बाबांनी तपासणी केली; तेवढ्या वेळात सोनाचं सारखं आपलं फ्रँऽऽ फ्रँऽऽ चाललेलं. बाबा सोनाला तपासत असताना, सोना सोंडेनं त्यांच्या खांद्याला, पाठीला घासत होती. तिच्या डोळ्यांत वेदना स्पष्ट दिसत होती. या वेळी तिचं माना वेळावणं हे कळवळून विनवण्या केल्यासारखं जाणवतं होतं. 'डॉक्टर, बघा ना माझ्याकडं ! मी नखरे नाही करीत हो !' - असंच जणू ती म्हणत होती. सोनाच्या डोळ्यांतून झर्रकन पाण्याची धार ओघळली, तेव्हा बाबांनी तिला थोपटलं आणि गन्नाकडे वळून म्हणाले -'गन्ना, उद्या दवाखान्यात घेऊन ये. बघू जरा नीट तपासून.'

एवढ्या वेदना होत असूनही सोनाचा थट्टेखोरपणा मात्र थांबत नव्हता. आपल्या सोंडेच्या टोकात गवत घेऊन तिनं भुर्रकन् माझ्या डोक्यावर टाकलं आणि पायांतले साखळदंड वाजवत जागेवर नाचत तिनं माझ्याकडे पाहून मान वेळावली.

बाबांनी दुसऱ्या दिवशी दवाखान्यात यायला सांगितलं होतं खरं. पण आदल्या संध्याकाळीच गन्ना धापा टाकत आला.

'डाकसाहेब, सोनाच्या नाकातनं रगात गळतंया !'

तत्क्षणी बाबा गन्नाबरोबर निघाले. अर्थात मीदेखील बरोबर गेलोच. सोना स्तब्ध उभी होती. तिच्या सोंडेच्या टोकातून रक्त ठिबकत होतं. बाबांनी चिंताक्रांत होऊन सोनाच्या सोंडेवरून प्रेमानं हात

फिरवला. त्यांना काही अंदाज येत नसावा.

'बाबा, काय असेल हो ?'

'अल्सर किंवा ट्यूमर....?'

'ट्यूमर ? म्हणजे कॅन्सर ? हत्तीनां कॅन्सर होतो ?' मी विचारलं.

माझ्या पाठीवर थोपटत बाबांनी मला गप्प केलं. ते स्वत: विचारात बुडून गेले. मग म्हणाले

'गन्ना, सोनाला आता काही खायला देऊ नकोस. आता काय पाणी पील तेवढं पिऊ दे. पण त्यानंतर पाणीपण देऊ नको.'

'जीऽ डाकसाहेब' गन्ना काळजीच्या सुरात म्हणाला.

आम्ही घरी आलो तर बाबांचं कशात चित्तच नव्हतं. त्यांचे सारखे फोन सुरू होते. मेडिकलच्या ग्रंथांमधून संदर्भ वाचणं चालू होतं. त्यांच्या करियरच्या काळात प्रथमच त्यांना अशा तऱ्हेची केस हाताळायला मिळत होती. अनेक फोन आणि खूप विचारांती त्यांना काहीतरी मार्ग सापडला असावा.

'बाबा, ऑपरेशन करणार तुम्ही सोनाचं ?'

'प्रॉब्लेम कुठं आहे नेमका ? कशा स्वरूपाचा आहे ? हे समजल्याशिवाय नाही.'

'मग तुम्ही एवढी सहा फुटी सोंड तपासणार तरी कशी ?'

'तीच मोठी समस्या होती. सुटली!! अशाच प्रकारची एक केस मेडिकल जरनलमध्ये नेमकी वाचायला मिळाली !' बाबा आनंदानं म्हणाले.

'खरंच बाबा ?सांगा ना काय ते!'

'बस् बस् ! रोहित आता प्रश्न नकोत. बाबांना नीट विचार करू देत. सारं नियोजन करू देत. तू

नुसतं निरीक्षण कर' आईनं मला मध्येच अडवत म्हटलं.

सकाळी सकाळी बाबांचे एक मित्र काहीतरी उपकरण बाबांच्या हाती देऊन गेले. आतड्याची एण्डोस्कोपी करण्यासाठी वापरला जाणारा एण्डोस्कोप होता एवढं मला त्यांच्या बोलण्यावरून समजलं.

बाबा सारी तयारी करीपर्यंत गन्ना सोनाला घेऊन आला. आज तो तिच्यावर स्वार होऊन आला नव्हता

तर तिच्या बरोबरीनं चालत आला.

त्याचा चेहरा काळजीनं ग्रासलेला होता.

सोनाला वेदनांनी त्रास होत असावा. त्याहीपेक्षा तिच्या खाण्यापिण्याच्या बाबतीत तत्पर असलेल्या गन्नानं तिला कालपासून खाणं तर सोडाच पण पाणीही दाखवलं नव्हतं, याचं तिला मोठं दु:ख वाटत असावं.

सोनाच्या सोंडेवरून हात फिरवत मी म्हटलं - 'छोनी, काळजी करू नकोस हं !' बाबा तुला लगेच बरं करतील. तू बरी झालीस की चॉकलेट देईन हं तुला.'

'छोटे डाकसाहेब, काल सांजपासून काही नाही हो पोटात तिच्या. भूक जरा निभत नाही माझ्या सोनीला...' एवढं बोलताना गन्नाला हुंदका दाटून आला. सोनानं कानांची सुपं फडफडवली आणि मलूलपणे

गन्नाच्या खांद्याला अंग घासू लागली.

जणू गन्नाचं दु:ख तिला समजलं होतं.

बाबांनी भली मोठी सिरींज घेऊन एकीकडे सोनाला चुचकारत, तिच्याशी प्रेमानं बोलत तिला इंजेक्शन दिलं, काही मिनिटांतच सोनाची शुद्ध हरपली. गुढघे मुडपून जमिनीवर निपचित पडली.

बिचारा गन्ना कसनुसा झाला. डोळे झाकून त्यानं क्षणभर आकाशाकडे तोंड करून सोनासाठी प्रार्थना केली. बाबांचे हात यांत्रिकपणे काम करीत होते. कसलं तरी जेल लावून बाबांनी त्या उपकरणाची लांबलचक नळी अगदी हलक्या हातांनी सोनाच्या डाव्या नाकपुडीतून आत सरकवली. नळीच्या टोकाला असलेला दिवा मोठ्या बोगद्यातून प्रवास करीत आत आत चाललेला होता. त्या उपकरणाच्या एका बाजूला असलेल्या 'आयपीस'ला बाबांनी डोळा लावला आणि गन्नाला त्यांनी सांगितलं - 'हलके हलके नळी पुढं जाऊ देत. कुठे अडल्यासारखं वाटलं ना, तर थांब तिथंच.'

आयपीसमधून आतल्या दिव्यावर नजर ठेवून बाबा एकीकडे हातानं त्या उपकरणाची नियंत्रणं सांभाळत

होते. मधूनच गन्नाला सूचना देत होते-

'हांऽ जाऊ देत. अजून जाऊ देत. हळूच सावकाऽश... अरे अरे! थांब थांब !

सोनाचा प्रॉब्लेम सापडला होता. एकाग्र चित्तानं ते आयपीस मधून 'त्या' अडथळ्याचं निरीक्षण करीत होते. मग काही बाही नोटपॅडवर टिपून घेत होते.

हातभर आत गेलेली नळी त्यांनी बाहेर काढली, तिच्या टोकावर

असलेला दिवा बंद केला आणि बाबा

गन्नाच्या पाठीवर थोपटत म्हणाले

'काळजी करू नको बेटा. सारं ठीक होईल.'

'काये पण डाकसाहेब?'

'काही नाही रे ! पॉलिप आहे साधा.'

'पाईऽप ?'

'पाईप नाही, गन्ना. पॉलिप - म्हणजे खरं तर कोंब. मासांची वाढ झालीय आत. ते काढून टाकू.

'बाबा, काय असतो पॉलिप ? कशामुळे होतो ?'

'सांगू ? आपल्याला नाही का नाकात माळीण होते ? असं समज, सोनालासुद्धा माळीणच झालीय !- फक्त तिच्या 'नाका'च्या आकाराच्या प्रमाणात !' बाबा हसतहसत म्हणाले.

सोनाच्या नाकपुडीत साधारण अडीच फुटांवर मांसाचा गोळा वाढला होता. श्वसनाच्या वेळी घर्षण होऊन तिथं जखम झाली होती आणि सोनाच्या नाकातून रक्त आलं होतं. तो सगळा



हात फिरविता प्रेमाने भाव प्रकटे वात्सल्याचा ।
वेदनेला द्या दिलासा मायेच्या स्पर्शाचा ।
शंभरावा अंक

रक्ताळलेला गोळा बाबांच्या उपकरणातून डोळा लावून मी बघितला आणि मी म्हटलं -

'बाबा, हा गोळा काढायचा तर सारी सोंड कापणार तुम्ही ?'

माझं बोलणं ऐकून गन्ना तर थरथरूच लागला.'डाकसाहेबऽ , डाकसाहेऽब' करायला लागला. बाबांनी त्याला धीर दिला.

हत्तीच्या सोंडेचं ऑपरेशन करणं सोपं नव्हतं, असंख्य स्नायू आणि रक्तवाहिन्यांचं जाळं यांची रचना समजावून घेऊन मगच ते करावं लागणार होतं.

माझ्या प्रश्नाला सावकाशीनं उत्तर देत बाबा म्हणाले -

'रोहितबाबू, फार काळजीपूर्वक आणि अभ्यासपूर्वक करावं लागणार आहे हे. जरा जरी चूक झाली तर सोनाची सोंड लुळी पडण्याचा धोका आहे. मग तिला खाणं-पिणं मुष्किल होईल. आणि गन्नासमोर प्रश्न विचारू नकोस. त्याच्या सहकार्यानंच सोनाचं ऑपरेशन व्यवस्थित होणार आहे. त्याचा धीर खचला तर तो हवं तसं सहकार्य देऊ शकणार नाही.'

मग बाबांनी ऑपरेशनचा दिवस निश्चित केला. दोन दिवस आधी सोनाला थोडं थोडंच खाणं द्यायचं होतं. मग १२-१४ तास पाणीसुद्धा नाही. मी हा सर्व वेळ गन्नाबरोबरच लुडबुड करीत होतो. सोनाला चुचकारायला, गन्नाला धीर द्यायला आणि बाबांना ऑपरेशनसाठी हवी तशी अनुकूलता निर्माण करायला. मला हे मोठं आव्हानच वाटत होतं.

बाबांनी ऑपरेशनची सिद्धता केली. त्यापूर्वी शंभर वेळा तरी त्यांनी मनातल्या मनात ते ऑपरेशन करून पाहिलं असावं. कितीतरी ग्रंथ

ते वाचत होते. कागदावर काही लिहीत होते, आकृत्या काढून पाहात होते !

ऑपरेशनच्या दिवशी सकाळी गन्नानं आणि मी मिळून प्रार्थना केली. बाबांनी सोनाच्या सोंडेवर अचूक माप घेऊन खूण केली. मग सोनाला भूल देण्यात आली. काही क्षणांतच सोना बेशुद्ध पडली. तशी अत्यंत कुशल आणि तत्पर हालचाली करून बाबांनी तिच्या सोंडेवर उभा छेद दिला आणि मांसाचा वाढलेला गोळा काढून काचेच्या मोठ्या कटोऱ्यात पाण्यात ठेवून दिला. ऑपरेशन होत असताना गन्ना सोनाच्या उशाशी बसून तिचं मस्तक हलकेहलके, थोपटत होता.

ऑपरेशन होताच बाबांनी सोनाची जखम चटकन बंद केली. आयुष्यात प्रथमच केलेलं आणि अगदी क्वचितच आढळणारं ऑपरेशन कितपत यशस्वी झालंय, याची बाबांना उत्सुकता लागून राहिली होती. काही वेळानं सोनाच्या सोंडेची हालचाल सुरू झाली. तिनं हळूच कान फडफडवले आणि मग एक मोठा उच्छ्वास टाकून सोना चटकन चार पायांवर उभी राहिली.

'सोनाऽ, ठीक आहेस ना ? मी सोनाला कुरवाळत विचारलं. तशी तिनं फक्त अलगद डोळे मिटले अन् उघडले - 'अगदी ठीक आहे. पण थकलेय खूप.' हिला बादलीभर पाणी आणून द्यावं. गेल्या कितीतरी तासांत पाणीसुद्धा प्यायलं नाही बिचारीनं- असा विचार माझ्या मनात येतोय तोच बाबा म्हणाले- 'हे बघ गन्ना, थोडे दिवस तिला सोंडेनं पाणी पिऊ देऊ नकोस. जखम बरी होईतो तिला पाईपानं पाणी पाज.'

मग मी न् गन्ना तिला नळीनं पाणी पाजत होतो काही दिवस. तसं पाणी पिण्यानं तिचं समाधान होत

नव्हतं. पण गन्नानं खूप हुशारीनं सोनाला सांभाळलं. गन्नाला मदत करायला

म्हणून मीही लुडबुडत होतोच.

ऑपरेशनच्या दुसऱ्याच दिवशी मी बाबांबरोबर त्यांच्या लांबलचक शेडवजा क्लिनिकमध्ये बसलो होतो. बाबा मला सोनाच्या ऑपरेशनमधील काही मजेशीर बारकावे समजावून सांगत होते. तोच सारी खोली अंधारून गेली म्हणून आम्ही चमकून वर पाहिलं तर सोना समोर उभी ! गळ्यातील घंटा सोंडेनं तिनं अशी काही पकडली होती की तिचा आवाजही आला नाही. पाठोपाठ गन्ना धापा टाकत आला -

'डाकसाहेब, पाहिलंत कशी चावट आहे ! अहो, गवत

साफ करीत होतो तर माझ्या नकळत मांजराच्या पावलानं निसटली आन् थेट इथं आली.'

सोनाच्या पाठीवर थाप मारत बाबा कौतुकानं हसले - म्हणाले -

'अरे, ऑपरेशननंतर फॉलो अपसाठी आलीय ! येऊ देत.'

फार दिवसांनी सोनाच्या डोळ्यांत पूर्वीचे भाव होते !

या गोष्टीला आता दीड-दोन वर्षं तरी झाली असतील. दहावीच्या परीक्षेनंतरच्या सुट्टीत आई आणि मी आजोळीच गेलो. त्यानंतर कॉलेजचं वर्ष. मी सुट्टीलाच घरी आलो. मधल्या काळात सोनाची आठवण यायला वेळच नव्हता. पण आज स्टेशनवरून घराकडे परतताना सोनाचीच खूप आठवण येत होती. कशी असेल ? ओळखेल का आपल्याला ? रिक्षातून उतरतोय, पैसे देऊन सामान उचलून आत शिरतोय तोच मागनं चिरपरिचित झुलणाऱ्या घंटीचा आवाज आला. मी मागे वळून पाहिलं- अरेच्या ? सोऽ नाऽऽ ? माझ्या हृदयातून आनंद ओसंडून वाहात होता. नक्कीच !

पण सोना आज एकटी नव्हती. तिच्या पोटाखालून सुरक्षितपणे चालणारं सोनाचं गोंडस पिल्लूही बरोबर होतं ! बाल गणपतीसारखं दिसणारं !!- सोना झुलत माझ्यापाशी आली. माझ्या खांद्यावर तिनं सोंडेनं प्रेमानं थोपटलं - 'कसा आहेस ? ठीक आहेस ना ?' केवळ स्पर्शातून ती माझी चौकशी करीत होती.

तोच आईच्या कुशीतून बाहेर दौडत सोनाचे चिरंजीव माझ्यापाशी आले. आपल्या चिमुकल्या कोवळ्या सोंडेनं त्यानं माझ्या खिशाची चाचपणी केली आणि खुशाल माझ्या शर्टच्या खिशातली दोन चुईंगमस् पळवून मटकावून टाकली बेट्यानं !

तशी लटक्या रागानं सोनानं छोट्याच्या पाठीत चांगला धपका ठेवून दिला !

हंऽऽ सोना बदलली होती ! विसरली नव्हती काही ! पण सोना बदलंली होती नक्कीच !

सोना आता 'आई' झाली होती!!

***

सुहासिनी देशपांडे
३ पुण्यश्री अपार्टमेंट्स,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड,
पुणे २९.



पिल्लासाठी तिचे मन, फांदी होऊन झुलते
गतजन्मीचे हे नाते ओळख घेऊन हे आले.



# शेवटचा साथी

पर्ण पुष्प फलभारे होता हासत वृक्ष महान
शीतल छाया, फळे मधुरतम, सौख्याचेच निधान
विसावती ते पथिक मार्गिचे, दुवे त्यास देत
कितीक वर्षे, उभा वृक्ष तो, अभय जगा देत
त्या वृक्षावर खगगण होता राहात आनंदे
एक वेगळे निर्मुन अपुले जग ते अति मोदे
कालचक्र पण उलटे-सुलटे फिरता एकाकी
वीज कोसळे त्या वृक्षावर, क्षणात हो माती
शुष्क वृक्ष पाहुन उसासे मुखातून निघती
आणि खगांचा थवा उडाला नव्या जगासाठी
सान एकला पक्षी पाहुन त्या वृक्षावरती
'कशास येथे फुका बैसशी?' प्रश्न त्यास पुसती
'अशक्य मजला वृक्ष सोडणे' पक्षी तो वदला
'ज्याने आम्हा सदा रक्षिले साहुन दु:खाला
आपत्काली कसा अंतरू माझ्या मित्राला
इथेच माझी अर्पिन ह्याला मी जीवनमाला'
नयनातून पक्ष्याचे गळता अश्रू मग दोन
वृक्ष पुन्हा मग बहरुन उठला गात गात गान

***

- वसंत जोशी, वृंदा निवास,
कर्जत, जि. रायगड.


# रविंवार

'रविवार' ऐतखाऊंचा असतो 'आईतवार'
आमच्यासाठी त्या दिवशी कामं असतात फार
वहिनीसोबत झाडाव्या लागतात, तिळाच्या पेंढ्या
दादासोबत सोलाव्या लागतात, नारळाच्या शेंड्या
काकासोबत लावावा लागतो, देवाला शेंदूर
बैलासोबत पाराभोवती खेळावा लागतो बेंदूर
काकूला द्यावं लागतं, पाणी आडाचं शेंदून
गड्यासाठी न्यावं लागतं, भाकरीचं गठुडं बांधून
गोऱ्हा चारत धुऱ्यावर, माराव्या लागतात चकरा
बकऱ्यासोबत धावत, खेळाव्या लागतात टकरा
सांज्चा पार झाला की, गाई येतात चरून
एकेकीला बांधावं लागतं, खुंट्यावरती धरून
दिवस मावळता, वासरं सोडावी लागतात
तांब्यात फेसाळ, दुधं काढावी लागतात
दुधात चुरून मग, खातो आम्ही भाकर
हात धुऊन मोकळा, देतो आम्ही ढेकर
आजीच्या गोधडीला, येतो तपकिरीचा वास
पण मग गरमगरम, झोप लागते खास
झोपेमध्येच ऐकू येते, चिमण्यांचे पारायण
झोप मोडून जागा होतो, मग सूर्यनारायण
रविवारी दिवसभर, खूप करून काम
आजीच्या गरम गोधडीत, रात्री करून आराम
पांगलेले दप्तर, करून गोळा
सोमवारी सुरू होते, पुन्हा आमची शाळा



***

– इंद्रजित भालेराव,
एकनाथनगर,परभणी



# सूर गवसलेले बीज!

**– प्रवीण दवणे**

कार्यक्रमानंतर कितीतरी मुलं आदराने, कौतुकाने भेटत असतात. संगमनेर तालुक्यातल्या आतल्या गावात एका शाळेच्या कार्यक्रमात सचिन असाच मला भेटला. सगळे निघून गेल्यावरही रेंगाळणारा, नुसतंच बघणारा; पण जवळ येऊन काही बोलायला घाबरणारा...

बराचसा सैल, दुसऱ्या कुणाचा असावा असा सदरा, तशीच विजार, चपलेचा एक अंगठा उचकटलेला, सावळा, घामेजलेला चेहरा; पण या साऱ्या गोष्टींकडे सहज दुर्लक्ष व्हावं असे चमकदार डोळे सचिनला लाभले होते. मीच जवळ बोलावून ओळख करून घेतली.

'काही विचारायचंय् का तुला ? बावरू नकोस; ये जवळ ये.'

'सर, मुंबई किती मोठी आहे हो?' अनपेक्षित प्रश्न.

'खूप मोठी - तुला बघायला आवडेल ?'

'हो, मुंबई बघणं माझं स्वप्न आहे !'

'मुंबईत तुला काय बघायला आवडेल ?'

'समुद्र -'

मी अवाक् - मला वाटलं, तो म्हणेल अमिताभ बच्चनचा बंगला बघायला आवडेल किंवा असंच काही तरी-

पण त्याला समुद्र बघायची ओढ होती. मी म्हटलं -

'ये माझ्याकडे - दाखवीन तुला समुद्र !'

ही घटना माझ्या दृष्टीने साधी होती. पण ती साधी राहिली नाही; म्हणून तर मी तुम्हाला ती सांगतोय.

सात-आठ दिवस गेले -

पहाटे पाच वाजता बेल वाजली.

'इतक्या सकाळी कोण ? दूधवालाही साडेसहाला येतो -' मनात म्हणत मी दार उघडलं -

'सर - ओळखलं का ?'

'अं ?'

'कार्यक्रमाला भेटलो होतो - संगमनेर'

'हां... हां... ये... ये... !'

घरात शिरताच त्याची उत्सुक नजर भिरभिरली -

'तू - आत्ता अन् एकटा ?'

'हो. ट्रकवर बसून आलो !

'ट्रकवर ?'

माझी उरलेली झोपही उडाली

'घरी कुणाला माहिती नाही ?'

'का-काय ?'

'सर, पाणी?

खरं तर पाणी मला हवं होतं. कोण कुठला पोरगा पहाटे ट्रकमधून येतो आणि एकटा - संदर्भ फक्त एका भेटीचा.

'अरे, पण घरी शोधाशोध ?'

'रात्री पोहोचेन पुन्हा - पण सर तुम्ही कबूल केलंय, समुद्र दाखवीन म्हणून !'

सिमेंटच्या फ्लॅटमध्ये राहात असूनही माझे धाबे दणाणले होते. घरी शोधाशोध झाली;

पोलिस तपास सुरू झाला तर काय ! मी आणि सचिन फिरतोय आपले समुद्रावरून -

.... आयुष्यात पहिल्यांदाच मी पहाटे साडेसहा-सातला समुद्रावर गेलो असेन. कुठून तरी समुद्र दाखवून त्याला खरं म्हणजे मला मोकळं व्हायचं होतं.

टॅक्सीतून उतरलो न् त्याच्या डोळ्यांनी मी समुद्र पाहिला -

अवाक् होऊन सारी निळाई न् अथांग सागर तो जसा काही हृदयात सामावून घेत होता -

मी बरोबर आहे; किंबहुना मी त्याला इथं आणलंय हेही तो विसरून गेला होता.

कित्येक मिनिटं जशी काही समाधीच लागली होती.

'निघायचं ?'

म्हटलं अन्-'अं ?' डोळ्यानंच विचारीत त्याची तार - मीच घड्याळाशी जोडली. डोळे भरले होते त्याचे एका अननुभूत अशा आनंदाने. किनाऱ्यावरून फिरताना खरा सचिन मला कळला - खरं तर दुसरीच भेट - आठवीतला सचिन - सचिन पवार परिस्थितीशी निकराने लढत होता. वडील म्हणत होते 'नाही शिकायचं - फक्त शेती करायची !'

कित्येकदा दप्तर लपवलं; वह्या फेकून दिल्या; पेनं लपवली -

आईचं मधल्यामध्ये मरण - 'तू शेफारून ठेवलयस' म्हणून तिला रोज जबरदस्त मारहाण. मला आनंद यादवांचं 'झोंबी' आठवलं. एक 'आंद्या' मला याची देही समोर दिसत होता.

कसं कसं शिकतात ही मुलं !

सचिन सांगत होता - 'वडिलांनी एखादा दिवस मारलं नाही तर झोप नाही येत; आईसाठी मी घर सोडत नाही. वडिलांनी मारलं, तरी नंतर ती जवळ घेते; अंगाला बाम लावते; पाठ शेकते.'

हे सांगताना सचिनचा चेहरा तक्रारीचा नव्हता ; हसत-मजेत सांगत होता. मजकूर आणि चेहरा यांचा मेळ बसत नव्हता -

वडिलांबद्दल चीड नव्हती, सूडबुद्धी नव्हती. 'सर, वडील अशिक्षित आहेत; त्यांना शिक्षणाचं महत्त्व कळलेलं नाही. मी शिकायला नको असं नाही; शेतात मजूर परवडत नाही. एक मुलगा शाळेत वेळ फुकट घालवतो हेच त्यांना मान्य नाही. केव्हातरी त्यांना चूक कळेल, मी शेती करणारच; पण आठवी नापास शेतकरी नाही होणार; कृषी विद्यापीठात जाऊन आधुनिक ज्ञान घेणार शेतीचं; आणि पदवीधर शेतकरी होणार !'

सचिन फुटणाऱ्या लाटेसारखं बोलत होता. आठ दिवसांपूर्वीचा बावरलेला - कोपऱ्यात उभा असलेला सचिन - न् हा ?

'सचिन, तेव्हा तर खूप संकोची वाटलास ?'

'हो सर; खरं तर आमच्या शाळेत बरीच मोठी माणसं येतात; छान बोलतात; पण नंतर पत्राचं उत्तरही देत नाहीत. तुम्ही लेखक -कवी - म्हटलं, बोललात छान पण खरंच मुंबईला आलो, तर दाखवाल समुद्र - भरवसा नव्हता -'

'म्हणजे परीक्षा घेतलीस माझी ?'

'परीक्षा मी कोण घेणार ? आदर होताच; वाढला - सर तुम्हीही प्रत्येकाला वेळ देऊ शकणार नाही. माहिती आहे. मलाही दिला नसतात; तरी मी समजून घेतलं असतं. सर एकच लक्षात ठेवलंय; ध्येय गाठायचंच. वाटेल ते होवो; जी संकटं येतील त्यांनाच दोस्त करायचं!'

'सचिन !'

आनंदाश्रू येण्याची वेळ हल्ली फार कमी येते.

'सचिन, हे सगळं तुला कुणी शिकवलं ?'

'परिस्थिती आणि पुस्तकांनी. शाळेतल्या वाचनालयातली एकूण एक पुस्तकं मी वाचली आहेत. चरित्रं वाचायला मला आवडतात. सर, अनेक चरित्रं वाचताना मला एक जाणवलं, अनेकांची बालपणं माझ्याचसारखी खडतर आहेत; पण मला काळजी आहे, पुढे माझं आयुष्य त्यांच्यासारखं उज्ज्वल होईल का ?'

...खरं तर त्याची धडाडी, बोलणं, निश्चय, निर्भयता या गुणांचा प्रत्यय मला येत होता.

त्याला भविष्याबद्दल प्रश्नचिन्ह असेल; पण मला खात्री होती.

दादरहूनच त्याला गाडीत बसवून दिलं.

पुढे त्याची अनेक पत्रं मला येत गेली. प्रत्येक पत्रात नव्या पुस्तकांची नावं त्याला हवी असायची.



**कळलेहि ना कसे ते सहजीच सांधलेले ।
एकाच त्या क्षणाला आयुष्य बांधलेले ।।**

सगळी पुस्तकं त्याला तिकडे मिळणं कठीण.

एकदा एक वीस-पंचवीस पुस्तकांचा गठ्ठाच त्याला पार्सलने पाठविला -

तेव्हा त्यानं लिहिलं,

'पूर्वी - वाचलंय, गुप्तधनाच्या शोधात गोष्टीतला राजकुमार असे; आज हे धनच मला शोधत आलंय.'

.. मध्ये पत्रात कळायचं -

'वडील आता मारत नाहीत. नववीला पहिला आलो; म्हणून मुख्याध्यापक घरी पुष्पगुच्छ घेऊन आले. वडिलांना वाटतं, बेणं काहीतरी करतंय. सर, शेतीत मी त्यांना मदत करतो. विहिरीला पंप बसवण्यासाठी कर्ज काढलं, त्याची कागदपत्रं बँकेत जाऊन मीच तयार केली. सर, हळूहळू आभाळ मोकळं होतंय...!'

माझ्या डोळ्यांतून मात्र ते बरसत राहिलं.

वर्षं कशी पटकन् जातात - का - गतिमान माणसाला ती पटकन् वाटतात ? कुणास ठाऊक ? सचिनला न् मलाही - प्रत्येकाचे खूप व्याप. वर्षं निघून गेली -

सगळ्या पत्रांना मी उत्तरंही देऊ शकलो नव्हतो; तरीही सचिन रुसत नव्हता. संवाद ठेवून होता. या साऱ्या संवादानं आज आनंदाचं शिखर गाठलं. पहाटेच सचिनचा फोन आला -

'सर - मी सचिन'

'हं बोल-'

'सर, ॲग्रिकल्चरल कॉलेजच्या हॉस्टेलमधून बोलतोय. फर्स्ट इयरला डिस्टिंक्शन मिळालं; आता त्यामुळे फ्रीशिप मिळालीय, सर तुमचं स्वप्न पूर्ण होणार - आता मी सहज पुढची वर्षं पूर्ण करणार?

माझं स्वप्न ?

होय,

सचिननं त्याचं स्वप्न माझ्या डोळ्यांत जडवलं होतं.

डोंगरातलं एक बलशाली बीज कडे - कपारीची कवचं भेदून आकाशाला कसं निमंत्रण देतं ते मला बघायचं होतं -

आकाश आता अगदी हाताच्या अंतरावर होतं -

बीजाला उमलण्याचा सूर गवसला होता.


***

- प्रवीण दवणे
ब/३०३, राजहंस, लुईसवाडी,
ठाणे - ४




सागराच्या साक्षीने, एक ध्येय पाहिले
तुमच्या मायेच्या स्पर्शाने, मार्ग माझे उजळले.
शंभरावा अंक






ग मुंबई येथे भरलेल्या पहिल्या ‘जागतिक मराठी परिषदे’त मान्यवरांना लामणदिवा भेट म्हणून देण्यात आला. आभाराचे भाषण करतांना पु.ल.देशपांडे म्हणाले,‘‘ या लामणदिव्याचे आम्ही डोळ्यांत तेल घालून जतन करू.’’ मग त्या वेळचे मुख्य मंत्री श्री.शरद पवार यांच्याकडे पाहून ते म्हणाले,‘‘ मात्र तेलाचे दर कमी करण्याचे तेवढे पाहा !’’

गग






खेडूत माणसापाशी मुळातच सूक्ष्म असा विनोद असतो, असं सांगून श्री. व्यंकटेश माडगूळकर त्यांच्या एका लेखात म्हणतात की ते एकदा सांगोल्याला चालले होते. वाटेत माण नदी लागते. त्यांना समोरून तरणाबांड पावणा येताना दिसला. खांद्यावर गळ, हातात मासे ठेवण्याची टोपली; हा सर्व अवतार पाहून व्यंकटेशांनी त्याला सहज विचारले,‘‘ काय नदीकडून आला?’’ तो म्हणाला, ‘व्हय’ त्याच्या टोपलीकडे पाहून व्यंकटेशांनी विचारलं,‘‘ काय मिळालं? मरळ, वाव (माशांची नावे)? त्यावर मान हलवून पावणा म्हणाला,‘‘ काय सुदीक नाई. नदीला आज एकादस (एकादशीचा उपवास) व्हती !’’

***

ग्रामीण कथालेखक श्री. शंकर पाटील यांना दरवर्षी दिवाळी अंकात ग्रामीण कथा पाठविण्यासाठी एका मासिकाचे संपादक विनंती करीत. त्यात लेखाच्या मानधनाविषयी, ‘‘लेखनास फूल ना फुलाची पाकळी मानधन दिले जाईलच’’ असा मोठ्या कौशल्याने उल्लेख केलेला असे. शंकर पाटील दरवर्षी कथा पाठवीत. पण लेखनाचे मानधन फारच कमी मिळत असे. त्याचा शंकररावांना संताप येई. एका वर्षी मात्र शंकररावांनी संपादकास धडा शिकवण्याचे ठरवले. संपादकांचे लेखाविषयी पत्र आल्यावर शंकररावांनी त्यांना उत्तर पाठवले ते असे- ‘‘ सालाबादप्रमाणे यंदाही कथा पाठवण्याविषयी आपले पत्र आले. त्याबद्दल आभारी आहे. आतापर्यंत पाकळ्या बऱ्याच आल्या. पण फूल मात्र आलेच नाही. यंदा आपण संपूर्ण फूलच पाठवावे. ते येताच कथा पाठवीत आहे.’’



माजी पंतप्रधान कै. मोरारजी देसाई यांनी एक वार्ताहर परिषद घेतली. त्यांचे वय त्या वेळी ८२ वर्षांचे होते. एका वार्ताहराने त्यांना ‘‘आपण पाच वर्षे पंतप्रधानपदी राहणार काय?’’ असा थोडासा गैरप्रश्न विचारला. ‘‘तुमचे वय इतके झाले आहे म्हणून विचारतो.’’ अशी पृष्टी दुसऱ्या वार्ताहराने जोडली. श्री. देसाई म्हणाले, ‘‘ माझी प्रकृती प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारापेक्षा चांगली आहे व इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे तर माझे वय १९ आहे.’’ २९ फेब्रुवारी ही त्यांची जन्मतारीख तोपर्यंत १९ वेळाच येऊन गेली होती. सभागृहात हंशा पिकला आणि वार्ताहर परिषद संपली.



साहसाच्या लाटेवर होऊनीया स्वार,
संकटावर मात करी हा छोटा बालवीर
शंभरावा अंक



.. स्मरणशक्ती सुधारण्यासाठी आज सरांनी दश सोप्या युक्त्या सांगितल्या.. त्यातली अेक मला आत्ता आठवतेय...सांगू ?
विजय पराडकर




बाबा, तुम्ही लिहून दिलेल्या निबंधातल्या ऱ्हस्व-दीर्घाच्या बत्तीस चुका सुधारून लिहून आणण्याचा गृहपाठ आज आम्हाला दिलाय !
विजय पराडकर

# बुद्धीला खुराक

**डॉ. वा. ना. दांडेकर**



(१) एका सुताराजवळ ७ लाकडी फळ्या आहेत. त्यांपैकी ४ फळ्या प्रत्येकी ४'ु१' या मापाच्या आहेत आणि ३ फळ्या ३'ु१' या मापाच्या आहेत. या फळ्या न कापता अशा प्रकारे जोडून दाखवा की त्यांपासून एक चौरस तयार होईल.

(२) बीना, रोना आणि मीना या तिघींना ६ वाजता




सुटणारी बस पकडावयाची आहे. घरापासून बसस्थानकापर्यंत जाण्यास प्रत्येकीला १० मिनिटे वेळ लागतो.

(१) बीनाला वाटले, आपले घड्याळ ५ मिनिटे मागे आहे; पण प्रत्यक्षात तिचे घड्याळ १० मिनिटे पुढे आहे.


(२) रीनाला वाटले आपले घड्याळ १० मिनिटे पुढे आहे, पण प्रत्यक्षात ते ५ मिनिटे मागे आहे.

(३) मीनाला वाटले आपले घड्याळ १० मिनिटे मागे आहे, पण प्रत्यक्षात ते १० मिनिटे पुढे आहे.




आपले घड्याळ किती मागे अथवा पुढे आहे याचा विचार करून प्रत्येकीने १० मिनिटे अगोदर घर सोडले तर तिघींपैकी कोणाची बस चुकली ? बसस्थानकावर प्रथम कोण पोहोचली ?


(३) बाणापासून सुरुवात करून शेजारच्या आकृतीत असलेली ६ लहान वर्तुळे जोडून दाखवा. एकदा गेलेल्या मार्गाने पुन्हा जावयाचे नाही. काळ्या रेषांवरून रस्ता ओलांडून जावयाचे नाही.




(४) सोबत दिलेल्या क्रेटमध्ये एकूण ८ डझन अंडी आहेत. सात सरळ रेषा काढून या क्रेटचे आठ भाग असे करा की प्रत्येक भागात १ डझन अंडी येतील आणि त्या प्रत्येक डझनामध्ये २ अंडी फुटलेली असतील.



(५) डावीकडील आकृतीत एकूण २५ वर्तुळे आहेत. यांपैकी अशा फक्त ५ वर्तुळांना रंग द्या की त्यामुळे या आकृतीचे एकाच प्रकारचे पाच समान भाग होतील.




(६) खालील आकृतीत दोन रांगांमध्ये चकत्या असून समोरासमोरील चकत्या जोडलेल्या आहेत. चकत्यांवर ज्या संख्या लिहिल्या आहेत, त्यांची प्रत्येक रांगेतील बेरीज २८ आहे. यांपैकी तीन जोड्या रांगेतून बाजूला काढा की ज्यामुळे प्रत्येक रांगेत उरलेल्या चकत्यांवरील संख्यांची बेरीज १४ होईल.




(१) ४'×१' मापाच्या चार फळ्यांची एक चौकट प्रथम अशी तयार करा की प्रत्येक बाजू ५' या मापाची होईल. चौकटीच्या आतील भागात ३×१' या मापाच्या तीन फळ्या बसविता येतील.


(२) (i) प्रत्येकीला १० मिनिटे वेळ लागतो या हिशेबाने खऱ्या घड्याळानुसार प्रत्येकीने ५.५० वाजता घर सोडावयाला हवे. आपले घड्याळ ५ मिनिटे मागे आहे अशी समजूत बीना हिची होती त्यामुळे तिच्या घड्याळानुसार ती ५.४५ वाजता निघणार; पण प्रत्यक्षात तिचे घड्याळ १० मिनिटे पुढे आहे. त्यामुळे ती ५.३५ वाजताच (खऱ्या घड्याळानुसार) निघाली असणार. तिला १० मिनिटे वेळ लागतो; त्यामुळे ती ५.४५ वाजता स्थानकावर पोहोचली असणार.

(ii) आपले घड्याळ १० मि. पुढे आहे असे वाटल्यामुळे रीना आपल्या घड्याळानुसार ६ वाजता निघणार पण प्रत्यक्षात ते ५ मि. मागे आहे म्हणजे ५.५५ वाजत ती निघाली; ६.०५ वाजता ती पोहोचणार; त्यामुळे तिची बस चुकणार.


(iii) आपले घड्याळ १० मि. मागे असे वाटल्यामुळे मीना ५.४० वाजता निघाली असणार पण प्रत्यक्षात तिचे घड्याळ १० मि. पुढे आहे. म्हणजे खऱ्या घड्याळानुसार ती ५.३० वाजता निघाली. ५.४० वाजता पोहोचली. सर्वात प्रथम मीना पोहोचली.

| | स्वत:च्या घड्याळानुसार निघालेली वेळ | | बरोबर घड्याळातील वेळ | स्थानकावर पोहोचण्याची वेळ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| बीना | ५.४५ | ५.३५ | ५.४५ | | |
| रीना | ६.०० | ५.५५ | ६.०५ | | बस चुकली |
| मीना | ५.४० | ५.३० | ५.४० | | सर्वात प्रथम पोहोचणार. |


(४)



(३)



(५)




(६) वरच्या रांगेतील ५,७ आणि २ या संख्या असलेल्या चकत्यांची जोडी दूर करा. राहिलेल्या चकत्यांवरील संख्यांची बेरीज १४ होईल.

***


**डॉ. वा. ना. दांडेकर**
बी/२, परिमल, १२३९/ए,
अपटे रस्ता, पुणे ४

# जेव्हा भावना बोलक्या' होतील...

– आनंद नाडकर्णी



भावभावना-ज्यांना आपण इंग्रजीत emotions म्हणतो, या माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. कारण आपण जेव्हा विचार करत असतो, तेव्हा त्या प्रत्येक विचाराबरोबर भावना येतच असते आणि आपण विचार करत नाही असा एकही क्षण नसतो. म्हणजे भावनांची साथ-सोबत आपल्या जन्मापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत अगदी सतत असते. Emotions हा इंग्रजी शब्द emovere या लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ आहे - Stirred up State म्हणजे क्षुब्धावस्था किंवा ज्याच्यात कुठे संथपणा नाही, गती आहे अशी अवस्था. माणसाच्या जीवनाचं वैशिष्ट्य असं की अनेक गतिशील भावनांचा वर्णपट (Spectrum) त्याच्या मनात निर्माण होत असतो. यातल्या काही भावना जगण्याशी (existence) निगडित असतात. त्यांना आपण आदिम भावना म्हणतो. परंतु माणूस जसजसा कुटुंबामध्ये, समाजामध्ये, संस्कृतीमध्ये राहायला लागतो, वाढायला लागतो तसतशी त्याच्या भावनांची कक्षा रुंदावते आणि भावनांनी त्याचं आयुष्य अधिक समृद्ध व्हायला लागतं, त्याप्रमाणे तितकंच त्रासदायकही व्हायला लागतं. अनेक भावना आणि त्या भावनांच्या विविध छटा हे मानवी जीवनाचं वैशिष्ट्य आहे. प्राण्यांच्या भावनिक विश्वापासून जर माणसाच्या भावनिक विश्वाला वेगळं काढायचं असेल तर या 'विविध भावनांचा उगम' हे महत्त्वाचं कारण ठरावं. 'या सगळ्या भावनांची आपल्याला ओळख असते का ?' असं विचारलं तर तुम्ही म्हणाल,''म्हणजे काय ? या सगळ्या भावना तर आमच्याच असतात.'' परंतु आपल्या असं लक्षात येईल की अनेक वेळा भावनांच्या छटा ओळखण्यापेक्षा आपलं लक्ष भावनांच्या ठळक कप्प्यांवरतीच असतं. भावनांच्या छटांपासून आपण स्वत:ला दूर नेतो आणि त्यामुळे विचारातही ठोकताळेबद्धपणा यायची शक्यता असते. म्हणून भावनांच्या छटा निरखण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे कसं पाहता येईल, याचा विचार करता यायला हवा.

हे सगळं आपण खूप theory त बोललो. ते समजून घेण्यासाठी एक उदाहरण घेऊया. समजा, आपण एखादं नाटक किंवा सिनेमा पाहतो आहोत. तो पाहताना आपल्या मनामध्ये कुठल्या भावना उमटताहेत याचा एक आलेख काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा एखादी भावना मनात तीव्र असते तेव्हाच ती आपल्याला जाणवते. त्या भावनेच्या आधी आणि नंतर

मनात खूप भावना असतात. त्यांच्याकडे बघायचा जर का आपण प्रयत्न केला तर आपली समज नक्कीच वाढेल.

अलीकडे शास्त्रज्ञ असं म्हणायला लागलेत की शब्दांची साक्षरता जशी आवश्यक आहे तशी भावनिक साक्षरताही (emotional literacy) चांगल्या जीवनासाठी आवश्यक आहे. भावनिक साक्षरता म्हणजे आपल्या भावनांकडे आपण जाणीवपूर्वक पाहायचा प्रयत्न करणं, त्यांची रूपं ओळखायचा प्रयत्न करणं, त्यातल्या खुपणाऱ्या भावना कमी करणं अन् पोषक भावनांची मशागत करणं. अशी भावनिक साक्षरता म्हणजे अर्थपूर्ण जीवनाचा पाया आहे. पूर्वी बुद्ध्यंकाला (IQ) खूप महत्त्व असायचं. 'ज्याची बुद्धिमत्ता जास्त तो जीवनात जास्त यशस्वी' अशी समजूत होती. परंतु आता शास्त्रज्ञांनी विचार थोडासा

बदललाय ते म्हणतात. की,'IQ पेक्षा EQ जास्त महत्त्वाचा'.EQ म्हणजे भावनांक.

भावनांक म्हणजे नेमकं काय? या संकल्पनेचे शास्त्रज्ञांनी काही टप्पे केले आहेत. त्यातला पहिला टप्पा आहे Emotional awareness आणि emotional acceptance चा. म्हणजे माझ्या भावनांचे पदर मी ओळखणं आणि सर्व भल्याबुऱ्या, चांगल्या-वाईट भावना माझ्या आहेत म्हणून स्वीकार करणं. तसंच त्यातल्या विरूप भावनांचं अनुरूप भावनांमध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न करणं. भावनांचं असं रूपांतर जे करू शकतात त्यांचा भावनांक (EQ) चांगला आहे, असं समजलं जातं. तसंच जेव्हा समस्या, अडचण निर्माण होते तेव्हा विरूप, नाशक भावनांना आपल्यावरती स्वार होऊ न देता त्यांचं जी माणसं अनुरूप भावनांमध्ये रूपांतर करतात, ती अडचणींना पार करतात, असं शास्त्रज्ञांना दिसून आलं. तेव्हा भावनांक (EQ) संकल्पनेमध्ये समस्यापूर्ती करताना माणूस भावनांची दखल कशी घेतो यावर ती समस्या तो पूर्ण करणार की नाही हे अवलंबून असतं. शास्त्रज्ञांच्या असंही लक्षात आलंय की ज्याचा बुद्ध्यंक जास्त आहे तो माणूस आयुष्यात खूप यशस्वी होईल असं नाही, तर ज्याचा भावनांक जास्त आहे तो माणूस मात्र यशस्वी होऊ शकतो, त्याच्याकडे जास्त बुद्ध्यंक असलेले लोक नोकरी करत असतात आणि ज्याचा भावनांक, बुद्ध्यंक दोन्ही जास्त आहे असा माणूस आयुष्यात खूपच यशस्वी होतो. त्यामुळे भावनिक साक्षरता वाढण्याला आज खूपच महत्त्व आलं आहे. भावनिक साक्षरता वाढीसाठी कलेच्या, छंदाच्या जोपासनेचा उपयोग होऊ शकतो. आपण जेव्हा एखादं पेंटिंग पाहतो, तेव्हा चित्रकाराने त्यात कुठल्या भावना चितारल्या आहेत? त्यातले रंग आणि भावना यांचं काय नातं आहे, याचा विचार केला पाहिजे. आपण जेव्हा एखादं गाणं ऐकतो तेव्हा गाण्यातले शब्द, सूर, लय, भावना यांचं काय नातं आहे अशा दृष्टीने रसास्वाद घेण्याचा जर प्रयत्न केला तर आपण स्वत:ला भावनिकदृष्ट्या परिपक्व करू शकतो. त्याचप्रमाणे एखादी कादंबरी वा आत्मचरित्र वाचताना 'त्यातील व्यक्तीने एखादा विशिष्ट निर्णय घेताना त्याच्या मनात कोणत्या भावना असतील ?' असे प्रश्न जर आपण स्वत:च्या मनाला विचारले तर आपलं वाचन जास्त अर्थपूर्ण होईल, आपल्या वाचनाला एक वेगळी किनार येईल. अशा वाचनातून आपण जास्त समृद्ध होऊ; तसंच स्वत:बरोबर दुसऱ्याला समजून घेण्याची सवयही आपल्या मनाला लागू शकेल.

या भावनांकाचा एक महत्त्वाचा पैलू असा आहे की आपल्या मनात येणाऱ्या वाईट, नाशक भावनांचं अस्तित्व मान्य करून त्यांना बदलण्याचा प्रयत्न करायचा. तसं केलं तर आपला भावनिक कोंडमारा टळू शकतो. बरेच वेळा असं होतं की आपल्या मनात निर्माण होणाऱ्या ज्या चांगल्या, सकारात्मक भावना आहेत, त्यांचं दायित्व आपण आरामात स्वीकारतो. तेव्हा आपण असं म्हणतो की 'हे सगळं मी केलं म्हणून मला आनंद झाला, मी अमुक अमुक केलं म्हणून मला समाधान वाटलं.' पण आपल्या

मनात ज्या नकारात्मक भावना येतात. त्यांचं दायित्व आपण स्वीकारत नाही. म्हणजे असं की, 'तो असं बोलला म्हणून मला राग आला', 'ती असं बोलली म्हणून मी depress झालो.' असं आपण म्हणतो. नकारात्मक भावनांचं बिल फाडण्यासाठी आपल्याला दर वेळी नवीन कुणीतरी व्यक्ती पाहिजे असते. भावनांच्या संदर्भात आपण जेव्हा आत्मपरीक्षण करू तेव्हा हा मुद्दा जरूर लक्षात ठेवावा.

एकदा काही कुमारवयीन मुलांसमोर हा मुद्दा मांडल्यावर एक मुलगा म्हणाला की, ''तुम्ही म्हणालात नकारात्मक भावनांचं बिल आम्ही दुसऱ्यावर फाडतो. पण आमच्या सकारात्मक भावनासुद्धा दुसऱ्यावरच अवलंबून असतात. माझी एक मैत्रीण आहे. ती मला रोज सकाळी दिसली तर मला अर्धा तास आनंद वाटतो. ती येऊन माझ्याशी चांगलं बोलली तर मला एक तास आनंद वाटतो. ती जर माझ्याबरोबर कँटीनमध्ये आली तर मला चार तास आनंद वाटतो.'' त्यावर मी म्हटलं,''याचा अर्थ तुला समजला का ? की ही जी तुझी मैत्रीण आहे ती मोठ्या राजकीय नेत्यापेक्षासुद्धा powerful असली पाहिजे. कारण तिच्या हातात तू तुझ्या सगळ्याच भावनांचा remote controll देऊन टाकला आहेस.'' तर मुद्दा असा आपण आपल्या भावनांचा remote cotroll बऱ्याचदा इतर व्यक्ती, प्रसंग, घटना यांच्या हातात देऊन टाकतो आणि वर अशी तक्रार करतो की आमचा भावनिक कोंडमारा होतोय. आपल्या भावनिक कोंडमाऱ्याची जबाबदारीसुद्धा आपलीच असते हे लक्षात घेणं खूप आवश्यक आहे. ही जबाबदारी उचलणं हा भावनिक कोंडमारा टाळण्यातला महत्त्वाचा टप्पा आहे. जोपर्यंत ही जबाबदारी आपण उचलत नाही, तोपर्यंत या बाबतीत आपण काय करू शकतो ? हा प्रश्न कधीच स्वत:ला विचारणार नाही.

अगदी अलीकडचीच गोष्ट आहे. माझ्याकडे एक आठवीतील मुलगी तिच्या आई-वडिलांबरोबर आली. ती सातवीपर्यंत अभ्यासात खूप हुशार होती, शाळेच्या सर्व उपक्रमांत भाग घेत होती, पण आता तिचं पूर्वीसारखं अभ्यासात लक्ष लागत नव्हतं. याविषयी आई-वडिलांशी ती मोकळेपणी बोलत नव्हती. म्हणूनच ते तिला माझ्याकडे घेऊन आले होते. मी त्या मुलीशी बोलायला लागलो तेव्हा ती एकदम रडायलाच लागली. तिला रडण्याचं कारण विचारलं तर ती म्हणाली,''तुम्ही मनोविकारतज्ज्ञ आहात. माझ्या आई-वडिलांनी मला वेडं ठरवून तुमच्याकडे आणलंय, पण मी वेडी नाही.'' ''तू कशाला वेडं म्हणतेस ?'' यावर ती म्हणाली की, ''ज्या माणसाच्या वागण्यावरचं नियंत्रण कधीतरी किंवा जास्त वेळा जातं त्याला आपण वेडा म्हणतो.'' मी म्हटलं,''आपण 'वेडा' हा शब्द न वापरता ज्यांना मदतीची जास्त आवश्यकता आहे अशी व्यक्ती म्हणू या. एखाद्या माणसाचं भावनिक नियंत्रण जर कधी जात असेल तर त्याला मदतीची आवश्यकता असते. लगेचच त्याला 'वेडा' हे लेबल लावायचं कारण नाही. कधीकधी लोकांचं ऐकून घेण्याची आवश्यकता असते. तेवढं केलं तरी त्यांना पुरेसं असतं.'' असं म्हटल्यावर ती मला लगेच म्हणाली, ''मी आता सांगते तुम्हाला माझा प्रश्न काय आहे तो. आमच्या घराजवळ १६/१७ वर्षांचा मुलगा राहतो. तो मला खूप आवडतो. मी त्याच्याकडे सारखी बघत असते. माझ्या मनात सारखे त्याचे विचार येतात आणि त्यामुळे माझं अभ्यासावरचं लक्ष उडालंय. मी हे कुणालाच सांगू शकत नाही. आई-वडिलांना, मित्रमैत्रिणींनाही सांगू शकत नाही. कारण ते काय म्हणतील याची लाज वाटते. माझ्याबद्दल त्यांचं काय मत होईल ? मला फुकट गेलेली मुलगी समजतील का ? असं माझ्या मनात येतं.'' तिच्याशी बोलताना मला जाणवलं की आपल्या मनातल्या सर्व भावभावना प्रामाणिकपणे व्यक्त करण्याची प्रत्येकाची गरज असते आणि अशी व्यक्ती जर आजूबाजूला नसेल तर भावनिक कोंडमारा होतो आणि ती सध्या

त्यातूनच जाते आहे. अशी जागा माणसं घरात शोधतात, मित्रांकडे शोधतात, कधी शिक्षकांकडे शोधतात. ही जागा उपलब्ध करून देणं ही भावनिक कोंडमारा टाळण्यातली पहिली गरज आहे. तसंच ही जागा कशी पाहिजे ? तर जिथे ती व्यक्ती आपल्या मनातली वाईट भावनाही मोकळेपणी सांगू शकेल. त्यावर कुठलंही judgement pass होणार नाही याबद्दल तिची खात्री पटली तर ती बोलेल. आपल्याला फुकट गेलेली समजतील म्हणून ही मुलगी मनातल्या भावना दडपत होती, कारण स्वत:वरती कुठलंही लेबल लावून घ्यायचा तिला त्रास वाटत होता. मी तिला म्हटलं,''अशा तऱ्हेची जागा असली पाहिजे हे मान्य. पण ती नसेल तर अशा तऱ्हेची जागा, असं विश्वासाचं नातं आपण तयार करू शकतो का? याच्यासाठी आपण आपल्या बाजूने काय करू शकतो ? याचाही विचार करायला हवा.'' ऐकून घेणारी व्यक्ती non-judgemental असेल तर बोलणाऱ्याचा भावनिक कोंडमारा होत नाही.

कुमारवयातल्या मुलांनीही हे लक्षात ठेवायला हवं की त्यांच्या मित्रांच्या बाबतीत त्यांनीही judgemental होता कामा नये, तसंच मोठ्यांनीही लक्षात ठेवायला हवं की मुलांना मोकळं होऊ द्यायचं असेल

तर त्यांनी कुठल्याही तऱ्हेचं jundge-ment pass करता कामा नये.

दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की प्रत्येकाने 'माझ्या भावनांची अभिव्यक्ती (expression कोणत्या वेळी, कशी करावी याचे माझे काही नियम असले पाहिजेत आणि ते पाळण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.' उदाहरणार्थ, अमुक एका ठिकाणी मी माझ्या आवाजाची तीव्रता जास्त वाढू देणार नाही हा माझा नियम असला पाहिजे किंवा अमुक एका वेळेला मला प्रचंड राग येईल तेव्हा त्याची श्रळाळीं काय असेल हे मी ठरवले पाहिजे. असे नियम ठरवले तर कोंडमारा खूपच कमी होईल. जेव्हा अनेक गोष्टी दाबल्या जातात, तेव्हा त्या कधीतरी स्फोटाच्या स्वरूपात बाहेर येतात. जर आपण नियंत्रित (controlled) स्वरूपात अभिव्यक्ती कशी करायची याचे स्वत:चे नियम बनवले तर हा कोंडमारा टाळू शकतो आणि त्यासाठी आपल्याला दुसऱ्या कोणावर अवलंबून राहावं लागत नाही. असा my porsonal code of emotional coduct मी तयार करू शकलो, तर मला स्वत:चं वागणं, स्वत:च्या भावना यांवर चांगल्या प्रकारे नियंत्रण ठेवता येईल. या नियमावलीत चूक होऊ शकते आणि त्या चुकीची जिम्मेदारी मी

घेऊ शकतो, त्यावर काय करायचं हेही

ठरवू शकतो. अशी नियमावली करणं

हा मला वाटतं कोंडमारा टाळण्याच्या

दृष्टीने महत्त्वाचा उपाय ठरेल.


तिसरा भाग असा की भावनिक कोंडमारा ज्या वेळेस होतो तेव्हा त्या व्यक्तीला असं वाटतं की, 'असं फक्त मलाच होतंय.' तर अशा वेळी त्या व्यक्तीला असा दिलासा देणं आवश्यक आहे की 'अशी भावनांवरचं नियंत्रण गमावण्याची अवस्था बहुतेक सर्व माणसांवर केव्हा ना केव्हा तरी आलेली असते. किंबहुना अशा तऱ्हेचे कोंडमाऱ्याचे क्षण येणं हे आपल्या माणूसपणाचंच लक्षण आहे.' हे जर आपण लक्षात घेतलं तर याकडे आपल्याला एक अवस्था म्हणून पाहता येईल. याच्याकडे आजार किंवा व्यंग म्हणून न बघता कुणाच्याही जीवनात येऊ शकणारी अवस्था असं पाहिलं तर चांगल्या पद्धतीने आपण त्यावर मात करू शकू.

***

- आनंद नाडकर्णी
१०१ गीतगोविंद, समतानगर,
रेमंडस्‌जवळ, ठाणे ६

# गुजगोष्टी

**डॉ. विजया वाड**



आज तुमच्याशी खूप मनमोकळं बोलणार आहे. तुम्ही सगळी नव्या नव्हाळीची, ताज्या दमाची आणि खूप स्वप्नं डोळ्यांत असलेली मुलं-मुली आहात. माझी तारुण्याकडे वाटचाल करणारी तरुण मित्रमंडळी!

समर्थ आणि सक्षम बनण्यासाठी हे करा... हे करू नका... तिकडे बघू नका, असे ‘डूज’ आणि ‘डोंट्स’.. थोडक्यात, उपदेशाचे डोस मला तुम्हाला मुळीच पाजायचे नाहीत.

मला तुम्हाला सांगायच्या आहेत चार खूप जवळच्या गोष्टी. त्या वाचल्यावर मला नक्की काय म्हणायचंय ते तुम्हाला आपोआप कळेल.

मी तेरा-चौदा वर्षांची होते, तेव्हाची ही गोष्ट आहे. माझ्या दोन्ही मोठ्या बहिणी दिसायला अतिशय सुरेख होत्या. जेव्हा जेव्हा मी स्वत:ला आरशात बघे, तेव्हा माझ्या मनाला विलक्षण दु:ख होई. कारण मी त्यांच्यासारखी रूपाली नव्हते. हळूहळू मी कुढी होऊ लागले. पण वेळीच ही गोष्ट माझ्या आईच्या लक्षात आली. एक दिवस संध्याकाळी ती मला लांब फिरायला घेऊन गेली. म्हणाली,“तुझ्याजवळ काय नाही याचा विचार करण्यापेक्षा तुझ्याजवळ काय आहे त्याचा विचार कर.”

“काय आहे माझ्याजवळ ?” मी रडकुंडीला आले.

“शुद्ध आणि तेजस्वी वाणी आहे तुझ्याजवळ बाळ. खूप वाच, विचार कर आणि आपले विचार खणखणीतपणे लोकांसमोर मांड. ज्याची वाणी सुंदर असते ना, असं माणूस लोकांना मंत्रमुग्ध करतं. बघ. तू आपोआप आवडती होशील. लोकांचं आवडतं होणं, यापेक्षा आणखी काय हवं असतं माणसाला?”

माझ्या आवडत्या, लाडक्या, छोट्या मित्र-मैत्रिणींनो, तो माझ्या आयुष्यातला टर्निंग पॉइंट होता. मी भाषणे, वादविवाद स्पर्धा यांत मग हिरिरीने भाग घेऊ लागले. जमाव बघितला की स्फुरण चढावं अशी वाणीची तयारी झाली. आणि सभा गाजविणे हा जणू मनाला छंदच जडला. आता एखादी सभा मी जिंकली की हमखास प्रिय आईची आठवण होते. आता ती या जगात नाही, पण तिचे ते शब्द माझी आयुष्यभर पाठराखण करतील, ‘तुझ्याजवळ काय नाही याचा विचार करण्यापेक्षा तुझ्याजवळ काय आहे त्याचा विचार कर.’

मार्टिना नवरातिलोवा या जगप्रसिद्ध टेनिसपटूला लोक तिच्या लहानपणी ‘घोडाछाप’ म्हणत असत. कुणी टेनिस कोर्टवर हा शब्द उच्चारला की ती नर्व्हस होई. खेळ खराब ! दुसरं काय ? पण तिचे वडील तिचे सर्वात जवळचे मित्र होते.“लाडक्या लेकी, जेव्हा तू सुंदर खेळशील तेव्हा लोक बघत राहतील. तुझ्यात जग जिंकण्याची ताकद आहे. चेहऱ्याकडे नाही आत्म्याकडे बघ. तिथे तुला फक्त तुझा झंझावाती खेळ दिसेल. जे फक्त मला ठाऊक आहे ते साऱ्या जगाला कळू दे.” आणि जेव्हा तिनं विश्वचषक जिंकण्याची हॅटट्रिक केली तेव्हा हजारो कॅमेरे केवळ तिच्याच चेहऱ्यावर रोखले गेले. तेव्हा कुणाला तिचा घोडाछाप चेहरा नाही दिसला. दिसलं ते तिचं विक्रमी - तळपतं यश. हे यश तिनं आपल्या प्रिय वडिलांच्या चरणी अर्पण केलं.

गणित हा विषय तसा

सरसकट सर्वांच्या आवडीचा नाहीच ! खरं ना ? तर कॉलेजमधल्या अशाच एका परीक्षेत मुलांना गणिताचा पेपर जाम अवघड गेला. अगदी सगळ्यांना ! अशा वेळी सर्वसाधारणपणे मुलं जे करतात तेच त्याही कॉलेजातल्या मुलांनी केलं. ती आपल्या प्राध्यापकांकडे गेली आणि तक्रारीचा सूर लावून म्हणाली,'' पेपर फार म्हणजे भलताच अवघड होता सर.'' ''मला जाणीव आहे.'' गणिताचे प्राध्यापक उद्‌गारले. ''आणि काय सांगायचं सर, त्यात पुस्तकाबाहेरचे प्रश्नही होते.'' ''ते खरेच आहे.'' प्राध्यापक म्हणाले. ''चक्क न शिकवलेला काही भाग !....'' मुलांचा स्वर वाढला. ''हो ना!''.. अरे वा ! आपल्या प्राध्यापक महाशयांना सगळंच मान्य आहे की !.. चलो.. फिर माँगो जो चाहे वो! मुलं सरसावली. ''सर आम्हाला ते वीस मार्कवाढवून हवेत. सरसकट.'' ''दिले असते रे..पण..''

''पण काय सर ? अडचण कसली ?''

सरांनी मुलांकडे एक दयेचा दृष्टिक्षेप टाकला नि ते म्हणाले, ''असं केलं.. तर मला एका मुलाला शंभरपैकी एकशेवीस गुण द्यावे लागतील.''

मुलं चाट पडली. इतका अवघड पेपर !.. इतके पोर्शनबाहेरचे प्रश्न.. काही तर चक्क समजलेच नाहीत. प्रश्नच समजला नाही तर उकल काय करणार कपाळ ?...अन् तरीही शंभरपैकी शंभर ?

मित्र-मैत्रिणींनो, इतकं आपल्या वर्गातलं हुशार मूल ओळखायला आपल्याला वेळ लागतो का ? त्या मुलांनाही तो लागला नाही. क्षणभरात ते तिथून खाली मान घालून निघून गेले. सर ज्या मुलाला शंभरपैकी शंभर गुण देणार म्हणून सांगत होते. त्या मुलाचं नाव आहे जयंत विष्णू नारळीकर ! एखाद्या विषयावर तुटून पडण्याची.. त्याची सर्वांगीण तयारी करण्याची अशी जबरदस्त इच्छाशक्ती असल्याशिवाय का असं यश प्राप्त होतं ?

झुलू कोबे नावाची एक बाई जपानमध्ये होती. तिच्या व्यवसाय शिक्षिकेचा होता. आपल्या गावापासून चाळीस किलोमीटर दूर अशा शाळेत ती रोज विद्यादानासाठी जाई. तिची चिमुकली मुलगी एमी तिच्या आईजवळ म्हणजे एमीच्या आजीजवळ असे. नवरा वखार चालवी. हिरोशिमा-नागासाकीचं ते भयंकर दु:स्वप्न ! तुम्ही फक्त इतिहासाच्या पुस्तकात वाचलंय. झुलूनं ते प्रत्यक्ष अनुभवलं. शाळेतून घराकडे येणारी बस पांढऱ्या ढगात गेली. विषारी वायूचा वास.. जळकी... ओळखू न येणारी प्रेतं.. झुलू वेड्यासारखी घरात.. घराभोवती फिरली. त्याला छप्परच उरलं नव्हतं. नवरा, आई आणि लाडकी एमी.. छे.. कुणीच नव्हतं. एका क्षणात होत्याचं पूर्ण नव्हतं करणारा तो विध्वंसक.. सर्वनाशी बाँब.. तिच्या डोळ्यांतले अश्रूसुद्धा त्या अणूबाँबनं शोषून घेतले. घशाला कोरड पडली. झुलू पाणी पिऊ शकत नव्हती.. कारण ते पिऊन माणसं तडफडून मरत होती. तीन दिवस अन्न-पाण्यावाचून काढताना तिला वाटलं, आपण कशासाठी जगतो आहोत ? जगण्याची कुठली एवढी लालसा आपल्याला जिवंत ठेवते आहे ? आपलं असं कुणीच उरलं नसताना ? आणि अचानक झुलूला जगण्याचा अर्थ सापडला या नरसंहारातून ! ती एक जातिवंत शिक्षिका होती. मानवतेचा प्रसार ! बस्. आता दुसरं काही नाही. दिवसभर शिकवायचं. उरल्या वेळात लोकांना शांततेचं महत्त्व पटवून द्यायचं. सुट्टी पडली शाळेला की गावोगावी सायकल हाणायची. खिशाला सवड असेल तर दूर दूर बस - विमान - रेल्वे.. पण जिथे जाईल तिथे शांतता - मानवता नि बंधुता यांचा प्रसार...प्रचार ! आपल्या भारतातही ती अण्वस्त्र चाचणीनंतर येऊन गेली. याचा उपयोग शांततेसाठी करा, असं कळवळून सांगून गेली. तेव्हा ती चौऱ्याऐंशी वर्षांची गोड, पिकलेली म्हातारी होती. पण जीवन एका ध्येयानं भारलेलं ना ! आता झुलू कोबे नावाचं एक शांततेचं वेड डोक्यात घेतलेलं चिमुकलं वादळ शांत झालं आहे. पण या सुरकुतल्या देहातल्या प्रचंड प्रेमस्रोताचं दर्शन मला घडलं म्हणून मी स्वत:ला खूप भाग्यवान समजते. दोस्तांनो, असं वाटलं की परिसस्पर्श म्हणतात तो हाच ! तो याहून वेगळा कसा असू

शकेल ? सारं संपून गेलेल्या, आशेचा एकही किरण बाकी नसलेल्या अवस्थेत झुलू जर फिनिक्स पक्ष्यासारखी राखेतून उठली... तर आपण ? मित्र-मैत्रिणींनो आपण तर त्या मानाने खूपच लहान आहोत.

कन्याकुमारी तुम्ही बघितली आहे का किशोर-किशोरींनो ? तुम्ही जमलं तर आता आई-बाबांबरोबर नाही तर मोठे झालात म्हणजे स्वबळावर त्या परमपवित्र तीर्थसंगमाचे दर्शन घ्या. तीन सागरांचा संगम ! आणि स्वामी विवेकानंद यांचं स्मारक. या समाधी स्थलापासून काही अंतरावर विवेकानंद आश्रम आहे. विशुद्ध भक्तिभावानं स्वयंसेवक विनावेतन येथे काम करतात. इथल्या शिलालेखांनी सारा आसमंत विद्यामय केला आहे. त्यातलाच एक शिलालेख माझ्या मनावर कोरला गेला आहे. हृदयस्थ झाला आहे. आपल्या देशाला आज बळकट पोलादी स्नायूंची गरज आहे. गरज आहे विजिगिषू महत्त्वाकांक्षेची- जी नक्षत्रांची रहस्ये शोधेल वा सागराच्या तळाशी बुडी मारेल. आपली ईप्सिते साध्य करण्यासाठी मागेपुढे बघणार नाही; मरणाला मिठी मारायची वेळ आली तरी डरणार नाही; आणि हे साध्य होणार आहे केवळ 'अव्दैताच्या', बंधुभावाच्या भावनेतून.

माझ्या लाडक्या उमलत्या फुलांनो.. असे सुंदर विचार आपल्या जीवनाचे भाष्य बनोत. तुमच्याजवळ काय नाही यापेक्षा तुमच्याजवळ काय आहे याचा शोध घेत तुमचे व्यक्तिमत्त्व समर्थ बनो आणि एखाद्या विषयाचा ध्यास घेतलात की त्यावर तुटून पडण्याचे बळ तुमच्या अंगी येवो. सुंदर रूपापेक्षा सुंदर गुण चिरस्थायी असतात हे तुमच्या लक्षात आलं तरच तुम्ही उद्याच्या भारताचे यशस्वी शिपल्कार बनाल !

***

डॉ. विजय वाड
बी/२९, ३ रा मजला,
रणजित सो.सरोजिनी नायडू
रस्ता,मुलुंड (प),
मुंबई - ४०००८०.

# विज्ञानकोडे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 2 | | 3 | | | 4 |
| | X | | X | | X | X | |
| 5 | 6 | | X | | X | 7 | X |
| X | | X | 8 | | | | |
| 9 | | 10 | X | | X | | X |
| | X | 11 | | X | 12 | | |
| | X | | X | 13 | | | X |
| X | X | 14 | | | X | X | 15 |

**आडवे शब्द**

१) वनस्पतींनाही संवेदनाग्रहण क्षमता असेत हे प्रयोगान्ती दाखवून वनस्पतींच्या वाढीचे मापन करणाऱ्या क्रेस्कोग्राफ या साधनाचा शोध लावणारे भारतीय शास्त्रज्ञ.

५) आकाशातील चांदण्या, तारे इ.

८) भारताचा एस्.एल्.व्ही.३ हा उपग्रह १९८० साली ज्या अवकाशयान केंद्रावरून सोडण्यात आला ते आंध्रप्रदेशातील ठिकाण

९) ज्या चौकानाच्या चारही बाजू व चारही कोनसारखे असतात अशा आकृती

११) बागेत शोभेसाठी लावली जाणारी नाजूक वनस्पती

१२) गणिताची एक शाखा

१३) पांढरी सुंगधी फुले येणारी एक वेल

१४) सुताराचे एक हत्यार

१५) पृथ्वी.

**उभे शब्द**

१) जाड्य, सुस्तता, वस्तूतील जडपणा

२) परस्परांमधील गुरुत्वाकर्षणामुळे एकत्र बांधल्या गेलेल्या अब्जावधी ताऱ्यांच्या संहतीला.... म्हणतात.

३) पौर्णिमेला सूर्य व चंद्र यांच्यामध्ये एका रेषेत पृथ्वी आल्यास पृथ्वीची छाया चंद्रावर पडून.... होते.

४) दोनाने भाग जाणाऱ्या संख्या.

६) रेडिओ तरंगांच्या द्वारा स्थान निश्चिती व अचूक मागोवा घेणारे यंत्र, ज्याचा उपयोग हवामानाचा अंदाज, ग्रहांचे मापन व शत्रूच्या विमानांचा वेध घेणे यासाठी होतो.

७) गणिताची एक शाखा ट्रिग्नॉमेट्री

९) चार बाजू असलेल्या आकृतीला...म्हणतात

१०) पाठीचा कणा असलेल्या प्राण्यांपैकी सरपटणाऱ्या प्राण्यांचा गट (उदा. पाल, सर्प, कासव वगैरे)

११) रोग्याला शस्त्रक्रिया करण्यापूर्वी बेशुद्ध करण्याची क्रिया

१२) हा कीटक अन्नपदार्थावर बसल्यास त्याद्वारे रोगजंतू पदार्थात मिसळून रोगाचा प्रसार होतो.

***

- मीनाक्षी केतकर८६/८विष्णुपंत दामले पथ, लॉ कॉलेज रस्ता, एरंडवन, पुणे ४

# शेखर सुमनची गंमत

**शाम भुर्के**

***आ**ठवड्यातून सोमवार ते शुक्रवार रात्री सोनी वाहिनीवरून सादर केला जाणारा 'मूव्हर्स अँड शेकर्स !' हा कार्यक्रम आपल्या सर्वांच्या परिचयाचा. या विनोदी कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेता शेखर सुमन आपल्या निवेदनातून भल्याभल्यांची खिल्ली उडवत असतो. वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवरांच्या मुलाखती घेत असतो. श्याम भुर्के यांच्यासारख्या विनोदी लेखकाने मात्र इथे विनोदवीर शेखर सुमनचीच मस्तपैकी फिरकी घेतली आहे.*

''आपल्या बँकेच्या रौप्य महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम झाला की रात्री करमणुकीचा कार्यक्रम ठेवूया.''

''अंताक्षरी कार्यक्रम करू या का?

''नको. गेल्या वेळीही तोच कार्यक्रम होता.''

''मग संगीतावर आधारित सारेगम बसवू या.''

''त्या कार्यक्रमाला चांगले गाणारे लागतात. आपल्या बँकेतले हे सो कॉल्ड गायक गायला लागले की संत ज्ञानेश्वर रेड्याच्या तोंडून वेद वदवून घेत आहेत असं वाटायला लागतं ! स्वागतासाठी दारावर उभं राहिल्यावर निमंत्रितांना गुलाबपुष्प देण्याऐवजी एअर इंडियात विमानात बसल्यावर देतात तसा कानात घालायला कापूस द्यायला लागायचा !'' ''हो, गेल्या वर्षी ती सुजाता चिटणीस गात होती, तर तिला चार वेळा वन्स मोअर मिळाला. पुन्हा वन्स मोअर मिळाल्यावर सूत्रसंचालन करणाऱ्यानं विचारलं की इतक्या वेळा गायल्यावरही तुमचं समाधान झालं नाही का ? पुन्हा वन्स मोअर का देताय ! तर एकानं उभं राहून सांगितलं की तिला नीट गाता आल्याशिवाय आम्ही सोडणार नाही !'' ''अरे वा ! बँकेत असूनही बऱ्यापैकी विनोद करतोस की !''

''ऐक ! आणी एक किस्सा ऐक ! अरे एकदा आम्ही कारमधून चाललो होतो. पुढं एक ट्रक चालला होता. ट्रकच्या मागं लिहिलं होतं – रेखा, सुरेखा, सुरेश, रमेश 'बँकेच्या सौजन्याने.' म्हणजे बँकेच्या सौजन्याने ट्रक घेतला का मुलं झाली?'' ''गुड जोक ! बरं. या वेळी आपण विनोदी कार्यक्रमातला सध्याचा जो टीव्हीवरचा टॉपचा कार्यक्रम आहे तोच बसवूया ! शेखर सुमनचा मूव्हर्स अँड शेकर्स !''



''गुड आयडिया. पण अगदी तस्साच कार्यक्रम व्हायला पाहिजे.''

''कार्यक्रमाला आपण खऱ्या शेखर सुमनला आणायचं. त्याचं खातं आहे आपल्या बँकेत.'' साऱ्यांनीच मान्यता दिल्यानं सर्वत्र कसं उत्साहाचं वातावरण तयार झालं होतं. मूव्हर्स अँड शेकर्स कार्यक्रम बसवायला तयारी म्हणून एक मीटिंग बोलावली होती. प्रत्येकालाच भाग घ्यायची संधी मिळावीक असं वाटत होतं.


''शेखर सुमनची भूमिका कोण करणार ?''

''ती आपल्या दुबेला करू देत. त्याचं हिंदी एकदम छान आहे.''

''फक्त हिंदी छान असून काय उपयोग ! त्याला एक वाक्य हिंदी आणि दुसरं इंग्रजीत असं बोलता आलं पाहिजे. शिवाय हिंदी वाक्यात जास्तीत जास्त शब्द इंग्रजी आले पाहिजेत. ते काम आपला एस के चांगलं करील.''

''बँकेत सात कुलकर्णी असल्यामुळे कोणत्याही कुलकर्णीला फक्त इनिशिअलनच ओळखायची पद्धत होती.''

''होय. शिवाय चांगला सूट त्याच्याकडेच आहे. त्यामुळे त्या भूमिकेसाठी नायकाला नवीन सूट शिवायचा खर्च वाचेल.'' ही शेवटची सूचना मात्र साऱ्यांनाच पटली आणि या प्रमुख भूमिकेसाठी एस.के.च्या नावावर शिक्कामोर्तब झालं.



''आता वाद्य मंडळ ठरवूया. देशपांडे, तू तबला वाजवायला बैस. तुझ्या घरी तबला आहेच. शिवाय ऑफिसमध्ये टेबलावर तबल्यासारखा ठेका धरतोसच ना?''

''पण मला तबला नीट वाजवायला येत नाही.''

''अरे इथं काय गाण्याच्या मैफलीत तबला वाजवायचा नाही. शेखर सुमनचं वाक्य झालं की सगळ्यांनी हसायचं, आणि त्या वेळी तू नुसता तबला बडवायचा! तुझा

ठेका बरोबर आहे की चुकलाय हे हास्यकल्लोळात लक्षातही यायचं नाही.''

''ठीक आहे. मी होतो तबलजी.''

''जोशा, तू व्हायोलिनवर, पवार तू गिटारवर आणि करवंदे, तू सिंथेसायझरवर !''

तुम्हाला कितपत वाजवायला येतंय याला महत्त्व नाही. फक्त हिरोचं वाक्य झालं रे झालं की खरोखर विनोद झालाय, असं तुम्हाला वाटलं पाहिजे आणि अगदी खो-खो हसता आलं पाहिजे. मग आपलं हसता हसता साईड बिझिनेस म्हणून ही सारी वाद्यं बडवायची. हसणं आणि वाद्यं यांचा आवाज एका वेळी येण्यावरच कार्यक्रमाचं यश आहे. या आवाजातच

कार्यक्रम एकदम लाईव्ह वाटला पाहिजे.

''पण ही सारी वाद्यं कुठं मिळणार?''

''बँकेच्या स्पोर्ट्स क्लबला खरेदी करायचीत, असं सांगून स्काय म्युझिकल हाऊसमधून ट्रायल म्हणून एक दिवस आणा. नाहीतरी आपल्याला या वाद्यांची प्रक्टिस करायची नाहीच.''

''तुझ्या सजेशन्स अगदी प्रक्टिकल असतात हं ! आता कार्यक्रम हुबेहूब करायचा म्हणजे किमान दोन तरी मुलाखती हव्यात. देसाईबाई, तुम्हाला परवा कालिदास संगीत स्पर्धेत बक्षीस मिळालं ना, तेव्हा तुमची मुलाखत घेऊ.''

आपल्या बक्षिसाचा उल्लेख झाल्यामुळे देसाईबाई चांगल्याच खुलल्या. पण होकार देण्यापूर्वी त्यांनी एक शंका उपस्थित केली. शंका उपस्थित करणे हा त्यांचा स्वभावधर्मच. बँकेत साहेबांनी त्यांना काहीही काम सांगितले की त्या शंका उपस्थित करणारच.

''मी मुलाखतीला तयार आहे. पण मी त्या कार्यक्रमाला मूव्हर्स अँड शेकर्स मधल्यासारखे तोकडे कपडे घालून येणार नाही. शिवाय स्टेजवर आल्यावर पुरुषाशी शेक हँड करणार नाही. वाटल्यास कार्यक्रमाच्या नावातला शेकर्स शब्द बदला. पाहिजे असेल तर पुरुषांशी जास्त वेळ शेक हँड करा. मी फक्त नमस्कार करणार.'

आता हवा होता एक मुलाखतकार पुरुष.

''जोगळेकर, तू नाटकातून कामं केलीत. तेव्हा या कार्यक्रमात एक तुझीमुलाखत ठेवूया.''

''मला अभिनय जमतो, पण सभेत किंवा मुलाखतीत बोलता येत नाही.''

''त्याची तू काळजी करू नकोस. तू टी.व्ही.वर मूव्हर्स अँड शेकर्स हा कार्यक्रम पाहिला आहेस ना ? तुला काही विचारलं की तू थोडं काहीतरी बोल. फक्त हसत हसत बोल. म्हणजे तुला खूप हसू आल्यानं तुझे शब्द नीटपणे इतरांना कळणार नाहीत. त्यामुळे उत्तर चूक की बरोबर असा प्रश्नच येणार नाही. तू वाक्य उच्चारल्याबरोबर हे ऑर्केस्ट्रावाले जोरात हसतील आणि त्याच वेळी धाडधाड वाद्यं बडवतील. म्हणजे श्रोत्यांना वाटेल तू खूप विनोदीपणे उत्तर दिलंस. थोडक्यात काय लेका, हा कार्यक्रम म्हणजे चार आण्यांची कोंबडी आणि बारा आण्याचा मसाला आहे.

इथं शेखर सुमनची भूमिका करणाऱ्या एस. केनंही जोगळेकरला धीर देत म्हटलं - ''तुला उत्तर आठवेना झालं की तू आणि मी दोघांनीही एकमेकांना टाळी देऊन जोरात हसायचं. मग मी म्हणेन, मी तुझ्या नाटकाबद्दल प्रश्न विचारलाय पण उत्तर मात्र हवंय ब्रेकनंतर ! तेव्हा तुला आठवायला भरपूर वेळ मिळेल ! शिवाय देसाईबाईही मुलाखतीसाठी तिथं आधीच आलेल्या असणार. तुझ्या प्रश्नावर त्या बोलल्या तरी चालेल. फक्त लक्षात ठेवायचं, वाक्य झालं की सगळ्यांनी हसायचं, वादकही हसतील आणि वाद्यं बडवतील. आजपर्यंत जगात संगीताला साथ द्यायला वाद्यं होती. नुसतं वाद्यवादन होतं. पण गद्याला वादनाची जोड देण्याचा हा प्रयोग अजोड आहे, त्याला तोड नाही. तो हास्यास्पदही असल्यामुळे वादक या साऱ्या प्रकारालाच हसत राहतात.

तेव्हा तू मुळीच काळजी करू नकोस.''

''चला पात्रांची जुळवाजुळव तर झाली !''

''छे छे ! आपलं काय ठरलंय ? कार्यक्रम तस्सा व्हायला पाहिजे. मग कार्यक्रमातला सर्वात अधिक आकर्षक भागच राहिला !''

''तो कोणता ?''

''जाहिराती !''

''पण त्या कशा दाखवणार ? कड्यावरून कोण सुंदरी खाली पडणार ? तिला वाचवायला सिएट टायरची जीप घेऊन कोण येणार आणि हे स्टेजवर सारं दाखवणार कसं ?''

''चित्रांच्या स्लाईड दाखवायच्या आणि संवाद तेवढे आपण म्हणायचे. एका जाहिरातीचे संवाद एकाकडे त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावर फोकस मारायचा. म्हणजे त्यालाही या



दिवाळी म्हणजे फटाके, कपडे अन् खाऊ,
परंतु जे जे वंचित याला, त्यांनाही काही देऊ.
शंभरावा अंक

कार्यक्रमात भाग घेतल्याचं समाधान मिळेल. आपण स्टेजवर दिसलो म्हणजे झालं.'' या सूचनेने सर्वांनाच आता स्टेजवर यायला मिळणार म्हणून आनंद झाला.

जाहिरातीचा क्रम चुकू नये म्हणून रात्री साऱ्यांनी टीव्हीवर मूव्हर्स अँड शेकर्स एकत्रपणे पाहिला. थोडीशीच वापरूनही भरपूर परिणाम देणारी विम पावडर, तलफ भागविणारी नेसकॅफे, बॉलीवूड बाईट, इमाऽऽऽ मी, आपण सुंदर दिसावं म्हणून वर्षानुवर्षे स्त्रियांना भुरळ पाडणारं फेअर अँड लव्हली, उत्साहवर्धक थम्सअप, आपला विस्तार कळावा म्हणून इंटरनॅशनल शब्द वापरून पुढे सिंथॉल जोडलेले, फिलिप्स मोबाईल, बोरोसॉफ्ट, जेम्स बाँड, बी पी एल, क्लोजअप टूथपेस्ट, पॅरी वेअर, होंडा सिटी, फॅरेक्स, डेटॉल सोप, नया व्हील (साबण किंवा टूथपेस्ट कोणत्याही कंपनीचं असो, त्याच्यामागे 'नया' हे विशेषण लावावंच लागतं !), तरुणपणासाठी चुईंगगम, नीमा रोज सोप, वाटिका शांपू....

''बापरे म्हणजे जाहिरातीत सगळा वेळ जाणार !''

''असं म्हणू नका. आपल्याला कार्यक्रम 'तस्सा' करायचाय ना ? मग असू दे. शिवाय प्रत्येक जाहिरातीला एक अनाऊन्सर म्हणजे आपल्या सगळ्या स्टाफला कामं मिळाली. पंचेचाळीस मिनिटांच्या कार्यक्रमात तीस मिनिटं जाहिरातीला गेल्यावर आता फक्त पंधरा मिनिटांचीच तयारी करावी लागणार. कार्यक्रम बसवायचं आपलं काम सोपं होणार !''

''शिवाय कार्यक्रमाला टायटल साँग वाजवायचं. सुरुवातीला, मधला ब्रेक देताना, ब्रेकनंतर कार्यक्रम सुरू होताना आणि पुन्हा शेवटी. यांत दोन मिनिटं जातील. मग कार्यक्रम राहिला फक्त तेरा मिनिटांचाच.''

''असली गणितं मांडून तू काय कार्यक्रमाचे तीन तेरा वाजवतोस काय ?''

''कोटी चांगली आहे. बरं आपण एक म्हैस आणू या का कार्यक्रमात ?''

''हो, बिहारमधला लालूचा एखादा जोक टाकता येईल. शिवाय सरकारी योजनेत आपल्या बँकेकडून घेतलेल्या कर्जात खरंच एखाद्या कर्जदारानं म्हैस घेतली असेल तर तीही कार्यक्रमात दाखवून बँकेचे कार्य आणि व्हेरीफिकेशन दोन्हीही होतील !''

''हो, आणूया ! शिवाय म्हैस दाखवण्यामध्ये आणखी पाच मिनिटे जातील. मग कार्यक्रमाची तयारी फक्त आठ मिनिटेच करावी लागेल!''

सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे एवढ्या बिझी शेड्यूलमधून येण्याचं शेखर सुमननं मान्य केलं. फक्त त्यानी सांगितलं की तो प्रत्यक्ष कार्यक्रमात भाग घेणार नाही. प्रेक्षकांत बसून कार्यक्रम पाहाणार!

''आपण शेखर सुमनच्या कार्यक्रमाचं नाव घेतलं. तो रागावणार तर नाही ना?''

''त्यासाठी आपण त्याच्यासारखीच युक्ती योजूया. तो या सिरीयलच्या वेळी एक सूचना झळकवतो की या मालिकेतील विचार त्याचेच असतील असे नाही. ते केवळ करमणूक म्हणून पाहावेत.''

तसाच एक बोर्ड कार्यक्रमस्थळी लावण्यात आला.

ठरल्या दिवशी कार्यक्रमाला जाहिरातीनं सुरुवात झाली. जाहिरातीनंतर जाहिराती दिसू लागल्या. टायटल साँग झाले एस के शेखर सुमनच्या भूमिकेत आला. ''मी आपल्या सर्वांचं स्वागत करतो'' असं म्हणताच जोरदार हशा आणि झांजसह बँड वाजला.

तेवढ्यात बँक मॅनेजरनी त्याच्याकडे एक चिठ्ठी पाठविली. ती त्याने जाहीरपणे वाचली. ''आपल्या बँकेचे माजी डायरेक्टर यांचे निधन झाले. त्यानिमित्त एक मिनिट स्तब्धता पाळूया''- पुन्हा हास्यकल्लोळ आणि बँड वाजला. ''मी आज श्रेष्ठ कलाकार शेखर सुमन याचं स्वागत करतो''- प्रचंड हास्याचा धबधबा आणि धडाधड बँड!

''आपल्या बँकेला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत.''- पुन्हा हशा आणि बँडबाजा. आपली फजिती होतेय, असं वाटायला लागल्यावर त्यानं स्वत:ला सावरलं आणि म्हटलं -''आपण

पुन्हा भेटूया - ब्रेक के बाद !''

पुन्हा जाहिरातीच जाहिराती. मुलाखतीला आलेल्या देसाई बाईंनी संगीतावर बोलण्याऐवजी मी इथं

कुठल्या अटीवर आले - म्हणजे पुरुषाशी शेकहँड करणार नाही हेच सांगितले.

प्रचंड जाहिराती, टायटल साँग, ऑर्केस्ट्रा, हास्य यांमध्ये या हिरोला वेळच राहिला नाही. कार्यक्रमात प्रचंड हास्यकल्लोळ उमटत होते, पण ते नैसर्गिक नव्हते. कार्यक्रम संपला. खरा शेखर सुमन रंगमंचावर आला. त्याच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला. तो म्हणाला - आज हा कार्यक्रम पाहून माझे डोळे उघडले. माझ्या पंचेचाळीस मिनिटांच्या कार्यक्रमात प्रत्यक्ष किस्से, विनोद, घटना हे पाच मिनिटे तरी असते का अशी आता मलाच शंका यायला लागलीय. तरी माझ्या हातून झालेल्या गुह्यासाठी तुम्ही द्याल ती शिक्षा मी भोगायला तयार आहे. यावरही प्रचंड हशा असळला उसळला अन् बँड वाजला !

कार्यक्रमाच्या समारोपात बँकेचे मॅनेजर म्हणाले -

आजच्या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध अभिनयपटू शेखर सुमन हे स्वत: हजर राहिले, यामुळे आम्हाला किती आनंद झाला हे शब्दानं सांगणं हे अतिशय अवघड काम आहे. (प्रचंड हशा आणि ऑर्केस्ट्राची बडवाबडव.) आपण हसताय पण हा काही मूव्हर्स अँड शेकर्स कार्यक्रमाचा भाग नाही. (पुन्हा हशा आणि बँड !) आमच्या कार्यक्रमाला सुमनाने शेखरजी आले. (टाळ्या) त्यांना आजचा कार्यक्रम बघून त्यांच्या काही चुका लक्षात आल्याचे त्यांनी म्हटले, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. (हशा आणि टाळ्या) त्यांनी त्यांच्या प्रमादाबद्दल शिक्षा सुनावण्याची आज्ञा केली आहे. (हशा) हा काय आजकी अदालत कार्यक्रम नाही. तरीही केवळ त्यांच्या आग्रहास्तव, अगदी हट्टासाठीच आम्ही

त्यांना प्रेमळ शिक्षा देत आहोत. (हशा)

कार्यक्रमाच्या मूळ भागापेक्षा जाहिरातीला कमी वेळ द्यावा.

विनोद झाल्यासच श्रोत्यांनी हसावे.

स्त्री कलाकारांना फक्त लांबून नमस्कार करावा.

दाढी वाढलेल्या पुरुषांच्या गालाला गाल लावायला हरकत नाही.

आता इथं श्रोत्यांनी थोडं हसायला हरकत नाही.

***

**- श्याम भुर्के**
४ महालक्ष्मी,
३२/२अ एरंडवणे,पुणे ४


# नवी दिवाळी



नवी दिवाळी करू गड्यांनो,
नवी दिवाळी करू ।
अनाथ कोणी असेल दुर्बल,
त्याचा हात हाती धरू।।
शरीरासंगे स्वच्छ करू मन
धर्म जातीचे नष्ट करू तण ।
सद्‌भावाचे दीप चेतवुन
बंधुभावना सिद्ध करू ।।१।।
मत्सररूपी जाळू दानव
क्रोध शांतवू, मिटवू तांडव ।
माणुसकीची गाणी त्यांची
मांगल्याची ऋचा करू ।।२।।
मायपित्यांचे आज्ञापालन
गुरुवचनाचे नित्य आचरण ।
आशीर्वादे त्यांच्या,
पुढची विकासगामी वाट करू
।।३।।
अज्ञानाचे जळमट जाळू ...!
विज्ञानाची गृहिते पाळू ... ।
विश्वशांतीच्या गुढीस अवघ्या
सत्यशिवाची ध्वजा करू ।।४।।

***

– **रवीन्द्र भट**, सी४६, विजय कॉम्प्लेक्स, शास्त्रीनगर, पुणे २९



# गाणे

शब्दांत जे खुलावे, ते गीत का सुचेना
हा सांध्य रंग दाटे, का पापणी उलेना ....
त्या क्षितिज सावल्यांनी, मज घातले उखाणे
आभाळ आर्त गाते, ओठात वेडगाणे....
ते गीत का सुचेना, शब्दात जे खुलावे
हे फूल उमललेले, आता कसे मिटावे....

***

**डॉ. शंतनू चिंधडे,**
९/११४६ सूरश्री, लकाकी मार्ग, पुणे १६.

# सहजीवन



जातपात खोटी रे माणुसकी मोठी रे
जगतो ना आपण एकमेकासाठी रे ?।।धृ.।।
बंधुभाव जागा, मनी प्रेमधागा
हातात हे हात, एकतेचे गीत
करुणेचा ठिबके थेंब थेंब ओठी रे ।।१।।
पांगळे न आम्ही, आंधळे न आम्ही
आमुच्या मनात, ममतेची ज्योत
हृदयाच्या पडती, हृदयाशी गाठी रे ।।२।।
भेदभाव नाही, थोर-सान नाही
ओळखतो फक्त, माणसास मुक्त
सारखीच पेटते ना भूक ही पोटी रे ।।३।।
भक्ती माणसाची, पूजा माणसाची
माणसेच अंती, माणसास शांती
कोणासही मुभा इथे उघडाया ताटी रे ।।४।।

***

- फ. मुं. शिंदे
'यमुना' ८३, म.गांधीनगर,
पद्मपुरा, औरंगाबाद

# पिल्लू एकटे

हेमा लेले



त्या दिवशी मी माझी खरेदी वगैरे उरकून घरी आले तर आमच्या बिल्डिंगच्या खालच्या मैदानावर छोट्या-मोठ्या मुलांचा क्रिकेटचा खेळ अगदी रंगात आला होता. दिवाळीची सुट्टी असल्यामुळे अभ्यासातून सुटल्याचा आनंद सगळ्या मुलांच्या चेहऱ्यावर नुसता झळकत होता. मीपण हेवा वाटून त्यांचा खेळ बघू लागले.

एक छोटा, सात-आठ वर्षांचा चुणचुणीत मुलगा ऐटीत बॅट हातात धरून बॅटिंगला सज्ज झाला होता. बाकीची मुलं त्याच्या नावानं 'अक्षय---अक्षय' असं ओरडत होती, त्याला हाका मारत होती. त्यामुळे त्याचं नाव मला आपसुकच कळलं. बघताक्षणी आवडावं असं ते गोंडस पोरगं ऐटीत चेंडू झोडपू लागलं. सगळेजण त्याच्या तडाखेबंद फलंदाजीवर जाम खूष ! पण चार-पाच बॉल असे झोडपल्यावर त्यानं मारलेला बॉल अचानक माझ्या गॉगलवरच आदळला. माझ्या डोळ्यांसमोर अक्षरश: काजवे चमकले. मी फुटका गॉगल सावरत चटकन खालीच बसले. चांगलाच मार लागला होता. पटापट सगळी मुलं माझ्याभावेती जमली. सगळे नि:शब्द नि घाबरलेले. कुणालाच समजेना काय करावं. काही क्षण तसेच गेले. मी जरा सावरून उठले. डोळ्याच्या बाजूला चांगलंच टेंगूळ आलं होतं. गॉगल तर फुटलाच होता, पण डोळा जेमतेम वाचला होता. सगळी मुलं अपराध्यासारखी मान खाली घालून उभी होती. कुणीतरी सॉरी म्हटलं. तेवढ्यात अक्षय धावत माझ्यापाशी आला. खाली राहणाऱ्या काकूंकडून त्यानं घाईघाईनं, तत्परतेनं मला पाणी आणून दिलं. त्याही अवस्थेत मला अक्षयचं खूप कौतुक वाटलं.

माझ्या हातात पाण्याचं भांडं देऊन खाली मान घालून अक्षय मला म्हणाला,''सॉरी हं काकू! तुम्हाला चांगलंच लागलं. पण मी मुद्दामहून नाही केलं काकू...'' ...भोवतालची सगळी त्याच्यापेक्षा मोठी असलेली मुलं हतबुद्ध झालेली असताना हे छोटं पोर मात्र माझ्याशी योग्य रीतीनं माफी मागत संवाद साधत होतं. इतकंच नाही तर धावपळ करून समयसूचकतेनं त्यानं पाणीपण आणून दिलं होतं याचं मला कौतुक वाटलं... त्या प्रसंगानंतर अक्षयची नि माझी दोस्तीच जमली.

येता-जाता, ग्राऊंडवर खेळताना मला तो हमखास भेटायचा. व्यवस्थित रंगसंगतीचे कपडे, पायांत खेळायचे शूज, डोक्यावर कॅप अशा थाटात तो असायचा. बघावा तेव्हा कसा व्यवस्थित. त्याच्याबद्दल मला

एक कुतूहल वाटू लागलं होतं. भेटला की आवर्जून मला 'हाय' म्हणायचा.

एक-दोन वेळा मी त्याला खाऊ दिला. त्यानं आढेवेढे न घेता 'थँक्यू' म्हणत तो खाऊ आनंदानं गट्टम केला. एक दिवस तर अगदी मोकळेपणानं आपल्याला आवडणाऱ्या चॉकलेटचं नाव सांगून तो मोकळा झाला. आणि ''आता माझ्यासाठी ते चॉकलेट आणाल ना?'' असं लाघवीपणे विचारलं त्यानं.

अक्षय हळूहळू माझ्या घरीपण यायला लागला. कधी टी.व्ही. बघत बसायचा. कधी आमच्या योगेशबरोबर कॉम्प्युटरवर गेम खेळायचा. खाऊ दिला तर मोकळेपणानं खायचा. अक्षय चांगलाच हुशार होता. खूप मनमोकळा नि लाघवी होता. आमच्या घरात तो खूपच आवडता झाला. जणू कुटुंबामधला एक सदस्य. काही विशेष पदार्थ केला तर त्याला मी हाक मारू लागले. अक्षय स्वत:ची डिश नीट विसळून ठेवायचा. त्याची समज त्याच्या वयाच्या मानानं खरोखर जरा जास्तच होती. एक दिवस मी त्याच्या आई-बाबांबद्दल त्याला विचारलं. त्यानं तुटक उत्तरं दिली.

अक्षय आई-बाबांचा एकुलता एक ! आई-बाबा दोघं अधिकाराच्या जागेवर काम करणारे. घरी नसायचेच. एक कामाची बाई नि अक्षय - दोघेच दिवसभर घरी. अक्षयला घरी करमायचंच नाही. तो एकसारखा आमच्याकडे येऊन बसू लागला. काकू, काकू करीत मला चिकटू लागला. जणू माझं आणखी एक छोटं पिल्लू ! माझंही मन अखेर



**आसवांची डोळ्यांतिल एक कहाणी व्याकूळ**
**रक्त आपुलेच होते पाण्याहुनही पातळ.**

एका आईचं. अक्षयवर मी माझ्या मुलाप्रमाणं कधी माया करू लागले ते माझं मलाच कळलं नाही. आमच्या घरी एक दिवस अक्षयच्या एकसारखं आमच्याकडे रमण्यावरून जराशी चर्चा देखील झाली. त्याच्या 'आई-बाबांचं लक्ष नसतं त्याच्याकडे'... यावर जवळजवळ एकमत झालं. अक्षय

प्रेमाचा किती भुकेला आहे हे मला स्पष्टच कळत होतं.

अक्षयच्या घरात अक्षयला रमावंसं वाटेल अशा वातावरणाची गरज होती. पण या साऱ्या गोष्टींना कसं तोंड फोडायचं ? हे समजत नव्हतं.

या प्रश्नाचा विचार करीत असताना एक दिवस अक्षयच्या घरून त्याच्या आईचा मला फोन आला. अक्षय तापानं फणफणला होता. गेले दोन दिवस तो आला नव्हता खरा... अक्षय 'काकू, काकू' घोकत होता. मी अक्षयकडे प्रथमच गेले. नीटस, सुंदर घर होतं. सर्व सुख-सोयींनी सज्ज. मी गेल्यावर अक्षय मला सोडेचना. ''काकू, तुम्ही इथंच राहा. नाही तर मला तुमच्याकडं न्या !'' असं म्हणून हट्ट करून रडू लागला. अक्षयची आई दुखावली गेल्याचं मला समजत होतं. अक्षयचा हट्ट संपेना, म्हटल्यावर त्याची आई त्या आजारी पोरावर वसकन् खेकसली. ते ऐकून माझी सहनशक्ती संपली. मी अक्षयला उगी केलं. त्याला न जाण्याचं आश्वासन देऊन त्याच्या आईला बाहेरच्या हॉलमधे बोलावलं. सारा धीर एकवटला नि बोलू लागले. ''अक्षयच्या आई, रागावू नका. पण अक्षयचा आजार म्हणजे खरं तर त्याचं एकटेपण आहे. तुम्ही त्याच्यासाठी थोडा वेळ काढू शकाल तर बघा ! मला अक्षय खूप आवडतो म्हणून सांगते !''

हे ऐकून मला अनपेक्षित प्रतिक्रिया मिळाली. अक्षयच्या आईनं चक्क माझा हात हातात घेतला नि म्हणाली,''होय! पटतं मला, अक्षयला तुम्ही जीव लावला आहेत हेही दिसतं मला... पण काय करू ! मला वेळ नाही. सारं ॲडजस्ट करणं फार कठीण जातं.''

मी न राहवून म्हटलं,''अक्षयचे आजोबा, आजी... कुठे असतात?''

अक्षयची आई म्हणाली,''पुण्यात कुणीच नाही ! आम्ही एवढे बिझी असतो ना ! समजतं मला सारं... पण काय करू ?''

ते ऐकून मला खूपच दिलासा आला. मी काही बोलणार एवढ्यात तीच म्हणाली,''तुम्ही माझ्यापेक्षा अनुभवी आहात. मला तुमचा सल्ला आवडेल !''

अक्षयची आई मला अक्षयसारखी मनमोकळी वाटली ! मी तिला एक दिवस रविवारी आमच्या घरी येण्याचं आमंत्रण दिलं. ती आली. इतकंच नव्हे तर अक्षयचे बाबा आणि अक्षयही बरा होऊन आला. बोलता बोलता तोडगा निघाला. अक्षयच्या आई-बाबांनी ऑफिसव्यतिरिक्तचा जास्तीत-जास्त वेळ अक्षयला देण्याचं ठरवलं. योगेशच्या ओळखीनं अक्षयला संध्याकाळी क्रिकेटच्या कोचिंग क्लासमध्ये पाठवायचं आम्ही नक्की ठरवलं ! विशेष अभ्यास करून घेणाऱ्या एक शिक्षिकाही माझ्या ओळखीनं मी अक्षयसाठी मिळवून दिल्या. त्या शिक्षिकेनं नियमित सकाळी घरी येऊन त्याचा अभ्यास घ्यायचं कबूल केलं. दर रविवारी आई-बाबा इतर सारं काही बंद करून अक्षयबरोबर राहातील हे ठरलं.!... मधे बरेच दिवस लोटले. अक्षयचं माझ्याकडचं येणं-जाणं कमीच झालं होतं पण मला त्याचं कारण ठाऊक होतं. अक्षयच्या गोंडस चेहऱ्यावर वेगळाच उजाळा आला होता हे स्पष्ट दिसत होतं. मी खरोखर खूश होते. एक दिवस शनिवारी अक्षय माझ्याकडे आला नि म्हणाला, ''काकू, उद्या ग्राऊंडवर माझी एक दिवसाची क्रिकेट मॅच आहे. आई-बाबा येणारच आहेत, पण तुम्ही देखील यायचंय ! मला आवडणारं चॉकलेट घेऊन.'' मी कबूल केलं.

दुसऱ्या दिवशी आम्ही सारेजण ग्राऊंडवर गेलो. अक्षय ऐटीत मैदानावर आला. तडाखेबाज फलंदाजी करू लागला. त्याचा आत्मविश्वास जाणवेल इतका लख्ख होता. चेहरा निश्चयी ! मी कौतुकानं अक्षयच्या आईकडे बघितलं. तिला ते जाणवलं ! तिनं माझा हात हातात घेतला. मला तिच्या हाताची ऊब जाणवली; आणि वाटलं,''किती वेळेवर जागं होऊन तिनं आपल्या एकट्या पिलाला ही ऊब दिली !''... आणि मैदानात पराक्रम गाजवणाऱ्या अक्षयच्या बरोबरीनं मी त्याच्या आईलाही

'ब्रेव्हो !' म्हटलं...अगदी मनापासून !

***

- हेमा सुभाष लेले
१५, हेरंब, गजानन सोसायटी,
परमहंसनगर, पौड रोड, पुणे ३८



**प्रेमासाठी सुखा विसरणे हीच सुखाची पूर्ती**
**प्रेमासाठी स्वार्थी विसर्जन हीच खरोखर मुक्ती**

# इमानी इनाम

**शकुंतला फडणीस**




***गणेशला आता अभ्यासापेक्षा प्रश्नं, कुपनं, बक्षीसं याचाच नाद लागला. वेगवेगळया स्पर्धांसाठी कुपनं, पोस्टकार्ड भरून पाठविण्याचा त्यानं धडाकाच लावला. पण एवढा खटाटोप करून बक्षीस नाहीच ! त्याचा यातच इतका वेळ जायचा की त्याला अभ्यासाला सवडच मिळायची नाही. याचा परिणाम व्हायचा तोच झाला, चाचणी परीक्षेत तो चक्क नापास झाला. -गणेशचं पुढं काय झालं ? तो या चक्रातून कसा बाहेर पडला ते वाचूया शकुंतला फडणीस यांच्या या कथेत !***

भोवती वह्या-पुस्तकं पसरून गणेश काहीतरी लिहीत बसला होता; लिहिण्यात त्याची अगदी तंद्री लागली होती. मध्येच तो मान वर करून, गालावर हात ठेवून काहीतरी आठवत होता; पण त्याचं कुठे इकडे तिकडे इतकंही लक्ष नव्हतं. ते बघून आई मनोमन सुखावली. पोरगं मनापासून अभ्यास करतंय म्हणून तिला खूप बरं वाटलं. पण-पण गणेश मुळी अभ्यासाचं काही लिहीतच नव्हता ! अभ्यासाच्या वहीत वेगळाच कागद होता अन् त्यावर जाहिरातीच्या स्पर्धांची उत्तरं लिहिण्यात गणेश गर्क झाला होता.

गणेश तसा अभ्यासात बरा होता. मात्र, खूप हुशारही नव्हता. आपण चांगलं शिकावं अन् आई-बाबांना, घरातल्यांना सुखात ठेवावं, असं त्याला मनापासून वाटायचं. पण आपला अभ्यासाचा आवाका तेवढा नाही हेही त्याला कळत होतं. त्यामुळे काय करावं हेच त्याला समजेनासं झालं.

वर्गातल्या हुशार मुलांच्या कधीकधी गप्पा चालायच्या. कोणी म्हणे, मी डॉक्टर होणार - कुणी म्हणे, मी इंजिनीअर होणार. कुणाची सी.ए. व्हायची महत्त्वाकांक्षा होती तर कोणाचं आय्.ए.एस्. व्हायचं स्वप्न होतं. त्यांची बोलणी ऐकून गणेश मनाशी हिरमुसला व्हायचा. त्याला वाटायचं, ही मुलं खूप शिकतील - खूप पैसे मिळवतील. पण त्यांचं काय, ती हुशार आहेत. शिवाय पैसेवालीही आहेत ! थोडे कमी



**ध्येय तुजला जर गाठायाचे,**
**स्वप्नी रमुनी हे, कसे व्हायचे ?**

मार्क पडले तर भरमसाट देणग्या देतील त्यांचे आईबाप ! पण आपण ? आपली परिस्थिती बेताची. त्यात आपला अभ्यासही बेताचा. आपल्याला भारी पगाराची नोकरी थोडीच मिळणार आहे ? गणेश विचारात पडायचा.

मग मनाशी तो खट्टू व्हायचा. उदास व्हायचा. आपलं घर छान असावं, घरात चांगलं-चुंगलं सामान असावं, सर्वांना झुळझुळीत कपडे असावेत, असं त्याला खूप वाटायचं; पण या साऱ्याला पैसा हवा, तो कुठून आणायचा ?

अगदी काही सुचेना झालं म्हणून गणेशनं सहज टी.व्ही. लावला आणि आणि तो बघतच राहिला ! दूरदर्शनच्या छोट्या पडद्यावर मोठी आकर्षक जाहिरात झळकत होती - आमचे स्कॉलर बनियन खरेदी करा अन् हजारोंची बक्षिसे मिळवा ! गणेश नुसताच हुरळून गेला. नाही तरी त्याचे बनियन अगदी जुने झाले

होते. केव्हा फाटतील त्याचा नेम नव्हता. म्हणजे नवीन घ्यायला झालेच होते. मग याच कंपनीचे घ्यायचे !

लागलं बक्षीस तर पैसेच पैसे!

मग काय, दूरदर्शनवरच्या जाहिरातींनी तो एकदम भूलभुलैयातच सापडला. काय एकेक मस्त बक्षिसं होती ! सोन्याची साखळी काय, पाच हजार रुपये काय, मोटरगाडी काय, फटफटी काय - अन् यासाठी करायचं काय ? तर फक्त स्पर्धाकूपन भरून पाठवायचं, तेसुद्धा कित्ती सोप्पं. 'मी सागर लाल दंतमंजन वापरतो, कारण... किंवा मी स्नानासाठी लाइफबॉय साबण वापरतो कारण....' पुढे फक्त दहा शब्दांत उत्तर लिहायचं, बस ! बरं, दंतमंजन, अंगाचा साबण, कपड्याचा साबण, मीठ, असल्या वस्तू तर रोजच लागतात. या नाही तर त्या कंपनीच्या. पण काटा छाप मीठ खरेदी करायचं - एखादे वेळी सोन्या-चांदीची मोहोर त्यात मिळू शकेल ना! लागली लॉटरी तर बरंच झालं.

भारी अन् महागड्या वस्तू घेणं शक्य नव्हतं. पण या साध्या साध्या वस्तू घ्यायला काय हरकत आहे, असं गणेशला वाटलं. त्यानंतर विविध मालिकांच्या शेवटी प्रश्न असतात तिकडे त्याचं लक्ष गेलं. हेही प्रश्न किती सोपे ! रामेश्वरीने सुनेला कोणता सल्ला दिला ? मोहनलालसाठी माधुरीने कोणते सरबत बनवून दिले ? किंवा दादीमाँने बबलूसाठी कोणते व्रत केले? साधे अन् मामुली प्रश्न; पण उत्तरांत नंबर लागला तर भव्य बक्षीस नक्की. हीसुद्धा लॉटरीच !

गणेशला आता अभ्यासापेक्षा याचाच नाद लागला. वेगवेगळ्या स्पर्धा, त्यांची उत्तरं, कुपनं भरणे, स्पर्धा पोस्टकार्ड लिहून पाठवणे याचा त्यानं धडाका लावला. मग निकाल ऐकायची उत्सुकता. अरोरा-नवी दिल्ली, खन्ना-कानपूर, सुब्रह्मण्यम्-चेन्नई वगैरे नावं टी.व्ही. वर झळकायची. पण गणेशचं? ऊंहूं. मग गणेशनं नवी युक्ती काढली. एकेका उत्तरासाठी तो चार-चार, सहा-सहा कार्ड पाठवू लागला नाही तरी लकी ड्रॉ पद्धतीनंच बरीचशी बक्षीसं असतात ना. त्यामुळे बक्षिसाची शक्यता चौपटीनं किंवा सहापटीनं नाही का वाढली ? पण छे. एवढा खटाटोप करूनसुद्धा बक्षीस नाहीच ! गणेशचा सगळा वेळ याच भानगडीत जायचा - अभ्यासाला सवडच मिळायची नाही. परिणाम व्हायचा तोच झाला. चाचणी परीक्षेत गणेश चक्क नापास झाला !

आता मात्र तो जाम सटपटला. आजवर तो कधीच नापास झाला नव्हता. पन्नास टक्क्यांच्या आसपास त्याला मार्क पडायचे अन् आता सपशेल नापास ? आई-बाबा काय म्हणतील ? गणेशला भीतीच वाटू लागली. काळजीही वाटू लागली. पण घरात आई-बाबांना त्यानं सांगितलं - ''ते नवीन सर आलेत ना, फार कडक पेपर तपासले त्यांनी. अहो, पहिल्या-दुसऱ्या नंबरलासुद्धा आखडूपणानं मार्क दिलेत. शिवाय परीक्षेच्या वेळी माझं डोकंही दुखत होतं ना -''

होय. परीक्षेच्या वेळी त्याचं खरोखरच डोकं दुखत होतं. तासन्तास टीव्ही बघायचा. मग दुसरं काय होणार ? सारखं डोकं दुखायचं. डोळे दुखायचे. अभ्यास तरी कसा होणार ? गणेश आता निराश होऊ लागला. इकडे बक्षीस वगैरे काहीच नाही. उलट

त्यापायी खर्च अन् बाकीच्या उचापती मात्र वाढत होत्या ! आणि वर अभ्यासाचं वाटोळं. गणेश अस्वस्थ झाला. गोंधळून गेला. त्यात आई-वडिलांशी खोटं बोलल्यामुळे त्याचं मन त्याला खाऊ लागलं.

गणेशचे आई-वडील तसे अशिक्षित होते. वडिलांना जेमतेम अक्षरओळख होती. वडील चार घरी माळीकाम करायचे. आई दोन-तीन घरी पोळ्या अन् वरकाम करायची. आता गणेशनं ठरवलं, टी.व्ही.च्या स्पर्धा अन् कुपनं हे सगळं बंद करायचं, आधी अभ्यास नीट करायचा अन् सुट्टीच्या दिवशी आई-बाबांच्या कामावर त्यांना मदत करायला जायचं. त्यांचे कष्ट तेवढेच कमी होतील ! गणेशनं हे अगदी मनापासून ठरवलं.

त्याप्रमाणे तो जाऊ लागला. मनापासून काम करू लागला. त्यातल्या त्यात आपटे काकूंकडचं काम तो विशेष आवडीनं करायचा. त्याही गणेशला प्रेमानं वागवायच्या. पुस्तकांचं कपाट लावायचं, पंखे, ट्यूब-लाईट वगैरे पुसून काढायचे, बाजारातून सामान आणून द्यायचं, लाँड्रीत जायचं वगैरे कामं त्या गणेशला सांगायच्या चांगलं-चुंगलं खायलाप्यायला द्यायच्या. त्याच्या अभ्यासाची चौकशी करायच्या. त्याला वाचायला छान छान पुस्तकं द्यायच्या. गणेशही त्यांचं काम आनंदानं करायचा.

त्यांच्या एवढ्या मोठ्या बंगल्यात आपटे काका अन् आपटे काकू दोघंच राहायचे. त्यांची मुलं लांब परगावी राहायची अन् सुट्टीला यायची. काका अन् काकू दोघंही हौशी, आनंदी होते. गणेशला ते आपल्याबरोबर कधीकधी गाडीतून न्यायचे. त्याला कधी बिस्किटं किंवा चॉकलेट द्यायचे. थोडक्यात काय, काका-काकूंचं अन् गणेशचं छान जमत होतं. विशेषत: काकूंना गणेश फार आवडायचा. चुणचुणीत अन् हसतमुख - शिवाय नम्र अन् प्रामाणिक - मग गणेशवर काका -काकू खूश नसतील तरच नवल!

एक दिवस काका-काकूंना पार्टीला जायचं होतं. सुंदर भारी साडी, नव्या फॅशनचा पूर्ण हातांचा स्वेटर अन् गळ्यात सोन्याचा हार - सारं किती खुलून दिसत होतं काकूंना. निघायच्या वेळी, ''काही नको स्वेटर'' असं म्हणत काकूंनी घाईगडबडीनं अंगातला स्वेटर काढून हातावर टाकला अन् त्या पटकन गाडीत जाऊन बसल्या. कारण इकडे काकांनी गाडी सुरूही केली होती. गणेश फाटक बंद करायला निघाला अन् अचानक त्याचं लक्ष एका लहानशा चकचकीत वस्तूकडे गेलं. पूर्ण हाताचा स्वेटर काढताना काकूंच्या हातातली अंगठी खाली पडलेली होती !

गणेशनं अंगठी उचलून नीट बघितली. किती सुंदर दिसत होती ती अंगठी ! एकदम चकाचक. तिला खडे बसवले होते. ते चमकत होते. गणेश ती अंगठी न्याहाळतच बसला. मग त्यानं रुमालात गाठी मारून ती अंगठी बांधली अन् हातात घट्ट पकडून ठेवली. मनात म्हणाला - खूप महाग असणार ही. हजार रुपये तरी पडले असतील ! गणेशचं काम होतच आलं होतं. त्यानं माळीकामाची हत्यारं गॅरेजमध्ये ठेवली. गॅरेजला कुलूप लावलं. किल्ली खिडकीतून व्हरांड्यात टाकली अन् तो घरी आला.

घरी आला अन् अंगठीच्या विचारात गढून गेला. घरी तो एकटाच होता. आई-बाबा सकाळीच गावी गेले होते. दोन दिवसांनी यायचे होते. गणेशसाठी आईनं डबा करून ठेवला होता. जेवून तो अंथरुणावर पडला. त्याच्या डोळ्यांपुढे सारखी ती अंगठी दिसत होती. अंगठीचा विचार करताकरता झोप कधी लागली ते गणेशला कळलंच नाही.

दुसरे दिवशी सकाळी गणेश बंगल्यावर गेला. घराचं दार लोटलेलंच होतं. ते ढकलून गणेश घरात गेला. काका अन् काकू दोघंही गंभीर दिसत होते. काकूंचा चेहरा तर पार उतरलेला होता. अशा वेळी काय करावं, काय बोलावं, गणेशला कळेचना. तो क्षणभर बावचळून गेला. जरा वेळ तिथंच घुटमळला. मग विजारीच्या खिशात हात घालून त्यानं आपला जुना रुमाल बाहेर काढला. सात-आठ गाठी सोडून अंगठी बाहेर काढली अन्

म्हणाला,''काकासाहेब, हे बघा मला बागेत काय सापडलं.''

गणेशच्या हातातली अंगठी काकूंनी जवळजवळ झडप घालूनच उचलली. आपल्या तळहातावर ठेवून जरा निरखली अन् मूठ घट्ट मिटून त्यांनी ती अंगठी अत्यानंदानं छातीशी धरली. त्यांना इतकं भरून आलं की आनंदानं त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं ! ''अरे, कुठं सापडली तुला ही ?'' काकांनी विचारलं. गणेशनं सांगितलं की बागेतच पडली होती.

''अन् इकडे आम्ही शोध शोध शोधलं. गाडीमध्ये, जायच्यायायच्या रस्त्यावर, वाटेत गजरा घेतला तिथे, पार्टी झाली त्या हॉटेलचा तर कानाकोपरा धुंडाळून झाला. अगदी पायपुसणंसुद्धा उलटं करून बघितलं !'' काकू सांगू लागल्या.

त्यामुळे गणेशची खात्री पटली - अंगठी निदान पाच हजाराची तरी असेल. पण पाच नव्हे - पन्नास हजाराची होती ती ! अंगठीला हिरे बसवलेले होते. काकूंच्या वाढदिवसानिमित्त काकांनी त्यांना हौसेनं ती केलेली होती ! सात हिरे जडवलेली मौल्यवान अंगठी परत मिळाली - गणेश अन् त्याचे आई-बाबा नको नको म्हणत असतानाही काकूंनी गणेशला एक हजार रुपये इनाम दिले !


स्पर्धा, कुपनं, लॉटरी - काहीही न करता गणेशला आज अचानक भव्य बक्षीस मिळालं होतं.

मात्र हे बक्षीस त्याला बिघडवणारं नाही - घडवणारं होतं! आयुष्यभर पुरणारं !


***

सौ. शकुंतला फडणीस
१२३३ शुक्रवार,सुभाषनगर,
रस्ता क्र.४, पुणे २.

# भारताची चंद्रावर स्वारी











–डॉ. प्रकाश तुपे

लहान-थोरांना चंद्राविषयी प्रचंड आकर्षण असते. लहानपणापासून आपण चंद्राला मामा मानून चंदामामाच्या अनेक गोष्टी आणि ''चांदोबा चांदोबा भागलास का'' यासारखी गाणी ऐकत आलो आहोत. निंबोणीच्या झाडामागे लपत असलेला चांदोबा आयुष्यभर आपल्याला साथ देतो. ग्रहणे, अमावास्या, पौर्णिमा आणि चतुर्थीला विशेष करून त्याची आपल्याला आठवण येते. अशा या चंदामामाला प्रत्यक्ष भेटण्याचे स्वप्न माणूस शतकानुशतके पाहात होता. अखेरीस २० जुलै १९६९ रोजी अमेरिकेच्या अपोलो यानाने चंद्रावर यशस्वीपणे उतरून नवीन इतिहास घडविला. नील आर्मस्ट्राँग हा पहिला मानव ठरला की ज्याने आपल्या पावलाचा ठसा चंद्रावर उमटविला. त्यानंतर अमेरिकेचेच वीस अंतराळवीर चंद्रावर जाऊन आले. तेथून पृथ्वीवर आणलेल्या ३८१ किलो वजनाच्या दगड-मातीमुळे चंद्राचे खरे स्वरूप आपल्याला समजले. अमेरिकेने डिसेंबर ७२ मध्ये अपोलो १७ मोहीम संपल्यावर चंद्राची मोहीम आवरती घेतली. रशियाने देखील ल्यूना-१ नावाच्या मोहीमेद्वारे १९५९ मध्ये सुरू केलेली चांद्रमोहीम ल्यूना-२४ मोहीम १९७६ मध्ये पूर्ण करून चंद्रावरचे आपले लक्ष काढून घेतले.

अवकाश मोहीमांमधे चंद्राचे नाव मागे पडत असताना या वर्षी मार्च महिन्यात भारताच्या अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) आम्ही चांद्रमोहीम यशस्वीरीत्या राबवू शकतो, असे जाहीर करून खळबळ उडविली. पंतप्रधानांच्या कार्यालयातील राज्यमंत्री वसुंधरा राजे यांनी पार्लमेंटमध्ये जाहीर केले की,''भारतीय अवकाश संशोधन संस्थेने चांद्रमोहीमेविषयी प्राथमिक अभ्यास पूर्ण केला असून, ही मोहीम हिरवा कंदील दाखवल्यापासून ५ वर्षांत यशस्वीरीत्या पूर्ण होऊ शकेल. इस्राचे चेअरमन डॉ. कस्तुरीरंगन यांच्या मते भारतीयांमध्ये चंद्राची मोहीम राबविण्यासाठीची तांत्रिक क्षमता आहे. चांद्रमोहीम ही अत्यंत प्रतिष्ठेची असून, त्यात विविध पातळ्यांवर असलेल्या आव्हानामुळे आपल्या देशातील वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीला फार मोठा हातभार लागणार आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नाव वेगळ्या उंचीवर पोहोचून त्यापासून भारताला अनेक पातळ्यांवर फायदा मिळू शकेल.

अवकाश मोहीमांची सुरुवात होऊन जवळजवळ ४३ वर्षे उलटून गेलीत.सर्वप्रथम रशियाने स्पुटनिक-१ नावाचा ८३ किलो वजनाचा छोटा गोळा अंतराळात प्रक्षेपित करून जगभर खळबळ उडविली. अमेरिकन राज्यकर्ते आणि शास्त्रज्ञ रशियाचे यश पाहून पूर्णपणे हादरून गेले. त्यानंतर रशियाने अवघ्या २ महिन्यांत लायका नावाची कुत्री स्पुटनिक-२ यानातून अंतराळात पाठविली. तंत्रज्ञानात फुशारकी मारत असलेल्या अमेरिकनांना रशियाचे हे यश प्रचंड झोंबले. त्यांनी देशाची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी ''व्हॅनगार्ड'' नावाचा प्रकल्प चालू केला. त्यांच्या व्हॅनगार्ड-१ चे पहिलेवहिले प्रक्षेपण अयशस्वी झालेले लाखो लोकांनी टी.व्ही.वर पाहिले. अमेरिकन शास्त्रज्ञांनी या अपयशानंतर मोठ्या प्रमाणावर व्हॅनगार्डची

उड्डाणे चालू केली. त्यात त्यांच्या पदरी कधी यश तर कधी अपयश पडले. रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये अवकाश मोहीमांची तीव्र स्पर्धा सुरू झाली. अमेरिकन लोकांची व शास्त्रज्ञांची अस्मिता जागविण्यासाठी १९६० च्या राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकीत या विषयावर जॉन एफ. केनेडी यांनी भरपूर भाषणे दिली व निवडून आल्यावर, ''येत्या १० वर्षांत अमेरिका चंद्रावर माणूस उतरवेल'' अशी धाडसी घोषणा केली. आपल्या राष्ट्राध्यक्षांचे शब्द खरे करण्यासाठी चार लाख शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि प्रशासकीय लोकांनी रात्रीचा दिवस करून दहा वर्षे पुरी होण्याच्या आतच म्हणजे २० जुलै १९६९ रोजी नील आर्मस्ट्राँगला चंद्रावर उतरविले. या अपोलो मोहीमेमुळे अमेरिकेचे अवकाश तंत्रज्ञान फार मोठ्या प्रमाणात सुधारले. रशियाने देखील अनेक चांद्रमोहीमा केल्या. खरे पाहता रशियाचे ल्यूना-१ हे चंद्राजवळ गेलेले पहिले अवकाशयान, तर ल्यूना-२ हे चंद्रावर आपटविलेले पहिले अवकाशयान आहे. मात्र रशियाने चंद्रावर अवकाशयात्री उतरविण्याचा प्रयत्न न करताच चांद्रमोहीम आवरती घेतली. अमेरिका आणि रशिया सोडता युरोपियन राष्ट्रांनी अवकाश तंत्रज्ञानात बरीच मोठी प्रगती केली आणि त्यांनी १९७४ मध्ये ''युरोपियन स्पेस एजन्सी'' नावाची संस्था स्थापली. या संस्थेने हॅलेच्या धूमकेतूकडे ''जियोटी'' नावाचे यान १९८६ मध्ये पाठविले होते. त्यांना देखील चांद्रमोहीमांचे आकर्षण असल्याने नजीकच्या काळात चांद्रमोहीमा आखण्याची स्वप्ने ते पाहात आहेत. तसेच जपान देखील चांद्रमोहीमा राबविण्याच्या तयारीत आहे. या पार्श्वभूमीवर चांद्रमोहीमेची सुरुवात करून भारत आपला ठसा अवकाश मोहीमांच्या क्षेत्रात उमटवू पाहात आहे.

अमेरिकेने चांद्रमोहीमा आवरत्या घेतल्याच्या वर्षी म्हणजे १९७२ मध्ये भारत सरकारने इस्रोची स्थापना केली. डॉ. विक्रम साराभाई यांनी तरुण शास्त्रज्ञांच्या मदतीने पहिला उपग्रह तयार करण्याचे आव्हान स्वीकारले. बंगलोर येथे १९७२ मध्ये ''इस्रो सॅटेलाईट सेंटर'' नावाचे केंद्र प्रा. राव यांच्या अधिपत्याखाली स्थापले गेले. येथे ''आर्यभट्ट'' नावाचा ३५८ किलो वजनाचा उपग्रह तयार केला गेला. रशियाच्या मदतीने १९ एप्रिल १९७५ रोजी त्याचे प्रक्षेपण रशियाच्याच प्रक्षेपकाद्वारे केले गेले. त्यानंतर देशाची गरज ओळखून पृथ्वीच्या निरीक्षणासाठी ''भास्कर''; दळणवळणासाठी ''ॲपल'' व शास्त्रीय प्रयोगासाठी ''रोहिणी'' प्रकल्प चालू केले गेले. या प्रकल्पांमुळे भारतीय शास्त्रज्ञांना उपग्रह बांधण्याचे, ते प्रक्षेपित करण्याचे आणि त्यांद्वारे संदेश मिळविण्याचे तंत्र आत्मसात करता आले. त्याचाच फायदा घेऊन दळणवळणासाठी ''इन्सॅट'' व सुदूर संवेदनासाठी (रिमोट सेन्सिंगसाठी) आय. आर. एस. प्रणालीचा विकास केला गेला. यापूर्वी भारताने इतर राष्ट्रांच्या कृत्रिम उपग्रहांच्या दळणवळणाची मदत घेऊन उपग्रहांद्वारे माहिती मिळविण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले होते. यामुळे ''साइट व स्टेप'' प्रकल्पाअंतर्गत दूरदूरच्या खेडेगावांत शैक्षणिक टी.व्ही. कार्यक्रम राबविता आला. उपग्रहाद्वारे शेती, जंगल, भूगर्भातील पाणी आणि नियोजनासाठीचा आराखडा तयार करण्यासाठीची प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी ''अमेरिकेच्या लॅण्डसॅड व फ्रेंचांच्या स्पाट'' उपग्रहांची निरीक्षणे हैद्राबाद येथे मिळवून अभ्यासण्याचे तंत्रज्ञान आत्मसात करण्यात आले. इस्रोने २५ वर्षांच्या कालावधीत २३ कृत्रिम उपग्रह तयार करून इतरांच्या मदतीने व काही स्वत: तयार केलेल्या प्रक्षेपकाच्या मदतीने अंतराळात पाठविले. या उपग्रहांद्वारे रेडिओ, टी.व्ही.च्या संदेशाचे दळणवळण, हवामान खात्याला लागणारी मोलाची माहिती व इतर अनेक शास्त्रीय प्रयोग पार पाडले गेले. खगोलशास्त्राच्या अभ्यासासाठी ''अनुराधा'' नांवाचा टाटा मूलभूत संशोधन केंद्राचा प्रयोग तर ''टेरा'' नावाचा सुदूर संवेदन उपग्रह यामध्ये विशेष उल्लेखनीय आहेत. इस्रोने जगभरातील अवकाश संशोधन केंद्रांशी सहकार्य चालू केले असून,''ॲट्रीक्स कॉर्पोरेशन''

नांवाच्या संस्थेद्वारे व्यापारी तत्त्वावर दूरसंवाद व इतर दळणवळणासाठीची यंत्रणा विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे. भारतातील अनेक संशोधन संस्था, विद्यापीठे आणि भारत इलेक्ट्रॉनिक्स, हिंदुस्थान एरोनॉटिक्स, इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीजसारख्या औद्योगिक संस्थांचे सहकार्य इस्रोला मिळत असून, इस्रोबरोबरच या सर्वांचे ज्ञान आणि अवकाश तंत्रज्ञानाचे कौशल्य वाढत आहे.

इस्रोने प्रथम ऑक्टोबर ९९ मध्ये चांद्रमोहीविषयी प्राथमिक काम सुरू केल्याचे जाहीर केले. बंगलोर येथे भरलेल्या परिषदेमध्ये, ''अणुबॉम्ब फोडून भारताने जशी आपली मान जागतिक स्तरावर उंचावली आहे ती अजून उंच करण्यासाठी चांद्रमोहीम राबवावी'' असा सूर अनेक शास्त्रज्ञांनी काढला. अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीने यापूर्वी अमेरिकेने पुरविलेल्या चंद्राच्या दगडाचे विश्लेषण केले असल्याने, ते चांद्रमोहीमेसाठी विविध उपकरणे तयार करू शकतील. भारताच्या पोलर सॅटेलाईट लॉच व्हेइकल (पीएस्‌एल्‌व्ही) ची क्षमता ५३० किलोचा उपग्रह अंतराळात प्रक्षेपित करू शकणारी असल्याने चांद्रमोहीमेचा ३५० किलो वजनाचा चंद्राभोवती फेरी मारू शकणारा ''ऑर्बिटर'' आपण प्रेक्षपित करू शकू, असे इस्रोला वाटते. तसेच आपण लवकरच भूस्थिर उपग्रह प्रक्षेपक किंवा जिओसिंक्रोनस सॅटेलाईट लॉच व्हेइकल (जी.एस.एल.व्ही.) तयार करीत असून, त्याद्वारे ८५० ते ९५० किलो वजनाचा उपग्रह किंवा चांद्रमोहीमेची संयंत्रे प्रक्षेपित करण्याची ताकद इस्रोकडे येत आहे. याचा उपयोग करून इन्सॅट प्रकारचा २.५ टन वजनाचा उपग्रह इस्रो अंतराळात पाठवू शकेल. थोडक्यात, आपल्याकडे अंतराळात भारी वजनाचे उपग्रह पाठविण्याची क्षमता उपलब्ध होत असल्याने चांद्रमोहीमा हाती घेण्यात काहीच धोका नाही, असे इस्रोला वाटते.

इस्रोला शास्त्रज्ञांना असेदेखील वाटते की, चंद्राविषयीची अनेकविध प्रकारची माहिती अजून उपलब्ध नाही. चंद्रावर सापडणारे विविध प्रकारचे दगड आणि चंद्रावर खरोखरच पाणी आहे काय व असल्यास किती याविषयीचे संशोधन भारतीय मोहीम करू शकेल. चंद्राजवळच्या वातावरणात असलेल्या विविध कणांचा व प्रारणांचा अभ्यास आणि धूमकेतूने मागे टाकलेल्या धुळीचे निरीक्षण भारतीय अवकाश मोहीम करू इच्छिते. चंद्राच्या पृष्ठभागाची छायाचित्रे स्टिरिओस्कोपिक यंत्रणेद्वारे आणि गॅमा किरण स्पेक्ट्रोस्कोपीद्वारे करण्याची इच्छा इस्रोच्या संशोधकांत आहे. आय.आर.एस्. उपग्रहाच्या धरतीवर छोटा उपग्रह बनवून तो चंद्राच्या पृष्ठभागाचे सखोल निरीक्षण करू शकेल, असे इस्रोचे संचालक गोयल यांना वाटते. साधारणपणे चंद्राकडे उपग्रह पाठवून तो परत पृथ्वीकडे आणण्यासाठी १० दिवसांचा अवधी लागू शकेल व त्यासाठी ३५० कोटी रुपये खर्च होईल असा प्राथमिक अंदाज आहे. हा खर्च त्या मोहीमेपासून मिळणाऱ्या फायद्याच्या मानाने फारच कमी आहे, असे अनेकांचे मत आहे आणि त्यामुळेच कदाचित या वर्षीअखेर जेव्हा इस्रो सरकारला चांद्रमोहीमेचा आराखडा सादर करील, तेव्हा त्याला मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. असे झाल्यास २००५ च्या सुमारास भारतीय चांद्रमोहीम पूर्णत्वाला जाऊन भारत प्रगत राष्ट्रांच्या पंगतीला जाऊन बसेल. आपण या भावी मोहीमेला शुभेच्छा देऊया.

***

डॉ.प्रकाश तुपे
'गंगासागर अपार्ट.'
८१०, सदाशिव पेठ,
पुणे ३०.



फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश ।
दरी खोऱ्यातून वाहे, एक प्रकाश प्रकाश ।।
शंभरावा अंक
बुद्धिला खाद्य आणि मनाला चेतना देणारे 'छात्र प्रबोधन'


# जुन्यातून नवं काही...

आपल्या घरात वेगवेगळ्या आकाराचे डबे आणि बाटल्या पुष्कळ असतात, पण त्यातून काही वेगळं तयार करून आपल्याला त्याचा पुन्हा वापर करता येईल याचा विचार आपल्या मनात कधी येत नाही आणि आपण त्या वस्तू टाकून देतो. पण जरा विचार केला तर आपल्या लक्षात येतं की या सर्व वस्तूंमधून खूप छान गोष्टी बनू शकतात. ज्या आपल्यालाही वापरता येतात आणि भेट म्हणूनही देता येतात.


साहित्य : च्यवनप्राशच्या बाटल्या, पावडरचे डबे, सूपचे डबे, चिकटवण्यासाठी चिकटमाध्यम, कागद, सुतळी, रंगीत दोरे आपण तयार करणार आहोत त्या वस्तूसाठी लागणारे सर्व काही.


कृती : च्यवनप्राशची बाटली असेल तर ती बाटली मध्ये फुगीर असते. त्याची बाहुली करायची ठरवली तर तिच्या कपड्यांसाठी घरी असलेल्या चिंध्यांमधून रंगीबेरंगी चिंध्या निवडून घ्याव्या. कापूस/कृत्रिम कापूस/स्पंजचे तुकडे किंवा चिंध्या काहीही चालेल. प्रथम बाटलीचे झाकण काढून ठेवावे व बाटलीच्या बाहेरच्या बाजूने कापूस चिकटवून घ्यावा. नंतर रंगीबेरंगी चिंध्या कापूस दिसणार नाही अशा पद्धतीने चिकटवून घ्याव्या. जास्त मोठ्या असणाऱ्या चिंध्या बाटलीच्या तळाला दुमडून चिकटवून घ्याव्या. नंतर त्यावर कागदाचा तळाच्या मापाचा गोल चिकटवावा. त्यानंतर बाटलीच्या झाकणावर कापसाचा एक मोठा गोळा करून घेऊन तो चिकटवावा व नंतर बाहुलीच्या चेहऱ्यासाठी जो रंग हवा असेल तो निवडून तो त्या कापसाच्या गोळ्यावरून बाटलीच्या झाकणाच्या कडेपर्यंत चिकटवून घ्यावा. कापड दुमडताना बाटलीच्या झाकणाला बाहेरच्या कडेवरच दुमडावे. आतल्या बाजूस दुमडू नये नाही तर बाटलीचे झाकण लागणार नाही. हे सर्व करून झाल्यावर बाहुलीचे केस





ज्या रंगाचे हवे असतील त्या रंगाची लोकर त्यावर चिकटवावी आणि बाहुलीचं तोंड अणि डोळे रंगवून घ्यावे किंवा टिकल्या चिकटवाव्या. बाहुलीच्या फ्रॉकवर आपल्या आवडीप्रमाणे सजावट करावी. बाटलीच्या झाकणाची बाहेरची कड आहे. त्यावर रिबीन बांधून बाहुलीला अजून थोडं नटवता येईल. बाटलीचं झाकण उघडता येत असल्यामुळे आपल्याला या आकर्षक बाटलीचा वापरही करता येईल. चित्रात दाखवल्याप्रमाणे हत्ती, जिराफ, इ. प्राणी किंवा डब्याचा पेनस्टँडही करता येईल.





आता जुनी डबा आणि बाटली देणार? की त्याचा वापर करणार

***

**– विद्या नारळकर**
एच ३+४,हिमाली को.ऑप. सोसायटी,
महेंदळे गॅरेज जवळ, एरंडवन,
पुणे ४११ ००४.

वोर्षक वर्गणी रु. १२५/- **छात्र प्रबोधन - सभासद नोंदणीपत्रक**

नवीन सभासद/जुना सभासद क्रमांक : दिनांक :

सभासदाचे नाव : ____________________

संपूर्ण पत्ता : ____________________

मासिकाचे सभासद व्हा ! भरून वर्गणी व हे नोंदणीपत्रक संपर्क पत्त्यावर पाठवा !

दूरभाष क्रमांक : जन्मदिनांक : / /

शाळा : ____________________ इयत्ता - तुकडी ____________

अंक केव्हापासून येतो- नव्यानं/एक वर्ष/दानि वर्ष/ तीन वर्ष/ चार वर्ष/पाच वर्ष

**कार्यालयीन कामकाजासाठी**

वर्गणीचा कालावधी : वर्ष अंक ते वर्ष अंक वर्गणी रक्कम :

पावती क्रमांक : नोंदणी क्रमांक : स्थान क्रमांक :

वर्गणी : वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक/आजीवन, दीपावली विशेषांक रजिस्टरने पाठविणे: हो/नाही

## छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण

**१) 'तुम्हीच संपादक व्हा !' -** आपल्या प्रतिभेला वाव देण्यासाठी या दिवाळीच्या सुट्टीत एक सांघिक प्रयत्न करून ३२ पृष्ठांचे हस्तलिखित तयार करा. शाळा सुरू झाल्यावर आपल्या अध्यापकांच्या मार्गदशनाखाली ते अधिक आखीव-रेखीव व परिपूर्ण करून आमच्याकडे पाठवा.

**२) 'पंख सुरांचे' - ध्वनिफीत निर्मिती स्पर्धा -** आवाजाच्या माध्यमातून पोहोचविता येतील असे खेळ, कोडी, विज्ञान प्रयोग, गाणी, नाट्य, कल्पक जाहिराती, गोष्टी, विशेष मुलाखती, विविध बोलीभाषा, इ. प्रकारांमधून नावीन्यपूर्ण कल्पना वापरून, विद्यार्थ्यांनी ३० मिनिटांची ध्वनिफीत स्वत: तयार करून पाठवावी.

वरील दोन्ही स्पर्धांसाठी - १. स्पर्धा सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी असेल. २. ती एकट्यासाठी नसून गटासाठी आहे. किमान ४ व कमाल ८ जणांचा एक गट असावा. ३. शाळेतर्फे वा स्वतंत्रपणेही विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतील. स्पर्धेला प्रवेशशुल्क नाही. ४. ध्वनिफीत वा प्रकल्प सादर करण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २००१ ५. सर्व सहभागी विद्यार्थ्यांची पूर्ण नावे, पत्ता, इयत्ता असणे आवश्यक आहे. ६. स्पर्धेचे अन्य नियम, तपशील व नोंदणीपत्रकासाठी छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

**३) कोलाज-चित्र स्पर्धा :** या अंकातील श्री.प्रभाकर भावे यांचा 'काही नवं शिकूया - कोलाज' हा लेख तुम्ही वाचला असेलच. त्यातील तंत्रविषयक मुद्द्यांचा नीट अभ्यास करून, स्वत:ची कल्पनाशक्ती वापरून, कोलाज-चित्र तयार करा. चित्राला स्वतंत्र विषय (ढहशाश) असावा. चित्राचा आकार ९''द १२'' घ्यावा. चित्र पाठवताना दुमडून पाठवू नये. मागे स्वत:चे संपूर्ण नाव, पत्ता, दूरभाष क्रमांक व इयत्ता असावी. चित्र पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २००१.

**आकर्षक बक्षिसे अन् सुप्त गुणांना आविष्काराची संधी !**

**अधिकाधिक गटांनी/विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे.**



छात्र प्रबोधनचे सर्व स्थानिक कार्यकर्ते, केंद्रप्रमुख, सभासद, लेखक, चित्रकार, हितचिंतक, देणगीदार, प्रायोजक, जाहिरातदार व अन्य सर्व सुहृद, या सर्वांना ही दीपावली व येणारे नूतन विक्रम संवत्सर अत्यंत उत्साहाचे, पराक्रमाचे, भरभराटीचे, आनंदाचे जावो यासाठी आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा ! - संपादकीय मंडळ व कार्यालयीन सदस्य, छात्र प्रबोधन, पुणे.

## कुटुंबासबंधी माहिती

| | नाते | नाव | शिक्षण | व्यवसाय/जन्मतारीख |
|---|---|---|---|---|
| १. | आई | | | |
| २. | वडील | | | |
| ३. | भाऊ | | | |
| ४. | बहीण | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |

मासिकाचे सभासद व्हा ! वर्गणी व हे नोंदणीपत्रक भरून संपर्क पत्त्यावर पाठवा !

* आपल्याकडे यापैकी काय आहे? फ्रीज/टी.व्ही./व्ही.सी.आर./कौल/कॉम्प्यूटर/स्वत:चा फ्लॅट/बंगला/शेती/फोन/स्कूटर/कार/जीप/टेपरेकॉर्डर/स्टिरिओ सिस्टीम/पेटी/तबला/सतार
* तुम्ही मिळेवलेली बक्षिसे/विशेष यश/तुमचे विशेष छंद

(जागा कमी पडल्यास याच आकाराचा स्वतंत्र कागद जोडावा.)

*** कार्यालयीन कामकाजासाठी ***

अर्ज कोणाकडून आला : पोस्टाने/केंद्राकडून/कार्यालयात समक्ष केंद्राचे नाव :

**छात्र प्रबोधन**

### स्वरूप

* ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठीचे मासिक
  * लागोपाठ ५वर्षे उत्कृष्ट दिवाळी अंकांचे विविध पुरस्कार.
  * महाराष्ट्र, बेळगाव, गोवा मिळून ३५ शहरे आणि ७०तालुके यांमध्ये मिळून ४०,००० पेक्षा अधिक वाचक
* स्थानिक स्वयंसेवी कार्यकर्त्यांद्वारा कार्यरत केंद्रे
  * १०उपक्रम केंद्रे * २० नोंदणी केंद्रे *४०वितरण केंद्रे
  * मासिकाच्या सभासदांसाठी विविध उपक्रम
  * ग्रामीण जीवन परिचय शिबिर व गिरिभ्रमण.
  * नेतृत्व प्रशिक्षण शिबिर, अभ्यास शिबिर.
  * अभ्याससहली, सायकल सहली.
  * व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर, विज्ञान शिबिर.
  * साप्ताहिक उपक्रम, सहली, प्रासंगिक मेळावे.
  * राखी, शुभेच्छापत्र निर्मिती व विक्री उपक्रम.
* **पालक-शिक्षक यांच्यासाठी विविध उपक्रम !**
  * प्रबोधिनी परिचय सहल, संयोजक प्रशिक्षण शिबिर
  * शिक्षक प्रशिक्षण शिबिर, शिक्षक सभा, पालक मेळा
* **विविध शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन**
  आतापर्यंत २४ पुस्तके व तीन ध्वनिफितींची निर्मिती.

### आणि काय करू शकाल ?

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाच्या चळवळीत आपल्याला रस आहे का? आपण ज्ञान प्रबोधिनीच्या उपक्रमांशी संलग्न/ सहभागी होऊ इच्छिता का? आपण खालील प्रकारे सहभागी होऊ शकाल.

* आपल्या भागातील विद्यार्थ्यांना मासिकाचे सभासद करून
* मासिकाच्या सभासदांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करून
* स्वयंसेवी वृत्तीने कार्य करू इच्छिणाऱ्या व्यक्तींचा गट तयार करून
* ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांना स्थानिक स्तरावरील (निवास-प्रवास-स्थानिक सहकार्य इ. बाबत) साहाय्य करून.

कृपया आपला प्रतिसाद छात्र प्रबोधनच्या मुख्य कार्यालयाला कळवावा.

आपल्या अनेकांच्या सहकार्याने या उपक्रमांचे रूपांतर विधायक, विकासाच्या चळवळीत होईल असा विश्वास वाटतो.

छात्र प्रबोधन - सौर कार्तिक शके १९२२

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा.महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर २१ आश्विन शके १९२२, १३ ऑक्टोबर २००० या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले. शंभरावा अंक